आजकाल नवी नवीं नावें धारण करून किती तरी नियतकालिकें अस्तित्वांत येतात व लयास जातात ,आज एक अंक तर कांहीं कालांतरानें दुसरा अंक प्रसिद्ध करून रडुखुट चालणारीं वृत्तपत्रें प्रसिद्ध होऊन नामशेष होतात. ह्या सर्व गोष्टी महाराष्ट्रीय वाचकांच्या परिचयाच्या आहेत.

असल्या व तत्सदृश गंडांतरांखेरीज युरोपियन सिंह समजल्या जाणाऱ्या इंग्रज सरकारशीं केसरीचे वारंवार समरचमत्कार झाले असल्यामुळें अनेक आपत्तींतून, केवळ सहिसलामतच नव्हे, तर, सतत ५० वर्षें आपला उद्दिष्ट हेतु साधीत साधीत, पार पडल्याचें निदर्शक असा हा ज्युबिली–अंक पाहून महाराष्ट्र भाषाभिमानीं लोकांस आज आनंद वाटणें साहजिक आहे.

असले उत्सव ऐकून सुधां मन तल्लीन होतें. त्याचप्रमाणें, अवाढव्य फंड उभारून दुसऱ्यांच्या पैशानें कार्यारंभींच बडे उत्सव करून नंतर शुकशुकाट करणाऱ्या आमच्या लोकांची कृति आठवली ह्मणजे मन उद्विग्न झाल्याशिवाय राहत नाहीं. व हळुहळू प्रगति करून शेवटीं, योग्यकालीं ज्युबिली–अंक प्रसिद्ध करून खरा अर्थपूर्ण महोत्सव व्यक्त केल्याबद्दल केसरी संस्थेची तारीफ करावी तितकी थोडीच आहे असें वाटूं लागतें.

उत्सव हा अंतःस्फूर्त असावा लागतो. व केसरीचा ज्युबिली अंक हा तसल्या अंतःस्फूर्त उत्सवाचा द्योतक होय. अगोदर साप्ताहिक नंतर द्विसाप्ताहिक असें केसरीचें पाऊल प्रगतिपर आहे.

केसरीचे मूळ संस्थापक जसे राष्ट्राच्या कृतज्ञतेस पात्र आहेत, तसेच लोकमान्य टिळक हे केसरीचा मुख्य हेतु आमरण चालवून अंतीं त्या केसरीला कायम संस्थेंत टिकविल्याबद्दल लोकांच्या धन्यवादास पात्र आहेत. व ही असली तेजस्वी केसरी–संस्था अधिकृत रीतीनें चालविण्याचें महद्भाग्य लाभल्यावरून दे. भ. नरसिंह चिंतामण केळकर ह्यांचें व ती संस्था चालण्यास ज्यांचें ज्यांचे श्रम कारणीभूत झाले व होत आहेत त्यांचें सुधां मनःपूर्वक अभिनंदन करितों.

केसरी–चालकांच्या अपेक्षेप्रमाणें विचा ६१ व्या वर्षीं ह्याहून मोठ्या प्रमाणाचा ज्युबिली–उत्सव करण्याची सुसंधि प्राप्त होवो असें जगन्नियंत्याकडे मागून हा लेख संपवितों.

—पोर्तुगालच्या मिनिस्त्रांकडून दिझेंत्रागादोर आवेल फेर्नांदिस यांची योजना दीवप्रकरणाच्या चौकशी–अधिकाऱ्याच्या जागीं झाल्याचें समजतें.

गोमांतकांत बालचर चळवळ

सुप्रसिद्ध इंग्लिश गृहस्थ लॉर्ड बेडन पॉवेल ऑफ गिलवेल यानां प्रख्यात बोअर युद्धाच्या वेळीं मफॅकिंग येथें इंग्लिश सैन्याला बोअर लोकांचा वेढा पडला असतां (सन १८९७ सालीं) बॉय स्काउटिंगची कल्पना सुचली. यालाच आपण बालचर चळवळ ह्मणतों. शाळेंत शिक्षण घेणाऱ्या ७ ते १७ वर्षेपर्यंत वयाच्या मुलांना हाताशीं धरून [शाळेंतील शिक्षणाच्या वेळाबाहेर] त्यानां शीलसंपन्न, स्वावलंबी, आरोग्यवान् आणि देशाचे निस्वार्थी सेवक बनवून सुनागरिक करणें हें ह्या बॉय स्काउट चळवळीचें ध्येय आहे, हें खेळ इ. च्या द्वारें सहजासहज प्राप्त करावयाचें असतें.

× + ×

ही चळवळ सन १९०७ सालीं इंग्लंडांत प्रथम सुरू झाली. सन १९१७ सालीं हिंदुस्थानात सुरू झाली. आज जगांतील सुमारें ४२ राष्ट्रांमधून ही चळवळ मोठ्या जोमानें वाढत आहे. आमचा प्रांत मात्र या बाबतींत मागें पडलेला आहे. नाहीं ह्मणायाला गतवर्षापासून सरकारनें आणि कांहीं इंग्रजी शाळांनीं या बाबतींत उपक्रम केल्याचें कळतें. आमच्या हिंदु लोकानां या गोष्टीची गंधवार्ता नव्हती असें ह्मटलें तरी चालेल.

× + +

गेल्या वर्षाच्या जून महिन्यांत रा. नी. दळवी यांनीं रा. य. ह्मसकर यांसह मठग्रामस्थ हिंदुसभेच्या शिक्षण मंडळाचे सभासद रा. नरसिंह दा. नायक यानां ही चळवळ या प्रांतांत सुरू करण्याविषयीं विनंति केली. त्यानीं या विषयावरील प्रसिद्ध झालेलें मराठींतील सर्व वाङ्मय वाचलें व रा. नरसिंह दा. कीर्तने आणि प्रो. ल. भेंमरे यांच्याशीं विचारविनिमय केला. व आषाढी महाएकादशी, ता. ६ जुलै १९३० रोजीं श्रीदामोदर विद्यालयाच्या दिवाणखान्यांत मडगांव येथील नागरिकांची सभा भरून बालचर चळवळीविषयीं व्याख्यानें झालीं. व प्रो. भेंमरे यांच्या आचार्यत्वाखालीं 'श्री दामोदर बालचर पथक' सुरू केलें. [अखिल] गोमांतकांत पहिल्यानें यांनींच आपल्या युनियन हायस्कूल मधील विद्यार्थ्यांस शिक्षण दिलें.

* * *

पुढें, येथील म. हिं. सभेच्या शिक्षण मंडळाचे सेक्रेटरी रा. यशवंत वि. पै रायतुरकर यांनीं श्रीसरस्वत्युत्सवांतील शारदीय, व्याख्यानमालेंत, महाराष्ट्र बालचर मंडळ पुणें या संस्थेचे कार्यवाह रा. विश्वनाथ मा. देशमुख, बी. ए. एल्. एल्. बी. ॲडव्होकेट, यांचें 'बालचर चळवळ व तिचें राष्ट्रीय दृष्ट्या महत्व' या विषयावर व्याख्यान होण्याचा सुयोग जमवून आणुन देऊन उपयुक्त अशा विषयाची माहिती अगदी पहिल्यानें करून दिली.

* + ×

श्री. देशमुख यांच्या "हिंदु" पत्रांत प्रसिद्ध झालेल्या व्याख्यानाच्या प्रति श्री. न. दा. कीर्तने यानीं छापून त्या मराठी शिक्षण संस्थांकडे पाठविण्याकरितां म. ग्रा. हिं. सभेच्या शिक्षण मंडळास अर्पण केल्या. मंडळानें आपापल्या शाळेंत बालचर शिक्षण सुरू करावें, आम्ही माहिती पुरवूं, व अनेक ठिकाणीं हें शिक्षण सुरू झाल्यास गोमांतक बालचर मंडळ या नांवासारखी एक संस्था स्थापन करण्यास ठीक पडेल." अशा आशयाचें विनंतिपत्र जोडून तें व्याख्यान गोमंतक गीता धर्म मंडळाच्या सहकार्यानें गोमांतकांतील सुमारें १५० मराठी शिक्षण संस्थांकडे पाठविलें. पणजी, म्हापसें इ. शहरांप्रमाणेंच लोलयें, बाणावली, रायबंदर, हंणजूण इत्यादि लहान गावांतूनहि ह्या शिक्षणाविषयीं माहिती विचारण्यांत आली. अशी उत्सुकता दिसून आल्यानें रा. भाऊसाहेब देशमुख यांच्याकडे नाताळच्या सुटींत एक तज्ज्ञ शिक्षक पाठविण्याविषयीं विनंति करण्यांत आली. अपूर्ण

वर्तमानसार

—येत्या फेब्रुवारी महिन्यांच्या २६ तारखेस इकडे प्रजागणति करण्यांत येईल.

—मयें येथील राहणारे श्री. तेंडुलकर यांस बर्लीन येथील 'बर्लीनर ताझब्लाट' नावांच्या जर्मन दैनिक वर्तमानपत्राचा हिंदुस्थानांतील बातमीदार निवडल्याचें समजतें. सदरील दैनिकाचे जागतिक राजकारणांतील वर्चस्व पाहतां अवघ्या २५ वर्षांच्या उमरींत हा जबाबदारीचा सन्मान मिळविल्यावरून, त्यांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करून, गोमांतकाचे सुपुत्र ह्मणवून घेण्याचें भाग्य त्यांहून मोठ्या प्रमाणांत त्यांस लाभो असें इच्छितों.

वर्ष १५ वें. अंक ४०

गुरुवार [illegible] जानेवारी सन १९३१

[illegible]र्गणीचे दर
[illegible]. सह ३ रु. [आगाऊ]
[illegible]ास १ आणा

[illegible]र— समक्ष अगर पत्रद्वारें.

[illegible]ादक व मालक
[illegible] देसाई=फारमासेवतिकु
[illegible]त प्रेस–कुसमण केपें गोवा

भारत
O BHARAT

ANO 15, N. 41
QUINTA-FEIRA 22 DE JANEIRO DE 1931


ASSINATURA
Por cada ano tres rupias

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

VINOLIA
WHITE ROSE SOAP

गरमीच्या दिवसांत जसा शीतल गुलाब मनाला आनंद देतो तशाच प्रकारचा आनंद तुम्हांला प्रत्यहीं देण्याचें काम "व्हीनोलिया व्हाइट रोज" साबण खात्रीनें करील.



VINOLIA CO., LTD.
LONDON, ENGLAND

VWR 77-111

थी न्यु बॉबे बॅंकिंग कोर्पोरेशन लिमिटेड
(गोव्यांतील एजंट लवकरच कळेल)

ही विम्याची कंपनी निवळ स्वदेशी असून आपल्या सभासदांचें आपत्तीच्यावेळीं कल्याण साधणें हेंच तिचें ध्येय आहे. एकदां प्रवेश फी साडेपांच रुपये व बारा वर्षांच्या अवधींत दरमहा एक रुपया व इतकीच मरण संदेश फी भरली म्हणजे कंपनीचे सर्व फायदे सभासदांनां त्यांच्या हयातींत किंवा पश्चात मिळत असतात.

वयाची अट नाहीं व वैद्यकीय तपासणीचा ससेमिराहि पण नाहीं.

अनुभवांतें खात्री होईल विशेष माहिती साठीं पत्रव्यवहार करा.:—

१७ नानजी बिल्डींग, एलफिस्टन सर्कल, फोर्ट, मुम्बई

The New Bombay Banking Corporation Ltd.


E' a melhor Companhia de mutua beneficiencia que auxilia os seus sócios.

Estes pagando a taxa de admissão de 5 rupias e 8 tangas e uma rupia por cada mez durante doze anos seguidos e mais a taxa chamada de *aviso de óbito* (que nunca pode exceder a uma rupia por mez), podem destrutar de todos as vantagens da Corporação que é de mutua beneficiencia.

Não há exame médico nem limite de idade.

Logo será conhecido agente de Gôa.

Para mais informações, correspondam com a Companhia em 17, Nanji Building, Ele. Circle
FORT, BOMBAY



सर्व तऱ्हेच्या कर्णमधूर हीज मास्टर्स व्हॉइस प्लेट्या व ग्रामोफोन

Discos e gramafones o mais encantadores estão á venda no bem provido estabelecimento dos srs. Costa e Sons.

Mercado Novo, Margão



आत्माराम रा. तेली (डिचोलकर)
यांचा
ताजमहाल
नवा बाजार–मडगांव

या 'ताजमहालां'त गिऱ्हाइकाला खाण्यापिण्याचे ताजे, शुद्ध व पवित्र पदार्थच पुरविले जातात. साजूक व खमंग तुपाचे जिन्नस वगैरे 'महालां'तच मिळतात. गिऱ्हाइकाच्या रुचीला मानवतील व प्रकृतील पचतील असेच पदार्थ 'ताजमहालां'त ठेवण्यांत येत असतात, याची प्रत्येकानें खात्री करून घ्यावी।

इकडे लक्ष द्या !



प्रखर उन्हामुळें व मोटारच्या धूळीमुळें डोळे बिघडतात ना ?

तर मग डोळे उत्तम राहण्यासाठीं आमचेंच 'सन् गागल्स्' चष्मे वापरा. एकवेळ अनुभव घेऊन खात्री करा; शिवाय आमचकडे 'गारेचे' थंडगार चष्मे डोळे तपासून मिळतील.

पत्ता— रामभाऊ
नवा बाजार मडगांव

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार माघ शु. ४ थी शके १८५२

इतिहासाची शिकवण

जगांतील आजपर्यंत उत्पत्ति-लय पावलेल्या साम्राज्यांचा इतिहास पाहिला तर जी एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेसमोर उभी ठाकते ती ही कीं, जितके थोर व असामान्य सद्गुण साम्राज्याच्या भरभराटीच्या काळांत उत्कट स्वरूपांत परिणतावस्थेस पोंचलेले आढळून येत असतात तितकेच निंद्य दुर्गुण व हलकट भावना त्याच्या नाशाच्या समयीं साम्राज्यचालकांच्या डोक्यांत हैदोस घालीत असतात. 'विनाशकाले विपरित बुद्धि' या सूत्रांत तो समय गोंवण्यास हरकत नाहीं.

साम्राज्याच्या निर्वाणकालीं त्याच्या सूत्रधारांची बुद्धि इतकी अधोगतीला जात असते कीं, त्यानां बऱ्यावाईटाची निवड करण्याचें तारतम्य राहत नाहीं. सुबुद्धांचे युक्तिवाद मान्य करणें त्यांना अपमानास्पद वाटत असतें. आपल्यासारखे शहाणे जगांत दुसरे असणें संभवनीयच नाहीं, असें त्यांचें विनाशकाळचें विपरित बनलेलें मन घेत असतें. आणि अशी जर परमेश्वराची योजना नसती तर साम्राज्यें मर्त्य कोटींतील लुटपुटीं नाटकें न बनतां चिरंजीव झालीं असतीं.

इग्रजांच्या तागडी साम्राज्यापेक्षां चक्रवर्ति रावणांचें साम्राज्य किती तरी विस्तीर्ण होतें. खुद्द देवादिकानां सुधां त्यानें आपल्या अमर्याद साम्राज्य सत्तेनें भरडून काढलें होतें. रावणी साम्राज्यांत अशक्य अशी गोष्ट कोणतीच नव्हती. पण ज्या वेळीं साम्राज्य नष्ट होण्याचा समय ठेपला, त्यावेळीं त्याची बुद्धि फिरली. सुबुद्ध शिष्टांचें मत धाब्यावर बसवून सीताहरणाचें पाप त्याला रुचलें, आणि या पापी कृत्यानेंच अखेर रावणी साम्राज्याचा होम केला.

सार्वभौम कंसाचा केवढा मोठा दरारा! त्यांपुढें इंग्रजांचा दरारा कांहींच नाहीं. पण साम्राज्यसंरक्षणासाठीं देवकीच्या बालकांची निर्दय हत्या करण्याची दुर्बुद्धि त्याला आठवल्यानें त्याच्या अफाट साम्राज्याची राखरांगोळी झाली!

पण या पौराणिक गोष्टी सोडून दिल्या व आधुनिक इतिहासाकडे नजरफेंक केली तर आह्मांला कोणतें दृश्य दिसून येतें? रशियाची ती जुनी सर्वसत्ताधारी राजवटी आज कोठें आहे? मतस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य चिरडून टाकण्याला कोणता दुष्ट उपाय त्यानें अमलांत आणण्याचें शिल्लक ठेविलें होतें? मनुष्यप्राण्यानां छळण्याचा वाममार्गच त्याच्या नाशाला कारणीभूत झाला नाहीं काय? आणि इंग्रजसाम्राज्यशाहीचीहि शंभर वर्षे पूर्ण भरलीं असल्यानेंच लोकमताविरुद्ध कारभार हांकण्याची त्याला वाढत्या प्रमाणानें दुर्बुद्धि होत असल्यास त्यांत आश्चर्य आहे काय? श्री मल्लाप्पा धनशेटी प्रभृतींच्या फाशीच्या बुडाशीं हीच विपरीत बुद्धि झळकत आहे. तेहतीस कोटी लोकांच्या विनंतीला लाथाडून जें साम्राज्य आपला सैतानी हेकातहीस नेण्यास धजतें तें साम्राज्य जास्त काल कसें टिकूं शकेल? तें नेस्तनाबूद झालेंच पाहिजे, असा इतिहासाचा अचल सिद्धांतच आहे.

अर्विनशाही आतां बहुतेक संपुष्टांत येत चालली आहे. तिच्या दुष्ट व अनुदार कुशासनांत लाखो लोक कारावासांत कुजत पडले असले, हजारों राष्ट्रभक्तांना लाठीचा प्रसाद खावा लागला असला व शेंकडो निरपराधी, सार्जंटाच्या पाशवी शक्तीस बळी पडले असले तरी अर्विनशाहीनें उत्पन्न केलेल्या लोकजागृतीचा अखेर परिणाम इंग्रजसाम्राज्यशाहीच्या राखरांगोळींतच होईल, असें भविष्य वर्तविण्यांत हरकत नाहीं!

मात्र एकच शल्य आमच्या मनाला डवंचीत असतें तें हें कीं, आपले बांधव इंग्रजांच्या अमानुष दडपशाहीनें दुःखांत लोळत असतानां, कित्येक शहाण्या समजणाऱ्या हिंदी अहंमन्यानीं गोलपरिषदेसारख्या तमाशांस बळी पडावें! कावेबाज इंग्रजांच्या भूलथापानीं हुरळून जाऊन मजेंत गुंग व दंग व्हावें! बाकी, वाटोळ्या परिषदेचें वाटोळें होणार हें भविष्य काय आजच वर्तवण्यांत आलें नव्हतें. इंग्रज साम्राज्यशाहीचा हेतु शुद्ध असता मजुरपक्ष नावांप्रमाणें दिलदार असता व इंग्रज आणि हिंदी यांच्यांत सरळ व्यवहार चालू असता, तर सोलापूरच्या निरपराधी तरुणानां फाशी देण्यांत आलें नसतें, बाबू गेनूच्या अंगावरून मोटार-लॉरी गेली नसती, लाठीबाजीला व गोळीबाराला ऊत आला नसता व स्वदेशभक्तांच्या अन्यायामुळें लाखो लोकांना तुरुंगांत खितपत पडण्याचें कारणहि नव्हतें.

कर्ता करविता परमेश्वर आहे. जगांतील प्रत्येक गोष्ट त्याच्याच प्रेरणेनें होत असते. आणि परमेश्वर पूर्ण न्यायी असल्यानें सांप्रत जो आमच्या मानवी दृष्टीनें अनिष्ट प्रकार घडत आहे त्याच्याच उदरांत हिंदुस्थानच्या राजकीय मोक्षाचें बीज सुप्तावस्थेत का असूं नये? असलेंच पाहिजे. हिंदुस्थानच्या पापाचें माप भरत आलें असून आतां त्याच्या तारांतून मुक्ततेचें फांटें लागली आहे. स्वातंत्र्यासाठीं आत्मार्पण करण्याची प्रवृत्ति फैलावूं लागली आहे. अशा प्रसंगीं इंग्रजांच्या पाशवी शक्तीची डाळ कशी शिजणार? हिंदुस्थानदेश आतां मुक्त झालाच पाहिजे.

—सुरगांवहून परदेशांत जाणाऱ्या मालांत १९३० सालीं सुमारें ४२९०० टन लोखंडी दगड, ३१२२६ टन भुईमूग व ३७१० टन कापूस इतकी तूट आली आहे.

इंग्रजी सत्तेच्या क्रौर्यास बळी पडलेले सोलापूरचे हुतात्मे

सगळ्या हिंदवासी लोकांच्या प्रार्थना व विनंति बाजूस ठेवून शवटीं चालू महिन्याच्या १२ तारखेस सोलापूरचे हुतात्मे मल्लप्पा धनशेटी, श्रीकिसन सारडा, जगन्नाथराव शिंदे व कुरबान हुसेन यांस फांशीं देण्यांत आलें. ही दुःखद बातमी ऐकून, वाचक हो, तुमच्या डोळ्यांत अश्रु आले असतील व ते आल्याशिवाय राहणें कदापि शक्य नाहीं! पण तो दुःखाचा आवेग असल्या स्मशान वैराग्याच्या दुःखानीं विस्मृति होऊं देण्याइतका मात्र क्षणभंगुर स्वरूपाचा नाहीं. त्या हुतात्म्यानीं आपले प्राण स्वराज्य कार्यास वाहिले त्यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ परदेशी व विशेषकरून इंग्रजी मालावर कडक्याचा बहिष्कार पुकारा. परंतु मेहरबानी करून पासिंग शो किंवा इतर इंग्रजी सिगार वापरून त्या हुतात्म्यांचीं नावें देखील तोंडांत घेऊं नका! परकी मळेवाल्यानीं पिकविलेल्या चहाचे घुटके घेत घेत त्या हुतात्म्यांची स्मृति सुधां मनांत येऊं देऊं नका! हुतात्म्यानीं राष्ट्राखातर आपले प्राण सोडले तर परदेशी वस्तू सेवनाचा त्याग करून ज्या देशांत तसले थोर हुतात्मे निपजले, त्या देशांत राहण्यास आह्मीं लायक आहोंत इतकें निग्रहपूर्वक सिद्ध कराच. परदेशी-बहिष्काराचा नियम कडकडीत पाळल्यामुळें व त्या हुतात्म्यांच्या आत्म्यांस शांति मिळेल. चौघांहि सत्पुरुषांस सद्गति देण्याविषयीं परमेश्वराची अनन्यभावानें करुणा भाकतों! तथास्तु.

इतस्ततः

ब्रिटिश हिंदुस्थानांत राष्ट्रकार्याकरितां सर्वस्वाची आहुति देण्याकडे कशी अहमहमिका लागली आहे. हें ऐकूनसुद्धां अचंबा वाटण्याइतकी तेजस्विता आमचे स्वार्थत्यागी देशबंधु दाखवीत आहे प्राण. गेला तरी व मरतां मरतां देखील त्या अतुल हुतात्म्याचे प्राण जर कशासाठीं घुटमळत असतात तर ते एकाच, साठीं, ह्मणजे आपल्या प्राणाहुतीनें तरी स्वदेशबांधवांच्या मनांत परदेशी वस्तुविरुद्ध क्रोधज्वाळा भडकेल कीं काय इतकेंच जाणण्यासाठीं!

\+ × +

आतां तर फारच आणीबाणीची वेळ येईल! हिंदुस्थानच्या व्यापारास सोकावलेले परदेशी व विशेषतः इंग्रजी व्यापारी हा मोठा बाजार हातचा न गमावण्यासाठीं व हिंदी लोकांस भुरळ घालण्यासाठीं परदेशी वस्तु अति स्वस्त देण्याविषयीं खटपट करितील. व अशा रीतीनें हिंदी लोकांचें स्वत्व हरण करुन आपला खिसा भरूं पाहतील.

× + ×

अशा वेळीं हुतात्म्यांनीं दाखविलेल्या प्राणत्यागाचें कांहीं तरी सार्थक झालें हें दाखविण्याकरितां, त्यांच्या जीवास अक्षय शांति मिळण्याकरितां, एकएका परदेशी व विशेषतः इंग्रजी वस्तूंवर तीव्र बहिष्कार, पुकारण्याचें पुण्य स्वतः साधून इष्टमित्रांकडून देखील तें आचरणांत आणण्यासाठीं अवश्य यत्न करण्यामुळेंच चालू चळवळीस आह्मीं गोमांतकीयांनीं हातभार लाविल्यासारखें होईल.

× * ×

जितक्या मानानें इंग्रजी व्यापारी आपले माल स्वस्त करून आमच्या मनास मोह पाडतील, तितक्या मानानें आह्मीं देखील मनाची पूर्ण तयारी करून परदेशी वस्तु घेण्याचा मोह पार झुगारून दिलाच पाहिजे. व त्या वस्तूंच्या उणीवेमुळें आलेली अडचण इतक्या आनंदानें सोशिली पाहिजे कीं, जितक्या आनंदानें श्री. मल्लप्पा धनशेटी प्रभृति हुतात्म्यानीं स्वदेश-कार्याप्रीत्यर्थ प्राण सोडला!

× * *

वरील विनंतीबरोबरच गोमांतकीय व्यापाऱ्यांशीं एक प्रार्थना करावयाची आहे कीं, त्यानीं परदेशी निदान इंग्रजी माल कितीहि स्वस्त पुरवला तरी बिलकूल खरेदी करूं नये व होतां होईतों पूर्ण स्वदेशीच माल विकत घ्यावा. स्वदेशी वस्तु कितीहि महाग पडली तरी तिच्यासाठीं दिलेला पैसा हिंदुस्थानांतच राहील.

ANO XV Nº 41

Quinta-feira, 22 de Janeiro de 1931

DIRECTOR E PROPRIETARIO
ADV. G. P. HEGDO' DESSAI
FARMACEUTICO
Formado pela Escola Medica de Nova-Góa

O BHARAT

Jornal de maior circulação

REDAÇÃO E ADMINISTRAÇÃO
Cusmane-Quepem

COMPOSIÇÃO E IMPRESSÃO
Tip. *BHARAT* Cusmane-Quépém

ASSINATURA ANUAL
Edição portugueza 1-08-00
Edição marata-portuguesa 3-00-00

ECOS-E-CRITICA

Expressamente manipulada...?

Como os leitores sabem, o sr. General Craveiro Lopes fez publicar, ha poucos dias, do novo ano, uma portaria mantendo na essencia toda a obra da Comissão Administrativa do Hospicio, da presidencia do sr. dr. Adolfo Costa. E, isto, apezar do acordão do Conselho Superior das Colónias, que declarou nula e insubsistente a portaria de 23 de Dezembro de 1929 ao abrigo da qual a Comissão fizera todas as reformas que pela sua prodigalidade, provocaram um forte movimento de protesto no pais todo. Comentando este infeliz acto do sr. Governador Geral escreve Lucifer, no *Pracasha*, além do mais, o seguinte:

"A portaria espraia se, por demais, em volta dos serviços de clinica cirurgica do Hospicio. Sublinha as suas "vantagens incalculaveis para a população desta Colónia, que dantes tinha que recorrer aos Hospitais da India Inglesa." E nada "contratar provisoriamente os serviços do actual director e cirurgião no seu hospital com vencimentos que ora lhe são atribuidos no orçamento da instituição".

"Sucede, porem, que esse cirurgião exerceu com igual proficiencia a sua missão no hospital do outro instituto de beneficiencia, existente no pais, com vencimentos sensivelmente inferiores aos que lhe são atribuidos no Hospicio. E por certo, que na sua situação anterior não eram de menos vantagem os seus serviços cirurgicos para a colonia, que não teria de recorrer aos hospitais da visinha India."

"A razão invocada, é pois, tão elastica que se ageita a um e outro caso.

Sim, senhores. *A portaria esprai-se, por demais, em volta de serviços da clinica cirurgica*, tanto que, a ingenuos como nós, até pareceu que a mesma havia sido expressamente manipulada por causa desses serviços E o que deveras concorreu para firmar similhante persuasão, foi o facto de uma portaria, alias de caracter mais amplo ir ao ponto de salvaguardar *ao actual cirurgião os vencimentos que ora lhe são atribuidos*. E, notem, que foi uma excepção aberta a favor do cirurgião, quando lá existem muitos outros funcionarios em circunstancias identicas, a quem a portaria não ressalva.

E' outro o problema

O *Boletim Oficial* publicou, há dias, uma portaria, reorganisando a Junta Geral da Campanha de Arroz.

Pelo que vemos, o sr. General Craveiro Lopes ainda continúa a acalentar a ilusão de nos "tornar independentes do extrangeiro" por via de Campanha de Arroz, quando a experiencia, embora de pouco tempo, já havia fornecido elementos mais do que bastantes para S. Exia. verificar que a tal Campanha não passa de uma fantasia que a alguem lembrou no momento de bom humor.

Agora o nosso problema não é produzir mais arroz. E' outro. Promover a venda do pouco que produzimos e que ninguem compra.

Ha pouco o governo arrancara ao depauperado tesouro da India mais de 50.000 rupias para que Portugal figure na Exposição de Paris. Como se este sacrificio fosse piqueno, o mesmo governo vai levar-nos mais 10.000 rupias para a India figurar na Exposição de Paris. Enquanto figuramos em Paris, passamos privações em casa. Paternal governo!

PARA S. EXIA. LER

Temos visto mais de um vez. O sr. Caetano de Amorim sempre que procura bem servir o público, o que faz é prejudica lo mais.

Depois que s. excia. tomou posse do logar de Director das Obras Públicas, suspendeu (valia a pena saber ao abrigo de que lei) os exames para conductor de automoveis. Pelo que dizem, o motivo é honestissimo. O sr. Amorim achou que a prova estatuida não garantia a aptidão para *chauffeurs* e, recusou se a examinar mais candidatos, emquanto não fosse alterado o programa de exame.

Mas as consequencias da boa intenção de s. excia? Querem saber? Todos os automoveis continuam entregues aos condutores que, na opinião do sr. Amorim, conquistaram a carta sem uma prova satisfatoria. Ha mais. Como o número dos automoveis de praça vai aumentando e o número dos chauffeurs permanece o mesmo, os tais *inabeis* do sr. Amorim puzeram a premio a sua incompetencia, e cada dia exigem alta de salarios, que os donos não podem recusar, visto o sr. Amorim ter constituido a favor deles dos *incompetentes* um verdadeiro monopolio. Só tanto? Não. Ha mais ainda. Muitos automoveis com licença, já paga, do Estado e do respectivo Municipio, encontram-se sem funcionar por falta de conductores!!

Vêem, os leitores, as consequencias das belissimas intenções do sr. Caetano de Amorim? Um desastre autentico.

Cumpre, pois, ao sr. Craveiro Lopes despertar ao sr. Amorim, ao dever, pois não há lei que justifique o seu procedimento. As leis são feitas para serem obedecidas e não para cada Chefe de Serviço respeita las ou passar por cima delas conforme o seu capricho. A lei é má? Revogue se. Mas, emquanto ela tiver força executoria, cabe a todos, sobretudo aos agentes do Poder, executa-la e fazer executar.

O sr. Amorim, a pretexto algum, pode recusar o exame aos candidatos que se apresentem em termos. S. Exia, durante estes longos meses, positivamente vem abusando das suas atribuições. Isto não pode continuar assim. Ha prejuiso moral para a administração publica. Ha tambem grande prejuiso para a industria de transportes.

Bem sabemos que lá existe, a criar bolor em qualquer parte, um projecto de diploma que dá pelo nome pomposo de

E' inexoravel ...

O Imperialismo britanico, marcha, decididamente, para queda. Tudo deixa ver que tem dias contados. Doutra forma não se explica o ruim proposito que levou a efeito, mandando executar os quatro presos politicos de Solapur para quem fôra solicitada clemencia por toda a peninsula hindustanica em peso.

A burocracia nunca aprende á hora e tempo: aprende só muito tarde. E' o que vai sucedendo com o citado imperialismo que, por crescentes desatinos que vai cometendo, só lhe encurta a vida.

A Historia repete se. O que estamos a presencêar é lógico. E' muito natural. Do contrario, o imperialismo tenderia a viver a idade do Sol...

E a Mestra da Vida ensinanos que os imperialismos não são imortais como se imortalisaram os executados de Solapur. O imperialismo britanico não pode constituir excepção.

E' pena que os dirigentes do mesmo imperialismo no ocaso estejam concitando contra si o mais concentrado ódio dos indios, impossibilitando futuras relações de amizade entre ingleses e êles.

E' certo, porem, que o que tem que ser tem sempre mais força do que aquilo que queremos que seja ...

O Destino é inexoravel.

Seria para admirar

Acção produz reacção. O despotismo aciona no Povo que, porêm, reacciona com a mesma força. Trava se, então, uma luta renhida. Um desafio tremendo. Uma guerra sem tréguas.

E o combate epiloga por esmagar o despotismo. E' o que apregoa a Historia aos quatro ventos. E' a regra que não admite excepção.

O imperialismo britanico quiz a seu modo, matar o movimento da redenção da India á nascença. Para esse fim, proclamou o dominio de *Lathi pajia*. Encheu de milhares de patriotas os seus sinistros carceres. Deu morte a centenas. Pôz em actividade o exercito de sargentos.

Com tudo isso, ¿atingiu o seu fito de esterilisar o movimento? Não. Acção produziu reacção. E tal foi a força desta que, agora, o imperialismo não sabe o que faz: desapareceu-lhe o senso comum.

Tudo anda á matroca. Os substentaculos do imperialismo estão danados e levados de bréca. Perderam a razão. Procuram salvar se mas em vão. Tudo lhes sai ás avéssas.

Para mais, o movimento indiano vai tendo valiosos defensores por todo o globo que mofa do imperialismo ... periclitante.

Seria, de resto, para admirar que depois de tanto sangue inocente que fêz derramar o mesmo imperialismo tivesse ainda, admiradores!

Seria para admirar, sim!

Rumores

Ouvem-se rumores europeus de que é infalivel uma nova conflagração mundial que se éspera para breve.

E' claro que o imperialismo britanico ha de solicitar recrutas á India. Mas supomos que não será ouvida a sua suplica, dadá a serie infinda de ofensas que fez, durante esses ultimos nove mezes.

Virá, então, o arrependimento que, porem, será tardio. Sempre é certo que quem faz o que quere experimenta o que não quere. E os pecados do impelismo britanico não tem conta nem medida. São como estrelas do firmamento: incomensuraveis.

"Codigo de Estrada". Isto, porêm, está bem longe de constituir motivo ou justificação para a Direcção das Obras Publicas negar aos interessados um direito—o direito a fazer exame de conductor—reconhecido por lei.

Imagine-se por momentos que na Escola Medica ou nos Liceus se suspendiam os exames, alegando que estava para vir uma reforma mais larga e proficua para o ensino! O que diria o mundo? Certamente ria—se de quem tal medida havia ordenado.

Senhor Governador Gerall Urge chamar o sr. Director das Obras Públicas ao cumprimento do seu dever. Acima de tudo está o respeito á lei.

MAIS PRUDENCIA...

Ao sr. Craveiro Lopes
Aos srs. socios do Hospicio

Vão ser organisados de novo os serviços do Hospicio de Margão. Temos a certeza de que, na elaboração de regulamentos a que se proceder, os interessados nunca perderão de vista que a funcção primacial das instituições de caridade é velar pelos pobres, onde quer que eles se encontrem e qualquer que seja a casta, crêdo ou cor que os distinga. Além disso, torna-se indispensavel que o sr. Governador Geral e os sócios do Hospicio, ao formar os quadros de pessoal da saude e da secretaria, e fixar-lhe os vencimentos, sempre se convençam de que a receita das lotarias tem o caracter provisorio, pelo menos tratando-se do dinheiro que vem da India Inglesa que ao presente absorve mais de tres quartos de cada emissão. Pois, podemos garantir que dentro do corrente ano, ou o mais tardar, até o Março de 1932, será proibida na Grande India a importação e venda de bilhetes de lotarias de Gôa, mediante fortes penalidades.

Mais prudencia, pois. Não convem insistir na orientação da Comissão Administrativa cuja norma parecia ser:—*Après moi deluge*...

Ca' e la'

Na India Britanica, os inqueritos são feitos por comissões do elemento oficial e popular. Entre nós tal fucção é desempenhada por um funcionario só.

Crêmos que a *bitola* inglesa leva supremacia sobre a nossa norma. Aquela torna mais *acreditavel* o resultado da diligencia do que esta última.

A burocracia portuguesa ¿porque não há de imitar nesse particular a britanica?

Ao lado de muita coisa repreensivel, a burocracia britanica possui, tambem, alguns sistemas administrativos imitaveis.

Adopta-los não seria máo aos dirigentes da administração portuguesa.

Querer, eis a questão.

Um relatorio

Fazemos nossas as palavras em que o *Jornal do Comercio*, aprecia o relatorio da Comissão de Emigração:

"O *Boletim Oficial* publica em suplemento, como bem o merecia ser, o relatorio apresentado á Sua Ex.a o Sr. Governador Geral do estado da India, pela Comissão do Inquerito á situação dos emigrantes indo-portugueses na India Britanica. E' um documento de real alcance pelas informações que encerra, valiosas, todas, inecitas algumas e não menos pelo criterio pratico e bastante terra á terra que o ditou. O relatorio tem alem disso o muito de concisão sem prejuizo da clareza, o que raras vezes sucede entre nós, pois ordinariamente os trabalhos deste genero aborrecem pela sua extensão e pela insistencia em detalhes absolutamente dispensaveis. Quem se dá ao martirio de os ler, logo adivinha que o intuito de quem os elaborou foi antes compilar volumes, muitos volumes, *pour epater le bourgeois* do que esclarecer a verdade, apurar factos controvertidos, fornecer enfim elementos orientadores duma acção útil e eficaz por parte do Governo."

O QUE ME TOCA

A proposito da local "Não tem graça" devo informar aos leitores do *Bharat* que o jornal *A terra* posto que tenha sido das entranhas do *Ultramar*, mereçeu geral simpatia, como martir da politica sua, na ominosa governação do sr. Jaime de Morais, por ter feito empobrecer a Colonia, com excessivo agravamento dos impostos, a fim de dar larga expansão ao reino da burocracia.

Natural era que eu o acompanhasse, ainda com risco de padecer igual agressão.

Mas, assim que aquele Governador se retirou, a *Terra* tomou feição politica, representando o papel diametralmente oposto.

Tanto me bastou, para eu largar a minha colaboração e em sinal de protesto devolver mais de uma vez o jornal. Contudo a redacção continuava a enviar-mo; mas eu sistematicamente insistia em devolver.

Daí toda a ira.

Não me fez calor nem frio, como não me faz, por maior que seja a sua berrata.

Nunca segui a politica de graxa. Sou decididamente, adverso ao cativeiro da burocracia, como única causa da nossa perdição. A ela deve o desengano do resurgimento que a ditadura de balde anseia e promete sem mudança dos hábitos nocivos ao progresso da propria Nação, aquem só restam as gloriosas tradições do preterito.

Se estou em erro, digam-me qual.

C. V. Gomes Pereira

ERRATA

No número anterior do *Bharat* saiu o seguinte:—"Mas... um conselho amigo. Tenham a prudencia de ocultar dos fieis aliados esta poderosa arma que v. exias. inventaram de julgar o nacionalismo indiano. Não vá o idiota do inglez morrer de vergonha."

Ora, como vêem, *julgar* não é nada *Jugular* é que era.

PELA PRAÇA DE DIU

Em volta do caso de Diu

Sob esta epigrafe, o nosso presado colega de *O Anglo-Lusitano*, publicou o seguinte artigo:—

"Como dissemos numa das edições passadas do *Anglo-Lusitano* foi já decretado inquerito ou sindicancia foi determinada pelo proprio Governador de Diu, a seu pedido, não se sabendo por isso desde já a marcha que a mesma diligência seguirá. Porque se, no caso, houvesse acusação particular, é a esta que seriam tomadas declarações, franqueando-se lhe o direito de por indicação de testemunhas, provar os factos alegados.

Na hipotese de que se trata, não existe queixoso particular. Desde êsse momento é bem provavel que sejam chamados a ouvir sôbre a sindicancia homens *apanhados ao Deus dará*—individuos que por ventura, sejam extranhos á materia acusatoria. E se isso fôr assim, como nos parece, dúvida alguma não sofre que tenderá a dar *em droga* o tão apregoado inquerito.

Doutro lado, é bem possivel que nós nos enganemos e que o juiz sindicante que é o sr. dr. Desembargador da Relação de Nova Gôa Abel Fernandes se esforçe por apurar a verdade convidando por anuncios públicos na imprensa oficial e não oficial a quantos queiram pronunciar-se sôbre o governo do sr. Folque e sobre as irregularidades que lhe são atribuidas.

Nesse caso e podendo as testemunhas de acusação sem preconceitos de ... *perseguições futuras desabafar-se* com inteira liberdade, não pode deixar de sair a verdade do inquerito ordenado.

Mas a historia das sindicancias ou inqueritos aos *grandaços* deixa-nos na mente duvidas pronunciá-las sôbre o exito favoravel ao Povo,—da sindicancia ordenada. Que produziu a sindicancia aos actos dos srs. drs. Torgal Roque e Barbosa? ¿Que deu a sindicancia aos do dr. Fausto Quadros?

Verdade é que sindicancias aos actos dos *pequenos* têm produzido alguma coisa: mas aos *grandes*—uma autentica *bota*. De admirar, porisso não é que o nosso espirito esteja a vascilar—quanto ao resultado da sindicancia do sr. Folque. Porque verdade, verdade, se o fumo das acusações contra o Governador de Diu encastelou nuvens por sobre a atmosfera que nos cobre, deve, naturalmente, algum fogo ter produzido o mesmo fumo... E' lógico. Natural.

¿Para que, porêm, havemos de martelar o nosso espirito com reflexões...temerárias? Os factos demonstrarão se são ou não justificadas as nossas apreensões. E até então, julgamos prudente silenciar a nossa voz sobre o caso de Diu—enquanto não houver provocação por *parte de quem quere*..."

(D'*O Anglo-Lusitano*, de 10 de Janeiro de 1931)

Anuncios

O BHARAT, ano XV n.° 41 de 22 de Janeiro de 1931

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1.° oficio Viegas vão ser vendidos em hasta pública judicial, á porta do tribunal desta comarca, no dia 30 do corrente mês de Janeiro pelas 10 horas, pela 1a vez, e por maior lanço que se oferecer acima da sua avaliação, os seguintes bens, penhorados na carta precatoria vinda da comarca das Ilhas de Gôa, extraida dos autos de incidente da execução por custas e sêlos em que é exequente o M. P. e executado João Climaco Manuel José da Silva Colaço, de Velim, apensos aos autos crimes de querela em que foi autor o M. P., queixoso particular o dito João Climaco e reu Octaviano Borges Vàs, administrador das comunidades das Ilhas:—Predio denominado "Culumbialém" ou Tulpoilém—"Palmar e Varzea Bingareagalevoril" "Deumpacantem"; Predio da Varzea Molavoril girait paté;—E "Sálericantevoril tican", todos sitos em Cola de Cabo da Rama, discritos na Conservatoria do Registo Predial desta comarca sob os números 11790 fls. 118 V. do Livro B. 33, 2655 fls. 52 do Livro B. 10, 3253 fls. 127 V. do Livro B. 11, 3254, 3255, fls. 128, 128 V. do dito Livro B. 11, avaliados por 600, 2500, 650, 40 e 500 rupias tudo respectivamente. O arrematante pagrá as despesas da praça e a contribuição de registo por titulo oneroso nos termos de lei. São por êste citados todos os credores certos e incertos do mesmo executado bem como os quinhoeiros e os proprietarios para deduzirem seus direitos nos termos e para os fins de lei. São tambem citados para os identicos fins os representantes do credor falecido Francisco Xavier da Silva Colaço, casado, proprietário, de Velim, a cujo favor pesam as seguintes inscrições:—N.° 5092, no Livro C. n.° 3 fls. 151, (hipotecaria) para segurança da quantia de 1100 rupias da hipoteca constituida por Govinda Bicarò Velipo, sua mulher e outros da dita de Cola;—Pinhora no Livro F. n.° 1 fls. 259 inscrição n.° 322 para haver dos executados ditos Govinda e mulher a quantia de 1100 rupias;—Hipoteca no Livro C. 4 fls. 39 V. inscrição n.° 878, constituida por Goviada Naraina Porobo Dessai e mulher, da dita de Cola, para segurança da quantia de 1100 rupias;—Pinhora no Livro F. 3 fls. 9 V. sob a inscrição n.° 1256, para haver dos executados Govinda Bicaró Velipo e outros a quantia de 1100 rupias.—

Para ser público se expediu êste. Quepêm, 6 de Janeiro de 1931.

O escrivão do 1.° oficio,

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei

O Juiz de Direito

A. Colaço

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Viegas correm editos de 30 dias contados desde o dia em que se publicar o último anuncio nos termos do § 2° do art 197 do Codigo do Processo Civil, citando o interessado Miguel Caetano da Silva, solteiro de velim e ora residente em Bombaim em parte incerta para assistir a todos os termos até final dos autos de inventario orfanologico em que é inventariante Josefina da Silva de Carxeta de Velim e inventariado José Francisco da Silva que foi da mesma e deduzir nele seus direitos nos termos e para os efeitos de lei, sem prejuizo do seu regular andamento. Para ser publico se expediu este.

Quepem, 18 de janeiro de 1930.

O escrivão do 1 oficio,

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei,

O juiz de Direito,

A. Colaço

साहित्य-समुद्र-मंथन.

विचार शक्ति ही राष्ट्राच्या उत्कर्षांची गुरुकिल्ली आहे.

चालू जानेवारी महिन्याच्या चित्रमय जगत् मधील पृष्ठ ६ वर आलेल्या लेखाविषयीं अभिप्राय कळविण्यासंबंधानें मॅनेजर श्री. वा. ग. जोशी यांकडून सूचना आल्याप्रमाण आमचा अभिप्रायं पुढील रीतीनें दाखल करीत आहों. परंतु, वाचकांपाशीं विनंति करीत आहे कीं, त्यानीं हा अभिप्राय वाचण्यापूर्वी अगोदर तो मननपूर्वक लिहिलेला लेख वाचून पाहावा व त्यांतील मजकुरासंबंधाचें विवेचकबुद्धीनें आकलन करावें.

आमच्या हिंदुलोकांवर विचारी पुरुषांचा असा टपका आहे कीं, ते अधिक विचारी असल्यामुळें, केवळ विचारांतच गढून जात असल्यावरून व्यवहारतः त्यांकडून साधारणशीं कार्यें घडून येत नाहींत. ह्याचें कारण असें असावें कीं, प्राचीन काळीं देखील तत्वज्ञान, ज्योतिष, भूगोल यांचा शोध लावणारे आमचे पूर्वज ऐहिक गोष्टिस गौणत्व देत असल्यावरून आकाशांतील ग्रहांची बाधा मनुष्यास होते हा शोध लावूं शकले. पण खुद्द इहलोकीं पृथ्वीवर असलेले इंग्लिश पोर्तुगेज इत्यादि ग्रह हिंदुस्थानास खग्रास ग्रहण लावूं शकतील असें कदाचित् जाणूं शकले नसतील. कांकीं, ह्या ग्रहांची बाधा होईल ह्याचा विचारपूर्वक त्यानीं शोध लाविला असता, तर कदाचित् तन्निवारक दानें वगैरे उपचार त्यानींच योजून ठेविले असते ! व आज आह्मांस हरएक निमित्तानें त्या परदेशी ग्रहांस हिंदुस्थानची संपत्ति दान देण्याचा योग येता ना !

आज जर आह्मांस इतर राष्ट्रांबरोबर जगावयाचें असेल तर तीं राष्ट्रें जगण्यासाठीं काय करितात हें आपण विचारपूर्वक पाहिलें पाहिजे, व तें आचरिलें पाहिजे. ह्या पृथ्वीवर आमचें राष्ट्र सुखरूप नांदावें अशी उत्कट इच्छा असल्यास, चंद्रावर व मंगळावर लोकवस्ती आहे कीं काय ह्याचा विचार करण्यापूर्वी, ह्या पृथ्वीवरील एकंदर लोकांशीं आमचें दळणवळण वाढवून त्या दळणवळणाच्या धकाबुकींत झुंज सोसून आमचें राष्ट सुखरूप कसें राहील ह्याविषयीं विचार अगोदर केला पाहिजे.

विचारशक्ति वाढविणें ह्याचा अर्थ असा नाहीं, कीं, कोणत्याहि, गोष्टीविषयीं अव्यवहार्य कल्पनांचा काथ्याकूट करून "मंगळावर उडून जाण्यासाठीं मला पक्ष्यासारखे पंख कधीं फुटतील ?" अशा सारखे प्रश्न करीत निष्फल विचारानीं डोकें भणाणून घ्यावें !

विचार करणें याचा खरा अर्थ असा कीं, कोणत्याहि नवीन व पहिल्याप्रथम पाहिलेल्या गोष्टीनें भांबावून न जातां तिच्या कार्यकारण संबंध जाणण्याचा प्रयत्न करून सुधां तिचें खरें मर्म ओळखून ठेवावें.

उदाहरणार्थ, शिवण्याचें यंत्र, फोटो घेण्याची कला, फोनोग्राफ इत्यादि प्रथमच पाहण्याची वेळ सांपडली त्या वेळीं बहुजन समाज आश्चर्यानें स्तंभित होऊन गेला असला पाहिजे. परंतु ज्या जिज्ञासु लोकांची विचारशक्ति जागृत होती ते भांबावून न जाता यंत्राची उत्पत्ति लावण्यांत मग्न झाले आणि पायरी पायरीनें विचार करून त्या यंत्राची दुरुस्ती करूं शकले. विचारशक्ति वाढविणें ह्मणजे कार्यकारण संबंधाच्या सांखळींतील अत्यंत जवळचा एकएक दुवा पकडीत सगळी सांखळी हातात घेणें होय !

असली विचारशक्ति वाढविणाऱ्यांकडूनच जगांत महत्वाचे शोध लागले आहेत.

विचारशक्ति वाढवून सामर्थ्यवान बनलेले अल्पसंख्यांक परकी लोक आज आह्मां बहुजनसमाजावर राज्य करीत आहेत. त्यांशीं टक्कर देण्याइतकें सामर्थ्य राष्टास देण्यास आज आह्मीं देखील विचारशक्ति वाढवून तुल्यबल झालें पाहिजे. आह्मीं विचारी झाल्याखेरीज आज आमचें राष्ट्र उदयास येणें शक्य नाहीं, व आमच्या स्वतंत्र राष्ट्राचे संबंध इतर राष्ट्रांशीं आल्यावांचून आमच्या संस्कृतीची प्रभा त्यांवर पडणार नाहीं. व आमच्या सूक्ष्म विचारी पुरुषांचे आह्मीं वंशज आहोंत असें सिद्ध होणार नाहीं.

शेवटीं, वरील लेखांतील पुढील उतारे देऊन हा अभिप्राय संपवितों.

'जीवनाच्या दृष्टीनें शेतकी हा सर्वांत महत्वाचा व्यवसाय आहे. परंतु त्याकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे तितकें दिलें गेलें नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट होय."

"दान आणि परोपकार ह्या गोष्टी नाहींशा झाल्याखेरीज दारिद्र्य नाहींसें होणार नाहीं व बेकारी नष्ट होणार नाहीं. परोपकारानें कायमचें दारिद्र्य नाहींसें होत नाहीं. त्याचें तात्पुरतें निवारण होतें. गरीब लोकांकडून काम करून घेतल्याशिवाय त्यानां सुस्थिति प्राप्त व्हावयाची नाहीं."

'आळशीपणांत जे काळ घालवितात त्यांची विचारशक्ति नष्ट झालेली असते."

\+ × ×

पूर्ण स्वदेशी माल वापरून व इंग्रजी मालावर कडक बहिष्कार घालूनच आह्मा गोमांतकीयांस वाटत असलेली स्वदेशी देशबंधूंची सहानुभुति व इंग्रजी नोकरशाहीच्या उद्वेगजनक जुलमांची नापसंती दाखवावयास मिळेल. ही वेळ, हुतात्म्यांस फांशी दिल्याबद्दल दुःख मानण्याची नसून त्यांनी केलेला आत्मयज्ञ सत्कारणीं लागला हें व्यक्त करण्यासाठीं उत्कटतेनें स्वदेशी वस्तूंचा शक्य तितका प्रसार करण्याची होय.

वर्तमान सार

—पणजी येथील मुष्टिफंड संस्थेस श्री. सां घ. कंटक (सं. सुबोधमाला) यांनीं आपल्या मृतपत्नीच्या स्मरणार्थ पंचवीस रुपयांची देणगी दिली.

—ह्मापसें येथील ज्ञानप्रसारक मंडळीच्या मराठी विद्यालयांत सालाबादप्रमाणें ता. १५।१।३१ रोजीं मकरसंक्रांतीनिमित्त मुलींची सभा भरून त्यांत तीळगूळ, हळदकुंकू, परस्परांस देण्यांत आले. नंतर कु. जयश्रीबाई सी. मणेरकर व कु. कुसुमबाई द. वेरेंकर ह्यांनीं मकरसंक्रांतीवर दोन शब्द सांगितले. शेवटीं कु. इंदुबाई अ. कर्वे हिनें आभार मानल्यावर सभा संपविण्यात आली.

—कोठंबी, चांदर व असोळडें येथील हिंदु व ख्रिस्ती जमीनदारांनीं एकत्र जमून परदेशी वस्तु न वापरण्याचा, ठराव करून इतरांसहि उपदेश केला, असें कोठंबी येथील सुप्रसिद्ध नागरिक दो. बाबू शिवराम प्रभू देसाई यांकडून समजतें. ह्या उदाहरणीय कृतीचें अनुकरण इतर गावांतील लोकांनीं अवश्य करावें.

—स्पेन देशांत बंड चालू आहे.

—श्री. आर. एस् दगाईत एन्ड ब्रदर्स स्टेशनरी मालाचे मडगांव येथील प्रसिद्ध व्यापारी यांकडून आलेल्या कलेंडरचा साभार स्वीकार करण्यांत येत आहे.

—कर्टीस नावांच्या इंग्लिश बाईचा खून करणाऱ्या मोगलपुरा येथील सजन सिंग यानीं सांगितलें कीं, एखाद्या ब्रिटिश अधिकाऱ्याचा खून करण्याचा त्याचा इरादा होता व असा संकेत ज्यानीं केला अशी पुष्कळ मंडळी लाहोर प्रांतांतील वालटोंवा ह्या गावीं आहे.

—'श्रीमठ संस्थान दामोली यांचेकडून प्रतिवार्षिक चालीप्रमाणें श्रीमठाचा कारकून न येतां रा यशवंत घनःश्याम कुंकळयेंकर हे मठाचे नावें वसुलीकरतां फिरत आहेत तरी सर्व ज्ञातीबंधूनीं श्रीमठाचा कारकून अगर शिपाई वसुलास येईपर्यंत सदर मनुष्याकडे गुरुदक्षणा देऊं नये'. असें रा. गणपत आनंदनाथ महाराज वालावलीकर हे कळवितात.

दीवची चौकशी

दीवच्या चौकशीला वरिष्ट सरकारची मान्यता मिळाली असून दिझेंबारगादोर आबेल फेर्नांदिस यांना चौकशीचा अधिकारी नेमण्यांत आलें आहे. दीवच्या दडपशाहीचीं वर्णनें मराठी, इंग्रजी व गुजराथी पत्रांतून प्रसिद्ध होतच असतात. दीवच्या प्रकरणाला जितकी प्रसिद्धि मिळाली व मिळत आहे, तितकी त्याच जातीच्या दुसऱ्या प्रकरणाला आजपर्यंत कधीं मिळाली असेल, असें आह्मांस वाटत नाही.

दीवच्या प्रकरणाचा भरपूर पुरावा गोळा करण्यासाठीं आमचे संपादक मुंबईला रवाना झाले असून, चौकशीच्या सुमारास तें दीवला जाणार आहेत. परिश्रमाची शिकस्त करून दीवप्रकरण यशस्वी करण्याचे कामी ते झटत आहेत. सत्याचा वाली परमेश्वर दीवकरांची बाजू पूर्ण प्रकाशांत आणून, लुडबुडशाहीचे पंचप्राण कासावीस करील, असा आमचा आत्मविश्वास आहे.

वर्गणीदारांस विनंति

—मुंबई, पुणें, कलकत्ता, वेळगांव, पेडणें, वाळपई वगैरे ठिकाणच्या, चालू सालच्या वर्गणीसाठीं व्ही. पी. रवाना करण्यांत आली आहे' तीचा स्वीकार करून आभारांत ठेवावें. म. भारत

मोहन संगीत मंडळी

—कुडचडें येथें आपले १० प्रयोग करून सदरील मंडळी ह्मापसें येथें रवाना झाली. अगदीं नवीन धर्तीवर आपले प्रयोग बसवून कंपनीचे उत्साही मालक रा. धारणकर यानीं नाट्यसृष्टींत बरीच प्रगति केली आहे असें ह्मटल्याशिवाय राहवत नाहीं. मंडळींत काम करणारे एकंदर नट गोमांतकीय असून, अगदीं लहान वयाचे असतानाहि त्यानी दाखविलेलें अभिनय नैपुण्य पाहून मागेंपुढें ही बालमंडळी ह्या कलेंत बरेंच नांव मिळविल्याशिवाय राहणार नाहीं असें वाटतें.

मंडळी करीत असलेल्या प्रयोगांत सं. शिवसम्राट, कुंजविहारी आणि पंतांची सून ह्या नाटकांचे प्रयोग फारच चांगले वठतात. मंडळी स्वकीय असल्यानेंच तिला आमचे रसिक हरएक प्रकारें प्रोत्साहन देतील अशी आशा आहे.

वर्ष ... अंक ४२
गुरुवार ... वारी सन १९३१

...चे दर
... ह ३ रु. [आगाऊ]
... १ आणा

... — समक्ष अगर पत्रद्वारें.

...दक व मालक
... देसाई=फारमासेवतिकु
मुद्रण ... काशन –भारत प्रेस–कुसमण केपें गोवा

भारत
O BHARAT

ANO 15. N. 42
QUINTA-FEIRA 29 DE JANEIRO DE 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

भारत

जनसेवा हीच ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, माघ शु. ११ शके १८५२

गोव्यांत राष्ट्रीय कालेजांची आवश्यकता

आज शिक्षणाची किती आवश्यकता आहे, हें निराळें विशद करून सांगण्याची गरज नाहीं.

इकडे धंदेशिक्षणाच्या वगैरे शाळा नसल्यावरून व ज्या काय आहेत त्या फक्त पुस्तकी ज्ञान देणाऱ्या असल्यावरून शिक्षण घेणें ह्याचा सर्वसाधारण अर्थ सरकारी नोकरशाही तयार करणें असा रूढ होत चालला.

कालांतरानें, बहुजन समाजास पटलें कीं, शिक्षणसंपन्न होण्याचें अंतिम साध्य ह्मणजे नोकरशाहींतील गुलामगिरी पतकरणें नसून, ज्या राष्ट्रांत आपण जन्मलों तें राष्ट्र इतर राष्ट्रांच्या पंक्तींत शोभण्यासारखें कांही तरी कर्तव्य बजावणें हें सुशिक्षित माणसाचें पवित्र ध्येय होय.

सुशिक्षित माणसाची मुख्य कामगिरी जर कशांतहि असेल तर, स्वतः कार्यक्षम होऊन शक्य त्या मानानें राष्ट्रकार्यास; हातभार लावणें ह्या एकाच गोष्टींत आहे. असें विचारी लोकांस खात्रीपूर्वक वाटूं लागलें आहे.

सारांश, इतकें सिद्ध होतें कीं, ज्ञान संपादनाचा प्रमुख हेतु आपल्या राष्ट्राची इभ्रत वाढविण्यांत पर्यवसित झालेला असतो. परंतु, शिक्षण देतेवेळीं अशी राष्ट्रीय भावना जोपासली जाण्यासारखा शिक्षणक्रम सरकारी शाळां–कालेजांत दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

त्या शिक्षणसंस्थांत शिकवले जाणारे विषय मात्र संख्येनें वाढले जातात ह्मणूनच, एक घड ना भाराभर चिंध्या अशी स्थिति असूनहि त्या शिक्षणांत राष्ट्रीय भावनेचा लवलेश नसतो.

नाहीं ह्मटल्यास, सत्ताधिकाऱ्यांच्या पराक्रमानें ओथंबलेलीं राष्ट्रगीतें विद्यार्थ्यांकडून पढविलीं जातात. तथापि, त्या परभाषेंतील प्रौढ वाक्यसरणीचीं राष्ट्रगीतें बाल विद्यार्थ्यांच्या बुद्धीस आकलन होण्याजोगीं नसतात. तर दुसऱ्या बाजूनें, त्या राष्ट्रगीतांत आत्मीय भावना नसल्यामुळें हिंदी प्रौढविद्यार्थ्यांच्या आंगीं सुधां त्या राष्ट्रीय भावना उद्दीपित करणाऱ्या राष्ट्रगीतांच्या पठणानें वीरश्री स्फुरण पावत नाहीं कीं शरीर रोमांचित होत नाहीं!

तीं राष्ट्रगीतें ऐकून सुधां, त्या त्या स्वतंत्र देशांतील जेते जसे वीरश्रीयुक्त बनतात तसे वीरश्रीयुक्त आह्मांस बनविणारें शिक्षण देणाऱ्या कालेजांची आज जरूर गरज भासूं लागली आहे.

इकडे लिसेवांत मुलांस घेण्याच्या बाबतींत १३।१४ वर्षांपेक्षां जास्त वय असलेल्या विद्यार्थ्यांस कसा मज्जाव होतो हें अलीकडेच दिसून येतें. ह्मणजे ह्या वयाच्या अडचणीमुळें कित्येक हुशार अभ्यासकांस प्रबळ इच्छा असूनहि लिसेवांत शिक्षण घेणें दुरापास्त होतें, ही स्थिति वाईट आहे. फोंडें येथें आल्मैद कालेज सारखी संस्था आहे ह्मणून तरी अशा विद्यार्थ्यांची सोय होते, पण एक गोष्ट मात्र विसरून चालणार नाहीं कीं, एकटें आल्मैद कालेज दूरपणामुळें, सगळ्या गोमांतकीय विद्यार्थ्यांस शिक्षणदान करण्यांस पुरेसें वाटत नाहीं. ह्मणून गोमांतकांत आणखीं कालेजांची स्थापना होऊन, गोमांतकीय सर्व विद्यार्थ्यांस सुलभ व कमी खर्चाचें शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांची फार आवश्यकता भासूं लागली आहे. विद्यापीठांत अध्यापकाचें काम करणार लिसेवचे वगैरे पूर्ण शिक्षण घेऊन पास झालेले होतकरू तरुण उपयोगी पडतील व जे शिकूनसुद्धां पुढें काय करावें ह्या विवंचनेंत असतील त्यांस अध्यापकांचा नवा व्यवसाय मिळेल व आपल्या बांधवांस ज्ञानवान करण्याचें श्रेय मिळेल आणि शिक्षण संस्था आपल्या ताब्यांत असल्यामुळें विद्यार्थ्यांत हिंदी राष्ट्रीयत्वाची जागृति होईल अशा रीतीनें शिक्षण देणें सुलभ पडेल.

ह्यास्तव, इतर शिक्षणाबरोबरच राष्टीय शिक्षण देणारीं विद्यापीठें स्थापन करणें फार जरूरीचें आहे.

जाहीर विनंति

हरवळें येथील श्रीरुद्रेश्वर देवस्थानचा कारभार चालू कार्यकारी मंडळाकडून फार अव्यवस्थितपणें चालविला जात आहे, असें ऐकूं आल्यामुळें तत्संबंधीचा विचार करण्याकरितां पणजी–मळा येथं मुष्टिफंड संस्थेच्या सरस्वती विद्यालयांत येत्या शनिवारीं ३१–१–३१ संध्याकाळीं ६॥ वाजतां सदरील देवालयाच्या महाजन मंडळीनें एकत्र जमण्यांविषयीं विनंति करण्यांत येत आहे. शिवाय कोणत्याहि हिंदूनें सदर सभेला हजर राहून आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ करून दिल्यास त्यांचे आभारी होऊं.

विठ्ठल ल. पोंबुर्पेकर
यदुवीर ना. शिरोडकर
मुकुंद ध. चोडणकर

प्रासंगिक बोल

फटाक्यांविरुद्ध यशस्वी चळवळ सुरू ठेवून दिवसें दिवस गणेश ४ र्थी सारखे सण, शिमगे, भजनी सप्ताह यांसारखे उत्साह फटाके कडकडल्या शिवाय पार पडतात, हें सिद्ध करण्यासाठीं ज्या ज्या होतकरू तरुणानीं तडफदार निरोधन केलें त्यांचें सप्रेम कौतुक करणें योग्य आहे. कारण, त्यानीं धडाडीनें कार्य केलें, लोकांच्या मनावर परिणाम करून, कधीं गोडी गुलाबी तर कधीं प्रेमळ सक्ती करून, गोव्यांतून फटाक्यांपायीं नाहक जाणारा किती तरी पैसा गोव्यांत ठेवून घेतला.

+ × +

फटाक्यांच्या विक्रीवर नफा मिळवूं पाहणारे कांहीं व्यापारी गृहस्थ त्या चळवळी करणाऱ्यांवर फारच चिडले. त्यांचे चळवळ कर्त्यांस निरुत्तर करण्यासाठीं निरनिराळे युक्तिवाद होते. पैकीं एक असा होता कीं, 'फटाके हे गोव्यांत खपणाऱ्या अनेक परदेशी जिन्नसां पैकीं एक असल्यावरून फटाक्यांवरच तेवढा बहिष्कार कां?' ह्या प्रश्नास सरळ व सोपें असें उत्तर हेंच कीं, फटाके निकट गरजेच्या वस्तूंत अंतर्भूत न होतां केवळ चैनीच्या वस्तूंत मोडत असल्यावरून असल्या उपेक्षणीय परदेशी वस्तूंवर बहिष्कार चालू ठेवून तो यशस्वी केल्यानें लोकांचा आत्मविश्वास वाढून, मग क्रमशः एकएका परदेशी वस्तूवर बहिष्कार घालणें लोकांस आंगवळणीं पडून नेटानें निरोधन करण्यास उत्साह येईल.

× × ×

हे विचार तूर्त सुचण्याचें कारण हेंच कीं, गोव्यांत सार्वजनिक रीत्या परदेशी फटाक्यांवरील मोहीम उत्तम प्रकारें पार पाडविण्याची सुरवात आमच्या तरुण सुशिक्षित लोकांनीं केली. आतां केवळ कालौघानें असा प्रसंग आला आहे कीं, केवळ फटाक्यांवरच नव्हे तर इतर परदेशी वस्तूंवरसुधां बहिष्कार पुकारून, व्यापारी लोकांच्या 'फटाक्यांविरुद्धच चळवळ कां?' ह्या आक्षेपाचें निरसन होण्यासारखी सुसंधि प्राप्त झाली आहे.

× * ×

ह्मणून 'फटाक्यांविरुद्ध बहिष्कार घालणारे तरुण आतां स्वस्थ कां?' असा समाजाचा आक्षेप न घेण्यासाठीं, इतर परदेशी वस्तूंच्या बहिष्कारास प्रवृत्त होणें उचित आहे. नपेक्षां, त्या धडाडीच्या तरुणानीं योग्य प्रसंगीं निष्क्रीय राहून विसंगतपणा दाखवावा हें कसेंसेंच वाटतें. असें लिहिण्यांत आमचा हेतु कोणास खोंचण्याचा नसून फक्त एका कार्याची जाणीव पटवून द्यावी इतकाच आहे.

* × *

एकंदर परदेशी इंग्रजी मालावर जर बहिष्कार पुकारला तर त्या कामीं गोमांतकीय व्यापाऱ्यांचें सुधां त्यांस अलबत साह्य मिळेल, व 'फक्त फटाक्यांवर बहिष्कार कां?' असले अडवणुकीचे प्रश्न न करितां व्यापारी वर्ग बहिष्कार पुकारणाऱ्यांशीं सहकार्य केल्याशिवाय राहणार नाहींत. इकडील व्यापाऱ्यांत कडक निरोधनाची गरज आहे असें आह्मांस तरी वाटत नाहीं.

* + *

आतां, दुसरा एक आक्षेप व्यापारी वर्गाकडून निरोधकांवर होण्याचा संभव आहे. तो आक्षेप हाच कीं, डोक्यावरील खादीच्या टोपीस वैषम्य आणणारा 'पासिंग शो' सिगार मुखांत विराजमान करणारे बरेच सुसंमजस तरुण समाजांत झळकतात! अशा स्थितींत ते जर परदेश–वस्तु–निरोधन करूं लागले, तर उक्ति व कृति यांचा मेळ नसल्यावरून त्या तरुणांस पासिंग शो किंवा इतर परदेशी सिगारच्या धुरांत लाजलेलें तोंड लपविल्याशिवाय गत्यंतर नसेल! मग निरोधन कुठलें?

+ × +

परदेशी वस्तूंवर घालावयाच्या बहिष्काराचा मुख्य कटाक्ष अल्पमोली व अल्पसंतोषी अशा चैनीच्या पदार्थांवर पडलाच पाहिजे. त्याचप्रमाणें, हिंदुस्थानांत ज्या प्रकारचा माल तयार होतो, त्या जातीच्या परदेशी मालावरहि अलबत बहिष्कार पुकारला गेला पाहिजे. हें काम सुशिक्षित होतकरू माणसानीं राष्ट्रकार्यांप्रीत्यर्थ केलेंच पाहिजे. आतां ह्या बहिष्कारण्यांत येणाऱ्या वस्तूंपैकीं ज्या अत्यंत आवश्यक असतील तसल्या वस्तु इकडे करण्यास क्रमशः सुरवात होईल व अशा बहिष्कारामुळें इकडे असलेले देशी धंदे ऊर्जितावस्थेंत येतील आणि परिणामीं इकडील लोकांस काम मिळून पैसा देशांत राहील. सबब, बहिष्काराच्या कार्याचा आमच्या प्रांतबंधूंनीं अवलंब करून स्वराष्ट्रदेवीची सेवा केल्याचें महत्पुण्य संपादावें, अशी त्यांपाशीं नम्रतापूर्वक विनंति करितों.

—मौ. महमंदअल्ली हे मरण पावल्याची वार्ता ऐकतांक्षणींच त्यांचे सालन येथील एकनिष्ठ अनुयायी मि. कादर हुसेनसाहेब यांच्या हृदयास एकदम धक्का बसून लागलेंच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें!

—मुंबईंत ११ जुलै १९३० ते वर्ष अखेरपर्यंत एकंदर २७७१ लोकांना कॅाग्रेस हॉस्पीटलमध्यें लाठी हल्ल्यानें जखमी झाल्यामुळें उपचार करण्यांत आले असें प्रसिद्ध झालें आहे.

ANO XV No 42

Quinta-feira, 29 de Janeiro de 1931

DIRECTOR E PROPRIETARIO
ADV. G. P. HEGDO' DESSAI
FARMACEUTICO
Formado pela Escola Medica de Nova-Gôa

O BHARAT

Jornal de maior circulação

REDACAO E ADMINISTRACAO
Cusmane-Quepem

COMPOSICAO E IMPRESSAO
Tip. BHARAT Cusmane-Quépém

ASSINATURA ANUAL
Edição portugueza 1-08-00
Edição marata-portuguesa 3-00-00

Ecos-e-Critica

Deixa o velho...

O Sr. Dr. Wolfango da Silva aproveitou da ocasião em que no Conselho do Governo se apreciava, antes da ordem do dia, a questão da Leprosaria em Macasana, para fazer uma carga valente contra a psicologia dos filhos desta terra.

E' uma tunda de primeirissima ordem. Mas não se arreliem os meus queridos compatriotas, que o são do Sr. Wolfango tambem. O sabio Doutor não disse aquilo para incomodar quem quer. A sua intenção foi inocente. S. Exia. teve apenas em vista agradar aos *brancos*. Ha bastante tempo que o doutor não tivera ensejo de prestar o seu preito habitual e indirecto para a côr que sempre o facinou.

Deixa estar, pois. Deixa o velho gosar do prazer que sempre lhe foi predilecto.

Encantador...

Dum discurso do sr. Wolfango da Silva, proferido no Conselho do Governo em 19 do corrente:

प्रो. भगवंत गो. प्रभु देसाई, रा. स. वा. भिडये, रा. ना. वा. खलप, रा. यशवंत हासकर आणि रा. पां. बा. मराठे या गृहस्थांचें एक मंडळ बालचर शिक्षणाच्या गोमंतकाच्या परिस्थित्यनुरूप अभ्यासक्रम ठरविण्यासाठीं निवडलें. त्यानीं प्रो. भेमरे आणि रा. नी. दळवी यांच्या माहितीनें एक तात्पुरता अभ्यासक्रम ठरविला.

\+ * +

मठग्रामस्थ हिंदुसभेमार्फत रा. पेंडसे यांच्या कामगिरीबद्दल रा. पुरुषोत्तम श्री. सुकेरकर याच्या अध्यक्षतेखालीं श्रीदामोदर विद्यालयाच्या पटांगणांत सभा भरून जाहीर सन्मान करण्यांत आला, व त्यांस रौप्यपदक अर्पण करण्यांत आलें, रा. पेंडसे हे रविवार ता. ४।१।३१ रोजीं सकाळच्या मेलनें पुण्यास गेले, त्यांना निरोप देण्यांकरितां रा. नरसिंह दा. नायक वगैरे मंडळी, बालचर शिक्षक आणि बालचरहि स्टेशनवर हजर होते. त्यावेळीं बालचर शिक्षकांतर्फे रा. पेंडसे यांना मानपत्र आणि बालचर शिक्षकांचा ग्रुप फोटो अर्पण करण्यांत येऊन त्यांच्या टिळक पथकालाहि एक फोटो अर्पण करण्यांत आला. बालचर मंडळातर्फे त्यांना निरोपपत्र व पुष्पगुच्छ अर्पण करण्यांत आला. रा. पेंडसे हे जात असतानां सर्वांचीं अंतःकरणें गहिंवरून आलीं! रा. पेंडसे येथून गेल्यावर लगेच त्यानां टिळक पथकाच्या १० व्या वाढदिवससमारंभांत दे. भ. न. चिं. केळकर यांच्या हस्तें सर्वांगीण प्राविण्याबद्दल ६ रुपयांचें पहिलें बक्षीस मिळालें तें योग्यच झालें.

* × *

बालचर शिक्षक वर्गांत शिक्षण संपादन करून गेलेल्या मंडळींनी आपापल्या शाळांतून बालचरांचीं पथकें सुरू केलीं आहेत हें लिहिण्यास मोठा आनंद वाटतो. रा. महादेवराव भिडये यांनीं पणजी येथील महालक्ष्मी विद्यालयांतील विद्यार्थ्यांचें श्रीशिवाजी पथक सुरू केलें असून, त्यांच्याच प्रोत्साहनानें रा. हरि विठ्ठल राणे यांनीं रायबंदर येथें एक पथक सुरू केलें आहे. पणजीच्या इतर शाळा व बिठोण, ताळगांव इकडील शाळांत लौकरच रा. भिडये यांच्या खटपटीनें बालचर पथकें निघणार असें कळतें. हें रा. भिडये यांच्याप्रमाणें त्या त्या संस्थांचे चालक आणि शिक्षक यांस भूषणावह आहे. रा. नारायण प्रभाकर सामंत यांनीं बागवली येथील कात्यायनी-बाणेश्वर विद्यालयांत बालचर पथक सुरू केलें आहे. मडगांव येथें प्रो. भेमरे आणि रा. दळवी यांनीं चालविलेल्या पथकाशिवाय रा. हावकर यांनीं श्रीकृष्ण पथक व रा. श्र. ग. परब यांनीं एक पथक चालविलें आहे. म्हापशें येथील ज्ञानप्रसारक मंडळाच्या शाळेचे मुख्याध्यापक रा. ग. प्र. काकतकर, कुंकळ्ळी सांवरकडा येथील श्रीसरस्वती-लक्ष्मी विद्यालयाचे मुख्याध्यापक रा. वि. पां. वाळावलकर आणि शिरोडें येथील श्रीकामाक्षा विद्यालयाचे मुख्याध्यापक रा. सांज्य हे लौकरच बालचर पथकें उभारणार असल्याचें कळतें.

* + *

या चळवळीचा प्रसार गोमांतकांत होऊन गोमंतक बालचर मंडळासारखी मध्यवर्ति संस्था स्थापन होण्याचा प्रयत्न मठग्रामस्थ हिंदु सभा करीत असून तिनें त्या विषयीं विनामूल्य वांटण्याकरितां वाङ्मय प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला आहे. तूर्त पालक संमति-पत्रकें छापून तयार असून तीं बालचर पथकें उभारलेल्या ठिकाणी मागणी केल्याबरोबर विनामूल्य पाठवून देण्यांत येत असतात. (संपूर्ण)

वर्ष १५ वें. अंक ४५
. १९ फेब्रुवारी सन १९३१

वर्गणीचे दर
ट. ख. सह ३ रु. [आगाऊ]
अंकास १ आणा

चे दर— समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व मालक
गो. पुं. हेगडे देसाई=फारमासेवतिकु
द्रण कांशन —भारत प्रेस—कुसमण केपें-गोवा

भारत
O BHARAT

ANO 15. N. 45
QUINTA-FEIRA 19 DE FEVEREIRO DE 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार फाल्गुन शु. २ या शकें १८५२

गोव्याचें नशीव !

प्रत्येकास आपला भविष्यकाळ कोणत्या गोष्टीनीं व्यापलेला आहे हें जाणण्याची जिज्ञासा उत्पन्न होते व ती जिज्ञासा तृप्त करणाऱ्या ज्योतिषशास्त्रज्ञाचीहि पण तूट भासत नाहीं.

सद्या प्रांताची, देशाची, व खंडांची सुधां भविष्यें वर्तविण्याची नवीन टूम दिसूं लागली आहे. अशा स्थितींत गोव्याच्या नशिबांत काय लिहिलें आहे हें जाणून घेण्याची इच्छा गोमांतकीयांच्या मनांत उदित होणें स्वाभाविक आहे.

स्वतःचें भविष्य जाणूं इच्छिणारांकडून एक मोठें मनोदौर्बल्य दृग्गोचर होत असतें, कीं तें आपल्या बहुमोल वर्तमान काळाचा विनियोग भविष्यकाळ जाणण्याकडे खर्चितात. इतकें असून देखील प्रत्येक जणांस असा ज्योतिषि पाहिजे असतो कीं, त्यानें जिज्ञासूंचा भविष्यकाळ उत्तमच आहे असें सांगावें. ह्या वस्तुस्थितीस अनुसरून गोव्याचें उज्ज्वल असें भविष्य जाणण्याची अपेक्षा प्रत्येक सुज्ञ गोमांकीयास होणें योग्य आहे.

कर्म केल्याशिवाय त्याचें फळ प्राप्त होत नसतें असें अनुभव सांगतो. परंतु गोव्यास आलेला अनुभव सिद्ध करितो कीं, त्यास कर्म केल्याशिवायच कांहीं फळें मिळालीं आहेत. उदाहरणार्थ, गोमांतकीयांनां कांहीं प्रयत्न केल्याशिवाय त्यांस अचानक रीतीनें पोर्तुगीज राष्ट्राची प्रजासत्ताक कारकीर्द उपभोगण्यास मिळाली बाकी, पोर्तुगेज प्रजासत्ताक राज्याची व्याख्या करावयाची झाल्यास थोडक्यांत असें सांगतां येईल कीं, तेथें राजा नाहींसा झाला व प्रजेतील जो कोण ताकतवान असेल त्याला राज्यपद भोगण्याचा मार्ग खुला झाला. पोर्तुगेज रेपुब्लिकाच्या घटनेंतील आधारभूत अशा मुख्य कायद्याबरहुकूम त्या प्रजासत्ताक राष्ट्रानें ख्रिस्ती धर्म व राज्यसत्ता यांचे संबंध अजिबात तोडून टाकावयास पाहिजे होते, पण धर्मकर्मठपणाच्या समर्थनापीत्यर्थ ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराकरितां आपल्या क्रूरतर कृत्यानीं इतिहासांत अजरामर झालेल्या व इंकीझिसांव (धर्म समीक्षण) गोव्यांत स्थापन केलेल्यांचे वंशज असे जे पोर्तुगेज त्यांच्या मनांतून त्या ख्रिस्ती धर्माच्या अवडंबराचा मोह अद्याप जात नाहीं. ह्मणूनच, गोव्यास आपल्या कष्टाशिवाय यदृच्छेनें प्राप्त झालेल्या पोर्तुगेज प्रजासत्ताक राज्याच्या नांगरिकत्वाचे हक्क भोगीत असल्याचें छातीवर हात मारून सांगितां आलें तरी, पोर्तुगेज कृपा छत्राखालीं विहरणाऱ्या इगर्जी (ख्रिस्ती देवळें) व फक्त एकाद्या करासारखी रकम वसूल करावयाची असल्यावेळेंच सरकारास आठवत असलेलीं हिंदु देवळें यांतील भेदभावांची तफावत पाहण्याचें गोव्यांच्या नशीबांत आलें आहे.

एरवीं कोणतीहि स्थिति प्राप्त झाली तरी तींत गोव्यानें आनंदच मानून घेतला पाहिजे. कांकीं, स्वतः परिश्रम केल्याशिवाय अनायासें ती प्रजासत्ताक पद्धति प्राप्त झाली इतकें अल्पसंतुष्ट समाधान हेंच त्या आनंदास पुरेसें कारण असतें.

आज ज्या प्रकारचें आर्थिक स्वराज्य मिळविण्याची आटोकाट खटपट अखिल हिंदुस्थानांत चालली आहे, तसलें आर्थिक स्वराज्य (autonomia financeira] आह्मांस मिळाल्यास बरेच दिवस झाले. परंतु त्याचीं इष्ट फळें चाखण्याइतकें मात्र गोव्याचें नशीब नाहीं. त्याचें कारण हेंच, झाडाला उत्तम फळें लागलीं तरी ती काढून घेण्याची ताकद अंगीं असावी तेव्हांच तीं हातास लागतील. कार्यसिद्धीस लागणारी ताकद मिळविण्याचा प्रयत्न केल्यावांचून फक्त नशिबास दोष देणें ठीक नव्हे.

गोव्यांत ख्रिस्ती समाज संख्याबळानें हिंदु समाजा इतकाच असला तरी सांपत्तिक दृष्ट्या हिंदु समाज कमकुवत असल्यावरून गोमांतकीय राजकीय परिस्थितींत अनुकूल फेरफार घडवून आणण्याजोगी पात्रता संस्कृतिभिन्नत्व पावलेल्या उभय समाजांत निदान तूर्त दिसून येत नाहीं.

अखिल हिंदुस्थानांत दृग्गोचर न होण्यासारखी परिस्थिति गोव्यांस प्राप्त झाली असल्याकारणानें, नशीबाची परीक्षा पाहण्यासाठीं गोमांतकीयांनीं गोव्याबाहेर जावें किंवा नशिबावर भरंवसा ठेवून गोव्यांतच स्वस्थ राहावें, असा प्रकार झाला आहे.

सद्या देखील गोव्यानें हालचाल न करितां उगीच राहून अखिल हिंदवासी लोकांच्या चळवळीमुळें मिळणाऱ्या स्वराज्याचा फायदा गोव्यास आपोआप मिळण्याची संधि प्राप्त झाली आहे असें असलें तरी भावी स्वराज्याचा पूर्ण फायदा घेण्यासारखी ताकद आंगीं येण्याची लायकी मिळवण्यासाठीं शक्य त्या बाजूनें, तूर्त चालू असलेल्या स्वराज्यप्राप्तिकारक हिंदी लढ्यांत आह्मां गोमांतकीयांनीं विशेषतः स्वदेशी वस्तूंच्या प्रचारानें तरी अवश्य भाग घ्यावा.

निदान अशा प्रकारचें आचरण आज गोमांतकीयांकडून न घडल्यास, अखिल हिंदवासी लोकांच्या स्वराज्यप्राप्त्यर्थ राष्ट्रकार्यीं लागणाऱ्या अतुल आत्मत्यागाचा फायदा घरबसल्या मिळविण्याचा दोष आह्मां गोमांतकीयांच्या पदरांत पडल्या शिवाय राहणार नाहीं. सबब, गोमांतकीयानीं कर्तव्यशून्य राहून दुसऱ्यानीं मिळविलेल्या हिंदी स्वराज्याचा फायदा नशीबावर हवाला टाकून घेतला असें इतिहासांत नमूद करून ठेवण्याचा प्रसंग गोव्याच्या नशीबीं येऊं नये असें मनःपूर्वक इच्छितों.

गोव्याचा भविष्यकाळ उज्ज्वल व्हावा असें ज्या गोमांतकीयांस वाटत असेल त्यानीं स्वार्थत्यागपूर्वक झटून स्वराज्य-साध्यर्थ अनुकूल अशी तयारी करण्याची एव्हांपासून खबरदारी घ्यावी व गोव्याच्या नशिबांत स्वराज्य-प्राप्ति आहे हें गोड भविष्य सत्य सृष्टींत उतरविण्याचा प्रयत्न सोडूं नये

इतस्ततः

परदेशी वस्तूंविरुद्ध इतकी जोराची हाकाटी चालू असतानां, इकडील बाजारांत परदेशी साखरेचा मोठा पुरवठा होणार असल्याची बातमी कानीं पडूं लागल्यापासून आमच्या व्यापारी लोकांच्या देशविघातक धंदेगिरीची कींव येत आहे. ही परदेशी साखर दर रत्तलीं १ आणा इतक्या स्वस्त भावानें विकण्यास परवडेल असें ह्मणतात. परदेशी माल स्वस्त पडतो ह्मणून आह्मीं हिंदी लोक जर तो खरेदी करण्याच्या मोहास बळी पडूं लागलों, तर आमची देशद्रोही वृत्ति किती स्वस्त झाली आहे हें दिसून येईल व जगाच्या बाजारांत हिंदवासी लोकांची किंमत कमी होईल.

× * +

आज, महात्मा गांधी, कै. देशबंधु दास, पूज्य विभूति कै. प. मोतिलाल प्रभृति लोकांनीं सर्वस्वाचा—देहाचा, प्राणाचासुध्दां—मोह सोडून सगळ्या जगांत हिंदुस्थानची किंमत पुष्कळपटीनें वाढविली आणि असलीं दातृत्वशूर व कर्तृत्वशूर नररत्नें निपजविणारा भारत-भू-प्रदेश पारतंत्र्यांत पडण्याच्या लायकीचा नसून, स्वातंत्र्याच्या मृद झालेल्या जगास त्यागवृत्तीचे धडे देण्याइतका सामर्थ्यवान् आहे, असा निश्चिती पटवून दिली. तर यांचेच राष्ट्रबंधु ह्मणविण्यांत धन्यता मानणारे गोमांतकीय परदेशीं मालाच्या स्वस्तपणावर लुब्ध न होतां, स्वदेशी मालास लागणारा ज्यास्त पैसा सुधां देऊन, किंबहुना, परदेशी माल न वापरल्यामुळें होणारी गैरसोय देखील सोसून, आपली स्वार्थत्यागी वृत्ति जागृत ठेवितील व त्या जगद्वंद्य म. गांधी दे. दास, प. मोतिलाल यांसारख्या राष्ट्रप्रेमी पुरुषांचें आह्मीं खरोखरच राष्ट्र-बंधु आहोंत हें सिद्ध करितील अशी आशा आहे

\+ + +

मुंबई येथ आर्ट सोसायटीतर्फे गेल्या जानेवारीमध्यें भरलेल्या चित्रकलाप्रदर्शनांत आमच्या प्रांतबंधूपैकीं श्री. चिमूलकर, मुळगांवकर, लाड [पितापुत्र], सर्वेकर, रामनाथकर वगैरे हिंदु व त्रिन्दाद, मिस् फेर्नांदीस, कुलास, इम वियु व्हास वगैरे ख्रिस्ती बंधुभगिनींनीं आपलीं सुंदर चित्रें ठेवलीं होतीं त्यापैकीं त्रिन्दाद यांनां ' गव्हर्नर ऑफ बॉंबे प्राइज ' व ' पतियाळ महाराज प्राइज', चिमूलकर यानां 'हॉटसन्स प्राइज' मिस फेर्नांदीस यानां ' मॉटस प्राइज ', कुलास यानां ' हॉटसन्स प्राइज ' व मुळगांवकर याना ' मांडलीकस प्राइज ' अशीं बक्षिसें मिळालीं. चित्रकलेकरितां असलेल्या एकंदर वीस बक्षिसापैकीं सहा गोमांतकीयांच्या वाट्याला आलीं हें लक्ष्यात ठेवण्यासारखें आहे. शिल्पकला, शिवणकाम, फोटोग्राफी यामध्यें आपल्या प्रांतबंधूंकीं कोणीच प्रयत्न केलेला दिसत नाहीं. हीं काम केवळ गोव्याबाहेरील गोमांतकीय चित्रकारांचीं आहेत. गोव्यातील चित्रकार व फोटोग्राफर यानींहि आपलीं कामें सदरील प्रदर्शनात पाठविणें जरूर नाहीं काय ? झाल्या गोष्टी होऊन गेल्या. यापुढें तरी आमचे बांधव उपरोक्त प्रश्नास होंकारार्थी उत्तर देण्यास झटतील, अशी खात्री आहे.

गोमांतकीय
विधवा—विधुर, पुनर्विवाह

ह्मापसें येथील इग्रजी शाळेचे प्रोफेसर रा. गुडू सीताराम आमोणकर बी. ए. या विधुर गृहस्थांचा रा. लक्ष्मण द. महाम्बें, पणजी यांच्या गतभर्तृका मुलीशीं चालू महिन्याच्या १२ तारखेस विलेपारलें-मुंबई येथें पुनर्विवाह झाला. ह्या पुनर्विवाहास वर, वधु व त्यांची पालक मंडळी यानीं दाखविलेल्या मनोधैर्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करितों. गोव्यांत हा प्रकार नवीन असला तरी सर्वांच्या सहानुभूतिस पात्र असाच आहे. अगोदर, आठ वर्षांच्या मुलीचें लग्न करावें असें शास्त्र सांगतें. पण रूढीमुळें ही ८ वर्षांची उमर १६ वर्षांवर येऊन ठेपली आहे. ह्मणजे शास्त्राहून रूढीचा पगडा दुप्पट आहे असें अनुभव सांगतो हेंच मान पुनर्विवाहासहि लागू होणें उचित होतें. येथ, एकेरी ह्मणजे फक्त विधुर पुरुषाचे पुनर्विवाह होत असत हें प्रमाण विधवांसहि लागु होणें उचित वाटतें. त्या दृष्टीनें पाहल्यास प्रस्तुत विवाह हा दुप्पट पुनर्विवाह ह्मणून देखील रूढीला पसंत पडला पाहिजे.. रा आमोणकर दांपत्याचें आम्ही अभिष्ट चिंतितों.

ANO XV Nº 45

Quinta-feira, 19 de Fevereiro de 1931

DIRECTOR E PROPRIETARIO
ADV. G. P. HEGDO' DESSAI
FARMACEUTICO
Formado pela Escola Medica de Nova-Gôa

O BHARAT

Jornal de maior circulação

REDAÇAO E ADMINISTRAÇAO
Cusmane-Quepem

COMPOSICAO E IMPRESSAO
Tip. BHARAT Cusmane-Quépém

ANUNCIOS
Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

ASSINATURA ANUAL

Edição portugueza	1-08-00
Edição marata-portuguesa	3-00-00

SWADESHI

Vem da brilante pena do sr. Bragança Cunha o artigo que se refere ao titanico esforço na visinha India pelo desenvolvimento do seu comercio, industria e artes, e lamenta a nossa vergonhosa decadencia. Mas, não diz quem tem a culpa. Se o Povo ou o Governo.

Sou pela segunda alternativa, desde que se prova que os naturais de Gôa no estrangeiro representam importante papel em todos os ramos da actividade humana.

Lá eles adquirem soberba cultura intelectual, desempenhando, com proficiencia e mérito, variadas funcções. Lá jogam, a par dos estrangeiros, com bastantes capitais, exercendo comercio e industrias de alto valor.

E porque a sua terra natal é ingrata, numerosas familias, já hoje, abandonando a, estabeleceram-se aí, e os outros seguem o seu exemplo, porque aqui entre nós, debaixo do cativeiro da burocracia, em que vivemos, nada medra, nada prospera.

Explica-se. Pessimo sistema tributario, toda a legislação penosa para os executores. mas cómoda e benéfica aos encarregados da administração pública.

Dir-se-ia antes que todo o mal era pelo facto de o Terreiro do Paço decretar, sem conhecer as necessidades locais.

O funcionalismo, então, conseguiu montar duas maquinas burocraticas: uma na Metropole e a outra na Colonia. Aquela a tirar leis pouco acomodadas ao meio, e esta a satisfazer as aspirações burocraticas.

MOTILALGI.

Com a morte do Pandit Motilal Nehru perde a India um chefe adextrado, posto pela nação ao leme da barca, na actual delicada conjuntura do renascimento nacional. Cerebro condutor da patria indiana, ele desaparece precisamente no momento em que a sua habilissima tactica politica estava prestes a atingir o alvo pelo qual anciava o seu espirito penetrante. Porém morreu antes do triunfo, varado pelas perfidas e inexoraveis armas dos inimigos da India. Morreu no campo de batalha, ferido na sua constituição, combalido de septuagenario pelo cruel internamento nos carceres humidos da sua magestade britanica. Que a sua morte sirva para dar um novo impeto á luta sagrada da causa da India e que vá engrossar as fileiras dos seus combatentes.

Motilal Nehru simbolisa uma época e uma fase do movimento nacional indiano.

Foi um lutador pacifico, combatendo com armas que excluem mesmo o menor apêlo á violencia fisica, porque viveu num periodo de preparação em que a India desarmada estava incapaz de afrontar o adversario em todos os campos e tinha de restringir a sua acção ao desenvolvimento da disciplina nacional, indispensavel antes de se lançar no combate decisivo.

O seu extraordinario poder de adaptação capacitou-o a rivalisar com os astutos estadistas britanicos nos seus processos de arte politica chegando a imitar-lhes os habitos intelectuais e ás convenções sociais a ponto de os desconcertar, levando de vencida no proprio campo em que eles se julgavam inexpugnaveis.

Jurisconsulto eminente, ocupou no fôro indo-britanico uma situação elevada que só foi igualada por Deshbandhu Chittaranjan Das, outro chefe eminente do nacionalismo indiano. E' conhecido de todos que a profissão de advogado rendia-lhe em media, ao mez, a excepcional soma de 40.000 rupias, importancia que á má cara pagamos, por ano, aos nossos governadores gerais.

Orador e parlamentar inconfudivel, assenhoreara-se da lingua inglesa como do seu industáni materno a ponto de ter deixado mais duma vez em postura embaraçosa os habilissimos controversistas britanicos que ocupam as cadeiras do governo na Assembleia Geral da India.

Politico na mais elevada acepção do termo, soube jogar com os numerosos e complexos interesses de que é feita a trama de politica indiana sendo não raras vezes chamado a desempenhar o papel do arbitro em conjunturas dificeis.

Homem da sociedade, distinguiu-se sempre pela sua extrema elegancia de maneiras tendo criado para si, tanto no meio indiano como britanico, a reputação dum *dandy* aprimorado celebrisando-se pela extravagancia do seu luxo no seu vestir e nas sumptuosas vivendas onde reuniu produtos do mais requintado conforto oriental e ocidental.

E' como a pretexto de converter o despovoado Mormugão em cidade comercial e industrial, se fundou uma Comissão de Melhoramentos, e esta com gastos de alguns laques, nem fez dele uma humilde vila. Apezar deste fracasso, não ha poder que dissolva a Comissão como inutil.

Doutro lado, a titulo de fomento agricola foram criadas Zonas Agricolas e o Credito Rural, a gosarem do rendimento, nada produzindo do útil, como não produz a magestatica Direcção da Agricultura.

Mais, com insuportavel agravamento dos impostos apenas se vingou a ideia de melhoria de vencimentos, mas com bem pouca produção do trabalho.

Menos ainda produz a instrução pública, quando com ensino livre se obteve na visinha India gigantesco progresso; mas entre nós para os fins burocraticos tal não convém.

E a obra do Conselho? Os eleitos, os nomeados e os natos fazerem causa comum!... Paciencia, ilustre patriota. Deixa-los agir em plena liberdade á sombra duma Ditadura que prometeu o ressurgimento nacional, e este anda bem longe da realidade.

Só nos consola o nosso bom povo, com a sua indiferença politica a suportar o martirio.

C. V. Gomes Pereira

EXPEDIENTE.

Está para findar o ano corrente do nosso jornal. A partir do novo serão introduzidos varios melhoramentos tanto na parte grafica como na substancial da Empresa. E' de justiça, porisso, que a assinatura em divida seja paga imediatamente.

Finalmente, caracteristica bem indiana, esse predilecto da fortuna, que reunia dotes tão extraordinarios e vivia rodeado de bens incomparaveis, poz tudo, a sua inteligencia invulgar, a sua sciencia de jurista, uma boa parte da sua fortuna, a sua velha casa, ao serviço do seu pais, não hesitando até compartilhar com os mais desafortunados dos seus compatriotas as humilhações resultantes do facto de pertencermos a um paiz sujeito oprimido, explorado e aviltado pelo estrangeiro.

E' numa idade em que a maior parte dos homens aspiram ao descanço, saiu á frente para o derradeiro combate da sua vida em prol da patria morrendo no seu posto de honra.

Paz ao velho lutador.

"PELO SWADESHI"

Bragança-Cunha — um dos mais cultos espiritos da minha geração—em um longo e brilhante artigo inserto no *Pracasha* sob o sugestivo titulo de *Pelo Swadeshi* faz interessantes e curiosas considerações sobre os usos e os costumes que adquirimos aos nossos dominadores e depois de verberar contra alguns dêles escreve:

"Do aspecto espiritual da nossa vida seria melhor não falar. Privados de cultivar a lingua que nos é propria e natural" somos uma geração sem meio de expressão, condenada a não deixar o menor vestigio dos nossos pensamentos os mais intimos e das nossas aspirações as mais elevadas. Povo sem lingua, nem literatura, temos cavado um abismo entre a grande massa analfabeta e o numero insignificantissimo dos que penosamente procuram exercitar-se numa linguagem extranha e pouco útil, desprezando a lingua materna".

Desde que os portugueses— aliás em uma bela e heroica aventura—aportavam as nossas prais estamos privados de cultivar a nossa lingua, mercê do plano da politica imperialista de Albuquerque—qual o de unificar a India pela lingua e religião e. pela união das raças para produzir aquilo a que mais tarde G. Le Bon chamaria "o flagelo da humanidade".

Goa com os novos senhores e submissa de si propria aceitou naturalmente de mãos beijadas naqueles tempos de intolerancia o Alvará de 27 de Junho de 1684 pelo qual foi fixado um praso de tres anos para introduzir o portuguez nos seus actos e nas suas relações e foi banido completamente o concanim sob penas severas que o governo cominaria aos desobedientes. A lei se foi rigorosamante executada não teve os resultados que se esperava, di-lo o antigo parlamentar e eminente publicista Cristovam Pinto, e a naturesa das coisas produzíu o diálecto indo-portuguez. Mas doutro lado, o portuguez que para aqui se transplantou sofreu tais modificações com algum tempo que passou para a categoria de portuguez crioulo, como se diz nos livros do sr. Fidelino de Figueiredo.

E nem admira que assim fosse. No Brasil a lingua oficial e nacional é o portuguez, que tem, como sabem, uma notavel literatura e cuja origem e o desenvolvimento estão ligados á historia politica de Portugal. Contudo o portuguez que se fala e se escreve na grande republica da America já não é tão puro como o de Portugal, tendo havido mesmo quem quizesse denomina-lo brasileiro, não por um estulto e mesquinho nacionalismo, mas porque aquele idioma transplantado para alêm do Atlantico tomou uma outra forma assaz notavel, adquiriu uma outra belesa, éxotica, tropical.

Isto que se deu no Brazil quanto ao portugues, quanto ao inglez tem-se dado o mesmo na America do Norte e Australia.

E' que uma lingua qualquer com todas as suas produções e aquisições amadurecidas pelos seculos sobre o solo natal— escreve Rabindranath Tagore— sendo transportada a uma terra extranha que tem o seu desenvolvimento proprio e a sua historia propria, entrava o progresso da cultura e destroe o juizo individual e a perfeita liberdade de expressão. Em um meio diferente a propria riquesa da lingua torna um *impedimentum*. Se tal é o caso mesmo entre as raças em que a lingua ancestral se prolonga naturalmente na lingua materna—continúa o pedagogo de Shantiniketan— pode se imaginar, a que esterilidade chegaria um povo aceitando como instrumento de cultura uma lingua que lhe é completamente extranha.

E' o nosso caso. Aceitamos o portugues para " o nosso meio de expressão" despresando o concanim e o marata para perdermos toda a nossa personalidade do povo civilisado, para criminosamente esquecermos o concanim e para relegarmos, enfim, para a categoria de portugues crioulo a lingua que com tanto entusiasmo havimos adoptado.

Dahi a decadencia absoluta do senso estetico da manifestação da arte e do poder criador sobretudo em qualquer ramo da actividade humana, para imitarmos sómente o que nos vem de Portugál, mais os seus defeitos do que as qualidades.

Não nos seria dificil provar a asserção. Toda a nossa literatura consiste em livros — quando não seja feita de colecionar as inscripções das lapides e epitafios de erudição barata. Não nos falem do Nascimento ou do Paulino. Ambos grandes artistas em qualquer parte do mundo, ambos só enriqueceram a bibliografia portuguesa, embora muito tenham honrado a terra do seu berço, embora os dois se tenham inspirado nos motivos hindus.

Pois bem. Assente que a lingua portuguesa não se adapta ao nosso modo de ser, forçoso se torna saber qual o idioma proprio que nos servirá "do meio de expressão. ".

Bragança-Cunha conclue o seu artigo *Pelo Swadeshi* dizendo-nos: " Não nos envergonhemos de falar o concanim. Cultivemos pelo contrario a nossa lingua materna, empenhando-nos a apurar a sua forma ".

Não sabemos se isso é possivel ou pelo menos se merece a pena pensarmos em tal. V. P. Chavan numa conferencia realisada ha poucos anos na Sociedade Antropologica de Bombaim demonstrou que a lingua que se falava no Concão Maior ou Sapta—Concão desde tempos antiquissimos deriva do antigo Maharastri, actualmente uma lingua morta, e irmã gemea do marata, guzerate e outras linguas derivadas dos ramos sanscriticos. O concanim na opinião do sabio filologo teria ajudado muito o marata no primeiro estadio do seu crescimento e no estado actual está mui proximo de desaparecimento.

Não sabemos se o concanim teve a sua literatura propria e cremos bem que não.

As referencias honrosas que um missionario italiano fez á riqueza do lexico concanim são empanadas quando encontramos os vestigios de varias influencias que o modelaram muito de tempos a tempos, até os dias do advento dos portugueses, que o transformaram afinal em um outro dialecto: o indo—portugues !

As influencias Budhista, Jaina e Cristã são ainda hoje perceptiveis no pensamento religioso do povo concanim que na sua quasi totalidade professa a religião hindú e como "meio de expressão" tem ainda mais uma lingua: o Marata, uma das mais faladas na India, com a sua gramatica, com a sua literatura, com a sua historia, com a sua tradição, lingua das mais belas, e das mais ricas da India.

Se o concanim é o irmão gemeo do marata e se está hoje na sua fase do desaparecimento, enquanto o marata vai-se expandindo, dia a dia, porque não havemos de preferir esta última? Não pertencemos porventura ao mesmo ramo etnico que a cultiva?

Não nos seria pelo menos mais facil aprender o marata do que aperfeiçoar um dialecto moribundo restituindo-o á primitiva puresa da linguagem sem termos uma gramatica propria nem coisa alguma?

E ao espirito de T. Bragança Cunha não pode repugnar, por exemplo, de preferencia á qualquer outra, a difusão do Hindustani, a futura lingua nacional da India.

Qual delas adoptaremos?

Entre les deux...

Fialho de Rosa

ECOS-E-CRITICA

Arma e alma

O imperialismo britanico usou e abusou de todos os meios de violencia contra o movimento da redenção dos nossos irmãos da visinha India. Com o fim de esmigalhar o *gandhismo* o Vice-rei, representante do mesmo imperialismo no Indostão publicou uma série de ordenações, consentindo que os seus subordinados desenvolvessem todo o seu *furor brutal* contra o proprio Congresso Nacional Indiano.

Mas, ¿a *arma* do imperialismo conseguiu matar a *alma* do gandhismo? Não. Pelo contrario, contribuiu para incutir-lhe um vigor cada vez mais *vital*, ficando, a final, obrigada a confessar se vencida.

¿Não indica isso que a *alma* alcançará vitoria completa sôbre a *arma*?

Prova de tenacidade

Alguns jornais de Bombaim redigidos em guserate, marata e portuguez, referindo se ao inquerito oficial aos acontecimentos de Diu, informam que os habitantes da Praça promoverão um outro inquerito seu genuinamente popular, caso a diligencia governamental não fôr, por quaisquer circunstancias, capaz de descobrir a verdade em toda a sua plenitude.

A ser verdade o informe dos nossos colegas daquela cidade cosmopolita, não podemos deixar de apoiar a resolução do Povo daquele distrito, porque ela representa uma exemplar prova de tenacidade com que o mesmo Povo pretende concluir a sua empresa.

Tentativa baldada!

Quem vê a exemplar humildade com que senhoras das mais distinctas familias, enfileiradas no exercito de voluntarias, demovem o publico do proposito de comprar fazendas europeas, convencem-se, desde logo, de que a feliz data da redenção da India não está muito longe.

E de facto. Quando senhoras e crianças dum povo conquistado prontificam-se a sacrificar expontaneamente suas vidas em prol do ideal de sua libertação, não há conquistador por mais poderoso que seja — que as domine e as contenha debaixo do seu jugo.

A independeudia da India será, pois, um facto, resultando estereis os titanicos esforços da burocracia britanica que pretende, em vão, conservar subjugado a seu mando um paiz que desfruta a fama de haver sido berço da civilisação mundial—e dos proprios conquistadores.

Ma' politica

O magistrado do distrito de Mymensingh (Bengala) condenou a Nabendu Muzumdar, estudante do *M. A.* da Universidade de Calcuta á pena da prisão rigorosa de quatro mezes e da multa de 400 rupias, substituivel pela prisão rigorosa de mais dois mezes.

¿Que crime havia cometido o arguido? O de haver gritado *Vandê Mataram*, palavras iniciais do Himno Nacional Indiano!

E' com uma politica de opressão desse jaez que tentam os inglescs eternisar o seu imperialismo na India! Má politica a que está seguindo a burocracia britanica, politica que acabará por determinar lhe a propria derrota, — se não são falsas as lições da Historia que é a mestra da vida das nações e dos povos.

Digno de nota

Na Exposição de pintura e desenho, realisada em Janeiro proximo findo sob os auspicios da *Art Society*, de Bombaim. foram premiados os nossos seguintes patricios: o sr. A. X. Trindade com o premio "H. E. The Governor of Bombay Prize e com o de Maharajá of Patiala Prize"; o sr. R. G. Chimulker com o de "Honorable mr. W. F. Hudson's Prize"; a sra. L. Fernandes com o de "Dr, Monte's Prize;" o sr. D. J. M. Colaço com o de "The Honorable Sir Ernest Hotson's Prize; e o sr. P. S. Mulgãonker com o de "Mr. N. V. Mandlik's Prize".

E' digno de nota o facto de que dos vinte premios reservados na Exposição couberam seis aos filhos de Gôa.

Coisas de Diu

E' sabido que o inquerito aos acontecimentos de Diu foi ordenado pelo Ministro das Colonias sob proposta do Governo Geral da India. Desde este momento sem ser resolvido o mesmo inquerito por quem o determinou, o governador afastado não pode ir reassumir as suas funcções.

Corre, porêm, á bôca cheia que o sr. Capitão Feio Folque vai retomar conta do seu cargo sem resolução ministerial sobre o inquerito que ninguem sabe em que deu ou vai dar.

Manifestações em Goa

A morte do grande patriota e indomavel caudilho da revolução pacifica da India, Pandit Motilal Nehrú, causou em Gôa uma consternação como poucas vezes se tem visto, seja entre os hindús, seja entre os catolicos, maometanos etc.

Em Nova-Gôa o comercio observou *hartal* no dia 7, data da cremação do grande morto. Tambem nesse dia foi observado *hartal* em Mapuçá, Margão, Pernem e ... em suma em quási todos os pontos de Gôa. Ainda nas obscuras aldeias viam-se as mercearias e outros estabelecimentos, com portas fechadas.

As escolas de marata e urdú, de ensino particular, estiveram fechadas. Nas escolas de lingua inglesa embora as mesmas funcionassem, o concurso dos alunos era insignificante quasi nulo.

Houve tambem na Vila Nova de Curchorem uma reunião dos habitantes desta localidade sob a presidencia do sr. advogado Molcorneucar, sendo enviado ao sr. Javaharlal o telegrama concebido em sentidas condolencias pelo passamento do grande patriota Nehru.

ADMINISTRAÇAO DO CONCELHO DE QUEPEM

Pelo juizo das execuções administrativas do Concelho de Quepem e cartorio do escrivão Volvotcar, vão ser vendidos em hasta publica á porta da administração do mesmo concelho pelo preço da praça no dia 12 de Março proximo seguinte pelas 11 horas, um boi de côr branca, de 8 anos de idade, uma vaca leiteira com o seu bezerro, de 8 anos e 6 mezes de idade, respectivamente sendo a vaca de côr preta, uma vitela de 6 anos da idade, de côr cinzenta, uma vaca de 7 anos de côr preta, uma junta de bois de carroça, sendo um de côr vermelha e outro de côr branca, ambos da idade de 10 anos pertencentes a junta a Babagy Naraina Naique Dessay e o demais gado a Pandú Essó Naique Dessai, ambos de Fatorpá, penhorados na execução administrativa que a Comunidade de Fatorpá promove aos ditos Pandú como arrematante e outro como fiador e principal pagador, pela divida da renda dos campos dos anos de 1920 e 1921 alem de outros acessorios do processo. Os que quizerem arremata-los compareçam nos referidos dia, horas e local. E para ser publico se expediu este.

Quepem, 10 de Fevereiro de 1931.

O escrivão do processo
Caxinata Sinay Volvotcar

Verifiquei
O juiz de execuções
M. P. Rebelo

Pelo juizo de direito da Comarca de Quepém e cartorio do escrivão do 2° oficio Carapurcar vai á praça para venda em hasta pública á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldém ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem, no dia 6 do seguinte mez de Março, ás 10 horas, pelo maior lanço que se oferecer acima da sua avaliação o dominio útil do aforamento do terreno denominado "Maidda" da cultura de arroz e coqueiros sito na aldeia Naiquinim do Concelho de Sanguem avaliado por 4.137:13:00, discrito na na Conservatoria desta Comarca sob o n° 461 na carta precatoria vinda da Comarca de Salcete, extraido dos autos civeis de execução hipotecaria que Francisco Tomás Fortunato de Bragança de Santa Cruz promove contra Maria Baldomira Necessidade Henriquieta de Souza seu marido de Seraulim e outros. O arrematante pagará a contribuição de registo nos termos de lei e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e co proprietarios. E para ser público se expediu este. Quepem, 10 de Fevereiro de 1931.

O éscrivão do 2° oficio
Mucuada Sinai Carapurcar

Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

* × *

पुढील बातमी अ. प्रे. मार्फत प्रसिद्ध झाली आहे. " सध्याच्या आर्थिक परिस्थि. तीचा विचार करण्याशाठीं मंगळोर येथील कॅथोलिक लोकांची गेल्या ता. ३१-१-३१ रोजीं एक सभा भरली होती. त्या सभेमध्यें विचारविनिमय होऊन यापुढें साध्या राह- णीनें राहावयाचें व युरोपियन पद्धति आणि आचारविचार यांचा त्याग करावयाचा असें यांनीं ठरविलें असून यापुढें स्वदेशी मालच विकत घ्यावयाचा व वापरावयाचा असें निश्चित केलें आहे. या सभेच्या चालकवर्गापैकीं बहुतेक तरुण लोकांनीं खा. दीच पेहरली होती ".

* × *

सदरील बातमीवरून सांप्रत राष्ट्रदास्य विमोचनार्थ चालू असलेल्या चळवळीचा परिणाम उपरोक्त धर्मीयांवर कसा उत्कट रीतीनें झाला हें कळून येईल. धर्मप्रेम व देशप्रेम हीं परस्परांत विघातक नसून कोण- त्याहि धर्माच्या अनुयायास राष्ट्रप्रेम कर ण्यास आडकाठी नाहीं. परसंस्कृतीच्या अ मदानींत स्वत्व विसरून कृत्रिम चोंच. ल्यांस बळी पडलेल्या स्वकीयांचे डोळे उघ. डण्यास सांप्रतची चळवळ कारणीभूत झाल्याबद्दल, त्या चळवळीचें पर्यवसान अखेर स्वातंत्र्यप्राप्तींत हमखास होईल यांत संदेह नाहीं.

\+ + +

मंगळूरच्या किरिस्तांवांचें अनुकरण आ. मचे फिरंगाळलेले कंटीसाहेब करतील तर त्यापासून त्यांचें कोटकल्याण होणार आहे, हें उघड होय. गोमांतकाची आर्थिक परि- स्थिति सध्या इतक्या डबघाईस आलेली आहे कीं, अवास्तविक खर्चांचा पूर्ण निपात झाल्याखेरीज, कोणालाहि निभाव धरणें शक्य नाहीं. स्वदेशीला पाठिंबा देण्यासाठीं ह्मणून नव्हे तर स्वतःचें अस्तित्व टिकवून धरण्यासाठीं गोमांतकीय किरिस्तांव मंग. ळूरच्या धर्मबांधवांचा कित्ता गिरवण्याचा अंतःकरणपूर्वक प्रयत्न करतील अशी आ- ह्मांस खात्री आहे. ही आमची खात्री अनां. ठाई होईल काय ?

—ह्मापसें येथील ज्ञानप्रसारक मंडळाच्या विद्यालयांत ता. ११।२।३१ रोजीं सालाबा- दप्रमाणें दासनवमीचा उत्सव रा. यशवंत खलप यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. उत्सवप्रसंगीं मुलांचे श्लोक व त्यांस पुस्तकें वांटण्यांत येऊन शिक्षकांनीं व विद्यार्थ्यांनीं समर्थांच्या चरित्रावर भाषणें झालीं.

—डोळी-ह्मापसें येथील श्रीरामदास विद्यालयांत ता. ११।२।३१ रोजीं सालाबाद- प्रमाणें श्रीदासनवमीचा उत्सव ह. भ. प. बाळकृष्णबुवा इस्लामपूरकर यांच्या अध्य- क्षतेखालीं पार पडला.

गोवा विद्याप्रसारक मंडळ

गोमांतकप्रांतांत विद्याप्रसाराची फार उणीव आहे ती दूर व्हावी अशी मनःपूर्वक इच्छा असलेल्या गोमांतकस्थ व बाहेरील सर्व लोकांस विनंति करण्यांत येत आहे कीं, वरील संस्था स्थापन होऊन आज २० वर्षें पुरीं होत आलीं. संस्थेकडून इतक्या वर्षांत कार्यभाग कोणता झाला हें येथील रहिवाशांस प्रत्यक्ष दिसत असल्यावरून त्याचें वर्णन स्तुति किंवा निंदा करण्याची येथें जरूरी दिसत नाहीं. भूमीच्या कसाप्रमाणें, खता प्रमाणें आणि पर्जन्यादि इतर साधनांच्या अनुकूलतेप्रमाणें शेतांत धान्याचें पीक कमी किंवा जास्त येतें तोच दृष्टांत वरील संस्थे वदि लागू आहे.

प्रस्तुत ह्या विनंतिपत्रानें पूर्वोक्त विद्याप्र. सारेच्छु अशा सर्व लोकांशीं खालीं सही करणाऱ्या इसमाची नम्रतापूर्वक विनंति आहे कीं ही संस्था वर्धमान व्हावी आणि विशेष कार्यक्षम व्हावी असें तुह्मां सर्वांस वाटत असलेंच पाहिजे ह्मणून तुह्मीं ह्या वि. नंतीकडे आजवरच्यापेक्षां अधिक कृपापूर्वक लक्ष पुरवून ह्या संस्थेला अधिक साह्य क रण्यास उद्युक्त व्हा ! कारण संस्थेची आ. र्थिक स्थिति मुळींच अपूर्ण होती व आतां येत्या मार्च महिन्यापासून त्यांतहि कांहीं तूट पडण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे. ह्मणजे खालीं सही करणाऱ्यांकडून संस्थेला गेल्या १० वर्षांपासून दरमहा जी ६० रुपयांची देणगी देण्यांत येत असे, ती येत्या मार्च महिन्यापासून, दिलगिरीनें बंद करावी ला गत आहे ! ह्मणून गोमांतकस्थ आणि गो. मांतक हितेच्छु बाह्यस्थ उदारात्म्यांनीं ही उणीव भरण्याकरितां व संस्थेची वाढ हो. ण्याकरितां आजपासून झटून व्यवस्था क- रावी अशी प्रार्थना आहे.

माझ्या परिचयाच्या बहुतेक सर्वांस ठाऊक आहे कीं,

१] वरील संस्थेनें चालविलेली ' आ. ल्मेद कॉलेज ' ही शाळा १० वर्षेंच अ- व्याहत चालली ह्मणजे तींत शिकून निघ. णारे विद्यार्थी देशाभिमानी व शिक्षणा- भिमानी असे अध्यापक निपजतील व त्यां च्यांतून कित्येक स्वार्थत्यागपूर्वक झटणारे निघून ही तर काय, पण अशा आणखीहि जागोजाग शाळा काढून व त्या ठिकाणीं चालून विद्याप्रसार अव्याहत चालण्याची परंपराच उत्पन्न करतील अशी उमेद व अ टकळ आरंभीं पूर्ण वाटत होती; ह्मणून आ- रंभीं (१९११ सालापासून) कांहीं वर्षें प्रतिसालीं येणारी तूट भरून कांहीं वर्षांनंतर संस्थेला आर्थिक बाबतींत साधारण आधार प्राप्त झाल्यानंतर वरील देणगीचा संकल्प त्या वेळीं ५-७ वर्षांपुरताच ह्मणून आह्मीं केला होता. तरी तो आज १०-१२ वर्षें चालला हीच शिकस्त झाली.

(२) विद्याप्रसारक—मंडळाचें ध्येय नुसते सरकारी कामगारच तयार करण्याचें मुळापासून नसून, औद्योगिक शिक्षणानें स्वावलंबी नागरिकहि मुख्यतः निपजावे असें होतें. पण नाखुशीची गोष्ट अशी कीं, प्रत्येक वर्षारंभीं खासगी प्रयत्न व जाहिरा- तीनीं प्रसिद्धि करून सुद्धां ' औद्योगिक शि- क्षक आणि तसले विद्यार्थी ' मुळींच लाभले नाहींत ! असें होऊन, १८।१९ वर्षांच्या अनुभवानंतर सुद्धां— तें ध्येय सिद्ध हो- ण्याची पात्रता अद्यापि फार दूर आहे— असाच धडा आह्मांस मिळाला !! वस्तुतः सरकारी सेवक तयार करण्याचें काम सर- कारी विद्यालयांतून भरपूर चालत आहे. त्याचीं फळें वाजवीपेक्षां कितीतरी अधिक पिकत असून फुकट जातात. ह्मणून ह्या आणखी तसल्या प्रयत्नाची जरूरच नव्हती; अर्थात् अभिषादाखल ह्मणून आजवर झा लेला खर्च हेतुविरुद्धच झाला अशी स्वतःपुरती निराशाहि झालेली आहे.

(३) माझें वय ७२ वर्षांवर झालें ह्मणून आर्थिक व शारीरिक सामर्थ्य आतां उत्तरोत्तर घटतच जावयाचें हें स्वाभाविक आहे.

(४) प्रातीपेक्षां कौटुंबिकवगैरे ख- र्चाची वाढ उत्तरोत्तर अधिक होत आहे ह्मणूनहि काटकसरीवांचून आतां निर्वाह नाहीं.

अशीं हीं मुख्य ४ कारणें व दुसरीं हीं अनेक गौण स्वरूपाचीं पण अनिवार्य आ- हेत. तीं मनांत आणून विचार केल्यावरून निश्चय ठरतो कीं; सदरील संस्थेचें कांहीं कार्य यापुढें माझ्याकडून घडण्याची आशा संभवत नाहीं. ह्मणून माझ्यापुरता हा राजि- नामाच देऊन मोकळा होणें व कर्तृत्ववान् अशा पुढच्या पिढीतील तरुण होतकरू देशबंधु मंडळीवर या कामाचा भार सोंप- विणें हेंच योग्य होय. संस्थेला एक सभासद ह्या नात्यानें वरच्या शिवाय माझी वार्षिक वर्गणी चालू राहीलच.

सुदैवें करून गेल्या तीन वर्षांपासून संस्थेचें चालकत्व देशहितचिंतक व कर्तृत्व- वान् अशा सद्गृहस्थांच्या कमिटीकडे सोंप- विलेलें असून, ही मंडळी संस्थेच्या सर्वां- गीण उन्नतीसाठीं कळकळीनें यथाशक्ति झटणार यांत मुळींच संदेह नाहीं. कांहीं वेळ्यां अजून किती बाह्यावयास आहे हें त्यांच्या ध्यानांत आलेलेंच आहे. शिवाय, आ- मच्या प्रांतांत विद्यमान तरुण मंडळी, आ- मच्या तारुण्यकालापेक्षा देशाभिमानाच्या बाबतींत कितीतरी अधिक जागृत झालेली आहे हें जागोजाग वाचनालयें, व्याख्यानो- त्सव, नियतकालिकें, खासगी विद्यालयें इ. मूर्त स्वरूपांवरून उघड दिसत आहे. तेव्हां अशा होतकरू पिढीच्या स्वाधीन असल्या संस्था जाव्या; स्वतःच्या रंगाळण्यापासून त्या अलिप्त व्हाव्या; धडाडीच्या कार्यकर्त्यांच्या स्वैर मोकळिकीस वाव मिळावा, यांतच माझ्या सारख्या अशक्तांला आनंद व तितकेंच स- माधानहि वाटणें स्वाभाविक आणि उघड आहे. ईश्वरकृपेनें तथास्तु.

मु. हवेली, फोंडा गोवा.
ता. ८।२।१९३१

रामचंद्र पांडुरंग वैद्य, केरी.

'हिंदु'ची ओरड

गेल्या नोव्हेंबरांत निवडणुकांच्या वेळीं हिंदुकार रा. पै यांचे एक दूरचे नातेवाईक मजकडे येऊन ह्मणाले कीं, "यंदा आमचे दत्ता पै यांचा कौंसिलांत जाण्याचा विचार आहे, तेव्हां तुमची व तुमच्या मित्रमंडळीचीं मतें तुह्मीं त्यांना द्याल ना ?" यावर मी उत्तर दिलें कीं "डॉ. व्यंकटेशराव सरदेसाई, डॉ. साखरदांडे, श्रीमंत काकासाहेब देशप्रभु यांसारख्या प्रेमळ व कर्तृत्ववान् लोकांचीं नांवें उमेदवारीसाठीं जनतेतर्फेच पुढें आल्याची बातमी ज्या अर्थी ऐकूं येऊं लागली आहे, त्या अर्थी या तुमच्या शब्दद्याला माझें मत किंवा माझ्या मित्रमंडळीचेंच नव्हे तर इतरांचीहि मतें मिळणें मला शक्य दिसत नाहीं." ही गोष्ट कानीं गेल्यापासून 'हिंदु'ची माझ्याविरुद्ध निरर्गल ओरड चालली आहे. त्यांत आणखी 'भारत'मित्राच्या जानेवारीच्या अंकांत 'हिंदुप्रमाणें भारतानें पगडी फिर- वली नाहीं' अशा अर्थाचे शब्द प्रसिद्ध झाल्यामुळें 'हिंदु'चे प्रहार जरा जास्त जोरानें चालले आहेत. सदरील तथ्यहीन ओरडी- मुळें हिंदूच्या भणाणलेल्या डोक्याला जर शांतता लाभण्यासारखी असेल तर त्यानें शोध्या मोध्या पाहिजे तसल्या स्वरांत मज विरुद्ध पाहिजे तितकें ओरडावें. मी त्याबद्दल मुळींच अटकाव करीत नाहीं. हिंदु पत्राचें ध्येय हिंदु जनतेंत सुसंघटित ऐक्यवर्धक असें असावयास पाहिजे होतें, परंतु मडगां- वच्या 'हिंदु'त नेहमी कोणा ना कोणा हिंदु- विरुद्ध कुपेक्षालेख तोहमती प्रसिद्ध होत असल्यानें त्याचें ध्येय हिंदूंत दुफळी माज- विण्याचें आहे असें वाटूं लागतें.

रिवण, १४।२।३१

नारायण भास्कर नाईक

१५ वें म. सा. संमेलन

स्वागतमंडळाच्या सभेस आमंत्रण

१५ व्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाचा जमाखर्च व रिपोर्ट तयार झाले असून त्यांवर अभिप्राय घेऊन ते छापण्याचा व संमेलन विषयक आणखी कित्येक प्रश्नांचा विचार करण्यासाठीं येथें श्रीदामोदर विद्याभुवनांत

येत्या ता. २१ शनिवार रोजीं संध्याकाळीं बरोबर ६॥ वाजतां स्वागतमंडळाची सभा भरणार आहे. रिपोर्टांत घालण्यासाठीं स्वागतमंडळ व स्वयंसेवक–दल ह्यांचे फोटोहि दुसऱ्या दिवशीं घेण्यांत येणार आहेत. सर्व स्वागतसभासदांस व स्वयंसेवकांस खासगी आमंत्रणें पाठविलीं आहेतच तथापि एखाद्यास एकादे वेळीं तें चुकामूक होऊन न मिळणें संभवनीय आहे. ह्मणून हें जाहीर आमंत्रणहि देण्यात येत आहे. तरी सर्व स्वागतसभासद व स्वयंसेवक ह्यांनीं अगत्यपूर्वक हजर राहावें अशी विनंति आहे.

सू.— ज्या स्वागतसभासदांकडून संमेलनासाठीं देऊं केलेली वर्गणी अद्याप आलेली नसेल त्यांनीं ती सभेपूर्वी पोंचती करावी. हिशेबतपासणी–मंडळाची सभा ता. १९ रोजीं रात्रौ ८ वाजता हिंदु कार्यालयांत भरणार आहे. ता. २० व २१ रोजीं संमेलनाचा हिशेब स्वागतमंडळाच्या सभासदांस पहाण्यासाठीं ठेवण्यांत येणार आहे तरी ज्यांना तो पहावयाचा असेल त्यांनीं श्री. का. दा. नायक यांच्याकडे त्यांच्या नवीन बाजारांतील दुकानीं येऊन पहावा अशी विनंति आहे.

मडगांव, ता. १४।२।३१

का. दा. नायक, दु. ख.

द. व्यं. पै, मु. चि.

वर्ष १५ वें. अंक ४६
गुरुवार ता. २६ फेब्रुवारी सन १९३१

वर्गणीचे दर
[illegible] ट. ख. सह ३ रु. [आगाऊ]
[illegible] अंकास [illegible] आणा

[illegible] समक्ष अगर पत्रद्वारें.

[illegible] व मालक
गों. [illegible] साई=फारमासेवतिकु
[illegible]द्रण काशन [illegible] —कुसमण केपें-गोवा

भारत
O BHARAT

ANO 15. N. 46
QUINTA-FEIRA 26 DE FEVEREIRO DE 1931


ASSINATURA
Por cada ano tres rupias

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

VINOLIA
WHITE ROSE SOAP

गरमीच्या दिवसांत जसा शीतल गुलाब मनाला आनंद देतो तशाच प्रकारचा आनंद तुम्हांला प्रत्यहीं देण्याचें काम "व्हीनोलिया व्हाइट रोज" साबण खात्रीनें करील.



VINOLIA CO., LTD.
LONDON, ENGLAND

VWR 77-111

धी न्यु बाब बँकिंग कोर्पोरेशन लिमिटेड
(गोव्यांतील एजंट लवकरच कळेल)

ही विम्याची कंपनी निवळ स्वदेशी असून आपल्या सभासदांचें आपत्त्याचेवेळीं कल्याण साधणें हेंच तिचें ध्येय आहे. एकदां प्रवेश फी साडेपांच रुपये व बारा वर्षांच्या अवधींत दरमहा एक रुपया व इतकीच मरण संदेश फी भरली म्हणजे कंपनीचे सर्व फायदे सभासदांनां त्यांच्या हयातींत किंवा पश्चात मिळत असतात.

वयाची अट नाहीं व वैद्यकीय तपासणीचा ससेमिराहि पण नाहीं.

अनुभवांतीं खात्री होईल विशेष माहिती साठीं पत्रव्यवहार करा :—
१७ नानजी बिल्डींग, एलफिस्टन सर्कल, फोट, मुंबई


The New Bombay Banking Corporation Ltd.

E' a melhor Companhia de mutua beneficiencia que auxilia os seus sócios.

Estes pagando a taxa de admissão de 5 rupias e 8 tangas e uma rupia por cada mez durante doze anos seguidos e mais a taxa chamada de *aviso de óbito* (que nunca pode exceder a uma rupia por mez), podem desfrutar de todos as vantagens da Corporação que é de mutua beneficiencia.

Não há exame médico nem limite de idade. Logo será conhecido agente de Gôa.

Para mais informações, correspondam com a Companhia em 17, Nanji Building, Ele. Circle
FORT, BOMBAY



सर्व तऱ्हेच्या कणमधूर हीज मास्टर्स व्हॉइस प्लेव्या व ग्रामोफोन

Discos e gramafones o mais encantadores estão á venda no bem provido estabelecimento dos srs. Costa e Sons.

Mercado Novo, Margão



आत्माराम रा. तेली (डिचोलकर)
यांचा
ताजमहाल
नवा बाजार—मडगांव

या 'ताजमहालां'त गिऱ्हाइकाला खाण्यापिण्याचे ताजे, शुद्ध व पवित्र पदार्थच पुरविले जातात. साजूक व खमंग तुपाचे जिन्नस वरील 'महालां'तच मिळतात. गिऱ्हाइकाच्या रुचीला मानवतील व प्रकृतील पचतील, असेच पदार्थ 'ताजमहालां'त ठेवण्यांत येत असतात, याची प्रत्येकानें खात्री बाळगावी।

इकडे लक्ष द्या !



प्रखर उन्हामुळें व मोटारच्या धूळीमुळें डोळे बिघडतात ना ?

तर मग डोळे उत्तम राहण्यासाठीं आमचेंच 'सन् गागल्स्' चष्मे वापरा. एकवेळ अनुभव घेऊन खात्री करा; शिवाय आमचकडे 'गारेचे' थंडगार चष्मे डोळे तपासून मिळतील.

पत्ता— रामभाऊ
नवा बाजार मडगांव

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार फाल्गुन शु. ९ मी शके १८५२

बहिष्कार व पुरस्कार

ज्याला आपल्या. राष्ट्रीयत्वाचा अभिमान आहे, असा प्रत्येक इसम, आपल्या देशांत उत्पन्न झालेला हरएक प्रकारचा माल ज्यास्त पैसे देऊन सुधां अलबत खरेदी करितो, परकी देशांत तयार झालेल्या वस्तू सहसा विकत घेत नाहींं. हें तत्व पुढारलेल्या युरोप अमेरिका खंडासारख्या देशांतील लोक सुधां अमलांत आणतात. इतकेंहि असून विश्वबंधुत्वाचा टेंभा मिरविण्यास हेच लोक तयार !

पुढारलेल्या देशांतील लोक आपले देश सुखसमृद्धींत नांदावे ह्या दृष्टीनें स्वदेशी व्यापार जिवंत ठेवूं पाहतात, तर आज हिंदुस्थानांत आह्मांस स्वदेशी वस्तूंचा प्रचार, आमचें हिंदी राष्ट्र मृत न होण्यासाठीं, चालू ठेविला पाहिजे.

उद्योग, धंदे, कला, व्यापार हीं साधनें राष्ट्रांतील जिवंतपणा कायम टिकवितात उद्योग धंदे वगैरेंची वाढ झाल्यावर लोकांत निरुद्योगीपणा नाहींसा होऊन प्रामाणिकपणाचा व्यवहार करण्याची सवय लागते. व तरतरी कायम राहून बुद्धिविकासानें नवीन शोध लावण्यास उत्तेजन मिळतें.

ह्याच्या उलट प्रकार परदेशी वस्तूंवर गुजराण करण्याचा चटक लागलेल्या लोकांची होते. परदेशी वस्तूंवर अवलंबून राहिल्यानें एकप्रकारचें मनोदौर्बल्य येऊं लागतें. हा नियम हिंदुस्थानास कसा लागू होतो तो पाहूं.

वास्तविक पाहतां, हिंदी लोकांच्या अभिरुचीप्रमाणें माल इकडेच निर्माण होणें अगत्याचें होतें. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, ज्या प्रकारचे कपडे इंग्लंडांतून इकडे येतील त्या प्रकारचीं वस्त्रें वापरून आमच्या देहाची कशी तरी सजावट करण्याइतकी आमची अभिरुचि बदलली आहे.

या पुढें जर ही परंपरा चालू झाली तर आमच्या परंपराप्रिय लोकांत अशी एक समजूत दृढ होईल कीं, फार वर्षेपर्यंत एक सारखेपणानें इंग्लंडचींच वस्त्रें वांपरल्यानें तीं वस्त्र वापरणें ही एक रूढीच आहे. शिवाय, परव्यापार-दास्यामुळें आमचें राष्ट्र रसातळास जाईल. अशा प्रकार पुढें मागें न होण्याकरितां आज स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार व परदेशी वस्तुवर बहिष्कार जोराजोरानें अमलांत आणण्यांवर हिंदी-राष्ट्र-जीवन अवलंबून आहे.

आजच्या स्वदेशीच्या युगांत बहिष्कार कोणावर घालावा व स्वीकार कोणाचा करावा, ह्यांतील तारतम्य अवश्य जाणून न घेऊं तर आमच्या राष्ट्रीय उन्नतीला धोका बसेल.

बहिष्कार घालावयाचा तो मुख्यत्वें करून चैनीच्या पदार्थांवर अगोदर सुरू झाला पाहिजे, बहिष्कारानें दुसरें पाऊल नेमक्या अशा पदार्थांवर पडलें पाहिजे कीं, ज्या जातीचे पदार्थ हिंदुस्थानांत निपजतात.. शेवटीं जें जें काय परदेशी व विशेषतः इंग्रजी असेल त्या सर्वांवर बहिष्कार पुकारला गेल्यास उत्तमच होईल. परंतु, सदर हा अशा प्रकारचा बहिष्कार पदार्थांस लागू होणें इष्ट असलें तरी शास्त्र व भाषा यांवर, तीं परकी असल्याच्या सबबीवर बहिष्कार घालणें कधींच इष्ट होणार नाहीं. भाषा व शास्त्रीय ज्ञान यांवर जगाची सत्ता असते. ह्मणून, इंग्रजी अथवा पाश्चात्य भाषा यांवर देखील बहिष्काराचें सत्र कोणी घालूं पाहील तर तें आत्मघातकीपणाचें होईल.

आज मृत भाषेंत गणल्या जाणाऱ्या संस्कृत भाषेचा आस्थापूर्वक अभ्यास हिंदी संस्कृतीचा प्राचीन इतिहास जाणण्यासाठीं पाश्चात्य विद्वानांनीं चालविलेला आहे. तर, आज आम्हां हिंदी लोकास या आधिभौतिक प्रगतिमय जगांत जिवंत राहावयाचें आहे, ह्मणून दिवसेंदिवस युरोप अमेरिका खंडांत आजपर्यंत प्रसिद्ध झालेले व पुढें होणारे नवीन शोध आम्हास ज्ञात होण्यासाठीं, व जगांतील माहिती उपलब्ध करून घेण्यासाठीं हिंदी लोकांनीं पाश्चात्य भाषा व शास्त्र यांवर बिलकूल बहिष्कार घालूं नये.

आम्हांस बहिष्कार फक्त परदेशी वस्तूंवरच घालावयाचा आहे व तो अशासाठीं कीं, हिंदुस्थानांत असलेले देशी धंदे भरभराटींत यावे व नवीन धंदे अस्तित्वांत येण्यास वाव मिळावा असें न होतां, हिंदी लोक परदेशी वस्त्रें नेसण्याच्या मोहास बळी पडतील तर थोड्याच वेळांत परदेशी वस्त्रें उत्पादन करणारे कारखाने कांही कारणानें बंद पडतील किंवा परदेशी लोक आमची खोटी करण्यासाठीं म्हणून तीं वस्त्रें आम्हांस न पुरवितील तर देखील हिंदी लोकांस त्या वस्त्रांशिवाय नग्न राहण्याची पाळी येईल। ह्या सर्व विवेचनावरून असें प्रतिपादण्याचा हेतु आहे कीं, शास्त्रीय ज्ञान वगैरे जें काय उपयुक्त आहे तें परदेशी झालें तरी बहिष्कारार्ह समजलें जाऊं नये. बहिष्कार फक्त परदेशी मालावरच घालावा व एकंदर स्वदेशी मालाचा व परदेशी विद्येचा पुरस्कार करावा.

इतस्ततः

गेल्या शुक्रवारीं इकडील लिसेवचें वार्षिक शिक्षण संपून पुढच्या वर्षास पसार झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें वाचण्यांत आलीं. सबंध वर्ष अभ्यासांत घालवून शेवटीं नापास होण्याचा दोष विद्यार्थ्यांच्या माथीं स्थापन करणें बरवर सयुक्तिक वाटलें तरी, सर्व दोष विद्यार्थ्यांचाच असें ह्मणतां येत नाहीं, कांहीं विषय अनेक प्रकारचे व एकदम शिकावयाचे असतात. त्या सर्वहि विषयांत पारंगवता किंवा नुसता शिरकाव करून घेणें सर्वांच्या बुद्धिक्षेत्रांस आकळून होत नसतें.

* + *

असें असतांहि विद्यार्थ्यांच्या अभ्यासास योग्य वळण लावून त्याला एकंदर विषय सुलभ व बुद्धिग्राह्य करून देणाऱ्या व अभ्यासांतील अडचणी दूर करणाऱ्या शिकवणदाराची गरज असते. तूर्त लिसेवांतील प्रोफेसरांस अनेक विद्यार्थ्यांस शिकवावयाचें असतें म्हणून मुलांस दक्षतापूर्वक शिकवण्यास त्यांस सवडच नसते म्हटल्यास चालेल.

\+ * +

अशांत ज्या कोणास आपला मुलगा चांगल्या प्रकारें शिकावा असें वाटतें ते एखाद्या शिकवणदारा (explicador) कडून मुलास शिक्षण देण्याचा प्रयत्न करितात. सुदैवानें विद्यार्थ्याचे प्राथमिक शिक्षण चांगलें झालें असून तो अभ्यासू वृत्तीचा असेल तर शिकवणदाराच्या अल्प श्रमाचें चीज होऊन पास झाल्याचें श्रेय त्याच्या पदरात पडतें.

× + +

परंतु बहुधा असें घडत नाहीं. अगोदर प्राथमिक शिक्षण कसें बसें पार पाडून लिसेवांत आपला मुलगा प्रविष्ट झाला ह्मणजे कृतकृत्य झालों असें त्यांचे पालक समजतात. अगोदर असें अपुरें शिक्षण घाईनें संपवण्यांत आलेलें प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस लिसेवांत प्रथमच्या वर्षी पहिलें पाऊल टाकल्याबरोबर शिकवणदाराची आवश्यकता वाटूं लागते. व ही संवय अखेरपर्यंत ह्मणजे लिसेवचें शेवटचें वर्ष संपेपर्यंत कायम राहते. वास्तविक पाहतां शिक्षणाचें अंतिम ध्येय ह्मणजे स्वतःस पाहिजे असलेलें ज्ञान संपादन करून स्वावलंबी होणें, पण, आमच्या लिसेवांतील विद्यार्थी ज्ञानसंपादनानें स्वावलंबी होण्याऐवजीं शिकवणदारानें चर्वित केलेलें शिक्षण सेवन करण्या इतके परावलंबी झालेले असतात.

खुलासा

आम्हीं मंगेशी येथें साजरा केलेल्या श्रद्धानंद दिनाविषयीं बऱ्याच लोकांचा गैरसमज झालेला असावा असें आमच्याकडे आलेल्या तक्रारीवरून दिसतें. तरी आम्हीं खुलासा करतों कीं सदर दिनोत्सवाचा उद्देश फक्त धार्मिक जागृति व्हावी हाच होता. इतर कोणताच हेतू धरून साजरा केला नाहीं.

ता. २२-२-३१

पांडुरंग सीताराम चव्हाण
शाळा मास्तर, मंगेशी

पैसा उन्नति करूं शकेल काय?

गोमांतकाची आज अनेक वर्षांपासून सर्व बाजूंनीं एकसारखी अवनति होत चाललेली आहे. त्यांतल्यात्यांत तो आजच्या कठीण अशा जीवनकलहांत सांपडला असल्यामुळे आर्थिक अ[illegible] तीव्र बाधा होऊं लागली. [illegible] तिच्यावरच, आजच्या गोंधळलेल्या [illegible] स्थितींत, आमच्या सर्व अवनतीचा आ[illegible] करण्यांत येत आहे आणि तिच्यावर [illegible] ह्मणून आर्थिक उन्नति कशी करता येईल याच्याकडेच आज सर्वांचे लक्ष लागलेलें आहे. आर्थिक उन्नतीच आज प्रत्येकाला आपला तरणोपाय दिसत आहे. इच्छा असो वा नसो प्रत्येक जण आज याच प्रश्नाकडे खेचला जात आहे. आणि आर्थिक उन्नतीसाठीं कोणता इलाज योजावा हें सध्याच्या गोंधळलेल्या मनःस्थितीमुळें, बरोबर न समजल्यावरून प्रत्येकजण व्यग्र मनस्थितींत चाललेला असतो.

कोणत्याहि रोगावर औषधोपचार करण्यासाठीं पूर्वी त्याचें निदान ठरवावें लागतें. एकवेळ त्या रोगाचें मूळकारण मिळालें ह्मणजे मग तो मारणें सुलभ असतें. तेव्हां आर्थिक अवनति हें आमच्या अवनतीचें मुख्य कारण असेल काय ? नसल्यास मुख्य कारण काय आहे ? व त्याच्यावर कोणता उपाय योजला पाहिजे, याविषयीं विचार होणें अवश्य आहे.

आमच्या एकंदर अवनतीचें आर्थिक अवनति हें कारण असूं शकेल काय ? अस

—"वागाळें येथील 'पे. गौड सा. ब्रा. स. विद्यालया'चा द्वितीय वाढदिवस गेल्या ता. २३-२-३१ सोमवार रोजीं साजरा झाला. त्याप्रसंगीं संस्थेचे चिटणीस श्री. जयराम बा. प्रभु व विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. व्ही. एम्. कुडाळकर आणि पेडणे येथील समाजाच्या मंडळीचीं भाषणें व श्री. अनंत र. टोपलेकृत मुलांचे संवाद व पद्यें इत्यादि कार्यक्रम पार पडला.

ANO XV N.º 46

DIRECTOR E PROPRIETARIO
ADV. G. P. HEGDO' DESSAI
FARMACEUTICO
Formado pela Escola Medica de Nova-Góa

ANUNCIOS
Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

O BHARAT

E' caso para dizer: ao passo que, noutra India existem até caes *domesticados* professando os mais altos sentimentos de patriotismo, nesta nossa India não faltam, antes abundam homens *domesticados* sem a mais ligeira sombra dos menos sentimentos !...

...No tinteiro

Mahatma Gandhi impuzera ao vice-Rei da India, como uma das condições do *interregno* do seu movimento, inquerito aos actos de *selvageria policial de Borsad* onde centenas de senhoras inocentes foram insultadas e maltratadas sem motivo justificado.

Pelo que parece, tal condição foi aceite como o foram as outras que o Congresso Nacional Indiano, pela boca de Gandhi, impôs. E isto representa uma derrota monumental da *Arma* contra a *Alma* que vai triunfar.

Decididamente, ficou, pois, no tinteiro o tão apregoado prestigio da autoridade imperialista de que, a cada passo e por causa de nada, se fazia cavalo de batalha...

Que o concanim metodicamente cultivado seja susceptivel de produzir dentro do pouco tempo uma literatura, não é uma verdade que precisa ser demonstrada a quem conhece o seu opulento vocabulario, a variedade e a flexibilidade do seu fraseado, o seu ritmo, a força e a claresa da sua expressão. Não precisamos de recorrer para tanto á autoridade dos senhores missionarios estrangeiros que o conheceram apenas muito superficialmente. Poliglotas indianos e perfeitos conhecedores do marata, como o sr. Shanai Varlê Valaulicar, advogam com ardor a causa da nossa lingua tanto no campo teorico como no pratico.

Parece que para alguns há o receio de que o desenvolvimento da lingua concanim constitua um obstaculo ao nosso intercambio intelectual com a vasta região da India que nos rodeia e onde se fala o marata e mesmo venha a obstar o processo de unificação pan-indiana que se fará por meio da lingua oficial do futuro governo da India que será o industani. E o contrario que se me afigura ser verdadeiro Por mais paradoxal que isso pareça direi que a difusão do ensino na massa por meio do concanim literario modernisado e simplificado, contribuirá para a propagação entre nós do marata mais do que poderá fazer uma imposição forçada desta ultima lingua, porque o concanim, sendo o instrumento mais proprio para a difusão da instrução popular, facilitará e constituirá um grande passo para o conhecimento do marata de que ele pouco difere enquanto que o ensino directo do marata corre o risco de encontrar resistencia, por pequena que ela seja, na grande maioria da população laboriosa que ficará condenada, como o está hoje, a não cultivar nem uma nem outra lingua. E o mesmo sucederá tratando-se da difusão do hindustani.

A proscrição do concanim das nossas escolas é a principal causa do nosso formidavel e vergonhoso analfabetismo. Além disso, é certo que a cultura da lingua que nos é propria e a unica que pode contribuir para o desenvolvimento da personalidade do goês, forçosamente deformada e paralisada por falta dum meio de expressão que nos seja natural. A melhor prova disso está na esterilidade intelectual que produz aqui a lingua portuguesa que apesar de ter sido ancialmente trabalhada durante quatro séculos e ter usado muitos dos nossos melhores talentos não produziu em Gôa uma só obra de pensamento que mereça esse nome. Creio que, guardadas as devidas proporçôes, o mesmo se pode dizer do marata que entre os grandes classicos da sua literatura e entre os seus principais homens de letras não apresenta, se não estou em erro nome algum de filho de Gôa.

O despreso que os nossos patricios educados, tanto hindús como cristãos, professam pelo concanim é o resultado da politica seguida durante seculos pelos nossos dominantes mais ou menos estranhos á nossa terra que nos quizeram impor á força a sua propria lingua sem se importarem com o facto de que este rincão da India possuia um idioma fortemente enraizado e dificil de ser substituido por um outro. E' aos poderes publicos que temos de atribuir a decadencia que atingiu a nossa lingua-mãi a ponto de chegar hoje a ser rejeitada pelos seus proprios filhos. Neste assunto como noutros foi sempre aos governos que se dirigiu a minha critica, embora o sr. C. V. Gomes Pereira tenha duvidas a esse respeito porque lhe deve ter escapado o trecho do meu artigo que mereceu os seus reparos e onde eu dizia claramente: "A estagnação e a degenerescencia das industrias, artes, de cultura e da propria personalidade moral dos goeses teêm a sua origem na forma politica e no modo de vida que nos é imposto pelos dominantes estranhos a nossa terra."

Porisso mesmo é ao primeiro governó genuinamente nacional e indiano que se instaurar neste pais—e este facto se realisará mais cêdo do que muitos supoem—que pertencerá o dever de restabelecer a lingua concanim nos seus legitimos direitos sem contender com os direitos doutras linguas irmãs e do hindustani que será a nossa lingua nacional.

T. Bragança-Cunha

Coisas de Diu

Consta nos que o sr. Folque reassumiu as funções de governador de Diu.

Custa-nos, porém acreditar que, antes da publicação do resultado do inquerito aos acontecimentos daquele distrito haja o sr. Feio Folque reentrado nas funcções do seu cargo.

¿ Que deu em resultado o inquerito ? ¿Provou-se a acusação ? ¿Não se provou ?

Tudo isto era, primeiro, preciso tornar-se publico para, depois, o sr. Folque ilibada a sua conducta, reocupar o seu cargo. Antes disto, não.

E' o que todos entendem. E' o que acha o nosso importante colega *O Anglo-Lusitano* E' o que acha a *Opinião Publica* sensata, a que se impõe á consideração e respeito dos governantes.

Honra seja !

O patriota indiano Nariman foi tres vezes prêso por delictos politicos — por haver tomado parte no movimento de Desobediencia Civil. Noriman é advogado. Suscitou-se, então questão sôbre se devia ou não cancelar-se o diploma de advogado, de Noriman por sua tripla condenação. E o assunto está *sub judice*.

Em casos identicos, varios tribunais da India Britanica têem, porêm, defendido a doutrina de que condenações por crimes politicos, entrando os de imprensa, não infamam moralmente o caracter dos condenados, porque estes não podem ser, de maneira alguma, comparados aos maltrapilhos bandidos e outros criminosos vulgares.

Pelo que parece que o diploma do advogado, Nariman, não será *sacado*.

Quanto a nós, crimes politicos nunca constituirão desonra a ninguem. Antes pelo contrario.

E a prova recente está em que o Rei Afonso de Hespanha foi em um aperto de sua vida, solicitar a um exilado por condenação politica, o favor de constituir ministerio...

Há condenações e condenações. E as condenações por delictos politicos só nobilitam os condenados.

Honra seja, pois, a Nariman!

WANTED

Large pieces of lands under canal irrigation in Goa territory, unencumbered by debt or by long tenancies. Apply with particulars giving details and prices.

Brokers not allowed.

"X" C/o Lawrence Antao
Room N° 1, Wellington Terraces N° 6, Dhobi Talao, Wellington St, Bombay, 2.

Comunidade de Serula'

Por ordem superior e por não ter vindo publicados os anuncios nos jornais indo-portugueses de Bombaim, novamente se anuncia que a junta administrativa da Comunidade de Serulá, faz saber que, na Administração das Comunidades de Bardez, pelas 12 horas do dia 10 de Abril proximo seguinte, sexta-feira, se procederá á venda dos restantes lotes do palmar "Penha de França" situada na freguesia do mesmo nome, pertencente à dita Comunidade de Serulá, continuando a arrematação em todas as sexta-feiras subsequentes á designada, atè á conclusão da mesma arrematação.

A venda do dito palmar é superiormente autorisada e os lotes com suas dimensões são indicados na respectiva planta elaborada tecnicamente, que estará patente para o exame dos interessados nas casas das sessões desta comunidade, com as condições formuladas, e competentemente aprovadas.

Os licitantes ficam sujeitos ao desposto no art 673 e seguintes do Codigo das Comunidades e outras condições do contrato.

Serulá' 16 de Fevereiro de 1931.

Adriano José Ernesto de Couto
Pedro Caetano Vicente Facho
Heraclito Luis Xavier de Gouveio Miranda
Miguel José Furtado
Constatino Francisco José Rofino Paes
Mario Frias Pinto
Ignacio Placido de Heredio

KODAK

O *atelier* do fotografo Lord, instalado no *Sunshine Building*, Mercado Novo, Margão, temá venda todo o material de *Kodak*. No mesmo *atelier* executam-se com presteza e cuidando todos os trabalhos de arte fotografica.

Boa oportunidade

Papel de impressão glazed e outro para jornais revistas e outras publicações.

COLA " REFORMA " ou "SWASTIK"

Tinta para impressão, papel almasso pautado liso foliscap (pautado e liso) de marcas A. B. C. e D., papel corado para flores e trabalhos manuais apis, canetas, borracha e outros objectos de escritorio.

Xencor Poi Boló
NOVA-GOA

सोडावॉटरचा कारखाना काढावयास लागणारें सर्व प्रकारचें सामान मुख्य यंत्रासह

शिवलाल छगनलाल आणि कंपनी

मन्सूर बिल्डिंग, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई

येथें फारच किफायतशीर रीतीनें विकले जातें लवकरच गोमांतकांत ब्रँच ऑफिस उघडलें जाईल.

Todos os objectos e maquinas da extração e fabrico de soda vendem a preços módicos

Shiwlal Chaganlal & C° Mansur Building,
Princess Street, Bombaim.

Será breve montada uma Sucursal da Companhia em Gôa.

बांकु नासियोनाल उल्त्रामारिनु

लिमिटेड कंपनी

जगांत अत्यंत नाणावलेली ही बँक व्यवहारकुशलतमुळें आपल्या लौकिकांत दिवसेंदिवस भर घालीत आहे.

मुख्य ठिकाणः— लिजबोअ

सर्व खंडांत, बेटांत व वसाहतींत प्रस्तुत संस्थेच्या एजन्सीस पसरल्या आहेत.

2 सामायिक भांडवलः ४८.०००.०००$०० यस्कूद
कामचलाऊ भांडवलः २४.०००.०००$०० „
रिझर्वः ३२.२००.०००$०० „

वसाहतींतील शाखा

पश्चिम आफ्रिकाः— काबु व्हेर्दि, सां. तोम, सां. तियागु, बिझबोलान, कोंगु बेल्ग, कार्बींद, लोआंद, नोव्ह रदोंदु, लोबितु, बेंगेल, व्हील सीलुस पोर्तु मोसामेदिस आणि लुबांगु.

पूर्व आफ्रिकाः— लौरेंस मार्किस, इंजांबानि, बैर, शिंदु, तेवि, केलीमाव मोसांबिक, आणि इबु.

इंडियाः— नोव्हगोवा, मोर्मुगांव, मडगांव, मुंबई.

माकाऊ तिमोर इ. इ.

या बँकच सर्वत्र न्हेचे व्यवहार जगांतील सर्व ठिकाणीं होत असतात.

NOVA COMODIDADE

Aos proprietarios e fabricas

Os signatarios fornecem e instalam maquinas e maquinismos eletricos a preços módicos. Tambem fazem toda a sorte do trabalho e reparos nos aparelhos electricos Garante-se a consistencia

Drijam-se a

Messrs Potnis & Pangnecar
Engenheiros electricos Margão

पुराव्या दाखल

मुंबई येथें निघणाऱ्या 'प्रगति' साप्ताहिकांत पुनर्विवाह विषयक प्रसिद्ध झालेल्या सरळ पत्रव्यवहारामुळें श्री. प्रियोळकरांचें पित्त भडकलें असून आपल्या ता. ११ फे० ३१ च्या 'स्वयंसेवकां'त आमच्या विरुद्ध खोटीं विधानें करून त्यांनीं आपली निराधार बाजू सांभाळण्याचा प्रयत्न केला आहे. उपस्थित झालेल्या वादाविषयीं यापुढें मौन स्वीकारून प्रियोळकरांनीं केलले आक्षेप कसे फोल आहेत हें पुराव्यानीशीं सिद्ध करून देऊन या बाबतींत मी पुन्हां लेखणी विटाळणार नाहीं. तरी ज्यांना या पुराव्यांविषयीं संशय येत असेल त्यानीं मला समक्ष भेटावें म्हणजे मूळ पत्रव्यवहार दाखवितां येईल.

प्रियोळकर म्हणतातः 'पांच वर्गणीदारांचीं नांवें आमच्याकडे पाठवून त्यांनीं एक गोष्टहि पाठविली. ती आम्हांस नापसंत वाटल्यावरून आम्हीं परत केली' ही त्यांची थाप खोटी आहे. कारण 'स्वयंसेवका'चा प्रथमांक निघण्यापूर्वी मी पाठविलेली गोष्ट स्वीकारून माझे आभार मानलेल्या आपल्या ता. ५-३-३० च्या पत्रांत ते लिहितातः गोष्ट पोंचली. लवकरच प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करतों. आज आपल्या पत्त्यावर प्रथमांकाच्या पांच प्रति पाठविल्या आहेत कृपा करून वर्गणीदार मिळवून पत्ते कळवावे. त्यांचें दुसरें म्हणणें इतकें निराधार आहे की, ते वर्गणीदाराचे पैसे मीं भरले असें म्हणतात. मी केलेल्या वर्गणीदारांत प्रसिद्ध डाक्टर, कर्तबगार कंत्राटदार, धनाढ्य व्यापारी, हुशार एजंट इ. गृहस्थ आहेत, यावरून मी पैसे भरून, ते वर्षभर फुकट अंक स्वीकारतील अशी शंका घेणें म्हणजे माझी बदनामी करण्याचा प्रयत्न करतानां त्या थोर सद्गृहस्थांचा अपमान करण्यासारखें आहे. मजवरील त्यांचा तिसरा आक्षेप असा आहे कीं माझ्या 'हुंडा' नावांच्या गोष्टीला त्यांच्या केराच्या टोपलीनें आपल्या उदार उदरांत आश्रय दिला. सदर 'हुंडा' गोष्टीचें महत्त्व ओळखून आपल्या स्वयंसेवकाच्या ता. ९।४।३० च्या अंकांत 'श्री' कंटक याची 'हुंडा' गोष्ट लवकरच प्रसिद्ध होईल हें त्यांनीच जाड्या टायपांत मुखपृष्ठावर छापलें होतें यावरून आपल्या हातांत वर्तमानपत्रासारखें चालतें बोलतें हत्यार आहे म्हणून त्यांनीं ही भानगड केली हें कोणीहि सांगूं शकेल. याशिवाय माझी एक कविता आपण नापसंत ठरविली असे ते म्हणतात त्यालाहि आधार नाहीं. 'एकच फूल' या नावांची एक सामाजिक कविता मी त्यांजकडे पाठविली होती पण ती 'काव्य कुंजां'त प्रसिद्ध झाली असल्यानें मी त्यांना न छापण्याविषयीं कळविलें. याशिवाय माझी कविता जर त्यांजपाशीं असल तर त्यांनीं तिचें नांव कळवावें न पेक्षां आपला अपराध कबूल करावा. त्यांच्या इतर लिखाणाला उत्तर देण्याइतकें महत्व नसल्यानें मी थोडक्यांत संशयाविष्करण केलें आहे.

सां. घ. कंटक

सं. सू.— सुबोधमालाकर्ते श्रीयुत सां. घ. कंटक व श्री. स्वयंसेवककर्ते हे दोघेहि व्यवसायबंधु असून गोव्यांत महाराष्ट्रभाषेच्या सेवेचें एकच ध्येय आचरीत आहेत. उभयतांनाहि विधवापुनर्विवाह पूर्ण मान्य असल्याचें दिसून येतें. मग, अवांतर भानगडीबद्दल वाद उपस्थित करून परस्परांचीं मनें न दुखवितां दोघेहि समंजस वाङ्मयसेवक बंधुभावाने कर्तव्यरत होतील अशी आशा करतों. जातां जातां, असें सांगणें समयोचित ठरतें कीं, भारतपत्रावर विधवाबंधूसाठीं प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीनें किंवा स्वयंसेवकावर त्या जाहिराती संबंधीं केलेल्या ऊहापोहानें कोणाचेंच नुकसान होण्याचा संभव नाहीं.

संपादक.

सन्मित्र युवक-संघ

वरील नावाचीं संस्था गेल्या माघ शु १५ मा रोजीं असोळडें येथें स्थापन झाली. तिचा उद्देश स्वदेशीचा व विशेषेंकरून खादीचा प्रसार, मद्यपानापासून जनतेस निवृत्त करणें, शिक्षणप्रसार करणें, आपसांतील तंटे सलोख्यानें तोडणें, स्वतःच्या धंद्यांत गोडी उत्पन्न करणें, व बेकार मजुरास काम मिळवून देणें वगैरे आहेत. असोळडें, शेळडें, कोठंब, अवेडें या गांवच्या मध्यवर्ती ठिकाणीं सभा भरवून वरील उद्देशानुरूप व्याख्यानें करविण्यांत येतात. शिमग्याच्या सणा निमित्त आणखी एक नवा उपक्रम करण्यांत आला. माघ शु. १३ सोमवार या दिवशीं असोळडें गावांतुन एक मोठी भजनी मिरवणूक काढून ती कोठंब, अवेडें, आमोणें, शेळडें व काकोडें या गावांत फिरविण्यांत आली. मिरवणुकींतील बाल, वृद्ध, तरुणांनीं खादीचे पोषाख केले होते. प्रभातफेरींतील निवडक पद्य म्हणण्यांत येत होतीं. दरेक गावांत मिरवणूक पोंचतांच गांवचे लोक सामोरे जाऊन सन्माननें गांवच्या देवळांत आणीत होते. शुभ्र खादीचा पोषाख व स्वदेशीवरील पद्यें ऐकून लोकांत स्वदेशी विषयीं बरीच आस्था व अभिमान जागृत झाल्याचें दिसत होतें. फिरत फिरत ही ७००।८०० लोकांची मिरवणूक शेवटीं काकोडें येथील श्रीमहादेव देवालयाच्या सभामंडपांत रात्रौ ७ वाजतां प्रविष्ट झाली. तेव्हां गांवकऱ्यांनीं हरहर महादेव, गांधीमहाराज कीं जय ! श्रीशिवाजी महाराज की जय, वंदेमातरम यांच्या गजरांत मंडळीचे स्वागत केलें, त्या प्रसंगीं तेथील शिक्षक रा. गोखले यांचें स्वदेशीवर व मद्यपान निवृत्तीवर कौतुकपूर्ण शब्दांत भाषण होऊन मिरवणूक काकोडें गावांपर्यंत आण. त्याबद्दल व चंद्रवाडकरांचें काकोडकरांतर्फे आभार मानण्यांत आले. यानतर ह. भ. प. बाळुबुवा साठे यांचें पोवाडेगायन झा. त्यावर मिरवणूक परत शेळडहून असोळडेस येऊन विसर्जन झाली. येत्या फाल्गुन वद्य ३ या रोजीं काकोडें येथें होणाऱ्या श्रीशिवजयंत्युत्सवास फिरून आणखीं एक मिरवणूक काढण्याचें घाटत आहे.

बातमीदार

श्रीमहालक्ष्मी विद्यालयाचा उद्घाटन समारंभ

नवीन गोवें येथील मुष्टि-फंड संस्थेनें चालविलेल्या श्रीमहालक्ष्मी विद्यालयाचा उद्घाटन समारंभ ता. २८ फे० सन १९३१ [फा. शु० ११ शनिवार) रोजीं श्रीमंत श्रीनिवास वैकुंठ शेणवी धेंपे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटानें साजरा झाला. सुरवातीस नोर्मल स्कुलचे विद्यार्थी श्री. केशव ना बखले यानीं ईशप्रार्थना केल्यावर विद्यालयांतील मुलांनी स्वागतपर पद्य म्हटलें. नंतर संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्रो. रामचंद्र शंकर नायक यांनीं अध्यक्षांची ओळख करून दिली. ते म्हणाले, श्रीमंत धेंपे यांच्या घराण्याचें लोकसेवेचें व्रत कायम. त्यांच्या आज सार्वजनिक संस्थांच्या मार्फत वहि चालत असतें तरी असल्या कार्याच्या अध्यक्षपदावर श्रीमंतांचा अधिकार अबाधित आहे. प्रत्येक समारंभांत भाग घेणें त्यांना शक्य होत नसलें तरी ते या शहराचे अध्यक्षच आहेत. प्रस्तुत समारंभाचें सभापतित्व स्वीकारण्याचें अभिवचन त्यांनीं दिलें ही गोष्ट ते आपल्या थोर परंपरेला कसे जागत आहेत, याचें उत्तम उदाहरण होय. नंतर, त्याचें वाचन, बहुश्रुतपणा, कोणत्याहि प्रश्नाचा दूरवर विचार करण्याची त्याची दृष्टि, व सार्वजनिक हिताविषयींच्या कळकळीचें वर्णन करून अध्यक्षस्थान मंडित करण्याची त्यास विनंति केली. त्या विनंतीस श्री. अनंत विश्वनाथ केणी यांनीं अनुमोदन दिल्यावर अध्यक्ष स्थानापन्न झाले. व त्यानीं पुढील कार्यक्रमास सुरवात करण्याची परवानगी दिली. तीस अनुसरून विद्यालयातील मुलांमुलींचे संवाद व चित्तवेधक गाणी झा. त्यावर डॉ. शांताराम शेणवी होडरकर संस्थेच्या शिक्षण सल्लागार मंडळाचे एक सभासद यांना कार्यकारी मंडळाच्या वतीनें एक रिपोर्ट वांचून दाखविला. त्यांत इमारतीच्या कार्याचा साद्यंत इतिहास वर्णन करून श्रीमहालक्ष्मी संस्थानचें कार्यकारी मंडळ, त्याचे सहाय्यक, संस्थेस या प्रसंगीं आलेल्या देणग्या व झालेलें सहाय्य याचा तपशील सादर करून सर्वांचे आभार मानले होते. नंतर श्री. गणपतराव सामंत व श्री. शिवा फट्टू पै आंगले यांचीं समयोचित भाषणें झालीं आणि श्री. आंगले यांनीं अध्यक्षांचें सुविचारपरिप्लुत भाषण वाचून दाखविलें. शेवटीं श्री. विठ्ठल सदाशीव सुखटणकर यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर, राष्ट्रगीत, हारतुरे, वगैरे होऊन समारंभ पूर्ण झाला.

देशभक्त कुत्रे !

मोतिलाल दिनप्रसंगीं कडकडीत उपवास.

कनगलें येथें तुकाराम शेटजी नांवाच्या एका इसमानें मोत्या व मोगऱ्या नांवाचे दोन कुत्रे बाळगले आहेत. चालू चळवळीचा त्यांच्या मनावरहि परिणाम झाल्या सारखा दिसतो. ही दोन्हीं कुत्रीं कायदेभंगाची चळवळ सुरू झाल्यापासून नेहमीं प्रभातफेरीबरोबर जात असतात. गेल्या मोतिलाल दिनप्रसंगीं तर या मुक्या प्राण्यानीं अन्नास मुळींच स्पर्श केला नाहीं. पंडितजीबद्दल दुःख प्रदर्शित करण्याकरितां एक मिरवणूक निघाली. त्यांतहि यांनीं अगदीं मौनपणें भाग घेतला होता. वाटेंत बऱ्याच कुत्र्यांनीं त्यांचीं कुरापत काढण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनीं त्यांच्या वाटेस न जातां, आपला अनत्याचारीपणा लोकांच्या निदर्शनास आणून दिला ! मिरवणुकीनंतर सभा झाली. या सभेचें कामकाज चाललें असतांहि हे कुत्रे अगदीं गप्प बसले होते.

जनावरांनां भावना असतात याला या कुत्र्यांच्या व औधकरांच्या हत्तीच्या उदाहरणामुळें बरीच पुष्टि मिळाली आहे.

वर्तमान सार

—केपेंच्या त्रिबुनालावर भारताविरुद्ध दंड-भरपाईसाठीं चाललेल्या खटल्याचा निकाल पणजीच्या रेलासांवांतहि प्रतिकूल झाल्याचें समजतें.

—श्रीयुत डॉ. महादेव मंगेश शिरवैकर यांना त्यांच्या लोकप्रियतेबद्दल सांगे येथील चाहत्या मित्रमंडळीनें पानसुपारी व घड्याळाची सोनेरी सांखळी अर्पण करून गौरव केला. डॉ. शिरवैकर यांच्या योग्य गुणाचें चीज केल्यावरून त्याचें व सांगेकर मित्रमंडळी यांचें आम्हीं अभिनंदन करितों.

—फक्त पोर्तुगिज भाषेंत कित्येक शतकें विचारविनिमय करणाऱ्या इकडील कांहीं खिस्ती पुढाऱ्यांस ती परभाषा असल्यावरून कोंकणी मराठी, किंवा हिंदी, या भाषांवर निर्वाह करणें आवश्यक वाटूं लागलें आहे !

वर्ष १५ वें. अंक ४८
गुरुवार ता. १२ मार्च सन १९३१

वर्गणीचे दर
वालीना ट. ख. सह ३ रु. [आगाऊ]
किरकोळ अंकास १ आणा

जाहिरातींचे दर— समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व मालक
गो. पुं. हेगडे देसाई=फारमासेवतिकु
मुद्रण व प्रकाशन –भारत प्रेस–कुसमण केपें-गोवा

भारत
O BHARAT

ANO 15. Nº 48
QUINTA-FEIRA 12 DE MARÇO DE 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

वृद्धांनी, सबल-अबलानीं मुळींच कसूर केली नाहीं. पण स्वदेशीच्या तत्वाचें जतन व वर्धन करून, इंग्रजी सिंहास श्वानवत् करून सोडलें.

हिंदी लोकांस, ह्या शांतता युगास अस्तित्व दिल्याचें श्रेय संपादन करून घेत त्यावरून समाधान मानण्यास जागा आहे असें वरवर वाटलें तरी, खोल विचार करणाऱ्यास उघड दिसेल कीं समेटीबद्दल पूर्ण समाधान मानून न घेतां या चालू शांतता युगाचा फायदा घेण्याकडे दुर्लक्ष होतां कामा नये

शांतता युगाला प्रारंभ झाला तरी अद्याप लढा बंद झाला, असें ह्मणतां येत नाहीं. इंग्लिश सार्जंटांचे लाठी-हल्ले थांबले तरी परकी लोकांकडून हिंदुस्थानवर परदेशी वस्तुरूपी गोळ्यांचा मारा सारखा चालूच आहे. तो बंद झाला नाहीं. मग शांतता-युग प्राप्त झाल्याबद्दल समाधान मानण्यास कोठें जागा आहे?

स्वदेशी उद्योग धंदे भरभराटले जावे व द्रव्य हिंदुस्थानांत राहावें ह्या स्तुत्य इराद्यानें चळवळीस जन्म दिला. एक वर्षभर ही चळवळ चालू राहिली तरी बहुतेक प्रमुख कर्तृत्ववान हिंदी स्त्रीपुरुषांची कर्तबगारी ब्रिटिश लाठीचे तडाखे सहन करण्यांत गुंतल्यामुळें, निरनिराळ्या दिशानीं देशी वस्तु उत्पादन करण्याकडे दुर्लक्षच झालें.

पणजीच्या नगरपालिकेचें मंडळ उखडून टाकण्याच्या कामीं सरकारास निमित्त करून देणाऱ्या लोकनियुक्त प्रतिनिधींत श्री. डॉ बाळकृष्ण दत्ताराम साखरदांडे हे एकच अपवादभूत ठरले. ह्मणजे नगरपालिकामंडळ उखडविण्याच्या कामीं सरकारपक्ष सामील न होतां उलटपक्षीं, त्यानीं सरकारच्या ह्या नाविन्यपूर्ण व गोव्यांत अनैतिहासिक अशा धोरणाविरुद्ध जोराचीं तक्रार करून लोकमत ह्मणून कांहीं तरी आहे ह्याची नोकरशाहीस झणझणीत ओळख पटवून दिली, व ज्या लोकानीं त्यांस प्रतिनिधि निवडलें त्यांच्या वतीच हक्क संरक्षित जाण्याविषयीं ते शेवटपर्यंत झटले, हें त्यांस खरोखरच भूषणावह होय.

* + *

कोणत्याहि चळवळीचा उगम खेड्यांत होऊं लागला ह्मणजे तें एक चळवळीच्या यशस्वितेचें बलवत्तर प्रमाण होय अशी खात्रीं पटते. शहरी वातावरणांत अनेक चळवळीच्या वावटळी उठतात. शिवाय शहराचें एकंदर जीवित चळवळखोर असतें. व तेथें जगांतील नवीन बातम्या अगोदर समजण्यांत येत असल्याकारणानें नवीन प्रकारच्या चळवळींचा उगम शहरांत होतो ही गोष्ट खरी असली तरी, अगोदरच्या चळवळीहून दुसऱ्या मोठ्या चळवळीची लाट आली कीं, अगोदरच्या चळवळींकडे दुर्लक्ष होऊन नवीन चळवळ लोकांचें मन वेधून घेते पण खेड्यांतील नेहमीं शांत

गोडी उत्पन्न करणें, बेकार मजुरास काम मिळवून देणें. संस्थेचा कार्यप्रचार असोळडें शळडें, कोठंब, अवेडें या गावांत चालू आहे संस्थेचीं एकंदर ध्येयें चांगलीं आहेत तथापि, त्या सर्वांत, स्वतःच्या धंद्यांत गोडी उत्पन्न करणें हें एकच ध्येय साध्य झाल्यास इतर सर्व कांहीं साध्य झाल्यासारखेंच आहे. स्वतःच्या धंद्यांत गोडी लावून घेणें ह्मणजे, रिकामटेकड्या गांवकुचाळक्या न करितां स्वतःच्या धंद्याशीं प्रामाणिक राहणें होय प्रामाणिकपणानें पैसा मिळविण्याची संवय लागलेल्या मनुष्यास कर्तव्याची जाणीव झाली कीं, आपण कोण व आपला मार्ग कोणता हें उमजूं लागतें. हीं सर्व ध्येयें यथाप्रमाण पाळून, सन्मित्र युवक-संघ ही संस्था नावांप्रमाणें मित्रभाव वाढविणारी होवो असें अंतःकरणपूर्वक इच्छितो.

———

नागपूर येथील

'महाराष्ट्र'वरील राजद्रोहाचा खटला

गेल्या मंगळवारीं 'महाराष्ट्र'वरील राजद्रोहाच्या खटल्यांत संपादक श्री. गोपाळ अनंत ओगले यानीं कैफियत कोर्टाला सादर केली त्यांतील कांहीं उतारे:—

माझें कर्तव्य तेवढेंच मी केलें

सोलापूरचे आरोपी फांशी गेल्यानंतर लगेच आक्षिप्त लेख लिहिण्यांत आला. लो. … निराशा झाली

न करितां त्यानें इंग्रजी शब्द वापरल्याचें कबूल केलें आहे. उलट-तपासणीच्या वेळीं भाषांतरकारानें दिलेल्या कबुल्या लक्षांत घेऊन, त्या दृष्टीनें जर भाषांतराकडे पाहिलें, तर तें फिर्यादींत दाखल करण्यांत आलेल्या भाषांतरापेक्षा अगदींच निराळें दिसेल! आणि तरीहि तें मूलतःच सदोष असल्यामुळें मूळ लेखाचें खरें मर्म आणि त्याचा परिणाम व्यक्त करावयाला तें असमर्थ आहे.

दिलदार वृत्तीचा अभाव!

वर्तमानपत्राच्या संपादकाला सार्वजनिक व्यक्ति व संस्था यांच्यावर, त्यांचा दर्जा व अधिकार लक्षांत न घेतां, टीका करण्याचें कटु कर्तव्य अनेकदां करावें लागतें. पण, ज्यांच्यावर ही रास्त टीका केलेली असते, त्यांनीं तिचें दिलदार आणि खेळाडू वृत्तीनें स्वागत करावें, अशी सर्वसामान्य अपेक्षा असते.

ANO XV Nº 48

Quinta-feira, 12 de Março de 1931

DIRECTOR E PROPRIETARIO
ADV. G. P. HEGDO' DESSAI
FARMACEUTICO
Formado pela Escola Medica de Nova-Góa

O BHARAT

Jornal de maior circulação

REDACÇAO E ADMINISTRAÇAO
Cusmane-Quepem

COMPOSIÇAO E IMPRESSAO
Tip. *BHARAT* Cusmane-Quépém

ASSINATURA ANUAL
Edição portugueza 1-08-00
Edição marata-portuguesa 3-00-00

JUIZES E JUIZOS

Diversas são as origens dos crimes como diversas são as graduações dos crimes duma mesma origem. Se há crimes causados pela ambição desmedida ou ódio concentrado dos agentes que os perpetram, não faltam, tambem, delictos ditados pelos sentimentos humanitarios do bem-público.

Ao passo que estes ultimos delictos ficam abrangidos na classificação de *crimes politicos*, aqueles primeiros são tidos como *vulgares*. E tanto uns como os outros são graduados conforme a intensidade do sentimento ou intenção criminosa dos seus agentes e segundo a natureza das consequências dos crimes cometidos.

Crimes politicos não têem, consequentemente, paralelo com os *vulgares*, porque são diametralmente opostas as suas origens, as suas causas. E causas diversas e opostas produzem ordinariamente efeitos diversos e opostos tambem.

Donde se conclue que um *criminoso politico* que sofre castigo pelo bem publico, não pode ser enfileirado na mesma lista em que figura um *criminoso vulgar* que se apropria do alheio para ilicitamente encher a sua burra. E é a razão por que a jurisprudencia moderna entende, *definitivamente*, que as condenações por *delictos politicos* não depreciam minimamente o caracter moral dos condenados, ao contrário do que sucede com os castigados por *crimes vulgares*.

Essa opinião da jurisprudencia moderna é tanto mais natural e justa, quanto é certa a doutrina que dimana das considerações a seguir bordadas.

Numa terra em que existem conquistadores e conquistados, qualquer acto destes tendente a debilitar o poder daqueles, consolidado por leis e codigos de feição naturalmente egoista, importa infracção politica. Quem acusa infractor é um agente mantido pelos conquistadores e quem o julga é, tambem, um juiz nomeado e sustentado pelos mesmos conquistadores.

Natural e lógico, portanto, é que acusadores e julgadores dos crimes politicos que se destinam a enfraquecer senão eliminar o domimo e autoridade dos conquistadores, desempenhem as suas funcções sempre *imparcialmente — a favor dos que lhes dão o pão de cada dia e lhes proporcionam outras comodidades de vida*... O contrario é que seria objecto de admiração para todo o mundo e *son père*.

Há, ainda, mais. Na acusação e julgamento dos *crimes vulgares*, o instincto de conservação não preocupa a atenção dos respectivos *magistrados* dos conquistadores, — atenção que só se entretém na tarefa de *descobrir a verdade* e *acertar no veridictum*; mas tratando-se dos crimes politicos, o tal *instincto de conservação*, reforçado pelo inquerito da *defesa* do *prestigio do amo*, campêa infrine e concorre para que os *criminosos politicos* sejam, sempre e invariavelmente julgados e condenados *imparcialmente*—a favor dos conquistadores ..

E' isso muito duro, ainda que muito *justo* e muito natural. E cremos que por esta razão a jurisprudencia moderna poz o caracter moral dos condenados politicos ao abrigo de qualquer infamacão.

Que as condenações politi-

Swadeshi e os Catolicos

por Joaquim Alva

Ainda há pouco os jornais noticiaram que "em vista da actual crise economica, os catolicos de Mangalore decidiram adoptar um modo de vida simples, renunciando aos costumes e habitos europeus, comprar e promover o uso de artigos swadeshi encorajando e protegendo os produtos da industria indiana." Na reunião onde se tomou essa decisão notavam-se muitos jovens catolicos vestidos de *khadi* e cheios de entusiasmo.

Decididamente os catolicos de Mangalore tomaram avanço sôbre os de Bombaim embora estes últimos tenham sido os primeiros a adoptare o Swadeshi. E' detestavel introduzir a nota comunalista falando dum movimento de interesse nacional, mas é-nos impossivel permanecer silenciosos quando os nosssos correligionarios, esquecendo-se das supremas necessidades da terra da sua origem, continuam macaquear as maneiras dos nossos exploradores e ignobilmente contribuem para a ruina da sua propria patria. A decisão de Mangalore foi inspirada pelo partido nacionalista cristão de Bombaim que parece ter encontrado aí terreno mais fertil e circunstancias mais favoraveis para a realisação do ideal que se propoz defender.

Um padre catolico de Bombaim disse-me que uma alta autoridade eclesiastica, quando soubera da prisão do sr. Jos Bennie o primeiro presidente cristão do Conselho de Guerra nacionalista de Bombaim, exclamara num tom de desprezo que "só os catolicos de Mangalore eram nacionalistas, enquanto os *East Indians* e os Goeses conservavam-se muito exemplarmente alheios ao movimento nacional." A mentalidade caracteristica desse eclesiastico e dos seus iguaes, que infelizmente não são poucos, é mais digna de compaixão do que da nossa indignação. Esse reverendo padre tentava do seu modo ridicularisar uma secção de catolicos passando ao mesmo tempo certificado de "bôa conduta politica" ás outras secções da comunidade.

Porém ao proferir a sua sentença condenatoria dos catolicos mangalorenses o reverêndo padre esqueceu-se de que o Cardial Lepicier, delegado apostolico do Papa, cognominou Mangalore "a Roma do Oriente". Esqueceu se do que Mangalore possue o maior número de estabelecimentos escolares de educação feminina e masculina, o maior número de padres e freiras indigenas preparados nos institutos de alta cultura, o maior número de estabelecimentos filantropicos e de caridade trabalhando em prol das mais humildes classes, o maior numero de padres pertencendo á Sociedade de Jesus, sendo Mangalore a terra onde os principios do Swaraj foram aplicados na propria escolha dos membros do alto clero e onde se iniciou a indianisação dos bispados. Esqueceu-se de tudo isso

Anuncios

O BHARAT, ano XV n.° 48 de 12 de Março de 1931

Pelo juizo de direito da Comarca de Quepêm e cartorio do escrivão do segundo oficio Carapurcar vai á praça para venda em hasta pública á porta do tribunal judicial desta comarca, situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepêm se dirije á estação de Sanvordem, no dia vinte do corrente mez ás dez horas, pela segunda vez e por metade do seu valor o dominio útil do aforamento do terreno denominado "Maida" da cultura de arroz e coqueiros sito na aleia Naiquinim do concelho de Sanguem, avaliado por quatro mil cento trinta e sete rupias e treze tangas descrito na conservatoria desta comarca sob o numero quatrocentos sessenta e um, na carta precatoria vinda da Comarca de Salcete extraida dos autos civeis de execução hipotecaria que Francisco Tomas Fortunato de Bragança de Santa Cruz promove contra Maria Baldomira Necessidade Henriqueta de Souza, seu marido de Seraulim e outros. O arrematante pagará a contribuição de registo nos termos de lei e as despezas da praça além do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e coproprietarios. O que para ser publico se expediu este.

Quepem, sete de Março de mil novecentos trinta e um.

O escrivão do 2.° oficio
Mucunda Sinai Carapurcar
Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

pre os nossos emigrantes foram excelentemente acolhidos nos hospitais, orfanatos etc Por isso não carecem de tal assistencia.

Pelo visto, o principal fim é de construir desde logo o palacio, contraindo o emprestimo de cinco laques. Tudo mais para o inglez ver. Não nos enganam.

Em anos atraz quando se dizia que estava em poder o governo do povo pelo povo, muitas e muitas sinecuras foram montadas e continuam improdutivas, sem embargo de a Ditadura ostentar o seu programa de patriotismo, honestidade, moralidade e de resurgimento nacional. E tudo feito, o Governo da Ditadura vai consentir que outras tantas sinecuras com o dinheiro, que nos faz muita falta, sejam montadas na visinha India, onde os nossos felizes irmãos indios em breve vão experimentar uma bela constituição politica, sacudindo o jugo burocratico.

Nestas circunstancias os nossos emigrantes compartilharão com a prosperidade da India, colocando-se em condições mais desafogadas do que nós nesta terra de S. Francisco Xavier, e porisso mesmo pouco cubiçada por outros. Até numerosas familias dos goeses já não são dos emigrantes. Julgam-se muito felizes, por pertencerem a nacionalidade indiana.

C. V. Gomes Pereira

de Natal constituião ou não uma importunação", sob a presidencia dum redactor europeu do *Times of India*, enquanto um correligionario seu no mesmo momento desafiava as ordens do governo lendo extractos do discurso proibido do presidente do Congresso Nacional Indiano. Ha tres anos quando propoz o voto duma resolução de protesto contra o aumento das propinas escolares, introduzidas pelo governo, a direcção da União dos estudantes catolicos combateu a minha proposta embora estivesse plenamente consciente do prejuizo que essa medida ia causar aos pobres.

Seria curioso fazer a conta da quantidade de vinhos e licores estrangeiros consumidos nas soirées anuais de danças de *Catholic Gymkhana*, que ainda neste ano de luto para a India não dispensou essas festas, e da quantidade de roupa estrangeira comprada pela mocidade catolica para essas mesmas festanças.

E' já tempo dos dirigentes da mocidade catolica, tendo á testa seu presidente o sr. J. Albano de Sousa, que instalou-se no Conselho Legislativo apezar do heroico esforço das mulheres voluntarias do Congresso no historico dia das eleições de Bombaim, se penetrarem dos elementos do swadeshi regeitando as suas roupas estrangeiras, banindo das suas festas e reuniões o maldito alcool que é especialmente o flagelo da comunidade catolica. Que dancem quanto quiserem mesmo enquanto os mais nobres filhos da India estão aos milhares a soffrer nas prisões, mas que ao menos pensem patrocinar as industrias swadeshi quando vão comprar os seus fatos e vestidos. Sei que seria exigir demais pedir-lhes que renunciem aos seus chapeus estrangeiros e arborem o *Gandhi cap*.

O dia da liquidação das contas está proximo e aqueles que persistirem em conservar costumes e maneiras estrangeiras no seu proprio pais terão de responder dos seus actos perante os seus compatriotas que renegaram na hora do perigo e da povoação. Diz-se que a mocidade é o indice duma nação. Se os jovens catolicos de Bombaim pertencem todos á especie representada pela União dos estudantes catolicos só temos de esperar que Deus tenha compaixão de nós todos e não inclua nessa triste casta de individuos.

Ecos-e-Critica

No caminho de "Purna Swarajia'

As negociações de paz entre o Congresso Nacional Indiano representado por Mahatmá Gandhi e o Imperialismo britanico representado pelo Vice-rei Lord Irwin tiveram inicio em 17 de Fevereiro e, depois de varias incertezas, hesitações e duvidas, traduziram se em facto em 5 do corrente me

¿Quem triunfou na tremen da lucta que se manteve durante onze mezes seguidos em que se a burocracia britanica levou ao extremo o seu despotismo, o Povo, fiel ao seu proposito de não violencia, não se arredou apice sequere do campo de batalha, revelando paciencia e coragem sem limites?

A proposito do tratado de paz, Mahatmá Gandhi exprime-se da seguinte maneira:—

"No tratado de paz, hoje realisado, é impossivel dizer qual dos partidos triunfou. Direi, porêm, que se no caso há algum triunfo, pertence este a ambas as hostes guerreiras. O Congresso nunca morreu pela vitoria, porque a verdade é que enquanto êle não alcance um certo e determinado ideal a que aspira, não se sujeita a questão de triunfo.

E, porisso, recomendo a meus compatricios, que se não contentem com qualquer das condições do tratado que, por ventura, os alegre, mas que se humilhem e se prostrem perante Deus, implorando-lhe prudencia e força."

E' verdade. Dúvida alguma porem não resta de que a *Alma* abateu o orgulho da *Arma*. A Alma triunfou contra a Arma.

R. P. Loundo'

Consta-nos que está detido na Policia em Pangim o sr. Ramachondra Porobo Loundó.

¿Terá a detenção relação com o *shudhismo*? Melhor informados, voltaremos ao assunto.

Diga-se, porem entretanto que, na governação do sr. General Craveiro Lopes, estamos sentindo uma impressão, cada vez mais carregada de que se vive no regime em que o catolicismo é a religião do Estado.

No assunto da materia religiosa, o sr. General Massano de Amorim, a despeito do seu fervoroso catolicismo, nunca consentia que este fosse imiscuir-se nos assuntos do Estado. Faça-se justiça ao estadista da saudosa memoria.

Ao sr. Loundó vai toda a nossa simpatia, pelo que está sofrendo, sendo certo que o nosso correligionario detido é incapaz de praticar acto algum que importe violencia contra quem quere.

E depois há prisões e prisões. Quando estas representam resultado dalguma manifestação patriotica, como se nos afigura a que proporcionou, não aviltam o detido ou preso: só o honram, salvo a opinião em contrario.

Doutrina assente

Numa demanda, quando os litigantes ficam cansados, chegam, ordinariamente, a um acôrdo e terminam *de bôas* o seu litigio.

O fénomeno que se observa numa demanda, dá-se tambem, na guerra. Quando os guerreiros, de parte a parte, ficam fatigados da lucta, conciliam-se. Numa conciliação, há, portanto sempre, a igualdade de força, porque no caso de sua desigualdade, a victoria, sempre e inpreterivelmente, pertence ao lado onde milita a força maior.

Aplicando-se esta regra ao que se estipulou no pacto Gandhi-Irwin, pode dizer-se que o movimento da *Desobediencia Civil* provou ao Governo inglez que na força, os Congressistas valiam tanto quanto o imperialismo britanico—talvez, mais.

E nesta prova flagrante é que reside o incontestavel triunfo do movimento de Não Cooperação ou seja—la *Alma contra a Arma*

Facto único na Historia dos Povos este da subjugação da *força bruta* pela campanha de não violencia.

E' doutrina assente: ganha mais quem sofre do que quem faz sofrer.

E é a razão porque o gandhismo ganhou representação mundial,

A India conserva, pois, a sua fama de ser a *mãe* de todas as civilisações do mundo.

O BHARAT

A presente edição do nosso jornal é a ultima do seu ano corrente. O primeiro numero do ano novo publicar-se-há no dia 26 do corrente, com novas modificações graficas. Não se editará a edição de 19, por esse dia ser feriado de *Xigmó* ao pessoal da nossa Empresa.

A Empresa.

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, चैत्र व. १४ शी. शके १८५३

तूस कांडून हाताला फोड !

शेजारच्या हिंदुस्थानांत जो स्वातंत्र्य संपादनाचा लढा चालू आहे त्यानें खुद्द इंग्रज सत्तेपेक्षां येथील पोर्तुगीज सत्तेचीच जास्त तारांबळ उडवून दिली असल्याचें स्पष्ट दृश्य दिसत आहे. हा प्रकार अवलोकून सोम्यानें मदिरा झोंकल्यानें गोम्याला निशा चढली कीं काय, असा क्षणभर भास होतो. ज्या स्वराज्योन्मुख आक्रमणाला व स्वातंत्र्यपोषक भावनांना ब्रिटिश नोकरशाही पायबंद घालूं इच्छित नाहीं, त्याच गोष्टींचा नुसता संशय किंवा किरकोळ तपशील आमच्या विद्यमान सत्ताधाऱ्यांचें धाबें दणाणण्यास कारणीभूत व्यावा हें आश्चर्यार्य नव्हे काय ? कोंबडा झांकून पहाट टाळण्याचा हा म्हातारीचा प्रयत्न अजागळ स्थनवत् होत असला, तरी म्हातारी आपला मुत्सद्दीगिरीचा नगारा बडवीतच आहे !

साहित्यसंमेलन तें काय, पण त्याला ब्रिटिश हिंदुस्थानांतील चळवळे उपस्थित राहिल्यानें गोमांतकांत राजकीय क्रांतीचा वणवा पेटेल, या अवास्तवीक, असमर्थनीय व असंभवनीय संशयानें आमच्या दूरदृष्टि सरकारनें मडगांवच्या संमेलन नगराला लष्करी थाटानें सजविलें. काळ्या गोऱ्या शिपायांचा तेथें घोळका जमविला व अशा रीतीनें क्रांतीच्या रक्तपातांतून आम्हाला वांचविलें ! पोर्तुगीज सैन्यानें मराठी साहित्याला आपल्या पकडींत आंवळलें नसतें तर किती तरी घोर आपत्ति गोमांतकावर कोसळली असती ! महाराष्ट्र साहित्यसेवकानीं आमचा प्रांत खास हस्तगत करून पोर्तुगीजांना पोर्तुगालचा रस्ता दाखवला असता !

जें धोरण संमेलनाच्या बाबतींत आमच्या दीर्घ शहाण्या नोकरशाहीनें व्यक्त करून असामान्य कीर्ति मिळविली, तेंच धोरण मडगांव नगरपालिकेच्या दिवाणखान्यांत परलोकवासी पं. मोतिलालजींच्या स्मरणार्थ भरणाऱ्या सभेस बंदी करून अधिकाऱ्यानीं प्रगट केलें. ब्रिटिश साम्राज्याचे प्रतिनिधि असे व्हॉइस रॉय लॉर्ड आर्विन यानीं सुधां पंडितजींच्या शोचनीय निधनाबद्दल त्यांच्या कुटुंबाला दुखवट्याचा संदेश पाठवून ज्या थोर पुरुषाविषयीं आदर व्यक्त केला, त्याच विभूतींचें गुणवर्णन करण्यास गोमांतकीयांना प्रतिबंध ! नेहरूंच्या निधनार्थ सभांवर सभा भरून आ-सेतु हिमालय हिंदुस्थान हादरून गेला असतांहि ब्रिटिश नोकरशाही मूग गिळून स्वस्थ राहिली; पण पोर्तुगीज अधिकाऱ्यांना त्या एकाच सभेच्या कल्पनेनें थरथर कांपविलें !

हा चमत्कारिक प्रकार गोमांतकांत दिसून आला. अशाच तऱ्हेचें दृश्य परवां दीव येथें दिसून आलें. तेथील कित्येक व्यापाऱ्यांनीं श्रीरामनवमीच्या सणानिमित्त आपलीं दुकानें स्वयंस्फूर्तीनें बंद ठेवलीं होतीं; पण त्याच दिवशीं सरदार भगतसिंग प्रभृतीनां फांशी दिल्याबद्दल इतरत्र हरताळ पाडण्यांत आल्यानें, उपरोक्त व्यापाऱ्यांच्या त्या साहजिक व सरळ कृतींत दीवच्या दीर्घ शहाण्या अधिकाऱ्यांस राजकारणांचा हेतु दृगोचर झाला व त्यांनीं नारे कसून चौकशी चालवली ! चौकशीचा शेवट रामा शिवा गोविंदा, हें सांगण्याचें कारणच नाहीं म्हणा !

उपरोक्त आधिकाऱ्यांचें धोरण काय दर्शवितें ? खऱ्या वस्तुस्थितीचें पूर्ण अज्ञान नव्हे काय ? असल्या बेलगामी धोरणानें हिंदुस्थानांत सांप्रत वाहत असलेला स्वातंत्र्याचा झंझावत पोर्तुगीज वसाहतींना बाधा करूं शकणार नाहीं, असा आमच्या नोकरशाहीचा कयास असल्यास तो सपशेल चुकीचा आहे, हें एकादें शेंबडें मूलसुद्धा सांगूं शकेल. सदरील अरेरावी उपाययोजनेनें राष्ट्रीयत्वाचा प्रसार मंदावण्यांऐवजीं तो उलट वाढत्या वेगानेंच वृद्धिंगत होईल, याची सरकारनें पूर्ण खात्री बाळगलेली बरी.

आघात हा प्रत्याघाताचा जनक असल्यानें, व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालणारे जे जे हुकूम सरकारकडून अमलांत येतील त्यांचा उपयोग राष्ट्रीयत्वाची भावना खुंटविण्याकडे न होतां, उलट तिला उसळी देण्यालाच भाग पाडील, असाच जगाचा इतिहास मुक्त कंठानें ग्वाही देत आहे. मग, असल्या वेडगळ चाळ्यांनीं भांबावलेल्या वृत्तीचें प्रदर्शन करण्यांत काय हंशील आहे ? उपरोक्त प्रकारानीं जगांत झालेली शोभा आमच्या नोकरशाहीला भानावर आणील, असी आशा आहे.

—सरदार भगतसिंगादिकांच्या फांसी बद्दल दीव येथील कांहीं व्यापाऱ्यांनीं हरताळ पाडल्याच्या संशयानें तेथील सरकार बिचकल्याचें कळतें! भगतसिंगाचें भूत खुद्द ब्रिटिश सरकारपेक्षां दीवच्या पोर्तुगीज सरकारासच जास्त भयावह वाटूं लागलें म्हणावयाचें !

—वऱ्हाड व मध्यप्रांत सरकारनें मंजूर केलेलें 'भारतमित्र'कर्ते रा. नारायण भास्कर नाईक यांचें 'गोव्याचा माहितगार' हें पुस्तक मुंबई सरकारच्या शाळाखात्यानेंहि मंजूर केल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

इतस्ततः

जोंपर्यंत हिंदुस्थानांत जाति अस्तित्वांत आहेत तोंपर्यंत प्रत्येक जातीनें आपल्या सर्वांगीण उन्नतीप्रीत्यर्थ झटणें हें तिचें कर्तव्यच होय. मात्र हें कर्तव्य बजावतानां इतर जातींच्या उत्कर्षास किंवा राष्ट्रीय प्रगतीस कोणत्याहि कारणानें उपसर्ग न पोंचेल, असें कडक धोरण स्वीकारण्यांत येणें जरूर आहे. नाहीं तर जातजातींत परस्पर द्वेषाचें भयंकर काहूर माजून व जात्योन्नति बाजूलाच राहून राष्ट्र अवनतीच्या गर्तेत लोळूं लागेल व हिंदुस्थानच्या मानगुटीवर हैदोस घालीत असलेलें परसत्तेचें सर्वभक्षक भूत तेथेंच कायम स्थिरावेल. सांप्रत हिंदुस्थानांत असा एक तरुणांचा पक्ष निर्माण झाला आहे कीं, त्याला जातींचे अस्तित्वच नको आहे. जातींच्या संहारांत हिंदुस्थानच्या सुखाचें बीज असल्याची खात्री झाल्यानें, जातींच्या उच्चाटणासाठीं त्यानें कंबर कसली आहे. बंगाली सुभाषबाबू हे त्या पक्षाचे नेते असून, लाल सदरा हें त्याचें निशाण आहे.

× + ×

जाति केव्हां नष्ट होतील त्या होवोत; पण जोंपर्यंत त्या विद्यमान आहेत तोंपर्यंत त्यांना स्वोन्नतीचें उपरोक्त कर्तव्य आचरण्यास कसलीच हरकत नाहीं असें आमचें मत आहे. अशा दृष्टीनें गोमांतकीय वैश्य जातींतील तरुणांचा 'वैश्य' मासिकाचा नूतन उपक्रम कोणालाहि अभिनंदनीयच वाटेल. जातीच्या उत्कर्षाचा उत्कट उद्देश सदर मासिकांतून झळकत असून, आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अंकांतून जें धोरण प्रगट झालें आहे, तेंच कायम झाल्यास 'वैश्या'चें' अस्तित्व वैश्य जातीचा उद्धार घडवून आणण्यास सहज समर्थ होईल, असा आमचा दृढ विश्वास आहे. ज्या वैश्य तरुणांनीं स्वार्थत्यागपूर्वक मासिकाला जन्म देऊन, ज्ञातिकल्याणार्थ स्वतःला वाहून घेतलें आहे, त्यांचे 'भारत' हार्दिक अभिनंदन करून 'वैश्य' चिरायु होवो, असी परमेश्वरापाशीं करुणा भाकीत आहे.

× + ×

एकाद्या वर्तमानपत्राचा किंवा मासिकाचा अंक प्रकाश्य होऊन वाचकांच्या हातीं पडेपर्यंत अनेकांचे अनेक रीतींचे श्रम कामीं येत असतात. लेखकांची मानसिक व 'लेखनीय' शक्ति, खिळे जुळविणाऱ्यांचे शारीरिक श्रम, छापणाऱ्याची यातायात व मालकाचा द्रव्यव्यय इत्यादि साधनानीं वर्तमान पत्राचा किंवा मासिकाचा अंक तयार होत असतो. पण मजेची गोष्ट ही कीं, शहाणपणाचा टेंभा मिरवणाऱ्या कित्येक 'अक्षरमित्रां'च्या ध्यानांत उपरिनिर्दिष्ट वस्तुस्थितीचें चित्र उमटत नाहीं. हे शहाणे गृहस्थ एकाद्या नियतकालिकाचा वर्गणीदार राहावयाचें नसलें म्हणजे त्याला एक पैसा किंमतीच्या कार्डानें तसें कळविण्याचें सौजन्य व्यक्त करण्याचे भरीस न पडतां परभारेंच त्यांच्या नावांवर आलेला अंक बेशक परत करीत असतात! नियतकालिकांचे कचेरींत त्या अंकाचें पुनरागमन होईपर्यंत, तो जवळ जवळ निरुपयोगीच होत असतो ! आपला स्वताचा एक पैसा वांचविण्याच्या मोहाला बळी पडून दुसऱ्यांना सतावून टाकण्याची गोमांतकीय वर्गणिदारांची ही 'चाल' नियतकालिकांच्या इभ्रतीसाठीं कायमची बंद होणें जरूर आहे. अक्षरशत्रूनां वृत्तपत्रांची किंमत न कळून त्यांनीं त्यांचा एकजात समावेश 'बोलेतीनां'त करावा, हे क्षम्य असलें, तरी 'अक्षरमित्रां'ची उपरोक्त अपमानास्पद पद्धति, com agradecimentos चा पेहराव चढविला गेला तरी, कोणत्याहि दृष्टीनें समर्थनीय ठरत नाहीं, हें त्यानीं न विसरलेलें बरें. बाकी आह्मांस पूर्ण खात्री आहे कीं, वृत्तपत्रीय धंद्याच्या दगदगीची, त्रासाची व खर्चाची थोडीशी जरी त्यांना कल्पना असती, तर त्यांचे हात अंकाची बेमूर्वत वासलात लावण्यांस कधींच धजले नसते. पण—पण कोण लक्ष्यांत घेतो ?

भारत व लोकाश्रय

	मागील जमा	६५२। रु
श्री. दत्ता गिरी नायक करमली काकोडें		२ रु.
,, दत्ता शेट मोरजकर, भाटी		२ रु.
,, रघुत्तम श्रीधर सांवर्डेकर, सांवर्डें		१ रु.
(चालू)		६५७। रु.

—मोटारविषयक नवा कायदा अमलांत आला असून, त्यांतील बहुतेक कलमें मोटारवाल्यांस जाचक असल्यानें, त्यांच्याविरुद्ध सरकारांत तक्रार दाखल करण्यांत आली आहे. वसाहतीचे प्रधान या तक्रारीवर निर्णय देणार आहेत. तक्रारवाल्यानीं हा निर्णय तारेनें मागितला असल्याचें कळतें.

—पणजी-पाठशाळेचे रैतोर सि. गारसीय द सिल्व्ह हे मारांव विमानांतून जुहूपर्यंत गेले होते. या वैमानिक प्रवासाचा जाण्यायेण्याचा खर्च त्यानींच केला होता. नुकतेच त्यांना ओलिस लॉटरीचे ४० हजार रुपये आले होते. 'खाता पिता देव दिता' !

—पोर्तुगीज सत्तेखालीं असलेल्या मादैर बेटांत बंड पुकारण्यांत आलें असून त्याचा अजून उपशम करणें पोर्तुगाल सरकारला शक्य झालें नाहीं.

—धान्याचे भाव उतरले असतांहि मजुरी उतरण्याचा रंग दिसत नाहीं. बार्देस महालांत मात्र जमीनदार व मजूर यांची सभा भरून पुरुष व बायको यांचा दैनिक पगार १ रु. व ८ आण्या ऐवजीं अनुक्रमें १० व ५ आणे असा ठरवण्यांत आला आहे.

शूर्पारकाचा शालोपयोगी इतिहास अर्थात्

गोष्टीरूप गोमांतक

सत्तेच्या धुंदींत कार्तवीर्य कामधेनूंतें अन्यायानें हरण करीत असतां जमदग्नी ऋषीने त्याच्या ह्या आसुरी इच्छेला अनुमति न दिल्यामुळें त्या शांतमूर्तीचा तर त्यानें वध केलाच. शिवाय त्यांचें निवारण करीत असलेल्या पतिव्रता रेणुकेलाहि एकवीस घाव घातले. पण ह्या पाशवी सामर्थ्याचा शेवट व्हावा तसाच झाला.

परशुरामानें सहस्रार्जुनाचा वध करून एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली.

सैतानी सत्ता धुळीस मिळाली ! !

परशुरामानें स्वसामर्थ्यानें संपादन केलेली समग्र पृथ्वी ब्राह्मणास दान दिल्यामुळें क्षत्रिय-संहार-पाप—विमोचनार्थ यज्ञ करण्यासाठीं नैऋत्य दिशेस वास्तव्य करणाऱ्या मूळच्या समुद्रद्वीपीय अनार्य राजास हांकलून देऊन मार्गवगमानें नवी भूमि वसविली व गोमांतकाच्या पाश्वर्भागीं महायज्ञ करून गौडदेशांतील त्रिहोत्रपुराहून (तिर्हूत) आणलेल्या दहा ब्राह्मण कुळांला ती पवित्र भूमि वांटून दिली. ह्याच वाटणीतून कालपरवांपर्यंत पाश्चात्यानांहि चकीत करणाऱ्या ग्रामसंस्था निर्माण झाल्या. ह्या प्रदेशाचा आकार सुपासारखा असल्यामुळें त्याला शूर्पारक अशी संज्ञा होती. पण पुढें परशुरामानें यज्ञ केल्यामुळें ह्या भूमीला ‘ परशुराम क्षेत्र’ किंवा गो ह्मणजे बाण, मा फेक, किंवा मारणाचा अंत होतो तें ठिकाण, अर्थात् परशुरामाच्या बाणानें अखेरची विश्रांति घतली तें स्थान ह्मणजे ‘ गोमंत ’ असें ह्मणूं लागले. कालें करून गोमांतांत ‘ गोमांत होऊन लघुत्व व प्रियत्व दर्शविण्यासाठीं त्याला क प्रत्यय जोडला गेला. आणि त्यामुळें ‘ गोमांतक ’ असें रूप बनून तेंच पुढें प्रचारांत आलें.

शूर्पारखा बराच मोठा भाग आजच्या गोमांतकापासून अलग आहे.

ग्रामसंस्था अद्यापहि अस्तित्वांत असल्या तरी पोर्तुगेज सरकारानें त्याचे रूप पूर्णपणें पालटून टाकिलें आहे.

निवेदन

क्रमिक पुस्तकें शाळेंतील मुलांच्या हातांत पडण्यापूर्वी त्याचा परिणाम योग्य दिशा दाखविण्यांत होईल कीं नाहीं ? अथवा तीं त्यांच्या आकलनशक्तीच्या पलिकडचीं आहेत कीं काय ? हे व इतरहि प्रश्न तज्ञ परीक्षकांकडून सोडवून घेणं अगत्याचें आहे

परंतु असिमिलीसावांचें अनिष्ट धोरण कवटाळल्यामुळें जेथें मराठीची मुस्कटदाबी होत आहे तेथें अशी व्यवस्था व्हावी कशी ? आणि ह्मणून हा शालोपयोगी इतिहास स्वतंत्रपणें प्रसिद्ध होण्यापूर्वी तज्ञाच्या अभिप्रायासाठीं वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्याचें धाडस करीत आहें. तरी तज्ञानीं आपलीं मतें निष्कारण वृत्तपत्राचे स्तंभ न अडवितां परस्पर मला कळविण्याची कृपा करावी. ह्मणजे यदा कदाचित् तें अग्राह्य वाटलें तरच चर्चेसाठीं वृत्तपत्रांत पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. कृ. नाईक कुंकळी

—गेल्या ता. ५ मार्च गुरुवार रोजी मडगांव येथें श्रीदामोदर विद्यालयांत श्रीशिवजयंत्युत्सव साजरा होऊन विद्यालयीन शिक्षकाची श्रीशिवचरित्रपर भाषणें झालीं.

श्रीशिवजयंत्युत्सव

चालू माहेच्या ६ तारखेस काकोडे येथें वर्षचालीप्रमाणें, श्रीशिवसेवामंडळ या संस्थेकडून छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांच्या जयंतीचा उत्सव साजरा करण्यांत आला. रा. ह. भ. प बाळुबोवा साठे यांनीं इकडील सुप्रसिद्ध जमीनदार दो. बाबू शिवराम प्रभु देसाई यांनीं सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना मांडिली. रा. बरवे मास्तर यांच्या अनुमोदनानें ती टाळ्यांच्या गजरांत मान्य झाल्यावर, अध्यक्ष स्थानापन्न झाले. आपणांस अध्यक्ष पद दिल्यावरून सर्वांचे आभार मानून त्यानीं प्रसंगोचित भाषण करण्यांस वक्त्यांस सूचना दिली. आरंभीं, रा जनार्दन विष्णु कामत, यांनीं पंडित मोतिलालजींच्या मृत्युबद्दल दुःखप्रदर्शनार्थ पं. जवाहिरलाल यांस दुखवट्याची तार पाठविण्याचा ठराव पास करवून श्रीशिवरायाचें महात्म्य सांगितलें रा जयवंत घ. मळकर्णेकर वकील यांनीं हिंदुराष्ट्राचे संस्थापक श्री शिवबा व हिंदीराष्ट्राचे संवर्धक म. गांधी यां उभयतांच्या कार्यांतील साद्दश्य दाखवून दिलें. आर्यवैद्य रा. पुंडलीक वामन विर्जिनकर यांनें श्री. शिवरायांचें महत्व जोरदार भाषेंत सभेपुढें मांडलें व श्री छत्रपति शिवाजी राजे आणि म गांधी यांच्या कर्तव्याची तुलना केली.

नतर रा. महाबळेश्वर भिकाजीराव देसाइ, असोळडें, यांचें आवेशपूर्ण पोवाडे गायन झालें. रा गोखले मास्तर यानीं 'गोंधळ' ही कविता हावभावयुक्त ह्मणून दाखविली. शेवटीं, ह भ. प. साठे यांनीं सर्वांचे आभार मानून श्रीशिवबांच्या तसबिरीवर पुष्पें वाहिल्यावर आरति मुलांचे पद्य गायन वगैरे होऊन हा गोड समारंभ संपला.

सन्मित्र—युवक-संघातर्फे खादी पोषाखांतील मेळे असोळडें, अवेडें, शेळडें, कोटवी येथून मुद्दाम समारंभास हजर राहून स्वदेशी पदें गाण्याच्या नवीन कार्यक्रमाची भर यंदांच्या उत्सवांत पडली.

श्री. शुद्धिवीर लंवदे

श्रीयुत शुद्धिवीर रामचद्र नारायण प्रभु लंवदे, गयबंदर यांस चालू माहेच्या ३ तारखेस पणजीच्या पोलीस टाण्यावर कैद ठेवण्यांत आल्याच समजत. कैदीचा संबंध, गेल्या दिवसांत साजरा झालेल्या गोमांतकीय शुद्धींच्या तृतीय वार्षिक उत्सवाशीं आहे असें ह्मणतात. हें खरें असल्यास, आह्मांस असें वाटतें कीं, शुद्धिवीर लंवदे यांस कैद करून मात्र पोलीस खात्यानें शुद्धीनिमित्त प्रथम वर्षीं व आनंदमूर्ति प्रभृति लोकांच्या कैदीचा तृतीय वार्षिक समारंभ पार पडला !

सार्वजनिक कार्यांत भाग घेतल्यावरूनच कोणताहि गुन्हा दाखविल्याशिवाय, कोणाहि सद्गृहस्थास कैद करण्यांत, त्या गृहस्थाची बहनामी होत नसून, उलट, सरकारी दुबळेपणाचा तो एक मासला आहे असें मात्र जगजाहीर होते. आपल्या वीरश्रीनें सरकारास सुधां भीति उत्पन्न करणारे श्री. लंवदे हे खरोखर शुद्धिवीर असल्यानें असल्या दडपशाहीमुळें डगमगणार नाहींत ह्याचा आह्मांस खात्री आहे.

वर्तमान सार

—म. गांधीनें घडविलेली समेट अत्याचारी लोकांस मान्य नसल्यावरून ते विरुद्ध चळवळ करीत असल्याचें समजतें.

—पणजीच्या नगरपालिकेप्रमाणेंच मडगांवची नगरपालिका सरकार जमा करण्यांत येईल अशी दाट वदंता आहे !

—गेल्या सोमवारीं ९ तारखेस मडगांवच्या नगरपालिकेंत, कै. नेहरू यांच्या मृत्यूच्या दुखवट्याची जाहीर सभा भरविण्याचें प्रसिद्ध झालें होतें. परतु सरकारनें आयत्यावेळीं परवानगी देण्याचें नाकारल्यामुळं सभा रहित झाली.

—बांकु नासियोनाल उल्त्रामारिनु यामध्यें मोठ्या रकमेची अफरातफ झाल्यामुळें चौकशी चालू आहे. केलेल्या जप्त्यांत कांहीं द्रव्य सांपडलें.

—काकोडें येथें नुकताच साजरा करण्यांत आलेल्या श्रीशिवजयंत्युत्सवांत पोलिस खात्यास अराजकत्वाचा वास आल्याचें समजतें. सदरील उत्सव बरींच वर्षें चालू असून तेथें श्रीछत्रपतीचें पुण्यस्मरण करण्यांत येतें.

भारत

भारताचा चालू वर्षाचा हा शेवटचा अंक असल्यावरून वर्षचालीप्रमाणें शिमगानिमित्त पुढील एक आठवडा सुटीचा आहे. दुसऱ्या आठवड्यांत येत्या वर्षाचा पाहिला अंक प्रसिद्ध होईल. सं भारत

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas, vão ser vendidos em hasta publica á porta do tribunal desta comarca os seguintes bens penhorados nos autos civeis de execução por custas que o M. P. promove contra João Climaco Manuel José da Silva Colaço de Velim por apenso aos de execução fiscal promovida pela Fazenda Nacional contra o mesmo João Climaco sendo a mesma venda no dia 2 do seguinte mez de Junho ás dez horas pela 1.a vez e por maior lanço que se oferecer acima da avaliação daqueles bens que são:—Predio rustico denominado "Culumbialem ou Talpoilem", da cultura de coqueiros, arequeiras e outras arvores; Palmar denominado "Dumpacatem"; Palmar "Salericantevoril tican"; Palmar e varzea "Mauliguentcacodil; Varzea "Chactam"; Palmar e Varzea "Conjeagoracodil"; Predio "Masoddó coddó" cultivadado de coqueiros; Varzea denominada "Xelopa" Palmar denominado "Borimolavoril"; Palmar denominodo "Ganiamvadevoril; metade da metade do palmar e varzea "Bjanchigale; e metade do palmar e varzea "Bingareagalevoril"; todos situados em Cola de Cabo de Rama, discritos por inteiro na conservatoria do Registo Predial desta comarca sob os n ° s 11790, a fls 118 v. do L. B 3, 3253 a fls. 127 v. 3255 a fls. 128 v., 3256, 3257, a fls. 129 fls. 129 v., 3259 a fls. 130 v. 3263 a fis. 132 v., 3265, a fls. 133 v. 3267 a fls. a 134 v., 3218 a fls. 135, no livro B. 11, 80 a fls. 278 do L. B 1 e 2655 a fls. 52 do B n ° 10 e avaliados por 50, 650, 400, 75, 20, 20, 1.500, 10, 300 e 1 200 rupias. O arrematante pagará a contribuição de registo por titulo oneroso e as despesas da praça nos termos de lei.

São tambem citados para os mesmos fins os representantes dos seguintes credores falecidos. Francisco Xavier da Silva Colaço, casado proprietario de Velim e Gonessa Vitobá Parobo Dessai, dito dito de Cola de Cabo de Rama pesando a favor daquele as seguintes hipotecas:—hipoteca no livro C 4 a fls. 39 v. sob a inscrição n ° 878, registada em 2 de Abril de 1891, constituida por Govinda Naraina Porobo Dessai e mulher Locximim Dessaina, da dita de Cola, a segurança da quantia de 1 100 rupias; Uma penhora no Livro F 3 a fls. 9 v. sob a inscrição n ° 1256 registada em 1 de Junho de 1904, para haver a quantia de 1.100 rupias dos executados Govinda Bicaró Velipo e outros da dita de Cola; Uma hipotoca no livro C 3 a fls. 151 sob a inscrição n ° 592 registada em 14 de Julho de 1888 constituida por Govinda Bicaró Velipo e outros da dita de Cola a segurança da quantia de 1.100 rupias: Penhora no livro F um a fls. 259 sob a inscrição n ° 392 registada em 30 de Setembro de 1891 para haver dos mesmos Govinda Bicaró e outros a quantia de 1 100 rupias; e a favor do dito Gonessa Vitobá: Hipoteca no livro C 2 a fls. 173 sob o n ° 358, registada em 30 de Julho de 1884, constituida por Ragobá Sacró Velipo da dita de Cola á segurança da quantia de 1.500 xerafins ou 750 rupias; Penhora no livro F um a fls. 115 sob o n ° 132, registada em 4 de Novembro de 1887, para haver dos executados ditos Castam Boiró e mulher 750 rupias e outras responsabilidades. Para ser público se expediu este. Quepem, 27 de Março de 1931.

O escrivão do 1 ° oficio

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei

O juiz de direito

A. Colaço

---

com os vigários, tem sabido manter com toda a serenidade e bom senso a linha indicada e imposta pela sua consciência em frente dos sucessos dessa acção. E êste silêncio da freguesia era de oiro para o sr. pe Jorge, e como tal a êle e aos seus devotos, só cumpria respeita-lo com agradecimentos.

Mas já que assim não se fez e antes pelo contrario, surgiu uma provocação inepta, é necessário que se faça toda luz. E como para tanto se torna preciso que o autor da provocação concretise as suas afirmações convidamo-lo a declarar quem são os Nestórios, a quem se refere e em que consiste a guerra que diz que eles fazem. Esperamos que não será dêsses que atiram a pedra e escondem a mão.

Um Paroquiano

ECOS-E-CRITICA

Premio Nobel

Um jornal portugês queixa se amargamente de que o seu país não tenha sido ainda contemplado, na pessoa dum sábio ou dum escritor pátrio na distribuição do premio Nobel, que é uma recompensa internacional fundada ha trinta anos e é distribuida anualmente a cinco personalidades das mais eminentes no mundo inteiro. Com efeito, são 150 os nomes ilustres registados entre várias nacionalidades que mereceram essa suprema distinção e Portugal não figura nem uma única vez. Dividem se da seguinte forma os homens de sciencia e letras premiados em vários paises de alta cultura: 31 alemãis, 19 franceses, 16 ingleses, 11 americanos, 9 suecos; a Holanda, a Noruega, a Belgica e a Austria sendo distinguidas cada uma com cinco premios; a Italia com 4; a Espanha, a Polonia e a India com 2 cada e a Russia e o Canadá com 1. ¿Quem será o candidato português que brigará as honras já ganhas pelo poeta indiano Tagore e o sábio Raman?

UMA SUGESTAO

AO SR. GENERAL CRAVEIRO LOPES

Entendemos que seria um acto meritório por parte de S. Exia. o expedir instruções necessárias para se restringir a exigencia de obrigatoriedade do taximetro e do indicador da velocidade sómente aos automoveis que forem submetidos á inspecção para os efeitos do registo, mantendo-se, nesta parte, o *statu quo ante* com relação ás viaturas já registadas. Uma medida assim seria digna de aplausos, por justa e moral, pois não se percebe que o Governo vá onerar com laques de despezas uma industria que, por lutar com dificuldades, o próprio Governo, num diploma especial, entendeu dever proteger limitando o número dos automoveis de aluguer.

Testamento?

Consta que o sr. Governador Geral assinou já a portaria da nomeação do sr. José Inacio F. de Loiola para o cargo de administrador do Concelho de Praganã.

O sr. Loiola fôra trazido de Lisbôa pelo sr. Craveiro Lopes para libertar o paiz da dependencia económica do estrangeiro, tendo, porisso, á inspiração do mesmo e sob a sua direcção, sido iniciada aqui a celebre Campanha de Arroz. Depois, o mesmo sr. Loiola foi *aclamado* vogal do Conselho do Governo, onde ao presente é o *speaker* da parte eleita, cabendo-lhe em grande parte a responsabilidade do Governo nêsses três últimos meses. Agora... o *speaker* vai a Praganã.

O triste fim do salvador da pátria e—das cazanas!!

Registo Civil

Há quem nos informe que o Código do Registo Civil, aprovado pelo Conselho do Governo, foi pelo sr. Governador Geral submetido á sancção da Metropole, vai para alguns meses, tendo s. excia., durante êste tempo, expedido telegramas para o Ministerio das Colónias, alegando urgência da promulgação do mesmo Código.

Está bem. Nêste caso nada mais lógico e razoavel do que fazer o provimento das vagas existentes no serviço do Registo Civil pelo Código ora em vigor. Não se pode admitir, como já dissemos doutra vez, que se suspenda caprichosamente a execução de uma lei em parte a pretexto de que uma nova lei vai ser elaborada.

Providencias, pois, sr. Governador Geral. O que vai pelo Registo Civil não honra a soberania portuguesa na India. Dizemo lo com franqueza.

Um idoneo

O sr. General Craveiro Lopes, o mesmo que mandara dizer para a Metropole que em Gôa não havia, no elemento civil, idóneos para exercer o cárgo de administrador de concelho, nomeou administrador substituto do concelho de Canacona o sr. Aleixo dos Martires Dias, regedor de Chinchinim.

Só agora, passado um ano e tanto, que a gente fica sabendo a marca de *idoneos* que s. exia. procurava e não encontrava no país.

Em todo o caso, os nossos parabens ao chefe da Provincia pelo achado.

Valente "caneco"

Há pouco, deu se em Cacorá um caso deveras divertido. Um *caneco occidentalizado*, sem tradição de antiguidade nem visão de actualidade, se dirigia áquela aldêa, metido num auto. Não sabemos se ia acompanhado dum ou mais amigos *humanos*. O que, porém, podemos afirmar, é que o *caneco* levava em sua companhia—por sinal, bem *embarrigado*—certo sujeito *espiritual*, muito conhecido e familiarisado no nosso meio.

Quando o homem, assim *acompanhado*, ia aproximar-se do templo de Sri Madeva de Cacorá, deparou com uma grande procisão dos hindús vestidos de *khadi*, organisada em comemoração do aniversário de Shivagi Maharajá, Heroi de reputação mundial. E o pobretão, á vista duma manifestação tão estrondosa do civismo hindú, aterrorizou se e sujou as calças. Desmaiou. Julgou, por momentos, que os gandhi cap de Cacorá iam *reconquistar* a India. E correu para Quepem *ó pernas para que te quero* para salvar Portugal, sua pátria, do assalto iminente contra a colónia conquistada pelo Albuquerque.

Em Quepem, o *caneco* teceu, na região burocrática, intrigas contra os promotores e assistentes da festa civica de Cacorá, deturpando *ad libitum* o seu alto significado. Não se contentou com isto. E por conta e risco proprios foi, tambem, a Pangim com o patriótico propósito de repetir ali o papel que, finalmente, deu em resultado uma ligeira agitação telegráfica, uma intimação a êste e outra intimação áquele e uma pergunta ao fulano e outra pergunta ao sicrano, constando-nos que o *monte* do esfôrço *patriótico* do *caneco escravisado* pariu, a despeito de tudo, só aquele *rato* enfeixado de telegramas cifrados, intimações e perguntas.

E outra coisa não podia ser porque, promovendo a festa de Shivagi e assistindo a ela, os hindús não praticaram em Cacorá nenhum acto de desacato contra a soberania portuguesa. Cumpriram, apenas, um dever.

Simplesmente, a mentalidade escravisada do pobre do *caneco*, reforçada pela ignorância da verdade e pervertida pelo abuso do espirito, tomou nuvem por Juno e, por momentos, meteu tudo em conflagração.

Valente caneco—sem dúvida.

Festa de Sri Shivagi

Em um lindo e artistico barracão *ad hoc* levantado em um campo central das aldêas de Xeldem, Assoldá, Cotombi, Avedem e Cocorá, foi, no dia 20

do corrente, solenisada sob a presidência do director do *Bharat* a festa do aniversário de Sri Shivagi Maharajá promovida pela mocidade dos Marathas daquelas aldêas dêste concelho.

Era numerosissima a assistência. Viam-se nela representantes de todas as classes sociais. Fotografias de todas as individualidades preminentes da India, passadas e presentes, estavam colocadas em diversas partes do interior do barracão, dando a êste um aspecto solene e infundindo a mais natural e espontanea veneração nos assistentes.

Falaram muitos oradores e todos com calor e sinceridade, exalçando a colossal obra da redenção do Maharastra, do Grande Shivagi. Aos discursos precedeu a celebração de ceremónias religiosas, acompanhadas do maviôso toque de *Chougudá*, e os mais encantadores e variados jogos fisicos.

No seu discurso, o nosso director descreveu os importantes feitos heroicos do Maharajá; tócou o estado caótico e a escravidão mental em que se encontravam os hindús durante a dominação do Maharastra pelos conquistadores mouros; enumerou o triste rozario das nefandas consequências que haviam resultado aos conquistados da mesma dominação musulmana; relatou pormenorisadamente as causas que fizeram surgir o Grande Shivagi para salvar o Maharastra, duma es trepitosa ruina iminente; e concluiu o seu discurso, pedindo aos assistentes que se esforçassem por ser uteis aos seus concidadãos, ao seu Pais e á humanidade,—e levantando um caloroso viva á memória de *Sri Chatrapati Shivagi Maharaj*, viva que foi correspondido, unissonamente, pelos festejantes cujo número ascendia a mais de 800 pessôas.

Numa palavra, a festa que tivemos a rara ventura de presencêar, deixou em nós a mais grata e indelevel impressão pela insinuante imponência de que se revestiu, pela extraordinaria ordem com que decorreu e pelo grande empenho com que a mocidade dos *marathas* a celebrou.

Felizmente não, houve nenhum *caneco escravisado* que deslustrasse o brilho da festa com suas intrigas. E—diga-se, tambem, a verdade—no decurso dos discursos, nenhum orador saiu fóra do assunto que se restringiu apenas á descrição do tempo do festejado, ao enaltecimento de suas virtudes civicas e feitos patrioticos e á analise de sua grandiosa obra.

PELA PRAÇA DE DIU

Ninguem gosta sair da sua terra, da terra onde nasceu e viveu na infância, quando condignamente possa nela exercer a sua actividade productiva.

Em Diu, porém, observa se um fenomeno precisamente contrário. Desde que á sua testa está o sr. Feio Folque, os filhos da Praça, empregados públicos, preferem trabalhar fóra dela a desempenharem as suas funcções sob as ordens do governador dinástico.

E' muito sinificativo êsse fénomeno. Convinha que o governo geral ou central o analisasse mediante um inquérito escrupuloso cuja acção deve, tambem, incidir sôbre o motivo por que o sr. Folque quere estar ligado ao govêrno de Diu como uma óstra á sua concha.

* * *

As nossas ligeiras considerações sôbre a reducção do periodo do destacamento dos empregados públicos para Diu impressionaram agradavelmente a quantos passaram algum tempo na Praça—impressão que nos foi transmitida. Antigamente, o destacamento durava apenas um ano. E não sabemos porque, mais tarde, foi elevado a dôbro o seu periodo. Seja, talvez, porque entre nós no campo de reformas politicas *emendas* saem sempre piores do que *sonetos*...

Seja, porém, como fôr, torna-se, agora, mister que, se não fôr possivel a eliminação do periodo do destacamento, seja ao menos reduzido êste á sua expressão mais simples. E' necessário que o governo faça isso a bem de seus serventuarios—para que estes não sofram na saúde.

* * *

A politica do *Divide et regna* que em Diu provocou scisão entre mouros e hindús é um facto concreto. Absolutamente positivo. Temos provas documentadas disto, provas a que daremos cabida nas colunas desta secção de *O Bharat*.

E queremos ver que cara fazem os que tentaram esboçar a defesa da *situação folquista* com a leitura das mesmas provas.

Sempre é certo que a verdade, conquanto susceptivel de ser fatigada, nunca pode ser, porêm, morta.

* * *

Minúscula é a Praça de Diu, como pequena é a sua população cuja maioria é *grêga* no português. E como quanto menor fôr uma região e mais ignorante a sua gente, tanto maior é a rêde de intrigas que nela se tecem, não admira que tambem em Diu se note o mesmo *mal* que é o charco onde pulula toda a casta da bicharia perturbadora do socêgo individual e colectivo.

O remédio contra a aludida enfermidade é a difusão de instrução e educação por todas as camadas sociais. Espancar as trevas de ignorância é *partir a cara* da intriga, da prepotencia dos *meninos* e do absolutismo dos *mandões*.

* * *

Os *leaders* populares de Diu iniciando o caminho de mandar estudantes da Praça para Gôa para, aqui, serem instruidos e educados, provaram que prognosticaram com exactidão a doença do seu paiz e prescreveram o medicamento eficaz contra ela. Assim os *microbios* do mal podem estar certos de que aproxima se lhes a morte inevitavel.

E' desnecessário dizer que agradou-nos imenso o digno caminho seguido pelo bom povo de Diu a quem desejamos prosperidades de toda a sorte.

* * *

Toda a correspondencia destinada a esta secção deve ser dirigida ao director do *Bharat*. Sempre que fôr possivel, é melhor que se registem as cartas que contiverem esclarecimentos importantes.

* * *

Diu não pode continuar a ser considerado como distrito. Não tem condições politicas nem economicas para tanto. Reduzi-lo à categoria dum concelho do distrito da Damão seria, pois, uma medida de alto alcance economico, sobretudo agora que tanto se fala na compressão de despesas.

Para mais, os *altos* funcionarios da Praça, á mingua do trabalho inerente a seus cargos ficam, mau grado, compelidos a

---

☞ No *Comunicado* da edição passada do *Bharat*, em vez de Quinta-feira Maior, leia-se Sexta feira Maior.

आहेत. कित्येक ठिकाणीं कठीण अध्यात्मिक कोड्यांचा सुलभ भाषेंत उलगडा करण्यांचा ग्रंथकारानें उपक्रम केला असल्यानें तर 'संग्रहा'च्या उपयुक्ततेला मार्मिकतेचीहि जोड मिळालेली आहे. एवंच, धेनुदास डोळे यांचा हाहि संग्रह अत्यंत यशस्वी झाला असून, त्याबद्दल ते सर्वांच्या स्तुतीस पात्र आहेत. गोमातेबद्दल खरेंखुरें प्रेम वाटणाऱ्या प्रत्येक हिंदूनें सदर संग्रहाला आश्रय देऊन गोरक्षणाला पाठिंबा देणें हें त्यांचें पवित्र कर्तव्य होय. पुस्तकाची किंमत अवघी १ रुपया असून तें श्रीगोवर्धनसंस्था वांई, पुणें व मुंबई येथें मिळतें.

वर्तमान सार

—"सुबोधमाले"च्या गोमंतकीय आश्रयदात्यांनीं त्यांच्या पत्यावर गेलेल्या कार्डाप्रमाणें बाकी असलेली रक्कम पाठविण्याची कृपा करावी. गोमंतकांत वाङ्मय प्रकाशनाचें काम अत्यंत विकट असल्याबद्दल आतां मोठमोठ्यांची खात्री झाली आहेच. अशा परिस्थितींत कांहीं महाराष्ट्रीय वर्गणीदारांच्या आश्रयावर व जाहीरातींच्या उत्पन्नावर आजपर्यंत आम्हीं चार पुस्तकें प्रसिद्ध केलीं असून रंगबेरंगीच्छु नाट्यसमाजासाठीं लिहिलेलें संगीत 'पुनर्मिलन' हें नाटक व महाराष्ट्रभाषाभूषण श्री. आजगांवकर यांच्या 'सुदर्शन' साप्ताहिकांत क्रमशः प्रसिद्ध झालेली कादंबरी 'जयंती' ह्या दोन पुस्तकांस मागणी असतांहि केवळ पैशाअभावीं छपाईचें काम अद्यापि पुरें होत नाहीं. तरी आमच्या वर्गणीदारानीं पूर्वीच्या बाकीची फेड करून नव्या दमानें उगवू पहाणाऱ्या या वाङ्मयवल्लीला आश्रयाचें जलसिंचन करून नवजीवन द्यावें अशी विनंति आहे. आतां प्रसिद्ध होणारीं पुस्तकें रोख वर्गणीदारांसच पाठविलीं जातील." असें श्रीयुत सां. घ. कंठक, संपादक 'सुबोधमाला' मुरगांव हारबर हे कळवितात.

—कित्येक तालुक्यांच्या जुन्या मामलेदारांस काढून त्यांच्या जागीं नव्या मामलेदारांची नेमणूक करण्यांत आली आहे. केपेंच्या मामलेदारांची बदली मुरगांव तालुक्यांत झाली असून येथें कांसावली येथील आंतांव नावांच्या एका डॉक्टराची योजना करण्यांत आली आहे.

—स्पेनांत प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा विजय झाल्यानें तेराव्या आलफोन्सो यांस आपल्या सिंहासनाचा त्याग करावा लागला. तेरा आंकडा अशुभ असल्यानें राजेसाहेबांवर उपरोक्त आपत्ति ओढवली नसेल ना ?

—आर्थिक अडचणीच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें, फोंडा येथें प्रसिद्ध होणारें स्वयंसेवक पत्र बंद ठेवण्यांत आल्याचें कळतें. स्वयंसेवकासारख्या उदार धोरणी व निस्पृह भावंडावर अज्ञातवास स्वीकारण्याचा प्रसंग ओढवल्याबद्दल आम्हांस अत्यंत वाईट वाटतें.

गोवा विद्याप्रसारक मंडळ

आल्मैद कॉलेज

हें कॉलेज नवीन व पुनर्घटित स्वरूपांत येत्या जून महिन्याच्या १५ तारखेला सुरू होईल.

कॉलेजांत लिसेवचे तीन क्लास आणि प्रिमैर व सेगुंद ग्राव इतकें पोर्तुगीज शिक्षण लायक व पदवीधर अध्यापकांच्या हातून देण्यांत येईल. याशिवाय इंग्रजी पांच इयत्तांचें शिक्षण एका लायक व अनुभवी शिक्षकाकडून देण्यांत येईल. मराठी शिक्षण नेहमीप्रमाणेंच चालू राहील. 'पोर्तुगीज भाषा व वाङ्मय' या विषयाचा एक स्वतंत्र क्लास उघडण्यांत येईल.

कॉलेजच्या इमारतींतच एक विद्यार्थीवसतिगृह उघडण्यांत येणार असून, त्यांत विद्यार्थ्यांच्या भोजनाची व रहाण्याची नवीन सोयीवर व्यवस्था करण्यांत आली आहे. भोजनाची मासिक फी, एकंदर खर्चावरून आकारण्यांत येईल, व ती ८ रुपयांपेक्षां अधिक नसणार.

शिक्षक, शिक्षणक्रम, वसतिगृह इत्यादि बाबतींत, विद्यार्थ्यांच्या हिताकडे लक्ष देऊन नवीन व्यवस्था करण्यांत आली आहे तिचा फायदा विद्यार्थ्यांच्या पालकांनीं अवश्य घ्यावा.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक, नैतिक, बौद्धिक वाढीबद्दल विशेष काळजी घेण्यांत येईल. कॉलेजांतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यांत येईल व त्यांच्या शिक्षणावर तज्ज्ञ गृहस्थांकडून देखरेख ठेवण्यांत येईल.

कॉलेजसंबंधीं अधिक माहिती स्वतंत्र पत्रकांतून प्रसिद्ध करण्यांत येईल.

मे महिन्याच्या शेवटपर्यंत विद्यार्थ्यांनीं आपलीं नांवें नोंदवावींत. अधिक माहितीकरितां सेक्रेटरी गोवा विद्याप्रसारक मंडळ c/o डॉ. बाळकृष्ण सुखटणकर, फोंडा या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

कार्यकारी कमिटीचे अध्यक्ष
आत्माराम गो. वीरकर

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दूसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, वैशाख शु. १३ शी. शके १८५३

पोर्तुगालची परिस्थिति

पोर्तुगालच्या राजकीय परिस्थितीसंबंधानें ज्या वार्ता येथील वातावरणांतून प्रस्तुत विहरत आहेत, त्यांवरून तेथील सैन्यांत दुहीचा वणवा भडकला असल्याचा संशय येतो. विद्यमान 'दितादुरा'च्या एकमुखी सत्तेचा दरारा सर्वत्र बसण्यास जें सैन्य कारणीभूत झालें, त्याच सैन्यांत कलहाचा वडवानळ पेटला असल्यानें 'दितादुरा'चें अस्तित्व सध्या स्वाभाविक अस्थिरतेच्या भोंवऱ्यांत सांपडल्याचें दृश्य नजरेपुढें उभें राहत असल्यास आश्चर्य नाहीं. आणि चालू माहेच्या ता. ५ रोजीं सुरू झालेल्या बंडाळीचा उपशम आजपर्यंत करण्यास विद्यमान सत्ता समर्थ झाली नसल्यानें, ही स्थितिहि उपरोक्त ह्मणण्यासच दुजेरा देते, यांत संशय नाहीं.

'दितादुरा'चा पाडाव करण्याच्या हेतूनें, त्याच्या शत्रूंकडून आजतागायत अनेक क्रांतिकारक प्रयत्न झाले; पण सैन्यांतील अभंग एकोप्यामुळें ते प्रयत्न यशस्वी न होतां उलट कित्येक क्रांतिकारकांस देशोधडीचा तर इतरांस तुरुंगाचा मार्ग पत्करावा लागला! खेरीज कित्येकांची मालमत्ता सरकारजमा झाली ती निराळीच! या एकंदर गोष्टींमुळें प्रतिपक्षाला दहशत बसून, यापुढें 'दितादुरा'च्या अस्तित्वांत स्थैर्य उत्पन्न होईल, असी अधिकारारूढ पक्षाला आशा होती; पण ती सांप्रतच्या कलहाग्नीमुळें फोल ठरूं पहात आहे.

या पूर्वींचीं क्रांतिकारकांचीं आक्रमणें अवघ्या २४ तासांच्या अवधींत दडपलीं गेलीं आहेत. बंडखोरांचे डाव तावडतोब हाणून, त्यांस हैराण करण्यांत अधिकारारूढ सत्तेला पाठबळ असलेल्या सैन्यानें पराक्रम गाजविलेला आहे. आतांचा प्रकार तसा नाहीं. बंडाळीला प्रारंभ होऊन जवळ जवळ एक महिना लोटला असतांहि ती चालूच आहे. आणि 'मतमतांच्या' गलबल्यानें खुद्द सैन्यांतील एकोप्याचा स्तंभच ढांसळूं लागला असल्यानें, चालू बंडाळीचा शेवट अधिकारारूढ सत्तासमाप्तींत होण्याचा संभव कित्येकानां वाटत असल्यास त्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं.

एवंच, पोर्तुगालचें प्रस्तुतचें राजकीय वातावरण अधिकारारूढ सत्तेला अनुकूल नाहीं, असेंच ह्मटलें पाहिजे. व याच समयास शेजारच्या स्पेन राष्ट्रांत चाललेला प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा विजयी निनाद पोर्तुगालांत घुमत असल्यानें, त्याच्याहि अपरिहार्य परिणामानें 'दितादुरा'चें आयुष्य संपुष्टांत आल्याचा भास होत आहे. घोडा मैदान जवळच असल्यानें, काय होईल तें लवकरच लोकनिदर्शनास येईल हें उघड होय.

इतस्ततः

२४ तास आधीं त्या त्या तालुक्यांच्या पोलीस–कमांडरांना किंवा मामलेदारांना कळवून त्यांची परवानगी मिळविल्याविना राजकीय चळवळीच्या तसेंच इतर 'कोणत्याहि स्वरूपा'च्या सभा भरवण्यास प्रतिबंध करणारी सरकारी आज्ञा आज गोमांतकांत विद्यमान असल्याचें ऐकून कोणालाहि आश्चर्य वाटणें साहजिक आहे. परवानगीचें नियंत्रण केवळ राजकीय स्वरूपाच्या तेवढ्या सभांसच लागू असून धार्मिक किंवा शास्त्रीय सभांना त्याचा संपर्क बाधत नाहीं असी जी लोकांची समजूत होती ती अर्थात चुकीची ठरली. प्रजासत्ताक राज्यपद्धतींत मतस्वातंत्र्याचा बोलबाला जेथें मुक्तकंठानें होतो, तेथेंच या निसर्गदत्त हक्काची गळचेपी करणारा सदर सरकारी निर्बंध उजळ माथ्यानें अमलांत असावा हें खरोखर आमच्या देशाचें खडतर दुर्दैव नव्हे काय?

× + ×

गेल्या सोमवारीं येथील पोलीस कमांडर व भारतकार या उभयतांचें चंद्रवाडी व काकोडें येथील मराठा–समाजानें स्थापलेल्या सन्मित्र युवक संघामार्फत साजरा झालेल्या श्रीशिवजयंत्युत्सवासंबंधीं संभाषण झालें. या प्रसंगीं उपरोक्त पोलीस अधिकाऱ्यानीं आपल्या वरिष्ठांकडून आलेली ती आज्ञा दाखवून, भारतकारांकडे असोळडेच्या उत्सवाची पृच्छा केली. भारत संपादकांनींहि उत्सवाच्या शुद्ध स्वरूपाचें विवरण करून उपरिनिर्दिष्ट सरकारी आज्ञा त्या उत्सवास कशी लागू होत नाहीं हें सिद्ध केलें. आणि ते पोलीस अधिकारी समंजस, न्यायी व लोकहिततत्पर असल्यानें भारतकारांची विचारसरणी त्यांना पटलीहि, हें येथें नमूद करण्यास समाधान वाटतें.

+ × +

पण सगळेच पोलीस अधिकारी येथील कमांडरांसारखे दूरदर्शी असणें शक्य नाहीं. हैदोसहल्ला गाजवणारांचाच त्या खात्यांत विशेष भरणा. अशा अधिकाऱ्यांना अरेरावी चालवण्यास बिलकूल वाव मिळूं नये ह्मणून उपरोक्त आज्ञा अमलांत असेपर्यंत २४ तास पूर्वीं सरकारची परवानगी संपादन करूनच नंतर कोणतीहि सभा भरवणें– मग ती कसल्याहि कारणासाठीं असो– इष्ट आहे, असें आह्मांस वाटतें. एखादा कायदा कितीहि कडक किंवा अन्याय्य असला, परंतु जोंपर्यंत तो कायदा आहे, तोंपर्यंत समाजस्वास्थ्यासाठीं त्याला मान देणें क्रमप्राप्तच होय. आणि दुसरें असें कीं, सरकारांत सूचना देऊन भरवण्यांत येणाऱ्या सभांना सरकारी प्रतिनिधि उपस्थित राहणार असल्यानें, त्यांच्या मार्फत आमच्या राष्ट्रीय कार्याचें लोण सरकारी दरबारांत पोंचण्यास सोपें पडेल व भ्याडपणाच्या आरोपांतूनहि सभांचे चालक आपोआप मुक्त होतील. सविनय कायदेभंगाचें शस्त्र पाजळण्याचें सामर्थ्य आमच्यांत असतें, तर उपरोल्लेखित अन्याय्य आज्ञा गर्भावस्थेंतच नष्ट झाली असती, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

× + ×

केसरी पत्राच्या चालू माहे २१ तारखेच्या अंकांत 'गोमंतकाचें वातमीपत्र' या सदरांत 'न्याय गरिबांकीरतां नाहीं' या मथळ्याखालीं आलेली माहिती वस्तुस्थितीचा विपर्यास करून लिहिण्यांत आली आहे. श्री. ज. वि. कामत ह्यानीं गोमांतकीय हिंदुसभेचे सभासद किंवा परिचारक या नात्यानें केपें येथील पाद्रीनें केश कापलेल्या खिश्चन बाईची मुलाखत घेतली हीच गोष्ट मुळीं खोटी. श्री. ज. वि. कामत यांनीं, त्या बाईच्या तर्फेनें पाद्रीविरुद्ध खटला भरण्यास द्रव्य गोळा करण्याची खटपट केली व तें द्रव्य त्यानीं गोमंतकीय हिंदुसभेचे सभासद नव्हत अशा हिंदूंकडून व कांहीं खिश्चनाकडून सुद्धां घेतलें आहे. हा खरा प्रकार आहे. व त्या वातमीमुळें अस्तित्वशून्य गोमांतकीय हिंदुसभेची टिमकी वाजविण्यांत 'खास वातमीदारा'नें कितीहि पराकाष्ठा केली तरी, श्री. ज. वि. कामत यांनीं त्या सभेशीं बिलकूल संबंध नसलेल्या हिंदु व खिस्ती लोकांकडून वर्गणी गोळा करण्यामुळें एक धडधडीत गोष्ट सिद्ध होते, ती हीच कीं, गोमांतकीय हिंदुसभेस द्रव्याच्या अभावीं प्रचारकार्यासाठीं इतर परधर्मी लोकांकडे सुधां हात पसरावा लागतो, इतकी दीनावस्था त्या नामधारी संस्थेस प्राप्त झाली आहे!

+ × +

अशा प्रकारें ती संस्था बहुतेक नामशेष झाली असली तरी तिच्या नावांचा डोलारा नाचविण्यांत कोणास कसला पुरुषार्थ वाटतो, हें ज्याचें त्यासच माहित. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, सदरहू 'केसरी' पत्रावर प्रसिद्ध झाल्याप्रमाणें, जर एका खिस्ती बायकोचे, तिला 'हिंदु धर्माचें वेड लागलें असावें अशी कल्पना करून' पाद्रीनें केश कापले, तर गोमांतकीय हिंदुसभेनें त्या बाईचें शुद्धीकरण करण्याऐवजीं पाद्रीवर खटला भरण्याचें कोणतें शतकृत्य केसरीच्या गोमांतकीय खास वातमीदारानें, गोमांतकीय हिंदुसभेवर लादूं पाहिलें ह्याचा मात्र उलगडा होत नाहीं. पण निर्विवाद गोष्ट ती हीच कीं, गोमंतकीय हिंदुसभेच्या खर्चानें पाद्रीवर खटला भरण्यांत आला नाहीं!

+ × +

उपरोक्त 'खास वातमीदारा'नें असेंहि ध्वनित केलें आहे कीं, 'पोर्तुगीज रिपब्लिकच्या धर्म ताटस्थ्याचा कस लावण्याच्या इराद्यानें सभेच्या खर्चानें पाद्रीवर खटला भरून न्याय मिळविण्याचें ठरविलें.' परंतु अगोदर विसरून चालणार नाहीं कीं, धार्मिक प्रश्नाशिवाय राजकीय बाबतींत हात घालणें हें हिंदुसभेच्या घटणेंत बिलकूल संभवत नाहीं. मग, पाद्रीविरुद्ध खटला भरण्याचें अवास्तविक श्रेय गो. हिंदु सभेच्या गळ्यांत बांधणें हें सत्यहि नव्हे आणि सयुक्तिक देखील वाटत नाहीं.

—रिवण येथील श्रीविमलेश्वर विद्यालयाचा बक्षीस समारंभ ता. २३।४।३१ रोजीं रा. कृष्णराव सांवर्डेकर यांच्या अध्यक्षतेखालीं थाटानें पार पडला. समयास अनुसरून रा. सप्रे, रा. नाईक वगैरेंचीं भाषणें झालीं.

—ता. २३।४।३१ रात्रौ ९ ते १ वाजेपर्यंत श्रीविमलेश्वर देवालयांत (रिवण) श्रीशंकराचार्य जयंत्युत्सव साजरा करण्यांत आला.

—'फुकट श्रम' नावांचा जो गोमांतकीय नगरपालिकांकडून कर वसूल केला जातो, तो भरणारांची नोंद गावांत लोकल बोर्डांकडून व शहरांतून स्पेशल कमेस्यांकडून केली जाते. एकाद्या नव्या करभऱ्याचा सदर नोंदींत समावेश किंवा पन्नासी उलटलेल्या करभऱ्याचें नांव तींतून कमी करणें उपरोक्त संस्थाच्याच अधिकारांतलें आहे. हा अधिकार नगरपालिकेच्या सभासदांचा नाहीं', असा खुलासा करण्याची एक मठग्रामस्थ विनंति करितो.

—पोर्तुगालच्या परिस्थितीची माहिती करून देणाऱ्या सरकारी तारा खऱ्या वस्तुस्थितीवर प्रकाश पाडण्याच्या आड येत असतात असा बोभाटा असल्यानें त्यांवरच विसंबून तेथील बंडाळीची खरी कल्पना करण्याचा प्रयत्न करणें चूक आहे. पण सत्य अल्प काळ दडपून ठेवणें शक्य असलें, तरी त्याचा जीव घेणें अशक्य असल्यानें, अखेरे सत्याचें खरें स्वरूपाविष्करण जगासमोर होणारच आहे, हें आणखी निराळें विशद करण्याचें कारण नाहीं.

—महाशाल येथील मराठी शाळेंतील मुलांच्या परीक्षेचें व बक्षीसमारंभाचें प्रतिवृत्त येत्या अंकीं देण्यांत येईल.

—यंदां उष्णतेचें प्रमाण बेसुमार वाढलें असल्यानें पुष्कळ ठिकाणचें सार्वजनिक आरोग्य बिघडलेलें आहे.

शूर्पारकाचा शालोपयोगी इतिहास
अर्थात

गोष्टीरूप गोमांतक

गोष्ट दुसरी

प्रतिज्ञापूर्ति

हजारो वर्षांपूर्वी सूर्यवंशी राजे अयोध्येस राज्य करीत होते. दशरथ हा सूर्यकुलोत्पन्न राजा असून ह्याच वंशांत भरत, रघु, दिलीप, हरिश्चंद्र वगैरे महान सत्यवादी आणि पराक्रमी राजे होऊन गेले.

दशरथाला कौसल्येपासून राम, सुमित्रेपासून लक्ष्मण आणि कैकेयीचे भरत व शत्रुघ्न असे चार पराक्रमी पुत्र होते.

राम हा सर्वांत वडील अर्थात राज्याधिकारी होता. शिवाय तो शूर तसाच सत्यवचनी, न्यायी पण प्रेमळ, बुद्धिमान, दाता आणि उदार असल्यामुळें पौर जनांच्या प्रेमादरास पात्र झाला होता.

योग्य समयीं जनकराजाच्या सीता नामक सुस्वरूप आणि सद्गुणी कन्येशीं त्याचा विवाह झाला.

पुढें रामचंद्र वयांत आल्यावर तो राज्यधुरा वाहण्यास योग्य झाला आहे असें पाहून दशरथानें त्याला युवराज्याभिषेक करण्याचा निश्चय केला. पण ऐनवेळीं कैकेयीनें आपणास मिळालेल्या दोन वरांची राजास आठवण देऊन पहिल्या वरानें रामास वनवास पाठविण्यास आणि दुसऱ्यानें भरतास राज्याभिषेक करण्यास बजाविलें. पित्याचें वचन पुरें करण्याची प्रतिज्ञा करून राम सीता व लक्ष्मण यांसह वनवासास जाण्यास निघाला.

राम पंचवटीस असतां पराक्रमी पण दुराचारी लंकाधिपतीनें कपटवेषानें सीतेचें हरण केलें. राम अनार्यांचा राजा जो सुग्रीव त्याच्याशीं सख्य करून अफाट अनार्य सेनेसह लंकेंत जाऊन उतरला. रावणाचा पापी पराक्रम रामाला अटकाव करूं शकला नाहीं. युद्धांत रावणाचा त्याच्या अनुयायांसह वध करून राम–लक्ष्मण सीतेसह अयोध्येस परत आले.

मातृभक्त भरतानें राज्यपद नाकारिल्यामुळें स्वतःस राज्याभिषेक करवून घेऊन रामचंद्रानें 'आ सेतु हिमाचल:' पर्यंत भारतवर्षावर एकछत्री राज्य केलें. ह्याच श्रीरामचंद्राच्या उज्ज्वल चरित्रावर वाल्मिकीनें रामायणासारख्या उत्कृष्ट काव्याची रचना केली.

गोष्ट तिसरी

सत्यमेव जयते

इसवीसनाच्या तीन हजार वर्षांपूर्वी कुरूकुलोत्पन्न धृतराष्ट राजा राज्य करीत असतां दुर्योधनाला दुर्बुद्धि उत्पन्न होऊन तो पांडवांशीं वैर करूं लागला. तेव्हां कलहाचें कारण नीहींसं करण्यासाटीं धृतराष्ट्रानें राज्याचे दोन विभाग करून एक धर्माच्या स्वाधीन केला. पण राजसुयज्ञाच्या वेळीं पांडवांचें विपुल वैभव पाहून दुर्योधन असुयेनें व्याप्त झाला. त्यानें धर्माला शकुनीकडून कपट द्युतांत जिंकून पांडवानां बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास पतकरणें भाग पाडिलें.

वनवासानंतर अज्ञातवासाचें दीव्य पुरें करून पांडव परत आले तरी दुर्योधन सुईच्या अग्रावर मावण्याइतकी मातीहि देण्यांस तयार होईना. श्रीकृष्णानें संधीसाठीं केलेले प्रयत्न निष्फळ ठरले. तेव्हां कुरूक्षेत्रावर सतरा दिवसपर्यंत भीषण युद्ध होऊन पांडव विजयी झाले.

सत्य, वैभव व विजय यांची गांठ अखेर अभंग राहिली.

धर्मानें हस्तनापुरास आपली राजधानी कायम करून आर्यावर्तावर अनेक वर्षें राज्य केलें.

ह्याच प्रसंगावर व्यासानें ' महाभारत ' ह्या नावांचा अप्रतिम ग्रंथ निर्माण केला.

गोष्ट चवथी

मधली स्थिति

फार प्राचीन काळीं पांड्य, चौल, केरळ वगैरे राजवंशांमागून गोमांतकांत मौर्यवंशी राजे राज्य करीत होते.

इसवी सनाच्या ५७ वर्षांपूर्वी उज्जयनींच्या पराक्रमी विक्रमादित्यानें सिथियन लोकांचा पराभव करून दक्षिणेंत एकछत्री राज्य स्थापन केलें. त्याच्या स्मरणार्थ ' विक्रमसंवत ' सुरू झाला.

त्याच्या मागून इ. स. ७८ साली शालिवाहन राजानें सिथियन लोकानां कोंकणांतून कायमचे हुस्कावून लावून आपली सत्ता प्रस्थापित केली. तेव्हां पासून ' शालिवाहन शक ' सुरू झाला. इ. स. ११० सालीं कदंबवंशी मिनेमानें गोमांतक आपल्या सत्तेखालीं आणिला.

इ. स. ४७९ त चालुक्यानीं कदंबानां मांडलीक बनविलें.

इ. स. ८९९ च्या सुमारास राष्ट्रकूट घराणें उदयास येऊन त्यानें गोमांतकावर आपला ताबा बसविला.

पण पुढें ७५ वर्षानीं राष्ट्रकुटांचा अस्त होऊन चालुक्यवंशी विक्रमादित्य राजानें आपल्या आचंगी नावांच्या शूर सरदाराकडून गोमांतक आपल्या राज्यास जोडला इ. स. ११२८ त, कदंब आणि चालुक्य घराण्यांत परस्पर स्पर्धा चालली असतां, दार समुद्राच्या होयरवेळ बल्लाळानीं गोमांतक आपल्या ताब्यांत घेतला. पण पुढें लवकरच कदंबवंशी जयकेशी राजानें चालुक्य वंशांतील तैलप राजाशीं संगनमत करून गोमांतकावर आपला अंमल बसविला.

इ. स. ११९३ त यादव पुढें येऊन त्यानीं चालुक्यांचा पराजय केल्यामुळें पर्यायानें गोमांतकाची सार्वभौम सत्ताहि त्यांजकडेच गेली.

गोष्ट पांचवी

मुसलमानी सत्तेचा श्रीगणेशा

इ. स. १२९४ सालीं दिल्लीच्या सुलतानाचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी चुलत्याशीं भांडून राजमेंद्रीच्या राजापाशीं नोकरी मागण्यास जात आहे असा बहाणा करून देवगिरी जवळ येऊन थडकला.

अल्लाउद्दिनानें यादवांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं आपण लहानसें सैन्य घेऊन पुढें आलों, मागाहून दिल्लीपतीचें अफाट सैन्य येत आहे अशी हूल उठविली.

ह्या वेळीं महाराष्ट्रांत रामदेवराव यादव ह्या नावांचा राजा राज्य करीत असून देवगिरी येथें त्याची राजधानी होती.

रामदेवाचा मुलगा शंकरदेव सैन्य घेऊन राजधानीपासून दूर गेला असल्यामुळें हें एकाएकीं आलेलें संकट पाहून त्याला धडकी भरली आणि त्यानें अल्लाउद्दिनाशीं तहाचें बोलणें लाविलें. इतक्यांत शंकरदेव आला आणि त्यानें तहाचें घोंगडें तसेंच भिजत ठेवून अल्लाउद्दिनाला युद्धाचें आव्हान केलें.

आपल्या सैन्याचा एक लहानसा भाग मागें ठेवून अल्लाउद्दीनहि शंकरदेवावर त्वेषानें चालून आला पण लवकरच त्याचा मोड होऊन त्याचें सैन्य माघार घेऊं लागलें. इतक्या अवकाशांत धुळीचे लोट उधळीत मागें राखून ठेविलेलें सैन्य अल्लाउद्दिनाच्या मदतीस येत असलेलें पाहून मागाहून येणारें मोंगल सम्राटाचें सैन्य तें हेंच अशा समजुतीनें शंकरदेवाच्या सैन्यानें कच खाऊन पळ काढला.

आलेल्या अपयशामुळें अल्लाउद्दिनांच्या अटी मान्य करणें रामदेवाला भाग पडलें. ह्याच तहानें गोमांतकांतहि पाहिल्यानें मुसलमानी सत्तेचा पाया घातला. पुढें १३१४ त अल्लाउद्दीन खिलजीनें यादवांचे राज्य खालसा केल्यावर होनावरच्या मुसलमान नबाबानें कदंब राजवंश बुडवून गोमांतकांत प्रत्यक्ष मुसलमानी अंमल सुरू केला.

गो. कृ. नाईक

—नवीन गोवें येथील **मुष्टिफंड संस्थेनें** चालविलेल्या दोन्ही विद्यालयांतील विद्यार्थ्यांचें वार्षिक परीक्षण, **श्रीयुत जगन्नाथ महादेव सामंत** बी. ए. बी. टी. अध्यापक टोपीवाला हायस्कुल–मालवण, यांजकडून होऊन, ता. २१–४–९३१ मंगळवार रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां, श्रीमहालक्ष्मीच्या **सभामंडपांत** त्यांच्याच अध्यक्षतेखालीं बक्षिस समारंभ साजरा झाला.

—नागपूरचे राष्ट्रीय से. आवारी यांची तुरुंगांतून सुटका झाली. त्यांना पागलखान्यांत डांबून ब्रिटिश नोकरशाहीनें त्यांचा सूड उगवण्याचा दुष्ट आततायीपणा केला.

साहित्य–समुद्र--मंथन

तोतरेपणाचा प्रतिकार:– लेखक श्री. डॉ. बाळकृष्ण विठ्ठल जोशी एम. बी. बी. एस. हें पुस्तक ज्ञानमित्र पुस्तकमालेचें एकावन्नावें पुष्प होय.

बोलतानां निरनिराळ्या अक्षरांचा उच्चार सरळ उमटत नाहीं ह्मणजे, कधीं ' र ' सारख्या अक्षरांचा ध्वनि तोंडांतून निघत नसतो तर कधीं, एकाच अक्षरावर द्वित्त दिल्याशिवाय अथवा त्या अक्षरांचा पुनरुच्चार केल्याशिवाय बोलतां येत नाहीं, असल्या वाग्दोषांस तोतरेपणा असें नांव दिलें जातें. पण वास्तविक पहातां, विशेषतः ' त ' या अक्षराचा त, त, त असा पुनरुच्चार करण्यापासून तोतरेपणा हा अनुकरणवाचक शब्द रूढ झाला असावा असें वाटूं लागतें.

हे वाग्दोष सुधारण्याच्या हेतूनें डॉ. जोशी यानीं अनेक उपयुक्त माहिती देऊन प्रस्तुत पुस्तक रचिलें आहे.

आपले विचार दुसऱ्यांस कळवून आपल्या विचारांची छाप इतरांस कळविण्यास शुद्ध वाणीची फार आवश्यकता असते. वाणी शुद्ध व स्पष्ट निघण्यास वागींद्रियें निर्दोष असावीं लागतात. या सर्व माहितीचें खुलासेवार वर्णन, ' तोतरेपणाचा प्रतिकार ' या पुस्तकांत लेखकांनीं दिलें आहे. व वाद्दोष कसे सुधारावे हें निरनिराळे नियम व उदाहरणें देऊन सिद्ध केलें आहे.

तोतरेपणा कसा जडतो व तो कोणत्या उपायानीं टाळावा ही माहिती पुरविण्याचा प्रयत्न लेखकानीं यशस्वी रीतीनें पार पाडिला आहे, असें नमूद करण्यास संतोष वाटतो.

ह्या पुस्तकांतील माहिती नजरेखालून आपल्या मुलांतील वाग्दोष टाळण्याची संधी आईबाप व पालक यानीं अवश्य साधावी.

वाचा दोषरहित करण्यास कोणत्या उपायांचा अवलंब करावा ह्याविषयींचें विवेचन करून डॉ. जोशी यानीं मराठी भाषेंत एका नवीन व उपयुक्त पुस्तकाची भर घातली. त्यांतील माहितीचा फायदा घेऊन तोतरेपणा घालविण्याच्या कामीं सदरहू पुस्तकाचा फायदा घ्यावा अशी वाचकांस शिफारस करितों. पुस्तकाची किंमत एक रुपया असून, ज्ञानमित्र पुस्तक–माला ४८३ शनवार पेठ पुणें शहर येथें विकत मिळतें.

गोवर्धन पुस्तकमालेचें १३ वें पुष्प ह्मणून धेनुकथासंग्रह, भाग २ रा, हें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. गोरक्षणविषयक साहित्यांत ज्यानीं आपल्या तेजस्वी बुद्धिमत्तेनें व निरपेक्ष परिश्रमानें ओजस्वी भर घातली आहे ते गोभक्त शंकर सखाराम ऊर्फ धेनुदास डोळे प्रस्तुत पुस्तकाचे लेखक व संग्राहक होत. धेनुकथासंग्रहाच्या या द्वितीय भागांत अकरा कीर्तनांचा पूर्वरंगासह समावेश झाला असून, तीं सर्वच हृदयस्पर्शी व बोधप्रद

M 105

वर्ष १६ वें. अंक ५
र ता. ३० एप्रील सन १९३१

वर्गणीचे दर
ट. ख. सह ३ रु. [आगाऊ]
किरकोळ अंकास १ आणा.

...ीचे दर– समक्ष अगर पत्रद्वारे.
...से आल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध
केली जाणार नाहीं.

संपादक व मालक
... हेगडे देसाई– फारमासेवतिकु
मुद्रण व प्रकाशन भारत–प्रेस कुसमण केंपे गोवा.

भारत
O BHARAT

Ano 16 N° 5
Quinta-feira 30 de Abril 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

Anuncios

O BHARAT, ano XVI n.º 5 de 30 de Abril de 1931

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Viegas vão á praça para venda em hasta pública á porta do tribunal judicial desta comarca no dia 5 do seguinte mez de Junho ás 10 horas pela segunda vez e por metade do preço da sua avaliação os seguintes bens penhorados nos autos civeis de execução fiscal que a Fazenda Nacional promove contra Utoma Ladú Sinai Sanvordencar e Gongadora Ladú Sinai Sanvordencar, de Sanvordem: 4/5 do predio rustico denominado "Mirabaga tican poiquim vantopa dona primeira adição" da cultura de coqueiros sito em Comproi; 4/5 do predio rustico denominado "Mirabaga tican poiquim Vantopa dona segunda adição denominada xira" da cultura de coqueiros e outras arvores sito na dita, ambos descritos na Conservatoria desta comarca sob os nºs 17234 e 17235 a fls. 60 v. e fls. 61 do Livro B. quarenta e sete avaliados por 800 e 250 rupias tudo respectivamente. O arrematante pagará a contribuição de registo por titulo oneroso e as despezas da praça, nos termos de lei. São por êste citados todos os credores certos e incertos dos mesmos executados bem como os com-proprietarios e quinhoeiros, para deduzirem seus direitos em conformidade com a lei. Para ser público se expediu este. Quepem, 27 de Março de 1931.

O escrivão do 1º oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Viegas correm éditos de 30 dias contados desde a 2 a publicação do último anuncio nos termos do § 2º do art. 197 do Codigo do Processo Civil citando a Govinda Camotim de Assolnã e ora áusente em parte incerta para no praso de 10 dias findo o praso de éditos, pagar no cartorio do escrivão que êste assina a quantia de 658:15:06 proveniente de custas liquidadas nos autos crimes de querela que o Ministerio Público promoveu contra êle ou no igual praso nomear á penhora bens suficientes para o pagamento do pedido e mais custas e sêlos acrescidos, sob pena de esse direito se devolver ao exequente M. P. correndo a execução todos os seus termos a revelia do citando. Para ser público se expediu este. Quepem, 27 de Março de 1931.

O escrivão do 1º oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Viegas correm editos de 30 dias contados desde a 2.a publicação do último anuncio, nos termos do § 2º do art. 197 do Codigo do Processo Civil citando a ré Aminabi, solteira de Betul e ora ausente em Salassivagod de Karvar do territorio extrangeiro para no praso de dez dias findo o praso de éditos pagar no cartorio do escrivão que este assina a quantia de 49:13:04 proveniente de custas liquidadas nos autos crimes do processo sumario instaurado contra a citanda pelo N. Agente do Ministerio Público ou dentro de igual praso nomear bens suficientes para o pagamento do pedido e de custas e sêlos acrescidos e por acrescer da execução sob pena de êsse direito de nomeação se devolver ao exequente Ministério Público e correr a execução seus termos á revelia da citanda. Para ser público se expediu este. Quepem, 20 de Março de 1931.

O escrivão do 1º oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

Pelo Juizo de direito da comarca de Quepêm, e cartorio do escrivão do segundo oficio Carapurcar, correm editos de trinta dias a contar do dia da segunda publicação do respectivo citando os interessados Cristalina Fernandes e seu marido Vicente Fernandes ambos maiores residentes em Ponsulem de Canacona, ora ausentes em parte incerta de Karvar do territorio Britanico para assistirem a todos os termos até final do inventario orfanologico, a que se procede por obito de Xavier Fernandes, que foi da mesma, sendo cabeça de casal Florença Fernandes do mesmo lugar, e deduzirem querendo nêle os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento, bem assim para comparecerem no tribunal Judicial desta comarca situado em Xeliem ao lado da estrada nacional que de Quepêm se dirige a estação de Sanvordem na primeira audiencia posterior á citação afim de conferirem o dote de oitenta rupias recebido por ocasião do seu casamento. As audiencias deste Juizo se fazem em todas as terças e sextas feiras ás dez horas, se não forem feriados porque neste caso terão lugar nos dias imediatos se não tambem não o forem e não estiverem compreendidos nas férias. O que para ser público se expediu êste. Quepêm, 24 de Março de 1931.

O escrivão do 2º oficio
Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei

O juiz de direito
A. Colaço

Pelo juizo de direito da comarca de Quepêm e cartorio do escrivão do 2º Oficio Carapurcar, correm éditos de 30 dias a contar do dia da segunda publicação do respectivo anuncio, citando os interessados Crisnem e seu marido Calú Gauncar de Mairem e Upassó Gauncar, marido da interessada Abolem, de Bandeli, todos do territorio britanico em parte incerta, para assistirem a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede por obito de Foti Cuntcar que foi de Calem, em que é inventariante e cabeça de casal Baguiroti Cuntcar, do mesmo lugar, sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este.

Quepêm, 28 de Março de 1931.

O escrivão do 2º oficio
Mucunda Sinai Carapurcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. Colaço

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Viegas correm éditos de 30 dias a contar da 2.a publicação do último anuncio nos termos do § 2º do art. 197 do Codigo do Proc. Civil citando a interessada Etelvina Pereira, casada com Caetano Fernandes de Assolnã e ora ausente em Bombaim territorio britanico em parte incerta, para assistir a todos os termos até final dos autos de inventario orfanologico que Maria Esperança Remetina Lobo de Cananguinim presta por óbito de Constancio Lobo que foi da mesma e deduzir nele seus direitos nos termos e para os efeitos da lei, sem prejuizo do seu regular andamento. Para ser público se expediu êste. Quepem, 20 de Março de 1931.

O escrivão do 1º oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas
Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

Ano XVI) Quinta-feira, 30 de Abril de 1931 (N.º 5

107

O BHARAT

ANUNCIOS
Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

Não se aceita nenhum anuncio ou comunicado sem ser adiantado o seu custo provavel.

Jornal de maior circulação

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL
Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-08-00

REDAÇÃO E ADMINISTRAÇÃO
COMPOSIÇÃO E IMPRESSÃO
Tip. *BHARAT* Cusmane-Quépém

Magia Governamental

Jámais se conseguiu a redenção de uma terra com tanta facilidade como da nossa India, que ainda há pouco estava *a afundar-se na inercia, na descrença, no aniquilamento.* Foi bastante apenas isto: *alguns baldes de água fénica*, disfarçada em sonora prosa do *Boletim Oficial*, para não só *lavar a impureza*, mas até tornar-nos independentes do estrangeiro, fazendo abarrotar os nossos celeiros dos opimos frutos de duas ou mais culturas. Quem lêr a rica prosa da folha do Governo, ficará certamente na dôce persuasão de que o nosso minusculo torrão natal já se encontra curado dos rumerosos males que o traziam enfêrmo. Já tinhamos conseguido, com catadupas de diplomas, transformar a nossa capital em uma cidade aceiada e confortavel, e duplicar a nossa produção cerealifera, por meio de retumbantes relatórios; porêm, para completar o quadro, restava ainda, o ser debelado um mal. Era o mal da *emigração* cada vez mais crescente, pavorosamente crescente. Ora, hoje, existe cura para todas as doenças, e, nesta terra, pululam, por toda a parte, *ilustres* curandeiros.

Não passam muitos mezes que o Govêrno da India Porguesa nomeara uma Comissão, afim de inquirir das necessidades dos nossos emigrantes—os deshenrdeiros da sorte que mourejam em terras longiquas para ganhar o pão que escasseia na sua terra.

E' sobejamente público o sucinto relatório que a patriótica Comissão apresentou ao Govêrno, alvitrando várias medidas a tomar.

¿Qual não será agora o sossôbro dos ilustres signatários do referido relatório quando lêrem a fantastica proposta do Diploma Legislativo que acaba de ser publicado no *Boletim Oficial*, numa sua edição do mês de Fevereiro?

Com o fim de promover o progresso social dos emigrantes indo-portugueses na India Britanica, e dispensar-lhes assistencia, "vai-se criar um "Fundo da Emigração" que se destina *especialmente* para a construção de uma *Casa de Portugal* na cidade de Bombaim, e nela se instalar uma escola de portugues e de um curso comercial, regidos *exclusivamente* por professores de nacionalidade portuguesa"...e êsse teor estrondoso-esperam os nossos governantes-satisfará os anhelos dos nossos compatriotas em terras estranhas.

Embora mande-nos a Justiça confessar que bem louvavel é o intuito que ditou o referido Diploma, não podemos, em sã consciencia, deixar de afirmar que a forma com que se deseja alcançar o objectivo, é, além de ser sobremodo irrisório, deveras prejudicial aos nossos interesses.

¿Qual será a vantagem prática dessa chamada *Casa de Portugal*, erigida a troco de alguns laques de rupias?

CRISE AGRARIA

A formidavel crise agrária, para a qual os nossos economistas locais não encontraram ainda outra solução senão a de carregar ainda mais no odioso imposto sôbre o arroz, afecta o mundo inteiro e faz milhões de vitimas na população camponesa dos países agricolas da Asia, America, Europa e Australia. Os agricultores que se julgavam até aqui independentes, são expulsos das suas terras, vendidos os seus bens em hasta pública e obrigados a irem aumentar o exercito dos trabalhadores desempregados das cidades e a buscar desesperadamente um meio de não morrer á fóme. Na historia das crises economicas não há exemplo duma catástrofe de tanha amplitude.

Todas as classes da população rural estão a sucumbir sob o peso da crise. Os trabalhadores agricolas estão sujeitos ao desemprego parcial e mesmo total. Além disso, os seus miseraveis salários estão sendo cada vez mais reduzidos. Os camponeses que possuem um pequeno bocado de terra não vivem mas vegetam sempre á procura dum trabalho suplementar que lhes vai faltando cada vez mais. Os pequenos proprietarios recebem preços tão baixos pelos produtos que vendem que mal podem retribuir o trabalho necessário para as suas terras. As rendas elevadas estabelecidas sôbre a base dos antigos preços altos dos produtos agricolas, pagas pelos cultivadores, constituem para êstes um fardo insuportavel em vista dos preços atuais, os juros elevados dos usurários, os impostos pesados e a carestia constante dos produtos industriais. Até os grandes proprietários, sobretudo os que não empregam nas suas terras os métodos da tecnica moderna, estão sujeitos a uma grande redução nas suas rendas.

A actual crise agrária não é um fenomeno passageiro. E' uma consequêucia da crise geral do sistema capitalista. Nos Estados Unidos da America, país do grande capitalismo, enquanto milhões de trabalhadores vivem da caridade pública por falta de trabalho e alguns estão mesmo reduzidos á fóme, existe uma tal pletora de trigo, maiz, algodão e assucar que utiliza-se alguns dêsses produtos como combustiveis nas locomotivas e outras máquinas, afim de evitar uma baixa catastrofica de preços aos grandes productores. Por igual motivo o govêrno brasileiro mandou deitar ao mar milhões de sacos de café. Assim, em alguns paizes a fome resulta não da insuficiência da produção mas da sua superabundância.

E' á crise agrária que são devidas algumas das sangrentas revoluções de que foram teatro últimamente alguns grandes paises agricolas. Ainda agora, reveste uma fórma aguda na China onde uma grande parte dos camponeses do sul estão

जनार्दन वि. कामत, वासुदेव विठ्ठल देसाई, ह. भ. प. बाळुबुवा साठे व सन्मित्रयुवक संघाचे संस्थापक व चालक यांचीं भाषणें झालीं.

—गेल्या ता. ५।४।३१ रोजीं पोर्तुगालांत सुरू झालेली बंडाळी अजूनपर्यंत चालूच आहे, असें ह्मणतात.

—ह्मार्दोळ, मंगेश, वेलींग, बांदिवडें वगैरे अंत्रुज महालांतील मराठा–गायक समाजाची जाहीर सभा ता. २५।४।३१ रोजीं ह्मार्दोळ येथें रा. मोतीराम बाबुराव जांबावलीकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरून समाज सुधारणापर बऱ्याच गोष्टींची चर्चा करण्यांत आली. सभेला जुन्या चालीरीतींनां कंवटाळून धरणारे लोकहि उपस्थित होते. अध्यक्षांनीं त्या सर्व लोकांच्या शंकांचें निरसन केलें, असें एक प्रेक्षक कळवितो.

—शिरगांव, ह्मार्दोळ व खंडेपार येथें कांहीं शेंसविधीचे समारंभ पार पाडून कायद्याचें उल्लंघन केल्याबद्दल गुन्हेगारांविरुद्ध सांखळी व फोंडें येथील पोलीस चौकींत चौकशी चालू आहे. शेंसविधिप्रतिबंधक कायदा धाब्यावर बसवून जे ब्राह्मण सदर विधीला उपस्थित राहिले त्यांस फोंडेच्या पोलीसकमांडरानें अटक केली आहे. उपरोक्त ब्राह्मणांत शिरोडेच्या गायक परिवर्देत प्रसिद्ध पावलेले ' शेंसप्रिय ' उपाध्याय संभवतात काय ?

१६ वें. म. सा. संमेलन

हैद्राबाद (दक्षिण)

(१) संमेलनाच्या तारखाः—महाराष्ट्र—साहित्य—संमेलनाचें १६ वें अधिवेशन ७, ८ व ९ मे १९३१ रोजीं होण्याचें जाहीर झालेंच आहे. संमेलनाची सुरवात तारीख ७ रोजीं संध्याकाळीं होणार असल्यामुळें व स्त्रियांकरितां व कविमंडळाकरितां प्रत्येकीं दोन तासांचा विशेष कार्यक्रम ठेवित्यामुळें संमेलनाचा उरलेला कार्यक्रम तारीख १० रोजीं सकाळीं ११ वाजेपर्यंत पुरा केला जावा अशी योजना केली आहे.

(२) वर्गणीचे दरः— वर्गणीचे दर खालीलप्रमाणें ठरविण्यांत आले आहेतः—

स्वागत मंडळ...... रु. ५ व अधिक.
प्रतिनिधी......... रु. ३
प्रेक्षक............ रु. १
स्त्रीप्रेक्षक......... आणे ४

(३) सभागृहः— काचीगुडा स्टेशन रस्त्यावरील शेठ गुमानीराम हरीराम ह्यांच्या मालकीच्या नवीनच बांधून तयार होत असलेल्या हरिप्रकाश नाटकगृहांत सभा भरविण्याची व्यवस्था केली आहे. नाटकगृह विस्तृत असून जवळ जवळ दोन हजार माणसांची बसण्याची व्यवस्था होण्यास अडचण पडणार नाहीं.

(४) पाहुण्याची राहण्याची सोयः— गावांहून येणाऱ्या स्वागतमंडळाच्या सभासदांची व प्रतिनिधींची राहण्याची व भोजनाची व्यवस्था स्वागतमंडळाकडून पाहुणे या नात्यांनें केली जाईल. सभागृहाजवळच्या भागांत कांहीं बंगले राखून ठेविले आहेत.

(५) हवामानः— हैद्राबाद उष्ण प्रदेशांत मोडत असलें तरी इंदूर, ग्वालेर, वऱ्हाड, नागपूर वगैरे प्रांतांशीं तुलना करितां येथील उष्णतामान अत्यंत सौम्य आहे व रात्रीचे वेळीं उष्णतेचा ह्मणण्यासारखा त्रास होत नाहीं. शिवाय वर्फ पाणी व विद्युत ह्या त्रयीच्या विपुलतेमुळें उन्हाळ्याचा त्रास शक्य तेवढा कमी करण्याचा स्वागतमंडळ प्रयत्न करील हें सांगणें नको.

(६) रेल्वेचीं सवलतीचीं तिकिटेंः— संमेलनास येणाऱ्यासाठीं निझाम स्टेट रेल्वेनें १ ल्या व २ ऱ्या वर्गाचीं परत प्रवासाचीं [रिटर्न] तिकिटें निम्या दरानें व ३ ऱ्या वर्गाचीं पाऊणपट दरानें देण्याची व्यवस्था केली आहे. तिकिटें १ ते १० मे पर्यंत देण्यांत येऊन १७ मेच्या मध्यरात्रीपर्यंत परत प्रवासास चालतील. जी. आय. पी. रेल्वेनें सवलतीचे दर मंजूर केले नाहींत, परंतु निझाम स्टेट रेल्वेनें दिलेले सवलतीचे दर आकारून परत प्रवासाचीं तिकिटें कोणत्याहि जी. आय. पी, रेल्वे स्टेशनापासून सरळ हैद्राबादपर्यंत देण्याची व्यवस्था केली आहे. असल्या तिकिटांवर जी. आय. पी. लायनीपुरता पुरा आकार पडेल व वाडी, मनमाड अगर बलारशाहापासून हैद्राबादपर्यंत सवलतीच्या दराप्रमाणें आकार वसूल केला जाईल. सदरहू तिकिटें मिळण्यास लागणारे दाखले बऱ्याचशा व्यक्तींकडे परस्पर रवाना केले आहेत.

Porque afinal, sejam ou não atendidos por quem de direito os queixumes da *Opinião Pública*, produzem eles, em todo o caso, um papel importante na formação do caracter do Povo—quando os mesmos queixumes se estribem na mais pura verdade e só nesta.

Venham, pois, mais, factos, sr. *Espectro*...

Anuncios

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दूसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, ज्येष्ट शु. ४ थी. शके १८५३

आर्थिक आपत्तीशीं कसें झगडावें ?

महायुद्धाचा वणवा शांत होतांच सर्व जग आर्थिक आपत्तीच्या भोंवऱ्यांत सांपडलें. खुद्द अमेरिकासारख्या कुबेरी कीर्तीच्या राष्ट्रांना नाण्याची टंचाई सतावून सोडूं लागली. आणि फॉर्डासारखे नवकोट नारायण ज्या देशांत वास्तव्य करितात तेथेंच जर द्राव्यिक अडचणी भासूं लागल्या, तर जेथें नेहमींच ' अठरा विश्वे ' दारिद्र्याचें दृश्य दिसत होतें, अशा आमच्या गोमांतकांत प्रस्तुतच्या आर्थिक अनर्थानें किती भयंकर तारांबळ उडवून दिली असेल, याची कोणालाहि सहज कल्पना होईल.

आर्थिक आपत्तीची आंच बाकीच्या इतर देशांपेक्षां आह्मांस विशेष बाधण्याचें मुख्य कारण ह्मणजे आमच्यांत उद्योगधंद्यांचा पूर्णाभाव. उद्योगधंद्यानीं धनोत्पादन होऊन देशांत द्रव्याचा संचार होत असल्यानें आर्थिक आपत्तीशीं दोन हात करणें तितकें कठीण नसतें; पण केवळ शेतकीच्या उत्पन्नावरच जीं राष्ट्रें विसंबून असतात तीं उत्पन्नाचें प्रमाण कमी होतांच किंवा उत्पन्नाची किंमत उतरतांच, हलाखीच्या कैचींत धड पडत असतात. आणि आमच्या मुख्य उत्पन्नाचीं साधनें जीं—नारळ, भात व सुपारी—त्यांचा भाव मनस्वी उतरला असल्यानें, आमचें आर्थिक जीवित अडचणीच्या भोंवऱ्यांत गटंगळ्या खाऊं लागलें असल्यास अर्थात कोणतेंच आश्चर्य नाहीं.

प्रस्तुतच्या आपत्तींतून मुक्त होण्यासाठीं अथवा तिला तोंड देण्यासाठीं जो तो देश आपल्या गरजा भागवण्यास अत्यावश्यक असलेल्या वस्तु आपणच तयार करून स्वावलंबी बनत असल्यानें, त्याला आर्थिक आपत्तीची भीषणता तितकीशी भयावह वाटत नाहीं. पण प्रत्येक गोष्टीसाठीं इतरांच्या तोंडाकडे पाहण्याची संवय आमच्या आंगीं पूर्ण मुरलेली असल्यानें, अशा प्रसंगी आह्मीं गलितधैर्य झालों नसतों, तर मात्र नवलच ह्मणावयाचें.

केवळ शेतकीच्या उत्पन्नावरच ज्यांचा संसार अवलंबून आहे त्यांची मनें सांप्रतच्या परिस्थितीनें त्रस्त होऊन प्राप्त संकटांतून विमुक्त होण्याचा मार्ग शोधूं लागलीं असल्यास तें साहजिक आहे. कित्येकांच्या मतें प्रत्येकानें कोणता ना कोणताहि धनोत्पादक पूरक धंदा पत्करल्याखेरीज निभाव लागणें शक्य नाहीं. बाणावली येथील वयोवृद्ध जमीनदार सिं. कुन्हेय आफोंस ह्यांची असी सूचना आहे कीं, प्रत्येक जमीनदारानें हरतऱ्हेची फळफळावळ किंवा नाना तऱ्हेचा भाजीपाला स्वतः जातीनें उत्पन्न करून आर्थिक अडचणीशीं झगडणें जरूर आहे. आणि आपल्या या शिफारसीच्या पुष्टिकरणार्थ त्यांनीं पत्रावळी व द्रोण्याच्या सकृतदर्शनीं क्षुल्लक वाटणाऱ्या परंतु चौतीस हजार रुप्ये दर वर्षी उत्पन्न देणाऱ्या धंद्याचें उदाहरण नमूद केलें आहे.

दुसरे कांहीं गृहस्थ स्वदेशीच्या प्रसारानें सांप्रतच्या संकटांतून सुटण्याचा उपदेश करून साध्या राहणीचें महत्वहि लोकांच्या अंतःकरणांत बिंबवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

उपरोक्त सूचना व शिफारसी व्यवहार्य आहेत यांत संशय नाहीं; पण त्यांहिपेक्षां घरोघर सूत कांतण्याचा धंदा सुरू झाल्यास या सूतापासून होणारी जादा मिळकत संसारगाड्यास विशेष निश्चित रीतीनें हातभार लावण्यास उपयोगी पडेल, असें आह्मांस वाटतें. असो. तात्पर्य हेंच कीं, प्रस्तुतच्या आर्थिक आपत्तींतून मुक्त होण्यासाठीं आळस झाडून व शिळोप्यांच्या गोष्टींचा नाद सोडून किंवा बैठ्या खेळांचें व्यसन त्यजून, प्रत्येकानें कोणताना कोणताहि धंदा स्वीकारला पाहिजे व त्याच्यापासून उत्पन्न होणाऱ्या द्रव्यानें आपल्या घरच्या बजेटांत पडलेल्या तुटीची खूट भरून काढणें जरूर आहे. खेरीज, अनावश्यक खर्चाच्या बाबींस काट देऊन, साधी रहाणीहि ठेवणें आवश्यक आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. असें झालें तरच प्रस्तुतच्या संकटांतून आमचा निभाव लागणार आहे.

इतस्ततः

१६ वें महाराष्ट्र साहित्य संमेलन यदां निजामशाहींत हैदराबाद येथें पार पडलें. इतर राजकीयदृष्ट्या भरणाऱ्या हंगामी स्वरूपाच्या सभांत व वाङ्मयात्मक संमेलनांत बरेंच अतर असतें. राजकीय उलाढाली परिस्थितीच्या अनुराधानें बदलणाऱ्या असतात. परंतु वाङ्मयाचा विकास धिमेधिमे पण प्रमाणबद्ध गतीनें होत असतो. ह्मणून साहित्य संमेलनांत घेण्यांत येणारे ठराव अमलांत आणण्यांकडे संमेलन—पुरस्कर्त्यांचे श्रम विशेष प्रकारें खर्चा पडले पाहिजेत. ही गोष्ट खरी वाटली तरी तिला व्यवहार्यतेचें स्वरूप मात्र येत नसतें.

× × ×

बुद्धिव्यवसायी वाङ्मयभक्त संमेलनांत एकत्र होण्याचा प्रसंग वर्षांतून एकदां येत असतो. अशा वेळीं परस्परांच्या विचारविनिमयांतून महाराष्ट्र भाषेच्या खऱ्याखुऱ्या उत्कर्षाची इष्ट दिशा कोणती ह्याचा निर्णय व्हावयास पाहिजे होता. असें झालें असतांच दूरच्या प्रवासांतून क्षुधानिद्रेच्या गैरसोईसुद्धां सहन करून गेलेल्या साहित्यभक्तांच्या श्रमांचें सार्थक होण्याचा संभव होता. वस्तुतः असा व्यावहारिक अनुभव येत नसतो.

\+ × +

महाराष्ट्रसाहित्य संमेलनाचा प्रांत जितका महाराष्ट्रापासून दूर व अलग तितका ज्यास्त हुरूप संमेलन—प्रतिनिधींस येत असतो. मात्र, तो हुरूप प्रवासांतील दगदगींमुळें नाहींसा होऊन संमेलन—स्थळीं पोंचल्यावरोवर शीण घालविण्यासाठीं सुखसोई उपभोगण्याची लालसा उत्कट होते. तोंच स्वागत मंडळानें दक्षतापूर्वक अवतीर्ण केलेल्या सरदारी थाटाच्या सोईचें सेवन करून ताजेतवाने झालेल्या प्रतिनिधींस परत घरीं जाण्याची उत्कंठा जागृत होत असल्या कारणानें सभेचा कार्यक्रम लांबलचक व नीरस वाटूं लागतो ! हैद्राबादेच्या संमेलनांत असाच प्रकार झाल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

\+ × +

गतसालीं १५ वें साहित्य संमेलन इकडे भरल्यावेळीं, त्या पासून होणें संभवनीय असलेल्या बहुविध फायद्यांचे पाडे वाचण्यांत येत असत. वास्तविकपणें, त्यांपैकीं किती फायदे पदरांत पडले ह्याचें मोजमाप करूं गेल्यास काय निष्पन्न होईल हा प्रश्नच आहे. एक फायदा असा सांगण्यांत येत असे कीं, गोमांतकीय अर्थात कोंकणी शब्दांचा प्रवेश अधिकृत रीत्या मराठी वाङ्मयांत संमेलन द्वारा होईल. ही गोष्ट गोमांतकीय संमेलन पुरस्कर्त्यांनीं करावयास पाहिजे होती. ह्मणजे त्यांनीं मराठी लेखनांत शक्य तितके कोंकणी भाषेतील शब्द घुसडून देण्याचा उपक्रम सुरू केला पाहिजे होता. अशामुळें मराठी वाङ्मयांत ज्यास्ती शब्दांची भर पडून, शिवाय कोंकणी—मराठी भाषेच्या शब्दांत दिसणारी तफावत नाहींशी होऊन जाण्याचा व त्या दोनहि भाषांत निकट साम्य येण्याचा दुहेरी फायदा मिळाला असता. खुद्द महाराष्ट्रीयांस ही गोष्ट सुगम नाहीं. तर दुसऱ्या बाजूनें, बृहन्महाराष्ट्रीयत्वाची प्रौढी मिरविणाऱ्या गोमांतकीयांस अस्सल पुणेरी मराठी शब्द वापरण्याचा मोह सुटत नसल्यामुळें कोकणी शब्द मराठी लिखाणांत वापरण्याची बुद्धि सुचत नाहीं. एवंच, गोव्यांत संमेलन भरण्यानें कोकणी शब्दांचें मराठी संमेलन होईल ही आशा निरर्थक टरली !

× + +

दुसरा असा फायदा सांगण्यांत येत असे कीं, गोव्यांत संमेलनानिमित्त आलेले प्रतिष्टित महाराष्ट्रीय दिसले ह्मणजे त्यांच्या मतांचें वजन पोर्तुगीज सरकारवर पडून गोमांतकांत मराठी भाषेची सरकार दरबारीं होत असलेली हेळसांड नाहींशी होऊन व राजाश्रय प्राप्त होऊन तिचें नष्टचर्य संपेल. परंतु हा फायदासुधां काल्पनिकच ठरला. ह्याशिवाय, तिसरा फायदा असा आहे ह्मणून सांगत की, गोव्यांत संमेलन भरल्याच्या योगें गोमांतकीय व महाराष्ट्रीय यांमध्यें स्नेहाचें दळण वळण वाढेल. हा फायदा देखील तार्किक आहे, असें ह्मटल्यास आतिशयोक्ति होणार नाहीं. कांकीं, स्नेह व सख्य दृढ होण्यास समानशीलता असावी लागते. व मराठी वाङ्मयांत अघाडी मारलेल्या महाराष्ट्रीयांशीं खरा स्नेह संपादन करण्यास त्यांच्या सारखी ओजस्वी वाङ्मय निष्पत्ति गोमांतकांत झाली पाहिजे. असें झाल्याशिवाय दर्शनी स्नेहाच्या वल्गना व्यर्थ होत. तात्पर्य दरवर्षी भरणाऱ्या महाराष्ट्रीय साहित्य संमेलनापासून कायम स्वरूपाचें टिकाऊ स्मारक उपलब्ध न झाल्यास संमेलन हें वाङ्मयहितकारी साधन नसून, वर्षभर बुद्धिव्यवसायांत कष्टविणाऱ्या वाङ्मयभक्तांस ती एक निवळ करमणूक आहे असें वाटूं लागेल.

\+ × +

बूटविरहित हिंदूंला पोर्तुगीज भाषेचें ज्ञान असेल, असी पुसट कल्पनासुधां कित्येक पाद्र्यांना तसेंच फिरंगाळलेल्या कंट्री वयांना नसते. ही त्यांची कल्पना आह्मांस फायदेशीर झाली. गेल्या शनिवारीं आह्मीं पणजीस जाण्याच्या इराद्यानें मडगांवहून कुडाळ येथें जाणाऱ्या एका मोटार लॉरींत आरूढ झालों. आमच्या शेजारीं मडगांवच्या ऑस्पिसेंतील एक चष्मेवाली फॅशनेबल तरुण परिचारिका स्थानापन्न झाली असून, समोरच्या शॉफिरच्या बाजूच्या 'सीट'वर पिलार कोंव्हेंतांतील एक पाद्री मजेंत बसला होता. नुवेंचा डोंगराळ रस्ता लॉरीनें 'सुखरूप' गांठला; पण पुढें अकस्मात 'पॅंक्चर' झाल्यानें, लॉरीला मध्यंतरींच कांहीं काळ विसावा घेणें भाग पडलें. या सक्तीच्या विश्रांतींत त्या उभय विषम लिंगी चष्मेवाल्या व्यक्तींत संभाषण सुरू झालें. संभाषणांत पाद्रीनें ओस्पिसेंत किती कुमारी बाळंतिणी आहेत, किती अविवाहित मुली गरोदर आहेत, गरोदर बाईच्या पोटाचें प्रमाण कसें काय आहे, त्यांचा चरितार्थ तेथें कोण चालवितो वगैरे प्रश्नमालिकेचा मारे मारा चालवला होता. व आह्मांसमवेत बाकीचे सर्व 'प्यासिंजेर' पोर्तुगीज भाषेंत अनभिज्ञ असल्याच्या कल्पनेनें ती परिचारिकाहि पाद्रीला ऑस्पिसेंतील इत्थंभूत माहिती पुरवीत होती ! अशा रीतीनें लोकांच्या गुप्त पातकांचें पुराण वाचण्यांत व ऐकण्यांत तीं दोघेंहि निमग्न होऊन गेलीं होतीं ! या निंद्य प्रकारानें आह्मांस त्यांची कींव आली. 'लोकां'ची पर्वा न करतां पाद्रीनें चालविलेली वटवट व आपल्या स्त्री जातीच्या सौजन्याची पर्वा न बाळगितां परिचारिकेनें सैल सोडलेली जीभ पाहून आह्मांस फार दुःख झालें.

गोष्टीरूप गोमांतक

[ले. गो. कृ. नाईक]

गोष्ट सहावी.

गजेंद्र मोक्ष

वरगुळचा राजा रामराय दक्षिणेंतून मोंगली सत्तेचें उच्चाटन करण्याचे प्रयत्न करीत असतां दिल्लीच्या बादशहाचा मुलगा युनानखान यानें अफाट सैन्यानिशीं त्याच्यावर आक्रमण केलें.

युद्धांत रामराय पडला व स्वातंत्र्यवाद्यांचा पूर्णपणें मोड झाला.

युनानखानानें जरी रामरायाची प्राणज्योत मालवून टाकिली तरी जनतेच्या अंतःकरणांत प्रदीप्त झालेली स्वातंत्र्याची ज्योत काहीं त्याला विझवितां आली नाहीं. रामरायांचा गुरू मंत्रि–विद्यारण्य आणि सरदार हरिहरराय व बुक्कराय यांनीं राजाच्या वधानें हताश न होतां तुंगभद्रेच्या कांठीं विजयनगर नावांचें नवीन शहर वसवून इ. स. १३३५ सालीं पुन्हां स्वतंत्र हिंदुराज्याची प्राणप्रतिष्ठा केली. अल्पावधींत विजयनगरच्या साम्राज्यानें सगळी दक्षिण व्यापून टाकिली.

इ. स. १३६७ त स्वतः विद्यारण्य माधवानें गोमांतकावर स्वारी करून त्याला मोंगलांच्या मगरमिठींतून मुक्त केलें.

———

गोष्ट सातवी.

मुसलमानांचा पुनःप्रवेश

दिल्ली येथें एका ब्राह्मणाच्या घरीं हसन ह्या नावांचा एक गुलाम होता. त्याच्या अंगचा पराक्रम पाहून त्या दयाळु ब्राह्मणानें त्याला गुलामगिरींतून मुक्त करून त्याची सैन्यांत भरती केली.

दिल्लीचा सुल्तान महमद तवलव हा जुलमी निपजल्यामुळें कांहीं सरदार बेदील होऊन त्यांनीं दौलताबादेच्या किल्ल्याच्या आश्रयानें इ. स. १३४७ त बंडाचा झेंडा उभारिला.

स्वपराक्रमानें उदयास आलेला हसन हा ह्या बंडखोरांचा पुढारी होता. हसननें उपकारकर्त्यास स्मरून आपल्या नवसंपादित राज्यास ‘ ब्राह्मणी राज्य ’ असें नांव दिलें.

गोमांतकाचा सुभेदार अमराजी अल्पवयी राजा नरसिंगराव यास मदत करण्यास विजयनगर येथे गेल्याची संधि साधून महमद गावन ह्यानें इ. स. १४६९ सालीं गोमांतकाचा पाडाव केला.

अमराजीनें बेळगांवच्या विक्रमराजाची मदत घेऊन मुसलमानांना गोमांतकांतून हुसकावून लावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण त्यांत त्याला अखेरपर्यंत यश आलें नाहीं.

ब्राह्मणी राज्याची इतकी भरभराट झाला कीं, राज्याचा अभिमानी मंत्री महमद गावन यांच्या खुनानंतर त्याच्या मर्यादेचें रक्षण करणें अशक्य होऊन पांच स्वतंत्र राज्यें अस्तित्वांत आलीं. पैकीं इ. स. १४९७ त युसफ आदिलशहानें विजापूर येथें आदिलशाहीची स्थापना करून त्यांत गोमांतकाचा समावेश करून घेतला.

———

गोष्ट आठवी.

पोर्तुगीजांचा प्रवेश

सुवर्णभूमि ह्या नावानें प्रसिद्ध असलेल्या आपल्या हिंदुस्थान देशांत अपार संपत्ति आहे असें पाहून पाश्चात्यांच्या तोंडाला पाणी सुटलें आणि त्यामुळें त्यांच्यांत जलमार्ग शोधून काढण्याची अहमहमिका सुरू झाली

इ. स. १४९२ त दों. मानुएल राजाच्या कारकिर्दीत व्हास्को द गामा ह्या नावांच्या धाडसी पोर्तुगीज नाविकानें जलमार्ग शोधून काढण्याचें श्रेय संपादन केलें.

ह्याच सुमारास तुळवदेशच्या तिमाजी नांवाच्या एका लुटारूनें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर धुमाकूळ माजविला होता.

व्हास्को द गामानें त्याचीं गलबतें जाळून संपत्ति अपहारिली. पण तिमाजीनें पूर्व वैर विसरून गामा मागून आलेल्या आफोंन्सु आल्बुकेर्की ह्या पोर्तुगीज सरदाराचें सख्यत्व संपादन केलें.

ह्यावेळीं गोमांतकांत मलीक युसफ गुर्गी नावांचा कडवा अधिकारी युसुफ आदिलशहाच्या वतीनें राज्य कारभार पहात होता. त्यानें धर्माच्या नावांखालीं चालविलेल्या अमानुप अत्याचारामुळें हिंदुप्रजेंत असंतोषाचा वणवा झपाट्यानें फैलावत होता.

तिमाजीनें पोर्तुगीज सरदार आफोन्स द आल्बुकेर्की यास गोमांतक सर करण्याची सल्ला दिली. व संतप्त गोमांतकीयांचीं मनें वळवून त्यांना मुसलमानानविरुद्ध उठविलें.

हिंदूंच्या मदतीनें ता. २५ फेब्रुवारी १५१० रोजीं पोर्तुगिजांनीं पणजीचा किल्ला सर करून आपले पांढरे पाय एकदांचे ह्या पवित्र भूमीला लाविले.

———

गोष्ट नववी.

पोर्तुगीजांचें प्रत्यागमन

पणजीचा किल्ला पडल्याची बातमी समजतांच युसुफ आदिलशहा चाळीस हजार सैन्य घेऊन निघाला.

शहराला वेढा पडतांच आपला निभाव लागत नाहीं असें पाहून आल्बुकेर्कीनें दारूच्या कोठारास आग लाविली आणि हातीं सांपडलेल्या मुसलमानांस कापीत त्यानें पळ काढिला. पण हवा अनुकूल नसल्यामुळें तो बंदरावर अडकून पडला. तेथेहि आदिलशहानें त्याचा पिच्छा पुरविला पण आल्बुकेर्की हातीं लागला नाहीं.

झालेल्या पराभवानें हात पाय न गाळितां पोर्तुगालहून मदत येतांच आल्बुकेर्कीनें गोमांतकावर चाल केली. मुसलमान सूड उगविण्यासाठीं चवताळून उठले. पोर्तुगीजांनीं पराकाष्ठा केली पण त्याचा निभाव लागेना. इतक्यांत तिमाजी गैरसप्पाच्या राजासह पोर्तुगिजांच्या मदतीस आल्यामुळें जयाचें पारडें परतलें. मुसलमानाचा परभव होऊन त्यानीं पळ काढला.

शहरांत प्रवेश करून आफोन्सु द आल्बुकेर्कीनें निरपराधी प्रजेची जी कत्तल केली तिला तर तुलनाच नाहीं.

गोरखपुरचा गीता–प्रेस

आज सुधारलेल्या राष्ट्रांत ग्रंथप्रकाशनाची सर्व बाजूंनीं होत असलेली उन्नति पाहून आम्हांसारख्या परावलंबी जित लोकांना आश्चर्य वाटल्याविना खास राहत नाहीं. युरोप–अमेरिकासारख्या देशांत ग्रंथनिर्मितीची विविधविषययुक्त वृद्धीच झपाट्यानें होत नसून ग्रंथांच्या बाह्यस्वरूपांत व किंमतींतहि भयंकर क्रांति होत असलेलें चित्ताल्हादक दृश्य नजरेसमोर उभें ठाकत आहे. आणि याचें मुख्य कारण ह्मणजे वाढता शिक्षणप्रसार. शिक्षणप्रसारानें जनतेंत ज्ञानलालसा पोफावून वाचनाकडे सहजच तिची प्रवृत्ति झुकते व नव्या नव्या ग्रंथांचा संग्रह करणें हें आपलें उच्चतम कर्तव्य समजून तें पार पाडण्याचे कामीं ती अहमहमिकेनें पुढें येत असते. अर्थात अशानें ग्रंथ निर्मितीस व प्रकाशनास सहजच प्रोत्साहन मिळून ग्रंथकार व प्रकाशक या उभयतांचाहि उपयुक्त उद्यम स्वपरकल्याणकारक होत असतो. आणि ह्मणून आज सुधारलेल्या स्वतंत्र देशांत श्रीमंत ग्रंथकार व धनाढ्य प्रकाशकांचीं नांवें ऐकूं येत असतात.

परंतु आमच्या परतंत्र देशांत सदर धंदेवाईकांची जोडी जवळ जवळ दैन्यांतच काळ कंठीत असते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एकादा श्रीमंत ग्रंथकार किंवा श्रीमंत प्रकाशक हिंदुस्थानांत क्वचितच नजरेस येतो. शिक्षणप्रसाराच्या अभावानें ज्ञानलालसेला वाव न मिळून ग्रंथवाचनाची अभिरूचि जनतेंत वाढत नसल्यास नवलाई असें काय आहे? तथापि अशाहि कठीण परिस्थितींशीं झगडून व उत्तमोत्तम ग्रंथ लिहवून त्यांचें प्रकाशन करणाऱ्या संस्था हिंदुस्थानांत हल्लीं हल्लीं निर्माण होऊं लागल्या आहेत. हें सुचिन्ह होय. अशा तऱ्हेच्या उपयुक्त संस्थांतच शीर्षकांत उल्लेखिलेल्या हिंदी गीता–प्रेस संस्थेचा निर्देश करणें जरूर आहे. गीता–प्रेस छापखान्याचे मालक श्री **घनश्यामदास** हे असून त्यांनीं आतांपर्यंत प्रसिद्ध केलेलें हिंदी साहित्य त्यांची कीर्ति अजरामर करण्याच्या योग्यतेचें आहे, यासंबंधीं दुमत असणें शक्य नाहीं. भजन–संग्रह [भाग १ २], भक्तपंचरत्न, गीतामें भक्तियोग, श्रुतिकी टेर, विनय–पत्रिका इत्यादिनेक पुस्तकांच्या प्रकाशनानें श्री. घनश्यामदासजीनीं वाजावलेली हिंदुधर्माची सेवा व हिंदी साहित्य प्रसाराचें कार्य हीं अपूर्व होत. हिंदुधर्माचे खरेखुरे अभिमानी व हिंदी भाषेचे खरेखुरे चहाते गीता–प्रेस संस्थेला सक्रिय उत्तेजन देऊन हिंदी राष्ट्राची राजभाषा होण्याच्या मार्गांत असलेल्या हिंदी भाषेला धन्य करतील अशी आह्मांस पूर्ण आशा आहे.

श्री. घनश्यामजी यानीं आपल्या गीताप्रेसांतून पसिद्ध झालेल्या सुंदर पुस्तकांची भेट ‘भारता’स पाठविल्याबद्दल भारत त्यांचा पूर्णाभारी आहे. गीता–प्रेसाची शुक्लेंदुवत् प्रगति होऊन श्री. घनश्यामजींच्याकरवीं हिंदुधर्माची व हिंदी वाङ्मयाची असीच अभूतपूर्व सेवा घडो, अशी परमेश्वराची करुणा भाकून हें लिखाण पुरें करितों.

बालोन्नति समाज, केंपें

या संस्थेच्या सभासदांस कळविण्यांत येत आहे कीं, इकडील लक्ष्मीमंदिराची इमारत, कांहीं अटींवर बालोन्नति समाजाच्या ताब्यांत घेण्याचें घाटत आहे. त्या अटी विचारांत घेण्यासाठीं एकंदर सभासदांनीं चालू माहेच्या २४ तारखेस संध्याकाळीं ५॥ वाजतां भरणाऱ्या असाधारण सभेस हजर राहण्याची मेहेरबानी करावी. गैरहजर सभासदांची मान्यता वरील सभेंतील बहुमताच्या ठरावांस आहे असें मानून पुढील तरतूद केली जाईल.

कुसमण–केंपें, ता. १३।५।९३१

जयवंत घनश्याम मळकर्णेकर

अध्यक्ष बा. समाज

सारस्वत विद्यालय, ह्मापसें

येत्या ता. २४ मे रविवार रोजीं संध्याकाळीं ४ वाजतां, [स्टॅं. टा.], सारस्वत विद्यालय ह्मापसें या संस्थेच्या मुंबईतील कायम निधीच्या व्यवस्थेचा व इतर बाबींचा विचार करण्यासाठीं, संस्थेच्या दिवाणखान्यांत सभासदांची एक असाधारण सभा भरणार आहे. तरी सर्व सभासदांनीं या सभेस वेळेवर हजर रहावें अशी विनंति आहे.

ह्मापसें, ता. ८।५।३१

आ. न.

आत्माराम गोविंद बोरकर

अध्यक्ष सर्व साधारण मंडळ

—नवहिंदूंना पुन्हां खिस्ती कळपांत ओढण्याचीं खिस्ती धर्माधिकाऱ्यांचीं कृष्णकारस्थानें सुरू असल्याचें कळतें. पिलारच्या कोंव्हेंतांतून सदर कारस्थानांचीं सूत्रें चालवलीं जात असतात असें एक चित्रगुप्त कळवितो.

—चांदीवरील कराचा कायदा व मोटारची संख्या नियमित करणारा कायदा, हे दोन्हींहि कायदे सरकारीत्या प्रसिद्ध झाले. मोटारची संख्या ७०० ठरवण्यांत आली आहे, हें वाचकांस आठवत असेलच.

se conservasse intacta. Nem isto.

Conquanto tenha saido igualmente da rebelião de 28 de Maio de 1926, veio como govêrno constituido a declarar aos rebeldes de Madeira que ela *governa em nome da nação por vontade do exercito* !

O exército, aliás, não fala não manda, não impera. Quem nêle manda, são os seus oficiais, constituindo o núcleo pensante. Eles é que se degladiam!

Cá para nós na India, tanto vale que o sr. Carmona se conserve á testa da nação, como volte ou o sr. Afonso Costa ou Bernardino Machado, com a sua máquina democrática. Em qualquel caso, para governar as colónias, abundam generais, mas sem tino administrativo, nem com a mais rudimentar preparação.

E' como aos democráticos devemos não poucas sinecuras, absorvendo alguns laques em puro desperdicio, tais como a Comissão de Melhoramentos de Mormugão, o Crédito Rural, a Direcção da Agricultura, com suas ramificações, e muitas outras.

E a ditadura, com todo o seu programa da moralidade. do saneamento financeiro e da supressão dos escandalos não foi capaz de banir um só, nem mandou devidamente executar o Diploma Legislativo n.° 38 que não está revogado. Só tem alterado e modificado as leis, sem método. Codificasse pelo menos para facilitar a sua observância.

C. V. Gomes Pereira

Ecos-e-Critica

Um dia'logo curioso

Sábado passado, assistimos a uma interessante conversa entre um padre que serve a Deus no Convento de Pilar e uma enfermeira que alivia as dôres da humanidade no Hospicio de Margão. O diálogo teve lugar no *camiahão* que do *motor-stand* de Margão nos transportava a Cortalim.

O padre que usava *óculos* azues, dum azul celeste, ocupava o lugar da frente, conquistado por direito de *prejerência* derivada de *antiguidade*. A enermeira que, por sinal, era nova gorda e *decotada*, trazendo igualmente lunetas nos seus lindos olhos, estava alojada em um banco do interior da viatura ao lado doutros passageiros *modernos*, no número dos quais figurava tambem quem estas linhas escreve.

Até ás alturas de Nuvem a viagem foi esplendida; mas, depois, foi-nos adversa a sorte e uma *puncture* havida numa das rodas do *carro* deteve os passageiros no meio do caminho. E enquanto se substituia a róda estragada, é que se entabolou a conversação entre o sacerdote católico e a formosa enfermeira.

—¿Há no Hospicio muitas solteiras grávidas? ¿Que tal apresentam as barrigas?—interrogava o padre.

—Solteiras grávidas há no Hospicio mas não sei quantas, porque não pertenço áquela secção—respondia a enfermeira.

— E solteiras parturientes? São conhecidos os *coniventes*, isto é, os autores da *obra*? — perguntava, ainda, o religioso tonsurado.

—Nada posso dizer certo, *não é*? Sei, apenas, que há uma parturiente ilustrada, substentada por um cavalheiro tambem ilustrado e rico de Bardez por pessôa interposta — replicava a mulher.

Palavra puxa palavra. E o diálogo dos dois foi divulgando ali os pecados da fraqueza humana com os quais ambos se divertiam.

E, agora, pergunta-se: ¿E' permitido a um padre ser tão curioso? ¿E' licito a uma enfermeira ser tão leviana?

Se não, ¿em que ficou o decôro da batina e a que se reduziu o segrêdo profissional da empregada do Hospicio?

Boa civilisaSao !

Na América foi, há pouco, queimado vivo um preto, juntamente com sua habitação.

A' *festa* da queima assistiram em magotes os *brancos* a-

teresses dos capitalistas ou mesmo apenas dum grupo dêles Há alguns anos o govêrno criou um imposto sôbre os tecidos fabricados na India que se visava a favorecer os capitalistas inglêses de Lancashire mas para o justificar invocava se os interesses economicos do consumidor indiano. A assembleia Legislativa cuja maioria é eleita sancionou recentemente direitos aduaneiros sôbre o trigo e o sal. Pretendeu se que o direito sôbre o trigo favorecia o agricultor indiano, mas na realidade era o capitalista quem ganhava com aquilo A redução do preço do trigo não prejudica o pequeno agricultor que o cultiva para o seu próprio consumo, mas afecta unicamente o negocio dos açambarcadores dos cereais que pedem protecção contra a competência estrangeira. O mesmo acontece com o sal cuja barateza favorece os consumidores mas prejudica os fabricantes em beneficio dos quais o govêrno não hesita em elevar o preço dêsse artigo de consumo popular.

Acontece o mesmo na India Portuguêsa. Há dois anos a classe dos proprietários rurais alarmados pela baixa do preço de côco propuseram que o govêrno subsidiasse uma companhia franceza de navegação para estabelecer o transporte directo dêsse produto entre Marselha e Mormugão. Assim a copra de Gôa teria um bom mercado na França e na Alemanha, mas era necessário assegurar fretes baixos. Era uma tentativa hábil para encabeçar no país um encargo de que resultaria beneficio sómente aos proprietários dos coqueiros A proposta era feita sob capa duma medida que ia beneficiar o paiz inteiro. Felizmente para o contribuinte a proposta não mereceu o apoio do govêrno.

A baixa do preço do arroz provocou agora uma proposta de taxa movel sôbre a importação dêsse produto de consumo popular. A razão invocada para justificar êsse nosso imposto é que a taxa sôbre o arroz tem por fim estimular a produção local, mas na realidade o seu fim é elevar o preço do bate afim de favorecer os negociantes e os grandes proprietários dos arrozais.

A recente lei que limita o número dos automoveis de praça é mais um exemplo do interesse que se manifesta em pról da classe capitalista. Essa lei tem evidentemente por fim assegurar os beneficios dos actuais proprietários dos automoveis a quem são garantidos por essa forma lucros invejaveis para o capital empregado nessa industria O aumento no número dos automoveis teve por consequência uma consideravel reducção do custo das viagens; a concorrência entre os proprietários dos automoveis beneficiou o público que dispõe assim dum meio de transporte barato e rápido. Não se compreende porque o govêrno anda empenhado em atenuar os efeitos da livre competência. Os proprietários dos automoveis estão em condições de limitar o número de carros de praça quando êles acharem que as suas carreiras não rendem o suficiente para o dinheiro empregado. ¿Porque tanta solicitude paternal para com os capitalistas por parte do govêrno?

O descontentamento que vai pelo país é em grande parte devido ás suas condições económicas pouco satisfatórias. A classe trabalhadora não aspira ao poder politico simplesmente por amor ao poder mas únicamente como um meio de assegurar o seu proprio bem-estar economico. Não se importa com uma simples transferência do mando da burocracia estrangeira á uma burocracia indigena. O que ela deseja é que o futuro govêrno da India seja confiado a entidades que mereçam a sua confiança para melhorar a condição económica dos trabalhadores. A classe operária não está disposta a apoiar um govêrno onde os proletários não estejam devidamente representados.

129 21/5/1931

वर्ष १६ वें. अंक ८

गुरुवार [illegible] तन १९३१

दर

सालीन [illegible] रु. [आगाऊ]

[illegible]स १ आणा.

जा[illegible] समक्ष अगर पत्रद्वारे.

आग[illegible] शिवाय जाहिरात प्रसिद्ध [illegible]णार नाहीं.

[illegible]क व मालक

[illegible] देसाई— फारमासेवतिकु

मुद्रण व प्रकाशन भारत–प्रेस कुसमण केंपें गोवा.

भारत
O BHARAT

Ano 16 N° 8

Quinta-feira 21 de Maio 1931

ASSINATURA

Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO

G. P. Hegdo Dessai

FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO

TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas, vão á praça para venda em hasta pública judicial á porta do tribunal desta comarca no dia 2 do seguinte mez de Junho ás 10 horas pela 1 a vez e por maior lanço que se oferecer acima da sua avaliação os séguintes bens penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Pondorinata Quessova Sinai Corongotó de Parodá e residente em Rivona promove contra Gundó Vitobá Porobo Dessai e mulher Priaga de Rivona:- 4 a parte de cada um dos predios Palmar Pademada por outro nome Pademandantil que é 2.a adição do predio de igual nome da cultura de coqueiros; Palmar e arecal Gainguinim que é 3.a adição do predio de igual nome da cultura de coqueiros e arequeiras; Segunda adição do prédio Pademada, da cultura de coqueiros e outras arvores, sitos em Rivona e do predio rustico denominado Fotepor buagor da cultura de coqueiros e outras arvores sito na dita, discritos na Conservatoria do Registo Predial desta comarca sob os n ° s 2375 a fls 167 do Livro B 9, 2384 a fls 176 do dito B 9, 8374 a fls 194 v. do Livro B 24 e 17090 a fls. 187 v. do L. B. 46 avaliados por 50, 150, 50 e 500 rupias, tudo respectivamente.

O arrematante pagará a contribuição de registo por titulo oneroso e as despezas da praça, nos termos de lei. São por ê-te citados todos os credores certos e incertos dos mesmos executados bem como os quinhoeiros e co-proprietarios para deduzirem seus direitos nos termos de lei. São tambem citados para os mesmos fins os representantes dos seguintes credores falecidos Balcrisna Sadassiva Camotim, casado de Nanaim do territorio Britanico e residente em Sirvoi, a cujo favor pesa uma penhora no livro F. 3 a fl. 4 v sob a inscrição n ° 1235 registada em 27 de Janeiro de 1904 para haver dos executados Crisna Madeva Porobo Gauncar e mulher de Colomba a quantia de 500 rupias; mais uma hipoteca no Livro C n ° 4 a fls. 139 sob o n ° 995 registada em 4 de Janeiro de 1893, a favor do mesmo Balcrisna, constituida pelos ditos Crisna e mulher á segurança da quantia de 500 rupias mais uma penhora a favor do mesmo Balcrisna no dito Livro F 3 a fls. 5 v. sob a inscrição n ° 1239 registada em 24 de Fevereiro de 1904 para haver dos executados ditos Crisna e mulher 500 rupias; Govinda Buqui Porobo Dessai de Rivona a cujo favor pesa uma hipoteca no Livro C n ° 3 a fls. 121 sob o n ° 2621 registada em 15 de Abril de 1904 constituida por Babagi Gaudó Porobo Dessai, viuvo de Rivona á segurança da quantia de 90 rupias. Para ser público se expedi i este. Quepem, 20 de Março de 1931.

O escrivão do 1 ° oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas vão a praça para venda em hasta pública judicial á porta do tribunal judicial desta comarca pela 1.a vez e por maior lanço que se oferecer acima da sua avaliação no dia 2 do seguinte mez de Junho ás 10 horas os seguintes bens penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Maria Carmina Almeida por outro nome Carmelina Almeida, de Cuncolim promove contra Maria Etelvina Fernandes de Assolná, e outros: 3/4 partes do lado do nascente do predio rustico denominado Bomchepursa deula odil bagaeta, da cultura de coqueiros e outras arvores sito em Bali discrito por inteiro na Conservatoria desta comarca s b o n ° 10269 a fls. 153 do L B n ° 29 avaliado por 2000 rupias. O arrematante pagará a contribuição de registo por titulo oneroso e as despesas da praça nos termos de lei. São por este citados todos os credores certos dos mesmos executados, bem como os co-proprietarios e quinhoeiros para deduzirem seus direitos nos termos de lei Para ser publico se expediu este. Quepem, 10 de Março de 1931.

O escrivão do 1 ° oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

Pelo juizo de direito da Comarca do Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas correm éditos de 30 dias a contar de 2.a publicação do último anuncio nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civil citando a interessada Etelvina Pereira casada com Caitano Fernandes de Assolnà, e ora ausente em Bombaim da India Inglesa em parte incerta, para querendo assistir a todos os termos até final dos autos de inventario orfanologico que Maria Esperança Rametina Lobo, de Canaguinim presta por óbito de Constancio Lobo, que foi da dita, e deduzir nêle seus direitos nos termos de lei, sem prejuizo do seu regular andamento. Para ser público se expediu este. Quepem, 20 de Março de 1931.

O escrivão do 1 ° oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar, correm éditos de 30 dias a contar de 2 a publicação do último anuncio, citando o menor impubere Quensoa Vamona Porobo Dessai, residente em Malebaga de Loliem na pessoa do seu tutor Narana Venctexa Naique, de Calxi de Loliem, ora ausente em parte incerta com uma companhia de espectadulos mágicos para no praso de 10 dias findos os referidos éditos, pagar no cartorio do dito escrivão a quantia de 83:02:11, proveniente de custas liquidadas nos autos de inventario orfanológico procedido por óbito de Vamona Essó Porobo, que foi da mesma de Malebaga, ou dentro do mesmo praso nomear bens suficientes á penhora para o pagamento do pedido e de custas e sêlos acrescidos da execução, sob pena de não o fazendo ser a nomeação devolvida ao exequente M. P. prosseguindo se a execução seus termos á revelia. O que para ser público se expediu êste. Quepem, 23 de Março de 1931.

O escrivão do 2 ° oficio
Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar correm éditos de trinta dias a contar do dia da segunda publicação do respectivo anuncio intimando nos termos da segunda parte do artigo setecentos vinte e tres do Codigo do Processo Civil, os interessados Anondem, viuva de Loxeximona Naique, residente em Halguem de Karvar, Ganga e seu marido Balsú Pandú Naique de Sitar de Karvar, Ebunni e seu marido Balsú Custa Soil de Mazali de Karvar e Rigobá Lacximona Naique de Halguem de Karvar, todos em parte incerta da indicação dos herdêiros Locximona Naraina Naique e sua mulher Mogrem de Verodá pais da interessada falecida Darguem por outro nome Caxi, viuva de Babú Essó Naique que foi de Batpal de Canacona nos autos de inventario orfanologico requerido por óbito de Essó Naique e começado a prestar se do tronco comum de Zorgó Naique que fora de Batpal de Canacona em que é inventariante e cabeça de casal Custa Rogú Naique do mesmo lugar. O que para ser público se expediu ê-te. Quepem vinte e tres de Março de 1931.

O escrivão do 2 ° oficio
Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei
O Juiz de Direito
A. Colaço

Ano XVI) Quinta-feira, 21 de Maio de 1931 (N.º 8

O BHARAT

ANUNCIOS
Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

Não se aceita nenhum anuncio ou comunicado sem ser adiantado o seu custo provavel.

Jornal de maior circulaçao

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL
Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-08-00

REDACÇAO E ADMINISTRAÇAO
COMPOSICAO E IMPRESSAO
Tip. *BHARAT* Cusmane-Quépém

¡ ¿ Parte do Coraçao ? !

Comunica o telégrafo que numa entrevista o sr. Lord Irwin declarára que êle e a sua esposa deixaram na India uma parte do seu coração.

Para melhormente impingir conforme a táctica dos politicos, a amisade e a dedicação pela India, ainda com a maior dóse de hipocrisia e de fingimento, valia que precisasse qual é essa parte do coração: se um sexto, um quinto, quarto, metade ou dois terços.

De resto, gosou das honras magestáticas, soberbos vencimentos levantou, e foi se embora.

Não logrou, por certo, mistificar o pôvo indiano, êle que acarretou toda a responsabilidade de pelos gravissimos excessos, cometidos pela policia, matando e ferindo, cobarde e barbaramente, a gente desarmada, pois nem quando o sr. Gandhi, como principal condição da aliança, lhe propôz o rigoroso inquérito e a punição, sua exia. levado pelo autocratismo burocrático, negou se a praticar êsse acto de justiça e porisso em Londres recebeu uma condecoração.

Não desconhecia que na Europa e na América, sempre as revolções foram levadas a efeito, com as armas e com os homens do Govêrno, enquanto na India o pôvo só por si tratou de sacudir o jugo de opressão e tirania seculares, no legitimo direito de pugnar pela sua liberdade e pela sua pros

BEM-ESTAR ECONOMICO

Tomamos hoje a liberdade de traduzir para o nosso jornal o artigo de fundo da secção inglesa do nosso colega de Bombaim O ANGLO-LUSITANO, artigo que encara por uma forma clara e precisa o problema politico da India, distinguindo-se do geral dos escritos dos jornalistas goêses carateristicamente vagos e confusos.

Aproveitamos do ensejo para render a nossa homenagem ao redactor principal da secção inglesa do ANGLO-LUSITANO que desde ha muito vem combatendo com persistência pela causa da India definindo a sua posição ao contrário de muitos outros, sem subterfugios nem hesitações. E' verdade que não podemos dizer outrotanto dos que colaboram na secção portuguesa do mesmo jornal ou mesmo dos artigos da sua secção inglesa que não são da responsabilidade do seu redactor paincipal onde não è raro topar com manifestações dum espirito subserviente e duma mentalidade oportunista ou reaccionaria bem propria aos nossos patricios. Em vez do costumado frasedo abstracto e metafisico temos no seguinte artigo uma dedução clara e insofismavel da triste realidade dos factos.

Há sinais evidentes de que a classe trabalhadora vai tomando consciência de que é explorada pelos capitalistas seja ingleses seja indianos. O movimento da desobediência civica foi subsidiado pelos capitalistas indianos e é provavel que dêle rusulte uma concessão do govêrno autónomo, mas as massas receiam que o *Swarai* venha a ser apenas a substituição de novos donos pelos antigos. Se a independência representa apenas uma conquista de direitos politicos, ela não interessa á classe trabalhadora que mais aspira pelo bem estar económico. E' deveras significativo que os operários das fábricas de Bombaim respeitam mais a bandeira vermelha, simbolo do comunismo, do que a bandeira nacional. As condições de vida e trabalho da classe operária nos centros industriais criam um terreno propicio para a difusão das ideias comunistas. Os agitadores politicos que são inspirados pelo ensinamento dos comunistas europeus não hesitam em incutir aos operários a idêa de que a responsabilidade das tristes condições em que êles vivem cabe aos capitalistas. Os sindicatos operàrios criados nêstes últimos anos conseguiram organisar as massas embora essa organização deixe ainda a desejar no ponto de vista de unidade. Quando o *swaraj* triunfar é provavel que haja na India uma luta de classe entre os capitalistas e os trabalhadores.

E' sugestivo o facto de se invocar o bem-estar económico do país todas as vezes que se trata de salvaguardar os in-

peridade, mas sem vazar uma só gôta de sangue, o que não sucedeu com os povos que se consideram mais cultos, graças á civilisação que ao cristianismo se atribue, não obstante a sua propria propagação ter provocado ferocidade.

¿Não vemos o que acontece com o nosso Portugal essencialmente católico? Tão católico que a-despeito da sua angustiosa quéda financeira, substenta com enormes gastos o Padroado no estrangeiro!...

Mas, apezar desta e outras groriosas tradições, está fadado para interminaveis inclemências. Durante longos séculos da Monarquia guerras intestinas nunca faltaram. Mataram uns a outros, com intuito de arrancar o poder, dominar o paiz e absorver os seus recursos.

¡Pelo menos com a Rèpública cessasse essa ferocidadel Não. Logo depois de implantada, sacrificando inumeraveis vidas e derramando copioso sangue, não logrou manter a união, a paz e a harmonia, mesmo entre os proprios moventes.

Debalde as côrtes constituintes outorgaram a Constitúição Politica, lei fundamental, estabelecendo um poder supremo, intangivel, contra o qual não era permitido o menor assalto. Contudo, desde há menos de 20 anos, tres ditaduras militares o derrubaram, calcando-o aos pés!

Ora, se nenhum Govêrno constitucional medra, e para o salvamento nacional a Ditadura se impõe, pelo menos esta

—दीवचे गव्हर्नर सि. फोल्क्य हे सह-कुटुंब येथें आले असून कांहीं महिन्याचे रजेनें पोर्तुगालला रवाना होणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

—गेल्या रविवारीं कांसारपाल येथील श्रीकालिकेच्या देवालयांत नव्या कारभार कमेटीची निवडणूक व्हावयाची होती. परंतु कसलीशी अनपेक्षित भानगड उपस्थित झाल्यानें सदर निवडणूक पार पडूं शकली नाहीं, असें म्हणतात.

—कांसावली, कुवेली वगैरे गावांतून खादीप्रसाराचें काम जोरांत असल्याच्या वार्ता आहेत. हें काम खिस्ती पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालींच चालू असल्याचें नमूद करण्यास आनंद वाटतो.

हर्षातिरेकाचा परिणाम

पेडणेंचे तावेलियांव इरिनेव द कोस्त यांचा अकालीं व आकस्मिक अंत होण्यास हर्षातिरेक कारणीभूत झाला, असें आतां उघडकीस आलें आहे. इरिनेवाचे वडील केपें येथें तावेलियांव होते. त्याच जागीं कधींकाळीं आपली नेमणूक होईल असी त्याला कधींहि आशा वाटली नव्हती. म्हणून केपें येथें बदली झाल्याची व तीहि थेट आपल्या वाडिलांच्याच जागीं असं जेव्हां इरिनेवाला तारेनें कळलें तेव्हांच त्याला हर्षातिरेकानें पछाडलें. हर्षातिरेकानें तो वेडा बनला आणि अशा मनःस्थितींत नाना तऱ्हेचे चाळे करूं लागला. व उपरोक्त तारेच्या चवथ्या कीं पांचव्या दिवशीं हातांत पिस्तूल घेऊन खुद्द आपल्या बायकोशींच त्यानें तंटा उकरून काढून तिला ठार करण्याचा आव घातला. अशा स्थितींत तीनें आपल्या बेफाम नवऱ्याला सांवरून धरण्यासाठीं पोलिसांची मदत मागितली; पण पोलीस आपल्या चौकींत असतानांच इरिनेवाची स्वारी डाव्या हातांत कसल्याशा खिस्ती देवतेचें चित्र व उजव्या हातांत पिस्तूल घेऊन अकस्मात उपरोक्त चौकींत उपस्थित झाला. आणि त्याच्या एकंदर आविर्भावावरून तो आपला खून करण्याच्या विचारांत आहे, असें पोलीसकमांडरास वाटून, त्यानें तेथें नुकत्याच पोंचलेल्या एका 'भिकारो' नावांच्या पोलिसास इरिनेवावर बंदूक झाडण्याची आज्ञा केली. व या बंदुकीच्या एकाच गोळीनें तो जागच्याजागीं तावडतोब गतप्राण झाला. यावरून, इरिनेवाच्या मरणाशीं कसल्याहि कारस्थानांचा काडीमात्रहि संबंध नसून केवळ हर्षातिरेकानें तो आपल्या जिवास कायमचा अंतरला, हें स्पष्ट सिद्ध होतें. कावाच्या गोळीला तो बळी पडला नसून भिकारो नावांच्या पोलिसाच्या बंदुकीनें त्याचा जीव घेतला, अशी खरी बातमी आह्मांस आतां कळली आहे. हर्षातिरेकानें वेडे झालेल्या व्यक्तींची उदाहरणें कमी नाहींत. हर्षातिरेकानें मृत्यु आल्याचेहि अनेक दाखले मानवी इतिहासांत सांपडतात. 'अति तेथें माती' ही म्हण परिचित आहेच. दूध हें पेय उत्तम खरें, पण त्याचा अतिरेक ओकारी उत्पन्न करीत नसतो काय? तोच प्रकार इरिनेवाच्या हर्षातिरेकाच्या बाबतींत दिसून आल्यास नवल नाहीं.

जाहीर विनंति

काणकोण महालांतील सर्व सद्गृहस्थ व शिक्षणप्रेमी लोकांस या विनंतीद्वारा ता. २४।६ रोजीं संध्याकाळीं ४॥ वाजतां नगर्से येथें सरस्वती मंदिरांत शिक्षणसंस्थेबद्दल वाटाघाट करण्यासाठीं निमंत्रण करण्यांत येत आहे. सदर ऊहापोहार्थ भरणाऱ्या सभेस सर्वांनीं अगत्य हजर रहाण्याची मेहरबानी करावी.

नगर्से, ता. १४ मे १९३१

कार्यकारी मंडळातर्फे
शांताराम किनरकर

mericanos com mulheres e filhos, soltando tod s os mais alegres gritos, á medida que o fôgo ía cremando o negro corpo da vitima.

Não é, porêm, essa a primeira queima havida na *civilisada* pátria da Meyo, daquela célebre femea que disse cobras e lagartos do pôvo da India. De tempos em tempos, repetem-se aí *festas* analogas, com grande prazer dos *brancos*.

Civilisação que perpetúa a fatidica lembrança dos ominosos tempos inquisitoriais fica bem só aos senhores da América.

A India detesta uma semelhante *civilisação* que se extasia com as crueis torturas dos proprios de sua raça, da raça humana,—*civilisação* que tem os pretos na conta da *mais imunda coisa* dêste mundo.

Bôa civilisação—não há dúvida.

Um contraste

No Estado Nativo de Hyderabad realisou-se, há pouco, a 16.a Conferência Literaria da lingua marata. A assistência para as sessões da Conferencia foi mais numerosa do que a que houve nas efectuadas em Margão. Falou-se, ainda, nêlas um pouco de politica.

E é para admirar que, a despeito de, no mesmo Estado predominar a influência das autoridades mussulmanas, e, não obstante ser votada ao ostracismo a lingua marata que não é oficial, nem, porisso o Nijam entendeu imprimir o aspecto marcial a Conferência, como lho fizeram, o ano passado, no nosso paiz, os detentores das suas rédeas administrativas.

Para mais, note se que o Nijam não é tão *culto* como a Gôa que se alardêa de—*Roma do Oriente*.

Do que se conclue que o autocratismo que muitas vezes se dá nêste *paiz livre de cidadãos livres*, não se observa — nem a mais leve sombra dele — mesmo nas terras tidas como liberticidas.

———

"Pelos modos, nao ha o direito de abrigar a esperança de que as coisas de Goa tomem outro rumo..."

"As ilusoes derretem-se ao calor da realidade."

(Da "A TERRA" de 13 de Maio de 1931)

DURA LEX, SED LEX

Em parte alguma se fazem leis que não possam ser cumpridas. A possibilidade da execução é a condição *sine qua non* que em toda a parte preside á feitura duma lei. Em toda a parte—menos nas terras portuguesas. ¿Exagero? Não. Pois vão vê-lo.

O artigo 15.° do Dec de 25 de Outubro de 1926, publicado em suplemento ao *Boletim Oficial*, n.° 95, de 26 de Novembro do mesmo ano determina:

"...a partir de 1 de Outubro de 1930, os cargos de inspectores e administradores das circunscrições, de chefes de postos, *de administradores de concelho*, (o italico é nosso), de secretários de circunscrições e outros de categoria equivalentes, dos quadros coloniais, sejam providos exclusivamente por individuos diplomados com o curso geral colonial professado na Escola Colonial, dando-se preferência àqueles que além do referido curso possuam maior número de habilitações literárias e respeitando quaisquer disposições legais em vigor, que exigem para o provimento dos cargos acima, outros cursos ou habilitações, além do curso geral colonial."

E' o que diz a lei que está de pé. ¿Foi ela observada nas últimas nomeações de administradores de concelho? Se não ¿como é que o Govêrno pode evitar que actos praticados no exercicio de suas funcções por cidadãos cujas nomeações não são legais, sejam alegados de nulos? E ¿que é que fará o Govêrno se os respectivos jurisdicionados lhes negarem a obediência a êles—que estão fóra da lei?

Claro que não so nos apologistas da doutrina *salazariana* em que o Decreto se inspira. Como irmão gémeo do célebre *Acto Colonial*, êle merece-nos só a reprovação. Desde o momento, porêm, em que êle está em vigor—e para estar em vigôr foi êle feito—não se justifica que *se vá por cima dêle*.

¿E' inexequivel o Decreto? Revogue se pura e simplesmente. Antes disto, não o desprestigiem, calcando-o debaixo dos pés, seja a que titulo fôr.

E' que—*dura lex sed lex*—é um principio de que muito depende a estabilidade constitucional dum govêrno, seja qual fôr a sua forma.

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, ज्येष्ठ शु. ११ शी. शके १८५३

सत्य व अहिंसा

सर्वसाधारण जनतेची दानत शुद्ध व पवित्र बनल्याविना एकाद्या देशाची प्रगति होईल असें मानणें ह्मणजे अग्नीच्या सहवासांत शीतल छायेचा आस्वाद चाखण्याची लालसा बाळगण्यासारखें मूर्खपणाचें होय. ज्या राष्ट्राच्या मनांत आपली सर्वांगीण सुधारणा व्हावी, अशी आकांक्षा वसत असेल त्यानें प्रथमतः आपल्या जनतेची दानत सत्य व अहिंसा या दिव्यांतून तावून सुलाखून शुद्ध व पवित्र बनवण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. कारण सत्य व अहिंसा या उभय तत्वांची अनुभवी जाणीव ज्या लोकांना झालेली नसते ते उन्नतीचें वैभव उपभोगण्यास कधींहि व कोठेंहि पात्र होत नसतात, अशी इतिहासाची शिकवणूक आहे.

सुधारणेच्या वैभवगिरीवर आज विलसत असलेल्या राष्ट्राचा इतिहास वघितल्यास, आमच्या उपरोक्त ह्मणण्याची सत्यता कोणालाहि सहज पटेल. इंग्लंड आपला व्यापारी व्याप जगभर पसरवण्यास कसें समर्थ झालें? अमेरिका व्यापाराच्या बळावर कुवेरी श्रीमंतीचें भाग्य भोगण्यास कां पात्र झाली? महायुद्धाच्या वणव्यानें आपादमस्तक होरपळून गेलेली जर्मनी व्यापारी गतवैभव अल्पावधींतच पुनरेव हस्तगत करण्यास कशी 'नवजवान' बनली? आणि व्यापारी जगांत एका काळीं अत्यंत मागसलेला रशिया 'सत्य व अहिंसा' या तत्वांच्या जोपासनेस लागतांच, कसें डोकें वर काढूं शकला? या सर्व प्रश्नांचें उत्तर प्रस्तुत लेखाच्या प्रस्तावनेंतच वाचकांना आढळून येईल.

'सत्य व अहिंसा' या तत्वांचा जनतेच्या दानतेशीं निकटवर्ति संबंध असल्यानेंच, महात्मा गांधी सत्याची महति व अहिंसेचें श्रेष्ठत्व हिंदी जनतेंत मुरवण्यार्थ अविश्रांत झटत आहेत. आणि जोपर्यंत हिंदी जनता महात्माजींचीं उपरोक्त तत्वें आत्मसात् करून तदनुसार आपल्या आचाराची दिशा वदलणार नाहीं, तोंपर्यंत हिंदी राष्ट्र गत वैभव पुन्हा प्राप्त करण्यास कदापिहि समर्थ होणार नाहीं.

परसत्तेच्या पायी सहवासामुळें असो किंवा इतर दुसऱ्या कोणत्याहि कारणानें असो, सर्वसाधारण हिंदी जनतेची दानत आजला शुद्ध व पवित्र नाहीं, ही गोष्ट दुर्दैवानें खरी आहे. कोठेंहि जा, सुधारलेल्या राष्ट्रांत दिसून येणारा सच्चेपणा आमच्यांत दिसून येत नाहीं. नुसती व्यापारी बाबत घ्या. फाजील नफेबाजीला वळी पडून सत्याची गळचेपी व अहिंसेची हत्या करणें ह्मणजे आमच्या सर्व साधारण व्यापारी वर्गाचा हातचा मळ. कम अस्सल मालाचे गुण व किंमती फुगवून सत्यापरी सत्याचा खून करून, गिऱ्हाइकाच्या अंतःकरणाचीहि हिंसा करणें ह्मणजे कित्येक व्यापाऱ्यांना कांहींच नाहीं. आणि जो नियम व्यापारी बाबीस लागू आहे, तोच इतर गोष्टींसहि लहानमोठ्या प्रमाणानें लागू पडत असल्यानें, हिंदी जनतेची दानत पावित्र्यशून्य बनली असल्यास आश्चर्य नाहीं.

'सत्य व अहिंसा' यांचा योग्य मान न राखला गेल्यामुळें, हिंदी राष्ट्राची सर्व साधारण दानत शुद्ध राहिलेली नाहीं. व दानत शुद्ध नसल्यामुळेंच कसल्याहि प्रगतीच्या मार्गांत आमची उन्नति होत नाहीं. अपवादात्मक उदाहरणें वगळल्यास आमची उपरोक्त विचारसरणी अनुभवसिद्ध आहे, असाच कोणालाहि निश्चयात्मक कबुलीजवाब द्यावा लागेल. असो.

अर्थात् परसत्तेच्या मगरमिठींतून आह्मांस मुक्त व्हावयाचें असेल, परसत्ता झुगारली जाऊन तिच्या जागीं स्वसत्तेचा झेंडा फडकला जाण्याची तळमळ आमच्यांत उत्पन्न झाली असेल, आमच्या उन्नत्यर्थ आमच्यांत स्वार्थत्यागाची प्रवृत्ति पूर्णत्वानें जागृत झाली असेल, राजकीय मोक्ष गांठण्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि क्षुद्र भावनांनीं आमचें अंतःकरण काबीज केलें नसेल, आणि सत्य व अहिंसा या महात्माजींच्या तत्वांची खरी ओळख आह्मांस पटली असेल, तरच मात्र परसत्तेचा लय होऊन, परदास्यपंकांतून हिंदी राष्ट्राची कायमची मुक्तता होणार आहे.

तात्पर्य, जोंपर्यंत सत्य व अहिंसा या तत्वांवर आमची दानत उभारली जाणार नाहीं आणि आमच्या प्रत्येक कृतींत सत्य व अहिंसेची चमक चमकणार नाहीं, तोंपर्यंत हिंदी राष्ट्र वैभवगिरीचें शिखर गांठण्यास समर्थ होईल, अशी आशा करणें व्यर्थ होय. दानत सुधरा, सत्याचे पाय धरा, अहिंसेला नमन करा आणि मग तुह्मांला जें पाहिजे असेल तें हमखास प्राप्त होईल याची बालंबाल खात्री वाळगा. असाच हिंदी राष्ट्राला म. गांधींचा उपदेश आहे.

सत्य व अहिंसा या तत्वांवरच आमच्या खऱ्या सौख्याची गुरुकिल्ली अवलंबून आहे. हें अर्थात उघड होय.

—येथील मोटार व लॉरी यांची तपासणी सुरू असून, मोटारच्या नव्या कायद्यानें मालकांत खळबळ उडाली आहे.

इतस्ततः

महायुद्धाच्या वेळीं पदार्थांची किंमत वेसुमार वाढली असली तरी नाण्याचा भाव एकदम उतरला होता. यामुळें लोकांना व्यापारी वस्तूंची महागाई तितकीशी त्रासदायक झाली नाहीं. त्या वेळच्या तांदळांच्या तेजीचीच गोष्ट घ्या. कंट्रोलनें दर गोणाची किंमत २० रु. पर्यंत चढवली होती; परंतु देशांत नाण्याची मुबलकता नांदत असल्यानें, उपरोक्त भारी भावाचें जनतेला कांहींच वाटलें नाहीं तथापि आतां पदार्थांची किंमत मनस्वी उतरली असतांहि तीव्र नाणेभीडेची भानगड उपस्थित झाली असल्यानें, आर्थिक आपत्ति लोकांना ज्यास्त जाचक झाली आहे.

\+ + +

आर्थिक आपत्तीच्या तीव्रतेचें स्वरूप बदलण्याचें सामर्थ्य कोणाच्याहि आंगीं वसत असेल तर तें उद्योगधंद्यांच्या अभिवृद्धींतच होय, हें आज कोणास नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. आह्मांस लागणाऱ्या दरेक वस्तूची निर्मिती आमच्या देशांतच झाली तर तत्प्रीत्यर्थ परदेशांत जाणाऱ्या संपत्तीचा ओघ आपोआपच वंद पडून नाणेभीडेची बाधा आह्मांस भडावून टाकण्यास शकणार नाहीं. सध्याच्या जागतिक आर्थिक आपत्तीला तोंड देण्यासाठीं प्रत्येक देशानें याच उपायाचा अवलंब केला असल्यानें, तें तें राष्ट्र सुखांत असून आह्मीं मात्र उपासमारीच्या विवंचनेनें दुःखित झालों आहोंत. पण नुसतें दुःख करून काय उपयोग? उद्योग धंद्यांच्या वाढीनें राष्ट्राची आर्थिक कुवत सामर्थ्यवान बनवण्याच्या मार्गास लागल्यास च सांप्रतच्या कठीण स्थितींतून आमचा निभाव लागणार आहे.

× × +

अशा दृष्टीनें रा. गजानन गो. कारापूरकर यानीं आरंभिलेला सावणाचा धंदा प्रशंसनीय आहे. रा. कारापूरकर यानीं डिचोली येथें वनस्पतीच्या निर्मळ तेलापासून सावण तयार करण्याचा कारखाना स्थापन केला असून, त्यांतून उत्पन्न होणारा सावण किंमत व गुण या दोन्हीं दृष्टीनीं तो लोकाश्रयास पात्र आहे. सदर सावणाची बरोबरी विलायतेंतील तत्सम सावणाशीं होत नसली तरी आमची गरज भागवण्याची पूर्ण ताकत त्यांत आहे. स्वदेशीच्या या युगांत दुसरें तरी आह्मांला काय पाहिजे? अल्प मोलांत पण योग्य रीतीनें आमच्या गरजा भागवणारे स्वदेशी पदार्थ आह्मांस बस्स आहेत आणि ह्मणूनच कारापूरकरांचा उपक्रम आह्मांस अभिनंदनीय वाटतो.

× + +

कारापूरकरांनीं सावणाचा कारखाना उभारून उद्योगधंद्याच्या प्रगतीस ज्याप्रमाणें हातभार लावला, त्याच प्रमाणें इतर तरुणांनीहि निरनिराळे उद्योगधंदे स्थापून देशाची सांपत्तिक स्थिति सुधरण्यास मदत करणें रास्त आहे. अशानें आमच्यांत बोकाळलेली 'नोकराळ' वृत्ति नष्ट होऊन व स्वतःच्या पायावर उभें राहण्याची प्रवृत्ति वृद्धिंगत होऊन स्वाभिमानाचा प्रसार साहजिकच होणार आहे. आणि स्वराज्यप्राप्तीच्या चळवळींत स्वाभिमानाचा दर्जा अतिशय उच्च असल्यानें, उद्योगधंद्यांच्या अभ्युदयांतच स्वराज्यप्राप्तीचें वीज अंतरभूत आहे, असें सहज सिद्ध होतें.

\+ + +

श्री. दिनकरराव शंकरराव जवळकर यांच्या नेतृत्वाखालीं 'तेज' नावांचें साप्ताहिक मुंबई येथें प्रसिद्ध व्हावयास लागलें असून, त्याचे आजपर्यंत उजेडांत आलेले तीन अंक आह्मीं वाचले. सदर पत्र महाराष्ट्र शेतकरी वर्गाचें मुखपत्र असल्यानें, त्यांतून शेतकऱ्यांच्या हितसंबंधाच्या चर्चेस विशेष प्राधान्य देण्यांत असल्यास नवल नाहीं. तें साहजिकच आहे. 'तेज' पत्रांतून प्रचलित राजकारणाचाहि ऊहापोह होत असून तेजस्वी विचारसरणी व चित्ताल्हादक छपाई या गोष्टींमुळें तर तें लोकांचें अंतःकरण काबीज करण्यास समर्थ होईल, असें आह्मांस वाटतें. दे. जवळकरांनीं लोकहितासाठीं अनेक कष्ट सहन केले असून, त्यांच्या देशप्रेमी हृदयाची प्रभा 'तेजां'त फांकत असल्यानें 'तेज' शतायु होईल, अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे.

—खानापूर येथें प्रसिद्ध होणाऱ्या मासिक 'लोकमित्रा'ची दिवसेंदिवस होत असलेली प्रगति पाहून आह्मांस त्याचे तपस्वी संपादक रा. सडेकर यांचें करावें तितकें कौतुक थोडें वाटतें. 'लोकमित्रां'तून गोमांतक विषयक गोष्टींस वाहिलेला २१४ पृष्ठें मजकूर प्रसिद्ध होणार असून, अंतरंगांत तसेंच वाह्यांगांतहि महत्वाच्या नव्या सुधारणा करण्यांत येणार आहेत. अशा स्थितींत गोमांतकीय साहित्यभक्तांनीं 'मित्रा'ला मदत करणें त्यांचें कर्तव्य होय.

गोष्टीरूप गोमांतक

[ले. गो. कृ. नाईक]

गोष्ट दहावी.

सैतान की साधु ?

क्रूस, तागडी व तरवार ह्या अनुक्रमानें पाश्चात्यानीं पौवात्यदेश पादाक्रांत केल्यामुळें धर्मप्रसारक फ्रांसिस्कु शाव्हियर यांची हकिगत देणें अप्रस्तुत होणार नाहीं.

तिसवाडी महालाखेरीज सासष्टी आणि बारदेश महाल पोर्तुगीज सत्तेखालीं आल्यावर इ. स. १५४१ सालीं फ्रांसिस्कु शाव्हियरानें गोमांतकांत प्रवेश केला. नाटकांतील विदुषकाची ज्या उत्सुकतेनें आपण मार्गप्रतिक्षा करितों त्याच उत्कंठतेनें त्याचें गोमांतकांत स्वागत होऊं लागलें.

O municipio de Satari teve a infeliz inspiração de envolver na sua rêde tributaria o gado— elemento tão indispensavel á agricultura.

Os satarienses ficaram desgostosos com a nova imposição e pretenderam, em massa, entrevistar o sr. Administrador do concelho para, contra ela, reclamar, ordeiramente. Mas, ao que parece, a multidão causou indignação na autoridade que, por um seu agente, fez dissolver o ajuntamento popular, como desfazer uma reunião havida em casa do sr. Raugi Ranes, sôbre o mesmo assunto.

E' o que nos escreve um correspondente de Satari que informa, tambem, que sôbre o novo imposto foi dirigida uma representação ao Govêrno da Provincia.

E' pobre a gente de Satari. E' a razão por que o govêrno tem-lhe concedido várias regalias com as quais contrasta a criação do novo imposto municipal.

De esperar, porisso, é que os competentes a livrem do peso do novo tributo.

O "atestado"

O novo Código das Estradas determina que os condutores das viaturas automoveis apresentem o atestado passado pela Junta de Saude em vez do do delegado de saude da respectiva área.

Ignoramos o que motivou essa inovação que se torna onerosa áquela classe, tanto pelo lado da despesa como pelo da maçada.

E', porisso, caso para dizer: *a emenda saiu pior do que o soneto.*

Nêstas condições ¿não é bem avisado que o atestado do delegado de saude se restabeleça?

प्रो. गो. गार्सीय द सील्व्ह इत्यादि ख्रिश्चन मंडळीहि उपस्थित होती. स्थानिक मंडळीहि गावांत दोन प्रमुख गृहस्थांच्या घरीं लग्नस मारंभ असतांहि नेहमीपेक्षां कल्पनेबाहेर आधिक उपस्थित झालेली दिसत होती. या समारंभास प्रमुख हिंदु भागिनीहि उपस्थित असलेल्या दिसत होत्या. ही गोष्ट नवीनच होती. प्रथम ४ वाजतां श्रीदामोदरमंदिराकडून बँडसह वालचरपथकाची मिरवणूक निघाली. नंतर अध्यक्ष व श्रीमंत दामोळकरादि पाहुणे मंडळी श्रीदामोदर विद्याभुवनाच्या प्रवेशद्वाराजवळ आल्यावरोवर बँडच्या सुस्वर वादनांत वालचरांकडून त्यांना सलामी देण्यांत आली. नियोजित अध्यक्ष व पाहुणे स्वस्थानी विराजमान झाल्यावर विद्यालयीन मुलींकडून ईशस्तवन व स्वागतपरपद्यांचें गायन झालें. संस्थेच्या शिक्षणमंडळाचे चिटणीस श्री. यशवंत विष्णु पै रायतुरकर यांनीं वृत्तांत वाचून दाखविला. [वृत्तांताचा सारांश सवडीनुसार प्रसिद्ध होईल] व त्याचा पोर्तुगीज सारांश मंडळाचे सभासद श्री. नरसिंह दामोदर नायक यांनीं वाचून दाखविला. नंतर पास झालेल्या मुलांमुलींस अध्यक्षांच्या हस्तें पुस्तकें बक्षिस वाटल्यानंतर अध्यक्षांनीं आपल्या भाषणाचा मुख्य सारांश सांगितला (अध्यक्षांचें भाषण गोमंतकास शिक्षणविषयक नवमार्गदर्शक असल्यानें त्यांतील महत्त्वाचा भाग पुढील एका अंकीं देण्यांत येईल] पुढें वालचरांनीं लेझीमचे खेळ करून दाखविल्यावर मुलींनीं 'ध्रुव–तपस्या' ही नाटिका प्रयोग करून दाखविला. शेवटीं भगवा झेंडा गीतगान, आभारप्रदर्शन होऊन समारंभ पूर्ण झाला असें एक 'वार्ताहर' कळवितो.

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, मानवी उन्नतीचें काय किंवा राष्ट्रीय उन्नतीचें काय, विद्याव्यासंगाखेरीज कसलीच प्रगति साध्य होणें शक्य नाहीं.

जसजसा विद्याप्रसार मोठ्या प्रमाणानें होत जाईल तसतसी जनतेला स्व–स्थितीची जिवंत जाणीव होत जाईल. परकीय लोखंडी सत्तेचें जूं आमच्या मानगुटीवर जखडलें गेलें असल्यानें आमच्याच राज्यांत व आमच्याच घरांत आह्मीं परकीयांचे नोकर कसे बनलों आहोंत, याचें प्रत्यक्ष ज्ञान विद्याप्रसारानें सर्वत्र फैलावणार आहे. एवंच, विद्याप्रसारानेंच सत्वजागृति होणार असून परसत्ता लाथाडून टाकण्याचें सामर्थ्य आमच्यांत उत्पन्न होणार आहे.

तात्पर्य, विद्येची महती गावी तितकी थोडी आहे. ह्मणून विशेष चर्चा करण्याच्या भानगडींत न पडतां, येथील विद्यार्थ्यांस माझा असा उपदेश आहे कीं, मुलानो, तुह्मीं विद्वान व्हा व परदास्यांत कुजत पडलेल्या आमच्या देशास स्वतंत्र करण्याच्या प्रतिज्ञा करा. स्वतंत्रतेविना आमची उन्नति होणें कदापि शक्य नाहीं. पोटभर अन्न व देहभर वस्त्र सुद्धां मिळण्याची पंचाईत करून ज्या परसत्तेनें पराकाष्टेची दुःस्थिति निर्माण केली आहे, ती परसत्ता नष्ट झाल्याखेरीज आमच्या उन्नतीचा मार्ग मोकळा होणें शक्य नाहीं. तेव्हां, विद्या संपादून सर्वांआधीं जी एक गोष्ट आह्मीं करणें जरूर आहे, ती हीचः परसत्तेला झुगारून देण्यासाठीं सतत झटणें. परसत्ता बलवान आहे. पाशवी आहे. दुष्ट आहे. अर्थात स्वसंरक्षणार्थ तिच्या हातून तुह्मांला अनेक प्रकारचे त्रास होणार आहेत. परंतु त्या सर्वांस तोंड देण्यासाटीं निधड्या छातीनें व निःस्वार्थी भावनेनें तुह्मीं तयार असलें पाहिजे. सरकार तुह्मांविरुद्ध खटले भरील. कारागृहांत कोंडून तुमचा अवसानघात करण्याची कारवाई करील. भले लट्ठ दंड लादून तुह्मांला भिकारी बनवण्याचा प्रयत्न करील. परंतु या सर्व छलांची व कष्टांची तमा न बाळगतां तुह्मीं परसत्तेची रग जिरवण्यासाटीं विद्येच्या जोरावर एका पायानें तयार असलें पाहिजे. विद्या शिकावयाची ती याच साटीं. विद्येनेंच तुह्मांला सत्य, निर्भयता व आहिंसा या त्रयींचें अजिंक्य सामर्थ्य समजून देशोद्धारार्थ तुमच्यांत तळमळ उत्पन्न होणार आहे आणि ही तळमळच स्वदेशाला परदास्यांतून विमुक्त करण्यास लागणारी कार्यक्षमता तुमच्यांत उद्भूत करणार आहे.

––मद्रास इलाख्यांतील एक वैदिक ब्राह्मण नऊ वर्षांचे असतानां [खिश्चन] बाटले. त्यांचा शुद्धीविधि ता. २८।५।३१ रोजीं मसूर येथें करण्यांत आला. त्यांचें पूर्वीचें नांव जॉन असें होंतं. नवीन नांव श्रीपेरीशास्त्री रमणअय्या विंजनमुरी असें टेवण्यांत आलें आहे.

साहित्य-समुद्र-मंथन.

किर्लोस्कर मासिक

उद्योग, उत्साह व उत्कर्ष यांचें हें मासिक रा. शंकर वा. किर्लोस्कर यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होत असून त्यांतील तेजस्वी व ओजस्वी लिखाणामुळें तें दिवसेंदिवस ज्यास्तच लोकप्रिय होत आहे. नाउमेद व हताश बनलेल्या जिवंत चेतना उत्पन्न करण्याची किर्लोस्कर मासिकाची धडाडी वाखाणण्यासारखी होय. महाराष्ट्र शारदोपासकांतील नाणावलेल्या लेखकांचें सदर मासिकाला सहाय असल्यानें, त्याचा दर्जा चढूं लागला असल्यास आश्चर्य नाहीं.

दैववादाचें समूळ उच्चाटन होऊन त्याची जागा प्रयत्नवादानें भरून निघावी एतदर्थ किर्लोस्कर मासिक सतत झटत असतें. परंतु हा त्याचा प्रयत्न कितपत यशस्वी होईल हा एक प्रश्नच आहे. कारण दैववाद व प्रयत्नवाद हे 'वाद' फार पुरातन काळापासून एकसारखे चालत आले असून त्यांचा अजून निर्णय लागलेला नाहीं व पुढें कधींहि लागेल असेंहि वाटत नाहीं. ह्मणजे दैव श्रेष्ट कां प्रयत्न श्रेष्ट हें अजून सिद्ध झालेलें नाहीं. ज्याप्रमाणें दैवाचा ' उदो उदो ' करणारा एक पक्ष आहे त्याचप्रमाणें प्रयत्नाचीच पूजा करणाराहि एक दुसरा पक्ष आहे. आणि दोन्हींहि पक्ष सारखेच तुल्यबल असल्यानें समरांगणांत–वादांत– ते सारखेच पराक्रमी ठरत असतात.

असो. किर्लोस्कर मासिकाकडून आचरली जात असलेली लोकसेवा महत्वपूर्ण असल्यांनं त्याला जनतेकडून नेहमींच प्रोत्साहन मिळेल, अशी आह्मांस निश्चिति आहे.

पतितपावन माला

शु. रामचंद्र नारायण लंवदे हे प्रस्तुत मालेचे संपादक व मालक असून सांगें येथील 'संगमोदय' छापखान्यांतून तीचें मुद्रण होत असतें. प्रकाशनाचें स्थान रायबंदर हें होय. रा. उष्णो कृष्ण पै हे कायदेशीर प्रकाशक असून आजपर्यंत मालेचीं दोन पुष्पें उजेडांत आलीं आहेत.

ज्यावेळीं चिंबल येथें शुद्धिकार्याची मुहुर्तमेढ रोवली गेली त्यावेळीं आह्मीं असें विधान केलें होतें कीं, शुद्धि घडवून आणण्यापेक्षां ती पचवण्याचें कार्य विशेष कठीण आहे. आणि दुर्दैवानें अल्पावधींतच शुद्धिकार्य भयंकर वादाच्या वावटळींत सांपडून त्याच्या चिंधड्या झाल्याचें भेसूर दृश्य दृष्टीसमोर ठाकल्यानें, आमच्या उपरोक्त ह्मणण्याचा प्रत्यय आला. आमच्यांतील अंतःकलह शुद्धिकार्याच्या तंगड्या मोडूनच स्वस्थ राहिला नाहीं. शुद्ध झालेल्या नवहिंदूंची परिस्थितीहि दिवसेंदिवस कंटकमय बनवण्याचे कामी धन्यता मानूं लागला ! कारण आमच्यांतील झगड्यांचा फायदा काढण्याच्या लालसेनें खिस्ती धर्माधिकारी नवहिंदूंना छळूं लागले व त्यांना फिरून आपल्या 'कळपां'त ओढण्याची कारवाई करूं लागले. अशा बिकट प्रसंगीं केवळ नवहिंदूंच्या हितार्थ वाहिलेल्या एकाद्या नियतकालिकाची अत्यंत आवश्यकता होती. ती पतितपावन–मालेनें भरून काढली आहे, असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

मालेच्या प्रकाशनानें नवहिंदूंची हालहवाल जगजाहीर होणार असल्यानें, त्यांच्या अडचणी सहजच वेशीवर टांगल्या जातील. त्यांच्या त्रासांची जनतेला जाणीव होऊन, ते दूर करण्याची प्रवृत्ति लोकांत उत्पन्न होईल. एवंच, माला शुद्धिकार्याला प्रोत्साहक होणार असल्यानें तिचा उपक्रम अभिनंदनीय ठरतो. आणि अशा या अभिनंदनीय उपक्रमाचें जनकत्व खुद्द शु. लंवदे यांनाच लाभलें असल्यानें हिंदुसमाज त्यांना पूर्ण पाठिंबा देऊन पतितपावन माला दीर्घकाल टिकवील, असा आह्मांस भरवंसा वाटतो. मालेसंबंधीं 'केसरी'नें खालील अभिप्राय नमूद केला आहेः–

"गोमांतकांत जें प्रचंड शुद्धिकार्य झालें, त्याची पूर्वतयारी व नंतर जोपासना करणारे शुद्धिवीर श्री. रामभाऊ लंवदे यांनीं पतितपावन नावांची एक माला सुरू केली आहे. पतित झालेल्यांस योग्य मार्ग दाखविणें, व पावन झालेल्यांस समाजांत आत्मीय भावानें स्थिर करणें हा या मालेचा प्रधान हेतु आहे. या मालेंत सनातन धर्माची शिकवण देण्यांत येणार असून प्रथम अंकावरून तो उद्देश सफल होईल असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुसमाजाची आजची स्थिति काय आहे, परकीय समाजाचें त्यावर आक्रमण कसकसें झालें, याचीहि माहिती देण्यांत येत असून हिंदुधर्माची शिकवण कशी ओजस्वी व तेजस्वी आहे हें त्यांत दाखविण्यांत येतें. मालेचा हेतु अत्यंत स्तुत्य असून हिंदुधर्माभिमानी तीस आश्रय देतील अशी आशा आहे."

मालेचें वैभव वृद्धिंगत होवो, अशी परमेश्वरापाशीं करुणा भाकितों.

प्रगति

मुंबईच्या सु–प्रसिद्ध कर्नाटक प्रेसचे मालक रा. नाडकर्णी यांच्या मालकीचें व रा. शेजवलकर, बी. ए. संपादक असलेले हें साप्ताहिक भारतास प्रतिभेट देऊं लागल्याबद्दल, भारत त्या उभय साहित्यभक्तांचा आभारी आहे.

गोमांतकीय लेखकांचें व गोव्याचे हितसंबंधाचे लेख 'प्रगतीं'तून प्रसिद्ध होत असल्यानें गोमांतकांत 'प्रगती'चा बराच प्रसार असल्यास नवल नाहीं. 'प्रगती'चें प्रागतिक धोरण व निस्पृह बाणा–हीं अभिनंदनीय होत. परिस्थितीला सर्वस्वी अनुरूप, अशीचें 'प्रगती'ची एकंदरींत सजावट आहे.

वर्तमान सार

—सत्तरी–नगरपालिकेनें गुरांवर बसवलेला कर लोकांस नावडून त्याविरुद्ध तोंडीं तक्रार करण्याच्या इराद्यानें त्यानीं मामलेदारांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. सुमारें ३५० व्यक्तींचा समाज मामलेदार कचेरी समोर जमला होता. पण एका निमगोऱ्या सार्जंटाच्या अरेरावीनें उचल खाल्यानें लोकांना मामलेदाराशीं संभाषण करणें अशक्य झालें. संभाषणाचा योग श्रीयुत जोकु वकिलांमार्फत घडवून आणला. मामलेदारांनीं गव्हर्नरसाहेबांस अभ्यर्थना करण्याची इशारत दिली. या विचारासाठीं मंडळी मावळींगें येथील श्री. रावजीसाहेब राणे यांच्या येथें जमली असतां, एकाएकीं "धरा, पकडा, बांधा" अशी ओरड ऐकूं आली आणि भर सभेतून राणे यांस मामलेदारांसमोर खेंचण्यांत आलें. पण राणे तेथून सुखरूप परत घरीं आले. नंतर रा. नागेश नोविंद जोशी व आपा गांवकार यानीं सत्तरीतर्फे अर्ज सरकारांत दाखल केला आहे. असें रा. दत्तात्रय ग. जोशी हे कळवितात.

—पणजी रेलासावांचे ग्वार्दमोर सि. फिलांद्र कारवाल्य यांच्याविरुद्ध करण्यांत आलेल्या आरोपांची चौकशी चालू आहे.

—पावसाळा सुरू झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

—सत्तरी महालांत सि. मोराईस नावांच्या एका युरोपियन ऑफिसरची नेमणूक झाली आहे.

––दीवचे गव्हर्नर फेयु फोल्क्य हे गेल्या मंगळवारीं गोव्यांतून बाहेर पडले.

—"मडगांव येथील **मठग्रामस्थ हिंदुसभेच्या श्रीदामोदर विद्यालयाचा बक्षिस समारंभ** ता. २ जून १९३१ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां, **गोमांतकीय हिंदुसभेचे** अध्यक्ष गोवा कायदेमंडळाचे माजी सभासद असे जे श्री. **रामचंद्र पु. केंकरे** (लोलेंबाव) यांच्या अध्यक्षतेखालीं श्रीदामोदर विद्याभुवनांत मोठ्या थाटानें, शिस्तीनें आणि उत्साहानें साजरा झाला. ह्या समारंभास गोमांतकाचे अभिमानी मुंबईचे श्रीमान नागरिक श्रीमंत **लक्ष्मीकांत शांताराम दाभोळकर** हे आपल्या सौभाग्यवतीसह मुद्दाम हजर राहिले होते. शिवाय श्री. विष्णु रंगाजी शेळडेकरांसारख्या विद्वान हिंदु पाहुण्याप्रमाणें

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा॥

गुरुवार, अ. ज्येष्ठ शु. ३ या शके १८५३

हें कसलें राजकारण ?

गोमांतक प्रांत हा पोर्तुगालचाच एक अविभाज्य भाग आहे, आणि पोर्तुगालदेश हाच आपला मायदेश आहे, अशी जी कल्पना येथील राजकारणांत पूर्वीपासून रूढ आहे, तीचें स्वरूप अजून नष्ट झालेलें नाहीं. आणि उपरोक्त समजूत अजून विद्यमान असल्यानें 'सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी संपादून स्वताचा व स्वपक्षीयांचा तळिराम गार करून घेणें' हा जो एकदां राजकारणाचा अर्थ होऊन बसला होता, तोच आजपर्यंतहि कायम आहे. गोष्ट खरी कीं, गोमांतक प्रांत हा पोर्तुगालापासून अलग होऊन स्वायत्त झाला पाहिजे अशा विचारसरणीचा एक अभिनव पक्ष गोमांतकांत उत्पन्न झाला असून तो आपल्या मतांचा उघड प्रचार करीत आहे. पण तो तत्वनिष्ठ असल्यानें गोमांतकीय विद्यमान राजकारणांत मुळींच भाग घेत नाहीं. परसत्तेनें जनतेंत उत्पन्न केलेली स्वाभिमानशुन्यता नष्ट होऊन तिच्यांत उज्वल स्वदेशाभिमान निर्माण व्हावा, एतदर्थच या नव्या पक्षाचा पराकाष्ठेचा प्रयत्न सुरू आहे.

बाकी राहिलेल्या पक्षांचा कावा काय असतो याचें भारतांतून अनेकदां दिग्दर्शन झालेंच आहे. हरतऱ्हेच्या डावांनीं सरकारची कृपा संपादून अधिकाराच्या जागा हस्तगत करणें व त्या निसटून न जाण्यासाठीं सरकाराच्या प्रत्येक बऱ्यावाईट कृत्यांची सत्यास त्याचा विचार न करतां एकजात तरफदारी करणें— हा एका पक्षाचा ' राजकारणी कार्यक्रम ' ठरलेला असतो तर एकजात सरकारला विरोध करणें हा दुसऱ्या पक्षाचा प्रोग्राम निश्चित झालेला असतो. सरकारची मर्जी संपादण्याची आशा कायमची फोल ठरल्यानंतरच ' एकजात विरोधी ' पक्ष अवतीर्ण होत असतो हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. "राजकारण करावें । आणि पोट तुडुंब भरावें ॥" असें ज्या 'राजकीय' आक्रमणाचें स्वार्थी ध्येय असतें तीनें देशोन्नति कशी होईल ? स्वदेशासाठीं आत्मयज्ञ करण्याची भावना जनतेंत कशी उद्भूत होईल ? आणि दीर्घकालीन परसत्तेनें जनतेंत उत्पन्न केलेली म्याडवृत्ति अधोगतीस जाऊन देशोद्धारार्थ आवश्यक असलेली निर्भयता कशी फोंफावेल ?

विशेष दुःखाची गोष्ट ही कीं, लोकपक्षाची बाजू सरकारासमोर मांडण्यासाठीं ह्मणून ज्या इसमांची विधिमंडळाच्या गणंगाचे जागीं निवड झालेली असते, तेच गृहस्थ सरकारी ' पॉलीसी'शीं समरस होऊन स्वताचा किंवा स्वकीयांचा स्वार्थ साधण्यास नेहमींच एका पायानें तत्पर असलेले दिसतात ! अशा स्थितींत लोकपक्षाचें अस्तित्व केवळ नाममात्रच बनून, सरकारला हवें तसें वागण्यास सर्व मैदान मोकळेंच मिळत असल्यास आश्चर्य आहे काय ?

मग, गोमांतकांतील जुन्या परंपरेच्या ' राजकारणा'स ' पोटकारण ' हेंच नांव विशेष सार्थ होतें, असें जें आह्मीं नेहमीं ह्मणतों, त्यांत अतिशयोक्ति कोठें राहिली ? ' पोटकारण ' हेंच विशेषण प्रस्तुतच्या राजकारणाला लागू होतें हें अर्थात उघड होय. आणि ह्मणूनच अशा स्वार्थी राजकारणाला मूठमाती देण्याच्या निर्धारानेंच अभिनव पक्षाला जन्म दिला असून भारतांतून त्यानें आपलें ध्येय जगजाहीर केलें आहे. जुन्या राजकारणाशीं चालू असलेल्या झगड्यांत भारताला अनेक कष्ट सहन करावे लागत असतात ही गोष्ट खरी असली तरी अखेर विजयाची माळ आपल्याच गळ्यांत पडेल या श्रद्धेनें त्याला त्यांचें कांहींच वाटत नाहीं, हें येथें नमूद होणें इष्ट होय.

इतस्ततः

कुंभारजुवें येथील शारदा विद्यालयाचा प्रवेश गेल्या दिवसांमागें स्वताच्या इमारतींत झाल्याचें कळविण्यास आनंद वाटतो. हा समारंभ पणजीचे सु-प्रसिद्ध उद्यमभास्कर श्री. पुंडलीक अनंत केणी यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें पार पडला. इमारतीची कल्पना मूर्त स्वरूपांत उतरेपर्यंत शारदाविद्यालयाच्या चालकांस किती निरपेक्ष स्वार्थत्याग करावा लागला व किती त्रासक दगदग सहन करावी लागली असेल, याची आह्मांस पूर्ण जाणीव असल्यानें, त्यांचें करावें तेवढें कौतुक आह्मांस थोडेंच वाटत आहे. गोमांतकांतील नामांकीत मराठी शिक्षणसंस्थांपैकीं शारदा विद्यालय ही एक संस्था आहे. अशा उपयुक्त संस्थेला स्वताच्यां इमारतीमुळें स्थैर्य प्राप्त झाल्याबद्दल भारतास आनंद वाटत असून विद्यालय चिरस्थायी व्हावें, अशी त्याची परमेश्वराला हार्दिक प्रार्थना आहे.

\+ × +

महारवाडा, काकोडें येथील अस्पृश्योद्धाराची चळवळ कार्यक्षम करण्याच्या उद्देशानें या चळवळीचे मुख्य आधारस्तंभ जे रा. विनायक वामन करगुप्पीकर व भास्कर वामन गोखले हे अविश्रांत झटत आहेत. त्यांच्या निःस्वार्थी खटपटीमुळें सदर महारवाड्यांतील चौखामेळा विद्यालय अखिल गोमांतकांतील अस्पृश्यांचें शिक्षण केंद्र बनण्याच्या बेतांत आलें असून, गोमांतकीय अस्पृश्यांत अशक्य वाटणारा शिक्षणप्रसार प्रत्यक्ष सृष्टींत लवकरच उतरलेला पहाण्याचें भाग्य आह्मांस लाभणार आहे. करगुप्पीकर व गोखले या उभय तरुणानीं ठरवलेल्या अस्पृश्योद्धाराच्या योजनेस भारताचा पूर्ण पाठिंबा असून, शक्य त्या रीतीनें त्यांस सहाय्य करण्याचें तो जाहीररीत्या अभिवचन देत आहे.

\+ × +

डिचोलीच्या प्राथमिक शाळेच्या उन्नत्यर्थ तेथील शिक्षणप्रेमी तरुण रा. वासुदेव शे. कडकडे यानीं व्यक्त केलेल्या अनुकरणीय चिकाटीमुळें ते लोकांच्या अभिनंदनास पात्र आहेत. त्यांच्या स्वाक्षरीनें प्रसिद्ध झालेलें प्रतिवृत्तच त्यांच्या धडाडीची पूर्ण साक्ष देत असल्यानें, त्यांच्या कार्यासंबंधीं आह्मीं विशेष तें आणखी काय लिहिणार ?

एक उपयुक्त सूचना.

[श्रीदामोदर विद्यालय—मडगांव, गोवा या संस्थेच्या बक्षीस समारंभाचे अध्यक्ष या नात्यानें श्री. रामचंद्र पुंडलीक केंकरे यांनीं केलेल्या सारांशरूप निवेदनाचे महत्वाचे मुद्दे भारताच्या वाचकांकरितां महत्वाचे व मननीय असे असल्यावरून पुढें देत आहों.]

अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत आरंभीं, स्थैर्य, प्रगति आणि शिक्षणाचा व्याप इ. दृष्टीनें श्रीदामोदर विद्यालयाचें अग्रेसरत्व असल्याचें सांगून समारंभास उपस्थित असलेल्या श्रीमंत दामोळकरांची विद्याप्रसारप्रियता वर्णन केली व ते ह्मणाले, आपल्या गोमांतक प्रांतानी प्राथमिक, दुय्यम, वरिष्ट आणि विशिष्ट शिक्षणाचीहि स्थिति फार कष्टप्रद झालेली आहे. ज्ञानाप्रमाणेंच पोटाचा प्रश्न सोडविण्याच्या कामीं शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे. जगांतील सुशिक्षितांच्या वाढत्या बेकारीला विशिष्ट परिस्थितीमुळें गोमांतकांतील प्राथमिक शाळांतहि—अल्प प्रमाणांत कां होईना—आळा घालण्याच्या उद्योगास लागलें पाहिजे. बेकारीला आळा घालण्याला मुख्य उपाय ह्मणजे धंदे शिक्षणाचा प्रसार करणें. हें कार्य सरकार व मुनिसिपालट्या यांनीं हातांत घ्यावयाचें. पण त्यांच्याकडून तें आज केलें जात नाहीं आणि केलेल्या प्रयत्नाला सरकारच्या विशिष्ट धोरणामुळें—महत्वाच्या विषयांनाच गौणत्व दिलें गेल्यानें— यांचें तसें यश येत नाहीं. अर्थात प्राथमिक मराठी शाळांतून धंदे शिक्षणाची सोय करणें आवश्यक झालें आहे.

पण धंदे शिक्षण ह्मणजे केवळ हातकामाचें शिक्षण असा अर्थ या ठिकाणीं केला नसून, पेढ्यांवरील कारकुनी; खेड्यांत शिक्षणप्रसार; नारळ, सुपारी इ. च्या खरेदी विक्रीचें ज्ञान; निरनिराळ्या प्रकारची एजन्सी, टायपिंग इत्यादि आवश्यक व सोप्या कामांचाहि त्यांत समावेश केला पाहिजे.

पोर्तुगीज शाळांतून मिळालेलें शिक्षण भाषाज्ञान या एका गोष्टीशिवाय इतर दृष्टीनें व्यवहारांत निरुपयोगी ठरलें आहे; मराठी —इंग्रजी शाळांत विद्यार्थ्यांना गोमांतकासंबंधीं ज्ञान मिळत नाहीं. शिक्षणाच्या विशिष्ट पद्धतीमुळें बेकार फिरून कर्जबाजारी होणें पतकरलें पण वरील धंदे करणें नको अशा प्रकारची सुशिक्षितांची मनोवृत्ति होऊन बसली आहे. आपल्या प्रांतांतील या विद्यालयाप्रमाणेंच ह्यापशेंच्या सारस्वत विद्यालय व ज्ञानप्रसारक मंडळीचें विद्यालय या संस्था; पणजीच्या मुष्टिफंड संस्थेच्या शाळा; कुंभारजुवेंचें शारदा विद्यालय, डिचोलीचें शांतादुर्गा विद्यालय, फोंड्याचें आल्मैद कॉलेज इत्यादि प्रमुख संस्थांनीं सहकार्य करून या प्रश्नाच्या सोडवणुकीस लागलें पाहिजे.

पेढ्यांवरील कारकून, खेड्यांतील शिक्षक आणि एजंट किंवा एजंटाचा कारकून ह्या तीन प्रकारच्या धंद्यांस आवश्यक असें ज्ञान वरील संस्थांच्या शाळांतून सरसहा देतां येईल असें वाटत नाहीं; तरी कारकुनीच्या कामास योग्य असा अभ्यासक्रम सर्व शाळांना ठेवतां येणें शक्य आहे. मडगांव, पणजी, ह्यापसें इत्यादि शहरांतील शाळांना तीन इयत्तापर्यंत इंग्रजी आणि टायपिंगचें शिक्षण मराठी शिक्षणावरोबर देतां येणें जड जाणार नाहीं असें वाटतें.

खेड्यांतील शिक्षक तयार करण्यासाठीं वरील संस्थांनीं सहकार्य करून मडगांवसारख्या प्रमुख शहरीं सुटीच्या दिवसांत एक अध्यापनाचा वर्ग उघडावा. हा वर्ग मोठ्या शाळांतील शिक्षकांनीं किंवा तज्ञ गृहस्थानीं विनावेतन चालवावे व यांत मराठी सहावी यत्ता झालेले गरीब, होतकरू व लायक विद्यार्थी आपापल्या शाळांतून पाठवावे.

ही योजना साध्य होण्यासाठीं गोव्यांतील सर्व शिक्षणसंस्थांचा अभ्यासक्रमहि एकसारखाच असला पाहिजे. या करितां एकादें शिक्षणसंमेलन भरविणें हेंहि योग्य होईल.

पण या कामीं कार्य केलेल्या किंवा करणाऱ्या माणसाला आणखी कार्य करा ह्मणून सांगावेसें वाटतें. या व्यावहारिक न्यायानें या श्रीमोदर विद्यालयानेंच त्या प्रश्नाला चालना द्यावी. नुकत्याच वाचलेल्या रिपोर्टावरून विद्यालयानें यंदापासून अभ्यासक्रमांत जमाखर्च व इंग्रजी शिक्षण यांचा समावेश केल्याचें कळतें. अर्थात वरील प्रश्न सोडविण्यास विद्यालयानें आरंभ केला आहे असें दिसतें.

असें सांगून उपयुक्त विषयांना आरंभ केल्याबद्दल विद्यालयाच्या शिक्षणमंडळाचें अभिनंदन करून अध्यक्षांनीं आपलें सुविचार परिप्लुत असें भाषण संपविलें.

वर्ष १६ वें. अंक १२
१८ जून सन १९३१

वर्गणीचे दर
साल सह ३ रु. [आगाऊ]
अंकास १ आणा.

जाहिर समक्ष अगर पत्रद्वारे.
आगाऊ शिवाय जाहिरात प्रसिद्ध
र नाहीं.

मालक
गो. पु. हेगः फारमासेवतिकु
मुद्रण व प्रकाशन भारत-प्रेस कुसमण केपें गोवा.

भारत
O BHARAT

Ano 16 Nº 12
Quinta-feira 18 de Junho 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

dr. Rodolfo Colaço que tão trágicamente morreu em Timor.

Tudo isso não obsta, porem, a que reconheçamos no dr. Noronha o conjunto raro e harmonico das excelentes qualidades a que aludimos.

Páz á sua alma!

Dr. B. Pereira

Tomou já posse do elevado cargo de desembargador da Relação de Nova-Gôa o sr. dr. Bernardo Bragança Pereira.

Integro e inteligente, o sr. dr. Bragança Pereira tem-se provado, na carreira que abraçou, um magistrado dos mais distinctos. E não o admira. Porque a única preocupação do Grande Julgador têm, sempre, sido a mais recta distribuição de justiça — para o que o digno juiz se mantem, firmemente, alheio á influência nociva do meio e se cinge, rigorosamente, escrupulosamente, aos elementos insofismaveis dos autos submetidos ao seu *veridictum*, sendo absolutamente surdo á intriga e ás informações oficiosas.

Por tudo isso, o sr. dr Bragança Pereira gosa a bem justificada fama do ornamento da magistratura colonial.

O *Bharat* não tem a ventura de o conhecer pessoalmente; mas está intimamente familiarisado com o importante e valioso trabalho juridico, historico e literario do ilustre desembargador.

E' o bastante para que prestemos a nossa homenagem de respeito e admiração ao sr. dr. Bernardo Bragança Pereira.

Silencio eloquente

Quando um funcionário da *situação* é louvado oficialmente, a imprensa a ela afecta apressa-se a reforçar a obra laudatória do govêrno com a adjectivação que lhe é peculiar. E' esta uma regra geral.

Mas, coisa curiosa. Foi, há pouco, louvado pelo Govêrno Central, sob proposta do Governo Geral, o *crónico* governador de Diu sr. Capitão Feio Folque, e, por banda dos jornais da *situação*, — nem um *pio* de independência por serem todos historiadores mais ou menos oficiais.

¡Que ingenuidade a de querer julgar um facto histórico recorrendo precisamente á gente duma facção directamente interessada nos acontecimentos que se querem apreciar, se o procurar conhecer o ponto de vista da parte adversa! Façamos de conta que um investigador dos tempos futuros pretendesse estudar a governação do general Craveiro Lopes, apreciando a sua inteligência, o seu tino administrativo, as suas qualidades de estadista e mais excelsos predicados e que baseasse o seu estudo exclusivamente na opinião dos Araújos, Fanchús, Wolfangos e Luis de Menezes e outros turiferários profissionais da actual governação. Chegava evidentemente á absurda conclusão de elevar o actual governador ás alturas do próprio Albuquerque. E' exactamente êsse metodo pueril de critica historica que o sr. professor Mascarenhas adoptou na demonstração da sua tése. De resto, diga-se para consolar, esse defeito de metodo é comum a uma grande parte de historiagrafos e publicistas goêses cuja ignorância das linguas e da literatura indianas os levou a recorrerem exclusivamente aos documentos portugueses para fazer a historia do seu país. No entanto, em bôa justiça, é tambem necessário reconhecer que nenhum dêles que saibamos jamais seguiu um critério tão simplista e procedeu com tamanho impudor nesse género de trabalho, como o sr. prof. Mascarenhas.

Para o nosso propagandista oficioso o grande argumento em favor da tése da 'libertação' de Gôa por Albuquerque consiste em alegar que houve filhos da India, nos tempos da conquista, que solicitaram o auxilio e apoiaram a acção dos portugueses na India. ¡A grande descoberta historica do sr. professor! Admitindo mesmo que alguns dos factos narrados sejam rigorosamente exactos e tenham o caracter que lhes atribue o nosso autor, ¿que provariam êles? Simplesmente que nos tempos de Albuquerque houve na India Araújos e Fanchús capazes de venderem o seu pais ao estrangeiro a troco de alguns favores fazendo se cumplices dos invasores com o único fim de salvaguardar os seus interesses pessoais sacrificando-lhes o bem geral da sua terra. E sabido que traições identicas por parte dos chefes e ministros indianos houve as, quando os inglêses e francezes apoderaram se de vastas provincias da India e repetem-se ainda em nossos dias. Pode-se dizer que todas as conquistas coloniais e mesmo outras, em qualquer parte do mundo que elas se tenham feito, foram sempre acompanhadas de episódios identicos aos que são narrados pelo nosso conferente. Seguindo pois a sua lógica simplista teriamos de concluir que todos os conquistadores foram libertadores e todas as conquistas são libertações. E' o que sempre pretenderam os imperialistas para justificarem os seus actos de banditismo colonial, mas seria dar prova do mais abjecto subalternismo mental se as suas próprias vitimas aceitassem-lhes as suas cinicas e hipocritas justificações e de mão beijada lhes agradecessem a suprema humilhação de terem sido conquistados, como o faz o nosso digno professor do liceu de Pangim.

Uma analise mais minuciosa da conferência que esta nos a apreciar, facilmente nos levaria a descobrir contradições flagrantes e uma concepção vaga e confusa do problema da independência nacional por parte do seu autor. ¿Que ideia fará êle de *libertação* da sua terra quando êle próprio confessa, logo nas primeiras páginas do seu trabalho que Albuquerque, "a conquistou e a reconquistou e dela se *assenhoreou*"? Singular forma de libertar um pais assenhoreando se dele ¿não acham?

do reforço habitual. Pelo contrario, silêncio sepulcral.

¿Que indica essa atitude muda da imprensa *situacionista*? ¿Protesto mudo contra o louvor? ¿Desconcordância com êste?

Que quere que seja, a verdade é que o silencio da imprensa da *situação* em volta do louvor ministerial ao sr. Feio Folque, é muito *eloquente* por ser facto único nos anais dos louvores oficiais do nosso tempo.

Sim. Esse *silêncio* é *tão eloquente* que dispensa toda a sorte de considerações sôbre o mesmo louvor...

P=a'-p=a' Santa justa

Uma pessôa de destaque no nosso meio garante-nos que o padre a que se refere a local *Dialogo curioso* do nosso jornal não é nenhum sócio da *Sociedade de S. Francisco Xavier*, estabelecida no Pilar mas sim um outro padre recolhido no Convento dali—para correcção.

Para os devidos efeitos, registamos nas colunas do *Bharat* o referido esclarecimento—para que se não confunda o trigo com o joio.

Andaram direitas ...

Informam nos de Diu que circularam na Praça umas folhas soltas, enaltecendo a acção governativa do sr. Folque e encarecendo a necessidade dêste senhor eternisar se no governo do mesmo distrito.

O que as folhas soltas (de couve?) resam, não deixa de ser oportuno. E', mesmo, lógico. Porque, depois de se saber que o sr. Feio Folque é infalivel como Papa, insubstituivel e raro, nenhuma folha solta, fôsse qual fôsse a sua procedência podia já mais atrever-se a empanar o brilho das excelsas qualidades recentemente descobertas no impecavel governador de Diu.

As folhas soltas de Diu andaram, pois, direitas, pretendendo *endireitar* a maioria da população desafecta ao louvado governo do sr. Folque—pretenção que de resto, não poderá, de maneira alguma, alterar nem um pouco a *verdade* dos factos *verdadeiros*.

Ano XV) Quinta-feira, 18 de Junho de 1931 (N.° 12

O BHARAT

ANUNCIOS
Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

Não se aceita nenhum anuncio ou comunicado sem ser adiantado o seu custo provavel.

Jornal de maior circulação

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL
Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-08-00

REDAÇÃO E ADMINISTRAÇÃO
COMPOSIÇÃO E IMPRESSÃO
Tip. *BHARAT* Cusmane-Quépém

Ecos-e-Critica

Barafunda

Quem se dê á pachorra de esmiuçar as actas das sessões ordinárias do primeiro período dêste ano, encontrará aí farto material para se convencer de que o Conselho do Govêrno passou a ser um novo sector da balbúrdia que carateriza a actual situação governativa.

Ninguêm se entende. O próprio regimento é um farrapo.

Fechou assim o primeiro periodo das sessões ordinárias. E como o garupeiro da 3.a espiga não estava ainda suficientemente remunerado com os dinheiros públicos, pelos relevantes serviços que o seu govêrno deve aos acrobaticos prestimos, desde que o trouxe de Lisbôa á custa do Estado, o sr. Craveiro Lopes, acabou por arrumá-lo, com grossa prebenda, na Praganã. E lá naturalmente, limpará as matas com o cuidado e o esmêro que patenteou na inspecção das Comunidades e na direcção do *jazz band* do Conselho.

Sua Exa. no principio do seu govêrno, sentira no paiz a falta de *pessoal idoneo*. Pode agora julgar-se feliz por ter dado á India uma amostra do seu ideal em matéria de idoneidade.

E quem se arrumou, se não foi capaz de provar que o paiz está verde para a autonomia, demonstrou irrecusavelmente que numa crise de abandalhamento, há terreno propício aos traficantes.

Vão, breve, realisar se eleições para se preencherem as vacaturas deixadas pelos que se arrumaram Quem queira fazer uma carreira rápida passando pela sala do Idalcão, nesta hora de crise economica, já sabe como deve proceder.

Muito simples. E' pôr o civismo e a moralidade, ainda mais baixa do que está o coco e o *bate*, e estar aí, na sala, de cócoras.

Un *roulement* de arrumações.

LUCIFER

(Do *Pracasha*, de 13 6 31).

SERVILISMO

O sr. Araujo Mascarenhas, professor do Liceu, publicou em folheto a sua conferência sôbre a reconquista de Gôa, proferida em tempos na Câmara Municipal das Ilhas. E' um opusculo de propaganda anti-nacionalista editado na Imprensa Nacional e provavelmente custeado pelo govêrno, quer dizer, a expensas do bom público da India. Que o sr. professor Mascarenhas nos perdôe a franquesa da nossa opinião: o seu trabalho não se recomenda nem pelo fundo nem pela fórma.

A fórma e o estilo distinguem se como sempre pelo fraseado bombastico e grandiloquente tão predilecto do seu autor. Por vezes temos a impressão de estarmos em presença de uma larga compilação de frases sonoras e ôcas, dos lugares comuns literarios, usados e gastos pelos panegiristas da acção colonial portuguêsa, que desgraçadamente constitue num contingente importante da literatura portuguêsa. O abuso do tom enfático e pomposo e das banalissimas flôres da retorica tem o poder de enfastiar o leitor a um grau que chega a ser insuportavel.

Quanto á ideia dominante do opusculo êla tem por fim defender a tése fantastica e ridicula de que o português Afonso de Albuquerque foi o libertador de Gôa e que desde então o nosso paiz "integrou-se indissoluvelmente na terra bendita de Portugal"! Esta tése não tem sequer o cunho de novidade. E' a repetição do que nos prégam há muito os doutrinários liberais do colonialismo português quando querem ilibar o seu pais da pecha de exploração e opressão colonial. Nêles, esta doutrina é sinal de hipocrisia mas quando essa mesma teoria é papagueada por um filho das colónias passa a ser uma manifestação de servilismo mental e duma total abdicação de dignidade nacional e humana.

Assim, o autor do folheto, pretendendo provar que fomos libertados pelos portuguêses, conseguiu produzir apenas um triste documento de escravisação intelectual que êle próprio atingiu no gráu que será dificilmente igualado por qualquer outro. Sob êsse ponto de vista a sua conferência é uma preciosidade curiosa e bem caracteristica.

Com efeito, é bastante sugestivo o método de demonstração seguido pelo conferente oficioso. Para julgar os actos dos portugueses na India é exclusivamente aos cronistas e historiadores portuguêses que êle recorre. Toda a sua documentação está eivada do vicio fundamental de ser de origem suspeita porque se baseia no testemunho e na opinião de autores a quem falta o necessário espirito de objectividade e

Dr. A. Noronha

Já não é dos vivos o sr. dr. Antonio Floriano de Noronha. E manda a verdade que se diga que o Paiz perdeu nêle um seu eminente filho.

Inteligente, activo e metódico, o dr. Noronha revelara estes seus grandes dons, quando, ainda, cursava a Universidade de Coimbra. E' o motivo por que Trindade Coelho, no seu famoso livro *In illo tempore*, referindo se ao ilustre morto, chamou-lhe—*erudito indio Noronha*.

O *Bharat* abstem-se de encarar a personalidade do invulgar extincto como magistrado, porque em todos os pleitos do nosso jornal em que o dr. Noronha interveiu como julgador, sucedeu que êste se houvesse pronunciado desfavoravelmente. Não só isto. Tambem em um incidente de declarações do nosso director no inquérito aos actos do secretário da Relação sr. Filandro Carvalho, o dr. Noronha fez-nos agravo, acedendo a um pedido ilicito do

Secretaria da Câmara Municipal em Quepem, 1 de Junho de 1931.

O secretário da Câmara

Visvonata Rudragi S. Sirvoicar

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Viegas, vão ser vendidos em hasta publica judicial á porta do tribunal desta comarca no dia 26 do corrente mez de Junho pelas 10 horas, pela 3.a vez e por qualquer preço que a praça der os seguintes bens penhorados nos autos civeis de execução fiscal que a Fazenda Nacional promove contra Utoma Ladú Sinai Sanvordencar e Gangadora Ladú Sinai Sanvordencar de Sanvordem: — 4/5 do predio rustico denominado "Mirabaga tican poiquim vantopa dona 1.a adição" da cultura de coqueiros sito em Comproi, e 4/5 do predio rustico denominado "Mirabaga ticana poiquim vantopa dona segunda adição denominada "Xira" da cultura de coqueiros e outras arvores sito na dita, ambos discritos na conservatoria do Registo Predial desta comarca sob os n°s 17 234 e 17.235 a fls. 60 v. e fls. 61 do livro B. 47 avaliados por 800 e 250 rupiás tudo respectivamente. O arrematante pagará as despezas da praça e a contribuição de registo por titulo oneroso nos termos de lei. São por êste citados todos os credores certos e incertos dos mesmos executados bem como os quinhoeiros e comproprietarios, para deduzirem seus direitos nos termos de lei. Para ser publico se expediu este. Quepem, 5 de Junho de 1931.

O escrivão do 1° oficio

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei

O juis de direito 1° substituto

Abilio da Conceição e Souza

Pelo juizo de direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 2° oficio Carapurcar, correm editos de 60 dias a contar da segunda publicação deste citando o interessado João Crusinho Rodolfo d'Almeida, solteiro de Assolnã e ora residente em Africa, parte incerta para assistir a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede por óbito de José Sebastião de Almeida que foi de Assolnã, em que é inventariante e cabeça de casal Maria Piedade Coutinho do mesmo lugar sem prejuiso do seu regular andamento. O que para ser público se expediu este.

Quepem 9 de Junho de 1931

O escrivão do 2° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei

O 1° substo do juiz

Abilio Sousa

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do 2° oficio Carapurcar, vai á praça para venda em hasaa pública á porta do tribunal judicial desta comarca no dia 23 do corrente mez ás 10 horas pela segunda vez e por metade do seu valôr o predio rustico denominado "Galiem" da cultura de arroz sito em Palolem avaliado por 360 rupias discrito na Conservatoria do Registo Predial desta comarca sob o n° 17 856 a fls 11 v do livro B 49 e penhorado nos autos civeis de execução por custas que o M. P. promove contra Bicú Naique Dessai, de Palolem de Canacona, por apenso aos autos de inventario orfanologico, procendido por óbito de Rucmina Naique Dessai que foi da mesma. O arrematante pagará a contribuição de registo nos termos de lei e as despesas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e coproprietarios. O que para ser público se expediu êste.

Quepem, 5 de Junho de 1931.

O escrivão do 2° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei

O juiz de direito 1° substo.

Abilio da Conceição e Sousa

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Viegas, correm éditos de 30 dias a contar da 2.a publicação do último anuncio nos termos do § 2° do art. 197 do Cod. do Proc. Civil, citando o interessado Militão de Almeida, de Cuncolim e ora ausente em Bombaim, em parte incerta para querendo assistir a todos os termos até final dos autos de inventario orfanológico que Constancio Fernandes de Cuncolim, presta por óbito de Camilo Caetano Almeida, que foi da mesma e deduzir nele seus direitos nos termos de lei, sem prejuiso do seu regular andamento. Para ser público se expediu este. Quepem, 28 de Maio de 1931.

O escrivão do 1° oficio

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei

O 1° substituto do juiz de direito

Abilio Sousa

165

Ao Governo

Duma carta:—

"Não sei como o Govêrno tolera o ilegal facto dum só individuo ocupar três ou mais escrivanias das comunidades, uma como proprietario, outra como interino, a terceira como provisório e a quarta como encarregado—como se êsse individuo fôsse algum *Ravona* de 10 cabeças e 20 mãos.

Ora, desde que a lei proibe tais acumulações, é lógico que os competentes cumpram a prescrição expressa da mesma lei, ora considerada como *letra morta*.

Alêm do que, êsse cumprimento da lei fará que os candidatos habilitados no concurso das escrivanias das comunidades—para o que fizeram grandes sacrifícios—fiquem servidos em vez de serem compelidos a matar moscas por causa da referida ilegal acumulação com a qual urge, porisso, que o Govêrno acabe já."

Para o assunto da carta chamamos a atenção dos competentes.

Cada um no seu ofício

O sr. Higino da Cunha, redactor de *A Voz de Damão* foi intimado pela Administração do Concelho de Damão para ser ouvido sôbre uma local citada no mesmo nosso colega.

¿Uma semelhante intimação é admissivel segundo a lei de imprensa em vigor nas Colónias? ¿Tem as autoridades administrativas superintendência no jornalismo que só pertence ao poder judicial?

E' bom que se desenvencilhe êsse *embròglio*, para que se evitem consequências futuras.

Para cúmulo do infortunio, o nosso propagandista não se limita a ocupar se do passado historico, mas ainda se atenceia sôbre os homens e as coisas do presente e mesmo tenta fixar o futuro estatuto politico de Gôa dentro da India. O pouco que diz a êsse respeito é suficiente para mostrar a sua completa ignorância do assunto que tão desastradamente abordou. Para amostra da pouca familiaridade que tem das questões relacionadas com o movimento da independência da India bastará citar um erro crasso em que caiu. Referindo se á população indiana da India Britanica usa o qualificativo impropio do "povo anglo-indiano" e "os anglo indianos" quando é hoje geralmente sabido que esse termo está exclusivamente reservado á população mestiça da India e aos descendentes dos ingleses aqui fixados, dantes conhecidos como *eurasians* ou eurasiasticos, e não pode ser aplicado aos indianos puros. Se ao subalternismo juridico do advogado Mascarenhas repugna chamar simplesmente indianos aos filhos da India restava lhe a alternativa de empregar o qualificativo mais proprio de "indo-britanicos". A denominação de "anglo-indianos" não serve. Serviu apenas para trair o seu fraco conhecimento do que se está a passar a dois passos de nós e do grave conflito politico racial que se está a de e r lar na India toda. A pretenção do autor de que "politicamente, nada nos interessa o presente ou o futuro da India Inglesa" e a sua ingenua persuasão de ver um autentico *libertado* não o dispensam de conhecer os factos elementares que se relacionam com o formidavel movimento da independência da India.

A' má hora teve o sr. Araujo Mascarenhas a ideia de vir exaltar em público um estado de coisas que está prestes a desaparecer. A sua defesa chega tarde. Já o nosso público milhor informado do que o sr. professor sôbre o que se passa por êste mundo fóra, não se deixa embalar com idéias dessas que nos serve com a sua eloquência algo antiquada. Sem querer, o seu discurso, que celebra a data da reconquista de Gôa parece-se com uma oração funebre.

Anuncios

O BHARAT, ano XVI n.º 12 de 18 de Junho de 1931

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 º oficio Carapurcar correm éditos de 30 dias a contar do dia da 2 a publicação deste citando a José Antonio Alfrêdo Menino de Almeida, marido da interessada Maria Santana Herminia Fernandes de Carmona de Salcete e ora ausente em parte incerta de Bombaim para assistir a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede por obito de Manuel Salvador Fernandes que foi de Velim em que é inventariante e cabeça de casal Octaviana da Silva do mesmo lugar sem prejuiso do seu regular andamento, bem assim para comparecer no tribunal judicial desta comarca situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem na primeira audiencia findo o praso de editos afim de conferirir o dote de tres mil e quinhentas rupias recebido por ocasião do seu casamento com a dita Maria. As audiencias deste juizo se fazem em todas as terças e sextas feiras ás 10 horas se não forem feriados porque neste caso terão lugar nos dias imediatos se tambem não o forem e não estiverem compreendidos nas férias. O que para ser publico se expediu este Quepem, 28 de Março de 1931.

O escrivão do 2 º oficio
Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei
O juiz de direito
A. Colaço

Pelo Juizo de Direito da comarca de Quepém, e cartorio do escrivão do 1 º oficio Viegas, vão ser vendidos em hasta publica judicial, á porta do tribunal desta comarca, no dia 26 do corrente mês ás 10 horas, pela 2 º vez e pela metade do preço da sua avaliação os seguintes bens, penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Constancio Martins, de Velim, promove contra Gonobá Nilconta Sinai e mulher Laximibai de Nagorcem e outros:— ½ de cada um dos predios rusticos denominado "Fondxeta" por outro nome "Cumodxeta" e "Cumbordlote" ambos da cultura de arroz, situados em Nagorcem, discritos por inteiro na conservatoria do Registo Predial desta comarca sob o n º 17153 e 17154 a fl. 20 e fl. 20 v. do Livro B. 47, avaliados por 1000 e 500 rupias, respectivamente. O arrematante pagará a contribuição de registo por titulo oneroso e as despezas da praça nos termos da lei. Por êste são citados todos os credores certos e incertos dos mesmos executados bem como os co-proprietarios e quinhoeiros, para deduzirem seus direitos nos termos de lei.

Para ser publico se expediu este.

Quepem, 13 de Junho de 1931.

O escrivão do 1 º oficio
Joaquim Anselmo Carraciolo Viegas

Verifiquei
O 1 º substituto do juiz de direito
Abilio Sousa

TEMPLO DE XRI MOLICARJUNA DE MOLCORNEM

Anuncia-se que no dia 28 do corrente, pelas 16 horas, se procederá no local das sessões á arrematação das avenças da receita trienal do sobredito Templo de 1931-1932 a 1933 1934, pelo preço e condições constantes do respectivo calculo superiormente aprovado.

Aos 16 de Junho de 1931.

O escrivão da mesa
Ramacrisna Ananta Narcornim.

Visto o presidente—
Z. G. Molcornencar

CAMARA MUNICIPAL DE QUEPEM

Faz se público que na sessão ordinaria de 22 do corrente mês de Junho e nos dias imediatos, pelas 15 horas, será arrematada, em hasta pública, á porta do edificio da Camara, a renda de passagem invernal entre Parodá e Avedem, com as condições que estarão patentes no acto da praça.

गोष्ठीरूप गोमांतक

ले.— गो. कृ. नाईक

उत्तरार्ध

प्रकरण) पांच प्राच्य राजधान्या (दुसरें

मठग्राम (मडगांव)— हीच गोमांतकाची, गोमांतक वसविणाऱ्या ब्राह्मणांकडून निवडली गेलेली पहिली राजधानी होय. अजूनहि येथील लोकांकडेच बौद्धिक अग्रेसरत्व कायम आहे, परंतु एकेकाळीं 'कोंकणांतील अथेन्स' ह्मणून नांवाजलेल्या मठग्रामाची आजची दुःस्थिति पोर्तुगीज सत्तेची द्योतक नाहीं तर काय ? !

चंद्रपूर (चांदर)— ही कदंबवंशीय षष्टदेवाची राजधानी होय. अद्यापहि येथें जुने शिलालेख आढळतात.

गोपकपट्टम (थोरलें गोवें)— ह्या स्थानीं कदंबवंशीय जयकेशीनें आपली राजधानी स्थापिली. इतिहाससंशोधकांस येथें पुष्कळ वाव आहे.

फोंडें— आदिलशहा व त्याच्या मागून मराठे ह्यानीं त्या वेळच्या अशांततेला तोंड देण्यासाठीं हीच जागा राजधानीसाठीं मुक्रर केली.

जुनें-गोवें—हें कदंबकालीन शहर असून बहामनी राज्याच्या आश्रयास आलेल्या मलिक हासीन नावांच्या हेनावरच्या नवाबानेंहि आपल्या निवासस्थानासाठीं ह्याच शहराची निवड केली होती. इ. स. १५१० सालीं पोर्तुगिजांनीं गोवें घेतल्यानंतर इ. स. १७५९ पर्यंत ह्याच ठिकाणीं राहून राज्यकारभार हांकिला. पण आज येथें त्या प्रचंड शहराचा मागमूसहि राहिलेला नाहीं. पोर्तुगीज अमलाखालीं गोमांतकाची कशी दुर्दशा झाली ह्याचें हें एक मूर्तिमंत उदाहरण आहे. येथील भग्नावशेष ऐतिहासिक दृष्ट्या पहाण्यासारखे आहेत.

वर्तमान सार

—" महाराष्ट्रीय नकलाकार रा. टाणेदार हे पणजी (गोवा) येथें आपलें कार्यक्रम करण्यासाठीं गेले होते. पोलिसांना कांहीं संशय आल्यावरून त्यानीं त्यांच्या खोलीची झडती घेतली व भगतासिंग, राजगुरु वगैरेंची चित्रें जप्त करून नेलीं व त्यांनाहि अटक करून लोकअपमध्यें ठेवण्यांत आलें होतें. पण त्यांना आतां मोटारींतून ब्रिटिश हद्दींत सोडण्यांत आलें आहे. " असें गेल्या ता. १३ जूनच्या केसरींत प्रसिद्ध झालें आहे. पणजीच्या पत्रांतून प्रस्तुत गोष्टीचा बिलकूल उल्लेख आलेला नाहीं ! असें कां ?

—पणजी रेलासावांचे प्रेसिडेंट दोतार नोरोंज हे कालवश झाले. ते ख्रिस्तीधर्माविरुद्ध असून ख्रिस्तानुयायी लोकांचे वाभाडे काढून त्यानीं एक ग्रंथ प्रसिद्ध केला होता. त्यांचें कायद्यांचें ज्ञान अगाध होतें. पोर्तुगीज भाषेवरील त्याचें प्रभुत्वाहि वाखाणण्यासारखें होतें. पण ते एक फिरंगी संस्कृतीच्या पक्के पचनीं पडलेले व पोर्तुगाललाच पितृदेश मानणारे निदान तसें भासविणारे गृहस्थ होते.

सारस्वत व दैवज्ञ यांतील एकोपा

वाणावलीच्या हिंदुसमाजाची जागृति

'सत्योन्नति–समाज', व 'कात्यायनी बाणेश्वर विद्यालय' या वाणावली येथील नमुनेदार संस्था पहाण्याचा सुयोग गेल्या शुक्रवारीं आह्मांस आला. आणि येथें नमूद करण्यास आनंद वाटतो कीं, त्या उभयहि संस्थांचा कारभार सुव्यवस्थित रीतीनें चालला असून त्यांच्या अभ्युदयार्थ संस्थापकांकडून होत असलेला स्वार्थत्याग अभिनंदनीय होय. वाणावलींत हिंदु लोकवस्ती कमी. जिकडे तिकडे खिस्ती 'कपेलां'चें साम्राज्य, खिस्ती जमिनदार करतील ती पूर्व दिशा. अशा बिकट परिस्थितींत सदर संस्थांना जन्म दऊन, त्यांच्यांत कार्यक्षमता निर्माण करण्यांत वाणावलीच्या हिंदुसमाजानें व्यक्त केलेला स्वाभिमान कोणासहि कौतुकास्पदच वाटल्यास आश्चर्य नाहीं.

ता. २९ अक्टोबर सन १९१३ रोजीं 'सत्योन्नति समाजा'ची स्थापना झाली. यावेळीं समाजाच्या सभासदांची संख्या अवघी ९ होती. दर वर्षी लक्ष्मीपूजनाचा उत्सव साजरा करणें यापलीकडे समाजाचें कार्यक्षेत्र जात नव्हतें. नंतर सदर संख्या वाढविण्यांत आल्यापासून समाज झपाट्यानें प्रगतिपथ आक्रमूं लागला आणि आज समाजामार्फत उपरोक्त लक्ष्मीपूजनाखेरीज दत्तजयंती, प. नानाशंकर शेट यांची पुण्यतिथी, श्रीशिवजयंत्योत्सव व दर आठवड्याचे शुक्रवार— इत्यादि उत्सव उत्साहपूर्वक साजरे केले जातात. संस्थेच्या उन्नत्यर्थ सारस्वत व दैवज्ञ या दोनहि जातींतालं गृहस्थ सारख्याच कळकळीनें झटत असतात.

स्थापनेच्या वेळीं 'सत्योन्नति समाजा'ची आर्थिक स्थिति अत्यंत निकृष्ट होती. पण चालकांच्या निरपेक्ष स्वार्थत्यागामुळें समाज आज स्वताच्या जमिनींत उभारलेल्या स्वताच्या आलयांतच अधिष्ठित झाला असून, तीन साडेतीन हजार रुपये किंमतीच्या वस्तूंचा धनी बनलेला आहे. उपरिनिर्दिष्ट उत्सवांखेरीज समाजाकडून एक वाचनमंदीरहि चालवण्यांत येत असतें, याचा उल्लेख होणें जरूर आहे.

'कात्यायनी बाणेश्वर विद्यालया'ची स्थापना ता. ४ जानेवारी १९२३ रोजीं झाली. स. समाजाचे कांहीं सभासद या विद्यालयाचेहि सदस्य असले व विद्यालय समाजाच्या संस्थेंत चालू असलें तरी 'सत्योन्नति समाज' व 'कात्यायनी बाणेश्वर विद्यालय' या उभयहि संस्था भिन्न भिन्न आहेत. समाजाप्रमाणेंच विद्यालयाच्या चालक वर्गांतहि सारस्वत व दैवज्ञ या उभय जातींचा सारखाच समावेश होतो.

गोमांतकांत कोठेंहि सारस्वत व दैवज्ञ या उभय वर्गांत हार्दिक एकोपा विशेषसा आढळून येत नाहीं. जुन्यापुराण्या 'सूर्यपानी' भानगडीमुळें असो अथवा इतर 'महाजनी' कारणामुळें असो, सारस्वत व दैवज्ञ या उभय जातींत उत्पन्न झालेल्या तेढीचा अजून निःपात झाला नसल्यानें त्या परस्परांशीं खुल्या दिलानें वागत नसल्याचेंच दुर्दैवी पण सत्य दृश्य गोमांतकांत सर्वत्र नजरेसमोर उभें राहतें. फक्त वाणावली गांव मात्र त्या नियमाला अपवाद आहे, अशी आमची अनुभवांतीं खात्री पटली आणि आमचें अंतःकरण आनंदानें प्रफुल्लित झालें. वाणावलीच्या सारस्वत–दैवज्ञांत नांदत असलेलें ऐक्य इतरत्रहि पहाण्याचें भाग्य आह्मांस लाभो अशी परमेश्वरापाशीं करुणा भाकण्यास आह्मीं विसरलों नाहीं.

असो. 'सत्योन्नति–समाज' व 'कात्यायनी बाणेश्वर विद्यालय' या नमुनेदार संस्थांचें दर्शन आह्मांस आनंददायक झालें, याबद्दल संस्थापकांचें आह्मीं अंतःकरणपूर्वक अभिनंदन करून, संस्थांचा वाढता उत्कर्ष इच्छितों.

जाहीर विनंति

कुसमण–केपें येथील लक्ष्मीमंदिराची इमारत इकडील बालोन्नति समाजाच्या ताब्यांत देण्याचा विचार आहे. ती इमारत कोणत्या अटींवर समाजाच्या ताब्यांत द्यावी इत्यादि बाबी ठरविण्याकरितां लक्ष्मीमंदिराच्या व बालोन्नति समाजाच्या सभासदांची संयुक्त बैठक लक्ष्मीमंदिराच्या इमारतींत येत्या रविवारीं संध्याकाळीं पांच वाजतां भरविण्यांत येणार आहे. तरी उभय संस्थांच्या सभासदांनीं वेळेवर हजर रहाण्याची मेहरबानी करावी. लक्ष्मी मंदिराचे किंवा बा. समाजाचे जे सभासद बठैकीस हजर रहाणार नाहींत त्यांस संमत ठरणारें बहुमत मान्य आहे, असें समजून व्यवस्था केली जाईल.

केपें, ता. १४।६।१९३१.

रामकृष्ण अनंत नाडकर्णी
लक्ष्मीमंदिराचा अध्यक्ष

जयवंत घ. मळकर्णेकर
बा. समाजाचा अध्यक्ष

—श्री. नरसिंह पुरुषोत्तम सुकेरकर हे बी. ए. च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याबद्दल आह्मी त्यांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करितों.

—सांगें व काणकोण येथील नगरपालिकानीं कांहीं करवाढ केली असून तिला सरकारनें मान्यता दिली आहे.

बुवांचें पेंव

ले.— 'क्ष', डिचोली

आमचा हिंदुसमाज इतर कोणत्याहि बाबतींत नसला तरी साधूंच्या बाबतींत मात्र तो पूर्णपणें भाविक असलेला कोणासहि दिसेल. साधूंचें सोंग घेतलेला इसम दिसला मग तो खरोखरच साधु असो,किंवा धर्माच्या नावांवर पैसे उकळणारा, भक्तीच्या नावांवर दंभ विकणारा, मंत्रोपदेशाच्या नावांवर अनाचार करणारा एकादा ढोंगी गोसावी असो—त्याला पूज्य मानायाचा, त्याचा मंत्रोपदेश घ्यावयाचा हें जणूं काय आमच्या हिंदुसमाजाचें एक मुख्य कर्तव्यच होऊन बसलें आहे!

थोड्याच वर्षांपूर्वी आपला रक्तपितीचा विकार बरा होण्याकरितां श्रीस्थळ आमोणें येथें येऊन राहिलेला एक कारवारचा इसम श्रीच्या कृपाप्रसादानें बरा झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तोच इसम साधु होऊन येथें आल्यावर एका विशिष्ट 'तलवार बहादूर' समाजानें त्याचें माजविलेलें प्रस्थ पाहिलें, त्याचा दरबार्‍ी बळवईनजीक होत असलेला 'काला' पाहिला, 'हरिहर ब्रह्मादिक वंदिती ज्यांचे पाय' अशा प्रकारचीं आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचा, ज्ञानाचा व लौकिकाचा खून पाडणारीं, त्यांचीं केलेलीं पदें वाचलीं, आपल्या स्वतःच्या बायकांकडून त्यास तेल घासून गाणें ह्मणत न्हाऊं घालीत असलेलें लक्ष्यपूर्वक पाहिलें, ह्मणजे आमच्या वरील ह्मणण्यांत अस्वाभाविक किंवा अतिशयोक्ति नसल्याबद्दल कोणाचीहि खात्री होईल. अशाच सारखा एक प्रकार आमच्या डिचोलींत नुकताच घडून आला आहे. थोड्याच महिन्यापूर्वी एका साधूनें येथें येऊन आपलें गाठोडें स्थापन केलें. अर्थातच त्यास पाहण्यास कांहीं मंडळी गेली. त्यांस पाहतांच तो साधु ह्मणालाः "आपण येथें कां आलां? आपल्या सारखाच एक इसम मीं आहें. माझ्याकडून आपणास कांहीं मिळणार नाहीं. तेव्हां विनाकारण आपण येथें येऊं नका". झालें. येथील भाविक लोकांस साधूचे वरील शब्दच 'अनुग्रह' वाटला व ते लगेच त्याचे शिष्य बनले. तूर्त सदर साधूचें हलुहळू बरेंच प्रस्थ माजत गेलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शिष्य वर्गांत ह्मापसेचे थोर व आदरणीय घराण्यांतीलहि एक इसम आहेत.

ह्या साधूचा विशेष ह्मणजे त्यास स्ट्रॉंग चहा व पासिंग शॉ जास्त आवडतात हा होय! जो शिष्य त्यास जास्त 'स्ट्रॉंग टी' किंवा पासिंग शॉ आणून देईल तोच त्याचा आवडता शिष्य बनतो. पूर्वी सदर साधु ह्या दोन वस्तूंशिवाय आणखी कांहीं घेत नसे, पण तूर्त शिष्यांच्या आग्रहामुळें बाकीचे पदार्थीहि थोडे थोडे खात आहे.

ह्या साधूनें वरील सोंग कां घेतलें आहे हें तूर्त नक्की सांगतां येत नाहीं. तथापि त्यांच्या वागणुकीकडे बारकाईनें लक्ष दिल्यास साधूंच्या गुणांपैकीं एकहि गुण ह्या साधूंत दिसत नाहीं. बाकी त्यांच्या शिष्यमंडळीस हे साधु श्रीरामकृष्ण परमहंसाचे अवतार दिसतात ही गोष्ट निराळी.

वस्तुतः साधूंविषयीं पूज्य बुद्धि दाखविणें हें कितीहि युक्त व इष्ट असलें तरी केवळ त्यानें भगवें वस्त्र परिधान केलें आहे एवढ्याच गोष्टीकडे नजर देऊन त्याची वागणूक वगैरे इतर गुणाचा यत्किंचितहि विचार न करतां त्याचे शिष्य बनावें, त्याचा मंत्रोपदेश घ्यावा व 'हरिहर ब्रह्मादिक वंदिती ज्याचे पाय' इतक्या योग्यतेस त्यास बसवावें हें कोणीहि समंजस माणसास योग्य वाटणार नाहीं. उलट हें आत्मघातकीपणाचें लक्षण असेंच तो आपलें प्रामाणिक मत देईल. साधूंविषयीं पूज्य बुद्धि दाखवूंच नये किंवा त्यांचा मंत्रोपदेश घेऊंच नये, असें प्रस्तुत लेखकाचें मुळींच ह्मणणें नाहीं. पण तसें करतानां त्या कर्तव्यास तो माणूस पात्र आहे कीं काय हें प्रथम पाहूनच नंतर त्याचा मंत्रोपदेश घेतला पाहिजे. उगाच तुकाराम बुवांचा भाविकपणा अंगांत संचरल्यासारखें आंधळे बनून दिसेल त्या भगव्यावस्त्रवाल्यास आपण साधू समजूं लागलों व त्याचा मंत्रोपदेश घेऊं लागलों तर त्यापासून आपणास फायदा तर कांहीं होणार नाहींच पण थोड्याच वेळांत जेव्हां सदर साधूचा ढोंगीपणा चव्हाट्यावर येतो तेव्हां आपणास त्याचा मंत्रोपदेश घेतल्याबद्दल व त्याचें प्रायश्चित मिळाल्याबद्दल प्रस्तावा करित बसावें लागतें. असा सर्व साधारण अनुभव असलेला पाहण्यांत येतो. थोड्याच वर्षांपूर्वी एक साधु आमच्या गोमांतकांत असाच अवतीर्ण झाला होता व त्याचेंहि येथें बरेंच प्रस्थ माजलें होतें, पण थोड्याच महिन्यानंतर जेव्हां त्याचा एका तान्ह्या मुलावर बापाचा अधिकार शाबीत झाला, तेव्हां त्याच्या शिष्यानां त्याचा ढोंगीपणा कळून आला व अशा साधूचें शिष्यत्व पत्करल्याबद्दल त्यांस वाईटहि वाटलें. त्यानंतर हल्लीं सुद्धां कित्येक साधु येथें येऊन बायकानां मंत्रोपदेश देऊन शिष्यिणीं करतात. पण लवकरच आपलें Ditective चें सोंग चव्हाट्यावर आल्याचें त्यांस समजतांच ते पसार होतात. अशा तऱ्हेचीं अनेक उदाहरणें दाखवून देतां येतील. वरील साधूच्या बाबतींतहि असाच अनुभव न येवो ह्मणजे झालें.

—ब्रह्मदेशांतील बंडाळी शमन झाली नसून उलट ती जोरांतच असल्याच्या वार्ता पसरत आहेत.

—वैश्य मासिकाचा ४ था अंक प्रसिद्ध झाला असून त्यांत माजी नामदार बांदोडकर यांचें सचित्र चरित्र प्रकाश्य झालें आहे.

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, अ. ज्येष्ट शु.१० मी शके १८५३

वर्णभेदाचें भूत

'काळा–गोरा' हा भेद विद्यमान 'दिता दुरा'च्या सत्ताकालांत इतक्या तीव्रतेनें पसरूं लागला आहे कीं, पोर्तुगालला स्वताचा पितृदेश मानणारे व पोर्तुगीजांना पितर समजणारे फिरंगाळलेले गोमांतकीय ख्रिस्तीहि अगदीं बावरून गेलेले दिसतात. सदर भेदाची भरभराट सिव्हील व मिलिटरी नोकरशाहींतच होऊन थांवली नसून धर्माधिकाऱ्यांतहि तो भेद मोठ्या डौलानें डोकावूं लागल्याचा प्रत्यय येत आहे. रायतूर–सेमिनारीच्या मुख्याध्यापकाच्या जागीं नेहमीं नेटीव्ह पाद्रीच नेमला जात असे; पण विद्यमान पात्रियार्कानीं उपरोक्त हुद्यावरच नव्हे तर सेमिनारीच्या इतर अनेक अध्यापकांच्या जागींहि युरोपियन पाद्र्यांची नेमणूक केली आहे. या पंक्तिप्रपंचामुळें गोमांतकीय ख्रिस्ती 'मेंढरांत' भयंकर खळबळ उडाली असून वरिष्ट 'मेंढराख्या'विरुद्ध तीं दांतओठ चावीत आहेत !

नम्रता, समता व बंधुता या तत्व त्रयीवर ख्रिस्तीधर्माची उभारणी झाल्याची फुशारकी ज्या लोकांकडून वेळींअवेळीं मारली जावी, त्यानींच वर्णभेदाचें बंड माजवून ख्रिस्ती धर्माला काळोखी फांसण्याचा आततायीपणा करावा हें केव्हांहि निंद्यच होय. रायतूरच्या नेटीव्ह अध्यापकांचें मासिक वेतन तीस रुपये असून, त्यांची राहणी अगदीं साधी असते. परंतु नव्या युरोपियन शिक्षकांचा मासिक पगार नबाबी थाटाचा असून, खाण्यापिण्यांत त्यांची चंगल आहे. आणि अत्यंत दुःखाची गोष्ट ही कीं, उपरोक्त युरोपियन पाद्री आपल्या 'कानारी' बांधवांत न मिसळण्यासाठीं बुद्धिपुरस्सर झटत असून, त्यांचें खाणेंपिणेंसुद्धां स्वतंत्र व निराळ्या पंक्तींतूनच होत असतें ! सेमिनारींतील जुना वर्णभेद नेस्तनाबूद करण्याच्या इराद्यानें स्थापण्यांत आलेला हा नवा वर्णभेद विशेष जाचक ठरत नाहीं काय ? ख्रिस्ती धर्माची नम्रता, समता व बंधुता ही तत्वत्रयी सदर वर्णभेदामुळें लाथाडली जात नाहीं काय ? आणि धर्माची इभ्रत राखण्याचें ज्यांचें आद्य कर्तव्य त्यांच्याकडूनच असा अनाचार भरदिवसा व उजळ माथ्यानें घडला जावा यापरतें ख्रिस्ती धर्माचें दुसरें दुर्दैव तें कोणतें ?

पोर्तुगीज प्राजकाचीं समता, बंधुता व स्वातंत्र्य हीं तत्वें एकीकडून लाथाडलीं जात आहेत तर दुसरीकडून ख्रिस्ती धर्माधिकारी ख्रिस्ती धर्मतत्वांची अवहेलना करीत आहेत. अशा दुस्तर स्थितींत ख्रिस्ती लोकांची धुंदी उतरून, त्यांच्यांत राष्ट्रीय जागृति उत्पन्न होत असल्यास आश्चर्य आहे काय ?

वाइटांतहि कधीं कधीं बऱ्याचें बीज असतें असें ह्मणतात, त्याचा ताजा पुरावा उपरोक्त परिस्थिति देत नाहीं काय ?

इतस्ततः

भारताचा आजचा अंक हा नव्या ह्मणजे सोळाव्या वर्षाचा तेरावा अंक आहे. १३ आंकडा ख्रिस्ती राष्ट्रें अमंगल समजत असतात. पण त्याच राष्ट्रांपैकीं एकांतील ख्रिस्ती व्यक्ति तेरा आंकड्यानें कशा लौकिकवान, अधिकारसंपन्न व धनसंपन्न बनली याचें मनोरंजक वर्णन प्रसिद्ध झालें आहे. भारताचा आजचा अंकहि १३ वा असल्यानें सदर वर्णनाचें दिग्दर्शन आज यथा योग्यच होईल यांत संदेह नाहीं. फ्रान्स येथील सुप्रसिद्ध नागरीक मो. दुमेर्ग यांचा जन्म तेरा तारखेला झाला. तेरा तारखेलाच ते प्रथम सिनेटचे सभासद निवडून आले. तेरा तारखेलाच ते सिनेटचे अध्यक्ष झाले व तेरा तारखेलाच त्यांची फ्रान्स प्राजकाचे अध्यक्षस्थानीं निवड केली गेली. आपल्या सप्तवार्षिक पूर्व सत्ताकालांत त्यांनीं तेरा प्रधानमंडळें नेमिलीं. गेल्या ता. १३ मे रोजीं त्यांची पुन्हां त्याच फ्रान्स प्राजकाच्या अध्यक्षस्थानीं नव्यानें निवडणूक होऊन त्यानीं चालू माहेच्या तेरा तारखेलाच अधिकारसूत्रेंहि हातीं घेतलीं. आणि आश्चर्याची व मजेची गोष्ट ही कीं, मो. दुमेर्ग यांचें वयहि प्रस्तुत पांसष्ट वर्षाचें–ह्मणजे तेरा गुणिले पांच–आहे. अमंगल मानण्यांत येणाऱ्या तेरा आंकड्यानें एका व्यक्तीला किती थोर वैभवगिरीवर चढविलें पहा ! मग तेरा आंकड्याची अशुभता कोठें राहिली ?

× + ×

मोटारचा नवा कायदा मोटार–मालकांना व मोटार–हांक्यांना सारखाच विघातक असल्यानें उभयहि वर्गांत असंतोषाचा वणवा पसरूं लागला. आपापलें ह्मणणें काय आहे, हें त्यांनीं सरकारसमोर मांडलेंहि. पण सरकारनें त्यांच्या न्याय्य मागण्याकडे दुर्लक्ष केल्यानें सदर असंतोषाच्या वातावरणांत बदल होऊं शकला नाहीं. आणि मोटारहांक्यांनीं आपलें ह्मणणें सरकारनें मान्य केलें जावें ह्मणून गेल्या शनिवारीं संप पुकारला. पण तीन कारणानीं दीड दिवसाच्या अल्पावधींतच तो मोडला गेला ! हीं तीन कारणें ह्मणजे—मोटारहांक्यांतील एकजुटीचा अभाव, संपाला मोटार–मालकांच्या सहकारितेचा अभाव आणि सरकारचे मोटारविषयक कर पूर्वींच चुकते केले गेल्यामुळें संपाच्या यशस्वितेला साहजिकच उत्पन्न झालेलें प्रतिकुल वातावरण–हीं होत. या शेवटच्या कारणामुळें संपाला जनतेचाहि पाठिंबा मिळाला नाहीं. सामुदायिक रीतीनें संप पुकारून स्वतःचे हितसंबंध संरक्षण करण्याचा प्रत्येक वर्गाला जन्मसिद्धच हक्क आहे. पण त्यामुळें सत्य व अहिंसा या तत्वांना बाध येतां कामा नये. आणि दीड दिवसांत संपलेल्या संपांत सदर तत्वांचा योग्य मान राखला न गेल्यानेंच त्याची लवकरच इतिश्री झाली व सरकारला आपल्या सामर्थ्याचा डौल मिरवण्यास वाव मिळाला, अशी आमची समजूत आहे. संप अयशस्वी झाला असला, तरी त्याच्या बुडाशीं असलेलीं कारणें दूर करण्याचा सरकारी अधिकारी दूरदर्शीपणा दाखवितील अशी आमची खात्री आहे. न पेक्षां मोटारचा धंदा अशक्य बनून त्याचा अल्पावधींतच विनाश होईल, असें भविष्य वर्तविण्यास हरकत नाहीं.

× + ×

गोमांतकांत नाईक या उपनावांची एक जात असून तिच्यांत शेसविधीची अनिष्ट चाल फार पुरातन कालापासून रूढ होती. त्या चालीपासून अलिप्त राखून आपल्या घराण्याचा आत्मोद्धार करण्याचा पायंडा पाडणारे गोमांतकांतील पहिलेच गृहस्थ ह्मणजे कैलासवासी शंकर नाईक व त्यांचे बंधु रा. राम नाईक हे होत. उभय बंधूंनी आपल्या मुलांमुलींस उच्च शिक्षण देऊन त्यांना सुसंस्कृत केलें व त्यांचा सामाजिक दर्जा अर्थातच वाढविला. विद्यार्थीदशेपासून भारतकारांचा सदर घराण्याशीं हार्दिक मैत्रत्वाचा संबंध असून तो आजतागायत निश्चल आहे. उपरोल्लेखित शंकर नाईकाच्या घराण्याच्या बहुमोल कर्तबगारीचा सविस्तर निर्देश भारतांतून आह्मीं सवडीनुसार करणार आहोंतच. तत्पूर्वीं जाहीर करण्यास आनंद वाटतो कीं, शंकररावजींचे एक पुत्र व आमचे मित्र गोविंद शंकर नाईक यांचा वैद्यकीचा पंचवार्षिक शिक्षणक्रम यशस्वी रीतीनें पुरा होऊन त्यांना डॉक्टर ही पदवी मिळाली आहे. गोमांतकांतील नाईक जातींतील डॉक्टर गोविंदराव हे पहिले पदवीधर असून, स्वयंखुषीनें स्वीकारलेल्या पेशांत ते पूर्ण निष्णात आहेत. शंकर नाईकांच्या घराण्याचा होत असलेला हा शैक्षणिक उत्कर्ष उल्लेखिण्याचें भाग्य आह्मांस लाभल्याबद्दल आह्मांस वर्णनातीत हर्ष होत असल्यास आश्चर्य नाहीं. डॉ. गोविंदराव आपल्या परोपकारास वाव असलेल्या धंद्यांत नेहमींच यशस्वी होवोत असें इच्छितों.

× + ×

रायबंदर येथील श्रीमंत विश्वनाथ प्रभू लवंदे यानां गेल्या ता. १० रोजीं एकाएकीं ह्रदयक्रिया बंद होऊन देवाज्ञा झाली, हें कळविण्यास दुःख वाटतें. मयताचें वय अवघें ३४।३५ वर्षांचें असून स्वभाव उमदा होता. स्वदेशहितार्थ झटण्यास आवश्यक असलेली ऐपत त्यांच्यांत भरपूर होती. पण तिचा उपयोग करण्यांस त्यांना फुरसत न मिळाल्यानें समाजांत त्यांचा विशेषसा प्रकाश पडला नाहीं. सु–प्रसिद्ध वै. श्रीमान विष्णुराव धेंपे यांचे मयत विश्वनाथपंत हे जामात होते. मृताच्या आत्म्यास शांति इच्छितों.

गोष्टीरूप गोमांतक

आतां लवकरच सदर इतिहास स्वतंत्र पुस्तकाचें रूप धारण करण्याचें धाडस करणार असल्यामुळें तो प्रांतबंधूंच्या प्रेमाश्रयाची अपेक्षा करीत आहे. तेव्हां जून अखेरपर्यंत अभिप्राय, आक्षेप, आणि सूचना पाठविण्याची कृपा करावी ह्मणजे जिज्ञासू इतिहासभक्तांच्या आणि इतर आक्षेप–सूचनांचा एकदांच विचार करणें सोयीचें होईल. शिक्षक, पालक आणि पुस्तकविक्रीचा धंदा करणारे यानीं आपणास किती प्रति लागतील तें कळविण्याची मेहरबानी करावी. कारण नियमित प्रति काढण्याचा आमचा विचार आहे. अभिप्राय कळविणाऱ्या तज्ज्ञानीं, चर्चेंत भाग घेणाऱ्या साहित्यभक्तांनीं आणि आश्रयदात्यानीं आपलीं नावें सुवाच्य लिहून पाठविण्याची तसदी घ्यावी. कारण सदर इतिहासांत तीं सर्व संकलित करण्याचा आमचा मानस आहे.

गोमांतकीय चित्रकारांस विनंति

हिंद देवी प्रमाणेंच [ह्मणजे मागें हिंदुस्थानाच्या आकृति ऐवजीं गोमांतकाची आकृति घालून] गोमांतदेवीचें चित्र तयार करवून तें 'गोष्टीरूप गोमांतकाच्या मुखपृष्ठावर देण्याची आमची इच्छा आहे.

तेव्हां ज्या चित्रकाराची आह्मांस मदत करण्यांची इच्छा असेल त्यानें खालील पत्त्यावर पत्र किंवा चित्र पाठविण्याची तसदी घ्यावी. नापसंत चित्र ज्याचें त्यास आमच्या स्वताच्या खर्चानें परत करण्यांत येईल. मोबदल्याची इच्छा असल्यास तसें स्पष्टपणें कळविण्यास अनमान करूं नये.

गो. कृ. नाईक कुंकळ्ळी–गोवा.

—'हुतात्मा श्रद्धानंद' नावांचें एक आठवड्याचें पत्र डॉ. सावरकरांच्या संपादकत्वाखालीं मुंबईंत प्रसिद्ध होणार आहे.

—बाणावलीच्या सत्योन्नति समाजाची नियमबंदी सरकाररीत्या मान्य करण्याचे परिश्रम चालू आहेत.

वर्ष १६ वें. अंक १३
गुरुवार ता. २५ जून सन १९३१

वर्गणीचे दर
[वार्षि]क ट. ख. सह ३ रु. [आगाऊ]
किरकोळ अंकास १ आणा.

[जाहिराती]चे दर– समक्ष अगर पत्रद्वारे.
पैसे आल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध
केली जाणार नाहीं.

संपादक व मालक
पु. हेगडे देसाई– फारमासेवतिकु
[प्र]काशन भारत–प्रेस कुसमण केपें गोवा.

भारत
O BHARAT

Ano 16 Nº 13
Quinta-feira 25 de Junho 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

vincial se tem por mira o pro gresso, a felicidade do Pais não pode deixar de recolher a nobre lição.

Já soôu a hora de não nos limitarmos apenas a frases sonoras. Chegou o momento de trabalhar de uma forma prática e obter resultados concretos. Em diversas ocasiões, no seio do Congresso tem se lamentado a falta de industrias dentro do país. Possuimos matéria prima, temos cabedais necessários nem nos escasseiam espiritos empreendedores. Contudo se as industrias não nascem é porque falta a devida protecção que nenhuma industria, grande ou pequena, pode dispensar á nascença. ¿Podemos esperar esta protecção dos nossos governantes? A experiência responderá em negativa. Cumpre, pois, ao Congresso Provincial da India Portuguesa pregar o culto do Swadeshismo—o único meio da nossa redenção économica.

Theophilos

ECOS-E-CRITICA

Castismo Novo

Como é já sabido, o castismo dos professores do Seminário de Rachol serviu ao actual patriarca de pretexto e de justificação para a nomeação de padres europeus para os altos cargos daquele estabelecimento de ensino católico. Mas o diabo é que o remédio saiu pior do que o mal que se pretendia curar. Pois os padres europeus constituem agora uma nova casta, mais odiosa do que todas aquelas que dantes aí existiam. Esses senhores são pagos como verdadeiros nababos comparando os seus vencimentos com a miséria que ganham os seus colegas canarins. O custo de cada um deles daria para pagar maiduma duzia de professores indianos. E o leitor talvez fique espantado quando souber que êstes super-brâmanes criaram para si novos privilegios que não existiam no primitivo sistema castista do Semenario de Rachol: não se comisturam com os outros professores nem mesmo á mesa de jantar, comem separados e do melhor. Os brâmanes e os chardós indigenas passaram assim á categoria de intangiveis e párias.

Decididamente, os católicos levam a palma no que respeita á fraternidade cristã. Está-se a vêr: a *idoneidade* no civil, militar ou eclesiastico é uma questão de ventre. Excusam de passar como reformadores do castismo quando o seu proprio espirito está impregnado do mais arrogante preconceito de casta.

O europeismo é o pior de todos os castismos.

O pêso desses encargos é a causa da miséria economica da India. Mas é necessário notar que nem todas as classes sociais da India suportam igualmente esse pêso, visto a burguesia indiana ter interesses comuns com os inglesos. Os grandes proprietarios, os usurários e os comerciantes indianos partilham com a Inglaterra os beneficios resultantes da exploração do camponês indiano, produtor da matéria prima. Aparentemente o govêrno britanico não intervem na produção e na venda das matérias primas, mas permite a ignobil exploração do camponês indiano pelos grandes proprietários e pelos usurários que o obrigam a desfazer-se do produto do seu trabalho em proveito do capitalista inglês e êste em troco dá ao proprietário, em todas as circunstancias, a sua protecção contra o camponês, reduzido á fome e á miséria.

O montante da exportação anual das matérias primas atinge 225 crôres de rupias das quais 125 crôres vão para os negociantes indianos e ingleses e os restantes cem crores são divididos entre os camponeses que recebem apenas dez crôres e os proprietários grandes e médios que dispõem dos outros noventa crores. O govêrno inglês deixa explorar o camponês indiano pelo proprietario que lhe assegure a matéria prima barata exportada para a Inglaterra. Não é pois de estranhar que a burguesia indiana cujos interesses são identicos aos dos ingleses não queira contrariar nesse ponto as conveniências dos capitalistas britanicos. Durante muito tempo a propaganda dos nacionalistas indianos pretendeu demonstrar que a exportação dos produtos brutos tinha por fim pagar o custo da importação dos artigos estrangeiros, mas a falsidade dessa doutrina ficou patente no ano passado quando as importações sofreram uma grande redução sem contudo em nada ter melhorado a sorte dos camponeses, como sempre reduzidos á penuria e á fome. ¿Não é essa a melhor prova de que ao lado dos exploradores estrangeiros temos tambem exploradores indigenas?

Temos em seguida o problema da importação dos produtos fabricados da Inglaterra. O seu total anual atinge a cifra de 250 crôres e os beneficios dos comerciantes ingleses e indianos que traficam nesse negócio é de 150 crôres igualmente divididos entre esses exploradores das massas. Tambem neste capitulo os seus interesses identificam se. E' o que explica o fraco entusiasmo com que a burguesia indiana advoga a boicatagem dos artigos de proveniencia inglesa. No entanto a classe média da India teria muito a lucrar encorajando a industria nacional e indianisando os seus serviços públicos.

O terceiro meio de exploração tem merecido aos nacionalistas indianos ainda menos atenção que os dois primeiros embora seja o mais nocivo de todos. Ha cincoenta anos predominava o capital industrial e os dois primeiros géneros de exploração eram os mais perigosos, mas esses tempos já passaram. Estamos a viver presentemente na época do capital financeiro e é necessario termos a consciência desse facto essencial se não quizermos ser derrotados nas negociações com a diplomacia britanica. Ha cincoenta anos os paizes produtores de materias primas eram explorados pelos paizes industriais. Hoje, mesmo os paizes industrializados são explorados pelas grandes potencias financeiras, como a America, a Gran Bretanha, a França e a Alemanha. E' que o capital financeiro pode explorar mesmo os paises industriais por meio de seus bancos. A França não é um grande país exportador e no entanto ocupa o terceiro lugar como potência comercial graças aos seus negocios bancarios que empolgam o mundo inteiro. A última grande guerra foi um conflito provocado pelo capitalismo financeiro das quatro grandes potências ocidentais.

O Tinteiro

Disseram-nos que, logo depois de terminada a famosa sindicância á Administração das Comunidades de Bardês notou-se a falta dum tinteiro de prata pertencente a essa Administração. Não sabemos se esse misterioso desaparecimento foi objecto dum inquérito ou se o govêrno pensa em ordenar uma nova sindicância para averiguar do caso. E' sabido que o custo da sindicância ás comunidades de Bardês cifra-se em dezenas de milhares de rupias, ás quais teremos talvez de acrescentar o preço do tinteiro de prata que dizem ser valioso. Na ausência do sindicante Seabra que já se retirou da India e que devia conhecer muito bem esse tinteiro por tê-lo visto frequentes vezes durante os anos que durou a sua prolongada sindicância, ¿haverá alguem que nos informe precisamente sôbre o paradeiro desse utensilio de metal precioso, dizendo-nos o que há de verdade quanto a esse desaparecimento?

Deixem-nos contar aos nossos leitores a história do tinteiro da sindicância.

Aqui entre no's ...

Escreve A. B. C. na *Voz*, de Lisbôa, jornal insuspeito para a actual situação:

....

"E' verdade que êste (Brasil), quando chegou á maioridade, emancipou-se do pai.

171

Ano XV) Quinta-feira, 25 de Junho de 1931 (N.° 13

O BHARAT

ANUNCIOS
Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

Não se aceita nenhum anuncio ou comunicado sem ser adiantado o seu custo provavel.

Jornal de maior circulaçao

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL
Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-08-00

REDAÇAO E ADMINISTRAÇAO
COMPOSIÇAO E IMPRESSAO
Tip. *BHARAT* Cusmane-Quépém

O Culto do Swadeshi

Daqui há poucos mezes, pela nona vez, reunir-se há na capital da India Portuguesa o seu Congresso Provincial.

Da cadeira presidencial e coarão as costumadas frases retumbantes de saudação ao ilustre Chefe do Estado, palavras repassadas de sentimento pelos Congressistas que deixaram de existir, de apreço pelos sábios autores das estupendas memórias, de desejos ardentes por um porvir mais risonho para esta nesga da terra indiana tão misera e pobre. Após o tiroteio de discursos, virá o trabalho de diversas Mesas que doutamente darão o seu parecer sôbre as ponderosas Memórias que figurarão algum dia na bibliografia da India Portuguesa. Seguir-se há então a eleição dos cargos honorarios, e os salvadores da nossa querida Gôa, com *vivas* á Patria, seguidos de calorosos *handshakes* separarão para regressar para os seus palacetes, e ali á mesa de jantar, descrever aos seus ávidos ouvintes os seus *nobres feitos*, votando o congresso a um longo periodo de hibérnação.

E isto tendo por coeficiente o número de congressos havidos, dar-nos-há o resultado da mesma obra que eles tem realisado até hoje. *Words, words...* e para não faltar á verdade, um pouccoinho mais. Tem havido lindas festas em honra dos Congressistas, *tea parties* opiparos, espectaculos cinematograficos e coisas para recreio dos ociosos. De valor positivo absolutamente nada. Tratou-se, sem dúvida, da Valorisação das Novas Conquistas, dos seus imensos campos incultos, do porto de Mormugão, tão cubiçado pela nação aliada, do Fomento Agricola, da Protecção ás Industrias, da Instrução, da Emigração, do Alcoolismo, do Turismo (que formidavel lista, Santo Deus!). Tratou se, enfim, de todos os assuntos que o céu estrelado encerra no seu benigno manto. Todavia a India Portuguesa não avançou um palmo sequer donde os nossos avoengos a deixaram. Continuou moribunda, agonisante, vivendo só graças ás preciosas injecções que o emigrante regularmente lhe ia ministrando nas suas veias depauperadas. E agora que esse desterrado que permitia aos nossos homens públicos, numa inconsciência pasmosa, *flirtar* com o destino da nossa querida terra regressa a ela, com mãos vasias, ¿qual o caminho a seguir? O Congresso Nacional Indiano que sob o comando de um *fakir* semi-nú conseguiu humilhar o insolente John Bull aponta-nos a vereda pela qual um povo decrépito e espesinhado pode viver desafogadamente. Para acabar com a exploração deshumana dos descendentes dos Clives e Hastings, o *sage* do Sabarmati, não necessitou outra arma senão fazer do *swadeshismo* um culto que todos os indios, cristãos, parses, mouros ou indus podiam livremente professar.

E o nosso Congresso Pro-

INDEPENDENCIA

As classes sociais da India e o movimento da Independencia Nacional

No seguinte discurso, pronunciado em Calcatá por Sjt. Bakim Makherji, acha se encarado o problema momentoso da Independência da India no seu aspecto economico e politico e sob o ponto de vista dos interesses das diferentes classes de que se compõe a nação indiana. A forma clara na qual está exposto êsse assunto de interesse imediato para o nosso paiz permite compreender os acontecimentos que se estão a desenrolar actualmente na scena politica da India e ás fases pelas quais estão passando as negociações entre o Congresso Nacional Indiano e o govêrno britanico.

Elegendo hoje um socialista para a presidência desta assembleia vós acabais de reconhecer aos socialistas o direito de fazer ouvir a sua voz na politica dêste paíz donde durante muito tempo êles foram arredados dos seus negócios públicos.

Todos estão anciosos pela independência, mas nota-se ao mesmo tempo uma deploravel ausência dum programa definido e mesmo duma concepção clara do que seja a Independência. Eis a razão das constantes mudanças que tem sofrido o vosso programa e o vosso credo politico. Uma ideia clara e definida do que é a independencia completa é indispensavel para fixar uma linha de conduta e impedir as frequentes mudanças do alvo politico que temos de visar.

Há muitos que não compreendem ainda que existe uma contradição basilar entre o ideal do Dominion Status e o da Independência. O Dominion Status é mais humilhante e nocivo do que o proprio regime de sujeição, mas muitos ainda consideram no como uma preparação para a independência O Dominion Status sendo um regime de acôrdo entre os interesses britanicos e indianos não pode ser atingido sem o consentimento do Imperio Britanico. A Independência pelo contrario não precisa ser ratificada pelo Parlamento inglês e terá de ser alcançada contra a vontade da Inglaterra. ¿Haverá alguem que imagine que o parlamento britanico esteja disposto a sacrificar os interesses materiais do seu paiz?

Eis os interesses que ligam Inglaterra á India: 1° O monopolio das matérias primas indianas. 2° O monopolio do mercado para os objectos fabricados ingleses. 3° Garantia para o capital britanico já investido na India e para os novos capitais a serem empregados no futuro nas industrias indianas 4° Emprego para a classe média inglesa nos cargos do funcionalismo da India.

Fernandes, solteiro morador em Velim e ora ausente em Bombaim teritorio britanico em parte incerta para assistir a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede por óbito de Manuel Salvador Fernandes que foi da mesma em que é inventariante e cabeça de casal Octaviano de Silva, do mesmo lugar sem prejuiso do seu regular andamento. O que para ser publico se expediu este. Quepem, 12 de Junho de 1931.

O escrivão do 2 ° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei

O juiz de direito 1 ° substo.

Abilio Sousa

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do primeiro oficio Viegas vão ser vendidos em hasta pública judicial á porta do tribunal desta comarca no dia 30 do corrante mês pela 1.a vez, ás 10 horas e por maior lanço que se oferecer acima da sua avaliação os seguintes bêns moveis penhorados nos autos de execução por custas que o M. P. promove contra Vinaeca Trivinem Gan de Canacona por apenso aos outos civeis de embargos de 3 ° em que é embargante o mesmo Vinaeca e embargado Narbá Pautú Naique Dessai, de Delem apensos êstes por sua vez aos de execução comum que o mesmo Narbá promove contra Sivá Putú Folo Dessai e mulher de Mudcudo:—

Um moinho de ferro de extrair sumo de cana sacarina em perfeito funcionamento ou em bom estado avaliado por 200 rupias;

Dois taxos de ferro sendo um contendo 2 mãos de jagra avaliados por cincoenta rupias; Trinta e dois cabões cheics de jagra avaliados por cem rupias; Onze latas vazias de petrolio contendo jagra avaliadas por 35 rupias.

O arrematante pagará as despesas da praça. Para ser público se expediu este. Quepem, 12 de Junho de 1931.

O escrivão do 1 ° oficio

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei

O juis de direito 1 ° substituto

Abilio da Conceição e Souza

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar correm éditos de 30 dias a contar do dia da 2 a publicação deste citando a José Antonio Alfrêdo Menino de Almeida, marido da interessada Maria Santana Herminia Fernandes de Carmonã de Salcete e ora ausente em parte incerta de Bombaim para assistir a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede por obito de Manuel Salvador Fernandes que foi de Velim em que é inventariante e cabeça de casal Octaviana da Silva do mesmo lugar sem prejuiso do seu regular andamento, bem assim para comparecer no tribunal judicial desta comarca situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem na primeira audiencia findo o praso de éditos afim de conferir o dote de tres mil e quinhentas rupias recebido por ocasião do seu casamento com a dita Maria. As audiencias deste juizo se fazem em todas as terças e sextas feiras ás 10 horas se não forem feriados porque neste caso terão lugar nos dias imediatos se tambem não o forem e não estiverem compreendidos nas férias. O que para ser publico se expediu este Quepem, 28 de Março de 1931.

O escrivão do 2 ° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei

O juiz de direito

A. Coloço

Pelo juizo de direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar, correm editos de 60 dias a contar da segunda publicação deste citando o interessado João Crusinho Rodolfo d'Almeida, solteiro de Assolnã e ora residente em Africa, parte incerta para assistir a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede por óbito de José Sebastião de Almeida que foi de Assolnã, em que é inventariante e cabeça de casal Maria Piedade Coutinho do mesmo lugar sem prejuiso do seu regular andamento. O que para ser público se expediu este.

Quepem. 9 de Junho de 1931

O escrivão do 2 ° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei

O 1 ° substo do juiz

Abilio Sousa

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas, correm éditos de 30 dias a contar da 2.a publicação do último anuncio nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civil, citando o interessado Militão de Almeida, de Cuncolim e ora ausente em Bombaim, em parte incerta para querendo assistir a todos os termos até final dos autos de inventario orfanológico que Constancio Fernandes de Cuncolim, presta por óbito de Camilo Caetano Almeida, que foi da mesma e deduzir nele seus direitos nos termos de lei, sem prejuiso do seu regular andamento. Para ser público se expediu este. Quepem, 28 de Maio de 1931.

O escrivão do 1 ° oficio

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei

O 1 ° substituto do juiz de direito

Abilio Sousa

Outro tanto acontecerá ás outras provincias, mas isto é a lei do mundo: filho creado abandona os pais.

"Mas nós como todos os bons pais devemos fazer para que, perdida a autoridade sôbre os filhos não percamos o seu amor e o seu respeito".

Aqui, na India Portuguesa, uma das provincias de Portugal, procura-se manter o nosso "amor" e o nosso "respeito" á Metropole negando-nos os cargos de administradores a falso pretexto de que entre nós não existem *idoneos* e escorraçando do Liceu Central nativos com longos anos de bom e efectivo serviço de professores provisórios para os fazer substituir pelos *brancos*, extranhos ao magistério.

E tudo isto depois de 4 séculos de tal acção civilisadora.

Civilisação pelos pe's

O Código das Estradas torna obrigatório aos conductores de automoveis o uso de "calçado (sapato ou bota)", como se lê no mesmo Código.

Vem esta exigência—precisamente no momento em que o elemento pensante do país inicia o movimento para supressão de usos, costumes prejudiciais para o nosso clima e extranhos á civilisação nossa, isto é, indiana.

¿Pretende o Govêrno, entalando os pés dos condutores em calçados, torna-los progressivos, civilisados? Se assim é bem está. Já que quatro centos anos de tal acção civilisadora de Portugal não bastaram para nos meter a civilisação pela cabeça como prova a fenomenal percentagem dos analfabetos, vá agora de tentar civilisar-nos pelos pés.

Bôa sorte na empreza, senhores civilisadores.

A ser verdade...

Isto de, aparentando privanças com as autoridades púcos, *engrolar* os papalvos e incautos, constitue, pelo visto, um rendoso meio de vida a certos pataratas.

Informam-nos que pelas bandas de Margão tem surgido um *leão de costas* espaduadas que, dizendo-se amigo do comando policial daquela vila, especula torpemente os pobres diabos que lhe caiam nas garras, prometendo-lhes fundos e mundos... quando a verdade é que o mesmo comando anda alheio ao jogo do intrujão.

A ser verdade êsse informe urge que o tal *rei dos animais* seja chamado á ordem

O capitalismo britanico encontra na India emprego para vinte mil milhões de rupias, sendo senhor de 80% a 90% das industrias indianas. E' essa a sua principal fonte de riqueza. O Imperio britanico está pronto a sacrificar os beneficios que tira do seu comercio de exportação e importação com a India e os salarios do seu funcionalismo se lhe são garantidos os proveitos fabulosos que retira do capital colocado na India e a extensão dêsse capital para o futuro. Fenomeno curioso, os chefes nacionalistas indianos não se opõem a essa dominação do capital financeiro britanico que é a mais prejudicial de todas as dominações para os interesses da India. A Inglaterra está disposta a transportar o Lancashire e Manchester para a India. Feito isso a exportação das matérias primas da India terá cessado e a importação dos produtos manufacturados não será necessária porque o consumidor indiano terá êsses produtos em casa, fabricados pelas industrias indianas sob a direcção do capital financeiro britanico E' a êsse resultado que nos levará o regime do Dominion Status, que implica a liberdade comercial dentro do Imperio Britanico. O seu efeito será desastrado para a India que será assim ainda mais subjugada pelo capitalismo inglês. A invasão das industrias estrangeiras esmagará completamente as industrias locais. O resultado será de criar novas dissenções entre os adversários do imperialismo britanico e de prolongar a exploração do país. A grande burguesia e a classe média, que passarão a colaborar com a finança britanica, serão os maiores adversários do movimento da Independência da India e os mais leais agentes dos interesses britanicos. O Dominion Status com salvaguardas visa a salvar na India os interesses britanicos. As salvaguardas serão temporarias, diz-se, mas quando elas desaparecerem a Inglaterra as terá substituido por uma nova classe de capitalistas indianos, seus aliados.

Para vermos claro na confusão que reina nos nossos problemas sociais e politicos o único remédio que nos resta é de encará-los sob o angulo dos interesses das classes estudando-os no seu aspecto economico. O nosso maior defeito é de negar a existência da luta de classe neste país. A sociedade indiana é composta de quatro classes:

(1) A aristocracia territorial, sobrevivência do feudalismo medieval, que politicamente está submissa ao estrangeiro

(2) Os modernos capitalistas e burgueses, que são reaccionarios e exploram as massas.

(3) A classe média, que é politicamente extremista, mas socialmente conservadora, não querendo identificar-se com a massa.

(4) As massas trabalhadoras e proletarias oprimidas e exploradas, que são a única força revolucionaria do país.

Quem quiser estar na vánguarda da luta pela libertação tem de aderir ao movimento proletário em vez de gastar tempo e energia na politica reaccionária ou oportunista dos burgueses. O interesse geral da India identifica-se perfeitamente com os interesses da sua classe trabalhadora.

Uma *Nota Oficiosa*, publicada em *O Heraldo* de hontem, 24, indica, porém, que o Govêrno vai acabar com a *abusiva especulação inteiramente censuravel* da referida firma. Ainda Bem!

Lamentações

Com justa rasão, a imprensa católica lamenta que na Espanha tenham sido barbaramente invadidos e incendiados os conventos dos jesuitas e de outras congregações, os mosteiros etc. etc.

Vingou-se o assassinato do Ferrer e de tantos outros.

A fúria reaccionaria fôra muito mais feroz ao tempo em que Portugal era fidelissima, a França cristianissima e a Espanha catolicissima.

Por estes tempos, na Itália bem pouco durou o papel que Mussolini quiz desempenhar pelo acôrdo de Latrão á imitação de Constantino Magno, Pepino o Breve e Carlos Magno.

Ainda bem que todos êles não entraram no rol dos santos canonisados. Só a mãe do primeiro mereceu êsse titulo, por valer aos clericais.

¿E porque não o alcançou a célebre Catarina de Medicis?

O merecimento dos serviços prestados por esta foi muito maior do que o de Joana d'Arc.

Não se quer dizer com isso que o mundo culto aprovou o procedimento da Espanha. O que se pensa é que se a moral evangelica vigorasse, e a sublime doutrina de Cristo fôsse fielmente observada, os clericais seriam inofensivos mendigos ambulantes, como o foram os Apostolos.

C. V. Gomes Pereira

200% de lucros

Uma livraria da capital publica no *Heraldo* anuncio oferecendo-se a vender os livros da Instrução Primaria *por dois terços do preço estabelecido pelo depositario único constituido.*

O depositário é o sr. Artur Viegas.

Anuncios

मुत्राचें अत्यंत महत्व आहे. श्रावणींत पंचगव्य असतें तें गोमातेपासूनच मिळतें. गोदानाचें फारच पुण्य आहे. घरीं गाय पाळल्यानें इतर पुष्कळ फायदे होतात. वसुबारस, गोपाष्टमी, दसरा इत्यादि सणांत गोपूजन पुष्कळ महत्वाचें आहे. जिचे ठिकाणी देवाची वसती आहे व जिचे नेत्र ह्मणजे चंद्र सूर्य आहेत, ती गाय घरीं पाळा. गोरक्षण, गोपालन व गोसंवर्धन यांपैकीं कांहीहि करा. पण करा.

वर्तमानसार

—मडगांव येथील मठग्रामस्थ हिंदुसभेच्या श्रीदामोदर विद्यालयांत चौथ्या व पांचव्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांकरितां पुढील आठवड्यापासून प्रत्येक सोमवारीं एक तास आणि गुरुवारीं सुटीच्या दिवशीं सायंकाळीं तीन तास याप्रमाणें गायनाचा वर्ग चालणार आहे. सुप्रसिद्ध गायनाचार्य पंडित विष्णु दिगंबर पलुसकर यांच्या गांधर्व महाविद्यालयाचा शिक्षणक्रम पूर्ण केलेले श्री. अनंत केशव पर्वते या विद्यालयीन शिक्षकांची या कामीं योजना केलेली आहे. असें विद्यालयाचे चिटणीस श्री. यशवंत विष्णु पै रायतुरकर हे कळवितात.

—मडगांव येथील 'दैवज्ञ ब्राह्मण समाज' या संस्थेचे सन्माननीय सेक्रेटरी रा. भिकू वामन वेर्णेकर हे चालू महिन्यांचे १५ तारखेस एकाएकीं हृदयाची क्रिया बंद पडून कैलासवासी झाले, हें कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें. मृत्यूसमयीं त्यांचें वय अवघें ३९ वर्षांचें होतें. त्यांच्या मृत्यूमुळें दैवज्ञ ब्राह्मण समाजाची बरीच मोठी हानि झाली आहे. सदर संस्था उर्जितावस्थेला आणण्याच्या कामीं ज्यांचे परिश्रम कारणीभूत झाले त्यांतील प्रमुख सभासदांपैकीं एक असून ते तिच्या कार्यांत अत्यंत कळकळीनें भाग घेत असत. त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें त्यांच्या तरुण पत्नीवर व एकुलत्या एक लहान मुलीवर हा दुःखाचा डोंगरच कोसळला आहे. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो.

—गोमांतकांतील सुप्रसिद्ध मोर्लेंगडावर सध्या मांद्रे येथील श्रीयुत देसाई नावांचे एक सद्गृहस्थ सांवसारिक आपत्तींनें विरक्त झालेले असून ते तेथें येणाऱ्या शेंकडोशः लोकानां तेथील झऱ्याच्या पाण्याचें स्नान करण्यास लावून आपण तयार केलेलें तीर्थ त्यांना देतात. जेथें हे आसनस्थ होतात तेथें एक धुमी घातलेली असून भाविक लोकांनीं भेटीसाटीं आणलेल्या वस्तु त्या धुमींत टाकण्यास सांगतात. या गोष्टीस सुमारें दोन महिने होत आले. इतक्या अवधींत त्रिविध तापानें पोळलेल्या पुष्कळ लोकानां बराच फायदा झाल्याची लोकवदंता आहे. गरजूंनीं इच्छा असल्यास या कपिलाषष्टीच्या योगाचा फायदा घ्यावा!

—वेलगें–सत्तरी येथें एक फार जुना फणसवृक्ष असून त्याचा घेर २४ फूट आहे. त्याचे मोठमोठे फांदे कालमानाप्रमाणें मोडून गेलेले आज दिसत आहेत. या वृक्षास पूर्वी ७।८ हजार फणस येत असत. आज आहे त्या स्थितींत १०००।१५०० फणस येत असतात. या वृक्षाचे बुंधास जी पोकळी आहे तींत कांहीं माणसें राहू शकतील.

संदेशकारांचें निधन !

५।६ दिवसांच्या विषम तापानें दे. भ. अ. ब. कोल्हटकर हे कालवश झाले, हें येथें नमूद करण्यास आह्मांस अत्यंत तीव्र दुःख होत आहे. मराठी वृत्तपत्रलेखनांत घडवून आणलेल्या अपूर्व क्रांतीमुळें, संदेशकारांचें नांव मराठी भाषा जिवंत असेपर्यंत गौरवपूर्वक उल्लेखिलें जाईल यांत बिलकूल संदेह नाहीं. कोल्हटकरांची प्रतिभा उच्च प्रतीची होती. मराठी भाषेवरील त्यांचें प्रभुत्व असामान्य होतें. आणि कितीहि कठीण प्रसंगानें त्यांचें चित्तस्वास्थ्य भंग पावत नसे. या तिन्ही गुणांमुळें श्रेष्ठ कवि, श्रेष्ठ लेखक व श्रेष्ठ देशभक्त असा तिहेरी लौकिक संपादण्यास संदेशकार समर्थ झाले. मराठी मथळ्यांची मार्मिक मख्खी मरहूम कोल्हटकरांनाच माहीत होती. असा अनेक गुणसंपन्न पुरुष अत्यंत आवश्यकतेच्या प्रसंगीं हिंदुस्थानला अंतरला हें आमचें दुर्भाग्य होय. मुंबईच्या सु–प्रसिद्ध कर्नाटक प्रेसचे मालक श्री. एम्. एन. कुळकर्णी [नाडकर्णी नव्हे] यांच्या मालकीच्या प्रगति पत्रांतून कोल्हटकरांसंबंधीं खालील माहिती प्रसिद्ध झाली आहे:–

'अ. ब. को.' ऊर्फ अच्युतराव कोल्हटकर यांचा जन्म, विद्वान ह्मणून कित्येक पिढ्या गाजलेल्या वाईच्या कोल्हटकर घराण्यांत १८७९ सालीं झाला. आंग्लाईच्या सुरवातीस उत्तम वक्ता ह्मणून महाराष्ट्रभर गाजलेले महादेवशास्त्री कोल्हटकर हे यांचे आजोबा व एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सुधारकाग्रणी ह्मणून गाजलेले व नेमस्तांचे वऱ्हाडांतील महत्वाचे पुढारी रा. रा. ब. वामनराव कोल्हटकर हे यांचे वडील होत. वामनराव कोल्हटकर हे कर्ते सुधारक होते. प्रथम पत्नी–अच्युतरावांची आई–वारल्यावर यानीं एका विधवेशीं तत्त्वाकरितां ह्मणून विवाह केला. वामनराव त्यावेळीं फार मोठ्या सरकारी हुद्यावर होते आणि तसाच प्रयत्न केला असता तर एखाद्या सुशिक्षित सुंदर विधवेशीं त्यांना लग्न करणें शक्य होतें. त्या काळच्या विधवेशीं विवाह करणाऱ्या लोकांविरुद्ध असा एक आक्षेप असे कीं, ते सुंदर विधवेशींच लग्नें करतात. विधवेशीं लग्न करण्यांत तत्वपूर्तीपेक्षां विषयपूर्तीचाच उद्देश अधिक असतो, तसा नसेल तर सुधारक कुरूप व निरक्षर विधवांशीं कां लग्नें करीत नाहींत, असा वारंवार सवाल करण्यांत येई. या सवाल करणाऱ्यानां वामनरावानीं आपल्या कृतीनें चुप बसविलें. त्यानीं जाणून बुजून एका निरक्षर व जवळ जवळ कुरूपतेच्या सदरांत मोडणाऱ्या विधवेशीं लग्न केलें वामनरावांच्या स्नेह्याना वामनरावांची ही कृति आततायीपणाची वाटली. पण कांहीं वर्षांनंतर हें ह्मणणें त्यांना मागें घ्यावें लागलें. वामनरावांनीं या निरक्षर पत्नीला सर्व तऱ्हेनें इतकें सुशिक्षित व सुसंस्कृत केलें कीं स्वतःच्या सुशिक्षिततेचा व सुसंस्कृततेचा तोरा मिरविणाऱ्या स्त्रियांनींहि खालीं मान घालावी. वामनराव हे पक्के मवाळाग्रणी होते. टिळक व त्यांचें राजकीय तत्वज्ञान यांची ते थट्टा करीत, त्यांच्याशीं संबंध ठेवणारे लोक त्यानां शत्रूप्रमाणें वाटत. पण विधिघटना अशी विलक्षण कीं, त्यांच्याच घरांत त्यांच्यावर तोंड सोडणारी, त्यांच्या पक्षाची व तत्वज्ञानाची रेवडी उडविणारी व टिळकांचा नम्र पाईक ह्मणून त्यांच्या राजकीय तत्वज्ञानाचा महाराष्ट्राच्या एका कोंपऱ्यापासून दुसऱ्या कोंपऱ्यापर्यंत प्रसार करणारी व्यक्ति जन्माला आली. ही व्यक्ति ह्मणजे अच्युतराव कोल्हटकर होत. बापाचें आणि मुलाचें कधींच जमलें नाहीं. दोघांच्या दिशा भिन्न, मार्ग भिन्न, मनोरचना भिन्न, आयुष्यविषयक विचार भिन्न. एका गोष्टींतच काय ती साम्यता होती. आणि ती ह्मणजे बेडरपणांत. कच खाणें, माघार घेणें हें दोघांनाहि ठाऊक नव्हतें. उघड उघड आपल्याविरुद्ध समाज खवळला असून, एक शब्द बोलूं द्यावयाला तो तयार नाहीं, हें ठाऊक असतां, इतकेंच काय पण प्राण जाण्याचाहि प्रसंग ओढवण्याचा संभव आहे हें ठाऊक असतां, स्वारी कधीं डगमगली नाहीं, चेहऱ्यावर भीतीची पुसटसुद्धां छटा दिसूं न देतां आपलें ह्मणणें समाजाला ती ऐकावयालाच लावी.

अच्युतरावांच्या उत्तर आयुष्यांत त्यांच्या निरंकुश वागण्यामुळें त्यांचेवर अनेक आपत्ति कोसळल्या. त्यांच्याऐवजीं दुसरा कोणी असता तर तो जगांतून कायमचा उठला असता. पण त्यांच्या बेडर वृत्तीमुळें या आपत्ति त्यास स्थानच्युत करूं शकल्या नाहींत. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, या गुणाचा राजकारणांत जितक्या प्रमाणांत उपयोग व्हावा तितक्या प्रमाणांत तो झाला नाहीं. त्यांच्यांतील बेफाटपणा या उपयोगाच्या आड आला. हा बेफाटपणा त्यांच्यांत नसता तर अच्युतराव कोल्हटकर ही व्यक्ति महाराष्ट्रीय राजकारणांत एक महत्वाची व्यक्ति होऊन बसती. लोकनायक होण्यास लागणारें धैर्य, साहस व प्रयत्नवादित्व हे गुण त्यांच्यांत होते. पण या गुणांची केवळ बेफाटपणामुळें नासाडी झाली. या बेफाटपणामुळें 'संदेश'सारखें अत्यंत भरभराटलेलें पत्र अखेरपर्यंत त्याच स्थितींत त्यांस ठेवतां आलें नाहीं. अखेरी अखेरीस तर अज्ञातवास पत्करून दुसऱ्यांच्या नावांनें वर्तमानपत्रें चालविण्याची त्यांच्यावर पाळी आली.

मृत्यूच्या अगोदर कांहीं दिवस 'संदेश' पत्र शाश्वत पायावर पुनः उभारून तें अच्युतरावांकडून चालविण्याची एक निश्चित योजना येथील इंग्रजी, गुजराथी वृत्तपत्रांचे एका चालकांकडून तयार होत होती असें कळतें. तसें झालें असतें तर अच्युतरावांच्या मागचा अज्ञातवास सुटून त्यांचें चमचमीत लेखन वाचण्याकरितां हपापलेल्या महाराष्ट्रीयांची बहुत दिवसांची इच्छा तृप्त झाली असती.

अच्युतरावांत, महाराष्ट्राच्या आवडत्या नावांनें संबोधावयाचें झाल्यास अ. ब. कांत वरील प्रकारचे दोष असले तरी एक वृत्तपत्रलेखक या दृष्टीनें विचार करूं लागलें ह्मणजे ते दोष कुठल्या कुठेंच विसरले जातात, आणि वृत्तपत्रलेखकांत 'यासम हा' असेच प्रसंशोद्गार मुखावाटे बाहेर पडतात. विशेषतः व्यक्तीच्या मृत्यूनंतर तर गुणच डोळ्यांपुढें ठळकपणें उभे राहून मान आदरानें लवते. अच्युतरावांची निधन वार्ता ऐकून प्रत्येक महाराष्ट्रीयांची स्थिति अशीच होईल.

अच्युतरावांच्या आकस्मिक मृत्यूमुळें महाराष्ट्र एका थोर वृत्तलेखनधुरंधराला मुकलें आहे.

गोरक्षणाची जरूरी.

[ले. मुरलीधर शंकर देशपांडे, फलटण]

ज्या देशांत गोधन कमी होत जातें, त्या देशांत इतर उत्पन्नहि कमी होत जातें. गोधन –अर्थात गाई– कमी झाल्या कीं उत्पन्नाचें प्रमाण कमी होत जातें. परदेशांत गाई–इतर जनावरें– जातात पण ती आपली संपत्तीच परदेशास जात आहे असें समजा. आपण चिपाडें ह्मणून टाकून दिलेल्या पदार्थांवर उपजीविका करणाऱ्या गाईला परदेशीं पाठवून आपण आपलाच तोटा करीत असतों. आपला टाकाऊ [चिपाडें, वैरण, गवरा, पेंड, भूस वगैरे] पदार्थ खाऊन त्यावर संतुष्ट राहून आपणाला उपयोगी असे जिन्नस देणारीं गाईबैलांसारखीं जनावरें आपण नाहिंशीं न करणें हेंच बरें. त्यांच्यापासून आपणाला दूध, तूप मिळतेंच पण त्यांचा टाकाऊ पदार्थहि आपल्याला उपयुक्त असतो. उदाहरणार्थ त्यांचें शेण, मूत वगैरे. आपली घाण काढण्यासाठीं जनावरांची घाण लागते. 'यंत्राच्या साह्यानें शेती करतां येईल' असें कित्येक ह्मणतात पण हा त्यांचा निवळ भ्रम आहे. कृत्रिम खत व यांत्रिक मशागत यांनीं शेत मात्र खराब होतें व कांहीं दिवसांनीं टाकाऊ होतें. त्यानां मलमुत्राचेंच खत घालणें जरूर आहे.

भरपूर खतासाठीं जनावरांची जरूरी आहे. व जनावरांचा संहार बंद केल्याशिवाय जनावरांची पैदास होणें कठीण आहे. देशांतील संपत्ति देशांतच असणें आणि ती परदेशांत जाणें, या दोन्हींच्या अनुक्रमें चांगल्या आणि वाईट परिणामाचें प्रत्यक्ष उदाहरण ह्मणजे मोंगली राज्य आणि इंग्रजी राज्य होय असें इतिहासकार ह्मणतात. यावरून पाहतां आपणाला परदेशाकडे वरचेवर पहावें लागतें, परदेशच्या जिनसांवर अवलंबून रहावें लागते. यांतच आपलें नुकसान व अधोगतीचें रहस्य आहे. ज्या वस्तु आपणाजवळ असतानां त्या आपण दुसऱ्याला देतों व पुन्हां त्याच वस्तूंची वाट पहात बसतों याचा अर्थ काय ? इतर देश स्वदेशीचा जोरानें प्रसार करीत असतानां आपण त्याचें अनुकरण कां न करावें ?

हिंदु लोकांना गाईचें महत्व माहीत आहे इतकेंच नव्हे तर हिंदुलोकांची मनें दुखविलीं जाऊं नयेत व शेतीला जनावरांचा उपयोग व्हावा या बुद्धीनेंच बाबर, हुमायूत, अकबर यानीं गोवधबंदी केली होती. गाय ही धार्मिक दृष्टीनेंहि अत्यंत महत्वाची आहे. प्राचीन काळीं गाईचें महत्व हिंदुलोक जाणत होते. गाईचें दूधदुभतें खाऊन शरीर पुष्ट होतें. तिच्या होणाऱ्या बैलांपासून शेतांतून उत्पन्न काढतां येतें व त्या उत्पन्नावर सर्व संसार व व्यापार चालावयाचा. जमिनींत उत्तम पीक येण्यास खताची अत्यंत जरूरी आहे हें सर्वांस माहीत आहेच. पण स्वतःसाठीं ज्या जनावरांच्या शेणमुत्राचा उपयोग होतो, तीं जनावरें पालन करणें आपलें आद्य कर्तव्य आहे हें यावरून सिद्ध होत आहे. पण इकडे मात्र कोणीच लक्ष देत नाहीं. सुमारें एक कोटी गाईंची हत्या दरवर्षी आपल्या देशांत होत आहे. यासाठीं गोवधबंदीच्या कायद्याची योजना केली तरच आपला व आपल्या देशाचा तरणोपाय आहे. शेतीच्या उत्पन्नांत कमतरता आल्यामुळें कित्येकानां अर्धपोटी रहावें लागतें. भरपूर अन्न मिळाल्याशिवाय लोक निरोगी व सशक्त निपजणार नाहींत. ज्या जनावरांमुळें दुधाची पैदास होते व मुलाबाळांचें संगोपन होतें. अशा जनावरांचा वध करूं नका.

स्वराज्य मिळविण्याचे हरतऱ्हेचे प्रयत्न चालू आहेत. पण त्यांचा बरोबर विचार न करतां आपल्या देशांतील माल परदेशास जाऊं न देणें व शेती सुधारणा करणें याच गोष्टी मुख्य मानल्या गेल्या पाहिजेत. सध्या जे प्रयत्न चालले आहेत ते योग्यच आहेत पण त्यांबरोबरच इकडेहि लक्ष देऊन त्यांचा अंगिकार करणें जरूर आहे. देशांतील प्रजेची शरीरप्रकृति सुदृढ नसेल तर तो देश दुबळा बनतो. सुधारणेच्या व धकाधकीच्या काळांत टिकाव धरणारांस सशक्ततेची जरूरी आहे. आणि सशक्ततेला पोटभर अन्न व भरपूर दूध यांची आवश्यकता आहे.

गाईच्या महत्वाला अनेक कारणें आहेत. दुधाचा उपयोग व खत यांखेरीज आणखीहि कित्येक गोष्टींत तिचा उपयोग होतो. शिशुसंगोपन करण्यास गाईच्या दुधाची जरूरी लागते. गाईचें दूध आरोग्य दृष्ट्या फारच पवित्र आहे. गोरस ह्मणजे पृथ्वीवरील अमृत आहे. गाईचें दूध पचण्यास सुलभ व हलकें आहे. आजारांत गाईचें दूध उपयोगी पडतें. वैद्यशास्त्रांत गो-

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, अ. ज्येष्ट व. ३ या शके १८५३

डोळे उघडूं लागले !

अर्थ–नीति–आरोग्य या गोष्टींचा बिलकूल विचार न करतां पर संस्कृतीचा अंध स्वीकार करणें आत्मघातकीपणाचें कसें आहे याची आतां गोमांतकीय खिस्ती समाजाला जाणीव होऊं लागली असून येथील परिस्थितीशीं विसंगत असलेले परकी रीतीरिवाज व अनिष्ट सवयीं नष्ट करण्याचा सदर समाजांतील कांहीं सुशिक्षित पुढाऱ्यांनीं चंग बांधला आहे. उपरोक्त हेतु मूर्त स्वरूपांत उतरवण्याच्या उद्देशानें त्यांनीं 'आर्थिक सामाजिक संघटण' या नावांची एक संस्था स्थापिली असून, तिच्या अनुयायांची संख्या दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. आणि संस्थेचें उच्च ध्येय देशहितकारक असल्यानें तिचा झपाट्यानें उत्कर्ष होईल, हें उघड होय.

येथील सुशिक्षित खिस्ती समाजाचा पेहराव आर्थिक, नैतिक व आरोग्यशास्त्रदृष्ट्या त्याज्यच आहे. विक्षिप्तपणा व फॅशनमुळें दरघडी होणारा बदल या दोन कारणामुळें त्याचा यापुढें मुळींच स्वीकार करण्यांत येऊं नये असें सदर संस्थेनें निश्चित केलें आहे. विद्यमान पेहराव ह्मणजे एक जुना व भयंकर रोग असून त्याचा नायनाट करण्यासाठीं संस्था अव्याहत झटणार आहे. तसेंच, सांप्रतची व्यक्तिक व सामुदायिक राहणी अत्यंत महाग होऊन बसली असल्यानें व तिच्या मानगुटावर एखाद्या बुद्धिमान व सुशिक्षित लोकांच्या कर्तृत्वशक्तीच्या विकासाच्या आड येणारा दिखाऊ शिष्टाचारान्ना खवीस हैदोस घालीत असल्यानें, त्या राहणीचें आमुलाग्र उच्चाटण करण्याचीहि सदर संस्थेची इच्छा आहे. हें ध्येय हस्तगत होण्यासाठीं संस्थेचे प्रचारक अर्थ, नीति व आरोग्य यांवर घाला घालणाऱ्या व परसेच्या संयोगानें येथील समाजांत मुरलेल्या रूढींविरुद्ध निकराचें युद्ध पुकारणार असून येथील लोकांचे रीतिरिवाज व संवयी पाश्चात्य व अमेरिकन लोकांच्या सारख्या नसल्याची निश्चिति ते तिला पटवणार आहेत. त्याचप्रमाणें "एकाद्या देशाची खरी भरीव सुधारणा एकाद्या संस्कृतीची—मग ती कितीहि उच्च असल्याचा भास होवो—तिच्यांतील बऱ्यावाईट गोष्टींचा सारासार विचार न करतां तंतोतंत नक्कल करणें यावर अवलंबून नसून फक्त दरेक संस्कृतींत उत्तम असेल त्याचा स्वीकार व वाईट असेल त्याचा अव्हेर–मग हा वाईटपणा कितीहि भव्य भपकेबाजीनें प्रकाशलेला असो–करणें यावरच विसंबून आहे," याहि शिकवणीचे धडे उपरोक्त नमुनेदार संस्था येथील समाजाला देणार आहे. स्व–ध्येय साधनार्थ संस्थेनें खालील ठराव मान्य केले आहेत:—

१ पुरुषवर्गाचा पोषाख पुढीलप्रमाणें असावा: घरांत व कामाच्या वेळीं लहान किंवा लांब पैरण व मोटकी किंवा लांब पाटलोण (पायजमा); सामाजिक व्यवहारांत सदर पेहरावावर पायांपर्यंत पोंचणारा लांब, समोरच्या बाजूनें गुंड्या व मध्यभागीं पट्टा असलेला सदरा (काबाय); बायकांनीं घरांत व कामाच्या वेळीं हवा तसला पेहराव करावा, मात्र सामाजिक व्यवहारांत 'साडी'च वापरली पाहिजे.

२ आयुष्यांतील उत्सवप्रसंगीं असो किंवा दुःखसमयीं असो, काळ्या व वजनीं वस्त्रांचा कधींच उपयोग करण्यांत येऊं नये. निकटचें सुतक दर्शविण्यासाठीं उजव्या व दूरचें सुतक दर्शविण्यासाठीं डाव्या हाताला साध्या व हलक्या 'क्रेपी'चा तुकडा बांधण्यांत यावा.

३ 'भेय', बूट, व इतर आरोग्यविघातक व येथील हवेला मान्य नसलेल्या गोष्टींचा त्याग करून पेहराव आर्थिकदृष्ट्या साधा बनवण्याचा प्रयत्न केला जावा.

४ साध्या पादत्राणाचा प्रसार करण्यांत यावा व शिरस्त्राण वापरणें किंवा न वापरणें हें पुरुषवर्गाच्या इच्छेवर अवलंबून असावें.

५ कसलाहि रात्रीचा समारंभ बारा वाजण्याच्या आंत व दिवसाचा सूर्यास्ताच्या आंत संपवण्यांत यावा.

६ कसल्याहि सबबीवर मादक पेयांचा उपयोग केला जाऊं नये. भेटीच्या प्रसंगीं तीं कोणी कोणाला देऊं नयेत व दिलीं गेल्यास त्यांचा कोणीहि स्वीकार करूं नये.

७ आनंदोत्सवप्रसंगीं किंवा दुःखाच्या समयीं मादक पेयें अर्पिलीं जाऊं नयेत. त्यांच्याऐवजीं साधे खाद्य पदार्थ अर्पण्यास व खाण्यास हरकत नाहीं.

८ अल्पावधींतच मादक पेयें व तंबाकू यांचें समूळ उच्चाटण होऊन त्यांच्याऐवजीं दुसरे साधे व आरोग्यकारक पदार्थ उपयोगांत आणण्यासाठीं अविश्रांत चळवळ करण्यांत यावी.

९ बाहेरून येणाऱ्या वस्तूंपेक्षां आपल्या गावांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंचाच प्रत्येकानें विशेषत्वें उपयोग करावा व स्थानिक उद्योगधंद्यानां प्रोत्साहन द्यावें.

१० कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीनें स्वताच्या खर्चास लागणारी कमाई केलीच पाहिजे. आणि यासाठीं प्रत्येकानें आपापल्या कुटुंबांत कोणत्याहि योग्य घरगुतीधंद्याचा शिरकाव करणें जरूर आहे. सूत कातणें, कोंबड्यादि पक्षांची निपज करणें, फलपुष्पांची लागवड करणें इत्यादि उपक्रमांचा समावेश सदर घरगुती धंद्यांत होतो. भाजीपाल्याच्या उत्पन्नाचा बराचसा भाग स्वताच्या खाण्यांत केला जावा. विशेषतः कोणत्याहि स्वरूपांत नारळाचा —व त्यांतहि शहाळ्याचा—उपयोग करणें इष्ट आहे. 'निऱ्या'चाहि प्रयोग आरोग्याला हितप्रद होत असतो.

११ खरोखरच गरिबीची खात्री पटल्याविना कोणालाहि आर्थिक मदत करूं नये.

१२ अनावश्यक भपकेबाजीचा त्याग केला जावा. कोणत्याहि धार्मिक किंवा सामाजीक उत्सवांत फटाकड्या व इतर कोणतेंहि दारूसामान हीं वापरलीं जाऊं नयेत. प्रेताला महाग पुष्पाहार, प्रेतयात्रेला वादनाची जोड व प्रेतपेटीला 'गालावां'चा शृंगार इत्यादि गोष्टी त्याज्य होत.

१३ नाच–समारंभांत शिस्तीची तद्वतच बौद्धिक व नैतिक प्रगतीची वृद्धि होईल अशा प्रकारचे कार्यक्रम अमलांत आणण्याचा प्रयत्न केला जावा.

१४ प्रत्येक गांवच्या सभासदांनीं निदान दर आठवड्यात एक सभा भरवून आपल्या भौतिक, अध्यात्मिक व नैतिक हितसंबंधाचा व संस्थेच्या प्रगतीचा विचार करावा. संस्थेच्या तत्वाचा प्रचार व तपशिलाचा आचार अमलांत येण्यासाठीं प्रचारर्थ व देखरेखीसाठीं मंडेळ नेमण्याचा तात्काळ उपक्रम व्हावा. या मंडळांचा उपयोग त्या त्या ठिकाणचे सामाजीक दोष, उदाहरणार्थ चैनबाजी, रिकामगिरी, असूया, निंदकपणा, धूम्रपान व मद्यपान—दूर करण्याचा पायंडा पाडण्यांत यावा.

१५ प्रत्येक महालांतील सभासदांनीं वार्षिक व अखिल गोमांतकांतील सभासदांनीं द्विवार्षिक सभा भरवून संस्थेच्या कार्याचें प्रतिवृत्त ध्यानांत आणावें व संस्थेंत दिवसेंदिवस ज्यास्त कार्यक्षमता व जिवंतपणा उत्पन्न होण्यासाठीं अहर्निश झटावें.

संस्थेचा हा कार्यक्रम स्वदेशीला प्रोत्साहक असून राष्ट्रीय जागृतीलाहि उत्तेजक असल्यानें त्याचा सर्वत्र बोलबाला होईल यांत संशय नाहीं. उपरोक्त संस्था फिरंगाळलेल्या खिस्ती समाजाचे "डोळे उघडूं लागले" आहेत, असेंच सिद्ध करीत नाहीं काय ? आणि ह्मणूनच ती स्थापण्यास कारणीभूत झालेली आर्थिक आपत्ति 'इष्टापत्ति'च ठरत नाहीं काय ?

—येथील कोमार्काचे नवे देलेगाद दातोर आंतोनियु मिरांद यानीं आपल्या जाग्याचा चार्ज घेतला. नवे जज्ज येथें येत्या आगष्टच्या ता. ८ रोजीं पोंचतील.

दीवच्या गव्हर्नरांस शाबासकी

Surgiu, nisto, uma Inspecção ás comunidades, que absorveu mais algumas mil rupias.

Debaixo duma tutela assim ruinosa, pode-se fundar novas comunidades?

Haverá, depois da experiencia de séculos, alguem quem queira sujeitar-se ás inclemencias?

Mil vezes é preferivel o juro ainda de 2 ou tres por cento a adquirir acções das comunidades, prodigamente administradas.

Nenhuma confiança inspira o procedimento do Govêrno, desde séculos, experimentado. Sem justiça e equidade, sem menor respeito pelos justos interesses dos associados, o presente e o futuro das infelizes associações estão sendo entregues ao despotismo!

C. V. Gomes Pereira

Nao se pode tolerar...

Tendo alguêm, e com justa razão, extranhado que a Direcção dos nossos Correios se recusasse, algumas vezes, a fazer remessa de dinheiro por vales postais, — quem se acha á testa daquele serviço, com a facilidade que o carateriza, aldrabou uma defesa ou explicação muito curiosa: — que o Correio continuava a fazer a remessa por vales na mesma quantidade em dinheiro como a fizera no ano anterior.

Francamente, esta explicação pouco explica. O ponto de questão é saber se recusou ou não a certos a remessa por vales. Na afirmativa, ao abrigo de que lei ou regulamento assim procedeu. Pois não é dado a uma repartição arvorar o arbitrio em norma da conducta, quando existe lei clara que impõe ao Correio o dever de encarregar-se de remeter o dinheiro por vales para os paises onde essa remessa é possivel

¿Marca lei qualquer restricção? Dá ela porventura, direito á Direcção para restringir a remessa conforme o seu critério? Convem que o público conheça essas restricções, na primeira hipotese. E na segunda, cumpre ao sr. Director dos Correios pôr o pais ao corrente do seu criterio no assunto. E tudo isso para que os interessados saibam a verdade, evitando assim desapontamentos e maçadas inuteis.

Sim...não se pode tolerar que uma Repartição do Estado tenha, quanto ao serviço de vales, um criterio de funil largo para uns e apertado para outros!

---

quanto os seus compatriotas residentes na India se distinguem por úma mentalidade retardatária e contribuindo para criar um espirito de animadversão entre os goeses e os nacionalistas indianos. De resto, não há comparação possivel entre os goeses que se movem na atmosfera da liberdade e cultura cosmopolita do continente europeu e os que são, no pior dos casos, parasitas e arrivistas ou mesmo, quando bem intencionados são estouvados e ignorantes. Ferem o nosso orgulho nacional e obrigam nos a andar cabis-baixos de vergonha.

O recente debate municipal, a proposito da questão da bandeira tricolor da India, a ser içada nos edificios públicos de Bombaim, causou surpresa aos que consideravam o sr. professor A. Soares como um homem de caracter e independencia devido á sua estranha atitude naquela discussão em que ofendeu o susceptibilidade da maioria dos seus admiradores. O professor colocou-se numa posição ridicula ao avançar os seus estranhos argumentos contra a bandeira nacional. Provavelmente imaginou estar no meio dos seus colegas latinistas e que a questão da bandeira devia ser regulada pela gramatica latina, servindo-se fóra de proposito da sua alta e incontestavel capacidade de pedagogo. As suas objecções eram deslocadas numa sessão da Camara Municipal e teriam valor em qualquer colegio jesuita onde a pedagogia brilhante tem emprego nas discussões academicas e eruditas.

A proposito podia-nos tambem citar Homero e as suas palavras classicas sôbre o amor pátrio...ou antes, seria melhor não as mencionar em deferencia ao sentimento ardente que existe hoje em todos nós. Não seria a bandeira tricolor uma expressão desse sentimento? Devemos porventura orgulhar-mo-nos de ser tratados de *mongrels* quando temos direito a nossa qualidade de indianos, ápesar de todas as aparências enganadoras? Todos nós bons ou máus, olhamos para a bandeira como o simbolo da nossa salvação e é insultar os nossos sentimentos o dizer-se que não temos bandeira. E' uma vergonha. O sr. professor do latim tem de explicar-se.

---

da referida nossa local. Pois, o proprio Presidente dessa Camara confessa ter havido reclamações sôbre as gerências desta instituição. Não ha fumo sem fogo. Se a dita Camara não tem culpa no cartorio, ela nada tem a perder. Porisso mesmo repetimos mais uma vez — *quem não deve não teme* — frase com que rematamos aquela local.

Caxinata Naique sendo seus suplentes os srs. Pe. Basilio Degolação Mascarenhas, dr. Humberto Rodrigues e Luis Guilberme da D. Colaço.

O sr. Eng. Luis José de Sousa Jr., tecnico-gerente da nova fabrica, apresentou nessa ocasião aos sócios da Cooperativa alguns produtos locais conservados segundo os processos da tecnica moderna e por meio de aparelhos de laboratório recentemente adquiridos tendo os presentes admirado a perfeição com que é feito esse trabalho industrial. O sr. Eng. Sousa prosseguirá as suas experiencias de conservação dos produtos locais, utilizando as variadas matérias primas do nosso rico solo susceptiveis de serem preservadas.

E' justo reconhecer que, dentre de todas as sociedades fundadas nestes últimos tempos com o fim de promover o progresso de Gôa, a Cooperativa Industrial é a única que está encaminhando-se na via das realisações práticas, e partindo duma escalá modesta, marcha decididamente para o sucesso.

Corrigenda

No comunicado públicado na edição de *O Bhàrat* de 30 de Julho p. f. onde se lê simulacrio, leiam se simulacro; em vez de as coisas de chegar—as causas de chegar; fabriqueiros em lugar de paroqueiros.

Anuncios

O BHARAT, ano XVI n.° 20 de de 13 Agosto de 1931

COMUNIDADE DE COTOMBI

Por ordem superior de novo serão levadas á praça as restantes avenças da receita trienal do trienio de 1932 a 1934 da sobredita comunidade com alteração votada pela junta e aprovada superiormente no dia 23 do corrente pelas 15 horas no Pagode de Xri Madeu, lugar de sessões.

Aos 3 de Agosto de 1931.

O escrivão da comunidade

Xembú Ramachondra Sinai Assoldencar

E O GOVERNO?

O rebate da pavorosa crise economica e financeira que atormenta Gôa, chegou até a capital. E' o *Diario da Tarde* de 3 do corrente. São o *Heraldo* e *O Heraldo* de 4 que publicam artigos sensacionais sôbre a situação calamitosa que atravessamos.

Ontem os jornais da Provincia clamavam. Hoje é toda a imprensa sem distinção que fere a mesma nota trágica, comovedora.

O que será o dia de amanhã? Qual a finalidade desse desabar sem precedente? Eis as perguntas que se ouvem de todas as partes.

A miseria assaltou já lares outrora prosperos. O vinco de tristeza e dôr marca todas as frontes. Por toda a parte prenuncios de uma derrocada proxima.

Eis o quadro tetrico.

E o Govêrno?

O Govêrno vai dotar êste *paraíso* com mais um elemento do progresso:—A *Fotogrametria*.

COMISSÃO EXECUTIVA DO FOMENTO DO CONCELHO DE SANGUEM

Desejando esta Comissão Executiva admitir para a execução dos trabalhos a seu cargo, dois tecnicos auxiliares, com a pratica de serviços de Obras Públicas elaboração de projectos e orçamentos de estradas, são convidados os pretendentes a apresentarem-se ao sr. Vogal conductor desta Comissão Luis Bismark Dias, em Vasco da Gama até o dia 31 do corrente mês, com documentos que abonem a sua competencia para o exercicio dos referidos lugares.

Sanguem, 8 de Agosto de 1931.

O presidente

F. X. da Silva

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio Carapurcar, correm editos de 10 dias a contar da segunda publicação deste, citando todos os interessados incertos que se julgarem com direito á quantia em deposito de 129 rupias proveniente de expropriação amigavel feita pela Comissão de Melhoramentos de Mormugão a Edviges Furtado viuva de Caetaninho Mendes de Curchorem do predio "Bebquegale" situado em Curcohrém com exclusão de uma mangueira nele existente, para alargamento do largo do mercado de Vila Nova de Curchorém conforme consta do termo de acôrdo lavrado na administração do concelho de Quepem em 24 de Dezembro de 1930 entre as referidas Comissão e Edviges, e deduzirem dentro do mesmo praso os seus direitos nos autos de expropriação de utilidade publica, requerido pelo digno agente do Ministerio Público nesta Comarca. O que para ser publico se expediu este. Quepem, 18 de Julho de 1931.

O escrivão do 2° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei

O 1° substituto do juiz

Abilio da Conceição e Sousa

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio Carapurcar vai á praça para venda em hasta pública á porta do tribunal judicial desta comarca no dia 21 do seguinte mez ás 10 horas pelo maior lanço que se oferecer acima da sua avaliação, direito á metade de um sexto do predio denominado "Vainguinim gotom" da cultura de arroz e palmeirinhas sito em Cola de Caoo de Rama avaliado por 100 rupias. discrito por inteiro na conservatoria desta comarca sob o n° 15839 a fls 157 do livro B 43 e penhorado nos autos civeis de execução por custas que o Ministerio Público nesta comarca promove contra Malú Rama Velipo de Caregal de Cola, por apenso aos de execução por custas que o dito Magistrado promoveu contra Rafuf Velpina viuva de Rama Xibá Velipo da mesma, andando estes apensados aos de inventario orfanologico procedido por obito de Rama Xabá Velipo que foi da mesma para pagamento da quantia exequenda de 48:01:03 e de custas e sêlos acrescidos da execução. O arrematante pagará a contribuição de registo nos termos da lei e as despesas da praça além do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este. Quepem, 25 de Julho de 1931.

O escrivão do 2° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei

O 1° substituto do juiz

Abilio da C. e Souza

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio Carapurcar correm éditos de 180 dias notificando o réu Mablú Soil de Sozoaga de Mazali de Karvar do territorio britanico nos autos crimes de querela que contra ele e um incerto promove o Ministerio Público nesta comarca pelos crimes previstos e punidos pelos artigos 351 circunstancia 4.a e 433 do Código Penal, para apresentar-se neste juizo findo o praso de éditos a contar da publicação do último anuncio sob a cominação de que, se não se apresentar no praso assinado seguirá o processo á sua revelia e declara se que decorrido o praso de éditos poderá o referido reu ser preso por qualquer pessoa do povo e o deverá ser por qualquer oficial de justiça ou agente da autoridade para ser entregue no juizo competente. O que para ser publico se expediu este. Quepem, 20 de Julho de 1931.

O escrivão do 2° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei

O 1° substituto do juiz

Abilio da Conceição e Sousa

इतिहास

—×—

(ले. व्यंकटेश वि. वैद्य.)

ले. १ ला.

अति प्राचीन कालापासून भारतवर्षांत इतिहासाचा आदर होत आला आहे. अथर्व वेदाच्या पंधराव्या भागांत अगदीं प्रथम इतिहासाचा उल्लेख आढळतो. त्यानंतर शतपथ ब्राह्मण, गोपथब्राह्मण, जैमिनीय बृहदारण्यक, तैत्तिरिय आरण्यक, छांदोग्य–उपनिषद, सांख्यायन श्रोत्रसूत्र इत्यादि ग्रंथांत इतर विद्यांबरोबर इतिहासविद्येचाहि उल्लेख आहे. शतपथब्राह्मण, गोपथब्राह्मण आणि सांख्यायन श्रोत्रसूत्र इतिहासाला वेद अशी संज्ञा देतात. छांदोग्य–उपनिषदांत तर पुराणें आणि इतिहास यांस स्पष्टपणें पंचम वेद असें ह्मटलें आहे. अश्वमेध यज्ञाच्या अनुष्ठानकालीं यज्ञाचा होता दर दिवशीं एक याप्रमाणें दहा दिवस दहा विशिष्ट विद्यांचें निरूपण करीत असे. एक वर्षपर्यंत याप्रमाणें पारायण चालत असे. या दहा विद्यांत इतिहासविद्येचाहि समावेश होत होता. या सर्व पुराव्यावरून कळून येतें कीं, प्राचीन भारतवर्षांत इतिहास ही स्वतंत्र विद्या समजण्यांत येत असे व त्या विद्येला सन्मानाचें स्थान होतें. परंतु त्या कालीं प्रचलित असलेल्या या इतिहास विद्येचें स्वरूप व व्याप्ति किती होती तें चांगल्या तऱ्हेनें समजण्यास मार्ग नाहीं. वर ज्या सर्व ग्रंथांचा उल्लेख केला आहे त्यांत इतिहास हा शब्द पुन्हां पुन्हां आला आहे, तरी त्याची व्याप्ति मात्र त्यांत दिलेली नाहीं. यामुळें प्राचीन टीकाकार व आधुनिक विद्वान यामध्यें ही व्याप्ति निश्चित करण्याच्या बाबतींत फार मोठा मतभेद आहे.

कौटिलीय अर्थशास्त्रांत सर्वांआधीं इतिहासविद्येची व्याख्या दिसून येते. कोटिल्यानें ऋग्, यजू, साम, अथर्व आणि इतिहास या पांचाचाहि वेद ह्मणून उल्लेख केला आहे. त्यानंतर इतिहासाची त्यानें पुढील व्याख्या केली आहे. 'पुराण मितिवृत माख्यायिकोदाहरनः धर्मशास्त्रमर्थ शास्त्राःचेतिहास" अर्थात् पुराण, इतिवृत्त, आख्यायिका, उदाहरण, धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्र या सर्वांचा समुदाय तो इतिहास होय. आह्मी आज ज्या अर्थी इतिहास हा शब्द वापरतों त्यापेक्षांहि कौटिल्याच्या कालीं इतिहास या शब्दाचा अर्थ व्यापक होता. वर्तमानकालीं राजकारणशास्त्र, समाजशास्त्र अर्थशास्त्र इत्यादि आज जीं भिन्न शास्त्रें समजण्यांत येतात, तीं त्यावेळीं इतिहासशास्त्रांतच समाविष्ट होत होतीं.

वर्तमानकालींसुद्धां इतिहास ह्मटला ह्मणजे काय समजावें किंवा काय समजूं नये याची व्याख्या करणेंहि अगदीं सोपें काम नहीं. राजकारण आणि समाजशास्त्र हीं दोन्हीं इतिहासावर अवलंबून असतांहि तीं शास्त्रें आतां निराळीं समजण्यांत येतात, तव्हां "राष्ट्र आणि समाजबद्ध मनुष्यांच्या कार्याचें पर्यालोचन" हेंच आतां इतिहासाचें कार्यक्षेत्र समजण्यांत येतें. परंतु जरी याची मर्यादा लहान झाली आहे, तरी आधुनिक ऐतिहासिक सत्याचें आविष्करण करण्याचा नवीन मार्ग दाखविला आहे. प्राचीन कालीं आमच्या देशांत इतिहासाची व्याख्या व्यापक असली तरी इतिहासकारांमध्यें सत्यनिर्णय करण्याचें ज्ञान व दृढ सत्यनिष्ठा यांचा पूर्ण अभाव होता. याचमुळें जनप्रवाद, दंतकथा, आख्यायिका आणि नीतिकथा या सर्वांचा प्राचीन इतिहासकारांनीं सारखाच उपयोग केला आहे. ह्मणूनच तो इतिहास सत्याच्या तीव्र प्रकाशांत आणतांच येत नाहीं. परंतु सत्याचा अभाव त्यांनीं कल्पनांनीं भरून काढला आहे. भारतवर्षाच्या बाहेरील जगासंबंधीं सत्य ज्ञान नसल्यामुळें त्यांनीं सप्तसमुद्र व सप्तद्वीप यांची एक कल्पनासृष्टीच रचिली आहे आणि त्याचप्रमाणें दहीं, दूध, सुरा, मधु इत्यादिकांचे सागर निर्माण केले आहेत. भूतकालाच्या यथार्थ स्वरूपाचें काडीमात्र ज्ञान करून न घेतां लक्ष कोटी वर्षांचा एकेक युगभाग करून त्यांवर एकेका मनूची नेमणूक केली आहे. याचमुळें आह्मीं ज्याला आज इतिहास ह्मणतों त्या ज्ञानाचा परिचय त्यांत दिसून येत नाहीं. ज्याप्रमाणें ग्रीस, रोम आणि चीन या देशांचा प्राचीन इतिहास उपलब्ध आहे, त्याप्रमाणें भारतवर्षाचा नाहीं. ग्रीक, रोमन, चीन आणि अरब यानीं भारतवर्षाचें ज्ञान करून घेऊन ज्याप्रमाणें इतिहास लिहिला त्याप्रमाणें भारतीयांनीं दुसऱ्या देशांचें ज्ञान लिपिबद्ध केलेलें उपलब्ध नाहीं. जीं काय उपलब्ध आहेत तीं आपापल्या दैवताचें वर्चस्व प्रतिपादून दुसऱ्याच्या उपास्याचीं निंदा करणारीं पुराणें होत. शैवानीं वैष्णवांची निंदा करावी, वैष्णवानीं शाक्तानां कमी लेखावें, शाक्तानीं गाणपत्यांचा उपहास करावा, असलाच घाणेरडा प्रकार जेथें तेथें दिसून येतो. आत्माभिमानावर जरी प्रबल आघात झाला तरी हें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं कीं, आमचे पूर्वज इतिहास विद्येंत तत्कालिन सर्व राष्ट्रांच्या मागें होते.

परंतु केवळ पूर्वजांचा दोष दाखविण्यांकरितांच वरील सर्व विवेचन केलेलें नाहीं. कारण भारतीयांचा तोच स्वभाव आजहि कायम आहे, ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे ज्या कारणानीं प्राचीन कालीं आमच्या देशांत इतिहासविद्येचा प्रसार होऊं शकला नाहीं, तींच कारणें आज हजारों वर्षांनंतरहि आमच्या राष्ट्रांत जशींच्या तशीं कायम आहेत. आमचा भूतकालीन इतिहास सत्याच्या प्रकाशांत आणण्याची इच्छा आजहि आमच्या विद्वानांत नाहीं. अजूनहि आह्मांला आमच्या राष्ट्राचा इतिहास व संस्कृतीसंबंधीं स्वरचित काल्पनिक जगांत विहार करणें फार आवडतें. प्रखर सत्याच्या प्रकाशांत येण्याचें साहस आमच्यांत नाहीं. आह्माला स्वकपोलकल्पित गौरव व कीर्ति यांचें समर्थन करतानां, खोट्या कल्पना व असंगत अनुमानें करतानां, आह्मांला मुळींच लाज वाटत नाहीं. जर एखादा सत्यनिष्ट संशोधक कोणत्याहि प्रकारें याच्या विरुद्ध मत प्रतिपादन करूं लागला, तर आमच्या समाजांतील स्वयंमन्य विद्वान त्याच्यावर तुटून पडल्याशिवाय राहत नाहींत.

महाराष्ट्रांत इतिहास संशोधनाची मुळींच कमतरता नाहीं. पुण्याला तर भारतेतिहास संशोधक मंडळच निर्माण झालें आहे. परंतु बहुतेक संशोधकांची अशी स्थिति दिसून येते कीं, ज्या प्रांतांत किंवा ज्या जातींत त्याचा जन्म त्या प्रांताचा किंवा जातीचा गौरव वाढविणें हा त्यांचा मुख्य उद्देश. सत्य निर्णयाकडे तो ढुंकूनहि पहात नाहीं. जी स्थिति संशोधकांची तीच स्थिति लेखकांची. आह्माला इतिहासलेखनाची स्फूर्ति होण्याच्या मुळाशीं सत्यनिष्ठा नसते. स्वजातिप्रेम किंवा स्वप्रांतप्रेम ह्याच भावना त्याच्या मुळाशीं असतात. मराठी भाषेंत भारतवर्षाचा पूर्ण इतिहास अजून एकहि झालेला नाहीं. महाराष्ट्राचा किंबहुना गोमांतकासारख्या छोट्या प्रांताचा– एक नव्हे तर अनेक –इतिहास रचून झालेला आहे. यामुळें सत्य संशोधन तर झालेंच नाहीं, फक्त त्यामुळें अनर्थ मात्र इतका झाला कीं, इतिहासप्रसिद्ध व्यक्ति आणि त्याचें कार्यक्षेत्र निरनिराळ्या जातींत विभक्त होऊन अनावश्यक गुंतागुंतीचे प्रश्न, मनोमालिन्य व जातिद्वेष मात्र उत्पन्न झाला आहे. परशुरामानें देशांतराहून शुचिर्भूत ब्राह्मण आणून त्यानां भारतवर्षाच्या पश्चिम किनाऱ्यावरील भूमि दान दिली ही आख्यायिका नितांत असत्य अशा 'स्कंदपुराणे सह्याद्रिखंडे' कथिताम्. पण त्या भाकडकथेवर विश्वास ठेवून चित्पावन, आद्यगौड, सारस्वत, हविक आणि नंबुद्रि या पांच जाती त्या क्षेत्रावर स्वतःचा अधिकार स्थापित करण्याकरितां भांडत आहेत. ज्या पुराणांत भूगोलाचें प्राथमिक ज्ञानहि प्रकट झालेलें दिसून येत नाहीं, आणि ज्यापैकीं भविष्यपुराणांत होईल या भविष्यकालीन व्याकरण प्रयोगानें व्हिक्टोरिया राणीच्याहि राजवटीचें वर्णन आलें आहे, त्यीं भारतवर्षाच्या अवनतकालांत निर्माण झालेल्या ग्रंथांच्या जोरावर ! जात्याभिमानाची किती लज्जास्पद परमावधी ही !

कालयवनाच्या भीतीनें श्रीकृष्ण आणि बलराम यानीं गोमंतपर्वतावर येऊन कांहीं काळ वास केला. तो गोमंतपर्वत पश्चिमसागर तीरावर होता, मग काय विचारतां ! काठेवाडांतील गिरनारपासून मलबारांतील मलयाद्रिपर्यंत प्रत्येक पर्वताच्या पायथ्याजवळ राहणारे लोक आपल्याच टेकडीला प्राचीनकाळीं गोमंत हें नांव होतें असें सिद्ध करूं लागले. अठायशीं सहस्र ऋषींचीं अठायशीं सहस्र मतें अशी एक ह्मण आहे. पण या बाबतींत तिही मर्यादा नाहीं. जो तो लेखणी सरसावून गोमंताला आपल्या प्रांतांत ओढीत आहेत. येऊन जाऊन युरोपियन इतिहासकार निःपक्षपाती असावयाचे. पण प्रत्येक बाबतींत त्यानां फायदेशीर होणारा आमच्यांतील जातिवैमनस्याचा फायदा त्यानीं कां घेऊं नये ? कोणी या प्रांताला किंवा कोणी त्या प्रांताला गोंजारून यादवीची मजा स्वस्थपणें पहात आहेत ! ! !

कदंब वंशांतील पराक्रमी राजा चंद्रादित्य यानें चंद्रपूर शहर निर्माण करून ती आपली राजधानी केली हा उल्लेख शिलालेखांत मिळाला मात्र; एकदम चांदर (गोवा) चांदा (मध्यप्रांत) चांदवड [नाशीक] चंदनवदन (खानदेश) चांदूर (वर्धा) चंदावर [कर्नाटक चांदक [हैदराबाद] इतकीं चंद्रपुरें त्या राजधानीवर आपला हक्क प्रस्थापित करण्याकरितां पुढें आलीं. जो तो आपलेच पुरावे खरे, दुसऱ्याचे नितांत असत्य हीच भावना बाळगणारा ! प्रांताभिमान व जात्यभिमान यांच्या प्रचंड दडपणाखालीं चेंगरून गेलेलीं सत्यनिष्ठा डोकें वर काढते कशाला ?

दुसऱ्या जातीची प्रच्छन्न टवाळी करणें हा इतिहास लेखकाचा जन्मसिद्ध हक्कच होऊन बसला आहे. आपली पूर्व पीठिका व्यास,वाल्मिकापर्यंत भिडवून सर्व ब्राह्मण जातींत आह्मींच काय ते श्रेष्ठ दर्जाचे असें भासविण्याचा सारस्वत अट्टाहास करीत आहेत आणि 'कायस्थ प्रदीप' पाजळून त्याच्या प्रकाशांत कायस्थप्रभूंनां हीन ठरविण्याचा चित्पावनानीं प्रयत्न चालविला आहे. तसाच हिंदुपतपातशाही ब्राह्मणांनीं बुडविली असा मराठ्यानीं कोलाहल चालविला आहे. सारस्वत, ब्राह्मण नाहींत अशी देशस्थांनीं गर्जना करावी आणि तिचाच प्रतिध्वनि सारस्वतांनीं दैवज्ञांच्या बाबतींत काढावा असाच प्रकार जिकडे तिकडे चालला आहे. चित्पावनांना कायस्थानां प्रभु न ह्मणतां 'परभू' ह्मणण्यांतच धन्यता वाटते, तर प्रभू मराठ्यांना शूद्र समजतात. असलाच जातिद्वेष जोंपर्यंत इतिहासांत थैमान घालीत आहे तोंपर्यंत खरा इतिहास उजेडांत येण्याची आशाच नको. आधुनिक इतिहासाचीं पुस्तकें ह्मणजे पुराणांच्या सुधारून वाढविलेल्या नव्या आवृत्त्याच होय. सत्यनिष्ट इतिहासकार सध्या अपवादरूपच आहेत. कारण समाजांत त्याचा फारसा बोलबाला होत नाहीं. आपल्या भरगसाट लिखाणानें जातिविद्वेष वाढविणाऱ्यांच्या नावानें मात्र धुळें वगैरे ठिकाणीं संशोधनमंदिरें निर्माण होत आहेत.

वर्ष १६ वें. अंक २१

गुरुवार ता. २० आगष्ट सन १९३१

वर्गणीचे दर

. ख. सह ३ रु. [आगाऊ]

ोळ अंकास १ आणा.

आर. ...र– समक्ष अगर पत्रद्वारे.

...गाशिवाय जाहिरात प्रसिद्ध ...णार नाहीं.

मालक

गो. पु. ... फारमासेवतिकु

मुद्रण व प्रकाशन ...-प्रेस कुसमण केपें गोवा.

भारत
O BHARAT

Ano 16 Nº 21

Quinta-feira 20 de Agosto 1931

ASSINATURA

Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO

G. P. Hegdo Dessai

FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO

TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

गोष्टीरूप गोमांतक

[ले.— गो. कृ. नाईक]

उत्तरार्ध

प्रकरण सातवें

श्रीशिवाजी महाराज

इ. स. १६२७ सालीं शहाजीराजे आणि जिजाबाई ह्या थोर मातापित्यांच्या पोटीं शिवाजीराजांचा जन्म झाला. स्वतंत्र राज्यस्थापनेस ज्या गुणांची आवश्यकता असते ते सर्व गुण महाराजांच्या अंगांत वसत होते. विशेषतः स्वाॅभिमान नीतिमत्ता, धाडस, पारख आणि आत्मविश्वास हे गुण तर वाखाणण्यासारखे होते. वयाच्या बाराव्या वर्षींच स्वराज्यस्थापनेचें कार्य हातीं घेतलें. ह्यावेळीं महाराष्ट्रावर आदिलशाही कुतुबशाही, निजामशाही वगैरे शाह्यांचा अंमल होता. नुकतेच मोंगलहि महाराष्ट्रांत घुसूं लागले होते; कोकणांत पाश्चात्य लोक स्वसत्तेचा पाया घालीत होते; हिंदूंच्या दैन्याला पारावार राहिला नव्हता; पण, राजांचा आत्मविश्वास दांडगा, ते त्या प्रतिकूल परिस्थितींतून मार्ग काढण्यास तयार झाले. त्यानीं केवळ अडाणी सहकाऱ्यांच्या साह्यानें, विश्वासघातक्यांनां कडक शासन करून, शाह्यांच्या सुलतान शाहीला शह देऊन आणि धर्मवेड्या औरंगजेबाच्या आक्रमणाला आळा घालून, स्वतंत्र 'हिंदुपदपातशाही' स्थापन केली. आरमार उभारून कोंकणपट्टी आपल्या सत्तेखालीं आणिली आणि मानी पोर्तुगिजानां नमवून इंग्लिशांची धोरणी दूरदृष्टि धुळीस मिळविली.

शिवरायानीं राज्यविस्तार तेवढा केला असें नाहीं तर समर्थांच्या साह्यानें ' महाराष्ट्र धर्माचा ' प्रसार करून जातिद्वेषाचें निर्मूलन केलें आणि 'हिंदुस्थान हिंदूंचा आहे ' अशी घोषणा करून हिंदूंची मानसिक गुलामगिरी नष्ट झाली.

हैदरअल्ली

हैदरअल्ली हा पंजाबांत फत्तेमंहमद म्हणून मोंगलांचा एक कारभारी होता त्याचा मुलगा होय. ह्याचा जन्म इ. स. १७०२ ह्या वर्षीं झाला. पित्याच्या मरणानंतर, तो धाडशी असल्यामुळें धामधुमीच्या काळांत नशिबाची परीक्षा पाहण्यासाठीं फिरत फिरत दाक्षिण हिंदुस्थानांत आला. ह्यावेळीं ह्मैसुरांत हिंदुराजे राज्य करीत असत. इ. स. १७५० सुमारास चिकू कृष्णरायानें राज्याची सर्व सत्ता दिवाण नंदराजाच्या स्वाधीन केली. हैदरानें नंदराजाच्या पदरीं नोकरी पत्करली. इ. स. १७५९ त तो सेनापति पदावर आरूढ झाला. आणि पुढें लवकरच त्याला ह्मैसुरची दिवाणगिरी मिळाली. इ. स. १७६९ त राजाशीं विश्वासघात करून त्यानें राज्यपद बळकाविलें. पुढें बेदनूर, दक्षिण कानडा, मलबार वगैरे प्रांत हाताखालीं घालून हैदरअल्लीनें आपलें राज्य पुष्कळच वाढविलें.

Ano XVI) Quinta-feira, 20 de Agosto de 1931 (N.º 21

O BHARAT

Jornal de maior circulaçao

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL
Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-08-00
REDAÇAO E ADMINISTRAÇAO
COMPOSIÇAO E IMPRESSAO
Tip *BHARAT* Cusmane-Quépém

Novas Comunidades

Acerca desse projecto, a informação do Govêrno, pelo confronto da receita liquida de algúmas comunidades com a renda das propriedades do Estado, sem haver, de resto, termo de comparação afirma ser viavel essa *velha aspiração da India, expressa em um dos Congressos Provinciais.*

Tais Congressos, porêm, por iniciativa dos burocratas convocados, nunca mereceram aplauso popular, como na visinha India o povo em massa, no goso da sua legitima liberdade combateu energicamente os processos de expoliação, opressão e tirania, que padece o paiz dominado e absorvido, e quer a emancipação.

Entre nós, ainda na imprensa de oposição não falta tão sómente a questão de oportunidade, como se dissesse: sim, senhor, o Congresso exprimiu o desejo popular, mas a actual situação economica não consente. Mentira!...

A crise economica deriva não só da depreciação dos nossos produtos, mas tambem do insuportavel agravamento dos impostos, e não menos da abusiva drenagem dos cofres das comunidades, em detrimento da população interessada, que por estes tempos não percebe os dividendos e proventos que deveria receber se não houvesse os injustificaveis encargos, dia a dia, mais crescentes, por imposição do Govêrno.

Ninguem põe em dúvida que os interesses do Estado nunca podem estar separados dos da Nação. O intermediario, que não é amigo desta nem daquele, mas sim da agremiação politica, a que pertence, e que nos conduz á ruina.

Ao tempo em que assim não era, as comunidades, gosando da liberdade da sua acção, em directa participação dos seus componentes na administração e gerência prosperaram, como bem discreve o *Foral* de 16 de Setembro de 1526. Até chama o gancar *governador, ministrador* e *bemfeitor*.

Abolido, porêm, o antigo *nemo*, e imposta a tutela forçada, elas se converteram em feudo da burocracia. Lembraram ainda por Decreto de 15 de Dezembro de 1880 extinguir por completo, o feudalismo na India, graças ás leis liberais do paiz, a esse tempo, altamente constitucional, ao passo que nessa mesma época chegado com as comunidades, o Decreto de 15 de Setembro de 1880 lançou bazes para o autocratismo barocratico, mais tarde desenvolvido em sucessivos diplomas, a fim de que o *tutor nato* disponha dos recursos delas com liberdade mais ampla do que dispõe dos do Estado, Municipios etc.

Todo o zelo dos componentes é de elevar, delirantemente, nas arrematações a receita, arruinando uns e outros; mas o *tutor nato*, que nada tem a ganhar, nem arriscar só manda, perca quem perder, seja em sindicancias, seja em inspecções, seja no regalo do pessoal da administração, seja nas tombações, seja nas zonas agricolas etc. etc.

Vi de perto uma comunidade, com receita de 15 mil rupias para ratear por centenas dos componêntes gastou cinco mil rupias no serviço da tombação. Não admira. Assim como nenhuma comunidade tem direito de arquivar porque a última sindicância custou 37 mil rupias, tendo a anterior custado apenas 7 mil rupias, pela mesma razão não lhe é dado queixar-se da demora no serviço da tombação, absorvendo milhares e milhares. O da sindicancia custaria ainda mais se a atitude do falecido General Massano de Amorim não fosse diversa da do anterior.

Vão promulgar o novo Código que não aboliu esses erros e defeitos, libertando as comu

CONTRASTES

O Govêrno apresentou ao Conselho do Governo um projecto do diploma legislativo, concedendo aos contribuintes moratoria até 30 de Novembro Proximo. Vê se, pois, que o Govêrno reconhece a situação aflictiva em que a crise economica lançou o país. Entretanto o mésmo Governo gasta com

51 oficiais de exercito — Rps. 333.560

333.560 rupias representam mais de metade de Contribuição Predial que é de 528.400 rupias.

UMA CONFISSÃO UTIL

As páginas da história da humanidade, desde as eras mais remotas até os tempos mais chegados, registam uma lição que nenhum Governo pode dêixar de ter diante da sua vista, quando *sinceramente* deseje o bem-estar material e moral, e sobretudo o florescimento agricola do pais que governa.

"Les pays ne sont pas cultivés en raison de leur fertilité, mais en raison de leur liberté", afirma Montesquieu, no seu erudito livro *de L'Esprit des Lois*. E não é muito dificil convencer se desta verdade, que é quasi um axioma. Aquilo que Aristoteles diz á cêrca da Sardenha, nota se ainda mais claro e melhor em todos os paises subjugados. "De uma rica e prospera colónia grega, habitada, (?) nidades da penosa escravidão. Conserva êle a faculdade de nomear oficiais reformados, apesar de lhes faltar o treino, como atestam os acordãos do Tribunal Aministrativo, entre outros, de 4 de Agosto de 1928. de 26 de Setembro de 1930 e muitos. Creou um conselho, mas com voto consultivo, além de aumentar excessivamente muitos outros encargos. Pobres componentes, a sua dôr nunca alcançará menor alivio!...

Com êsse modo de vida, é vêr quem ousará arriscar os seus capitais.

C. V. Gomes Pereira

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, श्रावण, शुद्ध ७ मी शके १८५३

जमिनीविषयीं अनास्था

गोव्यांत जमीनदार होणें हें प्रपंचांतील अंतिम ध्येय असें समजण्यांत येतें. श्रमून, भागून व परदेशीं हाल अपेष्टेंत दिवस कंठणारा मजूर जरा धनिक बनला कीं, त्यास–लहानशी कां होईना– पण जमीन खरेदी करण्याचा मोह सोडीत नसतो. व एकदां ती विकत घेतली म्हणजे त्यास अस्मान देखील ठेंगणें वाटूं लागतें.

ही गोष्ट जर आगांतूक जमीनदार बनलेल्या एका साधारण मजुराची, मग पिढीजाद वारशानें जमीनदार असलेल्या 'भाटकाराची' मिजास किती और असेल हें सांगतां पुरवत नाहीं. ह्या भाटकाराचा आपल्या जमिनीवर इतका अवर्णनीय मोह असतो कीं, कुटुंबांत वारसदारांची वृद्धि होऊन एक एका वारसदाराच्या वांट्यास एक एक झाड आलें तरी, तें झाड सोडून, उर्जितावस्थेचीं साधनें मिळविण्याकारितां अन्य प्रांतां जाणें मालकास सहसा रुचत नाहीं! इतकेंच नव्हे, तर तो वारसदार त्या झाडावरील आपला हक्क शाबीत करण्यासाठीं उद्भवणाऱ्या कलहांत भाववंदाचे प्राण घेण्यास व स्वताचे प्राण देण्यास सुद्धां तयार असतो.

ह्या वर्णनावरून कोणास वाटेल कीं, इकडील जमीनदार आपल्या जमिनींतील झाडांस जिवापलीकडे जपत असतील! परंतु वस्तुस्थिति अशी नसून, गोव्यांतील बहुतेक जमिनदारांस लागू होणारा एक सर्वसाधारण सिद्धांत काढतां येईल कीं, जितक्या ज्यास्त जमिनी मालकाच्या ताब्यांत असतात तितक्या मानानें त्या जमिनीची ज्यास्त हेळसांड त्या मालकाकडून होत असते.

मोठाल्या जमिनीचा मालक 'बड्या भाटकारपणाचा' डौल घराच्या भिंतींत स्वतःस कोंडून मिरवीत असतो, तर लहान व आंटोपशीर जुमल्याचा धनी, क्षुल्लकपणावरून आपल्या जमिनीकडे दुर्लक्ष्यच करीत असतो.

अशी पूर्वपरंपरागत वहिवाट दृग्गोचर होत असून छोटे बडे भाटकार ऐतखाऊपणानें कसा तरी गुजारा करण्यांत समाधान मानीत होते. इतक्यांत नारळांचे व भाताचे दर अपेक्षेबाहेर उतरल्याकारणानें अगोदरपासून मुरलेल्या जमिनीविषयींच्या अनास्थेंत भर पडली आहे. ह्या वेळीं प्रस्तुत परिस्थितिशीं टक्कर देण्यासाठीं उत्पन्नाची वाढ करण्याची अत्यंत जरूरी असल्यावरून ज्यापासून उत्तम फायदा होतो अशा निरनिराळ्या झाडांची लागवड करण्याची सुसंधि दवडून निर्वाह होणें शक्य नाहीं.

सुशिक्षित लोकांनीं आज जमिनीची स्थिति सुधरून ज्यास्त उत्पन्न कोणत्या प्रकारें घेतां येईल ह्या विषयींचा आस्थापूर्वक ऊहापोह केला पाहिजे. यापुढें जमिनीकडे बेफिकीर नजरेनें पाहिल्यास विपद्ग्रस्त स्थितीचें दूरीकरण कठीण होईल.

जमिनींचें उत्पन्न वाढलें म्हणजे त्याचे इष्ट फायदे श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत मिळत असतात. शेतकीची भरभराट होणें हें राष्ट्रीय उत्कर्षाचें एक प्रमुख अंग होय. जमीन कितीहि खराब असली तरी ती विशिष्ट पिकांस लायक असल्याशिवाय राहणें संभवनीय नाहीं. म्हणून, कोंणतीं पिकें कोणत्या जमिनीवर उत्तम प्रकारें निघतात हें स्वानुभवानें किंवा तज्ज्ञ लोकांकडून समजून घेऊन एकाहि जमीन लागवडीशिवाय राहूं न देण्याबद्दल सर्व लोकांकडून प्रयत्न झाले पाहिजेत. सरकारी तिजोरींतील लठ्ठ पगार खाणाऱ्या आग्रिकल्चर खात्याकरवीं ह्या सुधारणा होण्याची आशा विफल होय.

सध्याच्या आर्थिक आपत्तीस तोंड देण्याचा एकत्र व सर्वांस आकलन होण्यासारखा धंदा म्हणजे जमिनीची लागवड परंतु ह्या धंद्याकडे वळण्यासाठीं अगोदर आमच्या हाडींमासीं खिळून राहिलेली जमिनीविषयींची अनास्था दूर झाली पाहिजे.

इतस्ततः

मागील खेपप्रमाणें सांफ्रांसिस्कु शावियेर यांच्या शव–प्रदर्शन प्रसंगीं, जुगारी खेळांचीं दुकानें मांडण्याचा परवाना मागण्यासाठीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील कांहीं जुगारी कंपन्यानीं पोर्तुगेज सरकारपाशीं अर्ज केले होते. ते सर्व नामंजूर झाल्याचें समजतें. हें वर्तमान ऐकून प्रत्येक सुसमंजस मनुष्यास समाधान वाटेल. रिकामे लोक घटकेंत श्रीमान् होण्याच्या लालसेनें मोहीत होऊन नशीबाची परीक्षा पाहतात. अशा प्रकारची नशीबाची परीक्षा पाहणें कधींहि झालें तरी परिणामीं घातक असतें. प्रामाणिक उद्योग, व्यवहार करूनच जें द्रव्य प्राप्त व्हावें, तें द्रव्य एका जुगारी डावांत मिळाल्यास प्रामाणिकपणें व्यवहार करण्याची गरज राहत नाहीं. प्रामाणिकपणा व उद्योग हीं प्रत्येकाच्या उन्नतीचीं मुख्य साधनें होत. म्हणून हे दोनहि गुण आकलन करण्याचा प्रयत्न करणें जरूर असल्यावरून जुगारी मार्गानीं द्रव्य संपादन करण्याच्या लालचीवर लुब्ध होणें प्रामाणिक व्यवहारास शोभण्यासारखें नव्हे. बहुत काल टिकणारी संपत्ति साव काश चालून येते.

\+ × ×

क्रूर जनावरांचा संहार करणें हें कार्य मानव समाजास हितकर आहे अशा समजानें तसल्या जनावरांचा संहार करण्यास सरकार प्रोत्साहन देत असतें. परंतु ते हिंस्र पशु विघातकच असतात असें नव्हे, तर, ते उपकारकहि असतात. उत्तर अमेरिका खंडांत लांडग्याविरुद्ध मोहिम सुरू करून त्या जातीचें अस्तित्व बहुतेक नष्ट झाल्यावर रानटी सशांची वाढ इतकी बेसुमार झाली कीं, त्यानीं पिकांचे अनेक मळे उध्वस्त करून टाकिले. ते ससे अगोदर त्या लांडग्यांच्या भक्षस्थानीं पडत असल्याकारणानें त्यांच्या वृद्धीस नियंत्रण पडत असे. ह्यावरून सिद्ध होतें कीं अगदीं अपायकारक समजले जाणारे हिंस्र पशुसुद्धां अन्य रीतीनें उपयुक्त ठरतात. ईश्वराची घटना अतर्क्य आहे.

\+ × +

साडी ह्या शब्दाचें रूपांतर सारी असें करून गोव्यांतील कांहीं नेटीव ख्रिस्ती तिचा प्रचार करण्याची शक्य तो उपाय करितात. पण 'सारी' हा शब्द कोठून आला ह्याचा मात्र ते विचार करित नाहींत. 'साडीस 'सारी' म्हणण्याचा प्रघात मूळ पोर्तुगेज किंवा इंग्रज लोकांनीं पाडला. 'उच्चारांत असा फरक पडण्याचें कारण फक्त उच्चार–सुलभता हेंच होय. पाश्चात्य लोकां संबंधानें वरील उच्चार–विपर्यास क्षम्य आहे, परंतु नेटीव ख्रिस्ती, ज्यांस 'साडी' असें उच्चारण्यास पंचाईत पडत नाहीं, ते सुधां पाश्चात्यांच्याच अनुकरणानें 'सारी' हा शब्द कोठून आला ह्याची चौकशी न करितां सारीच म्हणत आहेत. सारीच्या जागीं साडी म्हणणें म्हणजे उच्चारांत व आचारांत हिंदुपण आणणें असें वाटत असल्यामुळें तें टाळण्यासाठींच ते सारी म्हणत असतील काय?

वर्तमानसार

—ब्रह्मचर्याश्रम मसूर, या संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या उद्बोधन मालेंतील 'सती सावित्री', 'श्रीसमर्थांचें पुण्यस्मरण', 'बजरंग बली की जय' व 'धर्मवीर कुमार हकिगतराय' या पुस्तकांना २० रु., व 'गोमांतक शुद्धीचा इतिहास' या पुस्तकास ५० रु. इंदूर येथील महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळानें बक्षिसादाखल दिले आहेत.

—श्री. गो. कृ. नाईक, कुंकळ्ळी, यांच्या 'परिवर्तन' नाटकास, इंदूरच्या ग्रंथोत्तेजक मंडळानें १० रुपयांचें बक्षिस मंजूर केलें आहे. हें पुस्तक विद्यार्थी संघ, कुंकळ्ळी ह्या संस्थेचे चिटणीस श्री. वि. केणी यांनीं प्रकाशित केलें होतें.

—चार आण्याच्या व आठ आण्याच्या नवीन नोटा पाठविण्याची मागणी इकडील सरकारनें पोर्तुगालपाशीं केली आहे. असल्या नोटा देव–घेव करितानां फाडतात म्हणून त्याजागीं रुप्याचीं किंवा अन्य धातूचीं नाणीं पाडणें योग्य होतें.

—राउंडटेबल कान्फरन्ससाठीं महात्मा गांधींचा लंडनला जाण्याचा बेत पूर्ण रहित झाला, असें समजतें.

—कराची कॉंग्रेसनें नेमलेल्या राष्ट्रीय निशाण कमिटीचा रिपोर्ट नुकताच बाहेर पडला असून, यापुढें कॉंग्रेसचा झेंडा केसरी रंगाचा असून त्यावर डाव्या हाताच्या कोपऱ्यावर निळ्या रंगांत चरख्याचें चित्र असावें अशी सदर कामिटीनें एकमतानें शिफारस केली आहे.

—अहमदाबाद येथें म. गांधींच्या हस्तें शिवाचें देवालय उघडण्यांत आलें असून तें अस्पृश्यांना खुलें ठेवण्यांत आलें आहे.

पणीबाई–विद्यालय, दीव

(आमच्या खास प्रतिनिधींकडून)

येथील पणीबाई–विद्यालय, त्याचें शैक्षणिक कार्यक्षेत्र व परोपकारी संस्थापक वगैरेंची विस्तृत माहिती दिलेलें सचित्र पोर्तुगेज चोपडें भारत–मुद्रणालयांतून नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. परतु केवळ मराठी जाणणारांस त्याचा बिलकूल उपयोग होणें शक्य नसल्यानें, उपरोक्त उपयुक्त संस्थेचा त्रोटक वृत्तांत मराठींतूनहि देण्यांत येत आहे. विद्यालयाच्या गच्चीवरच मी माझें 'बिऱ्हाड' थाटलें असल्यानें पहिल्या प्रथम त्याचाच समाचार घेणें शिष्टाचारालाहि उचित असेंच आहे, हें कोणालाहि मान्य असेल.

दिवांत अनेक दुमजली व तिमजली इमारती आहेत. एखाद्या इमारतीच्या 'आगाशी'वरून सभोंवार नजर फिरवली तर दृष्टीसमोर इमारतींच्या रांगाच रांगा उभ्या ठाकतात. परंतु पणीबाई– विद्यालयासारखी भव्य,नयनमनोहर, हवाशीर व शिक्षणोपयोगी सर्व साधनानींयुक्त अशी दुसरी इमारत दिवांत दिसत नाहीं. निरनिराळ्या वर्गासाठीं स्वतंत्र दिवाणखाने, शारीरिक शिक्षणाचा आखाडा, नानाविध व सुंदर फुलझाडांचा चित्ताकर्षक बगीचा, हरतऱ्हेच्या वेलींचे भूमितीशास्त्राच्या आधारानें उभारलेले स्फूर्तिदायक मंडप–वगैरेंची कुशल रचना पाहिली म्हणजे दानशूर संस्थापकांविषयीं सहजच कोणाच्याहि मनांत आदर उत्पन्न होत असतो.

पणीबाई–विद्यालयांत गुजराथी सहा इयत्ता, इंग्रजी तीन इयत्ता व पोर्तुगेज प्राथमिक–इत्यादि शिक्षण केवळ मोफत दिलें जातें. प्रवेश फीची अट नाहीं. मासिक वेतनाची 'ससेमिरी' भानगड नाहीं. पालकानीं मुलांना पुस्तकें व पाट्या देऊन व वेळेवर जेवण घालून पणीबाई शाळेंत

Pela Praça de Diu

(*Do nosso representante especial*)

Após uma prolongada viagem de onze dias só hoje cheguei a Diu. Houve neste dia, festas na Praça:—desde a meia noite, ou antes, desde o romper do dia 4 de Agosto até o seu *terminus*, queimaram se foguetes, tocaram-se musicas e batuques, efectuaram se diversos divertimentos, e enfim, passou-se o dia *civil*—entrando na linha de conta a respectiva noite—festivamente.

Não suponha o leitor—a presso-me a esclarece lo—que essas manifestações de rigosijo foram celebrádas em honra do representante especial de *O Bharat*—em honra do insignificante autor destas linhas, traçadas ao correr do pêlo. Não. Eram elas dedicadas á Sua Excia. o sr. Governador do distrito de Diu,—o sr. Capitão *dinastico* Feyo (com y) Folque, que nêste dia fázia anos, não sei quantos.

Eu só tive a oportunidade palpitante de constatar *de visu* que nas manifestações do aniversario só tomaram parte os funcionários e não funcionários da Praça, dêsses que estão afeitos aos *salamas tipicamente orientais* para os fins ablomi nais O Povo o verdadeiro Povo, êsse celebrou o aniversario de Sua Excia com uma indiferença que bem indica quanto é estimado— ás avessas — o govêrno dinastico do sr. Feyo Folque a despeito do elogio ministerial que não teve o condão de modificar a modalidade de ser das coisas.

Élogio é isso. Enlêa a vaidade ôca e a insuficiencia intelectual. Mas não pode dar o que a natureza não deu *Quod natura non dedit, nemo potest dare* E muito menos um elógio, ditado por mero intuito de salvar o *prestigio da autoridade*...

* * *

Percorri os estados nativos de Sangli, Miraj, Rajcota, Goundal, Junagada, Barodá e algumas provincias inglesas. Sempre com o deliberado proposito de aprender—*porque atè morrer se aprende.* Ora o que eu notei de comum tanto aos referidos estados nativos como á Praça de Diu é a péssima organisação do serviço de dejectos Nas terras inglesas é outra coisa. Os escrementos humanos são *canalisados* por processos modernos. Não há latrinas fedorentas e porcas nem latas pulhas e indecentes como as que se vêm nas cabeças dos *bonguìs* e *bonguinas* da capital do Estado da India Portuguesa.

Em Diu e nos estados que nomeei, o *chi-chi* é feito, ás mais das vezes, mesmo á borda dos bêcos e das estradas. E com toda a sem cerimonia. Mas como as aldeias daqueles estados e de Diu fazem excepção á regra geral de que não há aldêa sem porcos e como nela há absoluta ausencia desses *bonguìs naturais*, os seus bêcos e estradas são outras tantas latrinas que incomodam as narinas e sujam os pés calçados dos *novatos.* Valia a pena que o Municipio de Diu trabalhasse no sentido de, com o elemento rico da Praça limpa la da porcaria de que falei. Neste particular — na limpesa dos dejectos—Gôa é feliz, porque abunda lá o suino que os purifica por mecanismo digestivo.

A peculiaridade dos usos e costumes dos habitantes não catolicos de Diu exige que haja um código especial, regulando os mesmos usos e costumes Estou colhendo dados necessarios para vêr se se justifica a codificação reclamada pela população não catolica da Praça De resto, em Damão vigora ainda, o código dos usos e costumes da sua população não catolica. Vou estudando o assunto.

* * *

Por acaso, caiu-me deante dos olhos o oficio do sr Governador do distrito de Diu em que solicitou do Governo Geral a expropriação dum terreno particular em proveito do culto *particular* dos mouros.

Está prenhe de contradições. Revela um facciosismo comprometedor ao seu autor. E' um autentico *divide et regna.* Mostra, tambem, com uma evidencia esmagadora a completa ausencia do senso das proporções. Na *Carta Aberta* que estou fazendo destinada á Sua Excia o Senhor Ministro das Colónias — pretende analisar, o famoso oficio do sr. Capitão Folque.

O leitor poderá, então, apreciar devidamente, com elementos concretos e insofismaveis, o *tino diplomatico* e *administrativo* de ha mais de 9 anos, com sucessivas reconduções está governando — e com o elogio ministerial—a Praça de Diu. *Aguçem a lingua* que o prato vai ser deveras apetitoso—de se lhe tirar o chapeu.

Até a outra que esta já vai bem longa.

Corrigendas

No artigo *Obra Grandiosa*, publicado na edição de *O Bharat* de 13 de Agosto corrente, onde se lê 400 xerafins, leiam-se 400 mil xerafins, e em vez de a adquerir— do que adquirir as acções das comunidades.

E no artigo *O Sari* da edição de 6 de mesmo mez de *O Bharat* leiam se:

"Há mais genuino espirito de progresso e a ancia de reforma em quem veste se á europeia, serviudo-se de tecidos indianos, do que arvora um *Sari* feito de fazenda estrangeira."

"A India tem que fazer face a uma crise permanente de valores"

Sir. G. Shouster, Ministro de FinanSas da India

tada por homens cujo amor á agricultura era bem conhecido de todos os povos visinhos, a Sardenha, quando conquistada pelos cartaginezes, decaiu a sua industria, definhou-se e os seus verdes prados e frondosas devesas converteram-se em aridos desertos" diz o autor do *de Mirabilibus*.

Talvez a arvore bemfazeja que nutre o homem com o seu fruto suculento, e oferece gasalhado tanto ao cantor plumoso como tambem ao bicho feroz, torna se esteril como estes, quando ressente a perda da liberdade. As estatisticas da França após a *Grande Revolução*, da América, depois da *guerra de Independencia*, da Alemanha desde 1848, e as bem recentes da Russia Sovietica, postas em flagrante com as da França dos Bourbons e do *regime feudal*, da América governada de Whitehall, e da Alemanha e Russia tiranizadas oferecem-nos uma prova frisante de que a *agricultura* para floirescer carece mais do sacrosanto rocio de liberdade do que Direcções de Agricultura, com as suas ramificações despendiosas, adubos quimicos etc.

Se assim é, não nos admira que a nossa terra, favorecida pela Natureza, de uma forma assaz generosa, com um solo fecundo, não tenha progredido no sentido agricola. Numa terra agrilhoada, as suas associações comunais a gemerem debaixo da *carinhosa tutela* do Governo, não podia suceder outra coisa.

Que as terras, em que a ingerencia do Governo, é minima, dão mais do que em caso contrario, não só pensamos nós mas até aqueles que empunham neste momento as redeas do Governo. Aí está a *nota oficiosa* que aquilata as vantagens da conversão dos *bens nacionais* em comunidades aldeanas, a atestar esta verdade. Afinal, volvidos quatro séculos de mais, os sábios descendentes dos Albuquerques e Castros sentiram forçados a fazer uma confissão, que em linguagem forense, seria qualificada de útil.

Mas, se esta confissão é filha de remorso, se eles são sinceros no que dizem, como poderão eles continuar no cargo de tutores, quando confessam, talvez compelidos pelo desabar dos castelos fundados ao ar, que os bens nacionais, sob a administração directa do Estado, auxiliado generosamente pelos tecnicos pagos ás centenas de rupias, ¿rendem menos que quando estejam fóra das suas mãos?

Se o Governo reconhece que as terras administradas directamente rendem menos do que deviam render, ¿como pode êle manter sua tutela das Comunidades.

Um tutor que confessa a sua inepcia do governo dos seus proprios haveres, mais teima em administrar os interesses do alheio, é algo que não acabamos de compreender.

Theophilos

Ecos-e-Critica

Nao penetram bastante ...

O Govêrno pôs á disposição dos jornais, para os efeitos de publicidade, a nota dos rendimentos das Comunidades de Assolnã, Velim e Ambelim correspondentes aos anos de 1927-1928, 1928 1929 e 1929-1930.

Os jornais situacionistas, baseados nos dados oficiais, fazem a propaganda de venda das acções, últimamente emitidas das referidas Comunidades, dizendo entre várias virtudes que as mesmas garantem, desde já ao comprador o dividendo de uma rupia por cada acção de 21 rupias, o que representa o juro de 5%.

Há, porêm, muita gente que recua, naturalmente porque os dados oficiais, embora verdadeiros, não penetram o bastante no periodo da crise economica que estalou ainda ha pouco. E nós estamos com os retraidos, tanto mais que o Govêrno, não fornecia ao público a nota dos rendimentos das tres comunidades correspondentes ao periodo de 1930-1931, apezar de possuir elementos para se fazer esse calculo.

Desparates ...

Um economista, de tantos que a *patria livre* tem a fortuna de abrigar no seu faminto bojo, para provar que a *crise actual è passageira* socorre-se como argumento, do facto de os grandes proprietarios, não tratarem ainda "de desfazer-se da suas propriedades, vendelas em leilão; salvar, pelo menos, uma parte do seu valor, emquanto é tempo."

Agora, mavioso economista, admita por momentos, que a crise é permanente (como de facto ela é) e que, na lógica de economista, os grandes proprietarios anunciaram o leilão de suas propriedades. Quem vai disputar o lanço? Outros grandes e pequenos proprietarios que já não sabem o que fazer das terras que possuem? O capitalista? Para que? Para ser senhor de terras cuja producção nem compensa as despezas de cultura?

Bem sabemos que os senhores escrevem para servir os donos. Mas valia pena tambem saber o conceito em que os senhores têm os donos para servi-los com tanta baboseira.

Aumentos ...

Fomos sempre contra o chamado pagamento por excesso de horas, porque resulta dai uma imoralidade.

Pague-se a um funcionario por quanto êle pode e deve trabalhar. Arrastá-lo com a achega de excesso de horas a um excesso de trabalho, não é bom serviço, tanto mais que ha nesta terra muita gente que quer trabalho e não o tem.

Num projecto que aparece publicado no *Boletim Oficial* de 24 de Julho último, aparece criada uma achega de excesso de horas, a 2-13-8 por cada hora, aos professores da Escola Normal, isto é, um encargo de 137 rupias mensais ao Estado pelo trabalho de um professor que falta para dar aulas.

Mas o mais curioso é que pelo § 2.° do art. 221 da Portaria de 14 de Agosto de 1918 as despesas resultantes da falta de um professor eram pagas com a gratificação de 20 esc. mensais ou sejam 57-2-3.

Agora vai ser mais que o dobro!!

Com a crise do proprietario e crise do tesouro cujas receitas não entram, aumentos não fazem sentido.

O combate a' toleima

Talvez os leitores saibam já do facto. Como os pobres campónios de Indore esbanjassem dinheiros a larga nas cerimonias funebres, ficando geralmente escravados para toda a vida, o Maharajah Holker publicou um excelente decreto— *O Indore Nulka Act*— proibindo expressamente todas as praxes dêste género, salvo quando fossem estritamente religiosas. Os gastos extraordinários só seriam permitidos em casos excepcionais, quando ficassem a dentro das disponibilidades de cada qual. Magnifica idêa para combater a velha toleima do povo, que tem a cabeça á altura dos pés.

Mas, se o povo é o maior tolo deste mundo de tolos, ¿Quanto parvo ilustre não encontramos entre nós, que, para se dar ares de grande gente, estica as suas forças ao maximo, para rebentar um dia como a rã da fábula?

O Indore Nulka Act encerra, pois, lições profundas não só para o nosso povo, mas para muita outra gente do nosso conhecimento...

(Do *Heraldo*)

रवाना केलें ह्मणजे त्यांचें कर्तव्य आटपलें. विद्यालयांत सांप्रत साडेतीनशें मुलें शिक्षण घेत असून दरवर्षी ही संख्या वृद्धिंगतच होत आहे.

पणीवाई–विद्यालयांत सहा शिक्षक असून, त्यांची रहाणी विद्यालयांतच त्यांच्यासाठीं बांधलेल्या खोल्यांत असते. शिक्षणदानाचें प्रवित्र कार्य आपुलकीच्या भावनेनेंच ते पार पाडीत असतात, असेंच केवळ नसून स्वताच्या शुद्ध व नैतिक आचरणाचाहि पगडा ते आपल्या विद्यार्थीवर्गावर बसवीत असतात. आमच्या लिसेवांतील कित्येक अध्यापकांप्रमाणें ते 'कुयेल्यी'च्या मदिरालयांत व्हिस्कीसोडाचे पेग झोंकून विद्यार्थ्यांस ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगण्याचा आव आणीत नाहींत. वेतनाच्या वजनानें खिशे केव्हां जड होतील, याचाच ध्यास घेऊन ते आपल्या कर्तव्याची आबाळ करीत नाहींत. तर आपला विद्यार्थीवर्ग राष्ट्राला कसा उपयोगी होईल या एकाच विवंचनेनें ते कर्तव्यतत्पर असतात. हें येथें नमूद करण्यास मला आनंद वाटतो. थोड्याच अवधींत पोर्तुगेज शिक्षणाचीहि पद्धतशीर व्यवस्था होणार असल्यानें, पोर्तुगेज भाषाभिज्ञतेचा फायदा घेऊन लुबाडणाऱ्या अर्धशिक्षित लुडबुड्यांचीं शंभर वर्षें लवकरच भरणार असल्याचें भविष्य वर्तविण्यास हरकत नाहीं.

पणीवाई–विद्यालयाच्या इमारतीला एक लाख रुपये खर्च आला असून शिक्षणदानाचा वार्षिक खर्च तीन हजारांवर आहे. या विद्यालयांत फक्त मुलानांच शिक्षण दिलें जातें. मुलींसाठीं साध्वी पणीवाईचे पति भगवानदास यानीं स्थापिलेल्या निराळ्या शाळेंत स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे. मुलींच्या विद्यालयांत दोन 'मास्तरीणी' असून मुलींची संख्या शंभरांवर आहे. सदर परोपकारी जोडप्यानें उपरोल्लेखित संस्था स्थापून सरकारला शिक्षणप्रसाराच्या जड जबाबदारीतून बरेंचशें मुक्त केलें आहे. त्या दिवंगत जोडप्याविषयीं दीवच्या जनतेंत प्रेमादर वसत असल्यास अर्थात् आश्चर्य नाहीं. उलट प्रकार मात्र कौतुकार्ह ठरला असता. तथापि एक गोष्ट प्रमुखत्वानें नमूद करणें इष्ट आहे. ती ही कीं, सदर जोडप्याचे वारसदार शेट अमृतलाल जम्नादास, त्याचे बंधु शेट मगनलाल जम्नादास आणि शेट तुळशीदास जम्नादास व या बंधुत्रयाचे पालक तसेच दीवचे कंठभूषण शेट कर्सनदास मोतीचंद यांचा उच्चतम स्वार्थत्याग व अलौकिक शिक्षणप्रसाराविषयींची कळकळ हीं कामीं आलीं नसतीं तर पणीवाई–विद्यालयाला जें स्वरूप सध्या प्राप्त झालें आहे तें कदापिहि झालें नसतें. याबद्दल मी त्यांना हार्दिक धन्यवाद देतों.

हा मजकूर तयार होतांच संस्थापकांपैकीं भाई मगनलाल यानीं मला अध्यापकांच्या साप्ताहिक सभा भरणाऱ्या दिवाणखान्यांत नेलें. तेथील टापटीप अवलोकून मन प्रसन्न झालें. आणि दिवाणखान्यांच्या प्रमुख भिंतीवर टांगलेली मातोश्री पणीवाईची तसवीर दृष्टीस पडतांच डोळे सहजच अश्रूंनीं थबथबले, अंतःकरण सद्गदीत झालें व दोन्हींहि कर आपोआपच जोडले जाऊन तिला नमन करते झाले. अन्नदानापेक्षां मीं शिक्षण–विद्यादानाला विशेष महत्व देत असतों. कारण अन्नदानानें अन्न घेणाऱ्याचाच योगक्षेम चालूं शकतो; पण विद्यादानानें ज्ञान घेणाऱ्याचाच नव्हे तर त्याच्यावर विसंबून असलेल्या इतर कौटुंबिक व्यक्तींचाहि योगक्षेम चालू शकतो. अन्नदानाच्या परिणामाची व्याप्ति विद्याज्ञान–परिणामाच्या व्याप्तीपेक्षां कधींहि कमीच असते, यांत संदेह नाहीं.

गोमांतकांत इतके श्रीमंत असून, पणीवाईविद्यालयासारखी एकहि संस्था तेथें असूं नये, हें त्यांच्या दानतेला भूषणावह नाहीं. संपत्तीचा ओघ योग्य दिशेनें झाला नाहीं तर ती असली काय किंवा नसली काय मिळून एकच. गुजराथी वनियां पक्का 'वेपारी' असला–दिशेवांत पैचीसुद्धां कसर सोसणारा नसला–तरी परोपकारांत तो लाखांचीसुद्धां पर्वा बाळगणारा नसतो, ह्मणून त्यांचें करावें तितकें कौतुक थोडेंच आहे. बुद्धिवान व श्रीमंत सारस्वतांनीं बनियाचा परोपकारी धडा घेणें रास्त आहे. गोमांतकेतर सारस्वतांत–श्रीमंत सारस्वतांत अनेक दानशूर असल्याचें महशूर आहे. पं. पितापुत्र मोतीलाल व जवाहीर–या श्रीमंत सारस्वतानीं देशासाठीं फकिरी पत्करली नाहीं काय ? परलोकवासी शांताराम रावजी दाभोळकर काय कमी दानशूर होते ? गोव्यांतच मात्र त्यांचा जवळ जवळ अभावच दिसून यावा, हें आमचें दुर्दैव नव्हे काय ?

असो. सार्वजनिक कामासाठींच दिवांत माझा मुक्काम असून, शक्य तितक्या मुदतींत तो संपवण्याचा मानस आहे. काल येथील गव्हर्नरांचा कितवासा वाढ दिवस साजरा झाला. भिंधे मुसलमानानीं व 'निरुपायी' नोकरशाहीनें चंग बांधून 'दाढीदिक्षितां'ची मर्जी कशीबशी राखून ठेवली. लोकपक्षानें अर्थात वाढदिवस उत्सवांत काडीचाहि भाग घेतला नाहीं. 'फुलें वेंचलीं तेथें शेण गोळा करण्याचा प्रसंग लोटला' तरीहि कित्येक नरपुंगवांना धन्यताच वाटत असते, त्याला कोणी काय करावें. 'काजु द दीव ' ह्या नवीनच प्रसिद्ध झालेल्या चोपड्यांच्या कांहीं प्रति मीं दिवात नेल्या होत्या. त्या वाचण्यासाठीं लोकांच्या 'झुंड्या' पडत असल्याचें पाहून दीवप्रकरणांत जनतेचाच कसा निर्विवाद विजय झाला हें कळून आलें व कर्तव्यपालनापासून होणारा आनंद कसा अवर्णनीय असतो, याचा प्रत्यक्ष प्रत्यय आणखीं एकदां आला.

———

इतिहास

—×—

(ले. व्यंकटेश वि. वैद्य.)

ले. २ रा

अन्य सुधारलेल्या राष्ट्राच्या मानानें भारतीय इतिहासविभाग किती मागें आहे याचें विवेचन मागील लेखांकांत केलेंच आहे. तो सुधारण्याचा उपाय कोणता हाच काय तो आतां प्रश्न आहे. याविषयीं आमच्या सूचना निवेदन करतों.

Ontem, á noite, como ela recusasse, mais uma vez, aceder aos desejos do padre, este amarrou-a e meteu-lhe palha entre o vestuario e o corpo, regando a com alcool, que em seguida inflamou.

Aos gritos lancinantes da desgraçada, acudiu a visinhança, juntando-se em frente da casa algumas centenas de pessoas, e, avisada a policia, esta poude intervir a tempo a evitar que a rapariga ficasse completamente carbonizada, apezar de ter recebido queimaduras grandes.

O padre foi prezo.

Uma multidão de 8000 pessoas protestou junto das autoridades, contra tal acto de selvajaria." (*Trans.*)

Semanario catolico

Recebemos e agradecemos a visita de *A voz de S. Francisco Xavier*, orgão do Patriarcado da India. E' seu redactor principal o sr. Pe. Castilho de Noronha, escritor de reconhecido renome no nosso meio.

O novo semanario catolico promete não imiscuir-se nas lutas politicas locais,— o que nos apraz registar neste lugar.

Longa dura e muita prosperidade desejamos ao ilustre colega—*ab imo pectore.*

SUBLATA CAUSA TOLITUR EFECTUS

Urge que os funcionarios publicos passem a perceber os vencimentos anteriores aos elevados pela carestia de vida que ja' nao subsiste.

Carestia fôra a causa justificativa da elevação dos vencimentos do nosso funcionalismo civil e militar. Encarecimento de artigos alimenticios e de vestuario determinara o aumento da remuneração dos serventuarios do Estado.

Hoje, em dia, já não existe, felizmente, a carestia dos objectos necessarios á alimentação e vestuario dos empregados públicos, civis ou militares.

Ora, se *sublata causa tolitur efectus* ¿não é justo, não é necessario que os vencimentos dos funcionarios publicos voltem ás tabelas anteriores á carestia que ás elevara?

Para mais, estão reduzidos os salarios dos operarios. O comercio vegeta. E os proprietarios levam uma vida, cheia de amarguras e aflições. Isto é: a crise economica que o Paiz atravessa, tem, abertamente, abrangido nas suas funestas consequencias tudo e todos—menos os funcionarios publicos.

Urge, pois, nestas condições, que o Govêrno determine que os mesmos funcionarios passem a perceber os vencimentos anteriores aos elevados pela carestia de vida que já não subsiste.

Anuncios

O BHARAT, ano XVI n.° 27 de 8 de Outubro de 1931.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas vão ser vendidos em hasta pública judicial á porta do tribunal desta comarca no dia 13 do corrente pelas 9 horas pela segunda vez e pela metade do preço da sua avaliação os seguintes bens penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Ananta Sinai Corongotó de Parodá e residente em Margão, promove contra Vassudeva Crisna Camotim e mulher Sotiabama Camotina de Cacorá, 5.a parte do dominio útil do palmar denominado "Birnembagaeta" sito em Zinodem do torofo Moloornem dividida em cinco partes ou lotes; 3.a parte do lado nascente da "Varzea Murmuteada" da semeadura de arroz sito na dita, dividida em tres partes; e varzea denominada "Gundó" cultivado para arroz sito em Cacorá descrito na conservatoria do Registo Predial desta comarca sendo os primeiros dois por inteiro sob os numeros 2884 a fls 281 do L. B 20; 1385 a fls. 348 do L. B 6; e 1462 a fls. 28 do L. B 7 e avaliados por 800; 1400 e 150 rupias tudo respectivamente como tudo consta do primeiro edital passado em 18 de Agosto último e afixado nos lugares competentes na data de 19 do mesmo mez de Agosto. O arrematante pagará a contribuição de registo por titulo oneroso e as despezas da praça nos termos de lei. São por este citados todos os credores certos e incertos dos mesmos executados bem como os co proprietarios e quinhoeiros para deduzirem seus direitos nos termos de lei. São tambem citados para os mesmos fins os representantes dos seguintes credores falecidos. Naraina Porobo Dessai, casado de Rivona, a cujo favor se acha inscrito no livro F. 5 a fls. 86 sob a inscrição n ° 13128 registada em 7 de Novembro de 1922 o dominio directo consistente na importancia anual de 30 rupias; Rama Ticlé Camotim de Cacorá a cujo favor pesa uma hipoteca no livro C 2 a fls 225 sob a inscrição n ° 390 constituida por Govinda Gopala Porobo de Cacorá á segurança da quantia de 1550 xerafins ou 775 rupias; A favor do mesmo Rama Ticlé Camotim pesa uma penhora no L. F 1 a fls. 64 sob a inscrição n ° 76 para haver do executado dito Govinda Gopala a quantia de 775 rupias e seus juros; Vitu Subá Naique de Rivona, a cujo favor como cessionário do dito Rama pesa uma penhora no livro F 1 a fls. 227 sob a inscrição n ° 335 para haver dos executados Govinda Gopala e sua mulher Gopica a quantia de 775 rupias e seu juro legal; Srinivassa Upindra Camotim de Ponchovadi a cujo favor pesa uma hipoteca no livro C 5 a fls. 75 v. constituida por Gonessa Upassó Porobo e outros de Cacorá registada sob a inscrição n ° 1203 á segurança da quantia de 500 rupias. A favor do dito Rama Ticlé mais uma hipoteca no livro C 3 a fls 65 sob a inscrição numero 537 constituida pelo dito Gonessa e outros, á segurança da quantia de 437 rupias e oito tangas. Para ser publico se expediu este. Quepem, 2 de Outubro de 1931.

O escrivão do 1 ° oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas
Verifiquei a exatidão
O juiz de direito
Raul A. Correia

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar correm editos de trinta dias a contar do dia da segunda publicação do respectivo anuncio citando a Gongá viuva domiciliada em Madguiri de Karvar e Moga e seu marido Rovol Naique de Vossol de Karvar territorio britanico em parte incerta para no praso de vinte dias, findo o praso de éditos contestarem querendo os artigos de habilitação deduzidas pelo digno A-

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, आश्विन शु० ५ मी शके १८५३

गोवा– मजूर संघ

——×——

गोवा–मजूर संघाची रीतसर संस्थापना होऊन त्याच्या कार्याला सुरवात झाल्यापासून कित्येक असमंजस व अप्पलपोटे जमीनदार भयभीत झाले आहेत. त्यांच्यामतें मजुरांची सांघिक शक्ति वर्धन पावली व त्यांची एकजूट बनली ह्मणजे ते भाटकारांना 'दे माय धरणी ठाय' असें करून टाकतील ! मजुरीचें माप मनमानेल तसें फुगवून व भाटकारांना तोऱ्यानें वागवून ते समाजांत कायमची अस्वस्थता उत्पन्न करतील ! आणि मजूरसंघाविषयीं भाटकारांचा असा भलताच गैरसमज झाला असल्यानें संघाची चळवळ ते साशंकतेनें अवलोकन करीत असल्यास अस्वाभाविक असें कांहींच नाहीं.

तथापि भाटकारांची उपरोक्त भीति निराधार असून कांहीं अंशीं हास्यास्पदहि आहे. कारण मजूरसंघाची उभारणी भाटकारांशीं किंवा गोमांतकीय समाजांतील इतर कोणत्याहि वर्गाशीं झगडा झगडण्यासाठीं झाली नसून, आत्मोद्धार हा एकच उच्च हेतु संघ स्थापनेच्या बुडाशीं प्रमुखत्वानें विलसत आहे. आणि तो हेतु साध्य होण्याप्रीत्यर्थ संघाचे प्रवर्तक केवळ अहिंसात्मक उपायांचीच निर्भेळ योजना करणार असल्यानें, संघाचें अस्तित्व अथवा कार्य संघेतर वर्गांनां कोणत्याच तऱ्हेनें क्लेशदायक होणें संभवनीय नाहीं.

गोष्ट खरी कीं, संघाच्या पद्धतशीर कार्यक्रमानें मजुरांच्या अज्ञानाचा लोप होऊन त्यांच्यांत साहजिकच ज्ञानरवि उदय पावेल व मग अप्पलपोटे भाटकारांना त्यांना अल्प मोलानें मरमरपर्यंत खपवून स्वार्थ साधतां येणार नाहीं. पण ही आशाळभूत वृत्ति मानवतेला लज्यास्पद असल्यानें ती संघाकडून नष्ट केली गेल्यास संघाचा सर्वांनीं गौरवच करणें उचित होय.

शिवाय, संघाचे उत्पादक हे कांहीं समाज व अर्थशास्त्रांत अगदींच अनभिज्ञ नाहींत. समाजांतील सर्व वर्गांचे संबंध कसे परस्परावलंबी आहेत हें त्यांना पूर्ण परिचित आहे. तसेंच भाटकार नादान बनल्यास मजुरांचेंहि आयुष्य कसें कंटकमय होईल याचीहि त्यांना जाणीव आहे. मग, मजूर भाटकारांशीं तोऱ्यानें वागतील अथवा ते मजुरीचें प्रमाण बेसुमार वाढवून भाटकारांना जेरीस आणण्याचा आडमार्ग स्वीकारतील, अशी भलतीच कुशंका मनांत आणणें ह्मणजे शिवाजीचा इतिहास शिवाजी जन्मण्याआधींच लिहिण्याचा वेडगळ प्रयत्न करण्यासारखें होय.

शिक्षणप्रसार, मद्यपानप्रतिबंद, निराश्रितांस सहाय्य, औद्योगिक विकास, धंदेशिक्षणाची प्रगति इत्यादि गोष्टींचा मजूरसंघाच्या कार्यक्रमांत समावेश होत असल्यानें व सदर गोष्टी राष्ट्रकल्याणार्थ अत्यावश्यकच असल्यानें, गोमांतकांतील इतर सर्व वर्गांनीं मजूरसंघाशीं सहकारच करणें योग्य होय. पण या सहकाराऐवजीं उलट कोणीहि संघासंबंधानें बुद्धिपुरस्सर काल्पनिक गैरसमज पसरवण्याचा आततायीपणा करील तर तो निवळ देशद्रोही ठरेल, यांत मात्र संदेह नाहीं.

एवंच, आमच्या ह्मणण्याचा निष्कर्ष हा कीं, ज्या उद्देशानें मजूरसंघाची स्थापना झाली आहे, त्याच्या मुळाशीं आत्मोद्धार हेंच ध्येय मुख्यत्वें खेळत असल्यानें व तें इतर वर्गांतील व्यक्तिसमुदायाला विघातक नसून देशहितालाच सर्वस्वी पोषक असल्यानें, मजूरसंघाच्या कार्याला हातभार लावणें, हें प्रत्येक गोमांतकीयाचें क्रमप्राप्त कर्तव्यच ठरतें. हें कर्तव्य तो योग्य रीतीनें पार पाडून, मजूरसंघ कार्यक्षम होण्याच्या बाबतींत पराकाष्ठा करील, अशी आह्मांस आशा आहे. सांप्रत मजूरसंघाला एका हजारावर सभासद मिळाले असून, अल्पावधींतच ही संख्या मनस्वी वाढणार आहे. अशा वजनदार संस्थेशीं सहकार करण्याचें कर्तव्य टाळणें ह्मणजे पर्यायानें आत्मघातकीपणा करण्यासारखेंच नव्हे काय?

इतस्ततः

शुद्धिवीर लवंदे यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होणाऱ्या पतितपावन गुच्छाचें ३ रें पुष्प उजेडांत आलें असून त्याची विषय रचना गुच्छाच्या नावाला अनुरूप अशीच आहे. शुद्धिकार्यांत जोरकस जोम उत्पन्न करण्याच्या पवित्र हेतूनें अवतरलेल्या 'पतितपावना'स भरपूर लोकाश्रय मिळावयास पाहिजे होता, पण वस्तुस्थिति निराळीच आहे असें आमच्या नजरेसमोर असलेल्या पुष्पावरून ह्मणावें लागतें ! शुद्धिकार्यार्थ वाहिलेल्या या गुच्छाची सांपत्तिक स्थिति अशी निकृष्ट असावी हें हिंदुधर्माभिमानाची उठल्यासुठल्या प्रौढी मिरवणारांस लांच्छनास्पद होय. गोमांतकांत घडून आलेल्या शुद्धीचें स्वरूप नेहमी डोळ्यांसमोर असावें असें ज्यांना वाटत असेल, त्यांनीं तरी 'पतितपावना'चें अस्तित्व टिकवून धरण्यासाठीं पुढें आलें पाहिजे. नाहीं तर 'पावना'च्या प्रकटीकरणांत स्थैर्य उत्पन्न होणें कदापि शक्य नाहीं.

\+ × +

येत्या डिसेंबरांत होऊं घातलेल्या सेंट झेवियरच्या शव–प्रदर्शनानिमित्त तिसवाडी नगरपालिकेनें जे विविध वाहनावर व इतर अनेक गोष्टींवर जादा कर लादले आहेत, त्यामुळें स्वदेशी व 'परदेशी' झेवियर भक्तांचीं मनें त्रासलेलीं आहेत. झेवियरभक्तांच्या जोरावर आपली तिजोरी भरण्याचा हा सदर नगरपालिकेचा कावा आहे, असें 'एका बेकारा'नें मुंबईच्या एका नियतकालिकांत स्पष्ट विधान केलें आहे. आधींच जगावर प्रस्तुत अधिष्ठित झालेल्या आर्थिक आपत्तीचें स्वरूप गंभीर; पोटाचाच प्रश्न सोडवण्याची ताकत लोकांत राहिलेली नाहीं; 'आजचा दिवस कसाबसा घालवला, उद्यांचा दिवस कसा जाईल' ही घोर विवंचना. अशा स्थितींत झेवियर अनुयायांच्या शवदर्शनोत्सुकतेनें कितीहि उचल खाल्ली तरी सांपत्तिक अनर्थामुळें तिची उडी गोव्यपर्यंत पोंचणें अर्थांत अशक्य होय. १९१० सालीं उघडलेल्या प्रदर्शनाला जी लोकांची गर्दी उसळली होती, तिचा पचमांशसुद्धां १९२२ च्या प्रदर्शनांत दिसून आला नाहीं. आणि आतांच्या भुकेबंगाल स्थितींत मात्र भाविकांची गर्दी जमेल असें मानणें शुद्ध चूक आहे. पण घोडा मैदान जवळच असल्यानें याविषयीं विस्तारपूर्वक लिहिण्याचें कारण नाहीं.

× × ×

तांदूळ–भाताचें कंट्रोल व त्यांवरील जादा कर— या गोष्टींचा सांगोपांग विचार करून निश्चयात्मक निर्णय देण्यास सरकारकडून एक कमिटी नेमण्यांत आली आहे. या कमिटीच्या निदर्शनास आजच्या पोर्तुगेज विभागांत आह्मीं एक प्रश्न मालिका मांडली आहे. तिचा काळजीपूर्वक विचार केला गेल्यास, कमिटीकडून सरकारला योग्य त्याच सूचना देण्याला सुलभ पडेल, अशी आमची खात्री आहे. कमिटींत दिरेक्तोर द फाजेंद [सरकार पक्षीय ?], बेर्नार्दीन दा कोस्त [जमीनदार पक्षीय ?] व डॉ. आदोल्फु कोस्त [करविरोधक पक्षीय ?) अशा तीन मेंबरांची नेमणूक झाली असून ती आपला निर्णय विस्तृत रिपोर्टासह लवकरच प्रसिद्धीस आणील असें कळतें.

\+ + ×

महायुद्धाच्या कालांत महागाई मनस्वी माजली होती. अन्नवस्त्राची किंमत अव्वाचीसव्वा झाली होती. यामुळें आपल्या नोकरांचें वेतन वाढविणें सरकारला भाग झालें. आणि त्याप्रमाणें सरकारनें वेतन वाढवून त्याची भरपाई करण्यासाठीं दरेक वस्तूवरील आलफांतहि बेसुमार वाढविले. पण आतां महागाईचा काळ मागें पडला असून तिची जागा स्वस्ताईनें व्यापिली आहे. ह्मणजे जीं कारणें सरकारी नोकरांचा पगार वाढवण्यास पुढें करण्यांत आलीं होतीं, तीं आमुलाग्र नष्ट झालीं आहेत. मग, सरकारनें तो पगार पूर्वस्थितीवर कां आणूं नये ?

वर्तमानसार

—महाराष्ट्र आणि गोमांतक यांचा विशेष परिचय होऊन बंधुभाव वाढविणाऱ्या ज्या कांहीं थोड्या संस्था गोमांतकांत आहेत त्यांत श्रीसरस्वती–सेवक–मंडळ, मडगांव, या संस्थेची प्रामुख्यानें गणना होते. आजपर्यंत मंडळानें महाराष्ट्रांतील विद्वान आणि पुढारी मंडळीच आणवून महाराष्ट्र साहित्य सेवा उत्तम प्रकारें बजाविली आहे. सालाबादप्रमाणें यंदांहि निवडक महाराष्ट्रीय साहित्य भक्तांच्या सान्निध्यानें मंडळाचा सरस्वत्युत्सव साजरा होणार आहे, पुण्याचे प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. प्रो. दत्तो वामन पोतदार, धुळ्याचे प्रेमळ समर्थ–भक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव, संगमनेरचे देशभक्त श्री. श्रीरामकृष्णदास, कुंभारजुवेंचे प्रो. गणपतराव सामंत, वगैरेंचीं विविध विषयांवर ता. २० ते २३ अक्टोबर चार दिवसपर्यंत दररोज संध्याकाळीं ७॥ वाजतां भाषणें होणार असून रात्रौ ९॥ वाजतां सुप्रसिद्ध कीर्तनकार व गायनाचार्य ह. भ. प. गंगाधर रामचंद्रबुवा काशीकर यांचीं सुश्राव्य कीर्तनें होणार आहेत.

—माशेल येथील 'मराठीशाळा' मध्यें तारीख ५–१०–३१ रोजीं वार्षिक रिपब्लिक जयत्युत्सव साजरा करण्यांत आला. पहिल्यानें विद्यार्थ्यांचीं राष्ट्रीय पदें ह्मणत मिरवणूक निघाल्यावर श्रीदुर्गादत्तमंदिरांत भक्त रामचंद्र कृष्ण कामत चंदगडकर यांचें 'प्रजासत्ताक राज्य ह्मणजे काय व त्याचें महत्व' या विषयावर मुलांना समजेल असें समयोचित प्रवचन झालें. नंतर शाळेचे शिक्षक रा. मातोंडकर यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर विद्यार्थ्यांस खाऊ वाटण्यांत आला व राष्ट्रगीत होऊन हा राष्ट्रीय–समारंभ रात्रौ दिव्यांच्या रोषनाईत संपूर्ण झाला. असें एक प्रेक्षक कळवितो.

—गेल्या ता. ८–१०–३१ रोजीं असोळडें येथें सन्मित्र युवक संघाच्या विद्यमानें गांधी जयंत्युत्सव रा. बाबू शिवराम प्रभू देसाई यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें पार पडला. समयानुरूप रा. मास्तर, बाळुबुवा साठे, कृष्ण रावत वगैरेंचीं स्फूर्तिदायक भाषणें झालीं. या समयीं खादीचीहि बरीच विक्री झाली.

बालोन्नति समाज केपें.

सालाबादप्रमाणें सदर समाजाच्या श्रीसरस्वत्युत्सवास आश्विन शु. १० मी (ता. २० अक्टोबर १९३१) रोजीं प्रारंभ होऊन आ. शु. १२ शी (ता. २२–१०–९३१) रोजीं त्याची समाप्ति होईल. उत्सवाचे प्रत्येक दिवशीं भजन, पूजन, आरत्या वगैरे कार्यक्रम होणार असून त्यास सर्व हिंदूंनीं उपस्थित रहावें, अशी नम्र विनंति आहे.

दत्ताराम गो. शिरवईकर
से. बा. समाज

ग्रामसंस्थांची गळचेपी

——×——

[ले.— श्री. रा. नगसेंकर]

लेखांक १ ला.

पोर्तुगेज सत्तेच्या अमलापासून जनतेची व ग्रामसंस्थांची कवटी अशी उलटी झालेली आहे कीं, सरकार जितक्या त्यांच्या सुधारणेच्या व कल्याणाच्या गोष्टी करीत असतें तितक्याचेंहि त्यानां एकजात उलटें फळ मिळत असतें. व हा असा सतत अनुभव येत गेल्यामुळें, त्यांचीं मनें इतकीं साशंक व निराशामय बनलेलीं आहेत कीं, सरकारनें कोणत्याहि सुधारणेचा व लोककल्याणाचा बेत योजिला कीं त्यांच्या मनाला थोडा तरी धक्का बसल्याविना रहात नाहीं. आणि सरकारलाहि लोकांच्या व ग्रामसंस्थांच्या कल्याणाचा पान्हा इतका तटतटून फुटतो कीं तो त्यांना पाजल्याशिवाय त्याच्यानेंहि पण राहवतच नाहीं !

धान्याच्या तुटीला हद्दपार करण्यासाठीं काढलेल्या तांदुळांच्या मोहिमेला अजून कांहीं फारसा कालावधि लोटलेला नाहीं. तीच्यांतून निघालेल्या 'तिसऱ्या नाविन्या'सारख्या चमत्कारानें चकीत झालेल्या लोकांच्या मनांतून तीची आठवणहि अजून बुजलेली नाहीं. पण इतक्यांत सरकारच्या डोक्यांतून, दुसरीच एक, 'काजू'ची मोहीम, बाहेर पडलेली असून सद्या तीनें कोमुनिदादींनां गांठलेलें आहे. ही मोहीम आर्थिक दुःस्थितीला पायबंद घालण्यासाठीं आहे, असें प्रसिद्ध झालें असून ती कोमुनिदादींकडूनच चालविण्याचा सरकारचा आग्रह आहे.

कोमुनिदादींच्या आर्थिक दुःस्थितीवर रामबाण उपाय ह्मणून काजूचें उत्पन्न वाढविण्यासाठीं लागवडीस येण्यासारख्या त्यांच्या मालकीच्या सर्व जमिनींत काजूंची लागवड करण्याचा सरकारकडून त्यांना सल्लावजा हुकूम फर्मावण्यांत आला. रिवाजाप्रमाणें कोमुनिदादीनींहि या हुकमाला मान देऊन आर्थिक अडचण सोसूनहि, मोठ्या मिनतवारीनें त्यांपैकीं दोन तीन मळे लागवडीस आणले व त्या प्रमाणें सरकारास कळविण्यांत आलेंहि. रीतीप्रमाणें लागवड करून देण्याच्या मक्त्याच्या पावण्याहि करण्यांत आल्या; पण सरकारनें दाखविलेल्या किंमती प्रमाणेंच कोमुनिदादीनींहि लागवडीच्या व तीच्या संरक्षणाच्या किंमती आकारल्यानें व त्या लोकानां परवडत नसल्यानें कांही कोमुनिदादींना पावणदारच मिळाले नाहींत.

पण इतक्यानें कांहीं मोहिमेची भूक भागण्यासारखी नव्हती व हुकुमाच्या अम्मलबजावणीची चाललेली अशी टाळाटाळहि सरकारला सहन होणें शक्य नव्हतें. अर्थात कोमुनिदादींवर अशी टाळाटाळ न करतां, त्यांच्या मालकीच्या सर्व जमिनी लागवडीस आणण्यासाठीं, पूर्वींच्याच धर्तीच्या भाषेनें, सरकारकडून दुसरा बटहुकूम काढण्यांत आला. सर्व सोंगें आणतां येतात; पण पैशाचें सोंग मात्र आणतां येत नाहीं; तेव्हां पैशाच्या बाजूनें नाइलाज झाल्यामुळें त्यानां सरकारला आपली खरी स्थिति सांगणें भाग पडलें. तथापि पैशाच्या अडचणीला भिऊन माघार घेण्याइतकें आमचें सरकार कांहीं कमकुवत नसल्यानें व दुसऱ्यानेंहि असा कमकुवतपणा केलेला त्याला सहन होत नसल्यानें, कोमुनिदादींना, कर्ज काढून लागवडी करण्याबद्दल, तिसरा सल्लावजा बटहुकूम बाहेर पडून आज बरेच दिवस झाले व त्यांचीं कोमुनिदादींनीं एव्हांशी आपआपल्या परी उत्तरेंहि पाठविलीं असतील. पण हे हुकूम काढतानां त्यांच्यामुळें कोमुनिदादींवर कोणता अनवस्था प्रसंग ओढवणार आहे याचा सरकारनें थोडासुद्धां विचार केलेला दिसत नाहीं.

कोमुनिदादींच्या काजूच्या लागवडीस आणण्यासारख्या, जर कोणत्या जमिनी असतील तर त्या ज्यांच्यापासून त्यानां आज भरड व कुमेरींचें उत्पन्न मिळत असतें, अशा डोंगराळ व मळावरील जामिनी होत. व अशा तऱ्हेच्या जमिनी नवीन काबिजादींतील कोमुनिदादींकडेच जास्त आहेत. किंबहुना येथील बहुतेक कोमुनिदादीचा भरडकुमेरीच्या उत्पन्नावरच निर्वाह चाललेला असतो असें ह्मटल्यास कांहीं अतिशयोक्ति होणार नाहीं. ज्या कांहीं कोमुनिदादींना शेत बागायताच्या जमिनी मुळांतच नाहींत, त्यानां तर त्या भरड कुमेरींवर अवलंबून रहावें लागतेंच. पण कांहीं दुसऱ्या कोमुनिदादीनां शेतबागायताच्या जमिनी असूनसुद्धां लोकवस्तीच्या अभावीं, लोकांच्या निर्धनतेमुळें किंवा त्या जमिनी उत्पन्नांस आणण्याचें लोकांस परवडत नसल्यानें, त्या जमिनीचें उत्पन्न मिळत नसल्यामुळें असो किंवा मिळाल्यासहि ते अगदीं अल्पप्रमाणानें मिळत असल्यामुळें असो, त्यानांहि त्या भरडकुमेरीच्या उत्पन्नावरच बहुत करून अवलंबून रहावें लागतें. अशा स्थितींत त्या जामिनी काजूच्या लागवडीस काढणें ह्मणजे कोमुनिदादींच्या सध्याच्या आर्थिक अडचणीच्या वेळीं, काजूचें उत्पन्न मिळूं लागेपर्यंत, नवीन खर्च वाढवून त्यांचें मूळ उत्पन्नच तोडण्यासारखें आहे. अशा रीतीनें कोमुनिदादींचें उत्पन्न तोडून खर्च वाढविणें व त्याच्यासाठीं कर्ज काढण्यास लावणें ह्मणजे त्याच्या अस्तित्वावरच गदा आणण्यासारखें आहे. कांजूच्या लागवडीसाठीं एक कर्ज, उत्पन्न तुटल्यामुळें कुमुनिदादीचा खर्च चालविण्यासाठीं दुसरें कर्ज व त्या कर्जाचा व्याज देण्यासाठीं तिसरें कर्ज अशा परंपरेनें वर्ष प्रतिवर्षीं काढावें लागणाऱ्या कर्जाच्या पायींच, काजूचें उत्पन्न येण्याच्या पूर्वींच, काजूच्या मळयांसह कोमुनिदादींच्याच जमिनी नव्हत तर त्यांच्या कोंपोनेंतीच्याहि जमिनी लिलांवावर जाण्याची जर कोणी भीति दाखविली तर ती कांहीं निराधार ह्मणतां येणार नाहीं. ही गोष्ट ज्यानां भरड कुमेरीशिवाय 'बासंतीक' जमिनीचें कांहीं तरी उत्पन्न आहे अशा कोमुनिदादींची झाली. पण ज्यानां मुळांतच भरडकुमेरीशिवाय दुसऱ्या कसल्याहि कायम उत्पन्नाच्या जामिनी नाहींत त्यांची तर स्थिति फारच वाईट आहे. कर्ज काढण्यासाठीं तारण पाहिजे आहे. ह्मणून कर्ज काढायाचें असल्यास, लागवडीस आणावयाच्याच जमिनी तारणास दिल्याशिवाय त्यानां दुसरें गत्यंतर नाहीं. मात्र या असल्या तारणांवर कोणी कर्ज देईल किंवा नाहीं याची शंकाच आहे. एखादा असाहि कोणी कर्ज देणारा भेटून जमिनी काजूच्या लागवडीस निघाल्या ह्मणजे कोमुनिदादींच्या जिविताला अत्यावश्यक जसलेल्या खर्चासाठीं कर्ज काढण्यास तीच्याकडे आणखीं दुसरें तारण राहिलें नसल्यामुळें त्याचवर्षीं कोमुनिदाद कायमची बंद पडल्याखेरीज राहणार नाहीं.

दीवचीं दृश्यें

—×—

(आमच्या खास प्रतिनिधींकडून)

दीव, ११–८–३१

'गांव आहे तेथें महारवाडा असतो' या ह्मणीचें प्रत्यंतर येथील समाजकारणांत व राजकारणांत प्रत्ययास येतें. समाजकारण असो अथवा राजकारण असो, पक्षउपपक्षांची बाधा त्यानां झालेली आढळून येते. एखादी चळवळ देशाला कितीहि उपकारक व आवश्यक असो, पण ती एखाद्या विवक्षित व्यक्तीच्या नेतृत्वाखालीं चालते ह्मणूनच त्या व्यक्तीशीं खासगी तेढ असलेले लोक फटकून वागतात. यामुळें चळवळीचें सार्वत्रिक स्वरूप कमकुवत होऊन ती यशस्वी होत नसते. गोमांतकांतहि हा दुर्गुण बोकाळल्याचें प्रत्ययास येतें. परसत्तेचाच हा प्रभाव असला पाहिजे. परसत्ता—दीर्घकालीन परसत्ता—जितांचें स्वत्व तर रसातळास नेतेच; खेरीज तीच्यांत अहंकारासारखे देशहितविध्वंसक दोष उत्पन्न करीत असते ! आमच्यां डोक्यावर पारतंत्र्याचा वरवंटा मनसोक्त फिरवण्यास परकीयांस फावतें तें यामुळेंच.

'एकवचनी' व्यापार येथें मुळींच नाहीं ह्मटल्यास चालेल. विक्रीच्या पदार्थांची अव्वाची सव्वा किंमत सांगण्याची व्यापाऱ्याला व ती भरकन उतरवण्याची गिऱ्हायकाला जणूं काय सवयच होऊन बसली आहे. माझे मित्र गोविंदराव ज्या भाजीपाल्याची किंमत सहा आणे सांगितली जाते ती एक आणा देऊन खरेदी करीत असतात. जो नियम भाजीपाल्याला लागू आहे तोच नियम थोड्याबहुत प्रमाणानें इतर व्यापारी देवघेवीलाहि लागू करण्यास हरकत नाहीं. येथील व्यापारी लोक सरकारी नोकरांशी उधार देवघेव करण्यास समाधान मानीत असतात. आगपेटींशिवाय येथें सर्व वस्तु गोमांतकापेक्षां विशेष किंमतीनें विकल्या जातात. मच्छ—त्यांतल्या त्यांत 'बोंबील'—मात्र येथें कमालीच्या सस्ते भावानें मिळतात. गुर्जर बांधव मच्छाहार करीत नसल्यानें कदाचित मच्छाला दीवांत भाव नसावा असें वाटतें.

येथें कित्येक देवालयें असून त्यांचा महाजन वर्ग बराच मोठा आहे. महाजनाचा द्रव्यनिधीहि लाखानीं मोजण्यासारखा आहे. पण जनावरांपेक्षां मानवी प्राण्यांना त्याचा विशेषसा फायदा मिळत नसल्याची तक्रार आहे. लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, येथील देवालयांच्या कारभारावर सरकारचें कसलेंच नियंत्रण नाहीं. ना कोंप्रोमीस ना कोमिसांव. नगरशेटीच्या नजरेखाल सर्व व्यवहार सुरळीत होत असतात. कोंप्रोमीस व कोमिसांवाची चळवळ मागें एकदां उपस्थित झाल्याचें सांगतात. पण त्यांत चळवळ्यानां काहींच यश आलें नाहीं. येथील 'झुरळां'चे दांत 'वज्राहार' करण्याइतके तिखट नसल्यानें कदाचित कोंप्रोमीस कोमीसावांची आवश्यकता लोकांना वाटत नसेल.

दीवांत संपत्ति भरपूर आहे. पण तिचा व्यय लोकजागृतीच्या कामीं झाल्याविना दीवचें दैन्य तज इतरत्र फांकणार नाहीं. पोर्तुगेज भाषा व कायदे यांचें भरीव ज्ञान लोकांना झाल्याखेरीज सरकारशीं स्वतःच्या पायावर उभें राहून झगडण्यास ते समर्थ होणार नाहींत. या बाबतींत त्यांनीं शेजारच्या ब्रिटिश सीमेंतील आपल्या गुर्जर बाधवांचें अनुकरण करणें इष्ट आहे. गुर्जरबांधवांचें द्राव्यिक सहाय्य नसतें, तर महात्मा गांधीचें इंग्रजसत्तेविरुद्ध चालू असलेलें आक्रमण जितकें यशस्वी, परिणामकारी व धडाडीचें झालें आहे, तितकें खास झालें नसतें. असो.

आज मीं येथून स्वदेशीं परतणार असल्यानें या खेपेला आणखी कसलीहि दीवविषयक माहिती पुरवतां येणार नाहीं. या खेपेला मला सरकारी त्रास तर बिलकूल झाला नाहींच; उलट कित्येक अधिकाऱ्यांनीं मला आदरानेंच वागविलें. त्यांचें व माझ्या सारस्वत बंधूंचे पुन्हां एकदां जाहीर रीतीनें आभार मानल्याविना माझ्यानें रहावत नाहीं.

शेवटीं, दीवच्या जनतेंत महात्मा गांधीची राष्ट्रीय शिकवण प्रसृत होऊन ती परसत्तेचें जोखड लाथाडण्यास समर्थ व्हावी, स्वदेशोद्धारार्थ धनार्पणच नव्हे तर आत्मार्पणसुद्धां करण्याची उच्च भावना तीच्यांत निर्माण व्हावी, आणि अखिल हिंदुस्थानांत दीव व दीवकरांचा कीर्तिदुंदुभि दुमदुमावा अशी परमेश्वरापाशीं अनन्यभावानें करुणा भाकून हें ओझरतें प्रवासवृत्त येथेंच समाप्त करितों.

———

pertinencia. E' que, como dizem os ingleses, — *we live to learn.*

Belezas administrativas

O *Diario da Tarde* trouxe á luz algumas ilegalidades e actos de má administração praticados no concelho de Mormugão, pedindo para eles a atenção do sr. Governador que, segundo diz, "pretende timbrar o seu governo por uma administração parcimoniosa" e liga grande "interesse á moralisação dos negocios publicos".

Acontece, porém, que alguns dos actos ilegais atribuidos á Administração do Concelho de Mormugão são da responsabilidade do proprio govêrno. Achamos que embora justiça não se pode culpar unicamente da Administração daquele Concelho pelo facto de que as suas "juntas administrativas são por vezes compostas de vogais que são os maiores devedores das mesmas corporações, alguns desses estando a ocupar a presidencia da mêsa contra a expressa determinação da lei." visto a nomeação dessas juntas ser feita pelo govêrno que tem a obrigação de inquirir previamente sôbre as qualidades e incompatibilidades dos seus nomeados.

A nomeação de devedores e pessoas nocivas aos interesses das referidas corporações não é sómente contraria ao espirito e á letra da lei mas tambem vai de encontro ao mais elementar bom senso. E' um triste sintoma da afinação a que chegaram os negocios admitistrativos nesta terra e não há maneira de salvar o govêrno da responsabilidade que lhe cabe nessas ilegalidades flagrantes lançando toda a culpa nos seus subordinados. De resto, os factos relatados pelo insuspeito *Diario da Tarde* não datam de hoje mas são impunemente praticados de há anos.

O que, porém, não faz sentido, é que, em presença de semelhantes belezas administrativas, alguem venha, ainda, a falar no "interesse" e no "carinho" que sua exia. dedica ás corporações tuteladas do Estado. ¿Que seria, santo Deus, se não houvesse tanto *carinho* e tanto *interesse*?!

"Foi isto de todos os tempos. As religioes nao unem um povo. Separam-no em bandos que se engalfinham numa luta ignobil e perversa de privilegios e preeminencias em nome de Deus, que para cada uma das parcelas passa por verdadeiro, sendo para outras falso ou uma fabula."

Menezes Bragança

O Govêrno iniciou as suas medidas proteccionistas pelo arroz, por se lhe afigurar ser esse não só o melhor, mas o unico caminho que com segurança o podia conduzir ao fim que tinha em vista.

O proposito de acudir a crise do côco está já no presente projecto mais do que claramente manifestado pela eliminação da taxa de exportação e pela indicação de que o produto de sobretaxa de equilibrio será especialmente destinado a este fim.

Especialmente, dizia o Govêrno, e tanto bastava para definir o seu proposito.

Especialmente, porque não dispunha ainda nesse momento da certeza do quantitativo da contribuição predial produzida pelo côco e que era e é seu intento restituir na integra aos contribuintes.

Especialmente, porque, estando dependente deste Conselho a fixação da sobretaxa de equilibrio, não podia o Govêrno saber quanto ela viria a produzir e assim de quanto poderia dispor.

Especialmente, porque entendia e entende que a crise economica se não debelará nem debela com esta única medida.

Nesta maneira de dizer foi licito encontrar a possibilidade de que o Govêrno pensasse aproveitar-se do rendimento da sobretaxa de equilibrio para acudir a quaisquer necessidades de ordem financeira

Quer o Govêrno aproveitar esta ocasião para fazer aqui a pública afirmação de que tais dificuldades não existem, mas que se vierem a existir, dispõe dos necessarios elementos para as enfrentar, agindo com a energia que as circunstancias exigirem, e sempre no conhecimento completo, e de maneira alguma sofismado ou ocultado da nação.

Não compreende o Govêrno como em materia tão melindrosa, como é sempre a economica, as medidas de conjuncto se imponham de preferencia ás individuais, desde que elas obedeçam a um plano e tenham a sua natural sequencia.

Menos compreende como qualquer medida proteccionista imposta pelas circunstancias tenha de ficar dependente da aplicação do seu rendimento, porque será então forçoso concluir que a razão principal existe na aplicação e não na determinante.

Porém o Govêrno, neste como em todos os seus actos, não pretende agir contra a vontade da colónia, e assim resolve submeter ao estudo e apreciação duma comissão deste Conselho o Diploma em questão, afim de que ela, representante das correntes de opinião em conflito, sobre ela se pronuncie modificando-o, alterando o, refundindo o, dando lhe, enfim, a forma que melhor satisfaça ás necessidades a que é proposito acudir.

Para este fim nomeio a seguinte comissão: Director de Fazenda, engenheiro Bernardino da Costa e dr. Adolfo Costa.

Despertar duma classe

Promovida pela Direcção da Sociedade dos Operarios de Gôa, realisou se, no domingo passado, a primeira conferencia de propaganda da associação, na populosa freguesia de Navelim de Salcete.

Fe-la em concani o director de *O Bharat*, no campo aberto e ao ar livre, explicando com argumentos e exemplos á assistencia que era numerosa, a razão de ser da Sociedade e o Ideal que a originou.

Na reunião em que teve lugar a conferencia, falaram, tambem os srs. Roque Antonio Pereira e F. X. Fernandes de Lord, presidente e secretario da Direcção da Sociedade, e Sebastião Ricardo Carneiro, Francisquinho Fernandes e João Francisco Fernandes, sócios efectivos da instituição, todos frisando a urgente necessidade da instrução do nosso operariado e da sua imediata libertação do vergonhoso jugo do alcoolismo.

Terminada a conferencia, foram feitas inscrições de novos sócios, tendo sido escolhida uma comissão local para a propaganda permanente da Sociedade.

A seguinte conferencia será feita na freguesia de Majordá, no domingo proximo.

A. F. Pereira

Com uma doença de poucos dias, veiu a finar-se em Pangim êste nosso conterraneo que soube honrar condignamente as funcções em que o Estado o investiu.

Foi dolorosa a impressão que em nós causou o inopinado decesso de quem, com atividade e inteligencia modelares, melhorou consideravelmente os serviços telegrafo-postais do Estado da India.

Morre no vigor de idade e quando, ainda, se dispunha para com dedicação, reorganisar os serviços a seu cargo.

Paz á sua bela alma e sentidos pezames aos seus.

वर्ष १६ वें. अंक २८

[गुरुव]ार ता. १५ अक्टोबर सन १९३१

वर्गणीचे दर

ना ट. ख. सह ३ रु. [आगाऊ]

किरकोळ अंकास १ आणा.

[जाहि]रातीचे दर– समक्ष अगर पत्रद्वारे.

पैसे आल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाहीं.

संपादक व मालक

[गो. पु.] हेगडे देसाई– फार्मासेवतिकु

मुद्र[क ...]न भारत–प्रेस कुसमण केंपें गोवा.

भारत

O BHARAT

Ano 16 Nº 28

QUINTA-FEIRA 15 de Outubro 1931

ASSINATURA

Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO

G. P. Hegdo Dessai

FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO

TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas correm éditos de 30 dias a contar da 2a. publicação do último anuncio nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civil citando os interessados Aprupem Naique e seu marido Manjé Pandú Naique moradores em Mazali do territorio britanico em parte incerta para querendo assistirem a todos os termos até final dos autos de inventario orfanologico que Segnna Naique de Patnem de Canacona presta por óbito de Custo Balsó Naique que foi da dita e deduzir nele seus direitos nos termos de lei. sem prejuizo do seu regular andamento, bem assim comparecerem no tribunal desta comarca na 1a. audiencia findo o praso déditos, afim de conferirem o dote recebido por ocasião do seu casamento na importância de 100 Rps. sob cominação legal. As audiencias dêste Juizo só fazem em todas as terças e sextas feiras quando não sejam feriados ou estejam compreendidos nas ferias porque neste caso se fazem em dias imediatos tambem se não forem feriados. Para ser publico se expediu este. Quepem, 11 de Setembro de 1931.

O escrivão do 1 ° oficio

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei a exatidão

O Juiz 1 ° substituto

Abilio da C. e Souza

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar correm éditos de 30 dias a contar da segunda publicação deste citando a Mogá Naiquina Dessaina e seu marido Bicá Somum Naique Dessai ambos maiores residentes em Mazali do territorio britanico em parte incerta, para no praso de 10 dias, findo o de éditos pagarem no sobredito cartorio a quantia de 2:00:1 11/12 provenientes de custas contra ela liquidadas nos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito de Rama Pandu Naique que foi de Ponsulem de Canácona em que foi ultimamente cabeça de casal o regedor de Nagorcem Pandurronga Malopa Sinai ou nomearem bens suficientes á penhora para o pagamento do pedido e de custas e selos acrescidos da execução sob pena de não o fazendo ser a nomeação devolvida ao exequente Ministerio Público prosseguindo se a execução seus termos á revelia. O que para ser público se expediu este. Quepem, 26 de Setembro de 1931.

O escrivão do 2 ° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei a exatidão

O juiz de direito

Raul A. Correia

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar, correm éditos de 30 dias a contar da segunda publicação do respectivo anuncio citando os interessados Antonio Francisco Almeida, casado Martinho Gracias, marido da interessada Luisinha Almeida e Maria Santana Almeida, e seu marido José Santana Almeida ou José Almeida, todos de Assolnã e ora ausentes do territorio Britanico em parte incerta para no praso de 10 dias, findo o de éditos pagarem no sobredito cartorio a quantia de 69:08:01 proveniente de cota parte de custas e selos liquidados nos autos de inventario orfanologico procedido por óbito de Manuel João Almeida que foi de Assolnã, e u que foi inventariante e cabeça de casal Avelina Barros, do mesmo lugar ou no igual praso nomearem bens suficientes á penhora sob pena de não o fazendo ser a nomeação devolvida ao exequente M. P. prosseguindo-se a execução seus termos á revelia. O que para ser publico se expediu este Quepem, 26 de Setembro de 1931.

O escrivão do 2 ° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei a exatidão

O juiz de direito

Raul A. Correia

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas vão á praça para venda em hasta publica á porta do tribunal desta comarca no dia 16 do corrente mez de Outubro pelas 9 horas pela 3.a vez e por qual quer preço que a praça der os seguintes bens penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Maria Leonor Barreto, de Margão, promove contra Florença Fernandes e outros de Cuncolim: —Metade de cada um dos predios denominados "Tancabando" "Tancabando" "Tancabando" "Tancabando", "Batiem" este da cultura de mangueiras e aqueles de coqueiros, "Batiem" da cultura de coqueiros "Cumbarxir" "Armaudó" "Armandó" um quanto de cada um dos predios "Gormando" êste da cultura de mangueiras em que existem casas de morada e aqueles de arroz "Tancabando" "Tancabando" "Bati" da cultura de coqueiros e 1/8 do predio rustico denominado "Fondió da cultura de coqueiros e arroz todos sitos em Cuncolim e descritos por inteiro na conservatoria do registo predial desta comarca sob os n.os 13220 a 13226, 13229 a 13233, 13235, 13237 no L B 37, avaliados por 40, 40, 40, 40, 50, 50, 50, 40, 40, 300, 20, 20, 35 e 100 rupias, tudo respectivamente como tudo consta do 1 ° edital passado em 7 de Julho último e 2 ° passado em 15 de Setembro tambem último afixados respectivamente nos lugares marcados na lei nas datas de 8 de Julho e 22 de Setembro referidos. O arrematante pagará a contribuição de registo por titulo oneroso e as despesas da praça nos termos de lei. São por este citados todos os credores certos e incertos dos mesmos executados bem como os co proprietarios e quinhoeiros para deduzirem seus direitos nos termos da lei. Para ser público se expediu este. Quepem, 2 de Outubro de 1931.

O escrivão do 1 ° oficio

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei a exatidão

O juiz de direito

Raul A. Correia

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar correm éditos de 30 dias a contar da segunda publicação do respectivo anuncio citando a interessada Camalabai Sinai-ninu e seu marido Venctexa Vamona Gaintondó de Canacona e ora ausente em parte incerte de Bombaim India Inglesa, para assistirem a todos os termos ate final do inventario orfanologico a que se procede por obito da Esvonta Sinai Bendó que foi de Agosso de Loliem em que é inventariante e cabeça de casal Visvambora Sinai Bendó do mesmo lugar se u prejuiso do seu regular andamento. O que para ser publico se expediu este. Quepem, 2 de outubro de 1931.

O escrivão do 2 ° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei a exatidão

O juiz de direito

Raul A. Correia

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar correm éditos de 30 dias a contar da segunda publicação deste citando o reu Jacinto Fernandes, maior d'idade de Cusmane para no praso de 10 dias findo o de éditos pagar no sobredito cartorio a quantia de dez escudos proveniente de 10 dias de multa @ de um escudo por dia em que ele foi condenado nos autos crimes de policia correcional que contra êle promoveu o Ministerio Público nesta comarca pelo crime de ofensas corporais ou no igual praso nomear bens suficientes á penhora para o referido pagamento e de custas e sêlos acrescidos de execução sob pena de não o fazendo ser a nomeação devolvida ao exequente M. P. prosseguindo-se a execução seus termos á revelia. O que para ser público se expediu este. Quepem, 1 de Outubro de 1931.

O escrivão do 2 ° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei a exatidão

O juiz de direito

Raul A. Correia

Ano XVI) Quinta-feira, 15 de Outubro de 1931 (N.º 28

O BHARAT

ANUNCIOS
Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

Não se aceita nenhum anuncio ou comunicado sem ser adiantado o seu custo provavel.

Jornal de maior circulaçao

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL
Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-03-00

REDAÇAO E ADMINISTRAÇAO
COMPOSIÇAO E IMPRESSAO
Tip *BHARAT* Cusmane-Quépém

Ecos-e-Critica

No regime dos "baldes"...

O dinheiro— 10 rupias ao dia—que se paga ao sr. Bernardino Camilo da Costa Jr. a titulo da fiscalisação das obras da ponte cais da Alfandega, representa um autentico desperdicio.

O sr. Costa Jr. não é engenheiro— disse-se por aí e ninguem ainda deu á afirmação o desmentido que se tornava necessario se fôsse ela falsa. Não obstante, sua senhoria está a usufruir um cargo importantíssimo, o de Director de Agrimensura,— onde podia e devia ir um engenheiro. Mas ...vá. O sr. Craveiro Lopes considerou, segundo dizem, a aquisição do sr. Costa Jr. indispensavel para a maior felicidade desta terra. E lá está ele onde não devia estar. Agora o sr. Craveiro Lopes dá ao menino mais 10 rupias ao dia. Porque? Para fiscalisar a execução das obras de cimento armado etc. que vão fazer-se no cais da Alfandega. Agora, reflitamos por momentos. ¿Que experiencia previa leva sua senhoria para a nova comissão? ¿Quantas obras iguais ou simi lares o beneficiado executou ou fiscalisou antes?

Que nós saibamos, o sr. Costa Jr. devia ser o primeiro a não aceitar essa comissão, mesmo que, assim, corresse, o risco de desagradar ao sr Craveiro Lopes.

De resto, o caso não era de extranhamento, dado o feitio da

"SOBRETAXA DE EQUILIBRIO"

Na sessão do Conselho do Govêrno, de terça-feira, em que devia ser discutido o projecto elaborado pelo Governo para acudir a crise economica do páiz, o sr. Governador Geral fez as seguintes declarações,:—

Srs. Vogais do Conselho do Govêrno!

Ao apresentar a este Conselho a primeira das medidas com que o Govêrno pretende enfrentar a crise económica, entendo ser do meu dever dizer algumas palavras que esclareçam ou definam intenções e propósitos.

Sabe este Conselho muito bem que de ha muito vinha sendo solicitada a intervenção do Govêrno neste assunto.

A apatia pública apelava mais uma vez para o Estado-Providencia.

Eco dessas reclamações foi neste Conselho a voz do ilustre vogal Bernardino da Costa.

Mais tarde, subiu até o Govêrno a representação da Direcção da Associação dos Agricultores e Proprietarios de Gôa.

O Govêrno que não descurava o assunto, entendeu ser o momento opertuno da sua intervenção e fez publicar o projecto de diploma que hoje vem á apreciação deste Conselho.

E' a primeira duma série de medidas, como se diz no seu preâmbulo.

Sabe o Conselho como a opinião publica se manifestou aberta e claramente contra ele.

Dir se há que a crise economica não existe e que é mera fantasia tudo quanto atè aqui a este respeito se vinha afirmando e passando em julgado,porque não era contraditado.

Para os que assim pensam o Diploma em questão nem é mau nem bom. porque, mais do que desnecessario, não tem razão de ser.

Para os que pensam contrariamente e julgam necessário que alguma coisa se legisle, o projecto, se não é de todo mau, tambem os não satisfaz, porque contém, no seu entender, importantes lacunas.

O Govêrno esclarece que as bases fundamentais deste projecto são:

a)—O controle da importação pela sua limitação;

b)— A aplicação duma sobretaxa de equilibrio e como tal móvel.

Estes fundamentos encontrou-os o Governo em todas as sugestões que lhe foram feitas e que constam do processo que está sobre a mesa.

nossa administração pública. Mas...como no Conselho do Govêrno o estrategico de Carambolim falára em "baldes de agua fenica"...

Sobretaxa de Equilibrio

Arquivamos nas nossas colunas uma declaração que o sr. General Craveiro Lopes fez no Conselho do Govêrno em 6 do corrente, justificando a nomeação da Comissão para estudar o projecto da "Sobretaxa de Equilibrio".

A declaração é, para nós, um documento valioso por dupla razão. A uma, porque contem esclarecimentos tendentes a dissipar as apreensões e suspeitas de que nos fizemos eco neste jornal. A outra, porque nele se lêm afirmações que valem por promessa definitiva e terminante de que s. exia. não hesitará em tomar medidas para a redução das despezas públicas quando o estado das finanças do Estado aconselhar a sua intervenção neste sentido.

Dira' o colega ...

Para o *Diario da Tarde* são "incompetentes" os "Manejadores" das alfaias agricolas adquiridas pela Inspecção das Comunidades, hoje estincta. E' a opinião do ilustre colega. E nós a registamos mais uma vez.

Mas, dirá o colega ilustre, ¿porque é que o Govêrno tambem devolveu á Comunidade de Carambolim os adubos quimicos—nada menos de 800 sacas—que a mesma Inspecção havia comprado e armazenado no rez do chão do edificio das Comunidades das Ilhas?

Desculpe-nos mais esta im-

स्थेनें यंदांहि बरेंच वाङ्मय छापून प्रसिद्ध केलं आहे. तें गोवर्धन संस्था ५१० सदा. शीव पेठ पुणें या पत्त्यावर कार्ड पाठवून मागावेल्यास घरपोंच मोफत पाठविलें जातें तें आतांच मागवून घ्यावें.

'गोरक्षण' वर्तमान पत्राचा सप्ताहाचा खास अंक काढण्यांत यावयाचा असून त्यांत सर्व ठिकाणच्या सप्ताहांची विस्तृत माहिती संग्रहित करण्यांत येते. तरी सप्ताहाचें विस्तृत बातमीपत्र संपादक 'गोरक्षण' ५१० सदा शीव पेठ पुणें यांजकडे पाठवून त्रोटक पण महत्वाचा मजकूर न गाळतां 'भारत' केपें यांजकडे पाठवावें.

मागील वर्षी बऱ्याच ठिकाणीं लहान प्रमाणांत सप्ताह साजरा झाला असून 'नगाऱ्यापुढें टुणटुण्याचें काय' ह्या भलत्याच कल्पनेनें हकिकत प्रसिद्धीकरितां पाठविली गेली नाहीं असें ऐकिवांत आहे. तरी त्यांनीं असल्या भलत्याच शंका मनांत न आणतां अफाट वृक्षाचा विस्तार अणु एवढ्या सूक्ष्म बीजांतच असतो हें लक्षांत ठेऊन साग्र प्रतिवृत्त पाठवावें.

ह्या जाहीर विनताकड प्रत्येक हिंदूचें लक्ष जाईल अशी आशा आहे.

मार्मुगांव हार्बर, ता. ७।१०।३१.

गो. वि. बरवे, स्व. गोव. संस्था.

Por causa de 'sobretaxa'

Na estrada que fica entre os dois postos aduaneiros de Polem e Mazali, deu se, há pouco, uma scena devertida.

Era noite escura. Um cidadão *livre* deste *paiz livre* se dirigia ao territorio britanico com seu *satli-potli* e *modqui culnem* para lá se estabelecer. Precisamente na altura da estrada referida *caludiu* com um *subject* britanico que, a seu turno, com uma garrafa vazia, entrava nesse momento na terra portuguesa.

Do esbarramento resultou, como era natural, cairem das mãos do cidadão os tais *modqui-culnem*—utensilios de cosinha —que ficaram reduzidos a cacos, bem como desligar se do conchego do *subject* a tal garrafa que se fez em bocados.

Trocadas as necessarias explicações sobre o *accidente* involuntario, houve entre os dois a seguinte conversa:—

— ¿ Aonde vai você com *modqui culnem* e com uma cara endiabrada ? — perguntava o *subject* ao cidadão.

—Eu vou estabelecer me na India britanica onde o arroz é mais barato do que na minha terra em que a *Sobretaxa de Equilibrio* vai encarece-lo fortemente para acudir á chamada crise economica. Suponho que viverei ali melhor com a metade do meu ganho do que aqui com todo. E você ¿para que destinava a extincta garrafa e para onde se dirige ?

—Eu— replicava o *subject* — desloco-me para a primeira taverna do seu *paiz livre* para deliciar me com o saboroso *fenim de palmeira*—coisa que lá é mais barata do que em qualquer parte da India. Com duas tangas pode a gente embebedar-se *livremente*, dando, *livremente*, largas á lingua, pés e mãos. Mas hoje, fico apenas, compelido a encher do *fenim* o estomogo só, por o *accidente* haver tomado conta da infeliz garrafa.

"Antepor a crença ao foro civico, e' preparar o campo para o sinistro e ignobil principio do DIVIDE UT IMPERES."

Menezes Bragança

DADOS ESSENCIAIS

AO SR. DR. ADOLFO COSTA

Esperavamos que o sr. General Craveiro Lopes havia de retirar a proposta da "Sobretaxa de Equilibrio", tanto mais que sua exia. não deseja ir contra a vontade do país. Mas o sr. Governador, talvez para ser mais meticuloso, nomeou uma comissão para estudar o projecto, comissão em que, conforme se afirmou aí, estão representadas as duas correntes em oposição.

Ao ilustre vogal sr. dr. Adolfo Costa que é duns poucos que imensamente vem concorrendo para que o actual Conselho do Govêrno não seja um completo fiasco, e que, na comissão, supomos, representa a corrente onde milita o *Bharat*, pedimos que, antes de chegar ao acordo—se chegar —com o representante da corrente oposta, procure ver esclarecidos os seguintes pontos, sendo preciso solicitando do Governo a nomeação de uma comissão de inquerito:—

*

¿Qual o número dos habitantes do país que se dedicam á cultura dos arrozais?

¿Qual a área cultivavel que a cada um deles cabe? E esta area é capaz de produzir o arroz bastante para pagar as rendas ect. e satisfazer ao seu consumo e de seus durante todo o ano?

¿Qual o número dos que, cultivando os arrozais tem, quando os trabalhos das varzeas terminam. outras ocupações subsidiarias e por quanto tempo? E qual o número dos que não tem nenhuma ocupação subsidiaria?

¿Quais são os pontos do país onde o consumo do arroz importado é grande? E nestes pontos, qual é o elemento que prevalece? São os proprietarios, as familias dos emigrantes que, sem fazerem qualquer trabalho, vivem das remessas destes ou é o tal proletario?

¿O arroz da producção local aufere ou não um preço superior ao do arroz importado? E qual é esta diferença?

Nas comunidades, onde este ano realisaram-se as arrematações trienais, ¿qual foi o preço médio que obteve o candil de produção? Isto é :uma area capaz de produzir 1 candil, ¿porque preço foi arrematado?

¿Qual o custo de produção de um candil de arroz em Gôa?

São estes dados essenciais, na nossa modesta opinião, para se avaliar á justa o reflexo que, na economia do país, vai produzir a "Sobretaxa de Equilibrio" e sem que a comissão se habilite com os mesmos dados, não pode, de modo algum, fazer uma obra honesta.

Ao concluir, pedimos ao sr. dr. Adolfo Costa que na qualidade de representante da corrente que é adversa á sobretaxa, envide os seus melhores esforços perante o sr. Governador Geral no sentido de o projecto, modificado pela Comissão, ter a maxima publicidade juntamente com o relatorio que o preceder.

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
ग्यावीण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, आश्विन शु. ११ शी शके १८५३

सरकारची अक्षम्य बेपर्वा !

——×——

तांदुळांवर जादा कर लादण्याच्या भरीस सरकारनें पडूं नये एतदर्थ लोकानीं प्रयत्नाची पराकाष्ठा केली. व्यापारी मंडळ व मजूरसंघ या वजनदार संस्थानीं ठरावांवर ठराव मान्य करून सदर करापासून उत्पन्न होणाऱ्या दुष्परिणामांचें भेसूर चित्र सरकारच्या नजरेसमोर उभें केलें. वर्तमानपत्रानीं स्पष्ट शब्दानीं व जोरदार भाषेंत त्याचा तीव्र निषेध केला. तांदुळांच्या गिरणीवाल्यानीं व व्यापाऱ्यांनीं उपरोक्त जादा कराच्या बिलाचें स्वरूपाविष्करण करून, तें गिरणीचा धंदा व तांदुळांचा व्यापार बसण्यास कसें कारणीभूत होईल, याची सरकारला जाणीव करून दिली. एवंच, कांहीं अप्पलपोटे व स्वार्थपरायण 'भात'कार खेरीज करून, गोमांतकांतील इतर सर्व जनतेनें एकसमयावच्छेदें त्या बिलाबद्दल नापसंती व्यक्त करून, तें विधिमंडळाच्या चर्चेस न आणण्याविषयीं सरकारला विनंति केली.

वास्तविक रीत्या बहुसंख्य लोकमताला मान देऊन जादा कराचा संबंध तावडतोब गाडणें सरकारचें कर्तव्य होतें; पण सरकारनें त्याकडे डोळेझांक करून बिलांतील दोष नष्ट होऊन त्याचें स्वरूप स्पष्ट व्हावें या दिखाऊ हेतूनें एक कमिटी नेमण्याचा उपक्रम केला. आणि दुःखाची गोष्ट ही कीं, या कमिटीनें लोकांच्या साधार ह्मणण्याचा, जागतिक स्वस्ताईचा व अर्थशास्त्राच्या साध्या नियमांचाहि विचार करण्याची तसदी न घेतां एकदम तडकाफडकीं आपला अभिप्राय प्रकट केला ! हा अभिप्राय ह्मणजे न्यायाच्या आद्य व सर्वसंमत तत्वांचें खोबरें व व्यापार स्वातंत्र्याचें कडबोळेंच होय !

उदाहरणार्थ, उपरिनिर्दिष्ट अभिप्रायांत असें एक कलम सुचविण्यांत आलें आहे कीं, जादा कराची आज्ञा सरकाररीत्या प्रसिद्ध होतांच, तिच्या अमलबजावणींत सदर आशेपूर्वी व्यापाऱ्यांपाशीं 'दास्तन' असलेल्या तांदूळ–भाताचाहि समावेश व्हावा ! भूतकालीन गोष्टीला वर्तमानकालीन कायदा लागू होत नसतो या सोप्या सिद्धांताचीहि सुद्धां मान मुरगळण्यास कमिटीला कसलीच दिक्कत वाटली नाहीं !

कमिटीच्या अभिप्रायांतील प्रत्येक गोष्ट स्वाभिमानी माणसाला त्वेष आणणारी आहे. अभिप्रायावरून कमिटीची हडेलहप्पी वृत्ति व 'हम करेसो कायदा, हा अरेरावी भावना सिद्ध होते. मूळ बिलापेक्षां कमिटीचा अभिप्राय कितीतरी विकट स्वरूपाचा व अडचणीच्या कांट्याकुट्यांनीं भरगच्च भरलेला आहे ! ह्मणून मूळ बिल जर एकपट निषेधार्ह होतें तर अभिप्राय शतपट निषेधार्ह आहे. अर्थात असल्या अभिप्रायासमेवत बिल आमुलाग्र फेटाळणें सरकारचें कर्तव्य होतें.

पण ज्या थरावर गोष्टी पोंचल्या आहेत त्यावरून पाहतां जादा कराचा आपला हट्ट सरकार तडीस नेल्याविना राहणार नाहीं. प्रस्तुत अंक लोकांच्या हातांत पडण्यापूर्वीच जादा कराचें जूं जनतेच्या मानेवर जोखडलें जाण्याचा संभव आहे. तथापि अशा रीतीनें लोकांच्या हाकाटीकडे दुर्लक्ष करून सरकारनें आपला कावा साधल्यास, प्राप्त संकटांतून सहीसलामत निभावण्यासाठीं लोकानींहि नवा मार्ग शोधून काढणें जरूर आहे.

आमच्या मतें, तांदुळांचा उपयोग कमींत कमी करण्याचें ठरवून, त्याच्या ऐवजीं गहूं, जोंधळे, नाचणें वगैरे धान्याचा खाण्यांत जास्त समावेश करण्याचा उपक्रम केला गेल्यांस, मजुरीचें प्रमाण तांदुळांच्या महागाईच्या मानानें वाढवलें गेल्यास, तसेंच पोर्तुगालांत उत्पन्न होणाऱ्या कसल्याच पदार्थाचा स्वीकार न करण्याचा निर्धार केला गेल्यास, जादा कराच्या प्रवर्तकांची गुर्मी तावडतोब उतरेल यांत शंका नाहीं. आह्मीं सुचवलेले हे उपाय अशक्य कोटींतले तर नाहींतच, उलट सहजसाध्य व सुपरिणामी आहेत. त्यांच्या अवलंबनानें करप्रवर्तकांचा हृदयपालट होऊन, कराची ब्याद आपोआपच उठणार आहे. नाक दाबलें कीं तोंड उघडणें त्यांना भाग पडून ते आपल्या घोडचुकीचें परिमार्जन केल्याविना खास रहाणार नाहींत, असा आमचा होरा वाहतो. आजच्या पोर्तुगीज विभागांत प्रस्तुत विषयाची सांगोपांग चर्चा केली गेली असल्यानें, हें लिखाण आह्मीं येथेंच संपवितों.

—"कुंभारजुवें येथील श्रीशारदा–विद्यालयाचा वार्षिक श्रीशारदोत्सव ता. १६ पासून ता. १९ पर्यंत चार दिवस मोठ्या थाटानें साजरा झाला. ता. १६ रोजीं ह. भ. प. ठाकरशास्त्रीबुवा यांचें सुश्राव्य कीर्तन झालें. ता. १७ रोजीं श्री. शिवा फोटूं पैआंगले यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. सुब्राय रामकृष्ण सामंत यांचें 'सोनें व नाणें' या विषयावर भाषण झालें. ता. १८ रोजीं वे. शा. सं. अनंत यज्ञेश्वर धूपकरशास्त्री यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. सामंत व वे. शा. सं. रामचंद्र कृष्ण कामत चंदगडकर यांचीं 'शिक्षणाचें ध्येय' या विषयावर भाषणें झालीं. आणि शेवटच्या दिवशीं भजनादि कार्यक्रम होऊन उत्सव समाप्ति झाली." असें सदर संस्थेचे सेक्रेटरी श्री. के. म. भांडारे हे कळवितात.

इतस्ततः

ज्यावेळीं से. क्राव्हैर लोपीस यांची येथील गव्हर्नरचे जागीं नेमणूक झाली त्यावेळीं त्यानीं पोर्तुगालच्या कित्येक दैनिकांस मुलाखती देऊन आपण कोणकोणत्या रीतीनें येथील जनतेचें कल्याण करणार हें जगजाहीर केलें होतें. आपल्या कारकिर्दींत नूतन कर कदापिच लादले जाणार नसून डोईपट्टीसारखा अवजड कर नष्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेंहि त्यानीं अभिवचन दिलें होतें. पण हें अभिवचन कागदांतच राहून सि. लोपीससाहेबांच्या सत्ताकालांत गूळसाखरीवरील कराची लोकमताविरुद्ध वाढ झाली. इतक्यांतच या करवाढीची व्याप्ति संपली असा लोकांचा समज होऊं पहात होता, तोंच तांदूळ–भातावरील जादा कराचें बिल विधिमंडळासमोर उभें ठाकलें व कदाचित तें काल आज मान्य झालेंहि असेल. पोर्तुगेज सत्तेच्या प्रारंभापासून तों आजतागायत सदर बिलाच्या बाबतींत ज्या प्रकारची लोकमताची बेपर्वा झाली, त्याप्रकारची केव्हांच झाली नाहीं असा इतिहास पुरावा देत आहे.

× × +

उपरोक्त करप्रकरणामुळें आपल्याच मुलाखतीची किंमत आपल्याच कारभारानें कशी मातीमोल झाली हें सेनापतींना समजलें नसेल, असें ह्मणवत नाहीं. यापुढें गरीब अनाथांचा वालि ह्मणवून घेण्याचा सेनापतींस कसलास हक्क राहिलेला नाहीं. उलट विशेषणानेंच त्यांच्या कारकिर्दीचा उल्लेख इतिहास करील. जनतेच्या नावानें कारभार करण्याचा हव्यास सोडून त्यानीं यापुढें स्वताच्या मर्जीस येईल त्याप्रमाणेंच अधिकारसूत्रें चालवावीं. तांदूळप्रकरणानंतर त्यांना कसल्याहि बाबतींत लोकमताचा पाठिंबा मिळणें दुर्लभ होय. तांदुळांवरील करामुळें त्यांच्या कारभाराविरुद्ध सगळे लोक घरोघर खडे फोडल्याविना कदापि रहाणार नाहींत. बाता झोकणें व कार्य करणें यांमधील अंतर एकादेवेळीं किती लांब असतें, हें सेनापतीच्या सत्ताकालानें पूर्ण सिद्ध होत आहे.

× ÷ ×

मडगांवच्या पोलीसखात्यांत अनेक तऱ्हेचे चमत्कार घडून येत असल्याच्या दाट वदंता आहेत. सत्तेच्या जोरावर सन्माननीयांचा अवमान करण्याचा तेथें रिवाज पडूं पहात असून, एखादा मनुष्य 'इंतिमसांवां'स न सांपडल्यास तो सांपडेपर्यंत त्याच्या बायकोला पोलिसांच्या अटकेंत ठेवण्याचाहि प्रघात तेथें शिरत असल्याचा बोभाटा आहे ! दिवंगत सुलतानशाहीलासुद्धां मान खालीं घालं लावणारे हे प्रकार भरदिवसा मडगांवसारख्या सुधारलेल्या भागांत होत असल्याचें ऐकून कसेंसेंच वाटतें. सदर प्रकारांची शहानिशा करून भारताच्या पोर्तुगिज विभागांतून त्याची आह्मीं चर्चा करणार आहोंत.

+ × +

आमच्या पोलीस बहाद्दरांचें शौर्य दिगंत गाजण्यासारखें आहे, याचें प्रत्यंतर नुकतेंच पणजी येथील जनतेस आलें. एका नागरिकावर पोलिसांची वक्रदृष्टि होती. त्याला छळण्यासाठीं त्यानीं अनेक कारवाया अमलांत आणल्या, पण तो त्यांना दाद देईना. त्या गृहस्थाचें एक अत्यंत आवडतें कुत्रें होतें. गृहस्थ त्या कुत्र्यावर अत्यंत प्रेम करीत असे. कुत्र्याला यमसदनांत पाठवून धन्याचा सूड उगवण्याचा पोलिसानीं बेत केला व कायदेशीर रीतीनें पाळलेल्या त्या गरीब व निरपराधी जनावराची हत्या करून तो बेत त्यानीं मूर्त स्वरूपांतहि आणला ! यावरून आमच्या पोलिसांचें शौर्य त्रिखंड गडगडण्यासारखें आहे, असेंच लोक ह्मणणार नाहींत काय ? कुत्रें नाहक मारलें गेल्यानें त्याच्या धन्यानें मारेकऱ्यांविरुद्ध नुकसानभरपाईचा दावा भरला असून, त्याच्या निर्णयानंतर आह्मीं प्रस्तुत प्रकरणासंबंधीं सविस्तर मत प्रदर्शित करणार आहोंत.

× + +

'जन्माला आल्यापासून जो आत्मसमर्पणाचा मार्ग चोखाळतो, तोच लोकांचा पुढारी होतो. स्वार्थानें वागणारे जे असतात ते लोकांचे खरे पुढारी नव्हत. सत्याच्या व अहिंसेच्या मार्गानें जाऊन जनतेस उद्धाराचा मार्ग दाखवणाऱ्या या पुढाऱ्याच्या भाषणामधून जें कांहीं घेण्यासारखें–स्वीकारण्यासारखें–सेवन करण्यासारखें–असेल त्याचा त्याच्या अनुयायांनीं स्वीकार करावा व त्याप्रमाणें वागून आपली उन्नति साधावी. (अग्नि दुसऱ्यांस प्रकाश देण्यासाठीं स्वतः जळत असतो, ह्मणूनच तो देवांचा पुढारी होतो व त्याचे अनुयायी सर्व देव हे त्याच्या तोंडांतून जें मिळेल, त्यावरच संतुष्ट असतात. आपला सवता सुभा उभारीत नाहींत. असे पुढारी व असे अनुयायी असतील तेथें अभ्युदय निःसंशय होईल.)" (पुरुषार्थ)

+ + +

इटलींतील लसूण, कोथंबीर व बटाटे, रुसांतील गहूं व चिनांतील मूग हिंदुस्थानासारख्या कृषिप्रधान देशांत उजळ माथ्यानें प्रवेश करीत असतानांहि हिंदुस्थान सरकार त्या पदार्थांवर संरक्षक जकात लादण्याचें पाप आचरीत नाहीं. पण आमचें प्रांतिक सरकार मात्र आपल्या तिजोरीची आबादीआबाद असतानांहि केवळ आपल्या बगलबच्चे 'भात'कारानां खूप राखण्यासाठीं गरीबांचें अन्न तोडण्याचें महापाप करण्यास कचरत नाहीं!

उपयुक्त शिक्षण

——×——

(ले. व्यंकटेश वि. वैद्य.)

शिक्षणाशिवाय कोणत्याहि राष्ट्राची उत्क्रांति होणें शक्य नाहीं, हा सिद्धांत आतां सर्व परिचित होऊन गेला आहे. परंतु शिक्षण आणि राष्ट्र या दोन्ही गोष्टींचा कार्य कारण संबंध काय आहे याचा पूर्णांशानें विचार केलेले मनुष्य विरळाच. शिक्षण आणि राष्ट्रोन्नति यांचा किती निकट संबंध आहे ह्याची गोमांतकीयांसच नव्हे तर ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांसहि याची तितकी जाणीव अजून आलेली नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांना मात्र ही जाणीव पूर्णपणें येऊन चुकली आहे. ह्मणूनच तीं राष्ट्रें उपयुक्त शिक्षणावर कोट्यावधि रुपये खर्च करूं लागलीं आहेत. विशेषतः अमेरिकेनें या बाबतींत अग्रस्थान पटकावलें आहे. संयुक्तराज्यांत सामील असलेलें तेथील प्रत्येक संस्थान आपआपल्यापरी अत्यंत चढाओढीनें शिक्षणोन्नति साधण्याकरितां झटत आहे. तेथील धनिक लोकहि विद्यालयें, वाचनमंदिरें, नियतकालिकें, उद्योगमंदिरें इत्यादि ज्ञानसंपादनाच्या भिन्न भिन्न साधनास कोट्यावधि रुपयांच्या देणग्या बहाल करून सरकारच्या इष्ट प्रयत्नास प्रोत्साहन देत आहेत. अण्ड्रयु कार्नेजी, रॉकफेलर इत्यादि अमेरिकन अब्जाधिशानीं शिक्षणाप्रीत्यर्थ अब्जावधि रुपयांच्या दिलेल्या देणग्या लोकप्रसिद्ध आहेत. ह्यावरून राष्ट्राच्या उन्नतीला शिक्षणाची किती आवश्यकता आहे ही गोष्ट अमेरिकन सरकार व जनता यानां पूर्णपणें पटल्याचें कळून येतें. जर्मनी, डेन्मार्क, स्वीडन, इंग्लंड, फ्रान्स इत्यादि राष्ट्रें अनुक्रमें अमेरिकेचाच कित्ता गिरवूं लागलीं आहेत.

राष्ट्राची उन्नति कोणत्या गोष्टींत आहे हा प्रश्न दिसतो तितका सोपा नाहीं. राष्ट्र हें विराट पुरुषाप्रमाणें अनेकावयवी आहे. राष्ट्राची उन्नति व्हावयास त्या पैकीं प्रत्येक अवयवाची उन्नति होणें अत्यावश्यक आहे. औद्योगिक, सांपत्तिक, सामाजिक, राजकीय नैतिक इत्यादि सर्व बाजूनीं त्याची वाढ झाली ह्मणजे तें राष्ट्र उन्नत झालें असें ह्मणतां येईल. लोकांत सुबत्ता दिसूं लागली, लोक सदाचरणानें वागूं लागले, समाजांत समानता झाली, इतर स्वतंत्र देशाच्या बरोबरीनें सन्मान मिळूं लागला व प्रत्येकाच्या कर्तबगारीस वाव मिळाला ह्मणजे त्या देशाची उन्नति झाली असें ह्मणावयाचें. या सर्व गोष्टी साध्य होण्याला राष्ट्ररूपी विराट पुरुषाच्या अवयवानां ह्मणजे राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्याला उपयुक्त शिक्षणाची अत्यावश्यकता आहे.

लोकसंख्येच्या अपरिमित वाढीमुळें व द्रव्योत्पादक धंदे परकीय लोकांनीं बळकावल्यामुळें दिवसें दिवस आपल्या देशांतील लोकांना निर्वाहाचीं साधनें दुर्लभ होत चाललीं आहेत व त्यामुळें भुकेबंगाल प्रजेची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. पुरेसें पोष्टिक अन्न देशांतील बहुसंख्य लोकांना सणासुदीच्या दिवशींसुद्धां दिसण्याची पंचाईत पडत चालली आहे आणि सत्वांशाच्या अभावीं शरीरांत जोम न राहिल्यानें जनतेच्या शरीरावर अकालीं वृद्धत्वाची छाया दिसून येत आहे. असा दिवसेंदिवस समाज अवनतिगर्तेंत जात असल्यानें, त्यांत मृत्युसंख्येचें मान भयंकर प्रमाणांत वाढीस लागलें आहे. असले दुर्बल लोक अकालीं मृत्युमुखीं पडले तर त्यांत काय आश्चर्य ? आणि कसेबसे जगले तर स्वतः दुर्बल राहिल्यानें पुढील पिढी हीनबल न निपजेल तर काय होईल ? पुरेसें द्रव्य नसल्यानें ज्यांनां दोनप्रहरची भ्रांत पडते त्यांना आरोग्याचे नियम माहीत असून काय उपयोग ? पोटभर अन्न मिळणें ही मनुष्याची पहिली गरज आहे. आरोग्य शिक्षण वगैरे त्या नंतरच्या गोष्टी. लोकांजवळ उदरनिर्वाहासच जर पैसा नाहीं, तर त्यानीं शिक्षणास पैसा आणावा कोठून ? अशा वळीं उपयुक्त धंद्यांचें व शेतकीचें शिक्षण देऊन सांपत्तिक बाबतींत राष्ट्राची प्रथम सुधारणा घडवून आणली पाहिजे.

शिक्षण हा शब्द लिहितांच सामान्य हिंदी लोकांच्या मनांत लेखन, वाचन, गणित, भूगोल, इतिहास वगैरे वाङ्मयकि शिक्षणाची कल्पना उभी राहते. वास्तविक शिक्षणाचें क्षेत्र या पेक्षां अत्यंत व्यापक आहे. देशांत सार्वत्रिक सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झाला इतक्यानेंच देशाची उन्नति झाली असें ह्मणतां येणार नाहीं. प्राथमिक शिक्षण हें केवळ ज्ञान व माहिती मिळविण्याचें साधन आहे. शिक्षणाचें साध्य निराळेंच आहे.

जेणें करून राष्ट्राची उन्नति घडून येईल अशा प्रकारचे राष्टीय सदगुण वाढविणें हा शिक्षणाचा मुख्य हेतु आहे. ज्या गुणांचा प्रादुर्भाव राष्ट्रास अत्यावश्यक आहे त्या गुणांचें वर्धन न होतां त्याच्या उलटच जर स्थिति होत असेल, तर त्या राष्ट्रांतील नादान शिक्षणसंस्था जितक्या लवकर बंद होतील तितक्या चांगल्या. धैर्य, साहस, स्वावलंबन, स्वाभिमान, करारीपणा इत्यादि पौरुष गुणांचा आपल्यामध्यें अगदीं लोप झाला आहे. सध्या त्या गुणांचा उदय होणारें शिक्षण आह्मांला हवें आहे. पदवीधरांच्या परिमित पैदासीलाच मान असतो. जी परिमितता आपली मर्यादा ओलांडून अपरिमिततेचें शेवट गांठते, तेव्हां ती खची करणेंच योग्य आहे. शिक्षणाचा प्रमुख हेतु मनुष्याला स्वावलंबीं बनविणें हा आहे. तसेंच शील बनविणें हाहि एक शिक्षणाचा हेतु आहे. आणिबाणीच्या प्रसंगींहि नीतिमत्ता अढळ ठेवणें हा शीलाचाच प्रभाव आहे. आणि तें शील नैतिक व धार्मिक शिक्षणानें साध्य होतें ह्मणून नैतिक व धार्मिक शिक्षण हें त्याचें उपांग आहे.

(येत्या अंकीं पूर्ण)

ग्रामसंस्थांची गळचेपी

——+——

[ले.— श्री. रा. नगर्सेकर]

लेखांक २ रा.

कर्ज काढून काजूची लागवड केल्यानें पुढें काय लभ्यांश होईल तो होवो, पण नव्या काबिजादींतील कांहीं ग्रामसंस्थांनां आज ना उद्यां कायमची मूठमाती मिळाल्याशिवाय मात्र राहणार नाहीं. इतकेंच नव्हे तर भरडकुमेरीवर अवलंबून असलेल्या डोंगराळ व त्याच्या आसपासच्या प्रदेशांतील गरीब व शेतकरी वर्गाचाहि वृत्तिच्छेद होऊन तो उपरा बनेल. आज त्या भरडकुमेरीमधून जीं मिर्च्या, नाचणी, पाकळ, वरी इ. गरीब लोकांच्या उपजीविकेचीं धान्यें निघत आहेत त्यांची राष्ट्रीय संपत्तींत गणना करतां येण्यासारखी आहे. अर्थात वृत्तिच्छेद होऊन त्या शेतकरी वर्गाचें नुकसान होणें ह्मणजे पर्यायानें सर्व देशाचेंच नुकसान होण्यासारखें आहे.

मोठ्या फायद्याच्या गोष्टीसाठीं लहान फायद्याच्या गोष्टीचा त्याग करणें वाईट नाहीं. या दृष्टीनें काजूच्या उत्पन्नाच्या वाढीचें एकंदर देशाचा जर कायमचा फायदा होत असेल तर त्यासाठीं कांहीं कोमुनिदादी नष्ट झाल्या व एका शेतकरी वर्गाचें व देशाचें तात्पूर्तें कांहीं काळ नुकसान झालें तरी तें क्षम्य मानतां येण्यासारखें आहे. पण त्या उत्पन्नाच्या वाढीमुळें देशाचा खरोखरीच कायमचा फायदा होईल किंवा नाहीं, हाच तर लोकांपुढें आज मुख्य प्रश्न आहे. कारण काजूचें झाड लागवडीस येण्यास, जमिनीच्या मगदुराप्रमाणें व जातीप्रमाणें, चार पासून दहा बारा वर्षेंपर्यंत जाऊं शकतात व सगळीकडे तें सारखेंच उत्पन्न देत नाहीं. उत्तम मगदुराची जमीन असून, झाड तीन चार वर्षांमध्येंच जरी फळास आलें तरी तें पूर्ण लागवडीस येण्यास व त्याचें खरें उत्पन्न मिळण्यास त्याची वाढ पूर्ण होणें जरूर असतें. व झाडाची अशी पूर्ण वाढ होण्यास निदान दहा बारा वर्षें तरी जावीं लागतात. पण १०।१२ वर्षांनींसुद्धां, या नवीन उत्पन्न होणाऱ्या काजूच्या बियानां आजच्याच सारखी तेजी राहून गिऱ्हाइकाला तोटा पडणार नाहीं याची लोकानां हमी देतां येणें अशक्य आहे. हा प्रश्न योग्य रीतीनें सोडवणें हें सरकारचें कर्तव्य होय.

सरकारनें काजूच्या लागवडीसाठीं अत्याग्रह करतानां काजूचें झाड कोणत्या जमिनींत किती वर्षांनीं लागवडीस येतें, कमी मगदुराच्या जमिनी काजूस चांगल्या मानवतील अशा बनविण्यास कोणती उपाययोजना करावी व त्या उपाययोजनेला प्रत्येक झाडामागें किती खर्च येईल व तें किती उत्पन्न देऊं शकेल, आणि याविषयीं सरकारनें कुठें व कसा प्रयोग करून अनुभव घेतलेला आहे, हें जाहीर करणें अवश्य आहे. या लागवडीच्या उपयुक्ततेची सरकारला पूर्ण खात्रीं आहे तर त्यानें आपल्या मालकीच्या जमिनींत व आज त्याला भारभूत असलेलीं सगळीं रानें तोडून त्यांत काजूची लागवड कां करूं नये, काजूच्या नव्या उत्पन्नाला गिऱ्हाईक कुठें मिळेल व तें कायमचें मिळेल याला काय हमी आहे, व तें बंद झाल्यास सरकारनें दुसऱ्या कोणत्या गिऱ्हाइकाची योजना केलेली आहे, आणि त्या मालाचा दुसरा कोणता उपयुक्त पदार्थ बनवितां येण्यासारखा आहे, त्याचा आह्मांला काय उपयोग होईल व तो खपविण्याचा असल्यास कुठें व कसा खपवितां येईल इत्यादि गोष्टींचाहि खुलासा होणें रास्त आहे.

धान्य पिकविणाऱ्या मळांवर, जास्ती फायद्याच्या आशेनें, द्राक्षांची लागवड केल्यामुळें पोर्तुगालची काय अवस्था झाली हें सरकारला माहीत नसेल असें ह्मणतां येत नाहीं. (समाप्त)

४ था गो. सप्ताह जवळ आला

श्रीक्षेत्र काशी येथील अ. भा. महासभेच्या ठरावाप्रमाणें आणि गोवर्धन संस्थेचे आद्य संस्थापक गोजीवन चौंडेमहाराज यांच्या अविश्रांत परिश्रमानें सर्व राष्ट्रीय असे तीन गोरक्षण सप्ताह आतांपर्यंत झाले. चवथा गोरक्षण सप्ताह जवळ आला असून तो कार्तिक शु. १ दे पासून कार्तिक शु. ८ मी पर्यंत ह्मणजे नव्हेंबर ता. १० ते १७ पर्यंत येत आहे. गतवर्षीं एकंदर ८३ ठिकाणीं सप्ताह साजरा झाला. आपल्या गोमांतकांतहि राजधानीचें शहर पणजी, कुंभारजुवें, चिंबल वगैरे ठिकाणीं तो बऱ्याच मोठ्या प्रमाणांत झाला. व इतरहि बऱ्याच ठिकाणीं लहानप्रमाणांत कां होईना, पण झाला. सप्ताहाचें महत्व किती आहे तें महात्मा गांधींसारख्या थोर पुढाऱ्यांनीं अभिनंदनपर सहानुभूतीचे संदेश पाठवून आणि बऱ्याच पुढाऱ्यांनीं त्यांत प्रत्यक्ष भाग घेऊन जनतेस पटवून दिलें आहे. अर्थात हा सप्ताह प्रत्येक लहान खेड्यांपाड्यांतून सुद्धां होणें कितीं आवश्यक आहे तें प्रत्येकास समजलेंच आहे. आपल्या गोमांतकांत, मडगांव, ह्यापसें, डिचोली वगैरे तालुक्याच्या गांवीं त्याचा उपक्रम अद्याप झालेला नाहीं ह्याबद्दल आश्चर्य वाटतें. यंदा सर्व शाळा, संस्था व पुढारी यांकडे ठरावासह विनंतिपत्रकें आगाऊच रवाना करण्यांत आलीं आहेत. पूर्ण माहितीच्या अभावीं कोणास पोंचलीं नसलीं तर कार्याकडे दृष्टी देऊन त्यानीं राग न मानतां क्षमा करून ह्या जाहीर विनंतीप्रमाणें सप्ताहाच्या दिवसांकडे लक्ष्य ठेऊन व आगाऊ तयारी करून आपआपल्या गावीं परिस्थित्यनुरूप ७ दिवस ३ दिवस, १ दिवस निदान ७ घटकांचा तरी सप्ताह करावा.

सप्ताहाकरितां नेहमीप्रमाणें गोवर्धन सं-

não fôssem as piedosas almas supor que me valia dêsse facto para tentar abafar a sua *Voz*.

A questão está agora posta. E em termos que até uma exegese malabárica dos textos legais não pode rebuçar a flagrante infracção.

Mas o caso é que a *Voz* do sr. padre Castilho, bacharel em teologia pela *universidade* de Rachol, não indica siquer o nome do proprietario do jornal como manda a lei.

A dupla infracção envolve a pena de prisão correcional, para o proprietario e para o dono do estabelecimento onde é impresso o periodico, sendo o jornal suspenso pelo juiz, na sentença condenatória enquanto essas penalidades se não cumprirem, e sendo imposta áquelas entidades e ao director do periódico a multa de mil escudos, por cada falta.

E há mais. Qualquer autoridade tem o dever de apreender o jornal, cujo editor ou director não satisfizer aos requisitos exigidos na lei.

O que me interessa é a desigualdade de tratamento. A autoridade administrativa foi duma escandalosa solicitude em intimar e em apreender o *Pradipa* ou o *Pracasha*, que jamais estiveram fóra da lei. E, agora, não vejo o sr. tenente-coronel Melo ardendo em fervôres legalistas, para apreender a *Voz* que é o Boletim da arquidiocese, em flagrante e insofismavel infracção da lei de Imprensa, que não distingue entre um jornal de gentios e um periódico católico.

Dois pesos, duas medidas, com a agravante de que no caso do *Pradipa*, nunca a autoridade administrativa foi capaz de mostrar por que lei o sujeitava a um regimen de apreensão e proibição, enquanto o caso da *Voz* é dos tais que entram pelos olhos ainda de leigos que compreendem aquilo que lêem.

A não ser que o poder civil tenha empenho em corroborar o que as *Novidades*, muito atrevidamente, afirmaram:—que no Ultramar, quem *decreta* são os bispos e os missionarios, podendo o sr. padre Castilho andar a cavalgar sôbre as leis da Republica. Ou, melhor, da ditadura.

(*Lucifer*, do *Pracasha*, de 17 de Outubro de 1931.)

"SOBRETAXA DE ANIQUILACAO"

Arquivamos a seguir, para o conhecimento de todos, um trecho duma entrevista concedida pelo sr. General Craveiro Lopes, a um jornal metropolitano, logo após a sua nomeação para Governador Geral da India.

Como vão ver, o sr. General reconhece que o arroz que Gôa produz, mal chega para o substento da sua população durante cinco meses á roda do ano. Reconhece tambem que as medidas proteccionistas só servem para premiar a apatia do menor número, que é dos proprietarios. Não obstante é o mesmo sr. Craveiro Lopes que não hesitou e, o que é pior, ainda insiste, apezar de o pais se ter pronunciado contra, em levar ao Conselho o projecto de diploma creando a "Sobretaxa de Equilibrio" tributo êste que passará a historia da India como a "Sobretaxa de Aniquilação" que é o nome que milhor traduz o seu alcance e as suas consequências.

Dissemos antes e repetimos agora. A responsabilidade de sua exia. é tremenda. E não pode imputar no Conselho do Governo e ainda menos no pais que de facto não tem representação naquele Conselho. De resto, o sr. Craveiro Lopes, em lugar e ocasião solene declarou que o pais era contra a sobretaxa.

Enfim, como dizia o outro, entramos na era do "Agricola".

"O problema a que tenciono dedicar a minha maior atenção é o da produção agricola. O territorio da India Portuguesa vive economicamente, na dependencia do estrangeiro—dependencia de que é necessario liberta-lo. Não faz sentido que uma terra dotada de tão magnificas condições naturais não seja capaz de produzir o suficiente para a alimentação daqueles povos.

O arroz que a provincia produz mal chega para o substento da sua população durante cinco mezez á roda do ano. O faltante temos de ir adquiri-lo aos celeiros da India Inglesa. E' uma situação que não pode prolongar-se indefinidamente."

"O sr. dr. J. Morais tentou há anos, resolver o problema tributando com um imposto de importação o arroz estrangeiro que vinha fazer concorrencia ao nosso. Esperava aquele distincto governador que mercê desta medida proteccionista aumentaria a produção da colonia. Mas manda a verdade confessar que se malograram as suas esperanças porque a produção não aumentou e o povo é que ficou prejudicado, tendo de adquirir mais caro o produto mais necessario á sua alimentação'

"E' meu intuito promover o aumento da produção cerealifera por uma maior intensificação das culturas concedendo á agricultura diversas facilidades, entre as quais uma maior expansão do credito agricola. Se, porém, os meus esforços nesse sentido não forem coroados de exito, então *estudarei a possibilidade de extinguir o imposto de importação sobre o arroz estrangeiro, porque não ha o direito de prejudicar a maior parte da população em beneficio da outra bem menor, que por apatia ou porque lhe convem mais o 'statu quo" parece desinteressar se da situação.*" (O italico é nosso)

---

tes estrangeiros Em 1929 foram importados 3.227 galões de brandy e whisky num valor de 54 393 rupias, enquanto a cerveja atingia a cifra de 35.779 galões dum valor de 105.000 rps. e os vinhos portugueses atingiam um total de 42.391 galões e 138 504 rupias. A consequencia natural dessa fenomenal importação dos vinhos e licores alcoolisados numa pequena provincia de população empobrecida, podia só causar a ruina e o estrago da saúde geral. ¿Qual a razão deste estado de coisas?

E proceda ...

Porque a Navegação Fluvial dava deficit, o seu Conselho de Administração propoz e o Governo aprovou entre protestos unanimes da imprensa e dos habitantes do paiz a quem interessava de perto—a elevação do naulo ou taxas de bilhetes de lanchas de carreira entre Pangim Verem-Betim. Ao tempo governava a India o finado Massano de Amorim que consentindo *malgrè lui* no aumento, que era de 100%, havia declarado que o fazia por não encontrar outro meio de cobrir o deficit, reconhecendo, sempre, que lhe repugnava á razão e á consciencia ter de onerar exorbitantemente os que aproveitam dessa carreira para sanar o desfalque que resultava da exploração das outras carreiras como a de Pangim-Sanvordem Pangim Mormugão e Pangim, Piligão.

Vem tudo isto a proposito duma noticia que está a correr de que a Navegação Fluvial pensa em elevar as taxas das suas carreiras durante a proxima Exposição.

Nós bem sabemos que aí, no Olimpo, quando se trata de onerar mais o fardo insuportavel dos encargos que os desgraçados habitantes desta terra suportam resignadamente, não falta quem cite exemplos de Paris. Sim. Para fazer pagar, nós,os contribuintes passa nos á categoria de parisienses de gema. Agora,quanto ás regalias e direitos—somos organicamente escravos da Metropole.

Mas, voltando ao principal. Que o sr. Craveiro Lopes, ao sobrecarregar nas taxas, não se esqueça que os passageiros das lanchas de carreiras de Pangim-Verem-Betim pagam mais do que deviam, pagam por si e pelos outros que aproveitam das carreiras deficitarias. E proceda conforme.

वर्ष १६ वें. अक २९
ता. २२ अक्टोबर सन १९३१

वर्गणीचे दर
ट. ख. सह ३ रु. [आगाऊ]
रकोळ अंकास १ आणा.

चे दर– समक्ष अगर पत्रद्वारे.
आल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध
ली जाणार नाहीं.

ादक व मालक
गा. पु. हेगडे देसाई– फार्मासेवतिकु
मुद्रण व प्रकाशन भारत–प्रेस कुसमण केपें गोवा.

भारत

O BHARAT

Ano 16 Nº 29
QUINTA-FEIRA 22 de Outubro 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Cara purcar correm éditos de 30 dias a contar da segunda publicação deste citando o reu Jacinto Fernandes, maior d'idade de Cusmane para no praso de 10 dias findo o de éditos pagar no sobredito cartorio a quantia de dez escudos proveniente de 10 dias de multa @ de um escudo por dia em que ele foi condenado nos autos crimes de policia correcional que contra êle promoveu o Ministerio Público nesta comarca pelo crime de ofensas corporais ou no igual praso nomear bens suficientes á penhora para o referido pagamento e de custas e sêlos acrescidos de execução sob pena de não o fazendo ser a nomeação devolvida ao exequente M. P. prosseguindo-se a execução seus termos á revelia. O que para ser público se expediu este. Quepem, 1 de Outubro de 1931.

O escrivão do 2 ° oficio
Mucunda Sinai Carapurcar
Verifiquei a exatidão
O juiz de direito
Raul A. Correia

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas correm éditos de 30 dias a contar da 2.a publicação do último anuncio nos termos do § 2 ° do art. 197 do Codigo do Processo Civil, intimando o depositario Govinda Visnum Porobo Dessai de Cola de Cabo de Rama e ora ausente em Mazali territorio britanico em parte incerta para no prazo de cinco dias findo o de éditos apresentar em juizo o saldo de deposito liquidado na importancia de 212:12:00 contra êle nos autos de execução por custas que o M. P. promove contra Ananta Custam Porobo de Molorem de Cola por apenso aos autos crimes de querela que o mesmo Magistrado promoveu contra o dito Ananta sob pena de serem expedidos mandados de captura bem como citando o mesmo depositario para no praso de dez dias findo o de éditos pagar no cartorio do escrivão do 1 ° oficio que este assina a quantia de 138:04:09 proveniente de custas liquidadas na mesma execução ou no igual praso nomear bens á penhora suficientes para o pagamento do pedido e mais custas e selos acrescidos da execução sob pena de passado êsse prazo o direito á nomeação se devolver ao exequente M. P. correndo a execução todos os seus termos á revelia do citando. Para ser público se expediu este. Quepem dois de Outubro de 1931.

O escrivão do 1 ° oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas
Verifiquei a exatidão
O juiz de direito
Raul A. Correia

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas correm éditos de trinta dias a contar da 2.a publicação do último anuncio nos termos do § 2 ° do art. 197 do Cod do processo Civil citando os reus Joaquim Constancio da Silva e Josefina da Silva de Loutolim, e ora ausentes em Bombaim, em parte incerta menores impuberes já citados na pessoa do tutor e o menor impubere João Camilo da Piedade Mascarenhas na pessoa do seu pai administrador Guilherme Antonio Natividade Mascarenhas de Monorá de Raia este tambem ora ausente em Bombaim parte incerta para uma acção do processo ordinario que a Fazenda Nacional promove contra os citandos e outros e para no praso de 20 dias findo o de éditos contestarem querendo a mesma acção, sob pena de não havendo oposição no praso legal haver por confessados os factos alegados pela autora na sua petição em que ela alega que Maria Escolastica Herminia Arcanjela Figueiredo e Cruz, viuva de Quintão Quadrado Albino Santana da Piedade e Cruz que foi de Loutolim, por escritura pública de 3 de Agosto de 1924 ajustou a vender a Porisrama Queuim Robolo de Cuncolim a metade do predio denominado "Fatiota" por outro nome "Gosone fondo" sito em Nagorcem-Palolem do Concelho de Canacona da cultura de arroz discrito na Conservatoria desta Comarca sob o n ° 5.119 no L. B 16 pelo preço de 4.500 rupias. Por escritura pública de 13 de Janeiro de 1925 o dito Porisrama cedeu o direito que tinha áquele ajuste ao reu Vidiano Francisco Ascensão Colaço de Velim o qual por sua vez cedeu o mesmo direito ao dito Porisrama por escritura de 14 de Junho do mesmo ano 1926, a dita Maria Escolastica vendeu aquela metade ao reu dito Vidiano, essa foi feita com simulação do preço com manifesto intuito de defraudar os direitos da A. Fazenda Nacional pois é incrivel que a dita metade cuja venda foi ajustada ao aludido Porisrama pelo preço de 4.500 rupias recebendo no acto 2550 rupias como sinal e parte do preço vendesse a mesma metade ao reu Vidiano pelo preço de 2500 rupias como resa a referida escritura. Todo o acto ou contrato de compra e venda feita com simulação do valor está sujeito á pena de os contratantes incorrerem na multa igual ao dobro de contribuição de registo que deveria pagar relativamente, ao preço da compra e é punido além daquela multa com multa igual á quarta parte do valor dissimulado nos termos do art. 96 e seus §§ do Regulamento para liquidação e cobrança da contribuição de registo em vigor requere tambem entre outras coisas que sejam julgados habilitados como herdeiros da dita Maria Escolastica alguns reus indicados na dita petição e termina por pedir que a mesma acção seja julgada procedente e provada sendo condenados os reus a pagarem á autora o dobro da contribuição que deixou de ser paga pela simulação do preço e a multa igual á quarta parte do valor dissimulado e nas custas e selos dos autos. Para ser público se expediu este. Quepem, 30 de Setembro de 1931.

O escrivão do 1 ° oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas
Verifiquei a exatidão
O juiz
Raul A. Correia

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas vai ser vendido em hasta publica á porta do tribunal desta comarca no dia 30 do corrente pelas 9 horas pela primeira vez e por maior lanço que se oferecer acima da sua avaliação predio rustico denominado "Biedi" da cultura de arroz sito em Canvorem de Colomba descrito na conservatoria desta comarca sob o n ° 18180 a fls. 174 do L. B. 49 avaliado por 175 rupias penhorado nos autos de execução fiscal que a Fazenda Nacional promove contra Bima Gauncarina residente em Zambaulim e Rama Guiri Naique de Cacorá como herdeiros dos executados Zriu Gauncarina de Mangali e Ennua Naiquina de Cacorá para pagamento da quantia de 67:07:07 proveniente da contribuição de registo por titulo gratuito do ano de 1910 a 1911 alem de juros da mora selos e custas do processo. O arrematante pagará a contribuição de registo nos termos de lei e as despesas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. São por este citados todos os credores incertos dos mesmos executados bem assim os co-proprietarios e quinhoeiros para deduzirem seus direitos nos termos e para os efeitos da lei. Quepem, 14 de Outubro de 1931.

O escrivão do 1 ° oficio
Joaquim Anselmo Caraciolo Viegas
Verifiquei a exatidão
O 1 ° subst. do juiz de direito
Abilio da C. e Sousa

Ano XVI) Quinta-feira, 22 de Outubro de 1931 (N.º 29

O BHARAT

ANUNCIOS

Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

Não se aceita nenhum anuncio ou comunicado sem ser adiantado o seu custo provavel.

Jornal de maior circulaçao

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL

Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-08-00

REDACAO E ADMINISTRACAO
COMPOSICAO E IMPRESSAO
Tip. *BHARAT* Ousmane—Quépém

Ecos-e-Critica

Os Missionarios

Entre outras verdades crúas que Mahatmá Gandhi atirou á cara dos ingleses, durante a sua presente estada em Londres, deve-se mencionar a opinião franca que exprimiu sobre a acção dos missionarios cristãos na India: "No que respeita á actividade dos missionarios, disse, tenho de falar com muito cuidado. O menos que eu possa dizer quanto á sua acção é que duvido que ela seja de algum proveito á India. Direi antes que eles conseguiram afastar a India do cristianismo criando uma formidavel barreira entre os cristãos e os sectarios doutras religiões, como os mussulmanos e os hindús. Quando eu leio os evangelhos não encontro distinção alguma entre os crentes de diversas religiões, mas quando encontro com um missionario vejo a barreira erigir-se diante dos meus olhos. E' esta a opinião de alguem que durante certo tempo esteve sob a influência dos missionarios. Os missionarios cristãos trabalham nos colegios e nos hospitais com a reserva mental de servir-se desses meios para converter gente ao cristianismo."

Cá na terra os missionarios não têm nem hospitais nem colegios, exceptuando o Seminario de Rachol, onde se ensina preparar o arroz e caril nas esteiras, mas o fim a que eles visam é o mesmo: criar uma barreira inseparavel entre os cristãos indianos e os seus irmãos doutras religiões para maior proveito do dominante, de quem eles são bons auxiliares mas tambem em beneficio do seu proprio estomago e para poderem ganhar algumas centenas de rupias ao mez em paga do feroz odio racial que os anima.

Belezas administrativas !

Já vimos como o nosso governo, em vez de aplicar rigorosamente a lei e mostrar-se severo com os devedores das comunidades, achou melhor galardoar o seu acto de não terem pago o que devem ás mesmas, nomeando-os para administrar as mesmas. Como é natural, o resultado dessa singular medida é um furo formidavel nos cofres dessas desgraçadas corporações, cuja administração é assim confiada aos que mais as prejudicam. E' o que se dá, segundo nos escrevem, nas comunidades do Concelho de Mormugão onde estão por ser cobrados desde ha anos alguns milhares de rupias. Chama-se a isso governar com *tino administrativo, interesse e carinho.*

As belezas da administração portuguesa !

Dois pesos, duas medidas

Um colaborador deste jornal levantou a questão de inabilidade juridica do sr. padre Castilho de Noronha para director de periodico, em face da lei de Imprensa em vigor.

Reparara nesta irregularidade quando vi a *Voz* do sr. padre Castilho. Muito propositadamente, porêm, me calei,

ALCOOLISMO E RELIGIAO

A caraterística do goês pseudo civilisado é de macaquear tudo o que é europeu sem saber distinguir o bom do mau imitando servilmente o seu modelo mais nas suas qualidades exteriores do que no seu espirito. São apenas as aparencias da vida social e intelectual do Ocidente que aqui se copiam sem procurar compreender o verdadeiro sentido e a razão de ser das manifestações da vida estrangeira. Uma parodia de debate parlamentar, organisada recentemente em Bombaim por patricios nossos, serviu a "um goês" do BOMBAY CHRONICLE para verberar mais uma vez no artigo que segue a nefasta influência das ideias e dos hábitos e costumes estrangeiros na nossa sociedade. A praga do alcoolismo que está a minar a nossa raça devemo-la á religião que pretende ter civilisado esta terra e foi tambem importada do Ocidente.

A parodia de debate parlamentar, representada na sala do Instituto Luso Indiano de Bombaim, onde tomaram parte quase todos os professores goêses do ensino secundario, entre outros os srs Correia Afonso, Aloisio Soares e Armando Menezes, mobilisados para representarem o papel de membros do governo e chefes da oposição, foi interessante e significativa como um exemplo do que, na fraseologia de Freud, se poderia chamar um "desejo efectuação"...

Encarado o debate no campo das realidades, pode se dizer que os professores goêses teriam jús á nossa gratidão [alguns de nós sendo bastante simples e sinceros para não escrever nos jornais nem botar um discursosinho num comicio] se em vez de falarem num assunto tão estranho como a lei Volstead, dissertassem sobre factos mais concretos e de maior interesse local. O ministro da Higiene poderia ter citado cifras referentes aos casos de morte resultantes de cirroses de figado ou ao escandaloso cosumo de bebidas alcoolicas que temos em Gôa, acentuando o facto de termos familias inteiras degeneradas e arruinadas em consequência da bebedeira desenfreada. O consumo anual só de alcool de origem local em Gôa atinge perto de 2 450 000 de galões numa população de cinco e meio laques, o que representa, segundo a revista *Prohibition* um quantitativo muito superior ao consumo de toda a Presidencia de Bombaim que tem uma população de 16 milhões de habitantes.

Acrescente-se a isso a importação dos vinhos e aguardeu-

—मुंबईचे सुप्रसिद्ध गिरणीवाले श्री. वासुदेव बळवंत सोमण यानां बुधवार ता. १४–१०–३१ रोजीं देवज्ञा झाली. हे स्वपराक्रमानें रंकाचे राव बनून त्यानीं बिनचरबीची खळ तयार केली. हे मोठे दानशूर होते.

—मोरज येथील विद्याप्रसारक समाजाचा श्रीसरस्वत्युत्सव ता. १६–१०–३१ रोजीं सुरू होऊन ता. १९–१०–३१ रोजीं यशस्वी रीतीनें समाप्त झाला. सदर प्रसगीं भजन, पूजन व आरत्या या कार्यक्रमाशिवाय रा. विनायक रामचंद्र नायक यांचें ‘ शिक्षणाचें महत्व ’ या विषयावर वे. शा. सं. पुरुषोत्तम महादेव गणपुले यांचे अध्यक्षतेखालीं व्याख्यान, ‘ शीलं परं भूषणं ’ हें मुलांचें नाटक व ह. भ. प. रामकृष्णबुवा भागवत यांचें कीर्तन इ. कार्यक्रम पार पडला.

—कुंकळ्ळी येथील श्रीसरस्वती–लक्ष्मी विद्यालयाचा श्रीसरस्वती पूजनोत्सव गेल्या ता. १७–१०–३१ रोजीं सुरू होऊन ता. १९–१०–३१ रोजीं, पूजन, भजन, आरत्या, मुलांचीं गाणीं, मुलांचा संवाद व भाषणें इ. कार्यक्रमानें यशस्वी रीतीनें समाप्त झाला.

S. O. G.

Na reunião que a Sociedade dos Operarios de Gôa promoveu, no domingo passado, em Majordá, falaram, além do nosso director, os srs. Roque Antonio Pereira, Pedro Mariano Costa Bir, João Francisco Fernandes e Alberto de Lima, todos frisando a necessidade da difusão de instrução no operariado.

A' reunião que foi bastante concorrida, assistiu, tambem, o regedor da freguesia, tendo ascendido a 15 o número dos que, no acto, se inscreveram sócios da Sociedade, cuja terceira conferencia terá lugar em Benaulim, no domingo proximo.

E O PAIZ?

O tributo que o Conselho do Governo deve ter votado na sua sessão de 22 de Outubro, quando este jornal já entrar a circular, sob o inocente nome de "Sobretaxa de Equilibrio" constitue um acto cruel, deshumano como igual não regista a historia, aliás acidentada, de Quatro Séculos da dominação portuguesa na India.

Coube ao sr. General Craveiro Lopes acrescentar esta pagina tragica.

E o país? ¿Fica bem a nós filhos desta terra que presamos de ser homens, aceitarmos sem protesto essa "sobretaxa" que representa bem uma sentença de morte lenta, e a morte por privações, a pior das mortes, de "a maior parte da população em beneficio de outra bem menor"?

Sim, lancemos o nosso protesto; mas ordeiramente, constituicionalmente, sem tumultos nem violencias....em suma um protesto digno da India, consentaneo com a nossa indole, a indole da nossa civilisação— multimilenaria. E este protesto pode tomar a forma dum programa de acção mais ou menos vasado nos seguintes moldes:

Programa de acção

*

Boicotar os vinhos, conservas e outros artigos e generos de consumo procedentes de Portugal.

*

Substituir o arroz por nachinim ou trigo ou qualquer cereal em duas ou pelo menos nu na refeição das tres diarias que fazemos com arroz.

* * *

Aumentar os salarios proporcionalmente ao aumento que o preço de arroz sofrer em consequência da sobretaxa.

*

Não cultivar as varzeas por arrendamento senão depois de reservar a favor de quem cultiva uma soma— a titulo de salários, sementes etc.— que represente o custo de produção fixado pela comissão reguladora do mes no custo.

*

Este programa poderá ser alterado, modificado e ampliado conforme as circunstancias aconselharem.

A Redação do *Bharat* convida os filhos desta terra que aceitem o *Programa de Acção* a enviarem os seus endereços ao *Bharat*, Quepem.

> "Os indios devem tratar de reconhecer que sao, em primeiro lugar, homens, sendo, depois, indus, maometanos, parses etc."
>
> *Jadhaw*

"BELEZAS" DA SOBRETAXA

Com a tributação do arroz, o goês que não seja grande nem mediano proprietario, nem tenha talher á mesa do orçamento, não terá outras alternativas senão permanecer em Goa para comer patrioticamente arroz muito caro ou abalar pelas fronteiras para em busca de arroz barato. Isto, por algo de exagero, poderá parecer *blague*; mas a verdade é que com o desiquilibrio produzido pela nova taxa nas massas, resultará, pela raia seca do territorio, um exodo da população das Novas Conquistas, já de si depauperada pelo paludismo, esqueletica e faminta; e nas Velhas Conquistas os emigrantes preferirão levar suas familias para se estabelecerem, como já prognostcou o "Anglo Lusitano", fóra de Gôa. *Ubi bene, ibi patria.* (Delval, *O Heraldo*, 18-10 31)

A principal é incontestavelmente a politica seguida pelo governo português, que encoraja o fabrico e a venda do alcool sob pretexto de progresso "industrial".

Todavia uma das causas mais importantes da bebedeira desenfreada que reina não só em Gôa mas em qualquer parte onde o goês catolico emigra e se instala é a crença errada que ele leva consigo de que lhe é permitido beber até morrer sem infringir os preceitos da religião e da moral praticando semelhante crime contra si proprio. A Igreja catolica que guia os destinos da massa popular goêsa conserva se cautelosamente silenciosa a respeito da embriaguês que para toda a pessoa normal, é um vicio e um crime contra a raça. A bebedêira goêsa passou a ser para o estrangeiro a nossa carateristica tipica, convencido como está de que o catolico gosa de privilégio de se embriagar e que a sua religião não condena o alcoolismo como um crime anti social.

Embora falsa, essa ideia não deixa de ter sua justificação visto muitas festividades e cerimonias religiosas dos catolicos serem celebradas á maneira duma bacanal. Os nossos sociologos são falhos de coragem e de convicção e os nossos padres estão mais preocupados com subtilezas teologicas e permanecem completamente indiferentes a esse grave estado de coisas. O alcoolismo passou a ser uma carateristica da superioridade da civilisação europeia embora não haja prova historica de que os dominantes portugueses cultivassem a pratica da embriagues. Ficou nos pelo contrario a impressão de que os seus primeiros conquistadores eram verdadeiros modelos de sobriedade e eram considerados com despreso pelos seus camaradas ingleses por causa da sua ignorancia nêsse ramo de *cultura*.

Em todo o caso, o espirito do goês ignorante precisa de convencer-se de que o catolicismo nada tem de comum com alcoolismo e os oradores suaves de especie do sr. professor Correia Afonso, que nos afirmou recentemente ser catolico antes de tudo, tem de vingar o bom nome da sua fé. ¿Um bom catolico está obrigado a embriagar se? Ou pode um alcoolico ser um bom católico? Que os senhores professores de teologia decidam este ponto.

———————

Anuncios

O BHARAT, ano XVI nº 29 de 22 de Outubro de 1931.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2º oficio Carao purcar correm éditos de 30 dias a contar da segunda publicação do respectivo anuncio citando a interessada Camilabai Sinainim e seu marido Venctexa Vamona Gaintondó de Canacona e ora ausente em parte incerte de Bombaim India Inglesa, para assistirem a todos os termos ate final do inventario orfanologico a que se procede por obito de Esvonta Sinai Bendó que foi de Agosso de Lolien em que é inventariante e cabeça de casal Visvambora Sinai Bendó do mesmo lugar sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este. Quepem, 2 de outubro de 1931.

O escrivão do 2º oficio
Mucunda Sinai Carapurcar
Verifiquei a exatidão
O juiz de direito
Raul A. Correia

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा॥

गुरुवार, आश्विन व. ३ या शके १८५३

उक्तीविरुद्ध कृति !

——×——

"ज्या विषयांत मीं माझें चित्त विशेषत्वें गुंतविण्यास इच्छितों तो ह्मणजे शेतीच्या उत्पन्नाचा प्रश्न होय. पोर्तुगेज हिंदुस्थानचें आर्थिक अस्तित्व परप्रांतावर अवलंबून आहे. या पारतंत्र्यांतून त्याची सोडवणूक करणें जरूर होय. ज्या देशांत नैसर्गिक साधनांची विपुलता नांदत आहे त्या देशांत लोकांना पुरेल इतकें धान्य उत्पन्न होऊं नये, याचा अर्थ मला समजत नाहीं.

जो तांदूळ देशांत उत्पन्न होतो तो वर्षाकांठीं अवघ्या पांच महिन्यालाच पुरा पडतो. बाकीचा ब्रिटिश हिंदुस्थानांतून आणावा लागतो. ही स्थिति अशीच अनंतकाल चालू ठेवणें इष्ट नाहीं.

तांदुळांच्या आयातीवर कर बसवून उपरोल्लेखित प्रश्न सोडवण्याचा माजी गव्हर्नर सिं. डॉ. जाइम द मोराइस यांनीं कांहीं वर्षांमागें प्रयत्न केला. ही संरक्षक जकात तांदुळांची स्थानिक निपज वाढण्यास कारणीभूत होईल, अशी त्या बुद्धिमान गव्हर्नरांस आशा होती. पण सत्य आह्मांस असें कबूल करण्यास भाग पाडीत आहे कीं, सदर गव्हर्नराची आशा फोल ठरली व तांदुळांचें उत्पन्न तर वाढलें नाहींच; उलट जीवनास अत्यंत आवश्यक असलेला तो पदार्थ लोकांना महाग होऊन बसला.

हरतऱ्हेच्या उपायानीं, मुख्यत्वें शेतकी पतपेढ्यांच्या स्वैर विस्तारानें स्थानिक शेतीला उत्तेजन देण्याचा माझा मानस आहे. पण, जर या दृष्टीनें करण्यांत येणारे माझे प्रयत्न अयशस्वी ठरतील, तर तांदुळांच्या आयातीवर असलेला विद्यमान कर आमुलाग्र काढून टांकण्याच्या शक्यतेचा मी अभ्यास करीन; कारण अल्प संख्यांकांच्या हितासाठीं—कीं जे आळसामुळें असो, अथवा प्राप्त परिस्थितीच त्यांना विशेष हितप्रद वाटत असल्यानें असो, सदर प्रश्नाकडे नजर वळवीत नाहींत — प्रचंड बहुसंख्य लोकानीं तोटा सोसणें न्याय्य नाहीं."

गव्हर्नरच्या जागीं नेमणूक होतांच सि. क्राव्हैर लोपीस यानीं वर्तमानपत्रांना ज्या मुलाखती दिल्या, त्यांतील उतारे वर दिले आहेत. त्यांच्या इत्यर्थावरून ते तांदुळांवरील करवाढीचें बिल—व तेंहि ज्या भीषण स्वरूपांत प्रकट झालें. — विधिमंडळांत आणूं शकतील व तडकाफडकीं मान्य करूं देतील असें कोणासहि वाटलें नव्हतें !

पण लोकमताची यत्किंचितहि पर्वा न बाळगतां पोर्तुगेज प्राजकाच्या सत्ताकालांत उपरोक्त बिलाला मान्यता मिळालीच ! आणि सरकारी अभिवचनें ह्मणजे नजर बंदीचा खेळ कसा असतो याची आणखीं एकदां लोकांना सत्यता पटली.

नव्या करवाढीनें भात—तांदुळांची स्थानिक निपज वर्धमान तर पावणार नाहींच; उलट जुन्या काबिजादींतील 'परदेशगमनीं' लोक परदेशांत सहकुटुंब स्थिरावतील व नव्या काबिजादींतील जनता स्वस्ताईच्या मोहाला बळी पडून स्थानत्याग करील आणि परदेशगमनाचाच मार्ग पत्करील. खेरीज मजुरांची उतरूं लागलेली मजुरी फिरून चढण चढायास लागून छोट्या भात व भाटकारांची स्थिति आतांच्या पेक्षांहि विशेष दुस्तर होईल.

एवंच, उपरिनिर्दिष्ट करवाढीचे दुष्परिणाम लोकांना लवकरच भोवणार असून, जनतेंत अस्वस्थतेचा वणवा सारखा पेटता रहाणार आहे. जनतेच्या नावांनें अधिकार सूत्रें हालवीत असल्याचा बहाणा विद्यमान अधिकाऱ्यांना यापुढें करतां येणें शक्य नाहीं, हें उघड होय.

असो. करवाढीविरुद्ध व्यापारी मंडळ, मजूरसंघ व निस्पृह नियतकालिकें इत्यादीनीं जी धडाडीची चळवळ केली तिचा उल्लेख इतिहासांत सुवर्णाक्षरानें होईलच. मात्र नगरपालिकांनीं आपलें कर्तव्य न बजावल्याबद्दल इतिहास त्यांना दोष देईल. लोकांच्या हितासाठीं लोकांकडूनच निवडल्या ज्ञात असलेल्या सदर संस्थानीं करवाढी सारख्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाच्या बाबतींत मूग गिळून स्वस्थ बसावें, हें त्यांस केव्हांहि भूषणास्पद नाहीं. 'लोकांचे आह्मीं प्रतिनिधि आहोंत, असा त्यांना तोरा मिरवण्याचा हक्क यापुढें अर्थात बिलकूल राहत नाहीं.

आह्मांस आशा आहे कीं, प्राप्त आपत्तीशीं तोंड देण्याला जे उपाय आह्मीं गतांकीं सुचविले आहेत त्यांचा अवलंब जनता आस्थापूर्वक करून संकटविमुक्त होईल.

सत्योन्नति समाज, बाणावली

येथ्या ता १।११।१९३१ रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां संस्थेच्या लक्ष्मीमंदिरांत सदर समाजाची सभा भरणार असून तींत हरेक महत्वाच्या विषयांची चर्चा होणार आहे. सर्व सभासदांनीं सभेला उपस्थित रहावें अशी विनंति आहे.

बाणावली, ता. २६–१०–१९३१

शंकर महादेव कंकरे
चिटणीस

इतस्ततः

श्रीमती सौ. कमलाबाई निमकर यांस ४८ तासांत पोर्तुगेज सीमेबाहेर जाण्याची आज्ञा होऊन ती गोवा प्रांत सोडून गेल्याचें वाचकांस कळलेंच असेल. सौ. कमला भगिनींवर असा हडेलहप्पी हुकूम बजावण्यास पोर्तुगेज सरकारला कोणत्या भयंकर कारणानीं भाग पाडलें असेल, हें आह्मांस अजून कळलें नाहीं. पोर्तुगेजांची येथील सत्ता नेस्तनाबूद करण्याचा सदर अमेरिकन बाईनें येथें चंग बांधला होता अथवा पोर्तुगेजां विरुद्ध त्यानीं बंड उभारलें होतें असें आमच्या ऐकिवांत नाहीं. मडगांवच्या गांधी जयंती निमित्त त्यानीं गांधीगुणगान व महात्माजींचा सत्याग्रहाश्रमांतील आयुष्यक्रम—वर्णन केलें होतें. पण आपल्या त्या व्याख्यान्यांत लोकांना अज्ञात अशा कांहीं नूतन गोष्टी त्यानीं सांगितल्या नव्हत्या. बाईच्या हद्दपारीचा संबंध जर कदाचित उपरोक्त व्याख्यानाशीं असेल तर आमच्या विद्यमान नोकरशाहीनें गाजवलेली मर्दुमकी तिच्या आजपर्यंतच्या लौकिकास साजेशीच आहे, असें कबूल करावें लागतें. इंग्रज लोक ह्मणजे भ्याडपणाचे पुतळे. आपल्याविरुद्ध चाललेली चळवळ खुशाल चालूं देतात; आपल्या विरुद्ध होत असलेलीं कडक भाषणें खुशाल ऐकतात; आणि आपल्या समोर होत असलेली स्वातंत्र्याची घोषणा निष्कंटकपणें होऊं देतात. याचें कारण इंग्रजांचा भ्याडपणा. नेभळट वृत्ति. नाहीं तर आमच्या पोर्तुगेजांचें पराक्रमी धोरण पहा. शुद्धि प्रचारकांना हद्दपार ! मोतिलालजींच्या मृत्यूबद्दल जमलेल्या सभेस मज्जाव !? गांधी गुणवर्णन करणाऱ्यास सीमेबाहेर !!! पोर्तुगेज पराक्रमी खरे. इंग्रजानीं पोर्तुगेजांचें अनुकरण कलें असतें तर, हिंदुस्थानांत जीं 'आंदोलनें' दिसतात तीं खास प्रत्ययास आलीं नसतीं.

\+ \+ ×

यंदांचा गोमांतकांतील शारदोत्सवाचा 'मोसम' बहारीचा वठला, हें ठिकठिकाणाहून आलेल्या वार्तांवरून सिद्ध होतें. भजन पूजन, आरत्या, नाटिका, भाषणें, व्याख्यानें, प्रवचनें, कीर्तनें वगैरे कार्यक्रमानीं गोमांतकीय वातावरण कांहीं दिवस दुमदुमून गेलें. कित्येक ठिकाणीं लाठी—काठीहि चमकली व लेझिमचा देखावाहि दिसला. या एकंदर गोष्टी उत्सव प्रवर्तकांस अत्यंत भूषणास्पद होत. परंतु त्यानीं पार पडलेल्या यशस्वी कार्यक्रमानीं हुरळून न जातां, कोणत्या ना कोणत्याहि स्वरूपानें श्रीसरस्वतीची सेवा अखंड चालू ठेवणें जरूर आहे. सरस्वती देवीच्याच कृपाप्रसादानें आमचें अज्ञान तिमिर लयास पाऊन आमच्या संभोंवतीच्या वस्तुस्थितीचें खरें ज्ञान संपादण्याकडे आमच्या मनाचा कल झुकणार आहे. आणि एकदां वस्तुस्थितीचें पूर्ण आकलन झालें, ह्मणजे आमच्या सुखकर अस्तित्वाची चटणी उडवणाऱ्या शत्रूंचा कसा समाचार घ्यावा, हेंहि आमच्या ध्यानांत लवकर येणार आहे. सरस्वतीच्या उपासनेंतच आमच्या सामर्थ्याचें बीज सांठलेलें आहे, हें कोणीहि विसरतां कामा नये.

\+ × \+

सांप्रत अखिल जगतावर हैदोस घालीत असलेल्या आर्थिक आपत्तीची जाणीव आमच्या सरकारास झालेली दिसत नाहीं. जागतिक आर्थिक अनर्थाची थोडीशीसुद्धां तोंड ओळख आमच्या नोकरशाहीला झाली असती तर तीनें करवाढीचा कंटकमय मार्ग स्वीकारला नसता ! पण दुःखाची गोष्ट कीं, आमचें सरकार करवाढीच्याच तोडग्यानें आह्मांस संपत्तिवान बनवण्याच्या हट्टास पेटलें आहे ! या हट्टाचा बाह्य परिणाम आतांच दिसून येत नसला तरी कालांतरानें जनतेचा मनःक्षोभ प्रकट होणें असंभवनीय नाहीं. ह्मणून आतांच जागें होऊन, करवाढीच्या मार्गापासून सरकारनें परावृत्त झालेलें बरें. गोगलगाईच्या सहनशीलतेससुद्धां सीमा आहे. ही सीमा ओलांडली गेली ह्मणजे गोगलगाईच्या गरीब स्वभावाचें रूपांतर त्रासदायक प्राण्यांत होणें कठीण नाहीं. सरकारच्या प्रचंड शक्तीची आह्मांस जाणीव आहे. पण सर्वच लोकमत संतप्त होऊन बिथरल्यास ती शक्ति त्यांत शांतता अधिष्ठित करण्यास समर्थ होईलच, याविषयीं आमचें मन साशंक होत आहे.

÷ \+ ×

झेवियरच्या शवप्रदर्शनाच्या मुदतींत सरसकट मोटारींवर जादा कर लादण्यांत येऊन, [illegible]च्या उत्पन्नाची वांटणी नगरपालिकानीं आपापसांत योग्यतेनुरूप करून घ्यावी, अशी सूचना एका 'कंट्री' अर्थशास्त्रज्ञानें पुढें आणिली आहे. भात—तांदुळांच्या करवाढीनें आमच्यांत अर्थशास्त्रज्ञांचें पेंव पिकवलेलें आहे, असें उपरोक्त सूचकाच्या सूचनेवरून ह्मणावें लागतें. प्रदर्शनाचा फायदा घेणाऱ्यांवर कर लादणें एका अर्थी योग्य आहे, असें घटकाभर समजण्यास जागा आहे. पण फोंडें, केंपे, पेडणें वगैरे ठिकाणच्या ज्या स्थानिक मोटारींना प्रदर्शनाचा बिलकूल फायदा मिळणार नाहीं, त्यांवर जादा कराचा बोजा काय ह्मणून, याचा खुलासा सदर पंडित करतील काय ? या अशा पंडितांच्या हातांत आमचें अर्थशास्त्र सांपडलें असल्यानेंच, आमचें अस्तित्व दिवसें दिवस अनर्थमय होत आहे ! उपरोल्लेखित सूचना फेटाळली जाईल, अशी आह्मांस खात्री आहे.

———

उपयुक्त शिक्षण

—+—

(ले. व्यंकटेश वि. वैद्य.)

हिंदुस्थानच्या असो किंवा गोमांतकाच्या असो प्रस्तुत परिस्थितींत शेतकी हाच स्वावलंबनाचा मुख्य धंदा आहे. ह्मणून शेतकीचें पायाशुद्ध शिक्षण हेंच आज हितावह ठरणार आहे. निग्रो लोकांचे परलोकवासी पुढारी बुकर टी. वाशिंग्टन यांनीं चालविलेल्या टस्केजी येथील शिक्षणसंस्थेसारखी निदान एक तरी संस्था जेथें शेतकीची भरपूर जमिन आहे अशा ठिकाणीं काढणें हें सरकार व जनता ह्यांचें मुख्य कर्तव्य आहे. एरवीं शेतकीची व त्यावर अवलंबून असलेल्या इतर धंद्यांची उन्नति होणें शक्य नाहीं. शेतकीसंबंधीं प्रश्नपत्रिका छापून मागील अनुभवानें उदासिन असलेल्या—जनतेंत वांटल्यानें सरकारचें कर्तव्य संपलें असें होत नाहीं. पण आजपर्यंतचा अनुभव पहातां लोकांस परावलंबी ठेवण्यांतच हित समजणारें फाजील दूरदर्शी सरकार ह्या प्रकारची शिक्षणसंस्था अस्तित्वांत आणील याची मुळींच आशा वाटत नाहीं. भिकेच्या तट्टांकरितां नव्या जागा उत्पन्न करून किंवा असलेल्या जागांचे व्यर्थ पगार वाढवून कांहीं व्यक्तींस आपल्या ताटाखालचीं मांजरें बनविण्याकडे सरकारी धोरणाची मजल जात नाहीं. स्वतःच्या सत्तेखालीं असलेल्या दुबळ्या प्रजेला स्वावलंबनानें सबल केलें तर हाताखालचे भिन्न संस्कृतीचे लोक पुढें मागें पारतंत्र्याचें जूं फेंकून देतील ही धास्ती सरकारच्या मनानें घेतली आहे. ह्मणून लोकांनींच "उद्धरेदात्मनात्मानम्" या न्यायानें आपली उन्नति स्वतःच घडवून आणली पाहिजे. प्रत्येक बाबतींत सरकारच्या तोंडाकडे पहात बसण्याच्या नामर्दपणाच्या वृत्तीचा त्याग करून स्वावलंबनाचीच कास धरणें श्रेयस्कर आहे.

आज अनेक शतकें चालू असलेल्या वाङ्मयिक पोर्तुगीज शिक्षणानें सरकारी कारकुनाची पैदास करण्यापलिकडे हिंदु लोकांस कांहीं फायदा झाला नाहीं हें सर्वसंमत आहे. त्या शिक्षणांत अनेक ढोबळ व्यंगें आहेत हें ढळढळीत दिसत असूनहि सरकार त्यांत सुधारणा करण्याचें कांहींच मनावर घेत नाहीं. शिक्षणसुधारणेचे मसुदे वारंवार प्रसिद्ध होत आहेत; पण एक तर त्या सूचना अमलांत येत नाहींत आणि त्यांपैकीं कांहीं अमलांत आल्यास नेमक्या अधोगामीच सूचना आचरणांत येतात. शिक्षणसंबंधीं तपशीलवार प्रत्येक बाबतींत दोष दाखवितां येतील पण तो या लेखाचा विषय नव्हे. आज मुख्य मुद्दा सांगावयाचा तो हाच कीं, राष्ट्राची सर्वांगीण उन्नति होण्यास त्यास उच्च शिक्षणाची प्रथम आवश्यकता आहे. शारीरिक शिक्षणाचाहि उपयुक्त शिक्षणांत प्रामुख्यानें समावेश झाला पाहिजे. वयाच्या विवक्षित मर्यादेपर्यंतच शरीराची योग्य तऱ्हेनें वाढ करतां येते. तें वय निघून गेलें कीं, मनांत प्रबळ इच्छा असूनहि शरीराची वाढ करतां येत नाहीं. त्या मनुष्याचें पुढील आयुष्य दुर्बल स्थितींतच राहावयाचें. ह्मणून तरुण वयांतच शरीरसंपत्तीकडे लक्ष दिलें पाहिजे. शरीरसंपत्ति व उन्नति यांचा अन्योन्य संबंध आहे. ज्या राष्ट्रांतील बहुजन समाजाची शारीरिक उन्नति झालेली असते तेंच राष्ट्र पुढें अन्य उन्नतिपंथ आक्रमण्यास समर्थ होतें. दुबळ्या लोकांचीं कधींहि उन्नति होत नाहीं. ह्मणूनच पाश्चात्य राष्ट्रांत बौद्धिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षणाकडेहि जास्त लक्ष देण्यांत येत असतें.

जगांतील प्रत्येक राष्ट्र संरक्षक जकाती लादून आपल्या राष्ट्रांतील कच्चा माल परदेशांत न पाठविण्याची खबरदारी घेऊं लागल्यानें ज्या देशांत लोकसंख्येस खावयास पुरेसें अन्न निपजत नाहीं, त्या देशानें आपल्या शिक्षणाचें ध्येय शेतकीची उन्नति हेंच ठरविलें पाहिजे. इंग्लंडांतील सुप्रसिद्ध तत्वज्ञ आणि नाटककार बर्नार्ड शॉ यानें आपल्या संपन्न देशबांधवानांहि असाच सल्ला दिला आहे. शेतकीकडे दुर्लक्ष करून परदेशांत खपणाऱ्या उद्योगधंद्यांकडे आणि कारखान्याकडे जास्त लक्ष दिल्यामुळें प्रस्तुतकालीं इंग्लंडचें दिवाळें वाजण्याची वेळ आली आहे, असें त्याचें ह्मणणें आहे, आणि तें खरेंहि आहे. गोमांतकासारख्या धान्याकरितां बहुतांशीं दुसऱ्यावर अवलंबून असलेल्या प्रांतानें तरी या उपदेशाचें मनन करून त्या प्रमाणें आचरण केलें पाहिजे.

गोमांतकांत बाहेरून पैसा येण्याचे मार्ग दिवसें दिवस बंद होत चालले आहेत. परदेशांत नोकरीवर असलेले गोमांतकीय तरुण बेकार होऊन फार मोठ्या प्रमाणांत स्वदेशीं परत येत आहेत. गोमांतकांतून परदेशीं निर्गत होणारा नारळ, सुपारी, मीठ, आंबे इत्यादि माल माती मोलानें विकला जात आहे. आणि या स्थितींतच भरींत भर ह्मणून तांदुळांवर कर बसविण्याचें सरकारांत घाटत आहे. या स्थितींत गोमांतकांत धान्याची निपज जास्त झाल्याशिवाय आमचा तरणोपाय नाहीं. 'गरज ही अकलेची जननी आहे' अशी एक ह्मण आहे. तीस अनुसरून आह्मीं आतां सर्व शिक्षणाचा भर या उपयुक्त कार्याकडेच दिला पाहिजे. पुस्तकी शिक्षण आतां बस्स झालें. 'अन्न न दे पोटासी ऐशी विद्या ती काय कामाची!' ही उक्ति अक्षरशः खरी आहे. लिसेवचे पदवीधर झाल्यानें कदाचित भरपूर पगाराची नोकरी मिळून चैन चालण्याचा जरी संभव असला तरी प्रजेच्या उत्पादक शक्तीची सरिता आटतांच तिच्याच जलानें उत्पन्न झालेले हे नोकरीचे झरे आटल्याशिवाय रहाणार नाहींत हें प्रत्येकानें लक्षांत बाळगावें.

इंग्रजांच्या भारत मंत्र्यानें रुपयाची चलनाशीं फारकत करून पौंडाशीं त्याची सांगड घातल्यानें संपन्न राष्ट्रांत रुपयाची किंमत उतरत चालली आहे. अमेरिका, जपान, इटली, फ्रान्स इत्यादि देशांतून हिंदुस्थानांत येणारा माल आतां महाग झाल्याशिवाय रहाणार नाहीं. ब्रिटिश व पोर्तुगीज रुपयाची सांगड पूर्वीपासूनच असल्यानें गोमांतकालाहि त्याचे परिणाम भोगावे लागतील यांत संशय नाहीं. परदेशांतून येणाऱ्या चैनीच्या वस्तु महाग होतांच 'वृद्धा नारी पतिव्रता' या न्यायानें गोमांतकीय लोक त्यांचा त्याग करूं शकतील; पण अन्नाशिवाय कोणाचेंहि जीवन चालणें शक्य नाहीं. ह्मणून ज्या रीतीनें धान्याची वृद्धि होईल तेंच सद्यःकालीं खरें उपयुक्त शिक्षण होय.

(मागील अंकावरून समाप्त)

पत्रव्यवहार

आपल्या लोकप्रिय 'भारता'च्या २६ व्या अंकांत पणजी येथें प्रसिद्ध होणाऱ्या वैश्य मासिकांत माझ्या नांवें प्रसिद्ध झालेल्या कविता कै. सामंतांच्या ठरवून व आपल्या अर्थहीन कल्पिलेल्या कल्पना चित्राला पुष्टी देण्याकरितां कै. सामंत गुरुवर्यांच्या अंतकालीं जवळ मायेचा माणूस कोणीच नव्हता असें धडधडीत खोटें विधान एका 'फोंडेकरानें' ठोकून दिलें आहे; पण कै. सामंतांच्या मरणापूर्वी त्यांचे सख्खे बंधु श्री. गणेश शिवराम सामंत हे त्यांच्या शुश्रुषेकरतां आले ते त्यांच्या अंतविधीपर्यंत फोंड्यांतच राहिल्याचें सर्व फोंडेकरांना माहीत आहे. अशा ठोकळ गोष्टी ज्या वार्ताहराला माहीत नाहींत, त्याला सामंतांच्या मरणानंतर कवितांचें बाड नक्की मीच उचलल्याची किरकोळ गोष्ट कशी समजली? तरी बरें कीं कै. सामंतांच्या कवितांच्या बाडासह त्यांची मालमत्ताहि मीच उचलली, असें त्यानें झटलें नाहीं! ही 'फोंडेकरां'नें माझ्यावर मोठी मेहरबानीच केली ह्मणायाची!

सामंतांचा लेखन व्यवसाय दांडगा होता, ते आमच्या घरासमोर रहात होते, तसाच त्यांचा आणि माझा पुष्कळ परिचयहि होता. या गोष्टी खऱ्या आहेत; पण एवढ्या सिद्धांतावरून वैश्य मासिकांत प्रसिद्ध झालेल्या कविता कै. सामंतांच्या कशावरून? वैश्याच्या पहिल्या अंकीं प्रसिद्ध झालेला कूट प्रश्न आणि तिसऱ्या अंकांत मीं कवितेंत दिलेलें उत्तर, याचा जर निनावीं फोंडेकरानें विचार केला असता तर अशीं खोटीं विधानें त्यानीं मुळींच केलीं नसतीं असें मलाच नव्हे तर कोणाहि सहृदय वाचकास वाटल्यावांचून रहाणार नाहीं. पण कदाचित १९३१ सालीं वैश्य मासिक जन्माला येऊन पहिल्याच अंकीं ठराविक कूट प्रश्न येणार असल्याची माहिती गुप्त फोंडेकरानें कै. सामंतानां देऊन कवितेंतच उत्तर लिहवून ठेवलें असल्यास नकळे! तसेंच 'शारदेसाठीं' याहि कवितेसंबंधीं विचार केल्यास १९२५ सालीं सामंत वारले तर १९२९ त येथील शारदा मंदिराची स्थापना झाली. तेव्हां त्याप्रीत्यर्थ लिहिलेल्या कवितेचा मेळ सामंतांच्या बाडाशीं घालायाचा कां निनावीं फोंडेकरांच्या मत्सरी कल्पनेशीं घालायाचा, हेंच मला समजत नाहीं. त्याच्या पुढें हाच इसम 'गोमांत गीत' सामंतांच्या बाडांत आपण दोनदां वाचल्याचें पूर्णपणें स्मरल्याचें सांगून, माझ्या मराठी भाषाज्ञानाविषयींची माहिती असल्यानें लिहितो; मग माझ्या कविता प्रसिद्ध झाल्यानंतर त्या ओळखण्यास सहा वर्षांची आठवण पूर्णपणें ठेवणाऱ्यास त्या विषयीं अधिकृत चौकशी ती कां करावी लागली, हें अज्ञात फोंडेकर सांगूं शकेल काय?

रामनाथ स. गुडेकर.

वर्तमान सार

—गेल्या रविवारीं माझोर्डी येथें मजूर संघाच्या विद्यमानें भारतकाराचें दुसरें जाहीर भाषण झालें. भाषणास स्थानिक अधिकारी उपस्थित होते. लोकसमुदायहि बराच जमला होता. जागच्या जागीं १५ मजुरांनीं संघांत समावेश करून घेतला.

—येत्या ता. २५।१०।३१ रोजीं मडगांव येथें 'अखिल दैवज्ञ ब्राह्मण संघ' या नावांची नवी संस्था नवाकाळ पत्राचे सहसंपादक श्री. पुरुषोत्तम बाळकृष्ण कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन होणार आहे.

—तांदुळांवरील जादा जकात काढली जाण्यासाठीं, व्यापारी, मजूर, छोटे भाटकार व इतर जन यांनीं जोराची चळवळ केली; कालच्या विधिमंडळाच्या बैठकींत सदर जादा कराच्या बिलाची चर्चा व्हावयाची होती. या बिलाचा विशेष विचार करण्यासाठीं जी कमिटी नेमण्यांत आली होती, तिच्या अभिप्रायानें जनतेंत खळबळ उडाली आहे.

—वार्षिक रीतीप्रमाणें यंदांहि आल्मैद कॉलेज, फोंडा, या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून श्रीसरस्वत्युत्सव साजरा करण्यांत आला. उत्सवानिमित्त रा. दादावैद्य यांच्या अध्यक्षतेखालीं रा. दत्तात्रय व्यंकटेश पै यांचें 'आमच्या शिक्षणाची दिशा' या विषयावर व रा. शिवा फटु पै आंगले यांच्या अध्यक्षतेखालीं रा. अनंत बाबूराव सामंत यांचें 'आधुनिक मराठी काव्य' या विषयावर व्याख्यानें झालीं. व्याख्यानमालेचा समारोप प्रो. नारायण अनंत बांदोडकर यांनीं केला. प्रस्तुत उत्सवास 'भारता'ला आमंत्रण पाठविल्याबद्दल तो कार्यकारी मंडळाचा आभारी आहे.

हेगडे देसाई, सुब्राय सामंत वगैरे गृहस्थांचीं भाषणें व काशीकरबुवा यांचीं कीर्तनें झालीं.

—गोवा–मजूरसंघानें भात–तादुळांच्या करवाढीविरुद्ध आपली तक्रार पोर्तुगालसरकारकडे नेली आहे.

—येथील बालोन्नति समाजाचा वार्षिक श्रीसरस्वत्युत्सव यशस्वी रीतीनें पार पडला. यंदांचा उत्सव नव्या बांधलेल्या लक्ष्मीमंदिरांत साजरा झाला. शेवटच्या दिवशीं मंदिरापासून नदीपर्यंत निघालेली सरस्वतीची मिरवणूक प्रेक्षणीय झाली.

—आज रोजीं गोवा–मजूरसंघाचें सार्वजनिक वाचनालय उघडण्याचा समारंभ साजरा होणार आहे. संघातर्फे दिवसाच्या व रात्रीच्या शाळाहि लवकरच स्थापण्यांत येणार आहेत.

—सत्तरी महालांतील वयोवृद्ध गृहस्थ यशवंतमामा गाडगीळ हे गेल्या ता. १३–१०–३१ रोजीं दिवंगत झाले. मामा धर्मनिष्ट व कर्मनिष्ट असून, दिपाजी राण्याच्या बंडापासूनच्या ऐतिहासिक गोष्टी त्यांना अवगत होत्या.

वर्ष १६ वें. अक ३०
गुरुवार ता. २९ अक्टोबर सन १९३१

वर्गणीचे दर
सालीना ट. खं. सह ३ रु. [आगाऊ]
किरकोळ अंकास १ आणा.

जाहिरातीचे दर– समक्ष अगर पत्रद्वारे.
आगाऊ पैसे आल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाहीं.

संपादक व मालक
गो. पु. हेगडे देसाई– फार्मासेवतिकु
मुद्रण व प्रकाशन भारत–प्रेस कुसमण केपें गोवा.

भारत
O BHARAT

Ano 16 Nº 30
QUINTA-FEIRA 29 de Outubro 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

भव नेहमीं वृद्धिंगतच व्हावें, अशी परमे-श्वरापाशीं प्रार्थना करितों.

\+ + +

सुबोध मासिकाचा प्रथमांक आह्मांस मिळाला. या आमच्या नूतन भावंडाचे संपादक रा. सां. घ. कंटक असून, त्याचें प्रकाशन स्थान– 'तरुण भारत'–छापखाना, बेळगांव, हें आहे. पत्रव्यवहाराचा पत्ता– 'मॅनेजर–"सुबोध", मुरगांव–झरवर [गोवा] हा आहे. वार्षिक वर्गणी बक्षिस पुस्तकासह रु. २ आगाऊ. पूर्वी 'सुबोधमाला' या नावाच्या रा. कंटक यांच्या नेतृत्वाखालीं प्रसिद्ध होत असलेल्या मालेचें प्रस्तुत मासिक हें रूपांतर होय. सुबोधची रसाळ रचना रसिकांना रंजवणारीच असल्यानें तो लवकरच लोकमान्यतेचा मान मिळवील, अशी आशा वाटते. उपजत कवींच्या प्रतिभासंपन्न कविता, कसलेल्या लेखकांचे भारदस्त लेख व मनोरंजक गोष्टी, या साधनत्रयीनें मासिकाला आणलेली शोभा चित्ताकर्षक होय. गेल्या ता. १–११–३१ रोजीं सुबोधचा प्रकाशन समारंभ यशस्वी रीतीनें पार पडला. अपरिहार्य कारणांमुळें पूर्व सूचना असतांहि त्याला उपस्थित राहणें आह्मांला शक्य झालें नाहीं. याबद्दल समारंभाचे प्रवर्तक आह्मांस क्षमा करतील, अशी आशा आहे. असो. ज्या निरपेक्ष चिकाटीनें सुबोधला जन्म दिला ती सतत टिकून सुबोधांत स्थैर्य उत्पन्न व्हावें व त्याचें अस्तित्व मराठी साहित्याच्या वाढत्या वैभवाला उत्साहवर्धक व्हावें, इतकेंच आह्मीं इच्छितों.

वै. पुंडलीक अ. केणी

गेल्या ता. २७–१०–३१ रोजीं पहाटेच्या वेळीं श्री. पुंडलीक अ. केणी यांचें हृदयाची क्रिया एकाएकीं बंद पडून आकस्मिक रीतीनें देहावसान झालें ! हें दुष्ट, अशुभ व अमंगल वृत्त ऐकून, ज्या ज्या व्यक्तींचा मयताशीं कोणत्या ना कोणत्या मिषानें परिचय झाला व संबंध आला असेल, त्या त्या व्यक्तींचें हृदयविदारण झाल्याविना खास राहिलें नसेल. कारण श्री. केणी यांच्या ठिकाणीं वसत असलेले सद्गुण, विशेषतः अंतःकरणाची कोमलता, परोपकार वृत्ति व तेजस्वी धडाडी,—यामुळें त्यांची दुसऱ्यांवर छाप पडून, ते त्यांना लवकरच आदरणीय होत असत. त्यांच्या ऐश्वर्याला कुलीनतेची सोबत मिळाली होती; ह्मणूनच ते विशेष लोकप्रिय झाले होते, हें येथें नमूद करणें इष्ट वाटतें.

सु–प्रसिद्ध नागरिक व हिंदुसमाजांतील वजनदार गृहस्थ वै. केणी यांच्याशीं आमचा गोड परिचय होता पण दाट मैत्री नव्हती. परलोकवासी दे. भ. डॉ. पुरुषोत्तम वामन शिरगांवकर यांच्याशीं विद्यार्थीदशेंत आमचें दळणवळण चालू असतांना श्री. केणी यांची आह्मांस ओळख झाली व तदनंतरच्या अनेक प्रसंगीं त्यांच्यांत नांदत असलेल्या उच्च गुणाची जाणीव झाल्यानेंच आह्मीं त्यांस एकदां उद्यम–भास्कर ही पदवी बहाल केली.

गेल्या डिसेंबरांत दीवप्रकरणाबाबत आह्मीं दमणला गेलों होतों. त्यावेळीं श्री. पुंडलीक केणी यांचा तेथें मुक्काम होता. तेथील न्यायखात्याचे एक रार कारकून व आमचे स्नेही रा. दामोदर शेट रायकर यांच्या येथें आह्मीं व आमचे मित्र रा. वैकुंठ शिवराम शिरवैकर उतरलें होतों. पण आमच्या आगमनाची वार्ता श्री. केणी यांच्या कानीं पडतांच त्यांनीं आह्मांस गड्यांमागून गडी पाठवून आपल्या तेथील बिऱ्हाडीं नेलें व आपल्या कुलीनतेला साजेल अशाच रीतीनें त्यांनीं आमचा सत्कार केला. त्यावेळीं गुरुचरित्र वाचनाचा त्यांचा सप्ताह चालू होता. पहाटेला उठून ते अनन्यभावें श्रीगुरुदेवदत्त सेवा करीत असत. हा त्यांचा भक्तिभाव पाहून त्यांच्या विषयीं आमच्या अंतःकरणांत असलेला आदर कितीतरी पटीनें वृद्धिंगत झाला. असो.

'बुडत्यास हात द्यावा' या तत्वाचा तपशील ते प्रत्यहीं आचरणांत आणीत असत. रंजले–गांजलेल्यांना ते 'आपले' ह्मणत असत. या बाबतींत त्यांची तुलना पणजीचे दुसरे सु–प्रसिद्ध नागरिक श्री. हिरू कामत धागेकर यांच्याशीं करणें अवास्तविक होणार नाहीं.

वै. केणी यांच्या प्रेतयात्रेस लोटलेला असंख्य लोकसमुदाय व त्यांच्या निधनानिमित्त पणजी शहरांत व्यापारी वर्गाकडून पाळण्यांत आलेला कडकडीत हरताळ, या दोन्हीं गोष्टी त्यांची लोकप्रियता निर्विवाद सिद्ध करतात. अशा या लोकप्रिय नरश्रेष्ठाच्या निधनानें घडून आलेली हानि सहसा भरून येणें शक्य नाहीं. रा. शांबा रावजी सरदेसाई यांनीं दहनविधीचे वेळीं केलेलें मृताचें गुणवर्णन यथार्थ होतें, हें आणखी निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

शेवटीं, जगाच्या रहाटीकडे नजर पुरवून मयताचे नातलग आपला दुःखभार हलका करून घराण्याचा लौकिक कायम टेवण्याप्रीत्यर्थच "आपलें" शक्तिसर्वस्व वेंचतील अशी आशा करून वै. पुंडलीक अनंत केणी यांच्या आत्म्यास चिरशांति इच्छितों.

—गेल्या ता. २९–१०–३१ रोजीं मडगांव येथें मजूर संघाच्या सार्वजनिक मजूर वाचनालयाचा उद्घाटन समारंभ डॉ. व्हास यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला. या प्रसंगीं मजूरसंघाच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, सदर डॉ. व्हास व भारतकार इत्यादींची समयोचित भाषणें झालीं. समारंभास मजुरांचा बराच मोठा जमाव जमला होता. त्या जानेवारींत मजूरसंघाचें पहिलें कोंकणीपोर्तुगेज विद्यालय उघडलें जाईल.

वर्तमानसार

—फातर्पे येथें श्रीशारदा सेवामंडळ संस्थेचा प्रतिवार्षिक सरस्वत्युत्सव ता. २१ ते २५ पर्यंत उत्तम प्रकारें साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं दररोज भजन, आरत्या, पुष्पांजलि व ता. २१ रोजीं श्रीशारदाविद्यालयांतील मुलांकडून श्रीस्तवन, ता. २२—श्रीशारदा वेदशास्त्र पाठशाळेंतील मंडळीकडून वेदघोष व शास्त्रीय संवाद, ता. २३— रा. द. स. देसाई यांचें प्रवचन, ता. २४— वे. त्रिविक्रम विष्णु सहकारी यांचें 'शारदेची उपासना' या विषयावर व्याख्यान, ता. २५—ह. भ. प. नारायण वामन हरचीरकर यांचें सुश्राव्य कीर्तन व विसर्जनाची मिरवणूक वगैरे कार्यक्रम झाला.

—मुष्टिफंड संस्थेच्या 'श्रीसरस्वती माजी विद्यार्थी संघा'मार्फत ता. १० ते १३ पर्यंत चार दिवस गोरक्षण सप्ताह साजरा करण्यांत येणार आहे. त्या प्रसंगीं दिंडीचें भजन, कीर्तन, संघाच्या वाढदिवसाचा कार्यक्रम आणि रा. फणसीकर यांचें मॅजिक लँटर्नच्या साह्यानें गोरक्षणावर व्याख्यान वगैरे कार्यक्रम होणार आहेत. कार्यक्रमाच्या निश्चित वेळा योग्य वेळीं जाहीर करण्यांत येतील. गेल्या भारतांत प्रसिद्ध झालेला संस्थेचा कार्यक्रम रा. पुंडलीक अनंत केणी यांच्या शोचनीय निधनामुळें पार पडला नाहीं.

—शिरोडें येथील श्रीमहालक्ष्मी मंदिरांत श्रीकामाक्षी विद्यालयाचा वार्षिक सरस्वत्युत्सव ता. १८।१०।३१ पासून ता. २४।१०।३१ पर्यंत साजरा करण्यांत आला. नेहमीं सकाळीं झेंडावंदन, प्रभातफेरी, दुपारीं पूजन आरती, सायंकाळीं भजन कथा वगैरे होऊन ता. १९ रोजीं सायंकाळीं विद्यालयांतील मुलींचें गायन व रा. गुणवा शिवा प्रभु देसाई यांच्या अध्यक्षतेखालीं रा. श्री. विष्णु पाध्ये बी. ए. यांचें 'समर्थांचें शिकवण' या विषयावर व्याख्यान झालें. ता. २२ रोजीं सायंकाळीं विद्यालयांतील मुलींचें काव्य गायनानंतर कु. वसंत शिरोडकर यांनीं टिळकांची 'खरे पुढारी' ही कविता ह्मणून दाखविली. त्या नंतर रा. पांडुरंग ल. शिरोडकर यांच्या अध्यक्षतेखालीं रा. ज. मि. राऊत यांचें 'मराठी शाळांची संघटना' या विषयावर व्याख्यान होऊन रा. मोघे पर्वते, ठाकूर इत्यादि वक्त्यांचीं भाषणें झालीं. ता. २३ रोजीं रा. बळवंतराव गांवकर यांच्या अध्यक्षतेखालीं रा. सदानंद देसाई यांचें 'तरुणांचीं कर्तव्यें' या विषयावर व्याख्यान झालें. ता. २४ रोजीं सायंकाळीं भजन वगैरे कार्यक्रम होऊन रात्रौ ८ वाजतां श्रीसरस्वतीच्या मृण्मय मूर्तीच्या मिरवणुकीनें उत्सव समाप्त झाली.

—अखिल दैवज्ञ ब्रा. संघ व श्रीकालिका वाचन मंदिर, मडगांव–गोवा, या संस्थांचें सविस्तर वृत्त येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

गीता जयंती जवळ आली

गीता–जयंती (मार्गशीर्ष शु. ११ शी) ता. २० डिसेंबर १९३१ रविवार रोजीं येत आहे. तरी एव्हांपासूनच गीता शिक्षणास प्रारंभ करा अशी नम्र विनंति आहे. गीता–पठन करणें हा धर्मशिक्षणाचा मुख्य भाग आहे. या कामीं गोमांतकांतील विद्यालयांनीं केलेली कामगिरी सर्व महाराष्ट्रांतहि प्रशंसेस पात्र झाली आहे; ही गोष्ट गोमांतकास भूषणास्पद असून गोमंतक–गीता–धर्म–मंडळास उमेद आणणारी आहे. अशीच प्रेरणा भगवान गोपालकृष्णानें सर्वांच्या अंतःकरणांत करावी अशी प्रार्थना आहे.

मंडळानें ह्या वर्षापासून धर्मशिक्षण मालेचीं १ ते ५ पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें निश्चित करून, या कार्यास कायमचें स्वरूप देण्यांत यावें असा प्रयत्न चालविला आहे. या मालेंचें पहिलें पुस्तक बालवर्ग व पहिली इयत्ता यांच्याकरितां असून तें पुढील आठवड्यांत प्रसिद्ध होईल. या पुस्तकांत श्रीगीतागुह्य आणि भूपाळी, आरती, मनाचे श्लोक इत्यादि पद्यभाग व धर्मनीतीवर गद्यभाग दिलेला आहे. हें पुस्तक सर्वच विद्यार्थ्यांना पठनीय आहे. दुसरी, तिसरी, चौथी आणि पांचवी या इयत्तांतील विद्यार्थ्यांकरितां गीतेचा १२ वा, १५ वा, ३ रा आणि १८ वा अध्याय असावा असा मंडळाचा मनोदय आहे; आणि त्याप्रमाणें पुढील पुस्तकांत या गीताध्यायांसह मराठी पद्यभाग व गद्यभाग क्रमशः यावयाचा आहे. या वर्षी गीतापरीक्षेकरितां विद्यार्थ्यांकडून वरील लिहिल्याप्रमाणें तयारी करून घेण्याची कृपा करावी. कार्तिकी एकादशीपासून विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन उत्तीर्ण विद्यार्थ्यांचीं नांवें व श्लोक संख्या इकडे खालील पत्त्यावर कळविण्याची कृपा करावी; ह्मणजे बक्षिसार्थ पुस्तकें पाठविण्यास सोईचें होईल. बक्षिस-समारंभ गीताजयंतीच्या दिवशीं करावयास यामुळें संधि मिळेल.

प्रसिद्ध व्हावयाच्या पहिल्या धर्मशिक्षण पुस्तकाची किंमत अगदीं अल्प ह्मणजे अर्धा आणा आहे. पुढील पुस्तकें छापण्यास मदत व्हावी ह्मणूनच ही किंमत ठेविली आहे. ज्यांना पुस्तकें पाहिजेत त्यांनीं टपाल खर्चाकरितां आणि पुस्तकांच्या किंमतीकरितां तिकिटें पाठवावीं ह्मणजे पुस्तकें पाठविण्याची व्यवस्था होईल. तरी गोमांतकीय मंडळींनीं या विनंतीच्या हेतूकडे लक्ष देऊन कृपाळूपणें मंडळाशीं सहकार्य करावें अशी विनंति आहे. अधिक माहिती पुढील विनंति पत्रांत येईल.

मडगांव, ता. १।११।३१

सर्वांचा नम्र सेवक
पुंडलीक वामन विर्जिनकर
कार्यवाह, गोमांतक–गीता–धर्म–मंडळ

साधूचा डिटेक्टिव्ह बनला !

इंग्रजी हिंदुस्थानांतील डिटेक्टिव्ह साधूच्या वेशांत येथें येऊन भाविक लोकांस कसे फसवितात व थोड्याच वेळानंतर जेव्हां सदर साधूंचा ढोंगीपणा चव्हाट्यावर येतो तेव्हां त्यांच्या भक्ताला ह्या साधूंच्या नादीं लागल्याबद्दल कसा पस्तावा करीत बसावें लागतें ह्याचें एक ताजें नमुनेदार उदाहरण आमच्या डिचोलींत नुकतेंच घडून आलें आहे. गेल्या दहा बारा महिन्यापूर्वी येथें एक साधु (!) अवतीर्ण झाले; कोणीहि दाढी भगवेवाला दिसला कीं त्याचे भक्त बनावें असा सध्या आमच्या गोमांतकांत चालू असलेल्या नियमानुसार येथील बरेच लोक त्याचे शिष्य बनले व मग त्याचें येथें बरेंच प्रस्थ माजत गेलें हें सांगणें नकोच. कांहीं कांहीं लोकांस (ह्यांत उच्च घराण्यांतील सुशिक्षित लोकहि होते हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे) तर हे साधु प्रत्यक्ष श्रीरामकृष्ण परमहंसाचे अवतारच भासूं लागले !

अशा रीतीनें ह्या साधूचें प्रस्थ माजलें असतां गेल्या दोन महिन्यापूर्वी हे रामकृष्ण परमहंसाचे अवतार आपल्या भक्तांस सोडून इंग्रजी हिंदुस्थानांत गेले व १५ दिवसांनीं परत येऊन त्यानीं आपल्या कामास पूर्ववत सुरवात केली. वस्तुतः साधूच्या ह्या वर्तनावरूनच सावध होऊन त्याच्या भक्तानीं ह्या गुरूचा नाद सोडणें उचित होतें; परंतु विचारे शिष्य आपल्या गुरूच्या नामस्मरणानें अगदीं पूर्णपणें रंगून गेल्यामुळें त्यांना याचा विचार करण्यास कसा वेळ सांपडेल ?

परंतु अत्यंत दुःखाची गोष्ट ही कीं, गेल्या १०–१२ दिवसांपूर्वी हे रामकृष्ण परमहंसाचे अवतार [!] एकदम गुप्त होऊन पणजीस अवतीर्ण झाले. तेथें त्यांनीं आपलें दाढीचें जंगल उतरवून व साधूचा पोषाख टाकून देऊन बूट पाटलोण फेटा वगैरे जिन्नस विकत घेतले व अल्पावधींतच हे श्रीरामकृष्ण परमहंसाचे अवतार डिटेक्टिव्ह बनले व मुंबईस जाण्याच्या इराद्यानें बोटीवर चढले !

साधूच्या आश्रमांत बीरच्या बाटल्या बूचासह असल्याच्या आतां दिसून आल्या आहेत. ह्यावरून केवळ कोणताहि भगवेवाला तो भगवें वस्त्र परिधान करतो आहे एवढ्याच गोष्टीकडे नजर देऊन त्याच्या इतर वागणुकीकडे न पहातां आपण त्याचे शिष्य बनलों तर शेवटीं आपणास कसें तोंडघशीं पडावें लागतें हें ह्या उदाहरणावरून स्पष्टपणें दिसून येत नाहीं काय ? आतां तरी हे शिष्य ह्यापुढें आपली ही साधूसंबंधींची अंधभक्ति सोडून दतील काय ?

एक डिचोलीकर

—नवीन साधनसामुग्रीची जुळवाजुळव होतांच 'भारता'चा कोकणी विभाग प्रसिद्ध

ग्रामसंस्थांच्या पावणीदारांना इषारा !

नूतन करवाढीनें उत्पन्न केलेली भात–तांदुळांची महागाई ही कृत्रिम स्वरूपाची आहे. राजकीय वातावरणांत अकल्पित रीत्या कसलेंहि 'आंदोलन' झाल्यास, विद्यमान प्रातांधिपतीचें सिंहासन डळमळणें शक्य आहे. आणि त्यांच्या बदली येणाऱ्या नव्या अधिकाऱ्याकडून सदर करवाढीचें उच्चाटण होणें असंभवनीय कोटींतील नव्हे. अर्थात अशा रीतीनें करवाढीचा 'वेताळ पूर्व स्थळीं' जातांच–भात–तांदुळांची स्वस्ताई पूर्ववत होणार आहे.

ह्मणून नूतन होऊं घातलेल्या कोमुनिदादींच्या व इतर पावणीच्या इच्छूकांना आमचा असा इषारा आहे कीं, उपरोल्लेखित संभवनीय स्थित्यंतराकडे लक्ष पुरवून पावणीच्या चढाओढींत त्यांनीं भाग घ्यावा. न पेक्षां कधींहि न भरून येणारी ठोकर बसण्याची शक्यता आहे. या सूचनेला साजेशा सावधानतेनेंच सर्व पावणीदार वागतील अशी आह्मांस आशा आहे.

दारू व दारूडे

गोव्याच्या मध्यम पिढींत दारूचें व्यसन हल्लीं इतकें थोकाळलें आहे कीं, त्याच्या प्रतिबंधनार्थ कांहीं तरी कडक उपाय न योजिल्यास भविष्य अत्यंत कठीण आहे ! या मध्यम पिढीवर गोमांतकाच्या भावी कल्पनाची विशेषसी भिस्त नाहीं. त्या लोकांचें भावी कार्य ह्मणजे थोड्याच अवधींत वृद्धत्व स्वीकारून राम ह्मणण्याचें, अशा विचारानें समाजानें त्यांकडे दुर्लक्ष केलें ! त्यामुळें आज तरुण पिढींतीलहि अवघेच तरुण त्या मार्गास लागलेले दिसत आहेत ! समाजानें अशीच मुग्धता स्वीकारल्यास आज या बाबतींत अवघेच दिसणारे तरुण उद्यां जास्त दिसण्यास हरकत राहणार नाहीं ! आणि थोडक्याच अवधींत त्यामुळें नुकसान झाल्याशिवायहि रहाणार नाहीं ! यास्तव आतां भीडमूर्वतीस फांटा देऊन या व्यसनाच्या प्रतिबंधनार्थ कडक उपाय योजणें अत्यावश्यक आहे.

दारुड्यावर, प्रथम घरांतील मंडळीनें, नंतर नात्यागोत्यांतील लोकांनीं, ग्रामबंधूंनीं, समाजानें व धर्मगुरूंनीं कडक बहिष्कार टाकला पाहिजे. तरच कांहीं तरी उपयोग होण्यासारखा आहे. त्याशिवाय प्रथम चोरट्या रीतीनें समाजांत रिघाव करून घेणारी व आतां प्रतिष्ठितपणा मिळविण्याचा प्रयत्न करणारी ही मदिरा राक्षसी येथून कायमचें काळें करण्यास धजणार नाहीं !

दारूमुळें आमच्या हातांतील उच्चाधिकार जात आहेत.

दारूमुळें गोव्यांतील उच्च दर्जाचीं डोकीं पाषाणी बनत चाललीं आहेत !

दारूमुळें गोमांतकीय बुद्धीचा लय होऊं लागला आहे !

दारूमुळें नीति बिघडत चालली आहे !

दारूमुळें समाज अधोगतीप्रत चालला आहे !

वेडे व दारूडे यांत मुळींच अंतर नाहीं.

वर्तमान सार

—सांखळी [गोवा] येथील श्रीमंत सरदार भाऊसाहेब राणे सरदेसाई यांच्या कृपाछत्राखालीं चाललेल्या श्रीभवानी विद्यालयाचा शारदोत्सव पुढील कार्यक्रमानें पार पडला. ता. १७ रोजीं सकाळीं विद्यालयांतील सर्व विद्यार्थ्यांनीं एकत्रित जमून श्रीभवानी देवीची पूजाअर्चा, नैवेद्य, आरती वगैरे. सायंकाळीं विद्यार्थ्यांची कवाईत, संवाद, व्यायामाचे निरनिराळे प्रकार, लेझीम, नमस्कार, आसनें वगैरे. नंतर मालवणचे श्रीयुत गंगाधर कृष्णाजी राऊत, श्री. बोडके व श्री. शिरोडकर यांचीं भाषणें. दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं विद्यार्थ्यांनीं एक प्रहसन करून दाखविल्यावर कुमारी चंपा दि. दुभाषी इचें व श्री. दीपा दुभाषी व श्री. राऊत यांचीं भाषणें झालीं. तिसऱ्या दिवशीं विद्यार्थ्यांचा कार्यक्रम भजन, आरत्या वगैरे. चौथ्या दिवशीं (विजयादशमीं) सकाळीं शिवाजीच्या फोटोची मिरवणूक काढण्यांत येऊन, ती शहरांतून परत विद्यालयांत येतांच कुमारी चंपा दुभाषी इचें स्वागतपर भाषण व श्री. राऊत यांचें व्याख्यान झालें.

—सालाबादप्रमाणें गेल्या विजयादशमीच्या सुमुहुर्तावर सांखळी येथील 'आत्मोद्धार सन्मित्र संघा'च्या वाचनालयाचा ५ वा वार्षिकोत्सव मालवण कॉ. कमिटीचे सेक्रेटरी रा. गंगाधरराव राऊत यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला.

—पणजी येथील मुष्टिफंड संस्थेच्या दोहीं विद्यालयांत प्रतिवर्षाप्रमाणें यंदांहि श्री शारदोत्सव साजरा होऊन संस्थेच्या २३ व्या वाढदिवसानिमित्त होणारा बालोत्सव व जाहीरसमारंभ श्रीमहालक्ष्मीच्या सभामंटपांत गोमांतकाच्या परिचयाचे रा. सगुण आत्माराम मोये यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें पार पडला.

—मुष्टिफंडसंस्थेच्या श्रीसरस्वती माजी विद्यार्थी संघाच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ काल रोजीं सकाळीं ८ वाजल्यापासून कार्यक्रमास श्रीमहालक्ष्मीदेवालयाच्या सभामंडपांत सुरवात होऊन संध्याकाळीं ५ वाजतां त्याच ठिकाणीं रा. शिवा फट्टू पै आंगले यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरविण्यांत आली. या प्रसंगीं रा. वि. स. खांडेकर यांचें 'संघ व तत्प्रीत्यर्थ युवकांचीं कर्तव्यें' या विषयावर व्याख्यान झालें.

—'नाचनोडें व हळदोणें ह्या उभय गावांतील सर्व जातींचे स्पृश्य व अस्पृश्य तरुणांनीं 'युवक संघ' ह्या नावांची संस्था स्थापन केली असून यंदांचा श्रीशारदोत्सव सदरील संघाकडून मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला.' असें रा. जयराम रा. धोंड चिटणीस युवकसंघ हे कळवितात.

—वेलिंग येथें नुकतीच स्थापन झालेल्या श्रीशांतादुर्गा विद्यालयांत गेल्याच्या मागील शनिवारीं ता. १७–१०–३१ रोजीं सरस्वत्युत्सव मोठ्या थाटानें साजरा झाला. पहिल्या दिवशीं रात्रौ मुलांचें गाणें वगैरे झालें. दुसऱ्या दिवशीं ह. भ. प. लक्ष्मणबुवा जोग यांचें सुश्राव्य कीर्तन झालें. तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं मुलांचें 'शिक्षणाचें ध्येय' यावर गाणें झालें. व विद्यालयाचे शिक्षक, रा. पांडुरंग गुणाजी वेलिंगकर यांचें भाषण होऊन उत्सव समाप्त झाला.

—धी गोवा हिंदु असोसिएशन–मुंबई, या संस्थेनें यंदाच्या [१९३२] मॅट्रीक्युलेशनच्या परीक्षेंत गोमांतकीय हिंदु विद्यार्थ्यांत सर्वांत जास्त मार्क मिळवून पहिल्या पन्नासांत येणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यास संस्थेच्या 'एज्युकेशन फंडा'तून ५० रुपयांचें बक्षीस देण्याचें ठरविलें आहे. वरील प्रमाणें कोणीहि गोमांतकीय हिंदु विद्यार्थी यशस्वी न झाल्यास तें बक्षीस धी. एच्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत जास्त मार्क मिळवून यशस्वी होणाऱ्या गोमांतकीय हिंदु विद्यार्थ्यास दिलें जाईल. विशेष माहितीकरितां, चिटणीस, धी गोवा हिंदु असोसिएशन, मोतीलाल बिल्डिंग, त्रिभुवनरोड मुंबई नं. ४ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

—सालाबादप्रमाणें पेडणेंकर गौडसारस्वत ब्राह्मण समाज–विद्यालयांत शारदोत्सव ता. १६।१०।३१ ते २०।१०।३१ पर्यंत साजरा झाला.

—गेल्या रविवारीं गोवा–मजूरसंघाची बाणावली येथें सभा भरून कित्येक वक्त्यांचीं भाषणें झालीं. जागच्या जागीं २७ नवे सभासद झाले. येती सभा मडगांव येथें येत्या सोमवारीं भरणार आहे.

—पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें मडगांव येथील श्रीसरस्वती सेवक मंडळाचा श्री शारदोत्सव तेथील श्रीदामोदर विद्याभुवनांत, यशस्वी रीतीनें पार पडला. रा. पाध्ये, इतिहास संशोधक दत्तोपंत वामन पोतदार, पुंडलीक वामन विर्जिनकर, दत्तोपंत दलाल,

Anuncios

O BHARAT, ano XVI no 31 de 5 de Novembro de 1931.

Pelo juizo de direito da comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas, vão á praça para venda em hasta publica, á porta do tribunal desta comarca, no dia 6 de Novembro proximo, pelas 10 horas, pela primeira vez e por maior lanço que se oferecer acima da sua avaliação os seguintes bens: Predio rustico denominado "Camaragoracodil gongnichem tican, da cultura de coqueiros, mangueiras e outras árvores, sito em Agonda, descrito na conservatoria desta comarca, sob o n ° 1840 afls 10 do livro B 8: -1/4 da varzea denominado Bamorquerem, consistente em terra da cultura de arroz, sito em Palolem, descrito na conservatoria desta comarca, sob o n ° 3524 afl 240 v. do livro B. 3 velho, e 1/2 da varzea denominada Choucoti patencuchi, consistente em terra de semeadura de arroz, sito em Nagorcem, discrito na conservatoria desta comarca sob o n ° 3525 afl. 241 v. do aludido livro B 3 velho, avaliados respectivamente por 150:00:00; 1200:00;00; e 600:00;00, e penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Santana Vás de Cuncolim promove contra Romem, viuva de Babú Balsú Naique, residente em Bali e outros. O arrematante pagará a contribuição de registo por titulo oneroso e as despezas da praça, nos termos de lei. São por este citados todos credores certos e incertos dos mesmos executados bem assim os co-proprietarios e quinhoeiros para deduzirem seus direitos nos termos e para os efeitos da lei: São tambem citados para os mesmos fins os representantes dos seguintes credores falecidos. Visnum Naraina Sinai, casado, proprietario de Nagorcem, a cujo favor pesa uma hipoteca no livro C 11 afl 39 v. sob a inscrição n ° 3794 registada em oito de Julho de 1910 á segurança da quantia de 150 rupias, mais uma hipoteca a favor do mesmo Visnum, no dito livro C 11 afl. 40 sob a inscrição n ° 3795 registada em 8 de Julho de 1910 á segurança da quantia de 99 rupias Vamona Naraina Sinai Sancou por outro nome Vamona Sinai Sancou, casado proprietario de Cuncolim, a cujo favor pesa o onus real de consignação de rendimentos no livro F. 3 afl 147 sob a inscrição n ° 1801, registada em 21 de Dezembro de 1907, em compensação e por conta de juros á razão de cinco por cento ao ano da quantia de 350 rupias, que receberam por emprestimo obrigando-se a restituil-a depois de decorrer um ano e dentro de nove anos a contar de vinte e seis de Novembro de 1907. A referida consignação lhe foi feita por Vitobá Balsú Naique, sua mulher Malcuma, Rogunata Balsú Naique, sua mulher Dulú e Banú Balsú Naique e sua mulher Romem, proprietarios de Agonda. Para ser publico se expediu êste. Quepem, 16 de Outubro de 1931.

O escrivão do 1 ° oficio

Joaquim Anselmo Caraciolo Viegas

Verifiquei a exatidão

O juiz

Raul A. Correia

Pelo juizo de direito da comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas vão á praça para venda em hasta publica a porta do tribunal desta comarca, no dia 24 de Novembro proximo, pelas 10 horas, pela 1a. vez e por maior lanço que se oferecer acima da sua avaliação os seguintes bens, penhorados nos autos civeis de execução hipotecaria administrativa que o Colre da Fabri a da Igreja de Paroda, promove contra Utoma Essó Rauto e outros de Assoldá, de Quepem;— 1/28 do predio "Vaingone" da cultura de arroz, sito em Assoldá, descrito na conservatoria do registo Predial desta comarca sob o n ° 6283 afl—142 do livro B 19, avaliado por 250 rupias;— 1/28 do predio "Bentcantor" sito na dita, da cultura de arroz, descrito na dita conservatoria sob o n °. 6284 afl—142 v. do livro B. 19, avaliado por 100 rupias;— 1/8 do predio da várzea "Dac tevery" cultivada para arroz, no sorodio e vangana, sito em Molcornem descrito na dita conservatoria sob o n ° 2163 afl—174 do livro B 8 avaliado por 75 rupias;— 1/20 do predio da varzea denominado "Carotolem, consistente em terra de semeadura de arroz, sito em Assoldá, descrito na dita conservatoria sob o n ° 1226 afl—26 v. do livro B 2 velho, avaliado por 150 rupias;— O arrematante pagará a contribuição de registo por titulo oneroso e as despezas da praça nos termos da lei: São por este citados todos os credores certos e incertos dos mesmos executados bem como os co-proprietarios e quinhoeiros, para deduzirem seus direitos, nos termos da lei. São tambem citados para os mesmos fins os representantes dos seguintes credores falecidos: Gopica Rautina por outro nome Sorosoti, viuva de Loximona Gingú Rauto Dessai, proprietaria de Assoldá, a cujo favor pesa o usufruto no livro F n ° 5 afl.-21 v. sob a inscrição n ° 2865, registada em 14 de Maio de 1918, Zaiu Rautina, viuva de Putú Govinda Rauto Dessai, proprietario de Assoldá a cujo favor pesa o usufruto no livro F. n ° 5 afl—135 v. sob a inscrição n ° 3345, registada em 11 de Dezembro de 1925. Bogvonta Porobo Chimulcar, casado, proprietario de Cuncolim a cujo favor pesa uma hipoteca no livro C n °. 14 afl—183 sob a inscrição n ° 6037, registada em 10 de Junho de 1920 á segurança da quantia de 800 rupias;— Antá Sinai Cuncoliencar, casado, proprietario de Sirvoi, a cujo favor pesa uma hipoteca no livro C 2 [...]lho a folhas 18 sob a inscr[...] n ° 1992 registada em 9 [...] Setembro de 1874, constit[...] por Ambagi Atmarama S[...] Talvodcar, casado, propri[...]rio da mesma, á segurança [...] quantia de 210 xerafins [...] prata. Inacio Rosario Sant[...] de Siqueira Nazareth, me[...] cirurgião, casado, proprieta[...] morador em Noua-Gôa, a [...]jo favor pesa uma hipotec[...] livro C n ° 3 afl—109 so[...] inscrição n ° 563, registada [...] 24 de Janeiro de 1888 co[...]tuida por Vinaeca Balcus[...] Sinai Candiaparcar e [...]lher Loximin Sinai[...] proprietarios e moradores [...] Cumbarjua, á segurança [...] quantia de 1070 rupias, [...] juros;— Antá Sinai Murc[...] casado, proprietario de Mar[...] a cujo favor pesa uma hipo[...] no livro C n ° 1 velho afl [...] sob a inscrição n ° 412 re[...]tada em um de Dezembro [...] 1868, constituida por [...] Govinda Rauto Dessai [...] outro nome Mesnó Gov[...] Rauto, casado, propriet[...] morador em Assoldá, á se[...]rança da quantia de 2000 [...] rupias em prata.

Para ser público se exp[...] este. Quepem 28 de Out[...] de 1931.

O escrivão do 1 ° oficio

Joaquim Anselmo Carac[...] Viegas

Verifiquei a exatidão

O juiz de direito

Raul A. Correia

वर्ष १६ वें. अंक ३१
[गुरु]वार ता. ५ नव्हेंबर सन १९३१

वर्गणीचे दर
ा ट. ख. सह ३ रु. [आगाऊ]
किरकोळ अंकास १ आणा.

[जाहि]रातीचे दर– समक्ष अगर पत्रद्वारे.
[आगा]ऊ पैसे आल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाहीं.

संपादक व मालक
[ग]ो. पु. हेगडे देसाई– फार्मासेवतिकु
मुद्रण व प्रकाशन भारत–प्रेस कुसमण केपें गोवा.

भारत
O BHARAT

Ano 16 Nº 31
QUINTA FEIRA 5 de Novembro 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPE

भारत

जनसवा ही ईश्वर सेवा।
यावीण दुसरा धर्म न ठावा॥

गुरुवार, आश्विन व. १० मी शके १८५३

समय ठेपला नाहीं काय ?

——×——

गेल्या रविवारीं गोमांतकांत ठिकठिकाणीं मुनिसिपाल निवडणुका सुरू होऊन, त्या एव्हांशा संपल्याहि असतील. 'स्थानिक स्वराज्या'च्या या संस्थांची निवडणूक कितपत लोकमत निदर्शणारी असते यद्विषयीं विचार करण्याला अर्थात प्रस्तुतचा समय योग्य असल्यानें, त्याचा फायदा घेणें अनाठाईं होणार नाहीं.

गोमांतकीय नगरपालिकांना सरकारी सभासदांचा संपर्क नसतो. लोकांनींच स्वखुषीनें निवडून दिलेल्या गणंगांचा त्यांत समावेश होतो. ह्मणजे त्या निवळ लोकांच्याच संस्था आहेत, असें ह्मणण्यास कसलाच प्रत्यवाय नाहीं. आपल्या पसतीप्रमाणें मतदारानीं सभासदांची मालिका निश्चित करावयाची व त्यांना निवडून द्यावयाचें. सरकारचा त्यांत कोणताच 'उघड' संबंध नसतो. 'उघड' ह्मणण्याचें कारण हेंच कीं, एखादे वेळीं कांहीं लोकपक्षीय सभासद सरकारचे नावडते असले तर सरकार आपल्या राजकारणाला अडथळा उत्पन्न होऊं नये ह्मणून बाहेरून लोकपक्षीय पण खरोखर सरकारजमा सभासदांची निवड होण्याप्रीत्यर्थ 'आंतून' प्रयत्न करीत असतं. पण सरकारचे हे डाव नेहमींच यशस्वी होत असतात, असें मात्र नाहीं. असो.

नगरपालिकांचें उपरोक्त उदार स्वरूप पोर्तुगेजांच्या कितीहि उदात्त हेतूचें दर्शक असलें, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र तें सुपरिणामीं झालेलें दिसून येत नाहीं. दोन प्र[illegible] नगरपालिकांचें अस्तित्व व्हावें तितकें लोकहितकारी होत नसतें. सर्वसाधारण मतदारवर्गाची मुनिसिपल कारभाराविषयीं अज्ञानोत्पन्न उदासीनता व अधिकार क्षेत्राचें आकुंचन हीं तीं दोन कारणें होत. आणि पहिलें कारण मतदार वर्ग स्वार्थपरायण चळवळ्यांच्या सहज पचनीं पडण्यास वाव देत असतें, तर दुसरें नावांपुरत्या 'सौभाग्या'पेक्षां नगरपालिकांना विशेष कांहीं प्राप्त होऊं नये एतदर्थ सतत झटत असतें.

बहुसंख्य मतदारांना मतदारीचें महत्व समजत नसतें, हें सत्य गुप्त ठेवण्यांत हंशील नाहीं. मताधिकार बजावण्याचे बाबतींत त्याला स्वताचें मत नसतें. केवळ 'फलाण्या' गृहस्थाची भीड ह्मणून तो त्याच्या इच्छेनुसार मत देण्यास—व्होत उर्नीत टाकण्यास—पुढें येत असतो. त्याच्या बऱ्या वाईट परिणामाची त्याला बिलकूल पर्वा नसते. यावरून मुनिसिपल निवडणुकांत मतदारांचें मत प्रकट होण्याऐवजीं 'फलाण्या फलाण्या' चळवळ्यांचेंच कारस्थान कसें यशस्वी होत असतें, याची जाणीव वाचकांना होईल.

अधिकार क्षेत्राच्या दृष्टीनें, मुनिसिपाल्ट्यांचें 'जिर्णे' जवळ जवळ अजागळ स्थनवत् आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. किरकोळ रस्त्यांची साफसुफी व कांहीं प्रसंगीं नूतन मार्गाची अल्पखर्ची रचना यांपलिकडे त्यांचे अधिकार क्षेत्र जात नाहीं. स्थानिक स्वराज्याला साजेशा सुधारणा घडवून आणण्याचें सामर्थ्य सरकारनें त्यांच्यांत ठेवलेलें नाहीं. मतदारांची उदासीनता व मुनिसिपल अधिकार क्षेत्राचें आकुंचन, या दोन्हीं कारणामुळें, नगरपालिकांचें अस्तित्व लोकहितकारी कसें होत नाहीं हें तर सिद्ध झालेंच. उलट तें लोकहितविघातक कसें होत असतें हें आतां पाहूं.

नगरपालिकांच्या निवडणुकांत लोकमतांचें प्राबल्य नांदत नसून अवघ्या चळवळ्यांचेंच 'आक्रमण' कसें थैमान घालीत असतें, हें मागें नमूद झालेंच आहे. कांहीं अपवाद खेरीज करून, हे चळवळी लोक सरकारी दरबारांत आपला वेडेजाव मिरवण्यासाठीं, निवडणुकांचे जनक बनत असतात व इतके इतकें मतदार लोक आपल्या कह्यांत असल्याचें सांगून, ते सरकारकडू[न] स्वहित साधीत असतात. आणि आपल्या बऱ्या वाईट कारभारास लोकमताचा पाठिंबा आहे, हें भासवण्यास सरकारलाहि अशा लाळघोट्या व स्वार्थी लोकांचा मनमुराद उपयोग होत असल्यानें, त्यांना खुषी ठेवण्यांत सरकारलाहि समाधानच वाटत असल्यास आश्चर्य नाहीं.

एखाद्या वरिष्ट अधिकाऱ्याचें स्थान डळमळीत झाल्यास तें मजबूत करण्यास, लोकांच्या नावानें चहापार्टीचा फन्ना उडवण्यास, जनतेच्या नावानें आपला उदोउदो करून घेण्यास, एकतंत्री धोरणास लोकमताचा आधार आहे, असें सुचवण्यास—— वगैरे वगैरे 'पोलिसी'च्या कामीं निवडणुकांच्या जनकांचा सरकारला महत्वपूर्ण फायदा होत असतो.

जोंपर्यंत आमच्या नगरपालिकांत उपरोलेखित दोष हैदोस घालीत आहेत; जोंपर्यंत सदर दोषांमुळें त्यांचें अस्तित्व लोकहिताला पोषक होण्याऐवजीं उलट विरोधक होऊन सरकारच्याच फायद्याचें होत असतें; आणि जोंपर्यंत मतदारीचें महत्व सर्वसाधारण मतदारवर्गाच्या गळ्यांत उतरलेलें नाहीं, तोंपर्यंत त्या संस्था असल्या काय किंवा नसल्या काय, त्यांच्या निवडणुका झाल्या काय किंवा न झाल्या काय, आणि त्यांत लोकांनीं भाग घेतला काय किंवा न घेतला काय—एकच. या एकंदर परिस्थितीचा आस्थापूर्वक विचार करण्याचा समय ठेपला नाहीं काय ?

इतस्ततः

पोर्तुगालची अंतःस्थिति दिवसें दिवस विकटच होत असल्याच्या वदंता सेनमधील पत्रांतून प्रसृत होत आहेत. दितादुरांची सूत्रें ज्या एकतंत्री राजकीय पक्षाच्या हातांत आहेत, त्याच पक्षांत दुही बोकाळली असून, तिचा अनिष्ट परिणाम राष्ट्राला भोंवल्या विना राहणार नाहीं, असा लोकांचा तर्क आहे. शेजारच्या स्पेन देशांत झालेल्या क्रांतीनेंहि पोर्तुगेज जनतेंत मतांतर घडवून आणलें असून, त्याचा स्फोट केव्हां व कसा विद्यमान अधिकाऱ्यांना बाधक होईल हेंहि सांगवत नाहीं. एवंच, पोर्तुगालांत शांततादेवी केव्हां अधिष्ठित होईल, हें एक परमेश्वरच जाणे !

× × ×

गोवा–मजूर संघानें ज्या धडाडीनें आपलें प्रचारकार्य चालविलें आहे, ती धडाडी चिकाटीच्या भक्कम पायावर उभारली गेली असल्यानें संघाच्या अभ्युदयाला कारणीभूत होईल, हें उघड होय. संघाची रीतसर स्थापना झाल्यास अवघा दोन महिन्यांचा अवधि लोटला. या अल्प कालांत त्याच्या मार्फत फिरत्या व्याख्यानमालेचा उपक्रम व मजूर वाचनालयाची संस्थापना हीं दोन लोकजागृतीचीं अत्यंत महत्वाचीं कार्यें पार पडलीं. तांदुळांच्या करवाढीविरुद्ध बजावलेल्या महत्वपूर्ण कामगिरीमुळें तर संघाबद्दल मजुरांत आपुलकीची भावना वृद्धिंगत होत असून, संघ लवकरच कार्यक्षम होईल, अशी खात्री वाटूं लागली आहे.

\+ × +

किर्लोस्कर मासिकाचा दिवाळी अंक प्रसिद्ध झाला असून त्याची सजावट त्याच्या आजपर्यंतच्या लौकिकास साजेशीच झाली आहे. महाराष्ट्र साहित्याची व महाराष्ट्रीय समाजाची किर्लोस्कर मासिकानें बजावलेली सेवा इतिहासांत सुवर्णाक्षरानें नोंदून ठेवण्याच्या योग्यतेची आहे. 'उच्च ध्येय, सततोद्योग, दुर्दमनीय उत्साह, आत्मोन्नतीची हांव व आशावादीपणा मिसळा व रोज घ्या' हा सदर दिवाळी अंकाचा महाराष्ट्रीयांना संदेश आहे. हें 'प्रिस्क्रिप्शन' नित्य उपयोगांत आणलें गेल्यास महाराष्ट्राचें दैन्य विलयास जाऊन वैभवगिरीवर विलसण्यास त्याला विलंब लागणार नाहीं. उपरोक्त दिवाळी अंकांत इतर गोष्टींबरोबरच मनोरंजक मुख्य सचित्र गोष्टी, हृदयस्पर्शी कविता, उत्साहवर्धक लेख इ. विषय आल्यानें एकदां हातांत घेतलेला अंक संपूर्ण वाचल्याविना खालीं ठेववत नाहीं. दिवाळी अंकाची इतकी सुंदर सजावट साधल्याबद्दल आह्मी मासिकाचे पराक्रमी संपादक व उपसंपादक रा. शं. वा. किर्लोस्कर व रा. ना. धों. ताह्मनकर या उभयतांचेंहि हार्दिक अभिनंदन करून, मासिकाचें वाढतें वै.

Ecos-e-Critica

Recapitulando...

O governo do sr. Craveiro Lopes, auxiliado pelo sr. Bernardino da Costa, representante dos grandes proprietarios, açambarcadores do arroz, pelo sr. Adolfo Costa, representante dos descendentes dos europeus, classe burocratizada e alimentada exclusivamente pelos cofres publicos, pelo sr. Padre Castilho de Noronha, representante da Igreja catolica que é aqui a principal auxiliar do colonialismo portuguas, e por todos os altos funcionarios que teem assento no Conselho do Governo, ajudado por todos estes, encareceu, arbitrariamente, o arroz, o principal e quasi unico alimento da grande maioria da população pobre de Goa.

Fez isso precisamente no momento em que os salarios da classe trabalhadora estão sendo diminuidos e que ela se acha reduzida á penuria por falta de trabalho remunerador.

Fez isso precisamente quando centenas de desempregados voltam do estrangeiro e se acham incapazes de ganhar e auxiliar os seus que aqui ficavam.

Fez isso no momento preciso em que, por lei, o proprio governo procurou garantir aos altos funcionarios os seus vencimentos escandalosamente incompativeis com a pobresa do pais.

E não parou aqui. Anulou as arrematações de certas comunidades num momento improprio, na época em que os semeadores costumam preparar as suas varzeas, fazem a primeira lavoira, levantam os comoros e arrancam as plantas nocivas, trabalhos estes que não sendo feitos em tempo prejudicam muito a produção do arroz, tão penosamente cultivado pelos nossos agricultores.

Tornar caro o pão do nosso povo por meio dum imposto odioso e cruel e reduzir a produção cerealifera, já em si deficitaria, para enriquecer os grandes proprietarios e a alta burocracia, eis a grande obra de fomento do governo e dos seus aulicos.

¿Até quando se abusará, desta forma, da docilidade e da paciencia deste povo ?

S. O. G.

S. O. G.

Foi instalado, em 29 do mez findo, em Margão o "Gabinete de leitura S. O. G." da *Sociedade dos Operarios*. A' reunião da instalação presidiu o sr. dr. Caitano Vás, ilustre administrador substituto do Concelho de Salsete em exercicio. Além do sr. dr. Vás a quem, na ocasião, a menina Mariquinha P. Coutinho, filha do operario J. Coutinho, ofereceu um *bonquet* de flores, falaram o nosso director e o sr Roque Pereira, presidente da Direcção da S. O. G.

Na reunião de propaganda promovida pela *Sociedade*, no dia 2 do corrente, em Mungul, de Margão, falaram, além do nosso director, os srs. R. A. Pereira, J. F. Fernandes, F. Fernandes, Alberto da L. Fernandes e F. X. F. de Lord. A seguinte reunião realisa-se em Cortalim, no proximo domingo.

Como "circus"

Rumoreja se que se vai estabelecer uma taxa de 12 ou 6 reis sôbre cada pessôa que fôr visitar ou beijar o corpo de S. F. Xavier, por ocasião da proxima Exposição.

Como estamos no regimen de taxas e sobretaxas, pode bem ter visos da verdade o boato. E nesta provavel hipotese, é caso para a gente dizer que o corpo do santo deixou de ser *santo* para ter fôros dalguma *exquesitice* que se explora a dinheiro, á maneira daquelas celebres *gêmeas* que, cá, apareceram, uma vez. A curiosidade de admirar o fenomeno só podia ser satisfeita a tantos *poiçás*... como *circus*.

"O Gulistan"

O Gulistan ou *O Defensor do Povo Goano*, semanario concanim, de Bombaim, acaba de festejar mais um aniversario de sua fundação.

Os serviços que êsse periodico tem prestado á causa dos emigrantes e aos interesses da nossa terra e da nossa gente, são de incontestavel valor.

Desde o novo ano de sua publicação, o *Gulistan* alargou a sua esfera jornalistica com secção portuguesa, o que bem patentêa o acrisolado patriotismo dos seus redactores que-rerem bem defender o Povo de Gôa.

Longa dura e muitas prosperidades almeja nos ao nosso colega— *ab imo pectore.*

"O 19 de Junho"

Este brilhante semanario que se publica na Beira (Africa), sob a patriotica direcção do distincto jornalista sr. dr. Severo de Figueiredo, entrou no terceiro ano de sua publicação.

O artigo *A razoira da dignidade*, inserto na nossa edição d'hoje, foi transcrito do mesmo jornal, artigo que põe em evidencia a invulgar coragem moral com que o nosso confrade africano, fiel á sua divisa— *Em prol da Humanidade e do Direito*—, está defendendo a justiça das causa justas.

Felicitando-o cordealment o *Bharat* deseja ao ilustre co lega prosperidades—*ad multo anos.*

So' isto

Tudo está barato. O preç de arroz, a-despeito da sobr taxa de equilibrio, não sóbe; côco, a-pesar das *negociaçõ* entre os Governos de Maca e India, não se valorisa.

¿ Porque é que, nessas con dições, os vencimentos dos fu cionarios hão de manter-se r tractarios á influência da cri economica que nos avassala ?

E ¿ porque é que, tambe o preço do papel selado, exce sivamente elevado nos ultim tempos, há de permanecer *statu quo* ?

Sim; para que o pais po resistir, é mister que tanto vencimentos dos funcionar como o preço do papel sel se reduzam ás proporções co pativeis com a crise. Só is é que pode salvar o Paiz.

O BHARAT

Ficamos obrigados a red zir um pouco a materia presente edição por causa *influenza* que, de súbito, atac o nosso pessoal. Esperam que os nossos cooperadores n nos levarão a mal esta fal aliás involuntaria.

Anuncia-se novamente arrematação das avenças receita trienal, para o trien da 1932 a 1934, da comunida de Sirvoi, para o dia 15 corrente mez, ás 10 horas, n casas de sessões da dita com nidade; visto as arremataçõ já realisadas terem sido an ladas em virtude do dispos no artigo 7.º do Diploma L gislativo n.º 518 de 23 de O tubro ultimo e de ordem c cular da Administração de concelho n.º 357 de 26 dito Outubro. As ditas ave ças serão levadas á praça p cifra do calculo. Sirvoi, 2 Novembro de 1931.

O escrivão da comunidad
Esvonta Butó Sinai Regó

Igual ao monturo, por ai fica, por esse mundo fóra, envergonhando progenitores, deshonrando descendencias, sem ouvidos para conselhos, sem brios para uma revolta, chupa por inconsciente da borda da razoira, dos pingues patacos com que doira o estomago, em ar de festa, empolgando o gastrico e o pancreatico, creando adiposidades, lustrando as divisas...

A razoira da dignidade ! E assim se passa na vida, pode vender-se o patrimonio, perverter se a administração, cair o mundo, desiquilibrado, que, ao menos, certos pandegos comeram e beberam, arrotaram e dormiram...

Para eles, a razoira é insensivel... e talvez não os sacie...!

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा॥

गुरुवार, कार्तिक शु. ३ या शके १८५३

श्रीगोमाता विजयते !



महंत चैंडिमहाराज यांच्या सात्विक प्रेरणेनें प्रचारांत आलेला गोरक्षण सप्ताहाचा स्तुत्य उपक्रम हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान राष्ट्राला किती उपकारक आहे, हें आज कोणास नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. गोमातेचा शेतकीसंवर्धन व बालसंगोपन या उभय कार्याशीं तसेंच एकंदर मानवी अस्तित्वाशीं किती निकट आत्मियत्व आहे, याची ज्यांना पूर्ण जाणीव झालेली आहे त्यांच्या तोंडून गोरक्षण सप्ताहाच्या पवित्र पायंड्याबद्दल महाराजांविषयीं धन्यवादच निघत आहेत. आणि हे धन्यवादच सप्ताहाच्या वाढत्या वैभवाच्या बुडाशीं आहेत, यांत किमपिहि संदेह नाहीं.

प्रस्तुत आठवडा हा गोरक्षण सप्ताहाचा आहे. या आठवड्यांत प्रत्येक हिंदु कुटुंबानें गोरक्षणाची निर्विवाद उपयुक्तता ध्यानांत आणून कोणत्या ना कोणत्या स्वरूपानें जगाची जननी अशी जी गोमाता तिच्या निस्सीम सेवेंत काळ घालणें उचित आहे. गोरक्षण–सप्ताहाशीं सहकार्य न करणारा नर गोमातेशीं कृतघ्न ठरून नरकाच्या साधनास पात्र होईल, हें उघड होय.

गोमाता आहे ह्मणून शेतकीसंवर्धन होत आहे; बाळगोपाळांना दूधदुभतें लाभत आहे; शेतकी–संवर्धन होत आहे ह्मणून आह्मांस मोठ्या वयांत अन्न मिळून आमच्या प्राणांचें संरक्षण होत आहे. अर्थात गोमातेवरच मानवी अस्तित्व कसें अवलंबून आहे, याची साक्ष चटदिशीं मनाला पटते. व गोमाता आहे ह्मणून जर आह्मीं मानव प्राणी व आमचीं मुलेंबाळें जीवंत आहोंत तर आमचे 'सबसे प्यारे' प्राण संरक्षणाऱ्या, आमच्या तान्हुल्यांना ताकत देणाऱ्या व आमचें आयुष्य सुखकारक करणाऱ्या त्या आद्य जननीशीं सतत कृतज्ञ असणें आमचें पवित्रतम कर्तव्य सिद्ध होत नाहीं काय? सिद्ध होतें यांत दुमत असणें संभवनीय नाहीं.

प्रापंचिक पसाऱ्याच्या चिंतनेनें सर्वस्वी गोसेवेस वाहून घेतलेल्या गोभक्तांच्या यादींत सर्वांनाच आपला समावेश करवणें अशक्य असलें तरी दर वर्षी सप्ताहानिमित्त कांहीं दिवस, निदान कांहीं तास, गोपूजनानें व गोभजनानें गोमातेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणें सर्वांस साध्य आहे. या सुसंधीकडे कानाडोळा करणें ह्मणजे मानवता निर्दयतेनें लाथाडणें होय, हें कोणीहि मान्य करील. असो.

प्रत्येक गोपाडव्याच्या मंगल दिवशीं भक्तिपुरस्सर गोपूजा करण्याचा परिपाठ आह्मीं पाळलाच आहे. आणि गोरक्षण चळवळीचे पराक्रमी नेते महंत चैंडे महाराज यांच्या आज्ञेनुरूप प्रस्तुत लेख आह्मीं लिहिला आहे. हेतु हा कीं, महाराजांनीं हातांत घेतलेलें खरें राष्ट्रोद्धारक कार्य यशस्वी होऊन, आमचा हिंदुस्थान देश सुसंपन्न व्हावा; पाषाणहृदयी पाप्यांकडून होत असलेल्या गोवधाला कायमचा आळा बसावा; दिवसेंदिवस घटत जात असलेली गोसंख्या वर्धन पावावी व भरपूर दूधदुभत्याच्या अभावीं मृत्युमुखीं पडणाऱ्या बालकांच्या अगणित संख्येनें पूर्णविराम ह्मणावा; एवंच, गोरक्षणाच्या मार्गावरील सर्व अडचणी दूर होऊन गोमाता पुष्टतुष्ट व्हावी व राष्ट्र गतवैभव पुनरेव संपादन करण्यास समर्थ व्हावें. हा आमचा हेतु पावित्र्यानें ओथंबलेला आहे. राष्ट्रसूत्रधार महात्मा गांधी यांच्या सारख्या थोर विभूतींचा त्याला पाठिंबा आहे महर्षि टागोर यांच्या सारख्यांचा त्याला आशीर्वाद आहे. मग त्याच्या यशस्वितेबद्दल शंका बाळगण्यास कोण धजेल ?

श्रीगोपाळकृष्ण भगवानांस वंद्य असलेली जी गोमाता तिच्या रक्षणार्थ चाललेल्या चळवळींत परमेश्वराचें अधिष्ठान असलेंच पाहिजे. आणि अशी ही परमेश्वराची अधिष्ठान असलेली चळवळ अखेर सुफलदायी होऊन गोभंजनोत्पन्न दैन्य विलयास पावेल, अशी आमची दृढमूळ श्रद्धा आहे.

शेवटीं 'श्री गोमाता की जय' या जयजयकारांत हा लहानसा लेख आटोपता घेतों. श्री गोमाता की जय !

—गेल्या खेपच्या झेवियर–शव–प्रदर्शनाचे वेळीं प्रदर्शनाच्य तींत व्यापार करणाऱ्या, लोकांकडून सुमारें २८ हजार रुपये उत्पन्न आलें होतें. या खेपेला ८ हजारांपेक्षां जास्ती उत्पन्न अजून आलें नाहीं !

—गेल्या रविवारीं गोवा मजूर संघाची प्रचारक सभा कुडाळ येथें झाली. भारतकारासह अनेक गृहस्थांचीं समयोचित भाषणें झालीं.

—यंदांचा येथील स्थानिक श्रीलक्ष्मीपूजनोत्सव रा. वि. र. शिरवेकर यांच्या नेतृत्वाखालीं यथासांग साजरा झाला.

आमचीं सार्वजनिक कार्यें

ले.— निरीक्षक

भारतकार, पोट पाठीला एकसारखें हात धुवून लागलें असल्यानें व त्यांतच आर्थिक अनर्थांच्या आपत्तीनें पोटाचा प्रश्न पराकाष्ठेचा बिकट बनला असल्यानें, इतके दिवस आपली भेट घेतां आली नाहीं. पण ह्मटलें त्यांतल्या त्यांत वेळ शोधून आज आपलें दर्शन घ्यावेंच व कित्येक सार्वजनिक 'कोड्यां'चा खुलासा होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. मीं चळवळ्या नसलों, दे. भ. ही पवित्र पदवी माझ्या निनावीं नावांमागें झळकत नसली व सार्वजनिक बाबतींत मीं जवळ जवळ 'सोवळा'च असलों, तरी एक हिंदु नागरिक या नात्यानें सदर खुलासा करून घेण्याचा मला जन्मसिद्ध हक्क पोंचतो.

भारतकार, मडगांवच्या मराठी साहित्य संमेलनाचा रिपोर्ट हैद्राबाद येथें भरलेल्या अधिवेशनापूर्वी, निदान त्या दरम्यान, प्रसिद्ध होणार असल्याचें जाहीर झालें होतें. ठरीव मुदतींत तो उजेडांत न आल्याबद्दल भारतांतून एक तक्रार पत्र वाचल्याचेंहि मला आठवतें. ठरीव मुदतींत तर असोच पण आज तारीखपर्यंत त्याचा ठावठिकार नसावा हें, भारतकार, आश्चर्य नव्हे काय? आधींच गामांतकांत सार्वजनिक कामांविषयीं लोकांचीं मनें पराकाष्टेचीं साशंक. त्यांतच सार्वजनिक निधीचा निकटवर्ति संबंध असलेल्या मडगांव संमेलनाचा रिपोर्ट अजून प्रसिद्ध होत नसल्यानें लोक काय ह्मणत असतील याचा तर्क करणें कठीण नाहीं. मडगांवच्या संमेलनानें मराठीची सेवा कितपत बजावली आहे हा प्रश्न अजून सुटलेला नसला, तरी एक गोष्ट खरी कीं रिपोर्ट प्रकाशनाच्या दिरंगाईनें सार्वजनिक कार्यांविषयींची जनतेची साशंकता मात्र मनस्वी वर्धन पावली ! खरें सांगतों, भारतकार, ही गोष्ट फारच वाईट झाली. अहो, उद्यां एखाद्यानें फंडगुंडगिरीचें पुण्या–मुंबईचें विषारी वारें येथेंहि वाहूं लागल्याची कुरकुर केल्यास त्यावर हे संमेलनवाले काय तोडगा योजतील? बाकीच्या बऱ्याच बाबतींत महाराष्ट्र व गोमांतक यांचें एकीकरण फार दूर राहिलें असलें तरी फंडगुंडगिरींत मात्र उभयतांचाहि एकजीव होऊं लागलेला आहे, असें एखाद्या पृच्छकानें विधान केल्यास त्याला ते काय उत्तर देतील ?

यावरून, भारतकार, मीं एखाद्याविरुद्ध फंडगुंडगिरीचा आरोप करीत आहें, असें कोणीहि मानूं नये. तसें करण्याला माझ्यापाशीं पुरावा नाहीं. पण मसूर–ब्रह्मचर्याश्रमाच्या फंडासंबंधानें भलभलत्या दोषांचें दळण दळणाऱ्या या लोकांनीं स्वताच्या बाबतींत तरी लोकांचीं मनें बहकण्यास वाव ठेवावयास नको होता, इतकेंच माझें ह्मणणें आहे.

ही गोष्ट झाली संमेलनाची. मंडगां
सारस्वतसमाजाच्या स्वतंत्र इमारतीसाठी
उभारून कामकाजास प्रारंभ झाल्यास
रात्र काळ लोटला. इमारत पुरी
आली. पण अजून त्या फंडाचा हिशे
ठिशेब ! भारतकार, काय हें ? अशानें
र्वजनिक कामें अपमृत्यूला बळी पडत
ल्यास आह्मीं नाकें कां मुरडावीं ? व
पत्रें सुयंत्रित रीतीनें चालत नसल्याचा
लोकांच्याच माथीं कां मारावा ?

भारतकार, मीं उल्लेखिलेल्या उ
'कोड्यां'चा उलगडा होणें आवश्यक
तसें न झाल्यास यापुढें कोणतेंहि
निक कार्य यशस्वी होणें शक्य नाहीं
णाच्याहि मर्मस्थानीं घाव घालण्याच्य
हेतूनें हें मीं लिहिलेलें नाहीं. सार्वजनि
ताच्या गोष्टींत कांड्याखुंड्यांच्या कुंपणां
श्रय मिळूं नये इतकाच माझा प्रांज
देश आहे. भारतकार, तुह्मीं या
लिखाणास जागा देऊन, नेहमीं
मला आभारांत ठेवाल, अशी आशा
गून 'कोड्यां'च्या उलगड्याची उ
वाट पाहत स्वस्थ बसतों. उगाच
कां ?

इतस्तत

नवीन–गोवें येथें प्रसिद्ध होत
'वैश्य' मासिकाचे प्रथमचे ४।५ अंक
सदर नियतकालिकाचा जन्म केव
समाजाच्या उन्नतीसाठींच झालेल
अशी आमची समजूत झाली होती
तीच्या नावांखालीं सत्याच्या हत्तेनें
शिरजोरपणानें बेगडीचें सुवर्ण बन
हास्यास्पद आततायीपणापर्यंत '
जात्याभिमानाची मजल पोंचेल, अ
केव्हांच वाटलें नाहीं. पण त्याच्या
कांहीं अंकावरून व विशेषतः १०
कांतील 'विविध विचार' या सद
एस. गुडेकर यांच्या बाबतींत तोड
रांवरून व केलेल्या अकांडतांडवाव
मचा उपरोक्त समज साफ चुकी
असें खेदानें ह्मणावें लागतें. दुस
हित्य संपादन स्वतः अपात्र असतां
ह्मणून भासवून लोकांची दिशाभूल
च्या सदर गुडेकरांच्या दुष्ट प्रवृत्त
पडावा या सद्हेतूनें वैश्य समाजांत
गृहस्थानें 'एक फोंडेकर' या टोप
पत्रव्यवहार पाठविला व गुडेकरांच
लेखनविषयक पूर्वसिद्ध अपात्रता
निर्देशनास येतांच तो आह्मीं प्रसि
आर. एस. गुडेकरांत आज ना उ
साहित्य संपादण्याचें सामर्थ्य प्रग
अशी जर आमची अटकळ
तरमुद्दां तो पत्रव्यवहार आह्मीं

316

Ano XVI) Quinta-feira, 5 de Novembro de 1931 (N.º 31

O BHARAT

ANUNCIOS
Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

Não se aceita nenhum anuncio ou comunicado sem ser adiantado o seu custo provavel.

Jornal de maior circulação

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL
Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-08-00

REDAÇAO E ADMINISTRAÇAO
COMPOSIÇAO E IMPRESSAO
Tip *BHARAT* Ousmane-Quépém

A RASOIRA DA DIGNIDADE

Não sabemos qual a razão porque, em certa sociedade actual, se operaram estranhas modificações fisiologicas, mudando os orgãos da vitalidade animal em orgãos de sentimento, consciencia e raciocinio.

E muito menos sabemos os *porquês* do cataclismo moral de certas especies de bipedes-racionais, que tomam, como padrão de nobreza de vida e de dignidade de porte, o conchego do estomago, as exigencias da gastronomia.

Nós temos visto individuos de aparencia austera, com exigencias de genealogia e com obrigações de filhos, gente ilustre e conceituada, cabides de indumentaria reluzente de dragonas e com espadim a cinta, refulgente de douraduras, sofrerem os maximos vexames, as maiores vergonhas, suportarem as maiores baixezas, os maximos insultos, subservindo e amolgando-se, só pela ancia de viver as refeições, só com o fito da deglutinação, só com a paga de encher bandulhos.

शनिवारवाडा ह्मणजे पेशवाईची मूर्त साक्ष होय. हा वाडा आतां जीर्ण झाला असून आंतील प्राचीन अवशेष तेवढे शिल्लक आहेत. मुख्य दिल्लीदरवाजांतून आंत शिरल्याबरोबर उजव्या बाजूला एक नकाशा दिसतो. त्यावरून आंतील स्थानांची साधारणशी कल्पना होते. मध्यभागीं सदर बाजूला इतर खोल्या वगैरेंच्या भिंती जाऊन नुसता पाया शिल्लक राहिलेला आहे. या वाड्याचा महत्वाचा विशेष ह्मणजे तो सबंध पाण्यावरती आहे. वाड्याखालून 'आंबिलओढा" नावांचा पाण्याचा प्रवाह गेला असून वाड्यांत पाण्याची भरपूर सोय आहे. जागजागीं टाकी असून त्या शिवाय विहिरी आहेत. असें सांगतात कीं, या वाड्याखालून पर्वतीच्या देवळांत जाण्याचा रस्ता आहे. परंतु या रस्त्याचा शोध लागलेला नाहीं, असें वाड्यांतले कामकरी ह्मणाले. बहुतेक एखाद्या विहिरीच्या खालून हा रस्ता गेला असावा असा तर्क आहे. वाड्यांत अनेक तोट्यांचें एक कारंजें आहे. या कारंज्यावरच उडी टाकून सवाईमाधवरावांनीं आत्महत्त्या करून घेतली. कारंज्याच्या तोट्या आतां बुजविलेल्या आहेत.

पर्वतीचें स्थान फार रम्य प्रदेश आहे. हें स्थान एका टेकडीवर असल्यामुळें तेथें पोंचायाला बांधलेल्या १०८ पायऱ्या चढून जावें लागतें. असें सांगतात कीं, पहिले बाजीराव पेशवे यानां या टेकडीवर एका देवीची स्वयंभू मूर्ति सांपडली. ती पार्वतीची मूर्ति असल्यामुळें तिची तेथें स्थापना झाल्यावर टेकडीला पर्वती असें नांव पडलें. पार्वतीच्या देवालयाशिवाय येथें शंकर, गणपती, कार्तिकेय, श्रीविष्णु, श्रीसूर्यनारायण, श्रीविठ्ठल हीं देवालयें आहेत. श्रीविठ्ठलमंदिर दोन वर्षांपूर्वी बांधलें गेलें आहे. कार्तिक स्वामीच्या देवळांत बायका दर्शनाकीरतां जात नाहींत. पर्वतीच्या माथ्यावर जेथें श्रीविष्णूचें देऊळ आहे, तेथून पुण्याचा सर्व देखावा दिसतो.

शिंद्यांची छत्री पाहिल्यावर साधारणतः गोमांतकांतील देवालयांची आठवण होते. हें स्थान पुण्याच्या बाजूलाच वानवडी गांवीं असून तें ग्वाल्हेरचे कै. माधवराव शिंदे यांनीं महादजी शिंद्यांच्या स्मरणार्थ बांधलेलें आहे. आंतली शिंद्याचीं काळी भव्य मूर्ति पाहिल्यावर जणूं काय जीवंत महादजी शिंदेच गेलेली मराठेशाही परत काबीज करण्याच्या विचारांत आहेत असा क्षणभर भास होतो.

या छत्रीच्या भोंवतालचें वातावरण रमणीय असून त्याला मराठेशाहीची झांक मारते. समोरच्या पाराखालीं छाया पसरलेली असल्यामुंळ तेथें वाटसरू विसावा घेत बसलेले दिसतात. आणि तशांत जुन्या पद्धतीची मोठ्या बैलांची एखादी गाडी सामान घेऊन तेथें आली, कीं ते शृंगारलेले बैल व त्यांच्या गळ्यांतील घंटाचा नाद ऐकल्यावर आपल्या गतवैभवाची व साम्राज्याची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं.

चतुःश्रंगी हें देवालय पुण्याच्या वायव्य दिशेला असून तें एका स्वयंभू देवींचें आहे. हें देवालय पेशव्यानींच बांधलेलें असून येथें नवरात्रांत मोठी यात्रा भरते.

या देवळाच्या जरा पुढें गेल्यावर गणेशखिंड लागते. येथें गव्हर्नरचा बंगला असून उन्हाळ्यांत हवापालटीकरितां मुंबईचे गव्हर्नर या बंगल्यांत येऊन रहात असतात.

(चालू)

शंखासुराचा मशालजी.

[ले० श्री. रा. नगर्सेकर]

ज्यानीं काला पाहिलेला आहे ते शंखासुराच्या मशालजीला ओळखतच असतील. शंखासूर मत्स्यरूप घेऊन अगाध–थिएटर–सागरामध्यें ज्या बालिश व पोरकट लीला खेळत असतो त्या लीलांशीं, त्याच्याबेराबर असलेल्या मशालजीलाहि समरस व्हावें लागतें. शंखासुराच्या पाउलावर पाऊल ठेवून त्याच्याप्रमाणेंच मशालजीलाहि नाचणें व हातवोर करणें भाग असतें. या मशालजीप्रमाणेंच रजिदोरांचीहि आज अवस्था झालेली आहे. सरकारच्या विराट स्वरूपामध्यें कुठेंहि व कोणतीहि लहर उद्भवली कीं तिचा आघात रजिदोरावर झालाच ह्मणून समजावें. खेडेगावांतील अवघड ठिकाणीं एखाद्यावर हुकूमनामा बजावयाचा असल्यास न्यायालयांतून रजिदोराला आज्ञा; एखाद्याला पकडावयाचे असल्यास रजिदोराला आज्ञा; आरोग्यखात्यांतील कोणा भिषगवर्यांना संशोधनाची लहर आली कीं माकडाचीं पोरें धरून आणण्याला रजिदोराला आज्ञा; कोणाला कोंबडीं, डुकरें, गुरें, झाडें, माड इ. मोजण्याची लहर आली कीं सुटली रजिदोराला आज्ञा. अशा तऱ्हेनें हे सरकारच्या विराट स्वरूपाच्या अनेक मुखांतून, लहरीप्रमाणें सुटलेले हुकूम रजिदोरांना पाळावे लागतात. व हे हुकूम पाळण्यासाठीं त्याला जीव धोक्यांत घालून डोंगर चढावे लागतात; शेजाऱ्यांशीं द्रोह करावा लागतो ; माकडीचे खून करीत रानोमाळ फिरावें लागतें; व सकाळ संध्याकाळ गुरांचे गोठे व डुकरांचीं व कोंबड्यांचीं वसतीस्थानें शोधीत हिंडावें लागून कडकडीत उन्हांत झाडें व माड मोजीत गांवभर भटकत रहावें लागतें. आणि याचें पारितोषिक काय तर देहंदडना, कष्ट व प्रापंचिक नुकसानी. शिवाय हुकुमाची मनाप्रमाणें अम्मलबजावणी न झाली तर, वरिष्ठांकडून मिळत असलेला टपका, लोकांची वक्रदृष्टि, शिव्याशाप व दुरुत्तरें ! एवंच मशालजीला जसें काम मनासारखें केलें किंवा न केलें तरी, शंखासुराच्या हातचे, वेंटाचे तडाखे चुकत नाहींत, त्याच प्रमाणें रजिदोराच्या नशिबातील त्यानें कितीहि चोख काम बजावलें तरी कष्ट त आपत्ति चुकत नाहींत.

सांप्रत रजिदोर वरिष्ट हुकुमाप्रमाणें कोंबडीं, डुकरें, गुरें, झाडें व माड मोजीत फिरत असतात. मोजणींत जात, वय, लिंग इ. बारीक माहितीसुद्धा गोळा केली जाते ह्मणे. व त्यांतहि मजा ही कीं हें काम ताबडतोब उरकलें जाण्याबद्दल त्यांच्यामागें लकडी लागलेली असते ! या मोजणीपासून प्रजेला देण्यासाठीं सरकार कोणती मात्रा तयार करीत आहे हें जरी आज समजत नसलें तरी त्याचा परिणाम काय होईल, हें आजपर्यंत आलेल्या हजारों अनुभवांवरून सहज ताडतां येण्यासारखें आहे. हजारों प्रश्नार्थक वाक्यानीं भरलेल्या पत्रकापासून व शेतकी सुधारणेच्या प्रचंड खटाटोपापासून जें आजपर्यंत निष्पन्न झालें तेंच या मोजणीपासूनहि होणार असें भविष्य वर्तविण्यास आधार आहे. जों कामें लहरींप्रमाणें, कांहीं तरी करण्यासाठीं, केलीं जातात, त्यांच्या बऱ्यावाईटपणाची उगाच चर्चा करण्यांत काय हंशील ? असा एक प्रश्न उद्भवल्याशिवाय राहत नाहीं कीं, जेथें ज्यांना ज्या कामासाठीं नेमलेलें असतें, त्यानां त्याचकामासाठीं थोडेसे हातपाय हालवावे लागले कीं जादा भत्ता खिशांत पडत असतो, तेथेंच रजिदोरानीं मात्र असें कोणतें पातक केलेंलें आहे कीं त्यानीं इतके कष्ट करूनहि कष्टांशिवाय त्यांना आणखीं कांहीं एक मिळूं नये.

हुकूम करतानां रजिदोर हा बिनपगारी नोकर आहे, इतर सरकारी नोकरांप्रमाणेंच त्यालाहि पेट असतें, इतर लोकांप्रमाणेंच त्याला बायकामुलें असतात व त्यांना स्वतंत्र संसार ह्मणून असतो व शेवटीं रजिदोर हा एक संवेदनात्मक प्राणी असून त्याच्यावर श्रम, सुखदुःख, पाऊस, थंडी, ऊन, भय इ. चा परिणाम होत असतो व जितक्या लवकर हुकूम करतां येतो तितक्या लवकर त्याची अम्मलबजावणी करतां येत नाहीं हें सरकारनें लक्षांत ठेवावयास पाहिजे होतें. व त्याच्याकडून करून घेत असलेल्या कामाबद्दल त्याला कांहीं तरी वेतन देणें सरकारचें कर्तव्य होतें. पण जेथें देवसुद्धां दुर्बळांचा घात करणारा असतो तेथें सरकार तरी त्यांचे कनवाळू कसें होणार ?

रजिदोरांच्या अधिकाराची मर्यादा दुसऱ्याना किंवा स्वतः त्यानांसुद्धां सांगतां येणें कठीण असतें. तेव्हां त्याच्या या 'गोंधळगल्ली' व अमर्याद अधिकारामध्यें कांही आगळीक घडली तर त्याला टपका देण्यास सरकार व लोक तयार असतातच ! जेथें काढतां ओढतां सोन्याला तूट येते व झुरळें वज्र खात असतात, तेथें रजिदोराकडून कुठें कोणाकडूनहि चार आठ आण्याची, थोड्याशा भिच्यांची व एखाद्या भोपळ्याची आशा धरण्यांत आली तर त्याच्याविरुद्ध केवढा मोठा गहजब होत असतो ! लोक त्याला नागवणारा, छुटारू, लांचखाऊ इ. अनेक विधेशणें लावीत असतात व वरिष्ट अधिकारीहि डोळे वटारीत असतात. व त्यांना या 'वरिष्ठा'पत्तींतून सहिसलामत सुटण्यासाठीं आपल्या प्राप्तीचा अर्धा वांटा दान देऊन त्यांस सतत संतुष्ट ठेवावें लागतें.

एका परी मशालजीची स्थिति रजिदोरापेक्षां कितीतरी बरी असते. कारण लोकांकडून हास्यरूपानें होत असलेलें आपलें कौतूक पाहून, धन्यता तरी मानण्यास त्याला जागा असते. पण रजिदोराच्या नशिबांत परमेश्वरानें तेंहि लिहिलेलें नाहीं ! !

Indo-Portuguese Review

Recebemos e agradecemos um exemplar da—*Indo-Portuguese Review*— de Calcuta, orgão da Associação indo-portuguesa daquela importante cidade.

A referd a revista é anual. Impressão nitida e colaboração selecta, tanto em prosa como em verso.

A—*Indo-Portuguese Review* —de que é administrador honorario o nosso ilustre conterraneo sr. L. C. de Sousa, além de encerrar um copioso número de estampas atraentes dalguns edificios historicos de Gôa, regista, tambem, lindas produções literarias em inglez, português e concani.

A' interessante revista que representa, por assim dizer, a opinião dos goêses estabelecidos em Calcuta e que, em mais dum transe dificil, tê n prestado á sua mãe patria os mais relevantes serviços,—almejamos longa dura e muitas prosperidades, *ab imo pectore.*

Nao ha meio termo

Mesmo, quando o preço de cada candil de arroz com casca era de 35 a 40 rupias—candil de 20 mãos—, varias varzeas de Colomba, Curdi, Netorlim etc. [concelho de Sanguem] não eram cultivadas. Não podendo lutar com o mais virulento paludismo que, nas referidas povoações, é endemico, nem com a desenfrêada invasão dos campos semeados, pelos animais bravios que aí abundam, os seus habitantes abandonaramnas e escolheram outras terras mais sadias para sua residência e outros oficios mais proveitosos para sua vida.

Pergunta-se, agora: ¿Terá a sobretaxa de equilibrio o mágico poder de tornar a trazer á cultura as varzeas abandonadas de Colomba, Curdi, Netorlim etc?

Se sim, não só não levamos a mal a criação da actual sobretaxa, mas tambem levaremos a bem que ela se duplique, triplique e quadruplique, se necessario.

Se não, urge que seja extincta a mesma sobretaxa cruel e deshumana, atendendo ao justo clamor público.

Não há meio termo.

Que a dominação de classe seja baseada na escravatura antiga, na servidão da idade média ou no salariado moderno sob o regimen do trabalho "livre", ela é sempre a mesma: uma dominação violenta, apoiada no assassinato colectivo e, quanto mais a sociedade é "moderna", tanto mais modernos são os seus meios de violencia.

Mas, hoje, aquilo que esperavam e desejavam os oprimidos do mundo inteiro e de todos os tempos, aquilo que aspiram e anceiam os milhões de vitimas da dominação dos poderosos, aquilo que prometeram os melhores pensadores da humanidade, passou, na União Sovietica pela primeira vez na historia da humanidade, a ser uma realidade. Aquilo para que milhões e milhões de homens se sacrificaram, hoje vêmo-lo nascer e realizar-se á nossa vista.

Dois mundos se enfrentam face á face: o mundo capitalista e o mundo socialista. ¿A qual deles pertence o futuro?

Já hoje a questão está resolvida.

Que no velho mundo capitalista as classes dominantes se agarrem ainda ás tradições, aos costumes, aos habitos, aos sistemas sociais, aos privilégios e beneficios e a todos os meios de coerção, de nada lhe servem os seus esforços. O socialismo está em marcha. Hoje, em 1931, não se pode já negar e ironizar a superioridade e a eficacie do sistema socialista como se fazia ha alguns anos atraz. Os poderosos capitalistas estão agora a tremer perante o progresso da edificação socialista na União Sovietica. Já perderam vontade de ridicularisar a "experiencia bolchevista."

Os piores adversarios da classe operaria e dos trabalhadores do campo viram se obrigados a tomar a série o sistema sovietico, reconhecendo o seu sucesso, embora com uma raiva interior pretendam que esse sucesso não é devido ao sistema socialista. O que os obriga a inclinarem-se perante o progresso gigantesco da edificação socialista na União Sovietica é que ele coincide com a crise sem remédio e com a bancarrota por que está passando o sistema capitalista no resto do mundo.

Dum lado, uma ascenção formidavel, doutro, a crise e a decadencia. Eis o facto dominante que vai determinar a orientação da humanidade inteira.

¿Qual dos dois sistemas adversos triunfará? ¿Quem vencerá?: o capitalismo ou o socialismo, a burguesia ou o proletariado? Os dois sistemas são irreconciliaveis e estão separados por um abismo intransitavel.

Dois caminhos, dois processos se desenvolvem em direcções diametralmente opostas. No mundo capitalista, é a bancarrota e o naufragio, a podridão e desespero, o desemprego de milhões de trabalhadores, miseria e escravidão para milhões e milhões de homens, a fome ao lado da abundancia e da superprodução, a indigencia extrema ao lado da destruição violenta e absurda de grandes stocks de produtos alimentares. No mundo socialista, é a edificação e o desenvolvimento impetuoso da industria e do comercio, dos transportes da agricultura e de todos os ramos de produção. Não há desemprego mas pelo contrario falta de mão de obra. Aumento de riquesa para todos. Trabalho e pão para todos.

No mundo capitalista, é a crise economica tal que nunca dantes se viu. Kracs bancarios, dificuldades de credito, inflação, caos, panico. No mundo socialista é a consolidação financeira, aplicação de milhares de milhões para criação de novas industrias sem auxilio do estrangeiro, a estabilidade da moeda e o aumento constante das rendas nacionais.

No mundo capitalista, são os fiascos industriais, suspensão das industrias, demolição das fabricas mais modernas e das

Ousam, agora...

A sobretaxa de equilibrio não foi capaz de aumentar, *até aqui*, o preço do arroz nacional que tem permanecido na baixa do ano transacto com visiveis tendencias para, ainda, descer.

Novas arrematações, realisadas, segundo o diploma da sobretaxa, tambem, não prometem nada. Apatia por toda a parte. Praças votadas á mosca.

¿Que dizem a isso os apologistas fervorosos da sobretaxa que, em um momento de mau humor, incorreram no desparate de apodar de *meneurs* os adversarios do novo imposto?

¿Fizeram o que quizeram. Pois bem. Oiçam, agora, o que não queremos!

A sobretaxa de equilibrio foi, pois, uma asneira que, sempre, trará alarmada a consciencia de quantos contribuiram para sua criação.

Muita parra, pouca uva

Lê-se nos *Apontamentos* do *Diario da Tarde*, de 24 do corrente, o seguinte:

"Não se sabe o motivo porque até aqui não estão instaladas as delegações aduaneiras de Margão e Sanvordem, creadas há quasi um ano..........

....

Nós desvendamos o misterio ao ilustre colega. E' que a nossa publica administração destaca-se pela carateristica sintetisada no adagio popular *Muita parra, pouca uva.*

Se os detentores do poder levassem a efeito só uma decima parte do que prometem solenemente, seria um paraiso esta terra *conquistada.*

Simplesmente, succede que as promessas nunca ultrapassam o comodo, inerta e inactivo dominio do papel.

Muita parra, pouca uva, a carateristica do tino administrativo dos que se intitulam *conquistadores* desta *terra livre de cidadãos livres...*

वर्ष १६ वें. अंक ३४
गुरुवार ता. २६ नव्हेंबर सन १९३१

वर्गणीचे दर
सालीना ट. ख. सह ३ रु. [आगाऊ]
किरकोळ अंकास १ आणा.

जाहिरातीचे दर– समक्ष अगर पत्रद्वारे.
आगाऊ पैसे आल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाहीं.

संपादक व मालक
गो. पु. हेगडे देसाई– फार्मासेवतिकु
मुद्रण व प्रकाशन भारत–प्रेस कुसमण केंपें गोवा.

भारत
O BHARAT

Ano 16 Nº 34
QUINTA-FEIRA 26 de Novembro 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

do Senhor Morto, trezentas e cincoenta para um manto ao Senhor Morto, duzentas e setenta rupias para a colocação dos quadros da Via Sacra, quinhentas vinte e cinco para a colocação duma lage, e, durante tres anos e em média anual, quatrocentas e cincoenta rupias para a solenisação da festa de N. S. de Bôa Morte. E note-se que ninguem pediu contas desses donativos, apesar de não estar ainda colocada a referida lage!

Claro que o epiteto de bandidos com que o vigario incomodou os confrades da maioria, geralmente, analfabetos, determinou-lhe a eliminação, pura e simples, das vantagens que lhe proporcionavam varios actos facultativcs, como oficios, missas cantadas, uso de capa para batizados, benzimentos, casamentos, enterros etc—actos que foram suspensos, a partir da data do infeliz oficio do vigario que tão ingratamente havia procedido com a maioria.

Essa atitude, natural e legitima, da maioria gerou contra esta o ódio do vigario e da menoria, resultando daqui um inquerito e varios processos crimes contara o sr. Dourado, por este haver esclarecido o assunto da questão. Mas a verdade ó que, se a maioria viu, com desgosto, afastado da regedoria o sr. Dourado por causa de sua benefica e desinteressada interferencia no embroglio confrarial, teve, em compensação, a consolação de vêr o vigario legalmente forçado a reconhecer os diplomas de retorno que despresava, sob pena de ficar relaxado ao poder judicial, caso continue com a sua recusa, *causa mater* do conflito. Foi, tambem, ordenado o relaxamento aos tribunais judiciais, dos responsaveis dos cofres bem como a expedição das contas correntes em atrazo contra os respectivos devedores, coisa que a menoria insistia, por artes de berliques e berloques, em não faze la.

Só é pena que a Administração das Confrarias de Mormugão não tenha acelerado essas diligencias, o que tem dado azo, para que a menoria vá apregoando *por dá cá aquela palha* e aos quatro ventos a futilidade do inquerito e o vigario cante, tambem, no mesmo diapasão, em todos os domingos, da Cadeira de Estação quando, daqui, só devia explicar o Evangelho. E devido a esse irreligioso procedimento do paroco, varias pessôas do grupo da maioria deixaram de frequentar a Igreja para evitar conflitos.

O mais engraçado, porêm, é que estando as coisas de Cortalim nesse pé, veiu agora agrava-las a nomeação dum regedor, afecto á menoria contra a expressa determinação da Direcção dos Serviços da Administração Civil, que, com uma visão nitida da verdadeira situação da freguesia, ordenara que a escolha recaisse em um individuo idoneo, mas extranho á pólitica local. E o nomeado é afecto á menoria porque depôz contra a maioria!

Sôbre toda a sorte de tropelias e represalias da menoria contra a maioria, consta-me que vão subir representações aos srs. Governador Geral e Patriarca, tropelias e represalias que a mesma maioria, apesar de analfabeta, tem sabido suportar com uma resignação catolica.

Não posso terminar estas linhas sem perguntar o seguinte: Os referidos donativos de quantias avultadas, que hoje representam valores da Fabrica ¿porque é que se não acham consignados nos respectivos livros? ¿Seria, porque partiram dos analfabetos cujos nomes não tem cabimento nos mesmos?

Como, porêm, este vai longo, prometo tratar disso, bem como das gerências dos fundos da mesma Fabrica, da junta local e do dinheiro que ela manda á Comissão de Melhoramentos—noutra ocasião mais oportuna.

Cortalim, Novembro de 1931

Um Confrade

Anuncios

O BHARAT, ano XVI no 34 de 26 de Novembro de 1931

Anuncia-se novamente a arematação das avenças de receita trienal da comunidade de Sirvoi, para o trienio de 1932 a 1934, nas casas de sessões da dita comunidade, para o dia 6 do proximo mez de Dezembro ás 10 horas, com deminuição de 1/5 sobre a cifra do calculo.

Aos 23 de Dezembro de 1931

O escrivão da comunidade

Esvonta Butó Sinai Regó

Pagode de Xri Chamundesvari de aldeia Sirvoi

No dia 6 do seguinte mes de Dezembro ás 16 horas irão a praça ás avenças da despeza para o corrente ano no local das suas sessões.

Sirvoi, 23 de Novembro de 1931.

O escrivão da meza

Naraina Xembú Sinai Sirvoicar

E' convocada a Comunidade de Chicalim, para se reunir em sessão extraordinaria, nas casas das suas sessões no dia 29 de Novembro ás 10 horas para dar o seu parecer sôbre o requerimento do procurador da dita Comunidade em que este pretende que ela resolva se deseja fazer a mudança de cultura de arroz para a de palmeiras nas suas varzeas Baelomoló e Ordimoló, sitos em Bogmoló, se quer tomar qualqter outra resolução sôbre o mesmo assunto; bem como para tomar conhecimento dos requerimentos de Manuel Salvador da Costa, em que pede a troca das referidas varzeas com o seu sapal, situado em Sancoale que o Estado vende a P. Pedro Alcantara Lamartine de Quadros e do requerimento de Joaquim Santana Azavedo, em que este diz que a referida troca é prejudicial aos interesses da Comunidade.

Chicalim, 15 de Setembro de 1931.

O escrivão da Comunidade

Ramachondra Xencora Sinai

Ano XVI) Quinta-feira, 26 de Novembro de 1931 (N.º 34

O BHARAT

ANUNCIOS
Cada linha, ainda repetida, uma tanga. Número avulso uma tanga.

Não se aceita nenhum anuncio ou comunicado sem ser adiantado o seu custo provavel.

Jornal de maior circulaçao

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL
Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-08-00

REDACAO E ADMINISTRACAO
COMPOSICAO E IMPRESSAO
Tip. *BHARAT* Ousmane-Quépém.

ECOS-E-CRITICA

Muito apoiado

Sabemos de fonte segura que o sr. General Craveiro Lopes mandou providenciar no sentido de arrematar, como se fazia antes, as tendas onde vendem aos peregrinos os artigos de cera etc. para serem ofertados ao Santo, tendas estas que, segundo nos consta, desde certa data, eram exploradas directamente pelo administrador do Convento de Bom Jesus. Sabemos tambem que s. exia. providenciou outrossim em ordem a garantir melhor a regularidade do serviço das oblatas reforçando para tanto o respectivo pessoal que, apezar de todo o seu empenho, humanamente se achava impossibilitado de arcar com um trabalho tão fatigante e de tamanha responsabilidade.

Por tudo isso, muito apoiamos a solicitude do sr. Craveiro Lopes.

Um fenomeno curioso

Em consequencia do diploma da sobretaxa de arroz, foram consideradas sem efeito as arrematações das varzeas de Murdá que haviam sido ultimadas por um preço inferior ao do calculo.

Há dias, realisou se a nova arrematação. Por falta de licitantes, foi o preço do calculo reduzido a um quinto. Voltaram á praça—nada. Foi agora concedida a redução de mais um quinto, não nos constando ainda o efeito na praça desta reducção.

O curioso do caso, porem, está aqui. As arrematações anteriores haviam sido feitas na base de um quarto de menos no calculo. E agora, a mesma base desceu ainda mais.

Gostariamos conhecer a opinião dos partidarios da sobre-taxa acerca deste curioso fenomeno.

Valia a pena...

A Comissão Arquiologica gasta mensalmente, conforme nos informam, cem rupias para conservação dos monumentos e museus da Velha Cidade. Ha quem diga que esta verba é demasiada em vista de reduzidos encargos que á Comissão pertencem naquela antiga Capital da India. Mas, deixando á parte a questão do quantitativo da verba, valia a pena que o Govêrno procurasse saber em que se gastam as cem rupias—e a quem as mesmas são pagas e quem administra essa importancia. Consta-nos que tudo isso corre numa confusão que não honra o rigor que deve existir na aplicação dos fundos públicos.

Em tempo. Cabe nos em sã consciencia declarar que, chamando a atenção do Govêrno sôbre o caso, não temos em vista pôr sombra de dúvida na honestidade do presidente sido e do actual da Comissão.

S. O. G.

Na reunião da Sociodade dos Operarios, realisada no último domingo, em Pedda de Benaulim, além do director de *O Bharat*, falaram os srs. Roque Antonio Pereira e J. F. Fernandes.

A seguinte conferencia terá lugar em Varcá, no proximo domingo.

DOIS MUNDOS

Dois sistemas economicos dominam hoje o mundo e estão entre si em completa oposição: o sistema economico socialista que reina na União Sovietica e o sistema economico capitalista, no velho mundo.

¿A qual deles pertence o futuro? E' o problema que preocupa hoje toda a humanidade.

O sistema sovietico domina apenas sobre uma sexta parte do globo terrestre, mas fa-lo sob uma forma tão decidida e audaciosa que o mundo inteiro vê-se obrigado a se declarar a favor ou contra.

Não se trata apenas de dois sistemas economicos, mas de dois sistemas gerais e, tambem, dois sistemas culturais. A aspiração e a esperança no reino do socialismo são tão velhas como a opressão, a exploração do homem pelo homem, a servidão, a escravatura, as guerras e os crimes de toda a sorte.

Desde milhares de anos, está a tomar vulto a aspiração de milhões de seres humanos para uma existencia humana, sem servidão nem opressão, sem barbarie nem dominação violenta, sem guerras nem crimes, sem assassinatos nem a mutua aniquiláção.

Desde milhares de anos, os grandes pensadores de todos os povos trabalharam em pról de uma ordem social na qual os horrores e os sofrimentos que resa a historia humana pertencerão ao passado. Durante milhares de anos, os melhores cerebros da humanidade conceberam sistemas que possam permitir aos homens viver na igualdade, na fraternidade.

Desde milhares de anos, os oprimidos, os espesinhados, os que sofrem da fome e do frio, os escravos e os servos esperam pelo dia de liberdade, pelo dia que lhes trará o fim dos seus sofrimentos.

Desde milhares de anos, dura esse ardente desejo pelo socialismo.

Mas desde milhares de anos, os grandes e os poderosos, os afortunados e os previlegiados querem reservar a liberdade para sua propria classe ou casta, obrigando milhões de seres humanos a permanecerem na servidão e na escravidão.

Desde milharos de anos, os melhores cerebros trabalham em invenções que são destinadas a destruir o mais rapidamente possivel as massas humanas. A sciencia, a tecnica, o espirito de invenção e o ardor de trabalho estão ao serviço da produção de instrumentos de morte e de instituições criadas para aniquilar as massas. Quanto mais se desenvolve a cultura e progride a civilisação, tanto mais se desenvolve o assassinato colectivo.

Cartilha materna

O concanista sr. Joaquim Rosario de Silva obsequiou-nos com um exemplar do seu livrinho — *Concani* (Cartilha Materna), Tomo I—ou—*Concani Avoi Baxechem Poilem Pustoc.*

A confecção do trabalho do sr. Silva obedeceu ao proposito de vulgarisação metodica do ensino do concani, lingua que, no entender do autor da *Cartilha Materna*, é diversa e distincta do *marata*, segundo flue do seu prefacio.

Conquanto nos abstenhamos de entrar, por ora, na discussão da verdadeira origem do concani, declaramos, porên, que estamos de acôrdo com o sr. Silva, quanto ao seu desprazer derivado da anarquia ortografica que actualmente se observa nos escritos da lingua concani.

Quanto a nós, o emprego do alfabeto *Devanagari*, o único que possue o condão de traduzir todos os fonemas linguisticos, acabaria com essa anarquia estabelecendo ao concani uniformidade ortografica.

Nas últimas páginas da *Cartilha Materna*, o sr. Silva inseriu a doutrina cristã, — o que, evidentemente, deslustra o sinificado do adjectivo *Materna* da *Cartilha*, que, assim, parece destinar se, tão sómente, aos cristãos. E entre os que falam o concani, ao lado de cristãos figuram, tambem, hindus e maometanos.

Se o sr. Silva deseja que se justifique o emprego da palavra *Materna* com que intitulou a sua *Cartilha*, urge, pois, que nas suas futuras edições elimine-lhes a parte religiosa. E isto por causa de coerencia.

Se, porêm, entender manter a actual feição sectarista da *Cartilha*, seria melhor que o sr. Silva substituisse o adjectivo *Materna* pelo outro, mais adequado, como *cristã*, por exemplo. E isto, tambem, por causa de coerência.

Ao sr. Silva, agradecemos a oferta da *Cartilha*.

maquinas as mais aperfeiçoadas e mais recentes. No mundo socialista, é a abertura de novas empresas, a edificação de novas industrias, instauração e utilização de fabricas mais modernas e do maquinismo aperfeiçoado até aqui desconhecidas nos grandes paises industriais.

No mundo capitalista, é a crise agraria e o empobrecimento dos camponeses, enquanto no pais socialista é a agricultura colectivisada e o progresso gigantesco dos camponeses.

A historia mundial abriu uma nova página. A época prehistorica está por terminar. A historia da humanidade começa.

Hermann Remmele

Uma pergunta

No Indostão, os partidários da boicotagem de fazendas extrangeiras garantem a produção nacional do mesmo artigo em quantidade suficiente aos indianos.

Os defensores da sobretaxa de arroz ¿serão capazes de nos assegurar que identico fenomeno se dará tambem no tocante á produção *nacional* de arroz que, desde tempos imemoriais, nos faltou sempre?

Pela freguesia de Cortalim

Existem na freguesia de Cortalim duas confrarias: a de N. S. de Livramento e a de Santas Almas. Os seus confrades têm direito a retorno, isto é, o direito do confrade falecido ser enterrado no cemiterio por conta duma parte de joia já paga, na ocasião de sua coroação. Esse direito é garantido pelos compromissos confrariais.

O respectivo vigario não reconheceu, porêm, por muitos anos, o referido direito dos confrades, alegando, sempre, que as gerências das confrarias não lhe pagavam o retorno. E as familias do confrade falecido que não podia jazer indefinidamente no leito mortuario pagavam ao párroco uma nova taxa de enterramento. Houve, é verdade, reclamações contra a exigencia dessa nova taxa perante as gerências que, porêm, davam por arrumado o assunto com a seguinte e invariavel resposta: "Os cofres não têm dinheiro para solver os seus proprios compromissos."

Assim, a injustificada exigência da nova taxa, em manifesta contravenção do retorno assegurado pelos compromissos e a tacita conivencia com ela, das gerencias, levaram os confrades a definir a sua situação, fazendo respeitar a lei — para que a mesma imposição do vigario não ganhasse fóros de legalidade. E para tanto, mais de 800 confrades resolveram protestar contra a anormalidade, não se apresentando, por ocasião da última quaresma, com a sua capa, para os actos da Igreja, — resolução que, de facto, levaram a efeito, excepção feita dos 25 confrades que, hoje, representam a menoria, que, note se, sempre foi detentora das gerencias confrariais.

Scindidos, desta forma, em dois grupos os confrades, a maioria pediu ao sr. Agostinho Dourado, ao tempo regedor da freguesia, que, intervindo no assunto e entendendo-se com a menoria e com o pároco se necessario, normalisasse a situação anormal das confrarias, derivada do menospreso do direito de retorno.

Mas o sr. Dourado respondeu-lhe que não podia acceder lhe ao desejo, já porque era regedor e já porque não era confrade. Tal foi, todavia, a insistencia da maioria, secundada pelo proprio vigario, para o sr. Dourado, como arbitro, conciliar as desinteligencias que traziam inquietas as confrarias,—que êle coroou-se confrade e, nesta qualidade, logo após a sua coroação, solicitou uma reunião de todos os confrades para a solução harmonica do assunto,— reunião a que assistiram alguns confrades de menoria e o vigario, ficando resolvido que, para o fim que todos tinham em vista, devia ser, tambem, requisitada a intervenção do sr. Administrador das Confrarias, que, tendo-se, efectivamente, transportado á freguesia e ouvido, directamente, á maioria as suas reclamações, prometeu-lhe solucionar o assunto dentro das normas legais.

Mas, como que por encanto, compareceu o sr. Administrador das Confrarias na freguesia no dia imediato e fez reunir os confrades no mesmo sitio do dia anterior, a fim de serem ouvidos sôbre a materia dum oficio dirigido pelo párooo ao sr. Patriarca, participando que "a freguesia de Cortalim estava infestada de bandidos e que não havia nela segurança de vidas nem de propriedades."

Como era natural, o oficio produziu indignação geral e o sr. Dourado, em nome da maioria, declarou que não alcançava o objectivo do oficio do vigario que, tendo, no dia anterior, trocado impressões com o sr. Administrador, não houvesse feito com este minima alusão á existencia do perigo, relatado no mesmo furioso oficio que, propriamente, acirrou os animos não só da maioria, mas tambem, do geral da população da freguesia.

A indignação da maioria contra o vigario subiu de intensidade, porque, encontrando-se êle á testa da Igreja, há mais de 17 anos, ela procurou, sempre, satisfazer aos seus minimos desejos no sentido de serem melhoradas as condições do templo, tendo-lhe entregue com sacrificios somas avultadas, ainda que coalhadas por subscrições e donativos individuais, tais como: mil rupias para a ampleação do cemiterio, duzentas para a construção do seu portal, cem para a factura duma cadeira de estação, outras cem para um manto á N. S. das Angustias, trezentas para a tumba e imagem

भारत

जनसेवा ही ईश्वर सेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा॥

गुरुवार, कार्तिक व. ९ मी शके १८५३

नवें संकट !

ब्रिटिश सीमेतून गोमांतकांत येणाऱ्या तांदूळ व गहूं या वस्तूंवर नवा जादा कर लादल्याची वार्ता पणजीच्या पोर्तुगेज पत्रांतून पसरली आहे. ती खरी असल्यास आधींच कष्टमय बनलेलें गोमांतकीय श्रमजीवि लोकांचे जीवित अत्यंत दुःखदायक होईल, यांत काडीचाहि संशय नाहीं. एका बाजूनं पोर्तुगेज आलफांत व दुसऱ्या बाजूनें ब्रिटिश कस्टम अशा दुहेरी कचींत सांपडून महागलेला तांदूळ मजुरांना पोटभर खाण्यास मिळणें शक्य नाहीं. तांदुळांवरील ही 'उभयान्वयी' करवाढ मजुरीचं प्रमाण वाढण्यास कारणीभूत होऊन, गोव्याच्या आर्थिक स्थितींत भयंकर खळबळ माजणार आहे, यांत संदेह नाहीं.

सरकारी नोकर व मोठे जमिनदार हे दोन वर्ग खेरीज करून बाकीच्या लोकांचा प्रपंच सदर करवाढीमुळें क्लेशमयच होईल, हें अर्थात उघड होय. श्रमजीवि जनता व छोटे भाटकार व भातकार यांचे हाल कुत्रासुद्धा खाणार नाहीं, असा घोर अनर्थ ओढवण्याचा संभव—नव्हे खात्रीच आहे.

परदेशांत राहणाऱ्या प्रांतबंधूकडून विद्यमान आर्थिक आपत्ति उद्‌भवण्यापूर्वी बरीचशी संपत्ति गोमांतकांत येत असे. पण जागतिक आर्थिक अनर्थाचें काहूर उसळतांच बेकारी बोकाळूं लागली व आपोआपच त्या आवक संपत्तीचा झरा आटूं लागला. इतक्यांत तांदुळावर येथील सरकारनें कर लादला आणि त्याची अंमलबजावणीहि होऊं लागली. त्यामुळें चिडून जाऊन परदेशांत नोकरी करणाऱ्या आमच्या लोकांनीं आपल्या बायकामुलांना पोटापुरताच पैसा पाठविण्याचें ठरवून, बाकीची संपत्ति बाहेरच गोळा करण्याचा निर्धार जाहीर केला. हा निर्धार बाहेरच्या संपत्तीच्या आवकाला आटवण्याच्या बेतांत असतांनाच, ब्रिटिश सरकारनें तांदूळ व गहूं यांवर नूतन कर लादल्याची बोलवा आहे !

पण तांदुळावरील ब्रिटिश करवाढ पोर्तुगेज सरकारला आपली करवाढ रद्द करण्यास भाग पाडाल, असा अंदाज आहे. आणि तो खरा ठरल्यास वाइटांतून थोडें तरी चांगलेंच निष्पन्न होईल. कां कीं, करवाढीच्या मनूत सांप्रत होत असलेली व्यापारी वर्गाची गळचेपी आपोआपच टळेल. बाहेरच्या बाहेरच तांदूळ महाग होऊन आंत येणार असल्यानें स्थानिक तांदुळांचा भाव साहजिकच वाढेल व आपल्या भात-तांदुळांला किंमत नसल्याचें जमिनदारांचें रडगाणेंहि बंद पडेल.

असो. आतांच या विषयावर विशेष विचार प्रदर्शित करणें अप्रासंगिक होय. ब्रिटिश करांचें प्रमाण कळतांच साधक बाधक गोष्टी नजरेसमोर ठेवूनच काय तो निश्चित निष्कर्ष काढलेला बरा. पण जी एक गोष्ट आमच्यानें आतांच सांगितल्याविना राहवत नाहीं, ती ही कीं, सदर ब्रिटिश करांचें प्रमाण केवढेंहि असलें तरी त्याचा परिणाम येथील बहुसंख्य जनतेचा संसार कंटकमय बनवण्याचेच कामीं होईल. रात्रीच्या वेळीं दीर्घ शंका करण्याची संवय नेहमींच धोक्याची असते, हें काय आह्मीं सांगावयास पाहिजे ? न सांगताच समजणाऱ्या गोष्टींपैकींच तीहि एक आहे.

वर्तमान सार

—लोलयें, विद्याप्रसारक मुष्टिफंड संस्थेचा सहावा वाढदिवस गेल्या ता. २७ नव्हेंबर १९३१ रोजीं भारतकाराचे अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें पार पडला. वे. शा. सं. गोविंदाचार्य यानीं मंगलाचरण केल्यावर संस्थेच्या कार्यवाहांपैकीं रा. रा. मुकूंद प्रभू बोरसकर यानीं यथायोग्य शब्दानीं पाहुण्याचें स्वागत करून सभेच्या अध्यक्षांची निवड करण्याविषयीं सभेला विनंति केली. या विनंतीस अनुसरून संस्थेमार्फत चालू असलेल्या पोर्तुगीज शिक्षणविभागाचे होतकरू व उत्साही अध्यापक रा. भगवंत गो. प्रभू देसाई यानीं भारतकारांचें नांव सुचविलें व या सूचनेला सभेचा टाळ्यांचा दुजोरा मिळताच अध्यक्ष स्थानापन्न झाले. प्रास्ताविक भाषण झाल्यावर त्यानीं रा. बोरसकर यांस अहवाल वाचण्याची विनंति केली व प्रसंगोचित भाषण करण्याची इच्छा असणारांस ती पार पाडण्याविषयीं सुचविलें. नंतर भारतमित्र व सु-प्रसिद्ध मराठी लेखक, ग्रंथकार व नाटककार रा. व्यंकटेश वि. वैद्य, यांचें प्रचलित हिंदी राजकारण, समाजकारण व धर्मकारण यांवर ओजस्वी, अर्थपूर्ण, स्फूर्तिदायक व मार्मिक भाषण झालें. रा. वैद्यांचें व्याख्यान टाळ्यांच्या कडकडाटांत संपल्यावर, मराठी शिक्षक यशवंत सखाराम हासकर, प्रो. भगवंत गो. प्रभू देसाई व रा. विठल प्रभू देसाई यांचीहि कळकळीचीं भाषणें झालीं. मग भगिनी कृष्णाबाई प्रभू गांवकर या विद्वान महिलेचें स्त्रीशिक्षणावर सुंदर व हृदयस्पर्शी भाषण झालें. नंतर कुमार गोविंद लक्ष्मीधर गांवकर, यशवंत पांडरंग गांवकर, कृष्ण बाबया प्रभू गांवकर व हरि रामचंद्र गांवकर या विद्यार्थ्यांचीं भाषणें होऊन अध्यक्षांचें समारोपात्मक भाषण झालें व वाढदिवसाचा समारंभ यशस्वी रीतीनें आटोपला. संस्थेचा अभ्युदय इच्छितों.

—गेल्या रविवारीं मजूर-संघाची सभा वाकें येथें भरून भारतकार, प्रो. एफ्. मार्तीस, जुवांव फ्रां. फेरनांदीस व रोकि आं. पेरैर यांनीं संघाच्या प्रचारार्थ भाषणें केलीं.

—मुंबई येथील गोमांतकीय खिस्ती नागरिकांची प्रचंड सभा भरून, गोवा-सरकारनें तादूळ-भातावर लादलेल्या नव्या कराचा त्यांनीं पूर्ण निषेध केला.

—सेंट झेवियरच्या प्रदर्शनाला आज पासून सुरवात झाली. शव-दर्शनासाठीं लोकसमुदाय जात आहे.

फा. रा. शे. नाडकर्णी

फा. नाडकर्णी हे दीव येथील सरकारी धारमासिवतिकाचा हुद्दा आपल्या तीव्र बुद्धिमत्तेनें, कुशल धडाडीनें व अभिनंदनीय सदगुणानीं भूषवित होते. दीवच्या सफरींत त्यांचा आह्माला प्रथमतःच परिचय घडून आला होता. कर्तव्यततरतेनें त्यानीं संपादन केलेली लोकप्रियता पाहून आह्मास सानंद अभिमान वाटत असे. अशा या तरुणाचें भर तारुण्यांत मुंबई येथें कसल्याशा आजारामुळें नाकांत शस्त्रक्रिया करण्यांत आल्यावर देहावसान झाल्याचें कळतांच, आह्मास कल्पनातीत दुःख होणें साहजीक होय. त्यांच्या विषयीं आह्मास बरेंचसें लिहावयाचें असल्यानें सध्या फा. नाडकर्णी याच्या आत्म्यास सद्‌गति इच्छून इतक्यातच आटोपतें घेतों.

अनंत पै वेर्णेकर

कुंकळ्ळी येथील हे विद्वान, सुशील व लोकप्रिय नागरिक वैकुंठवासी झाल्याचें कळविण्यास आह्मास परमावधीचें दुःख होत आहे. रा. वेर्णेकर यानीं गेल्या २४।२५ वर्षामागें स्वदेशकल्याणार्थ भारतकारानां केलेलें सहाय्य आह्मीं कधींहि विसरणें शक्य नाहीं. आह्मीं, सध्या काणकोण येथें असलेले प्रो. अनंत पै काकोडे व वेर्णेकर मिळून त्याकाळीं लोकसेवा करीत होतों. आमचें कुंकळ्ळी येथील त्यावेळचें लोककार्य काकोड व वेर्णेकर या उभय सहाय्यकांच्या पाठिंब्यानेंच तडीस गेलें. अर्थात वै. वेर्णेकरांचें अल्प चरित्र देण्याचा आमचा मानस असल्यानें प्रस्तुत त्यांच्या आत्म्यास चिरशांति इच्छून, हा मृत्युलेख येथेंच संपवितों.

प्रवास-वर्णन

पुणें-सिंहगड

(ले.— डॉ. दामोदर व्यं. पै रायतुरकर, मुंबई)

(मागील अंकावरून पूर्ण)

किल्ल्यावर ठिकठिकाणीं पाण्याची भरपूर सोय आहे. सदरेच्या जरा वरील डाव्या बाजूस पाण्याचा 'गणेशटाकी' नावांचा एक हौद असून याचें पाणी इतकें बर्फतुल्य गार असतें कीं, आंघोळीकरितां पाण्यांत बुडी मारल्याबरोबर एका दमानें पाण्यांत जास्त वेळ रहावत नाहीं. सांधे आंखडल्यासारखे वाटतात व हौदाच्या कांठावर येऊन परत पाण्यातून अंग बाहेर काढणें भाग पडतें. सदरेंत कांहीं वेळ विश्रांति घेऊन घाम वाळूं दिल्यावर गणेशटाकींत आंघोळ करणें पुढील किल्ला शांत चित्तान पहाण्याच्या दृष्टीनें फायदेशीर असत. कारण किल्ला चढून तंग झालेल्या शरिराला थंड पाण्याची आंघोळ होऊन अल्पशी न्याहारी मिळाल्यावर किल्यावरचे महत्वाचे पुढील भाग पहायाला अवसान येतें.

किल्ल्यावर जागोजागीं अशाच टाका असून त्यांतून तुडुंब पाणी भरलेलें असतें अशांपैकीं पिण्याच्या दृष्टीनें 'देवटाकी'चें पाणी फारच स्वच्छ आहे. या टाकीची खोली पुरुष दीड पुरुष तरी आहे. तथापि, इतकें पाणी असूनहि तें इतकें स्फटिकमय स्वच्छ आहे कीं कांठावरून पाहिल्यास खालचा तळ अगदीं स्पष्ट दिसत असतो. हें पाणी स्वच्छ असून शिवाय औषधी आहे कांहीं न खातांना नुसतें हें प्यालें तरी भुकेचें तात्पुरतें समाधान होतें. कै. टिळकांचा सिंहगडावर एक लहानसा बंगला आहे. या बंगल्यावर ते केव्हांकेव्हां येऊन रहात असत तेव्हा ते देवटाकीचेंच पाणी वापरीत असत व या औषधी पाण्यासाठींच त्यानीं बंगल्याकरितां सिंहगडावरची जागा पसंत केली होती, असें सांगतात.

पुणें दरवाजांतून प्रवेश केल्याबरोबर उजव्या बाजूला सदर लागतें तर डाव्या बाजूला डोंगरांतून कोरलेल्या घोड्यांच्या पागा लागतात. या पागांमधून पाणी भरलेलें आहे. परंतु त्या पाहिल्यावर त्या वेळच्या किल्ल्यावरील घोडदळाची कल्पना होते.

सदरेच्या उजवीकडील चढण काढून वर पोंचल्यावर किल्ल्यावरचे महत्वाचे भाग दिसायाला लागतात. वर वर्णिलेल्या टाका जिकडेतिकडे दिसायाला लागतात. या टाकांतऊ पाणी वापरत नसल्यामुळें वाढलेल्या वनस्पतीनें व शेवाळानें हिरवेगार दिसत असतें.

आतां सुचतील त्या प्रमाणें किल्ल्यावरील महत्वाचीं स्थानें वर्णन करूं:—

राजारामहाराजांची समाधि

छत्रपति राजाराममहाराज या किल्ल्यावरच समाधिस्त झाले. समाधीवर शंकराची

प्रवास-वर्णन

पुणें-सिंहगड

———

(ले.– डॉ. दामोदर व्यं. पै रायतुरकर, मुंबई)

(मागील अंकावरून चालू)

पुणें शहर आज मात्र पेशवाईत नाहीं किंवा मराठेशाहींत नाहीं. कोल्हापुरासारखें तें एखादें संस्थानहि नाहीं. उलट तो खालसा प्रांतांत मोडणारा ब्रिटीश सत्तेखालचा प्रदेश आहे. परंतु पुण्यांत स्वराज्याचा भास होतो, तसा कोल्हापुरासारख्या हिंदु व मराठा संस्थानांत होत नाहीं ! शनिवारवाडा, सदाशिव हौद, आतां बुजून टाकलेला काळा हौद, जोगेश्वरी, तुळशीबाग, नानांचें विष्णूचें देवालय वगैरे देवस्थानें, एकाकाळीं महाराष्ट्राची राजधानी असल्याची स्मृति, हिंदूंची मोठी वस्ती या कारणामुळें पुण्यांत स्वराज्य नसलें तरी स्वराज्याचा भास होतो. पुण्याच्या मुनसिपालिटी अगदीं देशी पद्धतीवर आहे.

प्राचीनाला नेहमींच महत्व असतें; त्यामुळें पुण्याच्या जुन्या अवशेषांकडेच प्रवाशांचें जास्त लक्ष्य वेधलें जातें. पुण्यांत आधुनिक अशीं महत्वाचीं स्थानें नाहींत असें नाहीं.

टिळकांच्या वेळीं महाराष्ट्राच्या किंबहुना सबंध हिंदुस्थानच्या राजकारणाचें केंद्र असलेला गायकवाडवाडा आज भाऊबंदकी व अंतःकलहानें ग्रासला गेला आहे. ‘ केसरी’चें पूर्वीचें महत्वहि आज लुप्तप्रायः झालेलें असल्यामुळें, टिळकांचा एकेकाळचा वाडा, एवढ्या अभिमानापलिकडे गायकवाड्याकडे सहसा कोणाचें मन आकर्षक होत नाहीं.

प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्तें कोनशिला समारंभ झालेला शिवाजीचा भव्य पुतळा व त्याच्या मागली इमारत, फर्ग्युसन कॉलेज, श्रीशिवाजीमंदिर, चापेकरबंधूच्या प्रसंगानें संस्मरणीय झालेलें खुल्या मुरलीधराचें देवालय, बंडगार्डन, एम्प्रेस गार्डन, संस्थानिकांचे टोलेजंग वाडे, जंगली महाराजाचें देऊळ व तेथील लेणी वगैरे स्थानें अवश्य पहाण्यासारखीं आहेत. बंडगार्डन तर अतिशय रमणीय व निसर्गसुंदर भासतें. तशांत नदीच्या कांठींच ही बाग वसवलेली असल्यामुळें तिची नैसर्गिकता जास्त खुलून दिसते. नैसर्गिकतेला नेहमींच जास्त महत्व असतें. मुंबईच्या Hanging Garden करितां किती तरी पैसा खर्च झालेला असेल; तथापि मुंबईच्या या ‘ झुलत्या बागेला ’ बंडगार्डनची निसर्गशोभा येत नाहीं.

सिंहगड

पुण्याला पोंचल्यावर ‘सिंहगड’ पहाण्याचा मोह झाल्याशिवाय रहात नाहीं. राष्ट्राकरितां देह खर्ची घालणोर वीर पुरुष हे नेहमींच पुण्य स्मरणीय होत.

पवित्र तें कुल । पावन तो देश ॥
जेथें हरिचे दास । जन्म घेती ॥

ही तुकोबाची वाणी संतांच्या बाबतींत जशी खरी आहे, तशीच राष्ट्रपुरुषांच्या बाबतींतहि तीं तंतोतंत लागू पडते. तानाजी सारखे वीर अजरामर होऊन गेलेच; परंतु त्यांच्या पराक्रमाचें स्थान झालेल्या जागाहि अजरामर होऊन रहात असतात. या स्वामिनिष्ट वीरपुरुषानें शिवबांच्या शब्दाकरितां आपल्या मुलाचें ठरलेलें लग्न बाजूला ठेवून प्रतापगड हस्तगत करण्याचें प्रतिज्ञाकंकण बांधलें आणि प्रतिज्ञेप्रमाणें आपल्या जीवाचें अमोल मोल देऊन किल्ला हस्तगत केला. किल्ला हस्तगत झालेला पाहण्याचें भाग्य तानाजीला लाभलें नाहीं खरें; तथापि, त्या पुरुषसिंहाचा वीरात्मा, शत्रूंचा निःपात होऊन किल्ला स्वाधीन होईपर्यंत, त्या उत्तुंग बुरुजाच्या भोंवतीं घुटमळत राहिला असेल. आणि शेलारमामा व सूर्याजीच्या साहसानें गड काबीज झाल्यावर समाधानाचा निःश्वास सोडून मग स्वर्गाच्या पायऱ्या चढून गेला असेल. स्वर्गाच्या पायऱ्या असतील तर त्या चढून जाण्याची पात्रता तानाजीसारख्या रणमर्दांनाच, नाहीं तर दुसऱ्या कोणास असणार !

किल्ल्याचा पायथा पुण्यापासून १५ मैलांवर आहे. वाटेवर खडकवासला, डोणजं व अत्तरवाडी असे तीन गांव लागतात. पैकीं अत्तरवाडी किल्ल्याच्या अगदीं पायथ्याशीं असून येथूनच चढणीचा पायप्रवास सुरू होतो. पुण्याहून निघाल्यावर प्रथम खडकवासला गांव लागतें. येथें मुठा नदीचें धरण बांधलेलें असून पुणें शहराला नळांनी पाण्याचा पुरवठा येथूनच होत असतो.

यानंतरचें गांव डोणजं पुण्यापासून १२ मैलांवर असून मोटर सर्व्हिस येथपर्यंत असते. तथापि, स्पेशल मोटार करून किल्ल्याच्या अगदीं पायथ्याशीं ह्मणजे अत्तरवाडी गावांपर्यंत जातां येतें. अत्तरवाडीला पोंचल्यावर किल्ल्यावर सोबत करून किल्ला दाखविणारे वाटाड्या मिळतात. यांना कांहीं खुराक चारावा लागत असला तरी हे लोक प्रेमळ असून कसोशीनें किल्ला फिरवून दाखविण्याचें काम करीत असतात. यांना पाहिल्यावर मावळ्यांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं.

सुरवातीला किल्ल्याची चढण फारशी अवघड वाटत नाहीं. कारण वाट मोठी वळणें घेत घेत गेलेली असल्यामुळें सडक अगदीं उभी नाहीं. परंतु, अर्धीवाट चढून झाल्यावर चढण अवघड होत जाते. पायथ्यापासून गडापर्यंत एका दमानें जातां येणें बहुतेक अशक्यच आहे. वाटेंत एकदोनदां विश्रांति घेणें भागच पडतें. त्यांतल्यात्यांत दुपारची वेळ असली ह्मणजे उन्हाचा फार त्रास होऊन घामाच्या धारा सुटायाला लागतात. पुण्याहून जरा उशीरां निघाल्यावर ऐन उन्हांतच किल्ला चढावा लागतो. यासाठीं सकाळच्या ७–८ वाजेपर्यंत पायथ्याशीं पोंचणें प्रवाशांना सोयीस्कर होण्यासारखें आहे.

एकंदर चढण काटायाला जवळ जवळ सव्वादीड तास लागतो.. वाटेंत जास्त विश्रांति घेतल्यास याहून वेळ लागेल हें साहजिक आहे. चढण संपल्यावर एकामागून एक असे दोन दरवाजे लागतात, हे पुणें दरवाजे होत. पुण्याहून येणारे लोक याच दरवाजानें किल्ल्यांत शिरत असतात, ह्मणून त्याला ‘पुणें दरवाजा’ असें नांव पडलेलें आहे. किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूला असाच दुसरा दरवाजा असून त्यास ‘कल्याण दरवाजा’ असें नांव आहे. या बाजूच्या पायथ्याजवळ कल्याण गांव वसलेलें असल्यावरू त्याला कल्याण-दरवाजा हें नांव देतात. तानाजी घोरपडीच्या सहाय्यानें दोरखंडावरून निवडक लोकांनिशीं किल्ल्यांत शिरल्यावर याच दरवाजांतून सूर्याजी मालुसरे बाकीच्या लोकांसह पहारेकऱ्यांवर हल्ला करून आंत शिरला.

पुणें दरवाजांतून किल्ल्यांत प्रवेश केल्यावरोवर उजव्या हाताला सदर लागतें. येथेंच वाटसरू प्रथम विश्रांति घेतात. गडावरचे रहिवाशी विक्रीसाठीं दूध व खवा घेऊन तयार असतातच. एकसारखी दीड तासांची चढण काढून आल्यामुळें जीव अगदीं थकलेला असतो. अशा वेळीं या दुधाचा व खव्याचा प्रवाशांना उपयोग होत असतो, हें सागणें नकोच.

पत्रव्यवहार

रा. रा. संपादक ‘भारत’ यांस–

मीं कांहीं कामानिमित्त बेळगावांस गेलों होतों. पांचसहा दिवसांमागें घरीं आल्यानंतर कांहीं मित्रांनीं आपल्या लोकप्रिय भारतांत रा. आर. एस. गुडेकर याचें प्रसिद्ध झालेलें उत्तर माझ्या नजरेसमोर आणिलें, तसेंच वैश्य मासिकाच्या शेवटच्या अंकांत प्रसिद्ध झालेला असंबद्ध मजकूरहि मीं वाचला. रा. आर. एस. गुडेकर यांच्या उत्तराला प्रत्युत्तर मीं तयार केलें होतें, इतक्यांत आपला १२ नव्हेंबरचा अंक माझ्या हातीं आल्यानंतर त्या प्रत्युतराची गरज नाहीं असें वाटलें. मीं पाठविलेल्या मजकुराला आलेलें उत्तर प्रसिद्ध करून वर्तमानपत्रकर्त्यांचा निःपक्षपातीपणा आपण सिद्ध केला असतांना वैश्य मासिकांत आपल्या विषयीं अप्रबुद्ध विधानें करून आपली नालस्ती केली आहे. त्या मजकुरावरून वैश्य मासिकाच्या संपादकाला सारासार बुद्धि मुळींच नाहीं हें कळून येतें. मासिकाचीं पानें भरून काढण्यासाठीं रा गुडेकरानीं पाठविलेल्या कवितांचा संपादक महाशयांना भरपूर उपयोग होत असेल. ह्या कृतज्ञतेची भरपाई करण्यासाठीं रा. गुडेकराची बाजू उचलून जे मूर्खपणाचे शिंतोडे आपल्यासारख्या जबाबदार वर्तमानपत्रकर्त्यांवर उडविले आहेत, त्याबद्दल वैश्यकारांची कींव करावी तितकी थोडीच आहे. मीं पाठविलेला मजकूर सत्याला धरून आहे हें फोंड्यांतील प्रत्येक व्यक्तीस माहीत आहे. आजपर्यंत फोंडेकर रा. गुडेकरांनां उत्तमोत्तम चहा कॉफी तयार करणारे देशबंधू असें समजत असून त्यानीं ही लोकसेवा अशीच अखंड चालू ठेवल्यास मीं व माझी मित्रमंडळी त्यांनां एक मानपत्रसुद्धा देण्यास तयार आहों. ज्या वेळीं मीं पाठविलेला मजकूर प्रसिद्ध झाला त्यावेळीं आपल्या चहाच्या दुकानांत येणाऱ्या प्रत्येक गृहस्थाला ते आपल्या लंगड्या समर्थनाची जाणीव करून देत असत. इतकेंच नव्हे तर माझ्या एका मित्राला त्यानीं असें सांगितलें आहे कीं, प्रसिद्ध झालेल्या कविता आपण स्वतः लिहिल्या आहेत व त्या रा. शिर्के [हे इकडे एका अज्ञात नाटक कंपनीचे तालीम मास्तर होते] त्यांना दुरुस्तीसाठीं दाखविल्या होत्या; त्या कवितांत रा. शिर्के यानीं पुष्कळ खोडाखोडी केल्या असून त्या कवितांतील बहुतेक मजकूर त्यांचाच आहे, वगैरे वगैरे. वस्तुतः त्या कविता रा. गुडेकरांनीं रा. शिर्क्यांना दाखविल्या होत्या, पण रा. शिर्क्यांची दिशाभूल करण्यासाठीं, त्या कवितांच्या मूळ स्वरूपांत मुद्दाम कांहीं थोडीफार शब्दांची अदलाबदल त्यांनीं केली होती. कांहीं चरण त्यांनीं नवे घातले होते व कांहींत थोडे चरण वगळेले होते, पण हें सर्व आपण कविता करतांना चुकतों असें रा. शिर्क्यांनां भासविण्यासाठीं केलें होतें. रा. गुडेकरांच्या ह्या हातचलाखीमुळें रा. शिर्के फसले असतील, पण इतर लोकांची त्यामुळें दिशाभूल खास होणार नाहीं. कै. सामंतांनीं लिहिलेलीं कांहीं नाटकें व निबंधहि रा. गुडेकरांच्या वाङ्मय भांडारांत आहेत. तीं पुढें मागें आपल्या नावांनें प्रसिद्ध करण्याचा त्यांचा इरादा होता, परंतु आपल्या भारतांत प्रसिद्ध झालेल्या मजकुरामुळें रा. गुडेकरांपुढें नवें संकट उभें राहिलेलें आहे. असो. वैश्यकारानीं गुडेकारांच्या नावांनें जी न्यायकोर्टाची भीति आपणाला घातली आहे ती हास्यास्पद आणि भारतपत्राच्या आजपर्यंतच्या इतिहासाचें अज्ञान दर्शविणारी आहे. ज्यांनीं सत्य गोष्टी उजेडांत आणल्यामुळें सरकारचा रोष आपणावर ओढून घेतला व पुष्कळ खटल्यांतून जे तावून सुलाखून निघाले ते काडी किंमतीच्या गुडेकरांच्या धमकावणीला भीक घालणार नाहींत हें वैश्यकारानीं लक्षांत आणावयास पाहिजे होतें; परंतु येनकेन प्रकारेण संपादक होण्याची ज्यांची इच्छा त्यांना इतकी अक्कल कशी असावी ? पत्र फार लांबल्यामुळें येथेच आटोपतें घेतों.

एक फोंडेंकर

———

The Goan Union

Na reunião dos procuradores das massas goesas, realisada sob a presidencia do sr. Bragança Cunha, no salão do Institutó Luso Indiano, de Bombaim, foi votada por unanimidade a seguinte moção:

"Considerando que a taxa denominada "Sobretaxa de Equilibrio," estabelecida por um diploma legislativo do Governo Geral da India Portuguesa representa um imposto sobre a importação de arroz, genero alimenticio da primeira necessidade especialmente das classes operárias, que constituem a grande maioria da população da India Portuguesa.

Considerando que o actual Governador da India Portuguesa anunciando em Lisbôa o seu programa do governo declarou que desejava estudar *a possibilidade de extinguir o imposto de importação sobre o arroz estrangeiro, porque não ha o direito de prejudicar a maior parte da população em beneficio de outra bem menor*; que esse mesmo governador não se julga hoje com força bastante para arcar com todas as responsabilidades das suas afirmações.

Considerando que as questões economicas nas suas relações internas e externas constituem hoje, em toda parte um dos capitulos mais importantes da actividade dos governantes; que o governo portugues na India só mediocremente se ocupa dos problemas economicos; que a crise economica da India, que é Portuguesa, não se conjura com medidas proteccionistas que podem dar lugar a uma serie de perturbações na nossa vida economica que não é autonoma, sendo apenas uma vida de prestimo; que o arroz é um artigo que a India Portuguesa não exporta mas carece de importar da India Ingleza.

Considerando que o Governo da India Portuguesa não trata de proteger eficazmente os emigrantes goeses que suprem com as suas remessas, o enorme deficit economico da India que é Portuguesa; que o numero dos emigrantes desempregados é, dia a dia, maior, e que esses desempregados que regressam a sua desgraçada terra estão colocados actualmente diante duma perspectiva grave; que o arroz vai subindo de preço e a carestia de vida aumenta em proporções desconformes com a bolsa do consumidor.

Considerando que é paradoxal a existencia do Estado da India Portuguesa com orçamentos que deixam ver que as rendas do Estado sobem anualmente, e com uma população a debater-se na mais dolorosa crise economica.

Considerando que os governos de quasi todos os paises teem procurado suavisar a situação do povo, cortando os vencimentos do funcionalismo; que o problema do funcionalismo é o mais grave e urgente da nossa vida economica; que a crise que atravessamos exige uma redução imediata de 25% no funcionalismo da colonia e uma redução de 25% nos vencimentos que excedam a cincoenta rupias mensais; que essa redução é imposta pelas circunstancias, como uma medida urgente de salvação pública; que o Governo da India Portuguesa procura fugir a medidas que outros governos têm seguido; que a imprensa indo-portuguesa, de Gôa e de Bombaim manifesta o legitimo receio, de sobejo justificado pela experiencia, de que essa sobretaxa de equilibrio que o Governo Portugues na India, acaba de criar, é uma medida tendente a fazer entrar mais dinheiro nos cofres do Estado que alimentam o luxo inutil duma burocracia que embaraça toda a acção civilisadora.

Os representantes das massas goesas, reunidos sob a presidencia do Presidente da União Goana, o mais alto corpo representativo dos emigrantes na India Britanica, deliberam protestar contra a sobretaxa

---

ब्रिटिश दडपशाहीला राष्ट्र एकसमयावच्छेदें उत्तर देण्यास पुढें येईल, हें सांगण्याचें कारण नाहीं. दडपशाहीच्या आघाताला हिंदी लोकांकडून प्रत्याघाताचें उत्तर मिळेलच. आणि दडपशाहींत न्याय्य आकांक्षा नष्ट करण्याची शक्ति वसत नाहीं, असा इतिहासाचा त्रिकालाबाधीत सिद्धांत असल्यानें, अखेर दडपशाहीच नेस्तनाबूद होईल, यांतहि किमपि संदेह नाहीं.

मात्र हिंदी लोकनीं आतां दडपशाही समोर डरतां कामा नये. सगळ्या तऱ्हेच्य स्वार्थत्यागास एका पायानें रुज्ज असलें पाहिजे. तनमनधनाची बिलकूल पर्वा न बाळगतां दडपशाहीची रग जिरवण्यासाठीं पुढें आलें पाहिजे. आपापसांतील क्षुल्लक मतभेद क्षणभर बाजूस ठेवून सर्वांनीं संघशक्तीनें दडपशाहीला 'ची ची' करण्यास भाग पाडिलें पाहिजे. तरच राष्ट्राचा निभाव लागेल. एरवीं नाहीं.

प्रसंग अत्यंत भयंकर आहे. पाशवी शक्तीचा कडेलोट झालेला असून लोकाचें सर्वस्व संकटानीं ग्रासिलें आहे. अशा प्रसंगीं सर्व जितानीं एक होऊन परसत्तेचे स्वार्थी डावपेंच हुले करून टांकण्यासाठीं एकत्र झालें पाहिजे, हें आणखीं निराळें सांगितलें पाहिजे काय?

परमेश्वर दीनांचा कनवाळू असून, तो हिंदीराष्ट्राला गतवैभव प्राप्त करून देईल, अशा आह्मांस पूर्ण खात्री आहे.

परोपकाराय पुण्याय

भारताला बहुमोल देणगी!

भारतवर्षाप्रमाणेंच 'भारत'हि अनेक तऱ्हेच्या आपत्तीनीं वेष्टिला गेला असून, केवळ परमेश्वराच्याच कृपादृष्टीनें त्याचें अस्तित्व आजवर टिकलें आहे. आणि याचें कारण ह्मणजे, ज्याप्रमाणें एखाद्या राष्ट्राच्या, समाजाच्या व धर्माच्यां सामुदायिक संकटाच्या भयंकर प्रसंगीं परमेश्वर अवतार घेऊन त्या राष्ट्राचें, समाजाचें व धर्माचें संरक्षण करितो, त्याचप्रमाणें 'भारता'च्या कठीण प्रसंगीं त्याला सक्रिय सहाय्य व सहानभूति देणारी एखादी थोर व्यक्ति परमेश्वरी प्रेरणेनें अवतरत असते–हें होय.

दीड हजार रुपये नुकसान भरपाई संबंधीं जो वाद भारत व सरकार या उभयतांत चालू होता, त्याचा निर्णय पोर्तुगाल येथें शेवटीं भारताविरुद्धच लागला! अल्पावधींत हा भुर्दंड आह्माला भरावा लागेल हें अर्थात उघड होय. पण त्यांतल्यात्यांत अत्यंत आनंदाची व आश्चर्याची गोष्ट हीच कीं, कोल्हापुरचे (कोडोली) सावकार रा. रघुनाथ वामन कुळकर्णी यांकडून 'भारता'च्या खटल्यापायींच आह्मी घेतलेली कर्जाऊ रक्कम रु. ५०० व्याजासकट त्यानीं भारतास अर्पण करून भारताच्या आर्थिक आपत्तीचें स्वरूप सौम्य करण्याचें श्रेय संपादन केलें. परमेश्वरी प्रेरणेचाच तो चमत्कार होय अशी आमची मनोदेवता आह्मांस साक्ष देत आहे.

रा. रघुनाथरावजींची देणगी बहुमोल आहे. एवढी मोठी रक्कम भारताल यापूर्वीं कोणीहि दिलेली नाहीं. ह्मणून कृतज्ञतेनें ओतप्रत भरलेल्या अंतःकरणानें आह्मीं त्यांचे कितीहि आभार मानले, तरी आह्मांस थोडेच वाटत असल्यास आश्चर्य नाहीं.

असो. सद्गदित अंतःकरण वाचा कुंठीत करीत असल्यानें, उपरोक्त दानशूरतेचा विस्तृत उल्लेख पुढें केव्हांहि करण्याचें अभिवचन देऊन, सध्या दानशूर कोडोलीकरांकडून आलेल्या देणगीची पावती जशीच्या तशी—पुन्हां एकदां त्यांचे साश्रु नयनानीं आभार मानून—खालीं देतों:—

राजेश्री गोविंद पुंडलीक हेगडे देसाई, भारतकार
मुक्काम केपे गोवा यांसी:–

पावती लिहून देणार रघुनाथ वामन कुळकर्णी राहणार मौजे कोडोली पेठ पन्नाळा इलाखा करवीर.

तुह्मी सन १९२९ सालांत ५०० रुपये घेऊन त्याबद्दल माझे नांवें जो दस्त करून दिला त्याची पावती आज रोजीं करून देतों कीं, मीं आपणास दिलेली रक्कम रु. पांचशें (५००) व त्याचें व्याज आजपर्यंतचें सर्व आपण गोमांतकांत भारत वृत्तपत्रद्वारें जी अखंड जनसेवा केलीत व करीत आहांत त्या आपल्या कामगिरीबद्दल ती सर्व रक्कम मीं आपणास अर्पण करीत आहें. त्याचा आपण प्रेमपूर्वक स्वीकार करावा.

आपली ही भारत वृत्तपत्रद्वारें चाललेली जनसेवा अशीच अखंड चालो, हेंच त्या दयाघन परमेश्वराजवळ मागणें आहे. कळावें, ही लिहून दिली पावती सही ता. ७ डिसेंबर १९३१ इसवी दस्तुर खुद्द.

रघुनाथ वामन कुळकर्णी, कोडोली.

—गेल्या मंगळवारीं येथील श्रीलक्ष्मी मंदिरांत कीर्तनभूषिता सौ. सुशीलाबाई डिग्रजकर यांच्या कीर्तन सप्ताहाला प्रारंभ झाला असून त्याला लोकसमुहाची, विशेषतः महिलावर्गाची गर्दी उसळत असत. भगिनी सुशीलाबाईंची वाणी शुद्ध, रसाळ व हृदयस्पर्शी असल्यानें तिच्या कीर्तनाचा श्रोत्यांवर सु–परिणाम होत असता, हें नमूद करण्यास आह्मांस आनंद वाटतो. बाईसारख्या व्यक्तींनीं लोकजागृतीचें पवित्र कार्य हातीं घेतल्यास तें किती अल्पावकाशांत यशस्वी होण्यासारखें असतें, याचा, प्रत्येक श्रोत्याला प्रत्यक्ष अनुभव आला, असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

—डिचोली येथील श्रीशांतादुर्गा देवस्थानच्या नवीन सोमवारच्या पालखीच्या मिरवणुकीचा समारंभ प्रतिवर्षापेक्षां जास्त उत्साहानें पार पडला. गतसालीं सदर देवस्थानच्या महाजनकीसंबंधीं वाद उपस्थित होऊन आंतील पेठेंतील वैश्य समाजाला महाजनांच्या यादींतून अजिबात वगळल्यामुळें सदर समाजानें उत्सवास वर्गणी देण्याचें बंद केलें आहे त्यामुळें ह्या पालखीच्या उत्सवास जरा खो येतो कीं काय असें वाटलें होतें, परंतु अत्यंत समाधानाची गोष्ट ही कीं, ह्या कामीं सदर देवस्थानच्या व्यवस्थापक मंडळींतील श्री. विष्णुपंत कडकडे व गजाननराव लावंडीस ह्या सभासदानीं पुढाकार घेऊन सारस्वत व दैवज्ञ या दोनच जांची वर्गणी गोळा केली. ह्या वर्गणींत एकाच बड्या सारस्वत लक्ष्मीधरानें दिली नाहीं व मिरवणूक प्रतिवर्षापेक्षां उत्सवानें साजरी करून दाखविली. हें खरच त्या उभयतांस भूषणावह आहे एक डिचोलीकर लिहितात.

ठिकठिकाणची गी[illegible]र्त

—रिवण येथील श्रीविमलेश्वर विद्या
याचा गीताजयंत्युत्सव श्री. कृ. वि. [illegible]
कर यांच्या अध्यक्षतेखालीं श्रीमहालक्ष्मी
दिरांत सार्वजनिक रीतीनें थाटानें पार पड
भारतमित्रकर्ते श्री. नारायण भास्कर नाई
यांचें 'गीतेचा उगम व तिचें महत्व'
विषयावर आणि शाळाध्यापक श्री.
कृष्णराव यांचे 'नही ज्ञानेन सदृश्यं पवि
मिह विद्यते' या गीताश्लोकावर अशीं
पणें झालीं. नंतर सोलापूर येथील प्रसि
वकील श्री. कृ. वि. करंदीकर, गोमां
गीताधर्ममंडळ व भारतमित्रकार अशा
कांकडून आलेलीं पुस्तकें विद्यार्थी मुल
वांटल्यावर समारंभ खलास झाला.

—डिचोली विद्यावर्धक मंडळ
श्रीगीताजयंत्युत्सव वे. शा. सं. रघुनाथ शा
धूपकर यांच्या नेतृत्वाखालीं ता. २०
साजरा करण्यांत आला. प्रथम शास्त्रीबु
गीतेवर प्रवचन झालें. नंतर श्रीयुत वा
राव पालेकर यांचें 'कर्मण्येवाधिकार
या विषयावर व्याख्यान झालें व श्री. क
पूरकर यांचें काव्यगायन व केळकर
रचलेला गीतेच्या महतीवरील संवाद
कडून करविण्यांत आला. तसेंच सक
८ वाजतां मुलांच्या नमस्काराचे स
होऊन त्यांत उत्तीर्ण झालेल्या मुलांना
गीताधर्ममंडळाकडून आलेलीं पुस्तकें
ण्यांत आलीं. तसेंच, हरिवाजिव गीतामुर
हें पद मुलांमुलींकडून ह्मणविण्यांत अ
नंतर अध्यक्षांनीं समारोपादाखल गी
महती वर्णन करून सांगितल्यावर जमले
मंडळीचे आभार मानून प्रसाद वांट
आला व समारंभ संपला.

—रायबंदर येथील शिवाजी विद्याल
गीताजयंती साजरी करण्यांत आली. गीत
व गोपाल कृष्णाचें पूजन झाल्यावर मु
गीताश्लोक ह्मणून दाखविले. नंतर श्री.
यानीं 'गीताग्रंथाची थोरवी' या विष
उद्बोधक असें सुबोध भाषण केल्यावर
द्यालयाचे शिक्षक श्री. परशुराम शांबा
गणकर यांचें गीतेवर भाषण झालें.
क्षांच्या हस्तें मडगांव गीताधर्ममंडळा
आलेलीं धर्मशिक्षण मालेचीं पुष्पें मु

—येत्या जानेवारींत भारताचा
भाग प्रसिद्ध व्हावयास लागणार आहे

साभार स्वीकार

पंडित मदनमोहन मालवीय (चरित्र)

केसरीचे उपसंपादक व निकोलाय लेनिन, स्वातंत्र्यदीप, सुभाषचंद्र बोस, पं. जवाहरलाल नेहरू, इ. पुस्तकांचे विद्वान व मार्मिक कर्ते रा. रामकृष्ण गोपाळ भिडे यानीं हें मालवीयजींचें चरित्र लिहिलें असून पुणें–चित्रशाळामार्फत त्याचें प्रसिद्धिकरण झालें आहे. महाराष्ट्रसाहित्य सम्राट रा. नरसिंह चिंतामण केळकर, संचालक केसरी, यानीं सदर ग्रंथाला प्रस्तावना लिहिली असून हिंदुविश्वविद्यालय [आर्टस कॉलेज वसतिगृह] हिंदुविश्वविद्यालय (सर्व कॉलेजांचें दर्शन), पं. मालवीयजी–महात्मा गांधी आणि भागोजीराव कीर– न. चिं. केळकर– पं. मालवीय–चैडिमहाराज, यांचीं पुस्तकांत छायाचित्रे देण्यांत आलीं आहेत. शिवाय मुखपृष्ठावर मालवीयजींचा सुंदर फोटो देण्यांत आला आहे.

मराठी भाषेवरील असामान्य प्रभुत्व, ऐतिहासिक ज्ञानाचा भरपूर पुरवठा आणि शास्त्रोक्त विवेचनपद्धति या चरित्रलेखक भिडे यांच्या अंगीं वसत असलेल्या तीन गुणांमुळें त्यांचा हाहि ग्रंथ वाचनीय व राष्ट्रीय वृत्ति परिपोषक असाच उतरलेला आहे. ज्या सर्व सार्वजनीक गोष्टींशीं मालवीयजींचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध आला व आहे, त्यांचें खुलसेवार वर्णन प्रस्तुत चरित्रांत संकलित झालें आहे. त्यामुळें पंडितजींच्या श्रेष्ठ योग्यतेचें ज्ञान होऊन वाचक साश्रु नयनानें व कृतज्ञतापूर्ण अंतःकरणानें त्यांच्या पवित्र चरणासमोर मान लववितात.

विषयोद्घाटन, जन्म व कुलवृत्तांत, हिंदु विश्वविद्यालयाची स्थापना, हिंदुसंघटन, स्वराज्यार्थ प्रयत्न, कायदेमंडळांतील लोकसेवा, कमिशनांपुढील साक्षी व काम, पंडितजी व कायदेभंग, उपसंहार व परिशिष्ट (सुभाषितें व प. मालवीय व महाराष्ट्र) असे चरित्राचे दहा विभाग पाडण्यांत आले असून ‘ आदर्शभूत हिंदु व्यक्ति, हिंदुसभेचे कट्टे पुरस्कर्ते व सर्वांत विशेष ह्मटलें ह्मणजे बनारस हिंदु युनिव्हर्सिटीचे संस्थापक या दृष्टीनें पाहतां पंडितजींचा हात कोणीहि धरूं शकेल असें वाटत नाहीं ’ असें जें प्रस्तावनाकार तात्यासाहेब केळकर यानीं ह्मटलें आहे त्याचें सत्यत्व उपरोक्त विभागांच्या वाचनानें कोणालाहि सहज पटतें.

एवंच, भिडे यांचा हाहि चरित्रग्रंथ त्यांच्या लौकिकास साजेसाच झाला असून महाराष्ट्रीय व गोमांतकीय जनता त्याला आस्थापूर्वक हातभार लावून वाढत्या राष्ट्रीय वृत्तीला विशेषच तजेला आणतील अशी आह्मांस उमेद आहे. पृष्ठसंख्या १९० कि. ८ आणे. प्रकाशक व मुद्रक शंकर नरहर जोशी, चित्रशाळाप्रेस १०२६, सदाशिव पेठ, पुणें शहर.

नो मशालजी, नो भाई, पण "महामारी"

ले.— चक्षु

सर्वमान्य ‘भारत’ पत्रांत रजिदोर साहेबांसंबंधीं प्रसिद्ध झालेल्या अन्योन्य विरोधी अशा दोन लेखांच्या लेखकांपैकीं, एका लेखकास हे रजिदोरबाब ‘शंखासुराचे मशालजी’ दिसले तर दुसऱ्यास ‘वकासुराचे भाई’ वाटले. दोघांचेंहि ह्मणणें खरें. पण याहि शिवाय एक ‘न्याराच पंथ’ आहे.

रजिदोरांच्या मुख्य जाती दोन. पैकीं ‘शंखासुराचे मशालजी’ सारखी वाटते ती पिढिजाद ह्मणजे आजोबांपासून पणतुरापर्यंत परंपरागत पुरुष रजिदोरी चालवीत आलेले ही एक जात. ह्यांच्या उदरांत सबंध हत्ती सुद्धां वर शेपूट न दिसतां सहज पचून खाक होतो. एकाद्याच्या घरावर त्याची नजर फिरेल तर ती इमारत तेथें एकदां होती असें सिद्ध करण्यास तिच्या पायाचा पुरावा सुद्धां दिसणार नाहीं ! इतकें असूनहि साठ हजार खेड्यांचें अन्न खाणाऱ्या दुर्वासांप्रमाणें सदांच आपण उपवाशी असें जगास भासविणारे हे रजिदोर, त्या स्थितप्रज्ञ किंवा वस्तुस्थितीकडे कानाडोळा करणाऱ्या गृहस्थास सबंध दिसून त्यांची त्यास कळकळ वाटते.

प्रत्येक साधनांत ‘स्वार्थ मयार्थ’ करणारे आडवारगीर ह्मणून कच्चे जातीचे रजिदोर ‘वकासुराचे भाई’ गणले गेले असतील, पण हा त्यांच्या वर्तनाचा व पहाणारांच्या दृष्टिकोनाचा दोष आहे. वस्तुतः दोन्ही जातींच्या रजिदोरींची फलश्रुति कमजास्त मानानें एकच ! स्पर्श केलेली वस्तु जाळून भस्म करावी हा जसा अग्नीचा जन्मसिद्ध स्वभावधर्म त्याचप्रमाणें रजिदोरीचाहि. धडाडलेला त्वरित जाळतो तर मंदाग्नि आस्ते कदम जाळतो इतकेंच. हें मीं मुद्दाम एक त्रयस्थ या नात्यानें लिहीत आहें, कारण उभय लेखकांची दिशाभूल होऊन हें प्रकरण पुढें चिघळूं नये. बाकी, या वादांत भाग घेण्यास मला खालील गोष्ट भाग पाडीत आहे:–

कांहीं वर्षांमागें श्रीरामनवमीच्या उत्सवानिमित्त मीं पर्तगाळ येथें गेलो होतों. तेथून मझ्या एका गड्यासह भुपर वाड्याचे मार्गानें परत येत असतां एका खेड्यांतील एका शेतकरी कुणब्याचे येथें मुक्कामास राहिलों. ती वेळ भर दोन प्रहरची. आह्मी दोघेहि डोंगराळ मार्ग आक्रमून थकलेलों. तत्पूर्वी सर्व पाकसामुग्री आह्मापाशीं जय्यत होती. पाणीहि श्रीकृपेनें जवळपासच होते. फक्त पाहिजे होती ती पाणी आणण्यासाठीं एक कळशी. त्या घरच्या मालकापाशीं आह्मीं कळशीची मागणी केली.

आमची मागणी ऐकून मालक ह्मणाला ‘‘जरा दम खा. ह्या गावांतील सर्व माणसें आज एका गडबडीच्या कामांत गुंतली आहेत; त्यांत आमच्याहि घरची सर्व मंडळी आहे. घरीं कोणी नाहीं. अमलदारानें येतील. मग आपणास कळशी मिळेल.’’

त्याचें आमच्याशीं हें भाषण चाललें आहे तों दहा पंधरा पुरुष स्त्रिया व मुलें अशी मंडळी त्या ठिकाणीं आली; पण तीं सगळींच माणसें अत्यंत भयभीत, चिंतामग्न व दीनवाणी बनलीं होतीं. आह्माकडे कोणीच पाहिना व बोलेना. मात्र घरांतील दाणा गोटा वगैरे झाडून सारी चीजवस्त, बळलेल्या शेळी (दोन्या), गुरांस बांधण्याचीं दावीं, शिकीं व केवणीचे दोरसुद्धां पळवून दुसरीकडे नेण्यासाठीं भराभर ती मंडळी बाहेर काढूं लागली. आमची दाद कोण व कशी घेणार ?

पण ह्या धांवपळीचा अर्थ समजून घेण्याची आमची इच्छा तीव्रतर झाली. कोठलें जेवण आणि कोठलें खाण ! घर धन्यास या प्रकारासंबंधीं माहिती विचारूं लागलों. पण तो मंदाग्नीच्या आगटी [पळी] पाशीं घोंगडीवर आंग टाकून पडल्याजागीं विनारा स्तब्ध होता.

अंत्रूज महालांतील मीं गुरव जातीचा असल्याची मजविषयींची माहिती त्याला कळलीच होती. थोड्या वेळानें तो कुणबी ताडकन उठून बसला व चोंहींकडे चौकस दृष्टिक्षेप केल्यावर ह्मणाला:— ‘‘बाबा ! उद्यां इकडे ‘महामारी’ची फेरी व्हावयाची आहे. तिचा जासूद येऊन, उद्यां सर्वांस घरीं राहण्याचा हुकूम फर्मावून आतांच गेला.’’

या त्याच्या बोलण्यानें तर मीं अधिकच बुचकळ्यांत पडलों. कुणबी पुढें सांगूं लागला:— ‘थांबा, गोंधळूं नका. सगळी कर्मकथा सांगतों. पण ती सबंधीं कोणाकडे ‘ब्र’ काढणार नाहीं असें वचन द्या.’ मग कुणब्या शेजारीं असलेल्या आगट्यांतील अग्निनारायणासमक्ष मीं ‘वचन’ देतांच कुणबी उद्गारला: ‘रजिदोरबाबांची धाड या आमच्या गावांवर उद्यां फिरणार आहे.ही फेरी वर्षांतून दोनदां होते. बाबांच्या नजरेस पडलेली वस्तु न सांगतां न सवरतां ते ती उचलल्याशिवाय राहात नाहींत. या तऱ्हेनें गोळा केलेल्या जिनसा त्यांच्या घरीं एक पै न घेतां पोंचवाव्या लागतात. येते वेळीं भुकेल्या पोटास आह्मांस कांहीं मिळायाचें नाहीं. तांदूळ व प्रवास खर्च स्वतः बरोबर घेतला पाहिजे. अशीहि पिडणूक आहे’. इतक्यांत सवडींत सवड काढून त्यानें आह्मांस कळशी देवविली. मग मीं माझ्या कामास लागलों. कुणब्याचे झोंपडी मागचे बाजूस, पिकून तयार झालेल्या कागदी लिंबूंनीं बहरास आलेलें लिंबूचें झाड होतें, त्यांतील दोन लिंबू मीं मागितले असतां तो ह्मणाला:— ‘बाबा दिले असते, अगदीं अवश्य दिले असते, पण त्या पाप्याची नजर त्या झाडावर केव्हांच गेली आहे ! सकाळीं आलेला महामारीचा (रजिदोर बाबाचा) जासूद लिंबू मोजून त्यांतला एकसुद्धां कमी होईल तर खबरदार अशी धमकी देऊन गेला आहे ! कमी होतील त्या लिंबूंची प्रत्येकीं चार आणे किंमत रजिदोरबाब चापून वसूल करतील. व या मार्गें केलीहि आहे; ह्मणून भीति वाटते. या त्याच्या फेरीशिवाय, सिंहाच्या प्रसादानें गज मस्तकीं आरोहण करणारा बोकड, तासिलदारमामा, हातर कमीतकमी महिन्यास दोन खेपा वरिष्ठांस केळीं, लोणी, तूप या जिनसा पैदा करण्याचे निमित्तानें आह्मांस पाहुणा लागतोच. त्याची मिजास तर विचारूंच नका. बिचारा घरीं काय खातो देव जाणें; मात्र आमच्या येथें त्यास भाताच्या तांदुळाशिवाय ग्रासच जात नसतो. माथ्यावरील सवित्यापेक्षां पायांतळची मातीच विशेष त्रासदायक हें सर्वांसच ठाऊक.’’

रजिदोर लोकांच्या मासेलवाईक लीलांचा उपरोक्त वृत्तांत त्या कुणब्याकडून समजतांच मीं थक्क होऊन गेलों. मजबरोबरचा गडी तर जागचेजागींच मुकल्याप्रमाणें झाला.

वाचकहो, वरील गोष्ट दंतकथा नव्हे; ‘चक्षुर्वै सत्यम्’ अशी आहे. ‘शंखासुराचे मशालजी’ किंवा ‘वकासुराचे भाई’ ह्या नामुनधी संज्ञापेक्षां, पोटास चिमटा बसलेल्या वेदनेनें त्या गरीब कुणब्याच्या मुखांतून निघालेली स्वानुभवाची ‘महामारी’ हीच संज्ञा या रजिदोरांस विशेष सार्थ होत नाहीं काय ?

सेंत्र येदुकादोर द प्रियोळ

जाहीर झाल्याप्रमाणें वरील संस्थेची सभा गेल्या महिन्याच्या २२ तारखेस संस्थेच्या दिवाणखान्यांत भरली. सभेच्या कामास रीतसर सुरवात झाल्यावर, इमारत–फंड–कमिटीकडून इमारतीचे हिशेब दाखल करण्यांत आले. व्यवस्थीतपणें हिशेब तपासून झाल्यावर सभेकडून त्यांना मंजूरी मिळाली. उपरोक्त कमिटींतील प्रो. शणू भरणे व दो. बाळू केळेकर या सद्गृहस्थानीं अतिशय काळजीपूर्वक व निःस्वार्थबुद्धीनें इमारतीचें काम पार पाडल्याबद्दल, सभेकडून त्यांचे आभार मानण्यांत आले. व या अर्थाचा एक ठरावहि एकमतानें पास होऊन संस्थेच्या दप्तरांत नमूद करण्यांत आला. त्याचप्रमाणें फंडाचे हिशेब लगेच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्याचें ठरलें. प्रस्तुत सेंत्र येदुकादोर संस्थेनें इमारत–फंड–कमिटीला ८६१ रुपये देणें होतात. त्यांपैकीं, संस्थेचे हितचिंतक सभासद श्रीयुत शिवाजी त्रि. केळेकर यानीं ५०० रुपये मुंबईहून पाठविण्याचें अभिवचन दिलें आहे, असें संस्थेच्या सेक्रेटरीकडून सभेला कळविण्यांत आलें. त्यावेळीं टाळ्यांच्या गजरांत सभेकडून त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन झालें. बाकी राहिलेल्या ३६१ रुपयांसंबंधीं बराच खल झाला. पण निर्णयात्मक असें कांहीं न ठरल्यामुळें, पुन्हां सभा बोलावण्याचें ठरून, सभेनें काम संपविण्यांत आलें.

The Times of India—, acaba de abrilhantar as suas colunas com a fotogravura dum *conego—empreiteiro* que, a ...m, vai conquistar uma fama universal.

¡ Um *conego-empreiteiro* fotografado no *Times* !

O estranho caso, como natural era, fez sensação. Comentarios de toda a sorte e casta começaram a ser bordados em volta do *prodigio*.

Até não faltou quem atribuisse o *milagre* ao *meu santo* do mesmo *conego-empreiteiro*.

Plaudite, cives, que o *empreiteiro* de bátina negra e de coração não sabemos de que côr -forçou as portas de gloria, por conta e risco do grande diario da cidade cosmopolita !

Sim, aplaudi, cidadãos, que o *Bharat* vai, tambem, fazer o mesmo— para entretenimento publico !

Tenente Pedro A. Lopes

Desde que assumiu o comando de policia deste concelho o sr. Tenente Pedro Antonio Lopes, tem sensivelmente, escasseado aqui o numero de queixas. Os mais delicados e intrincados conflitos que entram pelos umbrais do comando harmonisam-se a contento dos interessados, pela escrupulosa, conscienciosa e imparcial intervenção do pundonoroso oficial, personificação de honradez e honestidade.

A única preocupação do sr. Tenente Lopes é honrar e prestigiar a classe a que pertence, procurando, sempre, manter a ordem pública na sua jurisdição e atender, prontamente, ás reclamações dos seus jurisdicionados.

Isso que aqui fica registado é o *substractum* da Opinião Publica cujo juizo se aproxima, ordinariamente, da realidade positiva.

Ao sr. Tenente Lopes vão porisso as mais calorosas felicitações do *Bharat*, pelo bom nome que soube alcançar no concelho onde dignamente exerce as suas funções.

Onde estamos ?

Sob a epigrafe de "Delegado de I. P. em Chinchinim," lê-se no nosso presado colega *A India Portuguesa*, entre outras coisas, o seguinte.

"A politica local vai tomando ares escandolosos sob a égide do actual governo.

Pois em menos de seis meses é exonerado o delegado de I. P. em Chinchinim o distinto advogado sr. Euclides Cota, o mesmo que tendo exercido a contento geral êsse lugar largo tempo, por motivos politicos fôra exonerado.

....

Mas o *BolOff.* d e 8 do corrente exonera o, e porque, imagina o leitor ? ¡Pelo especioso pretexto de *não possuir qualquer dos cursos complementares do Liceu ou qualquer curso superior* !—

Ideia genial, que não nos parece ser da autoria do Director de I. P. sr. Prudente. E' sabido que a prudencia do sr. Prudente é inspirada por certos politicos.

Ora vejam que temos tantos delegados da Instrução em varias freguesias como de Majordá, Betalbatim, Colvá, Varcá, Orlim, etc., onde nenhum deles possue qualquer dos cursos complementares do Liceu e qual será a razão de o sr. Prudente ainda não se ter bulido com eles ? Como se explica a exoneração só dos delegados quando pertencentes ao P. I. de Salcete e nomeados os de facção adversa !

DR. RAUL A. CORREIA

Todos o sabem. *O Bharat* não cultiva a lisonja. Detesta o *salama tipicamente oriental*. E' inimigo figadal do *salamal que*.

Isso, porem, não quere dizer que o *Bharat* regatê os encomios aquem, por suas incontestaveis virtudes, torna se deles merecedor, por consciente consenso publico.

Assim, apraz-nos focar, hoje, nas modestas colunas do nosso jornal, a ilustre e inconfundivel personalidade do sr. Dr. Raul A. Corrêa, como juiz de direito desta comarca.

Sua Excia. é um julgador a valer : um verdadeiro juiz, na rigorosa acepção da palavra. Escrupulo rigoroso e estudo consciente das causas submetidas ao seu *veridictum*, constituem a nobre carateristica do integro magistrado.

Como juiz humano que o é, o sr. Dr. Raul A. Corrêa não é infalivel; mas o cuidadoso, aturado e persistente esforço que o digno juiz, absolutamente alheio ás influências do meio, desenvolve no exercicio das suas funções e no seu gabinete de trabalho,-tem-no tornado alvo de admiração e respeito gerais.

O Bharat, interpretando o sentir publico, presta, tambem, a sua homenagem de respeito e consideração ao sr. Dr. Raul A. Corrêa, um dos brilhantes ornamentos da magistratura judicial, fazendo os melhores votos para que se mantenha intangivel o subido e prestigioso conceito que Sua Excia conquistou, durante pouco tempo, nesta comarca.

---

inferior qualquer raça que não fosse a sua; que cultivou sempre até ao extremo os previlegios das classes; o povo cultor, por excelencia, com a rigidez do dogma, das pragmaticas, das irrepreensiveis maneiras sociais, da indumentaria impecavel e austera,especialmente nas suas funções oficiais;esse povo que sob a capa da Correcção, mais profundamente praticou o Desprezo; esse povo, finalmente, viu se obrigado a receber Ghandi, semi-nú, de raça inferior, segundo eles !

Mas não só recebe lo. Honra-lo, senta lo á mesma meza com as suas figuras mais representativas, e ouvi-lo. Mas não só isto ainda:— fazer o que ele diz o que ele quer !

Orgulho humano, cuja expressão maxima é o orgulho inglês, que de lições graves te não preparou a Sorte, ou a consequencia fatal da propria função da existencia.

Fazem se esforços sobre-humanos para deter o declinio, remediando os males ? Sem duvida Porém, nada o evitará. Com a Grande Guerra acabaram todos os grandes imperios. As causas são multiplas de caso para caso; porém tanto é dificil mante-los, como formarem-se nesta epoca da Historia, as grandes unidades até agora existentes. A questão indiana avançou demais para que possa sofrer retrocesso util ao pais dominador. A divisão dos mercados operada gradualmente por circunstancias as mais diversas, é, na grande resultante, evolução, que não se detem nem se arreda.

E assim a grande crise britanica, crise de varias faces não terá cura com panaceias de qualquer genero. E' evolução, é declinio, é a sorte fatal de tudo que foi grande e que tem de deixar de o ser !

(*D'O 19 de Junho*)

"Tempero prodigioso"

E' este um produto que a *Gôa Trading "C"*. fabrica na cassabé do concelho. Na sua preparação entram só drogas nativas que espevitam o sabor dos pratos em que se emprega o *Tempero prodigioso*.

Experimentamo-lo e é nos grato constatar que o mesmo *Tempero* se recomenda por sua excelente qualidade, porque, além de tornar saborosos os preparados de cosinha, abrevia o tempo de preparação.

Agradecemos a oferta duma lata do *Tempero* com que a Companhia nos obsequiou.

Sacarama S. Natecar

Este conhecido e rico comerciante, de Mapuçá, acaba de dotar o Templo hindú de Sri Maruti daquela vila com o donativo de dez mil rupias. A oblata destina se ao toque permanente da musica hindú —*chouguddà* — durante três vezes ao dia.

O rasgo da generosa religiosidade do sr. Natecar é digno de especial menção, porque parte de quem se fez *alguem*

व — वें. अंक ३९
१ डिसेंबर सन १९३१

णीचे दर
सह ३ रु. [आगाऊ]
अंकास १ आणा.

र– समक्ष अगर पत्रद्वारे.
त्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध
ा जाणार नाहीं.

ादक व मालक
गो. ५. ...डे देसाई– फा ्मासेवतिकु
मुद्रण व प्रकाशन भारत–प्रेस कुसमण केपें गोवा.

भारत
O BHARAT

Ano 16 Nº 39
QUINTA-FEIRA 21 de Dezembro 1931

ASSINATURA
Por cada ano tres rupias.

DIRECTOR E PROPRIETARIO
G. P. Hegdo Dessai
FARMACEUTICO

COMPOSICAO E IMPRESSAO
TIP. *BHARAT* CUSMANE-QUEPEM

da sua avaliação os seguintes bens;— Direito á metade do predio da varzea denominado "Mangpatoli" da cultura de arroz, avaliado por 300 rupias; Direito á metade do predio; da varzea denominado "Nigolsor do" da cultura de arroz, avaliado por 50 rupias;— Metade do predio rustico denominado "Gainguina-tocxima" consistente em tres adições; a primeira cultivada para arroz, em duas novidades avaliado por 500 rupias; a segunda cultivada para arros na novidade de sorodio, avaliado por 200 rupias; e a terceira cultivada de arequeiras, avaliada por 100 rupias no total de 800 rupias; Direito a um sexto do predio denominado "Vangona-batoi" da cultura de arroz, avaliado por 100 rupias;— e Direito a metade da metade do predio rustico denominado "Atodentil xir" da cultura d e palmeiras e outros arvores, avaliado por 50 rupias, todos situados em Rivona e discritos respetivamente na conservatoria desta comarca sob os nos. 5837, 5838, 4575, 6960 e 18182 e penhorados nos autos civeis de execução por custas que o M P. nesta comarca move a Padmavati Porbina Dessaina e outra de Rivona, por apenso aos do traslado dos autos civeis de acção de manutenção de posse, em que foram autores Zoivonta Soirú Porobo Dessai e mulher de Rivona e reus Vitú Rannm Porobo Dessai e mulher da mesma, para pagamento da quantia de 576$92 proveniente de custas do Supremo Tribunal de Justiça e o acrescido da execução O arrematante pagará a contribuição de registo nos termos da lei e as despezas da praça além do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaesquer credores incertos e co-proprietarios e os representantes dos credores falecidos Govinda Rama Canotim, casado, proprietario, morador em Cacorá e Ananta Naraina-Boto, solteiro, proprietario de Rivona, sendo a fávor do primeiro se acha registada uma hipoteca no livro C seis a fls. 48 sob a inscrição n° 1578, registada em 13 de Setembro de 1898 á segurança da quantia de 175 rupias a favor do segundo se acha registada tambem uma hipoteca no livro C doze a fls. 63 v. sob a inscrição n° 4508 registada em 11 de Setembro de 1913 á segurança da quantia de 150 rupias. O que para ser publico se expediu este. Quepém, 15 de Dezembro de 1931.

O escrivão do 2° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei a exatidão

O Juiz de Direito

Raul A. Correia

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio Carapurcar, vão á praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca, no dia 15 do seguinte mes de Janeiro, pelas 9 horas, pela primeira vez e pelo preço superior ao da avaliação os seguintes bens. Predio 'Urbano" da cultura de coqueiros e outras arvores, avaliado por 50 rupias;— Direito a 1/9 da primeira adição de 1/3 do predio rustico dénominado "Bandol Nocodbab" da cultura de coqueiros e outras arvores avaliado por 40 rupias;— Direito a 1/9 da 2a. adição de 1/3 do predio rustico denominado "Bandol Nocodbab" da cultura de coqueiros e outras arvores frutiferas, avaliado por 40 rupias;— Direito a 1/8 da 3a. adição do predio rustico denominado "Bandol Nocodbab" da cultura de coqueiros e outras arvores, avaliado por 30 rupias;—Direito a 1/8 da 4a. adição do predio rustico denominado "Bandol Nocodbab" da cultura de coqueiros e outras arvores, avaliado por 35 rupias,— Direito a 1/8 de 5a. adição do predio rustico denominado "Bandol Nocodbab" da cultura de coqueiros e outras arvores, avaliado por 30 rupias;— Direito a 1/8 de 6a adição do predio rustico denominado "Bandol Nocodbab" da cultura de coqueiros e' outras arvores, avaliado por 35 rupias —Direito a 1/8 da 7a. adição do predio rustico denominado "Bandol Nocodbab" da cultura de coqueiros e outras arvores, avaliado por 40 rupias;— Direito a 1/9 da 1a. adição do predio rustico denominado "Durga Nocodbab" da cultura de coqueiros e outras arvores, avaliado por quarênta rupias; —Direito a 1/9 da segunda adição do predio rustico denominado "Durga Nocodbab" da cultura de coqueiros e outras arvores, avaliado por 30 rupias;— Direito a 1/9 da 3a. adição do predio rustico denominado "Durga Nocodbab" da cultura de coqueiros e outras arvores avaliado por 40 rupias —Direito a 1/9 da 1/2 da 1a. adição do predio rustico denominado "Xiró" da cultura de arroz avaliado por 30 rupias e Direito a 1/9 da 1/2 da 2a. adição do predio rustico denominado "Xiró" da cultura de arroz avaliado por 30 rupias, todos situados em Curpem, discritos respectivamente por inteiro na Conservatoria desta comarca sob os nos. 18246, 18247, 18248, 18249, 18250, 18251, 18252, 18253, 18254, 18255, 18256, 18257, e 18258 e penhorados nos autos civeis de execução por custas, que o M. P. nesta comarca move a Sangtú Velipo, de Curpém e outra por apenso aos de acção do processo ordinario que Martinho Fernandes de Sirvoi intentou contra o dito Sangtú e outros, para pagamento da quantia de 47 rupias. 5 tangas 6½ reis e de custas e sêlos acrescidos da execução.

O arrematante pagará a contribuição de registo nos termos de lei e as despesas da praça alem do preço da mesma dentro de três dias. Por este são citados quaesquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este. Quepém, 14 de Dezembro de 1931.

O escrivão do 2° oficio

Mucunda Sinai Carapurcar

Verifiquei a exatidão

O juiz de direito

Raul A. Correia

Ano XVI) Quinta-feira, 31 de Dezembro de 1931 (N.° 39

O BHARAT

Jornal de maior circulação

Director e Proprietario
Adv. *Govinda P. Hegdó Dessai*
FARMACEUTICO
Formado pela Escola Médica de Nova-Gôa

ASSINATURA ANUAL
Edição marata-portuguesa 3-00-00
Edição portugueza 1-08-00

REDAÇÃO E ADMINISTRAÇÃO
COMPOSIÇÃO E IMPRESSÃO
Tip *BHARAT* Cusmane-Quepém

Ecos-e-Critica

Para refletir...

Sob a epigrafe *Prostituição* — lê-se na ultima edição de *A Vitoria*, da direcção do nosso presado Amigo Dr. Antonio Furtado, o seguinte:

"A prostituição feminina foi sempre um assunto que nos mereceu uma grande atenção.

Não compreendemos como um pais que regulamenta a prostituição se possa jactar de civilisado, como não compreendemos, porque isto nos vexa e nos humilha, a regulamentação de outros vicios.

Como a prostituição da mulher é já um assunto debatido, nós resolvemos então tratar aqui de uma outra prostituição: a masculina! Não se trata, pois, da venda do corpo, mas apenas do leilão das consciencias!

Para nós, que defendemos a liberdade de pensar livremente visto que a liberdade de consciência, é a mais bela conquista dos homens do nosso tempo para nós é sempre agradavel vêr um homem que se impõe pelo seu caracter e pela firmeza dos seus principios. Em contraposição. nós encontramos, de quando em vez, muitos homens que, se não se vendem — é, simplesmente... porque não encontram comprador. ..."

———

E sob a de—*Meditações Natalicias*, o jornal metropolitano *A Verdade* escreve o seguinte:

"Sabemos de sobra que a nossa acção jornalistica se exerce numa atmosfera restrita e esse facto é de molde a não nos iludir quanto á influencia dessa acção.

Em Portugal é assim. O trabalho do espirito, quando realisado numa intenção depuradora, de apostolado social, passa despercebido. E se isto nos confrange, a realidade mostra-nos que as coisas não podem suceder de modo diferente, visto que o maior inimigo do progresso, nesta terra á beira mar plantada, é a ignorancia inocente da maioria dos seus habitantes"

Quem pode ?

O incidente divertido do cordão, dado por ocasião da inauguração do monumento de F. L. Gomes, tem provocado *écos* de variado tom.

Isso não admira. Porque se *é facil tapar a bôca dum poço, é impossivel silenciar o infinito número das linguas dum rio.*

Quot capita ot sensus. E o *cretinismo* dalguns não recuou, até, a fazer autora do incidente a intervenção do sr. Patriarca na solenidade da inauguração do monumento — festa de natureza civica, festa em que foi extemporanea — coscuvilha se — a presença do ilustre prelado católico.

Em fim, ¿ quem pode silenciar as linguas desse grande rio que representa a *Opinião Pública*, nos tempos liberais que correm ?

¿ Quem pode ?

Plaudite, cives !

O diario monstro e circulação mundial, de Bombaim.—

A DERROCADA DUM GRANDE IMPERIO!...

Esperada, há já longo tempo, por estadistas e pelos espiritos mais cultos do Mundo, é chegada ao povo que, na historia da Humanidade, mais alto levantou o Orgulho humano, a primeira hora de dolorosa humilhação.— "Quando a Fortuna põe o homem a cavalo, monta lhe nas ancas o Orgulho, mas a breves passos cai quem traz tão mau picador na garupa".

E, como sempre sucede, e o adagio o afirma:— a desgraça nunca vem só. Ao lado do crescente desequilibrio da balança comercial a contar, principalmente de 1925 em diante, criou-se o inevitavel desequilibrio orçamental, aberto em chaga precisamente no momento em que outras dificuldades graves se apresentavam, ameaçando a existencia do proprio Imperio.

No declinio, são inevitaveis as humilhações, e estas tanto mais dolorosas quanto mais se alimentou o Orgulho, e quanto mais este se fez sentir aos menos fortes ou menos afortunados. Esta divida do Povo Britanico para com os seus irmãos na vasta familia humana, fartamente contraida, individual e colectivamente, começa agora a liquidar-se. Lei imutavel rigida e severa, que a historia registou em todos os tempos, e que mais uma vez se cumpre.

A's primeiras medidas da vigorosa politica de compressão de despezas correspondeu a indisciplina da marinhagem, fenomeno que jámais se julgara possivel. Aos actos de indisciplina, seguiu-se, sem a mediação de um turno solar, a primeira manifestação grave de desconfiança, com a retirada no dia seguinte de muitos milhões dos Bancos da *City*, retirada que se acentuou tão assustadoramente em dois dias, que se tornou necessario recorrer, sem perda de tempo, ao abandono do regimen do ouro. Ao passo que no periodo antecedente a 1925, no decurso da desvalorisação do esterlino, esta mesma medida não chegara a dar 10 por cento de redução de valor, hoje excedeu 20 por cento, logo de entrada indicando iniludivelmente, a existencia daquela desconfiança.

A disciplina, que se julgou sempre intangivel; o Esterlino que se julgou sempre o fulcro imutavel de todo o giro financeiro do Mundo; revelaram-se, a final, nada terem de superior á condição necessaria de fragilidade de todas as coisas humanas. Curso fatal de toda a Criação.

Mas, a par destas humilhações dolorosas para o Povo que em toda a historia da Humanidade mais levantou o seu orgulho individual e colectivo, surge ess'outra humilhação tremenda: Ghandi ! O Povo que julgou sempre inferior tudo quanto não fosse genuinamente inglês; que julgou sempre

146-382

URGE DESVENDAR O SECREDO

O sr. Governador Geral General Craveiro Lopes exonerara ao sr. adv. Mariano da Piedade Rebelo, administrador dêste concelho, do cargo de 1 ° substituto do juiz de direito da comarca de Quepém, *porque as suas funcções haviam sido consideradas incompativeis com o cargo de administrador do concelho.* (*Boletim Oficial*, n ° 91, do mez de Novembro de 1930).

Mas—surpresa das surpresas!— o mesmo sr. Governador Geral acaba de tornar a nomear ao mesmo sr. Rebelo para o mesmo cargo de 1 ° substituto do juiz de direito "cujas funcções foram consideradas incompativeis com o cargo de administrador do concelho." (*Boletim Oficial*, n ° 102, de 22 de Dezembro de 1931).

Pergunta-se, agora: ¿ Como nasceu e morreu, dentro dum ano, a *incompatibilidade* dum administrador concelhio ser nomeado 1 ° substituto do juiz de direito da comarca onde exerce as suas funcções ?

Urge desvendar esse segredo, para que criticos de má morte não vão acusar de *inconstante* a acção governativa de Sua Excia.

---

no nosso meio comercial, só por seu esforço e saber individuais.

Registando, porisso, com prazer, nas nossas colunas, a importante dadiva do sr. Sacarama Sadassiva Natecar, apresentamos a êste as mais sinceras e cordiais felicitações.

Anuncios

O BHARAT, ano XVI no 39 de 31 de Dezembro de 1931

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar, vão á praça para venda em hasta publica, á porta do tribunal judicial desta comarca, no dia 19 do seguinte mez de Janeiro pelas 9 horas pelo maior lanço que se oferecer acima do seu valor os seguintes bens: Predio rustico denominado "Gotou" da cultura de arroz, avaliado por 50 rupias; Predio rustico denominado "Vantop" da cultura de arroz, avaliado por 60 rupias; Predio rustico denominado "Gotou" da cultura de arroz avaliado por 50 rupias; Predio rustico denominado "Vaingoni bandi" ou "Tarchobandi" da cultura de arroz e tem uma carreira de palmeiras, avaliado por 350 rupias; e Predio denominado, "Noviabando" da cultura de coqueiros avaliado por 40 rupias, todos situados em Mulem de Parodá, discritos respectivamente na conservatoria desta comarca sob os nos. 15155, 15156, 15157, 6424 e 6425 e penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Crisna Xexi Naique Curadó, de Cuncolim, como cessionario do exequente Tito Rafael José Antonio Vás de Assolnã, move a Govinda Ramaraia sinai Corongotó, sua mulher e outros de Parodá e Curpém, a segurança da quantia de 1704:08:00, seus juros, penas e custas da execução. O arrematante pagará a contribuição do registo nos termos da lei e as despezas da praça além do prêço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaesquer credores incertos e co-proprietarios. O que para ser público se expediu este. Quepém, 14 de Dezembro de 1931.

O escrivão do 2 ° oficio
Mucunda Sinai Carapurcar
Verifiquei a exatidão
O juiz de direito
Raul A. Correia

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar, nos autos de inventario orfanologico a que se procedeu por falecimento de Gopala Dessai, que foi de Uguem em que foi inventariante e cabeça de casal Orzuna Dessai do mesmo lugar por apenso aos do inventario orfanologico procedido por obito de Abolem Dessaina que foi da mesma, a requerimento dos interessados Raibá Gopala Dessai e Sotiabaina viuva de segundas nupcias do dito inventariado Gopala e por deliberação do conselho de familia tomada em sessão de 28 de Julho último vai á praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca no dia 8 do seguinte mez de Janeiro, pelas 9 horas pelo maior lanço que se oferecer acima do seu valor o direito a 3/16 de 1/140 avo do predio denominado "Bissugale ou Bedsugale" sito em Uguem do concelho de Sanguem da cultura de coqueiros e arroz do valor de 9:06:00 discrito por inteiro na conservatoria desta comarca sob o n ° 1939 a fls. 241 v. do livro B dois velho e aplicados aquelos 3/16 no referido inventario aos interessados menores Visnum, Anem e Govinda. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este. Quepem, 12 de Dezembro de 1931.

O escrivão do 2 ° oficio
Mucunda Sinai Carapurcar
Verifiquei a exatidão
O juiz de direito
Raul A. Correia

Pelo juizo de direito da comarca de Quepém e cartorio do escrivão do 1 ° oficio Viegas vai ser vendido em hasta publica á porta do tribunal desta comarca no dia 8 de Janeiro proximo, pelas 9 horas, pela terceira vez e por qualquer preço que a praça der o predio rustico denominado "Biodi" da cultura de arroz, sito em Canvorem de Colomba, discrito na conservatoria desta comarca sob o n ° 18180 afl. 174 do livro B 49, avaliado por 175 rupias, penhorado nos autos de execução fiscal quo a Fazenda Nacional promove contra Bima Gauncarina, residente em Zambaulim e Rama Guiri Naique de Cacorá, como herdeiros dos executados Zaiú Gauncarina do Mangale e Emuna Naiquina de Cacorá, para pagamento da quantia de sessenta e sete rupias, sete tangas e e sete reis, proveniente da contribuição de registo por titulo gratuito do ano de 1910 a 1911, alem de juros da mora sêlos e custas do processos como tudo consta do primeiro edital passado em nove de Outubro último e segundo passado em sete de Novembro, afi, ados respectivamente nos lugares marcados na lei, nas datas de nove de Outubrod e nove de Novembro tambem ultimos. O arrematante pagará a contribuição de registo nos termos de lei e as despezas da praça além do preço da mesma dentro de três dias;— São por êste citados todos os credores incertos dos mesmos executados bem assim os co-proprietarios e quinhoeiros para deduzirem seus direitos nos termos e para os efeitos da lei. Para ser público se expediu este. Quepêm 14 de Dezembro de 1931.

O escrivão into. do 1 ° Ofi.
Voicanta Zoivonta Sinai
Verifiquei a exatidão
O juiz de direito
Raul A. Correia

Pelo juizo de direito da comarca de Quepém e cartorio do escrivão do 2 ° oficio Carapurcar vão á praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca no dia 15 do seguinte mez de Janeiro, pelas nove horas, pela primeira vez e pelo maior lanço que se oferecer, acima

वाटण्यांत आलीं व गोपालकृष्णाच्या जयजयकारांत जयंती समाप्त झाली.

—श्रीभूमिका विद्यालय, हणजूण–बार्देश या विद्यालयामार्फत ता. २०–१२–३१ रोजीं श्रीगीताजयंती पुढील कार्यक्रमानें साजरी झाली:—सकाळीं ७ वाजतां श्रीगीताग्रंथ, श्रीकृष्ण प्रतिमा व गोमाता यांचें पूजन व प्रार्थना; ८ वाजतां गीतापाठ परीक्षा (अ. ११ व्यांतील विराट स्वरूपवर्णन, इयत्ता ३ री व ४ थी; गीतागुह्य इयत्ता २ री, १ ली व बालवर्ग); १० वाजतां गोमंतक गीताधर्ममंडळाकडून आलेलीं पुस्तकें वांटण्यांत आलीं. सायंकाळीं ५ ते ८ पर्यंत शाळेंतील मुलांसह सार्वजनिक जंगी मिरवणूक निघाली.

—श्रीरामदासविद्यालय खोर्ली–म्हापसें–गोवा येथें शु. ११ शी रोजीं जयंत्युत्सवानिमित्त पुढील कार्यक्रम पार पडला:– सकाळीं ८ वाजतां श्री. विनायक नारायण लांजेकर याच्या घरांतून श्रीगोपालकृष्णाची तसबीर व गीतापुस्तक शाळेंतील मुलांसह वाजत गाजत भजन करीत सदर विद्यालयांत नेऊन विद्यालयाचे चालक श्री. भगवंत नारायण लांजेकर यांनीं पूजा केली आणि प्रत्येक मुलांमुलींनें श्रीस गंधाक्षता पुष्पें समर्पण केलीं. नित्य नियमाप्रमाणें श्रीसूर्यनारायणास नमस्कार घातले. मुलांमुलींनीं पाठ केलेले गीतेंतील श्लोक व श्रीसमर्थांचे मनाचे श्लोक म्हणून दाखविले. नंतर श्रीकृष्णाची ~~प्रार्थना आणि~~ आरत्या वगैरे होऊन प्रसाद वांटण्यांत आला. संध्याकाळीं ५ वाजतां वे. शा. संपन्न बाबी भट यानीं मुलांची गीता पठणाची परीक्षा घेतली व गीतेवर प्रवचन केलें. त्यांच्याच हस्तें गोमंतक गीताधर्ममंडळातर्फे वे. काकतकर यांकडून आलेलीं पुस्तकें नंबराप्रमाणें मुलानां बक्षिसादाखल वाटण्यांत आलीं. त्याचप्रमाणें गीताधर्ममंडळाकडून आलेल्या धर्माची विटंबना, भयंकर रोगांपासून बचावण्याचा उपाय, शराब कीं सैतान ? अथवा दारूची दारूणता, गाईचा हंबरडा वगैरे पत्रकें श्री. भगवंत नारायण लांजकर यांनीं वाचून दाखविलीं. गीतापठणांत चौथ्या इयत्तेंत पहिला नंबर मोगाबाई सुबाय दलाल हिला व बालवर्गांत १ ला नंबर तुळशीबाई भगवंत लांजेकर हिला मिळाला. नंतर आरत्या वगैरे होऊन प्रसाद वांटण्यांत आला. दुसेर दिवशीं सकाळीं १० वाजतां श्रीकृष्णाची तसबीर व गीतेचें पुस्तक आदल्या दिवसाप्रमाणें भजन करीत रा. विनायक ना. लांजेकर यांच्या घरीं परत पोंहोंचविण्यांत आलीं. तेथें त्यानीं मुलानां खाऊ वाटला.

—माशेल मराठी शाळा या संस्थेंतील माजी व चालू विद्यार्थी व विद्यार्थिनींकडून श्रीगीताजयंत्युत्सव साजरा करण्यांत आला. शाळेंत सकाळीं गीतापूजन झालें. विद्यार्थ्यांकडून पाठ करून घेतलेल्या गीतेंतील श्लोकांची परीक्षा प्राणाचार्य डॉ. सुखटणकर यांनीं घेतली. दुपारीं ४॥ वाजतां शाळेंतून श्रीगीताग्रंथाची पालखींतून मिरवणूक निघून ती श्रीदेवकीकृष्ण सभामंडपांत आली. त्या ठिकाणीं विद्यार्थ्यांकडून ईश-स्तवन, स्वागतपर पद्यगायन, नमस्कार, सूत काढणें इ. झाल्यावर– प्रा० डॉ. वि. भा. सुखटणकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सभा होऊन भ. भक्त श्री. रा. कृ. कामत चंदगडकर ह्यांचें गीतेंतील विषयासंबंधानें सुश्राव्य व्याख्यान झालें. गीतापाठ परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस अध्यक्षांच्या हस्तें बक्षिसें देण्यांत आलीं. अध्यक्षांनीं गीतेचें महत्व, उपयोग इ. सांगून ग्रामस्थमंडळीस शाळेसाठीं प्रशस्त जागा तयार करण्याबद्दल कळकळीची विनंति केली. गोमंतक गीता–धर्ममंडळ मडगांव व भ० भक्त रा. रा. कृ. कामत चंदगडकर ह्यानीं उत्सव प्रसंगीं पाठविलेल्या पुस्तकादिकांबद्दल संतोष व आभार प्रदर्शित करून शाळेतील बालविद्यार्थी राधाकृष्ण विठ्ठल लवंदे ह्यानें अध्यक्षांच्या सूचनेस अनुमोदन देणाच्या कामीं दाखविलेल्या सभाधीटपणाबद्दल योग्य शब्दांनीं गौरव केला. नंतर रा. रा. विष्णु रामचंद्र करंडे यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर राष्ट्रगीत वगैरे होऊन सभा विसर्जन करण्यांत आली.

—केपें येथील गीताजयंत्युत्सव ता. २० रोजीं सकाळीं सुरू होऊन ता. २३ रोजीं रात्रौ समाप्त झाला. भारतकार हेगडे देसाई यानीं रा. जयराम पां. शिरवैकर यांच्या सहाय्यानें प्रथम दिनीं सकाळीं श्रीगीताग्रंथाची विधियुक्त स्थापना केली. ही स्थापना येथील श्रीलक्ष्मीमंदिरांत जेथें बालोन्नतिसमाजाचें मराठी विद्यालय व वाचनालय या संस्था आहेत तेथें झाली. उत्सवाच्या पहिल्या दोनहि दिवसांत भजन, पूजन व आरत्या इतकाच कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाशिवाय तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं विद्यालयाच्या मुलांमुलींकडून गीतागुह्य म्हणवून घेऊन गोमांतक–गीताधर्ममंडळाकडून आलेलीं गृहशिक्षण मालेचीं पुस्तकें व गोरक्षण-जागृतीचीं पत्रकें वांटण्यांत आलीं. दो. जयवंत घनःश्याम मळकर्णेकर, रा. सदाशिव प्रभू भाटिकर व रा. जना विष्णु कामत यानीं मुलांच्या परीक्षा घेतल्या व सामुदायिक प्रार्थनेनंतर तिसऱ्या दिवशींचा कार्यक्रम आटोपला. चवथ्या व शेवटच्या दिवशीं भारत कचेरींतून गोमाता व गीता यांची भजन करीत मिरवणूक निघून ती विद्यालयांत आली. तेथें गोपूजन झाल्यावर श्री. भाटिकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली. सभेंत भारतकार हेगडे देसाई, अध्यक्ष भाटिकर, मळकर्णेकर व जना कामत यांचीं भाषणें झालीं. अध्यक्षांनीं शाळेचे उत्साही व प्रेमळ अध्यापक रा. अनंत शंकर देशपांडे यांच्या गीतागुह्य पठणाचे कामीं १६ मुलगे व सहा मुली तरबेज केल्याबद्दल गौरव केला. सर्व वक्त्यांनीं गीतेच्या शिकवणीचें महत्व श्रोत्यांच्या मनावर बिंबवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. शेवटीं उत्सव उत्तम रीतीनें पार पडण्यासाठीं ज्यानीं अविश्रांत श्रम केले असे रा. देशपांडे, अध्यक्ष भाटिकर, वक्ते व पाहुणे या सर्वांचे रा. श्रीपाद नी. भेंडे यानीं आभार मानल्यावर सभेचें काम सपलें. नंतर धार्मिक कार्यक्रम साजरा झाल्यावर उत्सव समाप्ति झाली.

—सांखळी गोवा येथें विद्याप्रसारक–संघाच्या विद्यमानें श्रीमुरलीधर विद्यालयांत रविवारीं संध्याकाळीं गीताजयंत्युत्सव साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं श्रीकृष्णाची धेनु व भगवद्गीता यांसह असलेली प्रतिमा व भगवद्गीता ग्रंथ यांचें पूजन झालें. नंतर ईशस्तवन, स्वागतपर पदें झाल्यावर विद्यार्थ्यांच्या गीतेच्या १२ व्या अध्यायाच्या पाठाच्या परीक्षा घेऊन त्यांस गीताधर्ममंडळाकडून आलेलीं पुस्तकें वाटण्यांत आलीं. नंतर ह. भ. परायण रशिनकरबुवा यांचें गीतेवर प्रवचन झालें. रीतसर आभार प्रदर्शन वगैरे झाल्यावर श्रीगोपालकृष्णाच्या जयजयकारांत समारंभ आटोपण्यांत आला.

—रायबंदर येथील श्रीरामदास विद्यालयांत गीताजयंती श्री. हरी विठ्ठल राणे यांच्या अध्यक्षतेखालीं २ दिवस साजरी करण्यांत आली. प्रथम दिनीं गीतापूजन आरत्या होऊन समयास अनुरूप असें शिक्षक यशवंतराव केशव मोरजे यांचें गीताधर्मावर भाषण झालें दुसऱ्या दिवशीं श्री. रामभाऊ लवंदे, संपादक पतित पावन, यांचें ‘ श्रीकृष्णाचा उपदेश ’ या विषयावर भाषण झालें आणि मुलांकडून गीताश्लोक म्हणण्यांत येऊन, गोमंतक गीताधर्म मंडळाकडून आलेलीं पुस्तकें श्री. लवंदे यांच्याच हस्तें वाटण्यांत आलीं.

—ता. २०–१२–३१ रोजी युवकसंगानें [बागाळी गोवा] येथें गीताजयंत्युत्सव थाटानें साजरा केला.

सखाराम सदाशिव नाटेकर



Sacarama Sadassiva Natecar

स्वपराक्रमानें वैभवास चढलेले म्हापसें येथील सु–प्रसिद्ध धर्मनिष्ट वैश्य श्री. सखाराम सदाशिव नाटेकर यानीं तेथील श्रीमारुतीच्या देवालयांत त्रिकाल चौघडा वाजविला जाण्यासाठीं १० हजार रुपयांची देणगी दिल्याबद्दल भारत त्यांचें गौरवयुक्त अभिनंदन करीत आहे.

आपल्या तीव्र बुद्धिमत्तेनें सखारामरावजीनीं व्यापारांत श्रेष्ट दर्जा संपादन केलाच होता. उपरोक्त देणगीनें त्यानीं आतां आपलें नांव दानशूरता प्रगटवून अजरामर केलें आहे. देशकार्य हें जसें सत्कार्य तसेंच देवकार्यहि सत्कार्यच असल्यानें, अशा सत्कार्याप्रीत्यर्थ नाटेकरानीं व्यक्त केलेला स्वार्थत्याग केव्हांहि भूषणीयच होय.

देशकार्य असो, देवकार्य व समाजकार्य असो; या सर्व सार्वजनिक कार्यांत दृढतरता उत्पन्न होऊन ती यशस्वी होण्यास व्यापारी वर्गाचीच दानशूरता प्रमुखत्वानें पुढें येणें जरूर असतें. याहि दृष्टीनें सखारामरावजीनीं आपल्या थोर कृतीनें गोमांतकीय व्यापारी वर्गाच्या दानशूरतेला दिलेली चालना अनुकरणीयच होय. म्हणून आह्मांप्रमाणेंच गोमांतकांतील सर्व हिंदुजनता नाटेकरांचें कौतुक करील, अशी आह्मांस उमेद आहे.